म. ग्रं. सं. ठाणे
विषय चरित्र
सं. क्र. १३०७
११५५६

अनु. पां. वा. गाडगीळ

# धैर्यशीलांचीं शब्दचित्रें

१९५७चें "पुलिट्झर पारितोषिक" प्राप्त झालेला ग्रंथ

REFBK-0010322

…मान्य अमेरिकनांच्या
जीवनांतील कसोटीचे क्षण

# धैर्यशीलांचीं शब्दचित्रें


पुरस्कार ५

प्रस्तावना १३

१. मनोधैर्य आणि राजकारण १४

२. जॉन क्विन्सी ॲडॅम्स ४०

३. डॅनियल वेब्स्टर ६३

४. थॉमस हार्ट बेन्टन ८१

५. सॅम हाऊस्टन ९९

६. एडमंड जी. रॉस १२२

७. लुसिअस क्विटस सिनसिनॅटस लामार १४८

८. जॉर्ज नोरिस १७८

९. रॉबर्ट ए. टॅफ्ट २०१

१०. आणखी कांहीं धैर्यवंत २१८

११. धैर्याचा अर्थ २२७

# प्रस्तावना

राजकारणांत वैय्यक्तिक वाद व हमरीतुमरी यांना विशेष महत्त्व येतें. एकदां लोकप्रियतेच्या शिखरावर पोचलेला पुढारी दुसऱ्या वेळीं लोकनिंदेच्या भट्टींत सापडतो.

राजकारण हें असें धकाधकीचें असल्यानें निवळ विद्वत्ता, सौंदर्य, कला वगैरेची आवड असणारे व साधुवृत्तीचे लोक राजकारणांत पडत नाहींत. म्हणून लोकशाहीच्या राजकारणांत आढळणारीं माणसें धकाधकीप्रिय, लोकप्रियतेचीं आवड असणारीं, त्याचबरोबर सार्वजनिक कामकाजाबद्दल उत्साह बाळगणारीं अशीं संमिश्र गुणाचीं म्हणजे रजोगुणी असतात. अशा लोकांत कांहीं माणसें एकाद्या तत्त्वासाठीं प्रसंगविशेषीं लोकप्रियतेचा त्याग करून प्रखर लोकनिंदेस तोंड देण्यास तयार होतात. अर्थात् हीं माणसें सर्वथैव सज्जन अशीं नसतातच. पण अशा माणसास एकाद्या लेखकानें 'वीर' बनवायचें ठरविलें तर तो लेखक आपल्या 'वीरा'चे दोष लपवून त्याला नुसत्या गुणांनीं मढवितो.

पण जॉन केनेडी यानें रेखाटलेलीं अमेरिकन धैर्यशीलांचीं हीं शब्दचित्रें अशा सर्वसद्गुणमंडित सज्जनवीरांचीं नाहींत. सांगितलें आहे : सर्वसामान्य गुणदोषांच्या माणसांचीं हीं चित्रें असून विशिष्ट तत्त्वासाठीं त्यांनीं विशिष्ट प्रसंगीं अतुल मनोधैर्य दाखविलें आहे.

अमेरिकेंतील लोकशाही ही ब्रिटनसारखी साचेबंद, परीटघडीची, सभ्य व नाजूक लोकशाही नसून ती बरीच दांडगाईखोर व कणखर आहे. यामुळें तेथल्या लोकशाहीच्या घडामोडींत बोधप्रदतेबरोबर नाट्यपूर्ण मनोहरताहि आहे. केनेडीनें अमेरिका स्वतंत्र झाल्यापासून अगदीं दहा वर्षांपूर्वींपर्यंतच्या काळांतील निवडक पण प्रातिनिधिक अशा धैर्यवान व्यक्तींच्या आयुष्यांतील कांहीं घटना, त्यांच्या धैर्यशीलतेचें चित्र रंगविण्यासाठीं, फार आकर्षकपणें व मार्मिकपणें सांगितल्या आहेत.

भारताच्या दृष्टीनें या सर्व कथांचें एक वैशिष्ट्य आहे. मुख्यतः अमेरिका ( यू. एस्. ए. ) एकसंध राहावी व तिच्या राज्यघटनेची प्रतिष्ठा निष्कलंक आणि श्रेष्ठ राहावी यासाठीं आपल्या लोकप्रियतेवर उदक सोडून प्रखर लोकनिंदेस तोंड दिलेल्या धैर्यवंतांचीं हीं चित्रें आहेत. भारताला आज या ध्येयनिष्ठेचीच गरज आहे.

**पां. वा. गाडगीळ**

९०३२२

# पुरस्कार

जॉन ब्राईट एकदां म्हणाला "माणसें जीं महान मुत्सद्दी ठरतात, तीं कांहीं केवळ मोठ्या अधिकाराच्या जागीं गेल्यामुळें नव्हे; मोठेपणाची पदवी प्राप्त होण्याला याहून अधिक गुण त्यांनीं व्यक्त केले असले पाहिजेत. धैर्य हा एक असा गुण आहे." सिनेटर केनेडी यांनीं आपल्या ग्रंथांत एका विशेष प्रकारच्या धैर्याची चर्चा केली आहे. एकाद्या पार्लमेंटरी पुढाऱ्याला आपल्या एखाद्या तत्त्वाच्या पुरस्कारासाठीं आपले सहकारी, आपले मतदार आणि जनतेचें बहुसंख्य लोकमत यांच्या प्रक्षोभास जेव्हां तोंड द्यावें लागतें तेव्हां त्या प्रसंगीं लागणारें धैर्य हा केनेडीच्या ग्रंथाचा विषय आहे. अमेरिकन कॉंग्रेसच्या इतिहासांतील, मुख्यत: सिनेटच्या इतिहासांतील धैर्यवंतांचीं उदाहरणें त्यानें निवडलीं असून तीं विविध, संस्मरणीय व मनावर ठसा उमटविणारीं आहेत. केनेडीच्या लिखाणांत प्रत्येक नायकाच्या चरित्रांतील घटना मार्मिकतेनें सांगितलेल्या आहेत, इतकेंच नव्हे तर तत्कालीन लोकांच्या भावना व विचार यांचेंहि संपूर्ण ज्ञान केनेडी याला असलेलें त्यांत दिसून येतें. हा ग्रंथ वाचतांना मनाला इतका चटका लागतो कीं, तो कडेपर्यंत भराभर वाचत गेल्यावांचून पुस्तक खालीं ठेववत नाहीं आणि पुस्तक संपल्यावरच, केनेडीला जो नागरिक सद्गुणांचा धडा वाचकाच्या मनावर बिंबवावयाचा आहे तो मनावर बिंबतो. या ग्रंथांत इतिहास, व्यावहारिक राजकारण आणि भरीव नैतिक तत्त्वांचा पुरस्कार या सर्व गोष्टींचें एकसंध विवेचन इतकें चांगलें आलें आहे कीं, केनेडीनें या ग्रंथाच्या द्वारां खरीखुरी लोकसेवा केली आहे असें मला म्हणावेंसें वाटतें.

सिनेटर केनेडी आपल्या ग्रंथाच्या पहिल्या प्रकरणांत म्हणतो त्याप्रमाणें, धैर्य हा अनेक पैलु असलेला एक हिरा आहे. त्याची मोहकता तो जसा बसवावा त्यावरून ठरते. धैर्य हा सद्गुण सरळ आणि साधा नव्हे; त्याचे हेतु अनेकदां फार संमिश्र असतात. सार्वजनिक राजकीय जीवन हें ओबडधोबड आणि

ठेंचाळ असतें. त्यांत अनेक मोह आणि अवजड दडपणें असतात. कित्येकदां तडजोड करण्यांतच प्रामाणिकपणा दिसत असतो. अमुक एक सर्वोत्तम पण असाध्य ध्येय उराशीं बाळगण्यापेक्षां थोड्या कमी दर्जाचें पण व्यवहार्य असें ध्येय कां पदरांत पाडून घेऊं नये, असा प्रश्न नेहमीं पुढें उभा रहात असतो. अशा वेळीं कोणता मार्ग हा धैर्याचा, कोणता माथेफिरूपणाचा आणि कोणता भेकडपणाचा याचा निर्णय देणें हें सोपें काम असत नाहीं. ग्रोव्हर क्लिव्हलंड १८९४ सालच्या अमेरिकेंतील परिस्थितीबाबत म्हणतो " मनाला विशेष चिंता आणि खिन्नता आणणारे हे दिवस आहेत. आजचा आपल्यापुढील मार्ग जितका खडकाळ आहे तितका खडकाळ मार्ग इतिहासांत क्वचितच लागतो". चिंता हा एकच शब्द अनेक महामुत्सद्यांच्या जीवनांत त्यांना अतिशय अनुभवानें माहिती होता. वॉशिंग्टन, लिंकन यांसारख्या थोर पुरुषांनाहि आपलें धैर्य कोणत्या मार्गानें न्यावें याचा नेहमींच उलगडा होत नसे. उदाहरणार्थ ग्रीलीच्या मतें लिंकननें अमक्या वेळीं गुलामगिरीच्या नाशाचा नेटानें पुरस्कार करावयाला हवा होता. पण माझें मत असें आहे कीं ग्रीली म्हणत होता त्याकाळीं जर लिंकननें तसें धैर्य दाखविलें असतें तर तें धैर्य अकालीं ठरलें असतें. राजकारणांत धैर्य अथवा इतर असेच सद्‌गुण जे लागतात त्यांचें महत्त्वमापन करतांना आपण कोणता दृष्टिकोन अवलंबितों त्यावर आपलें महत्त्वमापन बरेचसें अवलंबून असतें.

केनेडीच्या या ग्रंथाचा एक मोठा गुण म्हणजे, त्यानें दिलेलीं धैर्यशीलांचीं उदाहरणें हीं सर्व खरीं, स्पष्टपणें मांडलेलीं आणि एकंदरीनें पहातां विधायक दृष्टिकोनानें मांडलेलीं आहेत हा होय. अ‍ॅडॅम्स्, वेब्स्टर, हाऊस्टन्, रॉस्, नोरिस या सर्वांनीं जें धैर्य दाखविलें तें अतिशय उदात्तपणें व फार थोर उद्दिष्टांसाठीं दाखविलें आहे. उत्तरेकडील प्रदेशांतले गुलामगिरीनाशाचे पुरस्कर्ते आणि दक्षिण प्रदेशांतील गुलामगिरीचे पुरस्कर्ते या दोघांनींहि यादवी-पूर्व कालांत जो माथेफिरूपणा प्रगट केला त्याचा बराचसा अंश वरील महापुरुषांनीं व्यक्त केलेल्या धैर्यांत होता. योग्य धैर्य आणि माथेफिरूचें धैर्य यांमधील फरक जॉर्ज फ्रेस्बि होअर या लेखकानें चार्ल्स् सुम्नर याचें स्वभाव-चित्र रेखाटतांना स्पष्ट केला आहे. होअरच्या मतें " सुम्नर हा माथेफिरू होता. प्रत्येक प्रसंगाला तो नैतिक सिद्धान्ताची कसोटी लावी. आपल्या अंतःकरणां-तील नैतिक प्रेरणेनें अमुक एक आदेश निर्धारानें दिला म्हणजे बहुमत विरुद्ध

असलें अथवा घटनेच्या मर्यादा आड आल्या तरी अशा कशाचीहि पर्वा करण्याचें कारण नाहीं. असे सर्व अडसर बाजूस सारून नैतिक प्रेरणेचा आदेशच पाळावा असें सुम्नरचें तत्त्व होतें." होअरच्या मतें असलें धैर्य हें खोटें आहे. जें धैर्य राज्यघटनेचा अवमान करतें तें धैर्य उदात्त कसें ठरेल ? अत्यंत अनावर आणि स्फोटक अशा स्वभावामुळें निर्माण होणारें धैर्य हाहि एक खोट्या धैर्याचाच प्रकार आहे. रोनोकचा जॉन रँडॉल यानें १८१२च्या युद्धाला विरोध करण्यांत फार मोठें धैर्य दाखविलें. तो नेहमीं बेडरपणानें वागे. अनेक वेळां त्याच्या बुद्धिमत्तेची चमक दिसून आली. पण नेहमींच तो इतका चिडखोर, युक्तिवाद-शून्य, शिवराळ व चुकीच्या मार्गाबद्दल आग्रह धरणारा होता कीं, आयुष्यभर त्याचा धैर्यशीलपणा वायाच गेला. एखाद्या चांगल्या गोष्टीस दुराग्रहानें विरोध करणारा मनुष्य जें धैर्य दाखवितो तेंहि असेंच अनिष्ट ठरतें. सिनेटर जॉर्ज एडमंड्स् हा या प्रकारचा माणूस होता. एकानें त्याचें वर्णन केलें आहे "जॉर्ज एडमंड्स् हा जर जगांत एकटाच असता तर तो स्वतःशींच भांडत राहिला असता. एडमंड्सनें एखादी गोष्ट सुचवावी व जॉर्जनें तिला विरोध करावा असें आयुष्य त्यानें घालविलें असतें."

केनेडीनें दिलेलीं विविध उदाहरणें याहून वेगळ्या जातीचीं आहेत. यांतील प्रत्येक नायकानें दाखविलेलें धैर्य दूरदृष्टीचें असून अमेरिकन राज्याची नौका योग्य मार्गावर रहावी अशा चिंतेनें व्यक्त केलेल्या धैर्याचीं हीं उदाहरणें आहेत. आपल्या राष्ट्राची अब्रु राखण्याकरितां अॅडॅम्सनें एकदां आपला पक्ष सोडला व आपला प्रदेशहि सोडला. पुढें अर्ज करण्याच्या हक्कासाठीं झगडतांना त्याला फार मोठ्या विद्वेषाच्या वादळास तोंड द्यावें लागलें. डॅनियन वेब्सस्टरच्या चरित्रांतील घटना अशी आहे कीं, क्ले यानें पुरस्कारलेल्या तडजोडवादी भूमिकेची कड घेतांना आपल्या पक्षांतले अर्धेअधिक लोक आणि जवळ जवळ न्यू इंग्लंडची सारी जनता आपला धिःकार करील, कवि व निबंधकार आपणांस सापासारखा दंश करतील हें वेब्स्टरला माहिती होतें; पण ७ मार्चचें तें प्रसिद्ध भाषण त्यानें हा सारा धोका पत्करून केलें.

सिनेटर केनेडी यानें दिलेल्या उदाहरणाबाबत लक्षांत ठेवण्यासारखी एक गोष्ट अशी आहे कीं, त्यांतील अनेक पार्लमेंटरी पुढाऱ्यांनीं "आपले मतदार चुकत आहेत, त्यांचें न ऐकता मी माझें मतच मांडीन," असें म्हटलें आहे.

आणण्यांत आलें. पण राज्यसत्ता ही लोकांची आहे हें तत्त्व त्यानें सोडलें नाहीं. आपल्या या हट्टामुळें आपण राष्ट्रपतिपदाची उमेदवारी मिळण्याची सुवर्णसंधि दवडत आहों हें त्याला माहित होतें. पण तो विचार त्यानें बाजूस सारला. हाएस हा अध्यक्ष असतां विल्यम ए. व्हीलर याचें सिनेटर कॉक्लिन बरोबर एक संभाषण झालें. त्यांत व्हीलरनें जो धैर्ययुक्त प्रामाणिकपणा दाखविला होता तसा प्रामाणिकपणा या वेळीं डग्लसनें दाखविला. कॉक्लिन व्हीलरला म्हणाला, "व्हीलर, तूं जर आमच्या बाजूला रहाशील तर न्यूयॉर्क राज्यांत अशी एकहि देणगीलायक वस्तु नाहीं कीं जी तूं मागून तुला मिळणार नाहीं." कॉक्लिन हा न्यूयॉर्कमध्यें जवळजवळ सर्वसत्ताधारी असल्यानें तो आपल्या अधिकाराच्या जाणीवेनें बोलत होता. पण व्हीलरनें त्याला उत्तर दिलें, "मि. कॉक्लिन, मी जर माझा स्वाभिमान गमावला तर न्यूयॉर्क राज्यांत अशी कोणतीहि देणगी नाहीं कीं जिनें माझें तें नुकसान भरून येईल." सिनेटर डग्लस लिकॉन्टनघटना नाकारतांना इतक्या धैर्यानें वागला.

सिनेटर केनेडीच्या पुस्तकांतील जॉर्ज नोरिसवरचें प्रकरण विशेष बोधप्रद आहे. जॉर्ज नोरिस आणि ला फॉलेटी यांनीं विशेष प्रकारचें विधायक धैर्य दाखविलें. नोरिस व ला फॉलेटी यांचें हें धैर्य अमेरिकन कायदेमंडळांच्या इतिहासांत अपवादात्मकच होतें. 'अमेरिकन कॉमनवेल्थ' या ग्रंथांत ब्राईस म्हणतो, "अमेरिकन मुत्सद्दी एकादी बाजू मांडतांना भित्रे व सूचना करतांना बालिश असतात." जें धैर्य वाईट योजनांना विरोध करते अशा धैर्यापेक्षां चांगल्या योजनांचा पुरस्कार करणारें धैर्य हल्लीं वाढतें आहे असें केनेडीला वाटतें. असें वाटण्याला केनेडी यानें कांहीं कारणें दिलीं आहेत. धैर्यप्रदर्शनाला आवश्यक असणाऱ्या गोष्टी बदलल्या आहेत असें केनेडी प्रांजळपणें सांगत आहे. ब्राईसच्या लापासून दडपण आणणाऱ्या गटांची संख्या वाढली आहे, तें अधिक संघटित झाले आहेत. त्यामुळें ते अधिक सामर्थ्यवानहि झाले आहेत. अमेरिकेंतल्या दोन प्रचंड कामगारसंघटनांच्या मीलनानंतर कामगारांची शक्ति धंदेवाल्यांच्या इतकीच वाढली आहे. धंदेवाले खूप संघटित असून अतिशय वर्गजागृत झाले आहेत. अमेरिकेंत शेतकऱ्यांचीं कुटुंबें सुमारें ५० ते ६० लक्ष असून अनेक राज्यांवर त्यांचें राजकीय प्रभुत्व आहे. म्हणून शेतकरीहि सामर्थ्यवान झाले आहेत; आणि हे तीन गट म्हणजे सामर्थ्यवंतांच्या यादीची फक्त सुरुवात आहे.

अमुक एका खास गटाचा पराभव करावा या महत्त्वाकांक्षेपेक्षां धैर्यानें सर्व बाजूंची नीट पहाणी करणें अवश्य आहे असें केनेडीचें मत दिसतें. या मुद्या-संबंधानें सिनेटर केनेडी यानें कांहीं बोधप्रद विचार मांडले आहेत. त्याच्या मतें अमुक एक हितसंबंधाचा पराभव ही कल्पनाच चूक दिसते. कारण अनेक हितसंबंधांना न्याय्य उद्दिष्ट असूं शकतें. पूर्वींच्यापेक्षां आजच्या काळीं प्रतिनिधि-सभेंत व सिनेटमध्यें अधिक तज्ज्ञ सभासद आहेत असें केनेडी म्हणतो. निदान नोरिसमध्यें तरी धैर्य आणि शहाणपण एकवटलें होतें. यामुळेंच, इतर लोक दारू-बंदी आणि धर्म या खोट्या मुद्यांवर निवडणूक लढवीत असतां नोरिसनें शेतकऱ्यांना साहाय्य आणि सार्वजनिक वीजशक्ति हे मुद्दे निवडणूकलढ्यांत मांडले.

नैतिक धैर्य हें थोर तत्त्व असून तें आपल्या परीनें प्रशंसनीय आहेच. पण त्याच बरोबर एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे कीं, धैर्य हा माणसाचा स्वतंत्र गुण नसून तो, माणसाचें जें एकंदर शील त्याचाच भाग असतो. शील नसलेला मनुष्य एकादे वेळीं लहरींत येऊन मोठा बेडरपणा दाखवूं शकेल. पण माणसाचें शील श्रेष्ठ असल्यावांचून तो सर्व वेळीं सुसंगतपणें धैर्यशील राहूं शकत नाहीं. ज्याच्या अंगीं खरें कणखर शील असेल त्याला सुसंगत धैर्याची कधींच वाण पडणार नाहीं. प्रामाणिकपणा, अंतःकरणापासूनची कळकळ, कठोर तत्त्वनिष्ठा, प्रांजळपणा, निर्धार इत्यादि ज्या सद्गुणांनीं माणसाचें श्रेष्ठ शील बनत असतें त्यांतलाच नैतिक धैर्य हा एक सद्गुण आहे.

राज्यकारभारांत अमेरिकन लोक बुद्धिमत्तेपेक्षां शीलाला अधिक मान देतात ही गोष्ट निर्विवाद आहे. खरोखर बौद्धिक बारकाव्यानें अथवा फार हुशारीनें वागणाऱ्या माणसाबद्दल अमेरिकन लोकांना थोडा अविश्वासच वाटतो. बौद्धिक हुशारीच्या मागें श्रेष्ठ शील असलें पाहिजे असें त्यांचें म्हणणें असतें. इतिहासांत कायदेमंडळांतील श्रेष्ठ धैर्याचें उदाहरण जॉन हॅमडन् याच्या एवढें कुणाचेंच सांपडणार नाहीं. थिओडोर रुझवेल्ट त्याचा फार मोठा चाहता होता. हॅमडन्‌ची बुद्धिमत्ता मोठी कार्यक्षम असे. त्याला कामाचा उरकहि खूप होता. परंतु त्याचें जें अफाट वजन होतें तें त्याच्या बुद्धिमत्तेमुळें नसून त्याच्या शीलामुळें होतें. मेकॉलेनें म्हटल्याप्रमाणें हॅमडन् हा मोठा शीलश्रेष्ठ पुरुष होता. क्लॅरेंडन आपल्या "लॉंग पार्लमेंट"च्या इतिहासांत लिहितो "मला वाटतें दुसऱ्याचें भलें अथवा बुरें करण्याची हॅमडन्‌ची त्या वेळची शक्ति इतर कुणाहिपेक्षां मोठी होती.

कारण तो प्रामाणिक असल्याबद्दल सर्वांचें एकमत होतें. आणि त्याचा स्नेहभावहि इतका व्यापक होता कीं खाजगी स्वार्थाला त्यांत वावच नसे. वॉशिंग्टननें अमेरिकेला एका क्रांतींतून यशस्वीपणें पार केलें याला वॉशिंग्टनचें श्रेष्ठ शीलगुणच कारणीभूत झाले. लिंकन्च्या श्रेष्ठ शीलगुणांमुळेंच यादवींतून राष्ट्र एकजूटपणें बाहेर पडलें. अमेरिकन काँग्रेसच्या कोणाहि सभासदाला धैर्य हा एक स्वतंत्र गुण म्हणून व्यक्त करतां येणार नाहीं. त्यानें आपल्या एकंदर शीलाचें पोषण चांगल्या प्रकारें केलें पाहिजे.

पण मीं आणखी एक गोष्ट येथें सांगितली पाहिजे, ती ही कीं सर्वसामान्य अमेरिकन लोकांच्या अंगीं बरेचसें श्रेष्ठ शील असल्यावांचून अमेरिकन काँग्रेस-मध्यें येणारे प्रतिनिधि विशेष शीलवान निपजतील ही आशा व्यर्थ आहे. बोस्टन पासून सॅनडायगोपर्यंत पसरलेल्या असंख्य अमेरिकन जनतेजवळ जर शीलसंपत्ति नसेल तर वॉशिंग्टनमध्यें ती संपत्ति आढळणार नाहीं. लॉर्ड ब्राईस म्हणतो "अमेरिका ही सारी एकसंध आहे. अमेरिकेच्या संस्था या अमेरिकेच्या आर्थिक आणि सामाजिक परिस्थितीनें बनलेल्या आहेत. या संस्था अमेरिकेच्या शीलाच्या प्रतीक अशा आहेत." समर्थ अशी लोकशाही असली म्हणजे लोकांचें शील चांगलें होतें हें सत्य नसून लोकांचें शील चांगलें असलें तर समर्थ लोकशाही निर्माण होतें हें सत्य आहे. आमचें राष्ट्रीय शील कसें असेल त्यावरून कायदे-मंडळांतले आमचे प्रतिनिधि हे धैर्यवान असतील कीं भेकड असतील आणि आमचें राजकारण उमदें होईल कीं भिकार होईल हें ठरणार आहे. सिनेटर केनेडीनें हें जें सुंदर पुस्तक लिहिलें आहे त्याच्या ओळीओळींतून हेंच तत्त्व प्रतिपादिलें गेलें आहे. एखाद्या प्रसंगीं काँग्रेसमध्यें आणि देशांत दुर्गुणांचाहि वरचष्मा झाल्याचें त्यानें नमूद केलें आहे. विशेषत: यादवीनंतर ही दु:स्थिति आली होती. पण तत्त्वच्युतीचे हे प्रसंग फार काल टिकलेले नाहींत. अमेरिकन लोकांनीं तत्त्वनिष्ठा नेमस्तपणा, शिस्त व न्यायप्रीति हे आपले श्रेष्ठ गुण होत असें सिद्ध करीत राहून हे सद्‌गुण संकटांत आल्यास त्या सद्‌गुणांचा बचाव करण्याचें धैर्य दाखवावें. अमेरिकन लोक असे वागतील तर कायदेमंडळांतील त्यांचे प्रतिनिधिहि आपल्या अंगीं हे गुण आणल्यावांचून रहाणार नाहींत.

ॲलन नेव्हिन्स.

# प्रस्तावना

मी सिनेटमध्यें जाण्यापूर्वीं पुष्कळ वर्षें जॉन क्विन्सी अॅडॅम्स याच्या संबंधींचें एक वर्णन वाचलें. त्यांत, त्याच्या फेडरेलिस्ट पक्षाशीं झालेल्या झगड्याची हकिगत होती. तेव्हांपासून मतदारांच्या दडपणाविरुद्ध धैर्यानें वागण्याविषयींचे राजकीय प्रसंग कसे उद्भवतात याविषयीं मला जिज्ञासा वाटूं लागली. जुन्या काळच्या मुत्सद्यांच्या चरित्रांतून या प्रश्नांवर जो प्रकाश पडतो त्यामुळें या प्रश्नाकडे माझें लक्ष वेधलें. पुढें ऑक्टोबर १९५४ मध्यें पाठीच्या कण्यावर शस्त्रक्रिया केल्यामुळें बराच काळ मला हॉस्पिटलमध्यें पडून रहावें लागलें. त्यानंतर प्रकृति दुरुस्त करण्याकरतांहि बरीच विश्रांति घ्यावी लागली. त्यामुळें पूर्वींच्या त्या जिज्ञासाविषयाचें अधिक वाचन व संशोधन करण्याला मला पहिली मोठी संधि मिळाली.

मी कांहीं व्यवसायानें इतिहासकार नव्हे. या ग्रंथांतील वस्तुस्थिति, निवेदन व व्यक्त केलेलीं मतें यांत चुका झाल्या असल्यास त्या माझ्या आहेत. ज्यांनीं या ग्रंथाच्या तयारीसाठीं मला मदत केली त्यांचे मी मनापासून आभार मानतों. कोलंबिया विद्यापीठाचे प्रो. अॅलन नेव्हिन्स हे आजच्या आपल्या कालखंडांतील मोठे राजकीय इतिहासकार आणि चरित्रकार आहेत. त्यांनीं या ग्रंथाला माझ्या विनंतीवरून पुरस्कार लिहून दिला. शिवाय प्रो. नेव्हिन्स यांनीं माझें हस्तलिखित वाचून दोष दाखविले त्यामुळें तें हस्तलिखित पुष्कळ सुधारतां आलें. म्हणून प्रो. नेव्हिन्स यांचा मी फार आभारी आहे.

जॉन् एफ्. केनेडी.

प्रकरण १ लें—

# मनोधैर्य आणि राजकारण

माणसाच्या अंगांत असणारा सर्वश्रेष्ठ सद्गुण म्हणजे धैर्य. त्यासंबंधीं हें पुस्तक आहे. 'संकटांतहि उमेदपणा' अशी अर्नेस्ट हेमिंग्वे या लेखकानें धैर्य या सद्गुणाची व्याख्या केली आहे. अमेरिकेच्या ८ सिनेटरांनीं संकटाशीं झुंज देऊन जो उमेदपणा दाखवला त्या त्यांच्या उमेदपणाच्या, म्हणजे मनोधैर्याच्या या कथा आहेत. त्यांचें नांवलौकिक धोक्यांत आले, त्यांनीं पत्करलेले मार्ग लोकांत अप्रिय झाले, त्यांच्या शीलावर चिखलफेंक झाली आणि यांपैकीं कोणाचीं तत्त्वें सिद्ध होऊन त्यांचा नांवलौकिक जर उजळ झाला असला तर असे प्रकार फार क्वचितच घडले.

इतिहासकालीं थोर पुरुषांनीं सार्वजनिक जीवनांत मनोधैर्य दाखविलेल्या उदाहरणांचा ज्या राष्ट्राला विसर पडतो तें राष्ट्र विद्यमान पुढाऱ्यांनीं धैर्य दाखवावें असा आग्रह धरीत नाहीं अथवा एखाद्या थोर धैर्यशील पुरुषाचा गौरवहि करीत नाहीं. आम्ही अमेरिकन लोक आज या स्थितीला आलेले आहों. हेन्री क्ले याच्या राजकीय कारस्थानामुळें जॉन क्विन्सी अॅडॅम्स हा राष्ट्रपति झाला ही गोष्ट आमच्या लक्षांत राहिली असेल. परंतु ऐन तरुणपणीं अॅडॅम्सनें राष्ट्राची बाजू सांभाळण्यासाठीं सिनेटमधील आपलें वैभवदायी स्थान सोडून दिलें ही गोष्ट आम्ही विसरलों आहों. डॅनियल वेब्स्टर बहुतेक आयुष्यभर नॅशनल बँकेची भाडोत्री कामें करीत असे हें आमच्या लक्षांत राहिलें असेल. पण आपल्या कार-किर्दीच्या शेवटीं राष्ट्रहितासाठीं त्यानें सर्वस्वी त्याग केला हें आपण विसरलों आहों. आपण या गोष्टी केवळ विसरतों एवढेंच नव्हे, तर अशा गोष्टी लक्षांत असल्या तरी त्या आपणांस क्षुद्र वाटतात.

थोड्या वर्षांपूर्वीं एका वृत्तपत्रलेखकानें लिहिलें आहे, "एखादा सामान्य सिनेटर अथवा कॉंग्रेसमन काय बोलतो याला लोक कवडीचीहि किंमत देत

नाहींत. कॉंग्रेसमध्यें जें बोललें जातें त्यांतलें ९९ टक्के निरर्थक, अज्ञानपूर्ण आणि उगीचच बढाईखोर असतें. लोकांना तें विश्वसनीय वाटतच नाहीं. म्हणून लोक तीं भाषणें क्षुद्र मानतात."

१९व्या शतकांतल्या एका मंत्रिमंडळांतील एका सदस्यानें आपल्या डायरींत पुढील नोंद केली आहे. "सगळेंच्या सगळें सिनेट निर्बुद्ध आहे असें म्हणण्याची माझी तयारी नाहीं. पण बरेचसे सिनेटर प्रामाणिक अथवा सत्यनिष्ठ असतील असा भरंवसा नसतो. त्यांच्यांतले बहुसंख्य सदस्य अगदीं क्षुद्र, मनानें दुबळे आणि सिनेटर होण्याला सर्वथैव अपात्र असे असतात. कांहीं तर वाह्यात भाषणबाज असतात,....कांही श्रीमान असून त्यांनीं आपलें पद पैशानें खरेदी केलेलें असतें... कांहींची बुद्धि कोती, समजशक्ति संकुचित आणि वृत्ति हीनपक्षबाजीची, असे ते असतात."

१८व्या शतकांतील सिनेटच्या एका सभासदानें आपल्या सहकाऱ्यांना उद्देशून म्हटलें आहे: "लोकांचा आमच्यावरील विश्वास उडत चालला आहे, याचें कारण आपण दिरंगाईखोर झालों आहोंत."

हल्लींच्या सिनेटला हे ठाउक आहे कीं, अनेक अमेरिकन लोकांना सिनेटबद्दल आजहि असेंच वाटतें. लोक म्हणतात, "सिनेटर हे राजकारणी असतात; राजकारणी म्हटला कीं त्याला मतें मिळविण्याचीच काळजी असणार. महान मुत्सद्दी होण्याची अथवा मनोधैर्य दाखविण्याची महत्त्वाकांक्षा तो दाखवतोच कशाला !" स्त्रियांना अजूनहि आपलीं लाडकीं मुलें राष्ट्रपति व्हावीं असें वाटत असतें. पण राष्ट्रपति होण्याच्या क्रमांत त्यांनीं राजकारणी झालें पाहिजे ही गोष्ट मात्र स्त्रियांना मान्य नाहीं."

मग सिनेटमध्यें यापुढें धैर्यशील माणसें असणारच नाहींत असें मानायचें काय ?

वॉल्टर लिप्मन् या लेखकानें ५० वर्षें बारकाईनें निरीक्षण करून आपल्या अलीकडे लिहिलेल्या एका पुस्तकांत राजकारणी लोक आणि मतदारवर्ग यांच्या-संबंधानें पुढील कठोर अभिप्राय व्यक्त केला आहे. तो लिहितो :

"लोकशाहींतील राजकारणी लोकांत जे यशस्वी होतात ते मनानें चंचल आणि भेकड असतात. (याला अपवाद असतात ते इतके थोडे आहेत कीं ते सृष्टिचमत्कार असे मानावे लागतात.) आपल्या मतदारसंघांतील ज्यांच्या दम-दाटीला हे भितात अशांना ते खुष ठेवतील, मनधरणी करतील, लांच देतील,

मोहांत पाडतील, अथवा दुसऱ्या एकाद्या मार्गानें त्यांना खिशांत टाकतील तेव्हांच या राजकारणी लोकांची राजकीय प्रगति होऊं शकते. अमुक एक सिद्धांत हा चांगला आहे कीं नाहीं ही त्याच्या स्वीकाराची कसोटी ठरत नाहीं. तो व्यवहार्य अथवा स्वयंसिद्ध आहे कीं नाहीं याची पर्वा केली जात नाहीं. तो सिद्धांत लोकांना आवडला, खटाटोपी आणि वावदूकी लोक त्यावर खूष झाले म्हणजे तो सिद्धांत स्वीकारार्ह आहे असें मानलें जातें."

वॉल्टर लिप्मनचें हें मत मला मात्र मान्य नाहीं. गेलीं दहा वर्षें मी सिनेट-मध्यें आहें. "यशस्वी राजकारणी" लोकांत मी काम करीत आहें. पण ते सारे चंचल आणि भेकड लोक आहेत असें मानायला मी तयार नाहीं. सार्वजनिक कामकाज हें अतिशय किचकट असतें. लोकांचें लक्ष आपणाकडे वेधून घेण्यासाठीं चढाओढ करावीहि लागते. पण यामुळें सिनेटरांना राजकीय मनोधैर्य दाखविण्या-चे रोज जे अनेक लहानमोठे प्रसंग येतात ते लोकांच्या डोळ्यांत भरूं शकत नाहींत. माझी खात्री झाली आहे कीं आमचा अध:पात झाला हें जर खरें असेल तर तो सिनेटरांत कमी झाला असून लोकांच्या ग्रहणशक्तीचा अध:पात अधिक झाला आहे. राजकारण ही एक कला आहे. तडजोड वृत्ति आणि समतोलपणा यांची, सिनेट हें कायदेमंडळ असल्यानें, सिनेटमध्यें गरज असते हें लोकांच्या लक्षांत पुरेसें येत नाहीं. लोकांच्या लहरीबरोबर वहावत जाणाऱ्यावरहि आपण प्रतिकूल टीका करतों. लोकमताला विरोध करणाऱ्यावरहि टीका करतों. परंतु सिनेटराला आपल्या मतदारसंघाच्या मतालाहि मान द्यावा लागतो. खवळलेल्या व अंगावर उसळून येणाऱ्या सागराच्या लाटांतून आपली लहानशी नौका तडीस नेऊं इच्छिणाऱ्या प्रामाणिक सिनेटराला मोठ्या अडचणींतून वाट काढायची असते हें आपल्या लक्षांत पूर्णपणें कधींच येत नाहीं. सिनेटरावर इतकी भयंकर दडपणें असतात कीं,त्याचें राजकीय मनोधैर्य खचतेंच. त्या दडपणापुढें त्याची सदसद्विवेक-बुद्धि नमून जाते. आणि मग अवघडपेक्षां सोपा मार्ग पत्करण्याकडे सिनेटराची प्रवृत्ति होते. अशा सिनेटरावर येणाऱ्या दडपणांचा भयंकरपणा लोकांना कळला म्हणजे लोकांना सिनेटराबद्दल सहानुभूति वाटूं लागेल आणि अशा भयंकर दडपणां-नाहि जे सिनेटर टक्कर देतील त्यांचें लोक कौतुक करतील.

सिनेटरावर अनेक प्रकारचीं दडपणें असतात. ह्यांतला पहिला प्रकार मी सांगणार आहें तो लोकांच्या फारसा लक्षांत येत नाहीं. सर्वच अमेरिकन

लोकांना भले म्हणून घ्यावेसें वाटतें कीं नाहीं ? मग सिनेटर तरी त्याला अपवाद कसे असतील ? ते स्वभावतःच सामाजिक प्राणी असतात. आणि सिनेटर या नात्यानें त्यांनीं तसें असलेंच पाहिजे. आमच्या मित्रांनीं आणि सह-काऱ्यांनीं आमच्याबद्दल स्नेह दाखविला, आम्हांला शाबासकी दिली कीं आम्हांला आनंद होतो. शिव्या न मिळता ओव्या मिळाव्या, धिःकार न मिळता पुरस्कार मिळावा असें आम्हांला वाटत असतें. सदसद्विवेकबुद्धीस साक्ष ठेवून कुमार्गाविरुद्ध जो बंड करतो त्याला एकट्यानेंच वाटचाल करावी लागते. हा एकाकीपणा टाळण्यासाठीं आम्ही इतर सदस्यबंधूंच्या बरोबर जायला उत्सुक असतों. ज्या क्लबांत रहावें, त्या क्लबाचे नियम पाळावे, त्या क्लबाची रीतभात सांभाळावी, क्लबांतल्या इतरांना अडचण वाटेल, त्यांना संताप येईल असे वागा कशाला, असें आम्हांला वाटतें. आमच्या क्लबांत, म्हणजे सिनेटमध्यें आमचें वजन किती असणार ? आमच्या संबंधानें इतर सदस्यांचें मत जितपत चांगलें असेल तितपतच आमचें वजन असणार. आणि एखादी चांगली कामगिरी अथवा मतदारांची सेवा जी आम्ही करूं ती आमचें वजन असेल त्या प्रमाणांतच आम्ही करूं शकणार. मी जेव्हां सिनेटमध्यें आलों तेव्हां मला एक उपदेश करण्यांत आला; "सिनेटमध्यें जम बसायला हवा असेल तर इतराशीं जमतें घ्या" असा तो उपदेश होता.

हें 'जमतें घेणें' म्हणजे नुसता स्नेहभाव ठेवणें नव्हे. तडजोड केव्हां, कशी करावी आणि व्यवहार्य काय आहे, हें चटकन लक्षांत आलें तरच 'जमतें' घेतां येतें. कोणतीहि तडज़ोड म्हणजे नैतिक अधःपातच होय असा घाईघाईनें निर्णय घेऊं नये. कारण राजकारण अथवा कायदे हीं कधींच न वाकणारीं तत्त्वें नव्हेत. अथवा आकाशांतील ताऱ्यासारखीं असाध्य उद्दिष्टें नव्हेत. जॉन मोर्ले मोठ्या मार्मिकपणें म्हणतो "राजकारण हें एक असें क्षेत्र आहे कीं, तेथें करायची दीर्घकालीन कृति ही अव्वल दर्जाची नव्हे तर दुय्यम दर्जाची असावी लागते. बिनचूक गोष्ट करण्याची संधि तेथें मिळत नसून ही घोडचूक करूं कीं ती घोडचूक करूं असाच प्रश्न नेहमीं येतो." लोकशाहीत, विशेषतः संयुक्त राज्यघटनेंत व्यक्तिव्यक्तींच्या अथवा गटागटांच्या परस्परविरोधी इच्छांत तडजोड घडवूनच कायदे करावे लागतात.

हेन्री क्ले हा राजकारणांत अनुभवी व माहितगार होता. "तडजोड ही

सिमेंट असून तिनेंच अमेरिकन युनिअन सांधून धरली आहे" असें त्याचें मत होतें. हेन्री क्ले लिहितो "कायदा म्हटला कीं तो परस्परांच्या सवलतीवरच आधारावा लागतो. जो कोणी स्वत: अतिमानवपदवीस पोचला असेल, मानवी दुर्बलता, चंचलता, मानवी जीवनांतील अपरिहार्यता या सर्वांच्यापासून वरवर अंतराळांत जो गेला असेल त्यानें खुशाल म्हणावें कीं, 'मी तडजोड कधींच करणार नाहीं !' पण, जो कोणी आमच्यातुमच्यासारखाच मामुली स्वभावाचा असेल त्यानें तडजोडीचा धि:कार करण्याची ऐट मारूं नये."

कोणच्याहि वादांतील दोन टोकांच्या ज्या भूमिका असतात त्यांचा परस्परविरोधी लढ्यांत जर चुराडा व्हायला नको असेल तर तो टाळण्याचा उपाय उभय पक्षांनीं तडजोड करणें हाच होय. राज्यकर्त्यांना कोणत्याहि एका बाजूचीं सर्व तत्त्वें अमलांत आणतां येत नाहींत यामुळें प्रत्येक बाजूचे जहाल व एकांतिक विचाराचे लोक अथवा सदसद्विवेकबुद्धीस जागणारीं माणसें, राज्यकर्त्यांनीं आपल्या बाजूचीं तत्त्वें अमलांत आणलीं नाहींत म्हणून राज्यकर्त्याबाबत निराश होतात. परंतु कायदेमंडळांतल्या सभासदाला आपल्या प्रदेशांतील अथवा पक्षांतील परस्परविरोधी मतवाद्यांमध्यें समेट घडवून आणायचा असतो. आणि ही समेटाची भूमिका राष्ट्रीय पातळीवर जे परस्परविरोधी हितसंबंध लढण्यासाठीं उभे राहिलेले असतात त्यांत एका बाजूनें मांडायची असते; शिवाय त्याला हें माहिती असतें कीं, ज्या प्रश्नाबाबत सर्व सत्य, सर्व न्याय आणि सर्व ईश्वरी कृपा एकत्र झालेली असेल असा प्रश्न जगांत जवळ जवळ नसतोच.

माझ्या अनेक सहकाऱ्यांच्यावर आज अशी टीका होते कीं, त्यांच्याजवळ कांहीं ठाम तत्त्वेंच नाहींत. ते "तडजोडवादी मुत्सद्दी" आहेत असें मानून त्यांचा तिरस्कार केला जातो. पण खरोखरी माझे हे सहकारी काय करीत असतात ? परस्परविरोधी मतवाद्यांत समेट घडविणें, वैचारिक वादांत समतोलपणा निर्माण करणें, लोकमतांतील प्रवाह व भेद समजून घेणें या गोष्टी करीत असतात. या सर्व गोष्टी करणें ही एक कला आहे. राष्ट्र एकजूट राखण्याला आणि सरकारला आपलें कर्तव्य पार पाडण्याला या कलेची गरज आहे. तत्त्वहीन म्हणून टीकापात्र झालेले माझे सहकारी या कलात्मक कार्यांत गढलेले असतात. त्यांना सदसद्विवेकशक्ति आहेहि, ती अमुक तत्त्वाबद्दल, अमुक तत्त्वाला ठाम चिकटून रहा असा आदेश त्यांना वेळोवेळीं देतच असते. पण त्यांची बुद्धि त्यांना सांगते

कीं "एखादा चांगला हेतु संपूर्णपणें पार पाडणारा कायदा मिळत नाहीं, म्हणून तो हेतु थोड्या प्रमाणांत पार पाडणारा कायदा कां नको म्हणतोस ? कारण तडजोडीसाठीं केलेल्या देवघेवीनेंच कोणत्याहि कायद्याला सिनेटची, लोकसभेची राष्ट्रपतीची व राष्ट्राची संमति मिळूं शकते."

पण नेहमीं आपणासमोर प्रश्न येतो तो असा कीं, आपण तडजोड कशी आणि कुणाशीं करावी ? वास्तविक ज्या सवलती देऊं नयेत अशाहि सवलती देऊन टाकणें हा सोपा मार्ग असतो. पण त्यामुळें न्याय्य अशी तडजोड होते असें नव्हे. " जम बसवायसाठीं जमतें घ्या " असा मला मिळालेला उपदेश वर आला आहे ना, त्यांतला हा प्रकार होतो.

जम बसवायासाठीं कुणाशींहि जमतें घ्या हा जो मला उपदेश ऊर्फ इशारा मिळालेला आहे त्यांत पक्षपुढाऱ्यापुढें मान झुकविणें ही एक बाब असून तींत थोडीफार बक्षिशीहि गृहीत असते. मीं एखाद्या पुढाऱ्याला निवडून यायला मदत केली तेव्हां आतां त्याचा अनुयायी म्हणून मला वागावें लागतें. कॉंग्रेस-मध्यें आम्हा सर्वांना त्या पुढाऱ्याच्या नेतृत्वाखालीं एकजूट राहिलें पाहिजे याची जाणीव सतत देण्यांत येते. (या पक्षीय एकजूटीच्या नांवाखालीं खरोखर अग-णित पापें केलीं जातात.) या एकजुटीविरुद्ध एखादा बंडखोर निघाला तर त्याला पुढील निवडणुकीच्या यशाबाबत आपणांवर केवढें संकट कोसळेल याविषयीं इशारा दिलेला असतो. आजकाल सिव्हिल सर्व्हिसचें राज्य आहे. त्यामुळें कायदे-मंडळाच्या सभासदाला फारसें पावलोणी मिळण्याचे प्रसंग कमी असतात. तत्त्वनिष्ठेखेरीज दुसऱ्या कोणत्या तरी हेतूनें जे निवडणुकांच्या मोहिमा अंगि-कारतात त्यांच्या वाटणीलाहि फारसे फायदे असतात असें नाहीं. पण पक्षाची फळी सोडून जे बंड करतात अथवा दूर जातात ते फायद्याच्या थोड्या फार संधीलाहि एकदम सर्वस्वी मुकतात. एखाद्या ध्येयनिष्ठ सदस्याला एखादा कायदा पास करून घ्यायचा असतो पण त्यासाठीं पक्षाचा पाठिंबा त्याला हवा असतो. हा पाठिंबा पक्षाच्या कार्यक्रमाशीं तो जितक्या प्रमाणांत तडजोड कर ल तितक्या प्रमाणांतच त्याला मिळतो. शेवटीं असेंहि म्हणता येईल कीं जो सिनेटर आपल्या ध्येयनिष्ठेसाठीं कुणाशींच तडजोड करीत नाहीं त्याला त्याच्या सिनेटमधील सह-काऱ्यांचा, पक्षांतील सहकाऱ्यांचा आणि विशेष म्हणजे त्याच्या निवडणकफंडाला ज्यांनीं मदत केली त्यांचा असा सर्वांचा तिरस्कार आपल्या माथीं घ्यावा लागतो.

येथवर भले म्हणून घेण्याच्या इच्छेचें जें दडपण सिनेटरावर असतें त्याची चर्चा केली. सिनेटरावर असणारें दुसरें दडपण म्हणजे पुन्हां निवडून येण्याची इच्छा. अगदीं तत्त्वनिष्ठ सिनेटरालाहि पुन्हां निवडून यावेसें वाटतेंच. अशी इच्छा असणें म्हणजे तो निव्वळ क्षुद्र स्वार्थ नव्हे. जे राजकारणांत पडतात त्यांना त्यांत टिकून राहावेसें वाटणें हें स्वाभाविकच आहे. निव्वळ तत्त्वनिष्ठेच्या नांवानें एखादा सिनेटर एकाच तत्त्वाच्या बाबतींत पराभव पत्करून घरीं बसला तर त्याचा उपयोग काय ? भविष्यकालांत त्या तत्त्वाला अगर दुसऱ्या एखाद्या तत्त्वाला विजय मिळवून देण्याची संधि आली तरी त्यावेळीं तो तेथें असणारच नाहीं. मग तत्त्वासाठीं पराभव पत्करून काय मिळविलें ?

शिवाय सिनेटराचा पराभव त्याच्या एकट्याचीच पिछेहाट करून थांबतोच असें नव्हे. ज्या पक्षानें त्याला पाठिंबा दिला त्या पक्षावर, ज्या मित्रांनीं हाडांचीं काडें करून त्याला विजय मिळवून दिला त्या मित्रांवर, ज्यांनीं याच्या निवडणुकीसाठीं पैसा दिला त्या धनदात्यावर आणि याहूनहि विशेष म्हणजे याच्या विजयावर ज्यांचें सुख आणि सुरक्षितता अवलंबून आहे अशा त्याच्या बायकामुलांवर अशा सर्वांवर याच्या पराभवाचा जो भयंकर परिणाम होणार असतो त्याचीहि दखल सिनेटराला घ्यावी लागते.

आणि लोकशाही राष्ट्रांत राजकारणांत पडलेल्या व्यक्तींकडून राष्ट्रासाठीं जेवढी सर्वस्वत्यागाची अपेक्षा जनतेकडून केली जाते तेवढी दुसऱ्या कोणत्याहि व्यवसायांतल्या माणसाबाबत केली जात नाहीं. एखादा खाजगी नागरिक, एखादा धंदेवाला आपला स्वार्थ दूरदृष्टीनें साधत असेल व त्यासाठीं कायदा मोडत नसेल तर त्याला आपण भले मानतों. प्रत्येक व्यक्तीच्या अशा दूरदृष्टीच्या स्वार्थबुद्धीनें एकंदर समाजाची प्रगति होते असेंहि आपण मानतों. पण सार्वजनिक कार्यांत पडलेल्या माणसानें मात्र राष्ट्रीय प्रगतीसाठीं स्वार्थ न साधता सर्वस्वत्यागच केला पाहिजे अशी आपली अपेक्षा असते.

राजकारणांत पडलेल्या माणसानें अगदीं एका तत्त्वासाठींहि आपला मानसन्मान, आपली इभ्रत, इतकेंच नाहीं तर कीर्ति अथवा वैभव मिळविण्याच्या इच्छेनें आपल्या जीवनाला लावलेली दिशा या सर्वांची आहुथि दिली पाहिजे, अशी लोकांची अपेक्षा असते. वकील, धंदेवाले, शिक्षक, डॉक्टर या सर्वांच्या आयुष्यांत त्यांच्या प्रामाणिकपणाची कसोटी घेणारे प्रसंग असतात.

पण ते प्रसंग कोणाच्या डोळ्यावर येत नाहींत. उलट लोकशाहींतील अधिकाराच्या जागेवर आलेल्या माणसाचें सारें जीवन अगदीं चव्हाट्यावर, लोकांच्या टवकारलेल्या डोळ्यांपुढें घडत असते. सिनेटमध्यें एखादा प्रश्न आला कीं अखेरचें मत देण्याचा प्रसंग समोर उभा रहातो. "होय" कीं "नाहीं" हे ठरविण्याला सिनेटरला वेळ हवा असेल, दोन्ही पक्षीं थोडथोडें सत्य आहे, एकाच बाजूला "होय" अथवा "नाहीं" कसें म्हणावें, अशा शंकेनें त्याचें मन थोडें चलबिचल पावत असेल. "अरे एवढी थोडी दुरुस्ती केली तर सारा वाद मिटून या सर्वांचें समाधान होईल" असें त्याला वाटत असेल. पण छे, आतांच मत द्या; आतां लपून रहाता येणार नाहीं, 'होय' 'नाहीं' करता येणार नाहीं, विलंब लावता येणार नाहीं. त्याचा मतदारसंघ जणू कांहीं त्याच्या टेबलावर बसून त्याला सांगत असतो कीं, 'याद राख, पुन्हां निवडून यायचें आहे ना ?' झालें ! फारसा विचार न करतां मत देऊन मोकळें व्हावें लागतें !

एकदां निवडून आलेला सिनेटर स्वेच्छेनें क्वचितच निवृत्त होतो. निवडणुकीचा ज्वर वॉशिंग्टनमध्यें सर्वत्र असतोच. पण तो सिनेटमध्यें जितका फणफणत असतो इतका इतरत्र क्वचितच असेल. अशा सिनेटमधून निवृत्त व्हायचें म्हणजे सोपी गोष्ट नव्हे. आमचें सिनेट म्हणजे जगांतील बड्यांचा तो खास क्लब आहे. त्यांतलें काम मनाला मोठें वेध लावणारें असतें. सिनेटराचा रुबाब केवढा मोठा असतो ! काँग्रेसच्या सदस्याला मान आणि अधिकार केवढे मोठे असतात ! मोठ्या धैर्यवान मुत्सद्यालाहि या गोष्टी मिळविण्याची ओढ लागली म्हणजे रात्रंदिवस झोप लागणार नाहीं. अर्थात एवढीं मोहकारणें समोर असल्यामुळें बहुतेक सिनेटर सदसद्विवेकबुद्धीची टोचणी अथवा पूर्ण विचारांतीं केलेला निर्णय बाजूला सारून सामान्यत: सोपा आणि आपल्या मतदारसंघांतील बहुमताला मान्य असा मार्ग अजाणताहि पत्करतात. हीं माणसें राजकारणांत भेकड आहेत असें म्हणता येणार नाहीं. बहुसंख्य लोकांचें जें मत असतें तसेंच आपलेंहि मत पूर्ण प्रामाणिकपणें बनविण्याची त्यांना संवयच लागलेली असते.

दुसरे कांहीं सिनेटर असे असतात कीं ते स्वत:च्या सदसद्विवेकशक्तीशीं वाद घालीत बसतच नाहींत. हीं माणसें नीति-अनीतीबद्दल बेफिकीर असतात असें नव्हे. आपण जर एखादें कार्य परिणामकारकपणें करावयाचें असेल तर सदसद्विवेकाचे

प्रश्न बाजूला सारले पाहिजेत असें त्यांना प्रामाणिकपणें वाटत असतें. "राजकारणांत अनीतियुक्त कांहींहि नसतें. कारण, नीति-अनीतीचा संबंधच येत नाहीं," असें फ्रँक केन्ट यानें म्हटलें आहे. तसें या लोकांचें मत असतें.

केन्ट लिहितो, "राजकारणांत महत्त्वाकांक्षा असलेल्या माणसानें कांहींहि करण्याची जबाबदारी न पत्करतां नुसतें बोलून लोकांना भारून टाकणें ही फार नाजूक कला आणि मोठी सिद्धि आहे...बाजू घ्यायची ती न्याय्य बाजू म्हणून घ्यायची नसते. लोकांना जी बाजू आवडते तीच न्याय्य आहे असें म्हणून ती बाजू घ्यायची असते. मग तुमचीं मतें आणि वस्तुस्थिति त्याहून वेगळी असेना का ! मतें मिळविण्याचा हा धंदा हा केवळ व्यवहार आहे ! नीति-अनीति, न्याय-अन्याय यांचा येथें संबंधच काय ?"

केन्टनें आपल्या मताच्या पुष्टयर्थ, अॅरिझोनाचा सिनेटर अॅशर्स्ट यानें १९२० च्या निवडणूकमोहिमेंत त्याचा मित्र मार्क स्मिथ याला दिलेला उपदेश उद्धृत केला आहे.

अॅशर्स्ट मार्क स्मिथला म्हणाला, "हे पहा मार्क, तूं वेफाट वक्ता व्हायचे नाकारतों आहेस हीच मोठी अडचण आहे. निवडून यायचें तर तत्त्वें बुडवायला नकोत का ? तुला एक गोष्ट शिकली पाहिजे कीं सार्वजनिक जीवनांत माणसाला पुष्कळदां आपल्या तत्त्वांच्या डोक्यावर चढावें लागतें."

सारांश काय, कीं पुन्हा निवडून येण्याची इच्छा ही स्वतंत्र बाण्यानें धैर्य दाखवण्याच्या वृत्तीवर फार मोठें दडपण आणीत असते. सर्व सिनेटर प्रांजळपणें हें मान्य करणार नाहींत. पण असें दडपण नसतेंच असेंहि ते म्हणणार नाहींत.

सिनेटरावर—आणि प्रतिनिधिसभासदस्यावरहि—येणारें तिसरें दडपण म्हणजे, त्याच्या मतदारसंघाचें मत, मतदारसंघांतील हितसंबंधी गट, संघटितपणें वृत्तपत्रांत पत्रें लिहिणारे लेखक, आर्थिक हितसंबंधवाल्यांचे गट आणि शेवटीं सर्वसामान्य मतदार इत्यादि हें होय. इतक्या या दडपणांचा परामर्ष घेणें, त्यांना टक्कर देणें अगर त्यांचें समाधान करणें हें सर्व काम भारीच अवघड आहे. कॉंग्रेसमन जॉन स्टिव्हन मॅक्ग्रोअॅर्टी यानें १९३४ सालीं आपल्या एका मतदाराला पुढील पत्र लिहिलें होतें :

"कॉंग्रेसमन होण्यांतच जीं अनेक दुर्दैवें आहेत त्यांत एक असें आहे कीं, तुझ्यासारख्या गाढवांचीं पत्रें येतात तीं मला वाचावीं लागतात. तूं लिहितोस

कीं, मी सीएरा माँद्रे डोंगरावर जंगल लावीन असें तुला अभिवचन दिलें आणि मी निवडून येऊन दोन महिने झाले तरी मी अजून माझें वचन पूर्ण केलें नाहीं. इतक्या उतावळीपणानें धांवतधांवत जाऊन विहिरींत जीव कां देत नाहींस ?"

खरोखर असे विचार नेहमीं मनांत येतात. सुदैवानें अथवा दुर्दैवानें आम्ही आमच्या मतदारांना अशीं उत्तरें पाठवीत नाहीं. पण इतका मनःक्षोभ होतो मात्र खरा. अशीं मूर्खपणाचीं पत्रें, अशक्य विनंत्या, अगदीं विसंगत मागण्या आणि कधींच न मिटणारीं गाऱ्हाणीं यांनीं डोकें नेहमीं भंडावून टाकलेलें असतें.

माझ्या पुढलें आजचेंच उदाहरण घ्या. न्यू इंग्लंडच्या कापड-गिरण्यांचें एक शिष्टमंडळ माझ्याकडे आलें होतें. आमच्या आर्थिक प्रगतीसाठीं हा धंदा अत्यवश्य आहे यांत वाद नाहीं. पण त्यांची मागणी कशी आहे पहा ! ऑस्ट्रेलियांतून येणाऱ्या लोंकरीवरची आयात जकात कमी करा म्हणजे लोंकर आम्हांला स्वस्त मिळेल. पण ब्रिटनमधून येणाऱ्या लोंकरीच्या कापडावरील जकात मात्र वाढवा. कारण, ब्रिटनची चढाओढ त्यांना बाधते असें त्यांचें म्हणणें आहे. दक्षिणेंतील संस्थानांतला एक सहकारी माझ्याशीं बोलत होता. त्याच्याकडे कांहीं दिवसांपूर्वीं असेंच एक शिष्टमंडळ आलें होतें व याच मागण्या त्यांनीं केल्या होत्या. शिवाय त्यांच्या आणखी मागण्या पुढीलप्रमाणें होत्या. "जपानांत मजुरीचे दर कमी आहेत म्हणून जपानी मालाशीं आम्हांला चढाओढ करता येत नाहीं तीपासून आम्हांला वांचवा. आणि आज आमच्या येथें आमच्या कामगारांना जे कमी पगार आहेत ते आणखी वाढवूं नका." पण यामुळें माझ्या मतदारसंघांतील मजुरांचें नुकसान होत होतें. पण त्याची त्यांना पर्वा नव्हती. कालच मी सिनेटमध्यें बसलों असतां, मला बाहेर बोलवून दोन धंदेवाल्या गटांनीं माझी भेट घेतली. त्यांतला एक गट 'अमुक एका सरकारी कारखान्यामुळें आम्हांला अन्याय्य चढाओढ भोगावी लागते म्हणून तो धंदा बंद करा' असें सांगत होता. दुसरा गट त्या सरकारी कारखान्यांतील कामगार-पुढाऱ्यांचा होता. 'सदर सरकारी कारखाना बंद करूं नका, आमच्यावर बेकारी कोसळेल' असा इशारा तो मला देत होता.

अशी अनंत उलटसुलट दडपणें आम्हां सर्व सिनेटरांना अनुभवावीं लागतात. अमेरिकेची अर्थसंघटना अगदीं गुंतागुंतीची असून त्यांतील अपरिहार्य अंतर्गत विसंगतीचीं हीं उदाहरणें आहेत. जर आम्ही आमच्या मतदारसंघांना 'आम्ही या बाब-

तींत कांहीं करूं शकणार नाहीं,' असें म्हणूं लागलों तर ते आम्हांला आम्ही सहानुभूति शून्य आहों असें म्हणतात. त्यांचें गाऱ्हाणें दूर करण्याचा जर आम्हीं प्रयत्न केला तर पुष्कळदां अपयशहि येतें. कारण त्याविरुद्ध बाजू दुसऱ्या सिनेटरांनीं घेतलेली असते. असें अपयश आलें म्हणजे "सारे राजकारणी लोक सारखेच" असें म्हणून ते लोक आम्हांला तुच्छ लेखतात. अशा वेळेला मग आपल्या केबिनमध्यें जाऊन बसावें, कुणी सहानुभूतिदाता सहकारी भेटला तर त्याच्या खांद्यावर डोकें टेकून दिलखुलास रडावें अथवा घरीं जाऊन बायकोवर तोंड सोडावें एवढेंच कर्तव्य उरतें !

अशीं हीं दडपणें आणणारे गट आणि पत्रलेखक हे एकंदर मतदारांमध्यें फार थोडे असतात अशी आपण समजूत करून घेऊं शकतों आणि ती खरीहि आहे. परंतु हीं थोडी माणसें विचारांना स्पष्टता देणारीं असतात. म्हणून त्यांची उपेक्षा करता येत नाहीं. सर्वसामान्य जनतेशीं आमचा ज्यांच्या मार्फत संबंध येतो त्यांत यांची संख्या मोठी असते. जनतेचीं मतें आम्हांला यांच्या मार्फतच कळतात. आम्ही काय करतों हें जनतेला यांच्या मार्फतच कळतें. म्हणून यांच्या मताला महत्त्व असतें. ( नुकतेच निवृत्त झालेले एक सिनेटर म्हणत असत कीं, "मी प्रत्येक मुद्यावर विशिष्ट हितसंबंधीयांच्या बाजूनें मतें देतों. माझी अपेक्षा अशी असते कीं निवडणुकीच्या वेळेपर्यंत या विशिष्ट हितसंबंधीयांची संख्या एवढी मोठी होईल कीं, त्यामुळेंच बहुसंख्य लोकांना माझी अनुकूल अशी आठवण राहील. बाकीच्यांना मी त्यांच्या विरुद्ध मत दिलें हें ठाऊकहि असणार नाहीं व मग अर्थात त्यांच्या तें लक्षांत रहाण्याचा प्रश्नच येत नाहीं." वरवर पहातां खात्रीलायक वाटणारा हा सिद्धान्त अखेर त्या सिनेटराच्या बाबतींत खरा ठरला नाहींच. )

सदसद्विवेकशक्तीला कौल लावून वागूं पहाणाऱ्यावर आतांच सांगितलीं इतकीं हीं अशीं दडपणें येऊं शकतात. दडपणें आणणारे हे विविध गट, सिनेटराचे मतदार, त्याचा पक्ष, सहकाऱ्यांचा स्नेह, कुटुंबियांच्या गरजा, अधिकाराच्या जागेचा अहंकार, तडजोडमार्गाची गरज, आणि अधिकाराला चिकटून रहाण्याचें महत्त्व यांतील कशाचीहि उपेक्षा करतां येत नाहीं. आपण जीं ध्येयें प्रतिज्ञेनें स्वीकारलेलीं असतात त्यांना कोणच्या मार्गानें मदत मिळेल व कोणच्या मार्गानें त्यांना अडथळा येईल हें ज्याचें त्यानें ठरवून आपल्या मार्गाची आपणच निवड

करावयाची असते. निवडणूक जिंकण्याच्या दिशेनें कोणती भूमिका घ्यावी याची विवंचना प्रथम सुरू होते. आणि मग अमुक तत्त्वाला हट्टानें चिकटून राहिलों तर शेवटीं सिनेटमधील जागाहि जाईल आणि त्यामुळें त्या तत्त्वाची सेवा करण्याची एखादीच येणारी संधिहि जाईल अशी भीति वाटून एकामागून एक अशा अनेक तत्त्वांबाबत तडजोडीच्या भूमिका आपण घेऊं लागतों. याचा परिणाम शेवटीं असा होतो कीं, ज्या सदसद्विवेकबुद्धीच्या स्वातंत्र्यासाठीं सिनेटमध्यें राहायचें त्या सदसद्विवेकबुद्धीचें स्वातंत्र्य नष्ट झाल्याचें आढळून येतें. पण असें असलें तरीहि तत्त्वनिष्ठेच्या कोणच्या टप्प्यावर, 'हा तत्त्वाचा प्रश्न आहे' असें मानून व तडजोड नाकारून सिनेटमधील आपल्या जागेवर लाथ मारायची, कोणत्या तत्त्वाच्या निष्ठेसाठीं एवढा त्याग करावयाचा हे ठरविणें अत्यंत कठीण असून तें काळीज खोदून पहाण्याचें काम आहे.

\+ \+ \+

कुणी म्हणतील हा कांहीं मुख्य प्रश्न नव्हे. लोकांचें मत कांहींहि असो, दडपणांची उपेक्षा करा, मोह-कारणें व तडजोडींच्या कल्पना सर्व झुगारून देऊन न्याय्य दिसेल त्याप्रमाणें वागा म्हणजे झालें.

हें म्हणणें सोपें आहे. आणि निवडणुकीमुळें मिळालेल्या जागेची जबाबदारी ज्यांना माहित नसते त्यांनाच तें कृतींतहि सोपें वाटेल. पण निवडून आलेल्यांच्या पुढें वर सांगितलेलीं दडपणें, राजकारण, वैयक्तिक महत्त्वाकांक्षा एवढ्याच गोष्टी असतात असें नव्हे. लोकमताची पर्वा करूं नये हें म्हणणें तरी योग्य आहे काय? वर आपण राजकीय धैर्याच्या मार्गांत येणाऱ्या दडपणांचें अवलोकन केलें. आतां घटनात्मक आणि सिद्धान्ताच्या कांहीं मुद्यांचा विचार करूं. आपण आपल्या घटक राज्याचें कांहीं ऋण लागतों, तसेंच आपल्या प्रदेशाचें, आपल्या पक्षाचें आणि आपल्या मतदार संघाचेंहि ऋण आपण लागत असतों.

सिनेटर हे निरनिराळ्या घटक राज्यातर्फे निवडून येतात आणि आप-आपल्या राज्याच्या मताचें प्रतिनिधित्व करणें एवढेंच, कांहीं लोकांच्या मतें, सिनेटराचें कर्तव्य असतें. आमचें अमेरिकन राज्य ही संयुक्त घटना आहे. कमी-अधिक प्रमाणांत स्वतंत्र असणाऱ्या अनेक घटक राज्यांची ही यूनिअन आहे. या घटक राज्यांच्या गरजा अत्यंत विविध आहेत. अर्थात माझ्या घटक राज्यानें मला निवडून दिलेलें असल्यानें त्याचेंच प्रतिनिधित्व मीं केलें पाहिजे. मॅसॅच्यु-

सेट्स्नें निवडून दिलेल्या सिनेटरनें जर त्याची बाजू घ्यायची नाहीं तर कोणीं घ्यायची ? कारण मॅसॅच्युसेट्स् हें घटक राज्य एकदां युनिअनमध्यें आलें कीं त्याचे हक्क आणि व्यक्तित्व हीं युनिअनमध्यें विलीन होतात. कॉंग्रेसमध्यें सर्व घटक राज्यांना समसंख्येनें प्रतिनिधित्व दिलेलें असतें तेंहि युनिअनमध्यें विलीन होऊन जातें. कारण त्या घटक राज्याच्या आकांक्षा अल्पमतांत असल्यानें, त्या ऐकल्या गेल्या पाहिजेत असें आपण कितीहि म्हटलें तरी अशा अल्पमतांना ऐकून घेतलें जाण्याची समान संधि बहुधा मिळतच नाहीं. घटक राज्याचें व्यक्तिमत्व युनिअनमध्यें सामील होतांच असें संपूर्णपणें विरून जात असल्या-मुळेंच त्या घटक राज्याचा सिनेटमधील जो प्रतिनिधि त्याजवर त्या घटक राज्याचें खास प्रतिनिधित्व करण्याची विशेष जबाबदारी असते.

प्रत्येक सिनेटर आपल्या आजूबाजूस थोडीशी नजर टाकील तरी त्याला असें दिसून येईल कीं, इतर प्रत्येक सिनेटर आपणांस निवडून देणाऱ्या घटक राज्याचेंच हितचिंतन करीत असतो. अशा घटक राज्याचे हितसंबंध हे राष्ट्रीय हितासाठीं सोडून द्यायचे असले तर तसा निर्णय सिनेटरानें कां घ्यावा ? आपल्या हितसंबधांची राष्ट्रहिताकरितां केव्हां आणि किती आहुति द्यावयाची हें त्या त्या घटक राज्यानेंच ठरविणें योग्य नव्हे काय? कारण, सिनेटर हा त्या त्या घटक राज्याचा वॉशिंग्टन्‌मधील एजंट असतो, त्या त्या घटक राज्याच्या हक्काचा रख-वालदार म्हणून सिनेट चेंबरमध्यें राष्ट्राच्या उपाध्यक्षानें त्याला मान्यता दिलेली असते. मॅसॅच्युसेट्चा हा सिनेटर, टेक्ससचा तो सिनेटर याचा अर्थ असा असतो.

पण, प्रत्येक सिनेटराची त्याच्या त्या घटक राज्याबाबतची जबाबदारी मान्य केली तरी सबंध अमेरिकेच्या राज्यघटनेनें येणाऱ्या संपूर्ण जबाबदारीची कथा येथेंच संपत नाहीं. कारण, वॉशिंग्टनमध्यें आम्ही सिनेटर म्हणून जेव्हां बसतों तेव्हां आम्ही जसे मॅसॅच्युसेट्स्‌चे, टेक्ससचे सिनेटर असतों तसेच आम्ही 'युनायटेड स्टेट्सचे सिनेटर्स' म्हणूनहि ओळखले जातों. आम्हांला जी घटना-निष्ठेची शपथ घालण्यांत येते ती आमच्या आमच्या घटक राज्याच्या गव्हर्नरा-कडून घातली जात नसून युनायटेड स्टेट्सच्या उपाध्यक्षाकडून घातली जाते. एडमंड बर्कची कल्पना वेगळ्या शब्दांत सांगावयाची म्हणजे आम्ही सिनेटर वॉशिंग्टनमध्यें जमतों ते परस्परविरोधी राष्ट्रांचे वकील म्हणून नव्हे, निरनि-राळ्या प्रदेशांच्या परस्परविरोधी भूमिका मांडणारे आम्ही एजंट नव्हे, तर

एकाच हितसंबंधानें बांधलेल्या एका राष्ट्राच्या कायदेमंडळांत त्याचे सदस्य म्हणून आम्ही जमतों. आमच्या मूळ प्रदेशांच्या हितसंबंधांची उपेक्षा आम्ही तेथें करूं नये. आणि आम्ही ज्या प्रदेशांतून आलेले असतों त्यांची उपेक्षा आम्ही करूं शकणार नाहीं. पण उलट जो तो सिनेटर जर फक्त आपआपल्या प्रदेशाच्या हितसंबंधांचीच काळजी करूं लागला, तर अखिल राष्ट्राच्या हित-संबंधाची काळजी मग वहायची तरी कोणीं ?

याशिवाय आपआपल्या पक्षाच्या हितसंबंधांचेंहि रक्षण करावयाचें असतें. वर सांगितलेलीं सर्व दडपणें झुगारून दिलीं तरी मला सिनेटमध्यें निवडून आणणाऱ्या पक्षाच्या धोरणानें मी वागायला नको काय ? या देशांत आपण पक्षीय जबाबदारीचें तत्त्व मानतों आणि म्हणून पक्षाच्या धोरणाला चिकटून राहण्याचें तत्त्वहि आपण मान्य केलें आहे, एरवी मी अमुक पक्षाचा असें लेबल लावून घेतलें याचा लोकांच्या दृष्टीनें अर्थ काय ? एखाद्या देशांत लहान लहान गटांचे दोहोंहून अधिक असे अनेक पक्ष असले तर देश संकटांत येतो. या पक्षांची संख्या जितकी अधिक तितकी त्यांची तत्त्वविषयक शुद्धता व निष्ठा कमी असते. अशा बहुपक्षांच्या अस्तित्वानें राष्ट्र संकटांत यायला नको असेल तर द्विपक्षीय लोकशाही टिकवावी लागते. त्यासाठीं उभय पक्षांच्या सदस्यांनीं आपआपल्या पक्षाबद्दल निष्ठा ठेवावी लागते.

पक्षनिष्ठेबद्दल एवढें बोलल्यानंतर प्रत्येक विषयाबाबतची अंतःकरणाची प्रेरणा, पक्षनिष्ठेच्या जबाबदारीची सबब पुढें करून, दडपून टाकणें योग्य नव्हे हेंहि येथें म्हणून ठेवलें पाहिजे. कारण, पक्ष म्हटला कीं, एकजूट, शिस्त, पक्षीय यश इत्यादि सबबीखालीं तेथें नव्या कल्पनांना वाव मिळत नाहीं. यामुळें स्वतंत्र वृत्तीच्या सदस्यांचें स्वातंत्र्य संकटांत येतें. सिनेटर आलबर्ट बिव्हरीज यानें पक्षांच्या कार्यपद्धतीबद्दल तक्रार केली आहे. तो लिहितो " नव्या कल्पनां-बद्दल राजकीय पक्ष जी असहिष्णुता दाखवतात तीमुळें त्यांचा मृत्यु ओढवतो. पक्षांनीं नव्यानव्या कल्पना स्वीकारून वाढलें पाहिजे तरच ते जगतील."

द्विपक्षीय लोकशाही टीकून रहाते याचें कारण ते दोन पक्ष नुसते ताठ नसतात तर लवचिक असतात. मी ज्या वेळीं काँग्रेसमध्यें शिरलों त्यावेळीं रॉबर्ट टॅफ्ट आणि वाईन मॉर्स यांसारख्या अगदीं भिन्न पुढाऱ्यांचा समावेश रिपब्लि-कन पक्षांत होऊं शकत होता. आणि मी सिनेटमधील ज्या डेमोक्रॅटिक पक्षांत

आतां आहे त्यांत हॅरी बिर्ड आणि वाईन मॉर्स इतक्या भिन्न प्रकृतीचीं माणसें एकत्र रहातात.

आज हे दोन्ही मोठे पक्ष राष्ट्रीय हित साधूं इच्छितात. राष्ट्रामध्यें जास्तींत-जास्त पाठिंबा आपणांस मिळावा एवढ्या साध्या हेतूनें तरी त्यांना राष्ट्रीय हित पहाणें आवश्यक असतेंच. पण पक्ष आणि त्या पक्षांतला एखादा सिनेटर यांचें दरम्यान राष्ट्रहित कसें साधावें या मुद्यावर ज्यावेळीं मतभेद होतो त्यावेळीं सिनेटरानें पक्षीय जबाबदारीपेक्षां अथवा आपल्या घटकराज्याबद्दलच्या जबाबदारीपेक्षांहि आपल्या सदसद्विवेक बुद्धाच्या प्रेरणेला अधिक मान दिला पाहिजे. पण घटक राज्याचे हितसंबंध अथवा पक्षनिष्ठा बाजूस सारणें हेंहि एकवेळ सोपें असतें. आपल्या मतदारांच्या इच्छा पार पाडण्यासंबंधींची जबाबदारी बाजूस सारणें मात्र फार कठीण असते. ही जबाबदारी बाजूस सारणारा सिनेटर अखेर कुणालाच जबाबदार नाहीं असें होईल. आणि त्यामुळें लोकशाहीचा संरक्षणाधारच नष्ट होईल. ही जबाबदारी बाजूस सारणारा सिनेटर लोकप्रतिनिधि या पदवीला पात्र रहातच नहीं. ज्यांनीं त्याला आपलीं मतें अमलांत आणण्यासाठीं विश्वासानें निवडून दिलें त्यांचा त्यानें विश्वासघात केला असाच याचा अर्थ होतो.

जॉन टायर म्हणतो "एखादा प्रतिनिधि जेव्हां लोकांची भाषा बोलत नाहीं व स्वतःची बोलतो तेव्हां तो त्यांचा प्रतिनिधि रहात नसून तो स्वतःचाच प्रतिनिधि होतो."

सारांश, या मताप्रमाणें पहातां मी जर माझ्या मतदारांची इच्छा पूर्ण करण्यासाठीं त्यांचें प्रतिनिधित्व पत्करलें आहे तर त्यांच्या इच्छेसाठीं मी माझीं तत्त्वें बाजूला सारलीं पाहिजेत. नेहमीं असें करणें सोपें नाहीं हें खरें. परंतु लोक शहाणे असतात असें मानणें यांतच लोकशाहीचें सार आहे. लोक चुकतात हें खरें. त्यांना जें सरकार मिळतें तें त्यांच्या लायकीप्रमाणेंच मिळतें. पण लोकांच्यापेक्षां आपण शहाणे आहों असें म्हणणाऱ्या प्रतिनिधींनीं बनलेल्या सरकारापेक्षां लोकांच्या इच्छेप्रमाणें वागणाऱ्या प्रतिनिधींचें सरकार हेंच अधिक चांगलें. सिनेटरसमोर आलेल्या प्रश्नाबाबत लोकांचें मत ज्या बाजूनें आहे त्या बाजूनेंच सिनेटरानेंहि मत द्यावें हेंच योग्य नव्हे काय, असें हे मतवादी विचारतात.

मला हें मत अगदीं संकुचित वाटत असून तें स्वीकारणें कठिण आहे. जणू कांहीं मॅसॅच्युसेट्सनें मला वॉशिंग्टनला जें पाठविलें आहे तें वेळोवेळीं लोकांची मतें काय असतात ते सांगणाऱ्या निरोप्या म्हणूनच पाठविलें आहे. मला हें मत साफ अमान्य आहे. लोकांच्या शहाणपणावर माझा विश्वास नाहीं असा याचा अर्थ नव्हे. या मतवाद्यांचाच लोकांच्यावर विश्वास नाहीं असें मला वाटतें. जे लोक मतदारांच्या वेळोवेळच्या प्रत्येक प्रेरणेचें बंधन न स्वीकारता स्वतःच्या पूर्ण विचारांनीं बनलेल्या मताप्रमाणें वागतात त्यांचाहि लोकांच्या शहाणपणावर विश्वास असतोच. याचा अर्थ असा कीं लोकांच्या अंतिम न्याय-बुद्धीवर त्यांचा विश्वास असतो. आपल्या प्रतिनिधीचें धैर्य व तर्कशक्ति यावर लोकांचा विश्वास असून राष्ट्राच्या हितासाठीं स्वार्थत्यागपूर्वक आपला प्रतिनिधि वागेल असे लोक मानतात असें याला वाटत असते. जनतेसंबंधींच्या लोक-प्रतिनिधींच्या या श्रद्धेवरच लोकशाही आधारलेली आहे. वेळोवेळीं असणारें लोकमत आणि जनतेचें हित हीं एकरूप असतात या श्रद्धेचा अनेकदां भंग झालेला असून अशी श्रद्धा ही लोकशाहीचा आधार असूं शकत नाहीं. माझ्या मतें मतदार जेव्हां आम्हांला निवडतात त्या वेळेला आमच्या निर्णयशक्तीवर भरंवसा ठेवून ते आम्हांला निवडतात. राष्ट्राच्या हितांतच सामावलेलें जनहित कोणचें तें ठरवून त्याप्रमाणें वागण्याची पात्रता आमच्या ठिकाणीं आहे असा विश्वास लोकांना आमच्याबद्दल वाटतो म्हणून लोक आम्हांला निवडतात. याचा अर्थ असाच होऊं शकतो कीं आम्ही लोकांना शिकवलें पाहिजे, मार्गदर्शन केलें पाहिजे, त्यांच्या चुका सुधारल्या पाहिजेत आणि ज्या आमच्या निर्णयशक्तीवर लोकांनीं भरंवसा ठेवला त्या निर्णयशक्तीची बजावणी करायची तर वेळप्रसंगीं लोकमताची उपेक्षाहि आम्हीं केली पाहिजे. ज्या वेळीं एखादा प्रतिनिधि स्वार्थ अथवा वैयक्तिक पूर्वग्रह बाजूस ठेवून आपल्या सदसद्विवेकबुद्धीच्या प्रेरणेनुसार वागतो त्या वेळीं तो प्रतिनिधि लोकांच्या भावनांबद्दल बेफिकीर असणारा, अमीरी वृत्तीचा अथवा बेजबाबदार वक्तृत्वाचा अथवा तऱ्हेवाईक स्वभावाचा निर्दय मुत्सद्दी आहे असें मानणें योग्य नाहीं. असा प्रतिनिधि जेव्हां आपल्या सदसद्विवेकबुद्धीच्या प्रेरणेनें वागतो त्यावेळीं आपल्या वर्तनाच्या शहाणपणा-बद्दल जनतेनेंच कौल द्यायचा आहे हें तो भीत भीत मान्य करतोच. पण आज आपणाला लोक शहाणे म्हणाले नाहींत तरी उद्यांची आणखी एखादी पुढली

आतां आहे त्यांत हॅरी बिर्ड आणि वाईन मॉर्स इतक्या भिन्न प्रकृतीचीं माणसें एकत्र रहातात.

आज हे दोन्ही मोठे पक्ष राष्ट्रीय हित साधूं इच्छितात. राष्ट्रामध्यें जास्तींत-जास्त पाठिंबा आपणांस मिळावा एवढ्या साध्या हेतूनें तरी त्यांना राष्ट्रीय हित पहाणें आवश्यक असतेंच. पण पक्ष आणि त्या पक्षांतला एखादा सिनेटर यांचें दरम्यान राष्ट्रहित कसें साधावें या मुद्यावर ज्यावेळीं मतभेद होतो त्यावेळीं सिनेटरानें पक्षीय जबाबदारीपेक्षां अथवा आपल्या घटकराज्याबद्दलच्या जबाबदारीपेक्षांहि आपल्या सदसद्विवेक बुद्धाच्या प्रेरणेला अधिक मान दिला पाहिजे. पण घटक राज्याचे हितसंबंध अथवा पक्षनिष्ठा बाजूस सारणें हेंहि एकवेळ सोपें असतें. आपल्या मतदारांच्या इच्छा पार पाडण्यासंबंधींची जबाबदारी बाजूस सारणें मात्र फार कठीण असते. ही जबाबदारी बाजूस सारणारा सिनेटर अखेर कुणालाच जबाबदार नाहीं असें होईल. आणि त्यामुळें लोकशाहीचा संरक्षणाधारच नष्ट होईल. ही जबाबदारी बाजूस सारणारा सिनेटर लोकप्रतिनिधि या पदवीला पात्र रहातच नहीं. ज्यांनीं त्याला आपलीं मतें अमलांत आणण्यासाठीं विश्वासानें निवडून दिलें त्यांचा त्यानें विश्वासघात केला असाच याचा अर्थ होतो.

जॉन टायर म्हणतो “एखादा प्रतिनिधि जेव्हां लोकांची भाषा बोलत नाहीं व स्वत:ची बोलतो तेव्हां तो त्यांचा प्रतिनिधि रहात नसून तो स्वत:चाच प्रतिनिधि होतो.”

सारांश, या मताप्रमाणें पहातां मी जर माझ्या मतदारांची इच्छा पूर्ण करण्यासाठीं त्यांचें प्रतिनिधित्व पत्करलें आहे तर त्यांच्या इच्छेसाठीं मी माझीं तत्त्वें बाजूला सारलीं पाहिजेत. नेहमीं असें करणें सोपें नाहीं हें खरें. परंतु लोक शहाणे असतात असें मानणें यांतच लोकशाहीचें सार आहे. लोक चुकतात हें खरें. त्यांना जें सरकार मिळतें तें त्यांच्या लायकीप्रमाणेंच मिळतें. पण लोकांच्यापेक्षां आपण शहाणे आहों असें म्हणणाऱ्या प्रतिनिधींनीं बनलेल्या सरकारापेक्षां लोकांच्या इच्छेप्रमाणें वागणाऱ्या प्रतिनिधींचें सरकार हेंच अधिक चांगलें. सिनेटरसमोर आलेल्या प्रश्नाबाबत लोकांचें मत ज्या बाजूनें आहे त्या बाजनेंच सिनेटरानेंहि मत द्यावें हेंच योग्य नव्हे काय, असें हे मतवादी विचारतात.

मला हें मत अगदीं संकुचित वाटत असून तें स्वीकारणें कठिण आहे. जणू कांहीं मॅसॅच्युसेट्सनें मला वॉशिंग्टनला जें पाठविलें आहे तें वेळोवेळीं लोकांची मतें काय असतात ते सांगणाऱ्या निरोप्या म्हणूनच पाठविलें आहे. मला हें मत साफ अमान्य आहे. लोकांच्या शहाणपणावर माझा विश्वास नाहीं असा याचा अर्थ नव्हे. या मतवाद्यांचाच लोकांच्यावर विश्वास नाहीं असें मला वाटतें. जे लोक मतदारांच्या वेळोवेळच्या प्रत्येक प्रेरणेचें बंधन न स्वीकारता स्वतःच्या पूर्ण विचारांनीं बनलेल्या मताप्रमाणें वागतात त्यांचाहि लोकांच्या शहाणपणावर विश्वास असतोच. याचा अर्थ असा कीं लोकांच्या अंतिम न्याय-बुद्धीवर त्यांचा विश्वास असतो. आपल्या प्रतिनिधीचें धैर्य व तर्कशक्ति यावर लोकांचा विश्वास असून राष्ट्राच्या हितासाठीं स्वार्थत्यागपूर्वक आपला प्रतिनिधि वागेल असे लोक मानतात असें याला वाटत असते. जनतेसंबंधींच्या लोक-प्रतिनिधींच्या या श्रद्धेवरच लोकशाही आधारलेली आहे. वेळोवेळीं असणारें लोकमत आणि जनतेचें हित हीं एकरूप असतात या श्रद्धेचा अनेकदां भंग झालेला असून अशी श्रद्धा ही लोकशाहीचा आधार असूं शकत नाहीं. माझ्या मतें मतदार जेव्हां आम्हांला निवडतात त्या वेळेला आमच्या निर्णयशक्तीवर भरंवसा ठेवून ते आम्हांला निवडतात. राष्ट्राच्या हितांतच सामावलेलें जनहित कोणचें तें ठरवून त्याप्रमाणें वागण्याची पात्रता आमच्या ठिकाणीं आहे असा विश्वास लोकांना आमच्याबद्दल वाटतो म्हणून लोक आम्हांला निवडतात. याचा अर्थ असाच होऊं शकतो कीं आम्ही लोकांना शिकवलें पाहिजे, मार्गदर्शन केलें पाहिजे, त्यांच्या चुका सुधारल्या पाहिजेत आणि ज्या आमच्या निर्णयशक्तीवर लोकांनीं भरंवसा ठेवला त्या निर्णयशक्तीची बजावणी करायची तर वेळप्रसंगीं लोकमताची उपेक्षाहि आम्हीं केली पाहिजे. ज्या वेळीं एखादा प्रतिनिधि स्वार्थ अथवा वैयक्तिक पूर्वग्रह बाजूस ठेवून आपल्या सदसद्विवेकबुद्धीच्या प्रेरणेनुसार वागतो त्या वेळीं तो प्रतिनिधि लोकांच्या भावनांबद्दल बेफिकीर असणारा, अमीरी वृत्तीचा अथवा बेजबाबदार वक्तृत्वाचा अथवा तऱ्हेवाईक स्वभावाचा निर्दय मुत्सद्दी आहे असें मानणें योग्य नाहीं. असा प्रतिनिधि जेव्हां आपल्या सदसद्विवेकबुद्धीच्या प्रेरणेनें वागतो त्यावेळीं आपल्या वर्तनाच्या शहाणपणा-बद्दल जनतेनेंच कौल द्यायचा आहे हें तो भीत भीत मान्य करतोच. पण आज आपणाला लोक शहाणे म्हणाले नाहींत तरी उद्यांची आणखी एखादी पुढली

पिढी आपग आपल्या स्वतंत्र वर्तनांतहि दाखविलेल्या तत्त्वनिष्ठेला मान देईल, अशी त्याची अपेक्षा असते.

एकाद्या विशिष्ट काळीं शिवराळ संपादकीय लिखाणामुळें अथवा विषारी पत्रलेखनामुळें एखाद्या पुढाऱ्याचें आयुष्य बरबाद होईल अथवा विशेष धोका म्हणजे मतपेटींत पडलेल्या प्रचंडसंख्य विरोधी मतपत्रिकांमुळें, एकाद्या लोकप्रतिनिधीचें सार्वजनिक जीवन थोडा काळ अथवा कायमचेंहि एकाद्या शिळेखालीं गाडलें गेल्यासारखें होईल. तरी पण भावी कालासंबंधानें त्याला आशा व भरंवसा वाटत असतो. कारण टी. व्ही. स्मिथ म्हणतो त्याप्रमाणें जनतेचे विचार जनतेच्या जीवनांत प्रतिबिंबित होण्यास बराच वेळ लागतो. स्मिथनें एका अनामिक कवीची कविता आपल्या मताच्या स्पष्टीकरणार्थ दिली आहे:

"एक डॅशंड कुत्रा फारच लांबट होता म्हणून त्याच्या डोक्यांतील भावना शेपटीपर्यंत पोचण्यास फार वेळ लागे. यामुळें त्याचे डोळे दुःखाश्रूंनीं भरलेले असतां त्याची शेपटीं त्यापूर्वीच्या क्षणांतील आनंदांत डोलत असे." असो.

अमुक एका मुद्यावर अमुक बाजूनें सिनेटर मत देतो. पण त्यापूर्वीं सिनेटमध्यें तो प्रश्न जसा मांडला गेला तसा तो लोकांसमोर मांडला गेल्यास लोक कसें मत देतील हें तो सिनेटर सांगूं शकेल काय ? सिनेटमध्यें आम्ही जेव्हां बसतों तेव्हां आम्ही जणूं कांहीं कृत्रिम असें लोखंडी फुप्फुस लावून बसलेले असतों. त्या कृत्रिम वातावरणांतून बाहेर पडून जनतेच्या खुल्या वातावरणाशीं मनानें सात्म्य पावणें हें सोपें नसतें. वॉशिंग्टनहून सिनेटर जेव्हां आपल्या घटक राज्याच्या प्रदेशांत जातो त्यावेळीं त्या पुढाऱ्याभोवतीं धंदेवाईकपणें घोटाळणारे लोक त्याला भेटतात. आपले विचार बोलून दाखविणारे गटहि त्याला भेटतात. पण त्यांच्यामागें दृष्टि-टप्प्यापलीकडे असणारे जे असंख्य लोक असतात त्यांचें मत तो जाणूं शकतो काय ? वॉशिंग्टनमध्यें असतांना अमुक एका विषयावर लोकमत काय आहे हें आम्ही कसें अजमावतों ? चाळीस ते पन्नास लोकांचीं आलेलीं पत्रें पांचदहा धंदेवाईक राजकारणी व कार्यकर्ते, मॅसॅच्युसेट्स्‌मधील तीनचार वृत्तपत्रांचे संपादकीय लेख. बस्स, एवढेंच आमचें लोकमत अजमावण्याचें साधन ! पण, खरोखर प्रचंड बहुसंख्य मतदारांना त्याविषयीं काय वाटतें ? अथवा वॉशिंग्टनमध्यें मोठ्या जोमानें धुमसणाऱ्या त्या प्रश्नाची लोकांना माहिती कितीशी असते, याचा आम्हांला कांहींच उमज पडत नाहीं.

पूर्वीच्या कोणत्याहि काळापेक्षां राजकीय धैर्य दाखविण्याचे प्रसंग आज अधिक आहेत. लोकांत ज्ञानप्रसार करण्याचीं व जागृति करण्याचीं साधनें अतिशय वाढलीं असून लोकांना नापसंत असें एखादें धोरण अवलंबलें तर केवढा विरोध व प्रक्षोभ माजतो याची कल्पना १५० वर्षांपूर्वीच्या मुत्सद्यांना येणें अशक्य होतें. राजकारणी जीवन अतिशय खर्चाचें झालें आहे. तें अगदीं यंत्र-बद्ध झालें आहे. आणि धंदेवाईक मुत्सद्दी व जनतासंपर्क मिळविण्यांत वाकब-गार असणारे लोक यांचें प्रभुत्व राजकारणांत इतकें माजलें आहे कीं, स्वतंत्र ध्येयनिष्ठायुक्त मुत्सद्देगिरीच्या स्वप्नांत रंगलेला एखादा माणूस निवडणुकींतील गरजांच्या धक्क्यानें खडबडून जागा होतो. आणि ध्येयनिष्ठेच्या स्वप्नाची क्रूर असत्यता अनुभवतो. 'शीतयुद्ध' म्हणून नांव पावलेल्या व कधींच संपणार नाहीं अशा दिसणाऱ्या ध्येयात्मक भांडणाभोंवतीं आपलें सार्वजनिक जीवन इतकें अधिकाधिक गुरफटलें जात आहे कीं ध्येयवादाचें ओतीव साचे आणि जुनाट विचारांचे सांगाडे यांनाच कवटाळण्यास आपण उत्तेजन देत आहों.

पुढील काळांत अशा विरोधी पक्षाशीं आपल्याला लढायचें आहे कीं, त्या पक्षाच्या पुढाऱ्यांना आपला मार्ग लोकप्रिय आहे कीं नाहीं हें पहाण्याची गरज नाहीं. चिखलाच्या मूर्ती बनवाव्या त्याप्रमाणें जे लोकमत बनवूं शकत असल्यामुळें लोकमताला कवडीचीहि किंमत देण्याची ज्यांना जरूरी नाहीं आणि भावी काळच्या वैभवाच्या आश्वासनावर विसंबून आजच्या आनंदाचा होम करायला लोकांना सांगतांना निवडणुकींत आपणाला थप्पड बसेल अशी भीति बाळगण्याची ज्यांना गरज नाहीं, अशा हुकुमशाही प्रवृत्तींशीं भावी काळीं लोकशाहीप्रवृत्तींना झगडावें लागणार आहे. या झगड्यांत यशस्वी होण्यासाठीं लोकांना अप्रिय असेहि निर्णय घेण्याची जरूरी भासेल. असा कठोर मार्ग अवलंबिण्यास फार लोकोत्तर धैर्याचीं माणसें पुढें आलीं पाहिजेत. व्यक्तिस्वातंत्र्य आणि मतस्वातंत्र्य या तत्त्वांनीं ज्या ज्या राष्ट्रास जन्म दिला आणि ज्यांच्या बालपणांत त्यांचें पोषण करून अतिशय कठोर प्रसंगांतून त्या राष्ट्राना परिपक्व दशेपर्यंत आणलें त्या राष्ट्रांना भावी झगड्यांतून निभावून नेण्यासाठीं लोकोत्तर धैर्याचीं माणसेंच हवीं आहेत.

लिबरॅलिझम् वि. कॉंझर्वेटिझम्, उत्तर वि. दक्षिण, कारखानदार वि. कामगार, मालउत्पादक वि. गिऱ्हाइक इत्यादि परंपरागत परस्परविरोध आमच्या

रिपब्लिकन वि. डेमोक्रॅट या विरोधांसारखेच असून अशा परंपरागत संकुचित दृष्टिकोणानें आपण राजकारण करूं तर तें सोपें होईल. सैन्यांचीं कामें जशीं पलटणींनीं चालतात त्याप्रमाणें कोणत्या तरी मतापुढें अथवा चळवळीपुढें गुलामाप्रमाणें मान तुकविणाऱ्यांच्या पलटणींत सामील होऊन चळवळी कराव्या व मतें द्यावीं म्हणजे झालें. पण अशा परंपरागत आळसावलेल्या राजकारणांतले विलास आपल्या देशाला आज परवडणार नाहींत. आपल्याला आतां ज्या विदेशी शक्तीशीं लढावयाचें आहे ती शक्ति हायड्रोजन बाँबपेक्षा स्वतंत्र विचाराला अधिक भिते. त्या शक्तीशीं लढण्यासाठीं स्वतंत्र विचार व निरनिराळ्या व्यक्तींच्या ( तऱ्हेवाईक व्यक्तींच्याहि ) कल्पना यांनीं मिळणारी शक्ति, प्रगति व शांततामय क्रांति यांचाच उपयोग होईल.

भावी काळांतहि आपल्याला तडजोडी कराव्या लागतील. पण या तडजोडी विशिष्ट प्रश्नापुरत्या असतील. तत्त्वाबाबत तडजोडी होता कामा नयेत. हित-संबंधांतील विरोध आपण मिटवूं शकूं, पण ध्येयांचा लिलांव करता कामा नये. आपलीं तत्त्वें न सोडतांहि हितविरोध मिटविता येतात. जे ध्येयनिष्ठ व सुधारक लोक आपल्या तडजोडींना अडथळे आणतात अशांचीहि मदत योग्य व अत्यावश्य अशा तडजोडीसाठीं हवी असते. कारण बर्नार्ड शॉनें ज्या तडजोडींना कुजका संधि-साधूपणा म्हटलें आहे अशा तडजोडीपासून हे ध्येयवादी लोक आपला बचाव करतात. तडजोड म्हणजे भेकडपणा नव्हे. तडजोड करणारे, समेट करणारे जे असतात त्यांनाच कसोटीचें धैर्य दाखवावें लागतें. कारण आपल्या पक्षांतील एकांतिक मताच्या लोकाशीं त्यांना झुंजायचें असतें. १८५० सालीं डॅनिअल वेबस्टरनें जी तडजोड स्वीकारली ती सदसद्विवेकबुद्धीस पटल्यानेंच स्वीकारली. पण त्यामुळेंहि त्याला इतिहासांत अभूतपूर्व अशी निंदा सोसावी लागली. त्याची कथा आज स्मरणांत ठेवण्यायोग्य आहे.

या पुस्तकांतील सिनेटरांच्या धैर्याच्या कथा, वरील सर्व दृष्टींनीं संस्मरणीय आहेत. त्यांची स्वराष्ट्राबद्दलची निष्ठा ही वैयक्तिक आणि राजकीय स्वार्थापेक्षां वरचढ ठरली. खरें धैर्य म्हणजे काय, हें त्यांनीं दाखविलें. युनायटेड स्टेट्स्चें सिनेट हें आपल्या मतदारांचीं मतें बोलून दाखविणारें आहे, तें मानवी यंत्रांचा संग्रह नव्हे अथवा लोकमताचा अंदाज घेऊन प्रसंगापुरते वागणाऱ्या संधिसाधूंचें हें सभा गृह नव्हे. तर खरी, जिवंत व स्वतंत्र वृत्तीचीं माणसें तेथें आहेत हें त्यांनीं दाखविलें.

या ग्रंथांत ज्यांचीं चरित्रें दिलीं आहेत त्यांतल्या कांहींचीं मतें खरीं होतीं, इतरांचीं नव्हतीं. कांहींना आपली गेलेली लोकप्रियता परत मिळाली व त्यांचें कर्तृत्व श्रेष्ठ ठरलें, दुसऱ्या कांहींना तें भाग्य लाभलें नाहीं. कांहींनीं सारा जन्मभर राजकीय धैर्य दाखविलें, दुसरे कांहीं लोक सामान्यत: प्रवाहाबरोबर चालते राहिले, पण सद्सद्विवेकबुद्धीच्या बोचणीचा प्रसंग आला तेव्हां त्यांनीं वादळाच्या मध्यभागीं उडी घेतली. कांहींनीं एकांतिक तत्त्वासाठीं अमर्याद धैर्य दाखविलें, इतरांनीं अत्यावश्य अशा तडजोडीसाठीं धि:कार पत्करला.

या चरित्र-नायकांत फरक कांहींहि असले तरी मनोधैर्य हा श्रेष्ठ गुण त्या सर्वांपाशीं होता. मीं पुढें दिलेल्या त्यांच्या चरित्रांत त्यांनीं ज्यासाठीं लढा दिला तीं त्यांचीं तत्त्वें व ध्येयें, त्यांचे गुण व त्यांचे दोष, त्यांचीं स्वप्नें व त्यांचे भ्रमनिरास, त्यांना मिळालेल्या प्रशंसा व त्यांनीं सोसलेल्या निंदा यांचीं चित्रें मीं रेखाटलीं आहेत. हें सर्व कागदावर लिहिता येतें. तसें तें लिहिणें व वाचणें हें आपलें काम आहे. या प्रत्येकाच्या जीवनांत असे कांहीं तरी एक उदात्त तत्त्व होतें कीं, तें कागदावर उतरणें फार अवघड आहे. पण तें घरोघर पोंचून आमच्या जीवनांत बिंबलें आहे. सर्व अमेरिकन राष्ट्रांचें जीवन त्यानें संपन्न केलें आहे.

# भाग १ ला

## काल....स्थल....परिचय

आपली पहिली कथा १८०३ सालीं सुरू होते. त्यावेळीं वॉशिंग्टन हें एक अगदीं अर्धवट वसलेलें खेडें होतें. दंतकथा अशी आहे कीं, एक नवीन फ्रेंच वकील वॉशिंग्टनमध्यें आला आणि सभोवार पाहून म्हणाला, "हे, भगवान ! मीं असा काय गुन्हा केला आहे कीं मला या गांवांत रहाण्याची शिक्षा व्हावी !" त्यावेळीं कॅपिटॉल इमारत अपुरी बांधलेली होती. तेथें त्यावेळीं बसणारें सिनेट हें १७८९ सालीं न्यूयॉर्क सिटी हॉलमध्यें बसणाऱ्या सिनेटहून अथवा १७८७ सालीं घटना करणारांच्या सिनेटच्या कल्पनेहून फारच वेगळें होतें.

सिनेटमधील सभासदांना पुढील काळांत आपल्या मतदारांच्या मतास विरोध करून आपली कारकीर्द धोक्यांत आणण्याचा अथवा ती संपवण्याचाहि प्रसंग आला. पण सिनेटच्या सभासदावर असें धैर्य दाखविण्याची पाळी यावी अशी त्याची मूळची कल्पनाच नव्हती. सिनेट आणि हाऊस ऑफ् रिप्रझेंटेटिव्हज (प्रतिनिधिसभा) हीं अमेरिकन कॉंग्रेसचीं दोन सभागृहें. पैकीं सिनेटवर मतदारांच्या मताचें दडपण येऊं नये अशा अपेक्षेनें त्याची मूळ रचना केली होती. घटक राज्याचा आकार अथवा लोकसंख्या कितीहि लहानमोठी असो, सिनेटरांची संख्या प्रत्येकाला समान देण्यांत आली पाहिजे. सिनेटर हे लोकांनीं निवडावयाचे नसून त्या त्या घटक राज्यांनीं पाठवावयाचे होते. जणूं कांहीं अमेरिकन फेडरल सरकारकडे त्या त्या घटक राज्यांचे ते वकीलच होते. दर दोन वर्षांनीं त्यांची निवड व्हावयाची नव्हती. अलेक्झॅन्डर हॅमिल्टनच्या मतें सिनेटर हा आयुष्यभर कायम असावा, पण तसें न करतां त्याला सहा वर्षांची मुदत देण्यांत आली. लोकमताच्या दडपणापासून तो बराच अलिप्त रहावा अशी यांत अपेक्षा होती.

सिनेटरांची निवड राज्यकायदेमंडळानें करावयाची होती. अशीं कायदेमंडळें हीं सनातनी प्रवृत्तीच्या धनवंतांची प्रतिनिधीभूत असतील अशी अपेक्षा

होती. सामान्य जनतेच्या मूर्खपणाला प्रतिकार करणें हें काम या कायदेमंडळांचें असे. "सिनेटमध्यें येणारीं माणसें मोठ्या शीलाचीं, उच्च दर्जाचीं, बडी संपत्तिमान आणि जास्तींत जास्त प्रमाणांत ब्रिटिश हाऊस ऑफ लॉर्ड्सच्या तोंडवळ्याचीं असतील" असें जॉन डिकिन्सननें कॉन्स्टिटयूशनल कन्व्हेन्शनपुढें भाषण करतांना म्हटलें.

कायदेमंडळ म्हटलें कीं तेथें प्रक्षुब्ध वादविवाद होतात आणि लोकांचें त्याकडे लक्ष वेधतें. सिनेटबद्दल ही अपेक्षा नसून सिनेट हें अधिक प्रमाणांत कार्यकारी मंडळ असावें अशी अपेक्षा होती. त्यानें नेमणुका कराव्या, तह करावे आणि राष्ट्रपतीला सल्ला द्यावा, पण सिनेटच्या बैठकीला प्रेक्षकांनीं हजर असूं नये अथवा सिनेटच्या कामकाजाचें नियतकालिकहि असूं नये अशी व्यवस्था होती. हॅमिल्टन म्हणे, "सिनेटमध्यें स्थानिक स्वरूपाचे पूर्वग्रह असतां कामा नयेत. नाहीं तर प्रतिनिधिसभेंत ज्याप्रमाणें 'अहो ही योजना घेतली तर माझ्या मतदारांना काय वाटेल, माझ्या निवडणुकीचें काय होईल' अशी चर्चा होते तशीच सीनेटमध्यें पुन्हां व्हायची."

१७८९ सालीं न्यूयॉर्कमध्यें युनायटेड स्टेट्सचे पहिले २२ सिनेटर जमले. त्यांनीं मूळ घटनाकारांची अपेक्षा पूर्ण केली. कारण, तें सिनेट ब्रिटिश हाऊस ऑफ् लॉर्ड्ससारखें होतें. प्रतिनिधिसभेशीं तुलना करतां सिनेटचा झगमगाट बराच अधिक असून त्यांत फार थोर व अनुभवी सदस्य होते. त्यांचा दिवाणखाना मोठा भव्य व दिमाखदार असून त्यांतील सदस्य सुंदर पोषाख करीत व आपल्या सामाजिक दर्जाबद्दल दक्ष असत. सिनेटच्या बैठकी चालू असतां दरवाजे बंद असत. राष्ट्रपति वॉशिंग्टनशीं सर्व सिनेट सल्लामसलत करीत असे. आणि सिनेट हें राज्यकारभाराचा एक भागच होऊन गेलें होतें.

पण प्रत्येक कायदेमंडळांत अखेर राजकारण शिरकाव करून घेतेंच तसें तें अमेरिकन सिनेटमध्येंहि आलें. फेडरेलिस्ट पक्ष (म्हणजे राष्ट्रहितापेक्षां घटक राज्याच्या हिताकडे अधिक लक्ष देणारा पक्ष) परराष्ट्रीय धोरणाच्या मुद्यावर फुटला आणि थॉमस जेफर्सननें कॅबिनेटचा राजिनामा देऊन आपल्या अनुयायांची संघटना सुरू केली. तेव्हांपासून सिनेटमध्यें सरकारच्या कार्यकारी शाखेवर टीका होऊं लागली. त्यामुळें कार्यकारी शाखेच्या कामांत सिनेटला शिरकाव मिळण्याचे बंद होऊन अध्यक्षाच्या मताचें असणारें आणि अध्यक्षाला जबाबदार

असणाऱ्या अधिकाऱ्यांचें जें कॅबिनेट त्याच्या हातीं सर्व अमलबजावणीचीं सूत्रें गेलीं. पुढें लवकरच राज्यकारभाराचीं धोरणें व व्यवहार यांची तपासणी करण्या-करितां सिनेटनें स्पेशल कमिटयाहि नेमल्या. त्याच वर्षी वायव्येकडील इंडियन लोकांशीं करावयाच्या तहासंबंधानें सिनेट वॉशिंग्टनशीं चर्चा करीत असता सिनेटर मॅक्ले व इतर सदस्य यांना सिनेटच्या हातीं अमलबजावणीची सत्ता नाहीं इतकेंच नव्हे तर राष्ट्रपति वॉशिंग्टन आपल्या मानगुटीवर बसतो आहे अशी भीति वाटली. म्हणून तें तहाचें काम एकाद्या सिलेक्ट कमिटीकडे तपासणीसाठीं सोपवावें अशी सिनेटनें मागणी केली. या प्रसंगासंबंधानें सिनेटर मॅक्ले लिहितो : "वॉशिंग्टन सुरुवातीला भडकून, चिडून बोलूं लागला....नंतर निघून जातांना रुसव्याच्या मुद्रेनें निघून गेला. जगांतील त्या श्रेष्ठशील महापुरुषाच्या जागीं दुसरा कोणीहि माणूस असता तर मी त्याला अधिकाराच्या जोरांत संतापून बोललों असतों."

हळू हळू सिनेटला कायदेमंडळाचीं इतर अंगें प्राप्त झालीं. १७९४ सालीं कायदेमंडळाच्या कामकाजाच्या वेळीं प्रेक्षकांना हजर रहाण्यास परवानगी मिळाली. १८०१ सालीं वृत्तपत्रकारांना प्रवेश मिळाला. सिनेटच्या सभागृहांत प्रवेश मिळण्याचा मान कोणकोणास द्यावयाचा याची चर्चा १८०३ सालीं झाली. कॉंग्रेसमेन, परराष्ट्रीय वकील, सरकारी खात्यांचे वरिष्ठ, गव्हर्नर यांना सिनेटच्या सभागृहांत प्रवेश मिळे. पण स्त्रियांना परवानगी असावी का, असा प्रश्न पडला. सिनेटर राईट म्हणाला, "स्त्रिया सिनेटच्या सभागृहांत असल्या तर वाद-विवादाला मोठें गोड आणि जिव्हाळयाचें स्वरूप येईल. वक्त्यांच्या युक्तिवादांना अधिक सफाईदारपणा येईल. त्यांच्या वागणुकींत अधिक सौम्यपणा येईल." पण जॉन क्विन्सी अॅडम्स् ह्या प्युरिटन सभासदानें उत्तर दिलें कीं, "स्त्रियांच्या अस्तित्वामुळें सिनेटमध्यें गोंगाट माजेल, घोटाळा होईल आणि केवळ स्त्रियांचें लक्ष वेधण्यासाठीं वादविवाद लांबत जातील." (अशा प्रकारें स्त्रियांना प्रवेश देण्याचा ठराव १६ विरुद्ध १२ मतांनीं नापास झाला. पुढील काळांत हा ठराव दोनदां उलटसुलट झाला आहे.)

सिनेटरांना रोजचा तनखा सहा डॉलर इतका भरपूर मिळत असे. आणि सिनेटमध्यें बसले असतांना तपकिरीची भली मोठी चांदीची डबी त्यांना जवळ घेऊन बसण्याची सवलत होती. पहिल्या सिनेटमध्यें आलेले सदस्य मोठ्या

सरदारी दिमाखाचे होते. पण १८०० सालीं वॉशिंग्टन हें खेडें राजधानीचें शहर होऊन तेथें सिनेट भरूं लागलें, त्यावेळीं पूर्वी न्यूयॉर्क आणि फिलाडेल्फिया या बड्या शहरांत शोभणारा सिनेटरांचा दिमाख वॉशिंग्टनच्या खेड्यांतील खडबडीत देखाव्याशीं विपरीत दिसूं लागला. सिनेटच्या कार्यक्रमांत नियमबद्धता पाळण्यांत येत असे. तरी पण कांहीं सिनेटर सिनेटमध्यें बसले असतां संत्री व केक्स खात आणि दोन माणसांचा वादविवाद चालला असतां त्या दोघांमधून हिंडत. अशा वेळीं मग अध्यक्षांच्या खुर्चीत असलेला उपराष्ट्रपति ॲरन अशा सभासदांना हटकत असे. स्वत: ॲरनहि दुर्लौकिकाचाच माणूस होता. कारण तो द्वंद्वयुद्ध खेळत असे. त्यानेंच एका द्वंद्वयुद्धांत हॅमिल्टनला ठार केलें. जॉन क्विन्सी ॲडॅम्स् यानें आपल्या रोजनिशीत लिहिलें आहे. "माझ्या कांहीं सहकाऱ्यांचीं भाषणें इतकीं बेताल आणि उद्धट असत कीं, ते पिऊन तर्र झाले असले पाहिजेत म्हणूनच ते असे बोलतात असें मानावें लागे." पण त्या काळीं एकंदरीनें सिनेटचा दर्जा प्रतिनिधिगृहापेक्षां अधिक उच्च होता. प्रतिनिधिगृहांत सभासद डोक्यावर हॅट घालत व समोरच्या लिहिण्याच्या डेस्कवर पाय ताणून बसत. रोनोकचा जॉन रँडॉल हा घोड्याला टोचण्याचा चांदीचा 'स्पर' टांचेला तसाच ठेवून व हातांत घोडेस्वाराचा भला मोठा चाबूक घेऊन सभागृहांत दाणदाण चालत येई. त्याच्या बरोबर त्याचा मोठा शिकारी कुत्रा येत असे आणि तो त्याच्या डेस्कखालीं झोपत असे. स्वत: रँडॉल विरोधी पक्षावर दुष्ट हल्ला करणारीं भाषणें करी त्यावेळीं द्वारपालाकडून अधिकाधिक दारू मागून घेई व बोलतांना ती झोंकत असे.

सिनेटपेक्षां प्रतिनिधिसभेचा दर्जा पहिल्या तीस वर्षांत याप्रमाणें जरी कमी असला व प्रतिनिधिसभा चर्चा करणारी सभा म्हणून जरी फार लहान असली तरी तिला सिनेटपेक्षां अधिक राजकीय सत्ता होती. त्या काळांतील परिस्थिती-संबंधानें मॅडिसन म्हणतो : "मी त्यावेळी अगदीं तरुण होतों. आणि महामुत्सद्दी म्हणून आपली कीर्ति व्हावी अशी मला महत्त्वाकांक्षा होती. म्हणून सिनेट-मधील जागा मीं नाकारली. कारण सिनेटमधील चर्चेचें लोकमतावर कांहींच वजन पडत नसे." पुष्कळसे सिनेटर प्रतिनिधिसभेंत जागा मिळावी म्हणून सिनेटमधील जागा सोडून देण्यास तयार होते. प्रतिनिधिसभेंत एखादी महत्त्वा-ची चर्चा चालू असल्यास सिनेटरांना ती ऐकायला मिळावी म्हणून सिनेट पुष्कळदां तहकूबहि करण्यांत येई.

सिनेटच्या त्या कालखंडाविषयीं सिनेटर मॅक्लेनें लिहिलेली रोजनिशी, कांहींशी चिडून विपर्यासानें लिहिलेली असली तरी फार चांगली आहे. त्या वेळचीं अधिवेशनें अगदीं कंटाळवाणीं आणि क्षुद्र असत, असे मॅक्ले लिहितो. त्याच्या ३ एप्रिल १७९० या तारखेच्या पानावर पुढील नोंद आहे: "सभागृहांत गेलों. मिनिट्स् वाचून दाखविण्यांत आली. अमेरिकेच्या राष्ट्रपतीचा संदेश आला होता, तो वाचून दाखविण्यांत आला. सभाध्यक्षांना एक अहवाल सादर करण्यांत आला. आम्ही एकमेकांकडे पहात व हांसत सुमारें अर्धा तास बसलों. . आणि सिनेटची वैठक तहकूव झाली."

पण हळूहळू सिनेटचें तें स्वरूप पालटूं लागलें. त्याची कार्यकारी सत्ता कमी-कमी होत जाऊन बिलें व ठराव यांची चर्चा करणें, तें मंजूर-नामंजूर करणें हें काम वाढत गेलें. तेव्हां सिनेटमधील चर्चेवर मतदारांच्या मतांचें अथवा राजकीय पक्षांचें दडपण येऊं नये म्हणून निर्माण केलेलीं घटनात्मक बंधनें, तीं सद्हेतूनेंच निर्मिलीं होतीं तरी वाया गेलीं. मॅक्लेला या प्रकाराचा तिटकारा आला होता. सिनेटमधील जागा हा एक अतिशय नाजूक मान आहे व सिनेटर हा अतिशय विद्वान व मोठा उमदा असतो असा त्याचा समज होता. पण त्या जागीं क्षुद्र, स्वार्थी माणसें तेथें असून आमची राज्यपद्धति ही बेजबाबदारपणें मतें ठोकून देण्याची पद्धति झाली आहे असें मत त्यानें व्यक्त केलें आहे. "तूं माझ्यासाठीं अमूक बाजूनें मत दे, म्हणजे मी तुझ्यासाठीं तमुक बाजूनें मत देतों" असे मतदानाचे सौदे चालत असल्याबद्दलची सिनेटर मॅक्ले यानें नोंद केली आहे. सिनेटमध्यें प्रादेशिक पूर्वग्रह विसरले जातील अशी हॅमिल्टनची कल्पना होती. पण ते पूर्वग्रह सिनेटमध्यें उलट अधिकच दृढ झालेले दिसून आलें. न्यू इंग्लंड राज्याचें फेडरेलिस्ट आणि व्हर्जिनियाचे जेफर्सोनियन यांनीं सिनेटमध्यें प्रादेशिक गट पाडले. शिवाय पक्षीय भूमिकेनें सिनेटमध्यें तुकडे पडले. पूर्वीं ज्या सामान्य लोकांना 'गळाठा' म्हणून तुच्छ लेखलें जात असे त्या लोकांचीं राजकीय मतें सिनेटरांवर दडपणासारखीं येऊं लागलीं. कारण मतदानाचा अधिकार मालकीच्या संपत्तीवर अवलंबून न रहाता सार्वत्रिक झाला व जनतेला महत्त्व आलें. सिनेटमधील सदस्यांना लोकाकडून हुकूमवजा सूचनाहि येऊं लागल्या. परराष्ट्रांत ठेवलेल्या वकिलाला मधूनमधून स्वदेशीं परत येऊन आपल्या सरकारला परिस्थिति सांगावी लागते त्याप्रमाणें कांहीं सिनेटरांना त्यांच्या प्रादेशिक

राज्याच्या कायदेमंडळाकडून बोलावलें जाऊन त्यांच्याकडून अहवाल मागण्यांत येऊं लागले.

त्या काळीं नित्य परिस्थिति बदलत होती. सिनेटमध्यें बदल होत होता. आमची सरकारविषयींचीं कल्पना बदलत होती, द्विपक्षीय लोकशाही अधिकाधिक दृढमूल होत होती. शेती आणि सरहद्द प्रदेश येथें लोकशाही वाटचाल करीत होती. त्यावेळचीं माणसें व्यवहारांत लवचिक होतीं. बदलत्या लोकमताबरोबर धांवत असत अथवा त्यावर प्रभुत्व गाजवीत. सिनेटमध्यें कायदे कसे होतात यापेक्षां सिनेटची इभ्रत वाढून त्याबरोबर आपली कीर्ति कशी वाढेल याची ते विशेष फिकीर करीत.

पण पुढें ज्याचें चरित्र सांगितलें जाणार आहे तो तरुण जॉन क्विन्सी अॅडॅम्स असा लवचिक अथवा लेचापेचा नव्हता.

प्रकरण २ रें—

# जॉन क्विन्सी अॅडॅम्स

मॅसॅच्युसेट्स्मधून निवडून आलेला जॉन क्विन्सी अॅडॅम्स हा तरुण सिनेटर एक दिवस सिनेटमधील चर्चा रटाळपणें चाललेली असतांना आपल्या खुर्चीत बसल्या-जागींच अस्वस्थपणें हालचाल करीत होता. सिनेटचें सभागृह अर्धवट भरलेलें होतें.

मॅसॅच्युसेट्स्मधून निवडून आलेला त्याचा दुसरा सहकारी सिनेटर पिक्‌रिंग हा १८०७ सालच्या अध्यक्ष जेफर्सनच्या व्यापारबंदीधोरणाचा निषेध करीत होता. शंभर वेळां तरी त्यानें असा निषेध करून आपलें कंटाळवाणें भाषण चालविलें होतें. सभागृहांतील सदस्य त्याच्या निषेधात्मक ओरडण्यास साथ देत होते. सभागृहाबाहेर जानेवारींतला पाऊस झिमझिम पडत असल्यानें त्या वॉशिंग्टन खेड्यांत सर्वत्र चिखल झाला होता. अशा प्रकारें सिनेटमध्यें व सिनेटबाहेर एक प्रकारचें औदासीन्य पसरलेलें असतां सिनेटर अॅडॅम्स आपल्या टेबलावर मॅसॅच्युसेट्स्मधून आलेलें व अस्ताव्यस्त पडलेलें टपाल चाळत होता. एका अपरिचित हस्ताक्षरानें त्याचे डोळे खेचून घेतले. पाकिटावर पत्र कोणीं पाठविलें त्याचा पत्ता नव्हता. त्यानें पाकिट फोडलें. आंत एक सुटा गुळगुळीत कागद होता, त्यावर एक अनामिक पत्र होतें. थोड्याशा रागानें त्यानें तें पत्र एकदां, दोनदां वाचलें. आणि नंतर तें पाकिट व पत्र चुरकळून डेस्कजवळच्या टोपलींत फेकून दिलें. पत्र पुढीलप्रमाणें होतें.

"हे प्रातःकालीं उदयाचलावर येणाऱ्या अरुणदेवा, काय हा तुझा अधःपात ! ह्या अधःपातांतून तूं कधीं वर येशील कां ? अॅडॅम्स्, तूं कोण आहेस हें विसर-लास ! मॅसॅच्युसेट्स्ला तूं परत ये. देशाकडे परत ये. त्याच्या विनाशाला कारण होऊं नकोस. परिणामाकडे लक्ष दे आणि वेळींच जागा हो.

ए 'फेडरेलिस्ट'

( फेडरेलिस्ट हा शब्द त्या काळीं संघराज्य विरुद्ध घटकराज्य या चालू असलेल्या वादांत घटकराज्याभिमानी या अर्थाचा होता. )

फेडरेलिस्ट या शब्दावर ॲडॅम्स मनांतल्या मनांत चिडून गेला. मागला राष्ट्रपति फेडरेलिस्टच होता. त्याचा मुलगाच जॉन क्विन्सी ॲडॅम्स्. स्वत: जॉन ॲडॅम्स यानें परदेशांत फेडरेलिस्ट सरकारतर्फे नोकरी केली होती. मॅसॅच्युसेट्स् कायदेमंडळांत तो फेडरेलिस्ट म्हणून निवडूनहि आला होता आणि आतां सिनेटमध्येंहि त्याच पक्षातर्फे निवडून आला होता. पण इतके सर्व घडल्यानंतर स्वपक्ष आणि स्वप्रदेश ह्यापेक्षां राष्ट्राच्या हिताला आपण अधिक महत्त्व दिलें एवढ्याचसाठीं हा 'फेडरेलिस्ट' आपला धि:कार करतो याबद्दल जॉन ॲडॅम्स्ला चीड आली. तो मनाशी म्हणाला, "मीं त्यांना सोडलेले नाहीं, तेच मला सोडून देत आहेत."

त्या रात्रीं लिहिलेल्या रोजनिशींत जॉन क्विन्सी ॲडॅम्सनें पुढीलप्रमाणें नोंद केली आहे. तो लिहितो : "माझें राजकीय भवितव्य घसरूं लागलें आहे. सिनेट-मधील माझी मुदत जशी संपत येत आहे तशी पुन्हां निवडून न येण्याची खात्री वाढत असून मी आतां फक्त एक सामान्य नागरिक रहाणार आहें. या परिस्थितीस तोंड देण्याइतकी माझी तयारीहि झाली आहे. दरम्यान ज्या परमेश्वरानें मला माझ्या राष्ट्राची सेवा करण्यास जरूर असलेल्या सद्‌गुणांची देणगी दिली त्याला मी एवढीच प्रार्थना करूं इच्छितों कीं, मला जें माझें कर्तव्य वाटतें त्याहून अन्य प्रकारचें वर्तन सार्वजनिक जीवनांत माझ्या हातून होऊं नये."

जॉन क्विन्सी ॲडॅम्सच्या या भावना केवळ त्याच्या धैर्यशील वृत्तीच्याच द्योतक नसून तो प्युरिटन ( सर्वविलासपराङ्मुख अशा ख्रिस्ती पंथाचें नांव ) होता, त्यामुळेंहि त्याच्या ठिकाणीं ही ईश्वरपरायणता व कठोर कर्तव्यनिष्ठा होती. अशा प्युरिटनांनीं अमेरिकन सरकारवर आणि अमेरिकनांच्या रहाणीवर एक संस्मरणीय ठसा उमटविलेला असून अशा अलौकिक प्युरिटन प्रतिनिधींपैकीं जॉन क्विन्सी ॲडॅम्स् हा एक होता. कठोर आणि हट्टी,—न्यू इंग्लंडच्या अगदीं खडकाळ प्रदेशासारखा या प्युरिटनांचा स्वभाव असे. अमेरिकन प्रजासत्ताकाच्या पहिल्या कांहीं दिवसांत या प्युरिटनांनींच अमेरिकन सरकारला ध्येय, सुसंगति आणि शील या गोष्टी दिल्या. आपण ईश्वरास जबाबदार आहोंत ही गंभीर भावना आपल्या रोजच्या जिण्यांतहि ते प्युरिटन लोक धारण करीत असत.

माणूस हा ईश्वराचीच प्रतिकृति असून स्वराज्याला अवश्य असणाऱ्या सद्‌गुणांच्या बाबतींत माणूस हा समर्थ आहे अशी त्यांची निष्ठा होती. प्युरिटन हे व्यक्तिस्वातंत्र्य आणि कायदा यांवर प्रीति करीत. व्यक्तीचे हक्क आणि राष्ट्राचे हक्क या दोहोंतील व्यवच्छेदक मर्यादा ठरविण्याचें अलौकिक कौशल्य त्यांचा ठिकाणीं होतें. प्युरिटनांच्या बुद्धिमत्तेसंबंधानें जॉर्ज फ्रिस्बिहोअर लिहितो :

"प्युरिटनांची बुद्धिमत्ता नीतिसंबंधी विषयांत मोठी अचूक चाले. सत्याचें स्वरूप त्यांना स्पष्ट दिसे. तें नेहमीं अविश्रांतपणें कार्य करण्याला उत्सुक असत. सूक्ष्म संशोधन आणि वाद याची त्यांना हौस असे. पण व्यावहारिक शहाणपण त्यांच्या रोमरोमीं भिनलेलें असे व त्यामुळें त्यांच्या कृतींत आपोआप संयम येई. आपल्या ध्येयाबाबत त्यांची मोठी चिकाटी असे. त्यांचें धैर्य मोठें उमदें आणि ताठ व इच्छाशक्ति खंबीर असे. मानवी शत्रूपुढें अथवा वनवास, छळ, मृत्यु अशा संकटांपुढें ते कधीं नमत नसत, माघार घेत नसत."

जॉन क्विन्सी ॲडॅम्स आणि त्याचे पूर्वज या गुणांचे बनलेले होते. पण जॉनच्या अंगचे हे गुण आणि त्याच्या काळीं राजकीय पक्षांत चालणारीं कारस्थानें व रूढ असलेल्या राजकीय भावना यांच्यामध्यें दुर्दैवानें संगति राहिली नाहीं. वर दिलेल्या शिवराळ पत्रासारखीं पत्रें आल्यानें त्याला नाउमेद वाटूं लागलें होतें. त्यापूर्वीं बराच काळ, इतकेंच नव्हे तर सिनेटमध्यें तो शिरण्यापूर्वीं पुष्कळ दिवस प्युरिटनांनीं राजकारणांत शिरण्यांत धोके किती आहेत हें त्याला कळलें होतें. तो आपल्या तत्कालीन रोजनिशींत लिहितो :

"राजकीय वादविवादांत पडण्याचा मोह मला होतो. पण या देशांत राजकारणी मनुष्य हा एकाद्या पक्षाचाच असावा लागतो. मी पक्षाचा न होता साऱ्या राष्ट्राचा राजकारणी होण्यांत आनंद मानीन."

जॉन क्विन्सी ॲडॅम्स अगदीं लहान असल्यापासून त्याचें शिक्षण आणि वळण त्याला त्याच्या मात्यापित्याच्या खास देखरेखीखालीं मिळालें. "आमच्या मुलाला कॅबिनेटमध्यें अथवा जनतेंत नेतृत्व मिळेल, आपल्या देशाचे कायदे आणि त्याचें स्वातंत्र्य यांचा तो रक्षक होईल अशी आमची महत्त्वाकांक्षा आहे." असें जॉनची आई ॲबिजेल ॲडॅम्स ही मित्रांना सांगत असे. जॉन क्विन्सी ॲडॅम्स हा जन्मतःच मोठा भाग्यवान होता. त्यांच्या घराण्याचें नांव प्रसिद्धी पावलेलें असून त्याचा बाप अमेरिकेचा राष्ट्रपति झाला होता. त्या बुद्धिमान पित्यानें आपल्या मुलाची

नैसर्गिक बुद्धिमत्ता अधिकाधिक तीक्ष्ण करण्यासाठीं अविश्रांत मेहनत घेतली होती. त्याची आईहि अलौकिक सद्‌गुणाची होती. जीवनांत सुख आणि यश मिळण्याला अवश्य अशी सर्व परिस्थिति त्याला जन्मताच लाभली होती. पण मानसिक स्वास्थ्य प्राप्त होण्यासाठीं जो स्वभाव लागतो तो मात्र त्याच्यापाशीं नव्हता. त्याला आयुष्यभर अलौकिक यश मिळत गेलें. पण आपण आपल्या कार्याच्या गरजेच्या दृष्टीनें अपूर्ण आहोंत, आपल्या आशा भग्न होत आहेत, आपणांस अपयश येत आहे अशा विचारांची कोरणी त्याच्या मनाला नेहमीं लागलेली असे. न्यू इंग्लंडच्या नागरिकांच्या ठिकाणीं असलेली सदसद्विवेक निष्ठा ॲडॅम्सच्या अंगीं असून श्रेष्ठबुद्धिमत्ताहि त्याच्या ठिकाणीं होती. यामुळें त्याला सर्वदा अद्वितीय असें यश मिळत गेलें. पण आपण अपेशीच आहोंत अशी एक रोगट भावना त्याच्या मनांत नेहमीं घर करून बसली होती. लहान वयांतच त्याचा बौद्धिक विकास फार झाला. त्याबरोबरच लहान वयापासूनच स्वतःच्या अपूर्णतेची खंतहि त्याला वाटूं लागली. वयाच्या नववे वर्षीं त्यानें बापाला पुढील पत्र लिहिलें आहे. तो लिहितो.

प्रिय पिताजी,

आपलीं पत्रें आल्यानें मला फार आनंद होतो. तुम्हांला पत्र लिहिणें जितकें मला आवडतें त्यापेक्षां तुमचें पत्र वाचणें मला अधिक आवडतें. माझी भाषा अगदीं दरिद्री आहे. विचार चंचल आहेत. पक्षांची अंडीं जमविणें, निरनिराळे खेळ खेळणें, इतर क्षुल्लक गोष्टी करणें अशामागें माझें मन धांवत असतें. माझी मलाच याबद्दल चीड येते. माझें लक्ष अभ्यासाकडे रहावें ही मोठी तापदायक जबाबदारी आईवर आहे. माझी मला शरम वाटते हें मी सरळ कबूल करतों. रोलीनच्या इतिहासाचा तिसरा खंड वाचायला मीं नुकतीचा सुरुवात केली आहे. या वेळेपर्यंत मी तो अर्धा संपवायला हवा होता अशी मूळ योजना होती. अधिक उद्योगतत्पर होण्याचा निर्धार मीं या आठवड्यासाठीं केला आहे. या आठवड्यांत हा खंड मी अर्धा वाचणारच. माझा हा निर्धार मी टिकवूं शकलों तर आठवडा अखेर मी माझें कर्तव्य पार पाडल्याची हजेरी मी तुम्हांपुढें देईन. कृपा करून मीं वेळ कसा घालवावा, खेळ आणि अभ्यास यांचें प्रमाण कसें बसवावें यासंबंधानें आपण मला कांहीं सूचना द्याव्या. त्या जवळ ठेवून मी त्याप्रमाणें वागेन.

स्वतःला अधिकाधिक सुधारण्याचा निर्धार करणारा तुमचा पुत्र—

जॉन क्विन्सी ॲडॅम्स"

यानंतर ३६ वर्षांनीं त्यानें लिहिलेलें पत्र पुढें देतों. या छत्तीस वर्षांत तो सिनेटर झाला. हार्वर्ड प्रोफेसर झाला. युरोपांतल्या प्रमुख राष्ट्रांत अमेरिकेचा वकील म्हणून कामगिरी करून आला. तो लिहितो; "मी आतां ४५ वर्षांचा आहे. एका दीर्घजीवनाचा दोनतृतीयांश भाग संपला:–एवढ्या आयुष्यांत माझ्या देशाच्या व मानव जातीच्या हितासाठीं मीं काय केलें ? प्रक्षुब्ध भावना, आळस, दुर्बलता आणि चंचलता यामुळें मला वाटणाऱ्या सत्य गोष्टीपासूनहि मीं चळलों. या दुर्गुणांनीं माझे सत्कार्याचे प्रयत्न कुंठित करून टाकले."

वयाच्या ७० वर्षांपर्यंत सेक्रेटरी ऑफ् स्टेट, स्वतंत्र वृत्तीचा राष्ट्रपति, उत्कृष्ट वक्तृत्व गाजवणारा कॉंग्रेससदस्य इतक्या भूमिका त्यानें पार पाडल्या. तरीहि तो लिहितो, "लागोपाठ एकसारखी निराशा असें माझें सारें जीवन झालें आहे. मीं अंगीकारलेल्या एकाद्या कार्यांत मला यश मिळालें असें कधीं घडलेंच नाहीं."

जें हें जीवन जगणाऱ्यानें स्वतः त्याचा इतका कडवटपणानें धिःकार केला आहे, त्या जीवनाइतकें यशस्वी जीवन खरोखर अमेरिकेच्या इतिहासांत झालेंच नाहीं. तो ८० व्या वर्षीं मृत्यु पावला. इतक्या दीर्घकाळांत अमेरिकन इतिहासांतील कोणाहि थोर पुरुषापेक्षां अधिक अशा मोठ्या जागांवर तो राहिला व अधिक घटनांत त्यानें भाग घेतला. हेग, इंग्लंड, प्रशिया वगैरे राष्ट्रांत तो अमेरिकेचा वकील म्हणून गेला होता. स्वतःच्या घटक राज्यांत सिनेटर म्हणून होता. अमेरिकन सिनेटचा सिनेटर होता. रशियाला वकील म्हणून गेला होता. इंग्लंडशीं करावयाच्या तहाच्या वाटाघाटींत अमेरिकेतर्फेचा पुढारी होता. तो अमेरिकेचा अध्यक्ष झाला. आणि प्रतिनिधिसभेंतहि निवडून आला. अमेरिकन राज्यक्रांति, १८१२ चें युद्ध आणि यादवीपूर्व घडामोडी या सर्वांमध्यें कांहींना कांहीं भाग त्यानें घेतला. त्याच्या रोजनिशींत त्याचें सहकारी व परिचित म्हणून ज्यांचे उल्लेख आहेत त्यांत सॅम् ॲडॅम्स् (एक नातलग जॉन हॅंकॉक, वॉशिंग्टन, जेफर्सन, फ्रॅंकलिन, जॉन जाय्, जेम्स मॅडिसन, जेम्स मन्रो, जॉन मार्शल, हेन्री क्ले, ॲन्ड्र्यू जॅक्सन, थॉमस हार्टबेंटन, जॉन टायलर,

जॉन कल्हाऊन, डॅनियल बेब्सस्टर, लिंकन, जेम्स्‌बुचॅनन, विल्यम लॉईड गॅरिसन, अॅन्ड्र्यू जॉनसन्, जेफर्सन डेव्हिस इत्यादि अनेक प्रसिद्ध पुरुषांचे उल्लेख आढळतात.

अमेरिकेंत जे अत्यंत बुद्धिमान देशसेवक होऊन गेले त्यांतला अॅडॅम्स हा एक प्रमुख होता. तरी पण माणसाच्या व्यक्तित्वांत भव्यता व आकर्षकपणा येण्याला जे गुण लागतात ते त्याच्या अंगीं नव्हते. आपल्या निर्धाराच्या बाबतींत न नमणारा पण त्याच बरोबर संकुचित दृष्टीचा व दुराग्रही, आपल्या शत्रूपेक्षांहि स्वतःचें अधिक कठीण परीक्षण करणारा, अमेरिकेच्या इतिहासांतील कोणत्याहि थोर पुरुषापेक्षां अधिक प्रामाणिक, आपल्या थोर आईबापांना साजेल असें आपण वागलें पाहिजे याची रुखरूख मनाला असलेला, सदसद्विवेकबुद्धीची मनाला नेहमीं टोचणी असणारा असा अॅडॅम्स असल्यामुळें अॅडॅम्सच्या ठिकाणीं एक विशिष्ठ उमदेपणा व आकर्षकता असे.

सिनेटर आणि राष्ट्रपति या नात्यानें त्याला जे आशाभंग आणि पराभव सोसावे लागले त्यांचें कारण राजकीय जीवनांतील वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष करून ध्येयाचे मागें धांवावें हा त्याचा स्वभाव होता हें होय. अॅडॅम्स् व त्याचा बाप हे दोघेहि राष्ट्रपति झाले. पण अमेरिकन राष्ट्राच्या पहिल्या ५० वर्षांत हे दोघेच राष्ट्रपति असे झाले कीं, जे दुसऱ्यांदा निवडले गेले नाहींत. त्यांना आलेलीं अपयशें हीं अपयशेंच होतीं असें म्हणायचें असलें तर तीं, आपणांस जें लोकहिताचें वाटतें तेंच करणें हा त्यांचा स्वभाव आणि त्या पिता-पुत्रांनीं आचरणांत आणलेली शुद्धनीति व त्यागवृत्ति यांचा तत्कालींन पुढाऱ्यांच्या ठिकाणीं असलेला अभाव यामुळें त्यांना सोसावीं लागलीं असेंहि म्हणावें लागेल.

या पितापुत्रांचें जीवन एकमेकांपासून अलग करता येत नाहीं. सॅम्युएल इलिअट मॉरिसन् यानें म्हटल्याप्रमाणें अॅडॅम्स घराणेंच वैशिष्टचपूर्ण असून जॉन क्विन्सी अॅडॅम्स हा त्यांतलाच 'अॅडॅम्स' होता. पिता-पुत्रांत एकमेकांबद्दल जिव्हाळा व निष्ठा होती. त्यांचे स्वभाव कठोर होते. त्यांचें जीवनहि रूक्ष झालें. एकमेकांबद्दलचा जिव्हाळा एवढाच त्यांना ओलावा लाभला.

जॉन क्विन्सी अॅडॅम्स हा लहानपणापासून प्युरिटन साच्यांत वाढला. बापाचा आदर्श डोळयापुढें ठेव अशी आईची त्याला नेहमीं शिकवण असे. पुढें सिनेटर झाला असताना ज्या वेळेला सर्व सहकाऱ्यांनीं व मित्रांनीं त्याचा सर्व

बाजूंनीं त्याग केला त्यावेळीं आधार आणि पसंती मिळविण्याकरितां तो बापाकडे वळत असे.

बापाच्या मृत्यूनंतरहि बापाच्या स्मृतीबद्दल त्यानें मोठी निष्ठा बाळगली होती. जेफर्सनच्या ग्रंथामध्यें आढळणाऱ्या जेफर्सननें ३५ वर्षांपूर्वीं लिहिलेल्या पत्रांत जेफर्सनचा प्रतिस्पर्धी ॲडम्स (म्हणजे जॉन क्विन्सीचा बाप) याच्याबद्दलचा उल्लेख वाचून जॉन क्विन्सी संतापत असे. आणि जेफर्सन विश्वासघातकी आहे असे म्हणे. "माझ्या बापाला जेफर्सननें इतक्या दुटप्पीपणें, विश्वासघातानें व खोटेपणानें वागविलें कीं तें सर्व सहन करणें अशक्य आहे." (जेफर्सन आणि, ॲडॅम्स म्हणजे जॉन क्विन्सीचा बाप, हे पूर्ववयांत मित्र होते आणि स्पर्धाकालानंतर पुन्हा मित्र झाले होते.)

अमेरिकन फेडरल घटनेंत उलटसुलट ताण व तोल (चेक्स् अँड बॅलन्सेस) कसे लावलेले आहेत व ते कसे चालतात इकडे ॲडॅम्सनें लक्ष दिलें नाहीं. जेफर्सनचे कपटी डावपेच म्हणून ॲडॅम्सनें ज्यांचा उल्लेख केला आहे ते खरोखर कपटी डावपेच नसून राज्यशास्त्र व राज्यकला या बाबतींत जेफर्सननें दाखविलेल्या कौशल्याचीं तीं उदाहरणें होतीं ही गोष्ट जॉन क्विन्सी ॲडॅम्सनें कधींच समजून घेतली नाहीं.

प्रचलित राजकारणाचें सत्यस्वरूप जॉन क्विन्सी ॲडॅम्सनें समजून घेतलें नाहीं ही गोष्ट त्याच्या सिनेटर या नात्याच्या कारकीर्दींत कळून आली. या काळांत त्यानें फारशी कामगिरी बजावलेली नव्हती. तरीपण सिनेटमध्यें तो असतांनाच त्याच्या भवितव्याचें दर्शन आम्हांला घडतें. माणसाच्या अंगीं अलौकिक असे श्रेष्ठ गुण असतील; पण एवढ्यानें माणूस अमेरिकन जीवनांत यशस्वी होतो असें नव्हे, हें ॲडॅम्सच्या जीवनावरून कळतें.

+ + +

थॉमस जेफर्सननें जॉन क्विन्सी ॲडॅम्सच्या बापाचा अध्यक्षीय निवडणुकींत पराभव केल्यानंतर जॉन क्विन्सी ॲडॅम्स परदेशांतील आपल्या नोकरीवरून बोस्टनला परत आला व आपल्या बापाच्या पक्षांत विशेष कष्टपूर्वक काम करूं लागला. फेडरेलिस्ट पक्षानें अमेरिकन घटना स्थापन केली होती. ते आरमारी शक्तीचे पुरस्कर्ते होते व फ्रेंच क्रांतीचें वादळ थोपवून धरणारे होते म्हणून ॲडॅम्सला फेडरेलिस्टांबद्दल आदर वाटे.

परंतु तरुण ॲडॅम्स मॅसॅच्युसेट्स् कायदेमंडळातर्फे सिनेटर म्हणून निवडून आल्यापासून फेडरेलिस्टांच्या संकुचित प्रादेशिक अहंकाराबद्दल तो तिरस्कार दाखवूं लागला. फेडरेलिस्ट पक्षातर्फे घटक कायदेमंडळांत निवडून आल्याला ४८ तास झाले नाहींत तोंच जेफर्सनच्या रिपब्लिकन पक्षाला गव्हर्नरच्या कौन्सिलांत प्रपोर्शनल रिप्रेझेंटेशन द्यावें अशी त्यानें मागणी करून फेडरेलिस्टांचा राग ओढवून घेतला. ( ॲडॅम्स स्वत: या प्रसंगासंबंधानें लिहितो : "अशा प्रकारें पक्षातीत भूमिका घेणें हें तेव्हांपासून आतांपर्यंत माझें जीवनतत्त्व बनलें आहे.") तरीहि त्याला अमेरिकन सिनेटसाठीं अमेरिकन कायदेमंडळानें निवडून पाठविलें. ऐन तारुण्यांत एवढा मोठा मान मिळाल्यास आपल्या पक्षाच्या कह्यांत रहाण्याची स्फूर्ति त्याला होईल अशी यांत फेडरेलिस्ट पक्षाला अपेक्षा असावी.

पण त्याच्या घटक कायदे मंडळानें एका हातानें तरुण जॉन क्विन्सी ॲडॅम्सला राष्ट्रसेवा करण्याच्या त्याच्या सुखस्वप्नांत नेऊन ठेवताना त्याच वेळीं त्या स्वप्नांत एक विघ्न आणून त्या स्वप्नाचा भंगहि केला. ॲडॅम्सच्या बापानें ज्याला सेक्रेटरी ऑफ् स्टेट पदावरून बडतर्फ केलें होतें अशा टिमॉथी पिकरिंग याला ॲडॅम्सच्या पाठोपाठ सिनेटर म्हणून निवडून देण्यांत आलें. पिकरिंग हा साऱ्या ॲडॅम्स कुटुंबाचा हाडवैरी होता. ॲडॅम्सचा बाप राष्ट्रपति असताना त्यानें दाखविलेल्या स्वतंत्र वृत्तीबद्दल फेडरेलिस्ट पक्षाचे सदस्य ॲडॅम्सच्या बापाचा द्वेष करीत असत. तीच द्वेषभावना आतां पिकरिंग हा ॲडॅम्सकडे वळविणार याबद्दल ॲडॅम्सची खात्री झाली होती. जेफर्सनच्या रिपब्लिकन सिनेटरांनीं अलिकडे ॲडॅम्सच्या बापाविरुद्ध मोठी मोहीम काढलेली होती. यामुळें त्यांचाहि पाठिंबा तरूण ॲडॅम्सला मिळणें अशक्य होतें. आपल्या रोजनिशींत ॲडॅम्स लिहितो "निर्धार, चिकाटी, धीर, थंडपणा आणि सहिष्णुता या गुणांची आतां जरूर आहे." प्युरिटनास साजेशा या निर्धारानें तो आतां वॉशिंग्टनला जाण्यास निघाला.

वॉशिंग्टनला येताच पक्षनिष्ठा आणि नवीन सभासदांनीं प्रथम पाळावयाचें मौन या गोष्टीबद्दल त्यानें तुच्छता दाखविण्यास सुरूवात केली. तो घरांतील कोणाच्या तरी दुखण्यामुळें थोड्या उशीरां वॉशिंग्टनला आला, यामुळें राष्ट्रपति जेफर्सनच्या लुझियाना प्रदेश खरेदी करण्याच्या धोरणावर मतप्रदर्शन करण्याच्या वेळीं तो हजर नव्हता. पण तो प्रदेश खरेदी करण्याच्या मुद्यास पाठिंबा देऊन

त्यासाठीं ११ दशलक्ष डॉलर्स मंजूर करण्याच्या बाजूनें त्यानें भाषण केलें आणि आपल्या विरुद्ध टीकाकारांचें मोठें मोहोळ उठविलें. उलट त्या नवीन प्रदेशांतील जनतेवर आपलें सरकार लादून त्यावर करवाढहि केली जाते याबद्दल रिपब्लिकन पक्षावरहि सडकून टीका करून ॲडॅम्सनें त्यांचाहि रोप ओढवून घेतला. अमेरिकन सरकारच्या सत्तेनें अमेरिका खंडाच्या दोन्ही किनाऱ्यापर्यंत पोहोचलें पाहिजे अशी ॲडॅम्सची महत्त्वाकांक्षा होती. म्हणून जेफर्सननें नेपोलियनला अमेरिकन किनाऱ्यावर पाऊल टाकूं दिलें नाहीं याबद्दल ॲडॅम्सनें जेफर्सनची थोरवी गाइली. आणि अमेरिकन राष्ट्र जेफर्सनच्या धोरणानें अधिक संपन्न होत आहे याबद्दल ॲडॅम्सनें जेफर्सनचा गौरव केला. न्यू इंग्लंडच्या फेडरेलिस्टांना जेफर्सन पश्चिमेकडे अमेरिकेचें राज्य वाढवीत आहे ही गोष्ट पसंत नव्हती. कारण त्यामुळें ईशान्य भागांतील व्यापारी वर्गाचें राजकीय व आर्थिक वर्चस्व कमी होईल, पूर्व भागांतील जमिनींच्या किंमती उतरतील आणि जेफर्सनला नव्या प्रदेशांतील सदस्य मिळून जेफर्सनचा पक्ष कायमचा बहुमतांत जाईल अशी भीति न्यूइंग्लंडवाल्या फेडरेलिस्टांना वाटली. पण फेडरेलिटांची ही मनोवृत्ति ॲडॅम्सच्या ठिकाणीं नव्हती. लुझिआना प्रदेश खरेदी केल्यादाखल जेफर्सनच्या रिपब्लिकन पक्षानें एक जेवण केलें. त्या जेवणाला ॲडॅम्स हजर राहिला आणि पुन्हा फेडरेलिस्टांचा राग त्यानें ओढवून घेतला. ॲडॅम्सनें हा विश्वासघात केला आहे असेंच फेडरेलिस्ट पक्षानें मानलें.

थिओडोर लायमन् हा एक प्रमुख फेडरेलिस्ट असून ॲडॅम्सच्या बापाचें पिकरिंगशीं भांडण झालें त्यावेळीं तो पिकरिंगच्या बाजूला होता या लायमन्नें "हें पोर्टे बापाची अगदीं सहीसही नक्कल आहे" असें एकदां ॲडॅम्सबद्दल म्हटलें होतें. पण ॲडॅम्स हा फक्त एकाच फेडरेलिस्टाच्या मताला किंमत देई; तो म्हणजे त्याचा बाप. बापाचा सल्ला तो मधून मधून घेत असे. 'तुझेंच करणें योग्य आहे.' असें बापानें म्हटलें म्हणजे आपल्याला मिळालेल्या शिव्यांची भरपाई झाली असें ॲडॅम्सला वाटे.

"लुझिआना प्रकरणींचें तुझें वर्तन मी नापसंत करीत नाहीं, उत्तरेकडील राज्यांत लुझिआनाची खरेदी कोणालाच आवडणार नाहीं. पण तूं त्याचें समर्थन करतोस तें योग्य आहे" असें बापानें त्याला कळविलें तेव्हां त्याला आनंद झाला.

सिनेटमधील पहिल्यापहिल्या कालासंबंधीं ॲडॅम्स आपल्या रोजनिशींत लिहितो :

"आपल्या तत्त्वाला चिकटून रहाण्यांत काय धोके असतात याची कल्पना मला अगाऊच होती व तसा अनुभवहि नंतर झाला. हें राष्ट्र पक्षनिष्ठेच्या भावनेला इतकें वाहिलेलें आहे कीं, या किंवा त्या पक्षाच्या मागें अगदीं डोळे बांधून न चालणारा मनुष्य गुन्हेगार व शिक्षार्ह ठरतो. या दोन पक्षांच्या कात्रींत राहूनहि आपल्या सदसद्विवेक बुद्धीचे आदेशच पाळायचे असें ठरविल्यास आपली प्रगति थांबेलच, शिवाय मुळचा असलेला माझा नांवलौकिकहि जाईल. पण मीं कोणत्या मार्गानें जायचें हें मीं एकदांच ठरविलें आहे. माझ्या देशबांधवांना मी जर समाधान देऊं शकलों नाहीं तर निदान माझ्या सदसद्विवेकबुद्धीचें समाधान तरी मी मिळवीन."

या ॲडॅम्सच्या निर्धारामुळें लवकरच तो एकटा पडला. ॲडॅम्स हें मोठें नांव त्याच्या उपयोगी पडलें नाहीं. उलट तें नांवच त्याला एकटें पाडण्याला कारण झालें. त्याचें राजकीय तत्त्वज्ञान वेगळें असतें तरी सुद्धां त्याच्या तऱ्हेवाईकपणामुळें ॲडॅम्स एकटा पडणें अपरिहार्य होतें.

सिनेटमध्यें आल्यानंतर तीनच दिवसांत आपल्या सहकाऱ्याशीं त्याला भांडावें लागलें. अलिकडे मेलेल्या तीन देशभक्तांच्याबद्दल शोकनिदर्शन म्हणून एक महिनाभर क्रीप कपडा वापरावा असा तो ठराव होता. त्यावर ॲडॅम्स कांहींशा उद्धटपणें म्हणाला, "असा ठराव हा गैरसनदशीर आहे तसाच तो अयोग्यहि आहे. कारण त्यांत मृतांच्या स्वभावाची चर्चा होते ती होणें अयोग्य आहे. शिवाय सिनेटच्या चौकटींत बसणारा हा विषय नव्हे." पुढें एकदां सिनेटनें आपल्या बैठकीचें कार्यकारी बैठकींत रूपांतर करावें असा ठराव आला असता, "सिनेटच्या जर्नलमध्यें केवळ कांहीं तरी काम दाखवावें एवढ्याकरितां हा ठराव येत आहे. खरोखर कामकाज कुणाच्याच मनांत कांहीं करायचें नाहींच," असें म्हणून ॲडॅम्सनें त्या ठरावाला विरोध केला.

जॉन क्विन्सीचा बाप फेडरेलिस्टपक्षाला जितका आवडत नव्हता त्यापेक्षाहि या 'पोटर्या'चा अधिक तिरस्कार तो पक्ष करूं लागला. पण फेडरेलिस्ट पक्षानें कदाचित जॉन क्विन्सी ॲडॅम्सचें आतां कौतुक केलें असतें तरी त्याचा उपयोग नव्हता. कारण जॉन क्विन्सी ॲडॅम्स हाच आतां फेडरेलिस्ट पक्षाचा तिरस्कार

करूं लागला. ॲडॅम्स स्वत: राष्ट्रवादी असून आपल्या आयुष्यांतील बराचसा भाग त्यानें परदेशांत आपल्या राष्ट्राचा प्रतिनिधि म्हणून घालविला होता. अशा रीतीनें त्यानें आपल्या ठिकाणीं निर्माण केलेली राष्ट्रभक्ति संकुचित प्रदेश-वादासाठीं आणि ब्रिटिश पक्षपाती धोरणासाठीं बळी द्यावयास तो तयार नव्हता. उलट न्यू इंग्लंडचा पहिला राजकीय पक्ष म्हणजे फेडरेलिस्ट पक्ष हा अमेरिकन राष्ट्रापेक्षां न्यू इंग्लंडच्या हिताकडे जास्त लक्ष देणारा या अर्थानें, प्रदेशवादी, संकुचित दृष्टीचा व ब्रिटिश पक्षपाती होता. म्हणून मॅसॅच्युसेट्स राज्य कायदेमंडळां-तील जॉन क्विन्सी ॲडॅम्सच्या पूर्वीच्या सहकाऱ्यांनीं त्याच्यावर कृतघ्नतेचा आरोप केला. पण आपल्या आईला लिहिलेल्या पत्रांत ॲडॅम्स लिहितो "सिनेटर या नात्यानें मॅसॅच्युसेट्स्चें हित कशांत आहे हें मी उत्तम प्रकारें जाणतों. आमच्या स्वातंत्र्याचें रक्षण ब्रिटिशांनीं करावें हें फेडरेलिस्ट पक्षाचे ब्रीद असेल तर मी त्या बाबतींत राजकीय नास्तिक म्हणून घ्यायला तयार आहें."

आपल्या पक्षांतील पुढाऱ्यानें आपल्याला जर राजकीय नास्तिक (हेरेटिक) ठरविलें तर पुढाऱ्याशीं मुकाबला देण्याकरितां अनेक सिनेटर त्या काळीं जनतेंत बरीचशी लोकप्रियता मिळवून ठेवीत. एकोणिसाव्या शतकाच्या सुरवातीस सर्वत्रिक मताधिकार मिळाल्यानंतर अशी लोकप्रियता मिळणें सिनेटरांना फार सोपें जाऊं लागलें. पण जॉन क्विन्सी ॲडॅम्सनें हा मार्ग पत्करला नाहीं. त्याचा एक सहकारी सिनेटर सांगतो: "कोणताहि सार्वजनिक प्रश्न त्याच्यासमोर आला असता त्याबाबत राजकीय दृष्टचा कोणती बाजू कुणाला आवडेल याचा तो विचार करीत नसे. युक्लिडच्या भूमितिशास्त्राचा एखादा सिद्धांतच आपल्या-समोर आला आहे असें मानून तो चिंतनाला लागे. आपणाला निवडून देणाऱ्या मतदारांच्या इच्छेपुढें भीतभीत मान तुकवली पाहिजे हें आपलें कर्तव्य आहे असें तो मानीत नसे. लोकांच्याबद्दल अतिरेकी आपुलकी दाखविणें, त्यांच्या दूषित पूर्वग्रहांची खुशामत करणें, त्यांच्या भावनांना झुलविणें, त्यांच्या क्षणजीवी व सदा बदलणाऱ्या मतांना कुरवाळणें हीं धंदेवाईक देशभक्तांचीं लक्षणें होत, असें तो म्हणे. या मार्गानें मिळविलेली यशस्विता मला नको आहे असें तो सांगत असे." "न्यायाधीश हा स्वत:च्या इच्छांचा नोकर नसतो. लोकांचाहि नोकर नसतो. तो फक्त ईश्वराचा नोकर असतो" हें त्याच्या बापाचें ध्येयवाक्य असून प्युरिटन मुत्सद्देगिरीचें हें तत्त्वच त्याच्या जीवनाचें ध्येय होतें.

90322

आज जॉन क्विन्सी ॲडॅम्स् असता व तो सिनेटमध्यें असता तर त्याचें धैर्य आणि निर्धार याची आपण प्रशंसा केली असती. त्याची पक्षातीत, गटातीत भूमिका आपणाला मोठी सन्माननीय वाटली असती. पण त्याचें व्यक्तित्वहि आपणांस पसंत पडलें असतें अशी माझी खात्री नाहीं. आणि त्यावेळींहि सिनेटर-मधील दोन्ही बाजूच्या सदस्यांना त्याचें व्यक्तित्व आवडत नसे. दोन्ही राजकीय पक्षापासून दूर गेल्यानें तो एकटा पडला. आणि आपल्या वर्तनानें त्यानें अनेकांचें वैर ओढवून घेतलें. त्यामुळें त्याचे स्वतंत्र आणि विद्वत्तायुक्त विचार कुणावरहि परिणाम करीनासे झाले. तरुणपणीं सिनेटर या नात्यानें राजकारणांत अधिका-धिक प्रमाणांत आपण एकटे पडत आहोंत, ही गोष्ट त्यांच्या लक्षांत येऊं लागली होती असें त्याच्या रोजनिशीवरून वाटतें. तो लिहितो: "निष्फळ विरोध करीत रहाणें एवढेंच मला करावें लागतें. हल्लींच्या सिनेटमध्यें माझी एकहि उपसूचना मंजूर होणार नाहीं अशी माझी खात्री झाली आहे." "या माझ्या सूचनेमुळें माझी खूप निंदा होईल यांत मला मुळींच शंका नाहीं." "जे सदस्य कोणत्याहि तत्त्वावर प्रेम करण्यापेक्षां अधिक मोठ्या निकरानें माझा द्वेष करतात असे पुष्कळजण मला माहित आहेत." वर उल्लेखिलेला पिकरिंग ॲडॅम्सबरोबर अगदीं तिरस्कारानें वागे. "पिकरिंग हा न्यायाची बाजू सोडून, न्याय-अन्यायाचा विचारहि न करता केवळ सोईस्कर काय आहे एवढ्याच दृष्टीनें वागतो आहे."

फेडरेलिस्ट पक्ष आणि ॲडॅम्स यांच्यामधले मतभेद वाढतावाढता १८०७ नंतर इतके विकोपाला गेले कीं, ते मिटणें अशक्य झालें. पक्षपुढाऱ्यांनीं व ॲडॅम्सच्या मतदारांनीं त्याचा धिःकार केला.

अखेरचें भांडण अर्थातच अमेरिकेच्या परराष्ट्रधोरणावर झालें. ब्रिटन व अमेरिका यांचे संबंध दुरावत जाऊन ब्रिटननें आमचीं जहाजें पकडलीं, त्या-वरचा माल जप्त केला आणि आमच्या खलाशांना ब्रिटिश नागरिक ठरवून ब्रिटिश आरमारांत कामाला जुंपलें. हजारों अमेरिकन खलाशांना संघटित रीतीनें पकडून नेण्यांत आलें. आमच्या जहाजावर खलाशी नाहींत म्हणून तीं वाहून जाऊन बेपत्ता झालीं. जे खलाशी आपण अमेरिकन नागरिक आहोंत असें सिद्ध करीत त्यांनाहि अमेरिकेस जाण्यास परवानगी मिळत नसे. यामुळें ॲडॅम्सच्या मनांतील देशाभिमान जागा झाला. ज्या फेडरेलिस्ट व्यापाऱ्यांचीं जहाजें ब्रिटिशांनीं पकडलीं तेच ब्रिटिशांची मनधरणी करणें हाच आपल्या संकटावर उपाय आहे

असें म्हणूं लागले तेव्हां ॲडॅम्स संतापला. उलट ब्रिटन फ्रान्सशीं लढण्यांत गुंतलें असून अशा अडचणीच्या प्रसंगीं आमचे खलाशी पकडून नेणें हें ब्रिटिशांना अपरिहार्य होतें असें ब्रिटिशांच्या धोरणाचें समर्थन करून फेडरेलिस्ट पुढारी ब्रिटिशांबद्दल स्नेह दाखवूं लागले. याबद्दल ॲडॅम्सनें उघडउघड तिरस्कार व्यक्त केला आणि ब्रिटिशांनीं अमेरिकन जहाजावर आक्रमण केल्याबद्दल निषेध करून राष्ट्रपतीनें तीं जहाजें परत मागावीं आणि जप्त केलेल्या जहाजा-बद्दल नुकसानभरपाई मागावी अशा आशयाचे अनेक ठराव सिनेटमध्यें मांडून ते त्यानें यशस्वी रीत्या पासहि करून घेतले. त्याच्या या सर्व ठरावांना त्याच्या फेडरेलिस्ट पक्षानें निकराचा विरोध केला होता. तरीहि ते ठराव आपण पास करून घेऊं शकलों हा आपला एक विशेष गौरवास्पद अनुभव होता अशी नोंद ॲडॅम्सनें आपल्या रोजनिशींत केली आहे. पण त्यावेळेपासून त्याला कोणताच पक्ष राहिला नाहीं आणि तो अगदीच एकटा पडला. अखेरीस १८०७ च्या उन्हाळ्यांत ब्रिटनच्या लेपर्ड या जहाजानें अमेरिकेच्या चेसॅपेक या लढाऊ जहाजावर एकदम गोळ्या झाडल्या. चेसॅपेक या जहाजावरील चार खलाशी हे ब्रिटिश प्रजाजन आहेत असा दावा सांगून ब्रिटिशांच्या लेपर्ड जहाजाच्या कप्तानानें चेसॅपेकची झडती घेण्याची मागणी केली आणि चेसॅपेकच्या कप्तानानें नकार देताच लेपर्डनें हा अचानक गोळीबार केला होता, यांमुळें ॲडॅम्स चिडला. आपल्याला कोणत्या पक्षाचा पाठिंबा मिळो अथवा न मिळो, ब्रिटिशांच्या अशा असह्य कृत्याविरुद्ध प्रतिकाराचें धोरण अवलंबलेंच पाहिजे अशी ॲडॅम्सची खात्री झाली. ब्रिटिशांच्या या कृत्याविरुद्ध बोस्टनमध्यें निषेधसभा भरवा अशी फेडरेलिस्ट पक्षाच्या बोस्टनच्या स्थानिक अधिकाऱ्यांना ॲडॅम्सनें विनंति केली. पण ही विनंति त्या अधिकाऱ्यानें अमान्य केली इतकेंच नाहीं तर, ब्रिटिश जहाजानें अमेरिकन जहाजावर केलेल्या हल्ल्याचें त्या फेडरेलिस्ट अधिकाऱ्यानें समर्थनच केलें. तेव्हां ॲडॅम्सला तो आपलाच अपमान वाटला. त्याच आठवड्यांत त्याच्या घटक राज्याच्या कायदेमंडळांत रिपब्लिकन पक्षानें अशी सभा घेण्याचें ठरविलें तेव्हां त्याला मोठा आनंद झाला.

रिपब्लिकनांच्या या सभेवर फेडरेलिस्ट पक्षाच्या "रिपर्टोरी" ह्या वृत्तपत्रानें अशी सभा घेणें "हें नियमबाह्य व दंगलबाजीचें आहे, कुणीहि न्यायनिष्ठ व स्वाभिमानी माणसानें अशा सभेस जाऊं नये" अशी टीका केली. पण जॉन

क्विन्सी ॲडॅम्स हा त्या सभेत हजर राहिला. त्यानें सभेचा नियंत्रक होण्याचें नाकारलें. पण त्या सभेंत मंजूर झालेला लढाऊ स्वरूपाचा ठराव ॲडॅम्सनेंच लिहिला होता. "या सभेंत भाग घेणारे सदस्य ब्रिटिशांनीं केलेल्या आक्रमणाच्या प्रतिकारार्थ राष्ट्रपतींनीं कितीहि कडक उपाय योजले तरी ते अमलांत आणण्यासाठीं आपलें जीवित आणि वित्त राष्ट्रपतीच्या हवालीं करीत आहेत" असें त्या ठरावांत म्हटलें होतें.

यामुळें फेडरेलिस्टांना ॲडॅम्सनें आपला अपमान केला असें वाटलें. त्यांनींहि एक सभा भरवून राष्ट्रपतीला पाठिंबा देण्याचा ठराव केलाच. पण ॲडॅम्सनें रिपब्लिकन पक्षाच्या सभेंत भाग घेतल्याबद्दल त्याचा जाहीर निषेध करून "पक्षाच्या विश्वासघाताबद्दल पक्षांतून त्यास हांकून लावावें" असें ठरविलें. ॲडॅम्स या प्रकरणासंबंधीं लिहितो : "त्या वेळेपासून फेडरेलिस्ट पक्षाच्या कौन्सिलांतून मी कायमचा बाहेर पडलों."

१८ सप्टेंबर १८०७ रोजीं राष्ट्रपति जेफर्सन यानें ब्रिटिशांशीं व्यापार करण्यावर संपूर्ण बंदी घातली. मॅसॅच्युसेट्स हें अमेरिकेंतलें मोठें व्यापारी राज्य असल्यानें त्याचें या बंदीमुळें फार नुकसान होणारें होतें. आणि जॉन क्विन्सी ॲडॅम्स मॅसॅच्युसेट्सचा प्रतिनिधि होता. त्यानें व्यापारबंदीच्या योजनेस पाठिंबा देऊन चिकित्सासमिति सदर बंदीच्या योजनेसाठीं नेमावी असा ठराव मांडला. या समितीचें अध्यक्षपद ॲडॅम्सला देण्यांत आलें. आणि त्यानें व्यापारबंदीचें आणि ब्रिटिश जहाजांना अमेरिकन समुद्रांत येण्यास बंदी करणारें अशीं दोन्ही बिलें सिनेटपुढें मांडलीं.

चिकित्सा समितीचें काम संपून सदर समितीचें सदस्य सिनेटकडे चालले असता तरुण ॲडॅम्स आपल्या एका सहकाऱ्याला म्हणाला, "यामुळें सिनेटमधील आपल्या जागा जाणार आहेत. परंतु खाजगी स्वार्थ हा सार्वजनिक हिताच्या आड येता कामा नये."

त्याचें हें भविष्य शब्दश: खरें ठरलें. हें व्यापारबंदी बिल पास होताच मॅसॅच्युसेट्समध्यें एवढा प्रचंड विरोध सुरू झाला कीं, ब्रिटिश सत्तेच्या काळीं बोस्टनमध्यें जें चहाचें बंड झालें ती वेळ आली कीं काय, असें वाटलें. मॅसॅच्युसेट्समध्यें अमेरिकेचें बहुतेक आरमार असून जहाजें बांधण्याचे कारखाने व

मच्छीमारीचा धंदा इत्यादि तेथेंच होते. व्यापारबंदीच्या कायद्यामुळें जहाजबांधणीचा धंदा अगदीं बसला. जहाजांतून होणारा व्यापार बंद पडला. आणि मच्छीमारीचीं जहाजेंहि स्वस्थ बसलीं. धंदे थंडावल्यामुळें दिवाळखोरी व दारिद्र्य येऊन लोक मुलूख सोडून जाऊं लागले. व्यापारी आणि खलाशी या दोघांनाहि हा कायदा आपल्या हिताचा आहे असें वाटेना. न्यू इंग्लंडच्या शेतकऱ्यांचा शेतमाल त्याची निर्यात खुंटल्यामुळें बाजारांत सांचून राहिला.

फेडरेलिस्ट पुढाऱ्यांनीं राष्ट्रपति जेफर्सनवर आरोप केला की, "जेफर्सननें केलेल्या व्यापारबंदीचा हेतु न्यू इंग्लंडचें वैभव नष्ट करावें, इंग्लंडशीं युद्ध करावे आणि फ्रेंचांना इंग्लंडविरुद्ध मदत द्यावी असा आहे." जरी न्यू इंग्लंडच्या रिपब्लिकन पक्षानें जेफर्सनच्या व्यापारबंदी बिलाची विशेषशी तरफदार केली नाहीं तरी पण मॅसॅच्युसेट्सच्या कायदेमंडळाच्या दोन्ही सभागृहांच्या निवडणुकी झाल्या तेव्हां फेडरेलिस्ट पक्ष दोन्ही सभागृहांत प्रचंड बहुमतानें निवडून आला आणि न्यू इंग्लंड हें अमेरिकेंतून फुटणार अशी भाषा सर्वतोमुखीं झाली.

मॅसॅच्युसेट्सचें फेडरेलिस्ट व्यापारी आणि इतर नागरिक यांचा जेफर्सनवर राग होताच. परंतु ज्या सिनेटरनें स्वपक्षाचा "विश्वासघात" केला व जो शत्रुपक्षाला मिळाला त्या सिनेटरचा, म्हणजे ॲडॅम्सचा ते अतिशय द्वेष करूं लागले. नार्दम्प्टन् येथील 'हॅम्पशायर गॅझेट' या पत्रानें लिहिलें, "हा महत्त्वाकांक्षी राजकारणी माणूस कधीं पाण्यांत जातो, कधीं जमिनीवर जातो. प्रसंग पडेल तसा कशाचाहि आश्रय करतो. पण त्याला अखेर पाणी आणि जमीन जेथें एकत्र मिळतात त्या चिखलांत पडावें लागेल." सॅलेमचें 'गॅझेट' हें पत्र म्हणतें, "ॲडॅम्स हा लोकप्रियतेच्या मागें लागलेला मनुष्य असून ज्या पक्षाची चलती असेल त्या पक्षाला तो मिळेल. हा बोनापार्टला फितुर असलेला सिनेटर आहे." 'ग्रिनफिल्ड गॅझेट'नें लिहिलें, "याच्या बापाची बदनामी करणाऱ्यांचा हा मित्र बनला आहे." बोस्टनमध्यें त्याचें जें मित्रमंडळ होतें त्यांत अनेक श्रीमान, सुसंस्कृत आणि वजनदार अशीं माणसें होतीं, तीं सर्व त्याजवर उलटलीं. बोस्टनचा एक प्रमुख नागरिक, 'मी या प्रतिगामी माणसाच्या पंक्तीला बसणार नाहीं' असें म्हणून त्याच्याबरोबर जेवणाचें एक आमंत्रण नाकारता झाला. एका फेडरेलिस्टानें वॉशिंग्टनमधील आपल्या पक्षपुढाऱ्याला लिहिलें, "स्टेटस्ट्रीटवरून ॲडॅम्स ठराविक वेळीं जात असतो. पण आतां त्याच्याकडे कुणी लक्ष देत नाहीं.'

जॉन क्विन्सी अॅडॅम्स् हा अशा प्रकारें अगदीं एकटा पडला होता. पण त्याला आपण अगदींच एकटे आहों असें वाटत नव्हतें. अॅडॅम्स् आपल्या आईला लिहितो, "माझ्या मित्रांनीं माझा संपूर्ण त्याग केला होता. बोस्टनमध्यें व राज्य-कायदेमंडळांत मला कोणीहि मित्र नव्हते. पण माझ्या माता-पितरांनीं माझा त्याग केला नाहीं याबद्दल मीं ईश्वराचे आभार मानावे तेवढे थोडेच होतील." अॅडॅम्सच्या घटक राज्यांतून ज्यावेळीं त्याच्यावर निर्दयपणें शिव्यांचा वर्षाव होऊं लागला त्यावेळीं अॅडॅम्स्नें बापापुढें आपलें हृदय खुलें केलें. तेव्हां "तुझी भूमिका स्पष्ट, सरळ आणि स्वयंसिद्ध आहे." असें त्याच्या बापानें अॅडॅम्स्ला उत्तर दिलें. अॅडॅम्स्चा बाप त्याला लिहितो :

"तुला कोणत्याहि पक्षाचा पाठिंबा नाहीं याचें एक कारण आहे. तूं इतका प्रामाणिक आहेस, इतका स्वतंत्र मताचा आहेस, इतका बुद्धिमान आहेस कीं राजकीय पक्षांच्या शाब्दिक घोषणा अथवा पक्षांच्या भावना यांच्या दडपणा-खालीं असलेला कुणीहि मनुष्य तुझ्यावर मनापासून विश्वास ठेवूं शकणारच नाहीं. यामुळें तुझा भोगवटा ठरून चुकला आहे. असें घडणारच अशी अपेक्षा करून खेद सोडून दे. तुझा मार्ग न्यायाचा आहे. तूं निर्धारानें त्या मार्गावरून जा. नेमस्तपणा आणि सावधगिरी आपल्या वर्तनांत ठेव म्हणजे झालें."

पण अॅडॅम्सच्या या धैर्यदर्शनामुळें त्याच्या बापाच्या पाठिराख्यांच्या दृष्टीनें सर्व अॅडॅम्स कुटुंबाचें नांवच बद्दु झालें. न्यूयॉर्कचा प्रतिनिधि गार्डिनर म्हणतो, "जॉन क्विन्सी अॅडॅम्स्चा पक्षद्रोह हा आतां वादाचा विषय उरलेला नाहीं. परमेश्वरानें अॅडॅम्सचें हें उमदें घराणें वीस वर्षांपूर्वीच गाडून टाकलें असतें तर बरें झालें असतें". पण बाप आणि मुलगा हे दोघे मात्र एकमेकास चिकटून राहिले. अॅडॅम्सचा बाप त्याला लिहितो: "पार्टन यानें तूं फेडरेलिस्ट नाहींस म्हणून तुझा धिःकार केला आहे. पण त्याप्रमाणें तो माझाहि धिःकार करील तर मला बरें वाटेल. कारण फेडरेलिस्ट पक्षाला आज जें स्वरूप आलें आहे त्या स्वरूपांतल्या फेडरेलिस्ट पक्षाचा मीं केव्हांहि धिःकारच केला आहे".

वास्तविक त्यावेळचा राष्ट्रपति जेफर्सन यानें अॅडॅम्स्च्या बापाचा पराभव करून राष्ट्रपतिपद मिळविलें होतें. पण त्या राष्ट्रपतीला जॉन क्विन्सी अॅडॅम्सनें पाठिंबा दिला व त्या बाबतींत त्याला बापाचाहि पाठिंबा मिळाला. यांत अॅडॅम्स घराण्याची प्युरिटन निष्ठा व्यक्त झाली. बोस्टनमध्यें राजकारणांत लुडबुड कर-

णाऱ्या एका धर्मगुरुनें उद्धटपणानें ॲडॅम्सच्या मतास आव्हान दिलें असता, ॲडॅम्स म्हणाला, "तुझ्या वयाला मान द्यावासा वाटतो. पण जीवनांत एक गोष्ट तूं अद्याप शिकलेला नाहींस, ती म्हणजे ख्रिश्चन धर्म ही होय." त्याचा सहकारी व शत्रु पिकरिंग यानें एक जाहीर पत्र लिहून ॲडॅम्सचा धिःकार केला होता. या पत्राच्या हजारों प्रती मॅसॅच्युसेट्स्भर वाटल्या गेल्या. त्या पत्रास ॲडॅम्सनें एक खणखणीत उत्तर दिलें. त्यांत फेडरेलिस्ट पक्ष हा देशाभिमानशून्य झाला आहे असें त्यानें म्हटलें आहे. पिकरिंगनें लिहिलें होतें कीं, "इंग्लंडजवळ एक हजार लढाऊ जहाजें असून आमचा सर्व व्यापार इंग्लंड उध्वस्त करूं शकलें असतें. पण खरोखर इंग्लंडनें फारशी इजा आम्हांला केलीच नाहीं." ॲडॅम्सनें पिकरिंगचें हें विधान गुलामी वृत्तीचें आहे अशी टीका केली.

१८०८ च्या मेमध्यें मॅसॅच्युसेट्स्च्या फेडरेलिस्टांचें बहुमत असलेल्या कायदे-मंडळाचें अधिवेशन सुरू झालें. त्याचा हेतु एकच आणि तो जॉन क्विन्सी ॲडॅम्सचा नायनाट करणें एवढाच होता असें मॅसॅच्युसेट्सच्या रिपब्लिकन गव्हर्नरानें राष्ट्रपति जेफर्सनला लिहिलेल्या पत्रांत म्हटलें आहे. ॲडॅम्सची सिनेटर पदाची मुदत अजून ९ महिने उरली होती. तरी पण ॲडॅम्स्नंतरच्या सिनेटराची निवडणूक त्या कायदेमंडळाच्या दोन्ही सभागृहांनीं तावडतोब केली. आणि आपल्या सिनेटरांना व्यापारबंदीचा कायदा रद्द करून घेण्याचा आदेश देणारा ठरावहि मंजूर केला.

ॲडॅम्स लिहितो : "ही निवडणूक मीं तावडतोब राजिनामा द्यावा म्हणून करण्यांत आली होती हें माझ्या लक्षांत आलें. कारण, रीतसर म्हणजे त्या कायदेमंडळाच्या दिवाळी अधिवेशनापर्यंत ही निवडणूक होण्याची जरूर नव्हती. शिवाय सिनेटरांना जो आदेश म्हणून देण्यांत आला होता तो माझ्या मताविरुद्ध असून माझ्या स्वाभिमानाला सहन होणारा नव्हता."

अशा परिस्थीत सिनेटचा राजिनामा देणें एवढा एकच मार्ग ॲडॅम्सपुढें खुला होता. आणि ज्या जेफर्सननें ॲडॅम्सच्या बापाला अध्यक्षपदावरून हाकललें होतें त्या जेफर्सनच्याच धोरणाचें समर्थन करण्यासाठीं ॲडॅम्सनें सिनेटचा राजिनामा देऊन टाकला. आपल्या राजिनाम्यासंबंधी ॲडॅम्स लिहितो, "मी सिनेटर या नात्यानें मला न्याय्य दिसणारी गोष्ट करण्याला पूर्ण स्वतंत्र नसलों तर मीं सिनेटर म्हणून रहाता कामा नये. मीं राजिनामा द्यावा कीं न द्यावा हा येथें

प्रश्नच नाहीं. मी इतकेंच म्हणतों कीं, ज्या माझ्या धोरणासाठीं मला दुःख भोगावें लागलें त्याबद्दल मला मुळींच पश्चात्ताप होत नाहीं. पूर्वी झालेल्या निंदेच्या दसपट निंदा झाली अथवा लोकविद्वेष पत्करावा लागला तरी वेळ आल्यास मी जसा वागलों तसाच पुन्हा वागेन."

अशा प्रकारें फेडरेलिस्ट त्याचा द्वेष करीत होते आणि रिपब्लिकन त्याच्यावर विश्वास ठेवीत नव्हते अशा परिस्थितींत जॉन क्विन्सी ॲडॅम्स सिनेट सोडून निवृत्त झाला व खाजगी व्यक्ति म्हणून राहूं लागला. यानंतर पुन्हां एकदां त्याचा तारा क्षितिजावर प्रकाशावयाचा होता. पण पुढील आयुष्यांत तो केव्हांहि आपल्या या राजिनाम्याचा प्रसंग विसरला नाहीं व त्यानें आपलें सदसद्विवेकबुद्धीचें धैर्यहि सोडलें नाहीं. ( दंतकथा अशी आहे कीं, ॲडॅम्स ज्यावेळीं पुढें स्वतंत्र उमेदवार म्हणून राष्ट्रपतिपदावर निवडून आला त्यावेळीं त्याच्या स्वागतार्थ झालेल्या भोजनाचे वेळीं "हा राष्ट्रपति आपल्या शत्रूंना पराभूत करो" अशी इच्छा त्या भोजनाच्या यजमानानें व्यक्त केली असता डॅनियल वेब्सस्टरनें टोमणा मारला "ज्याप्रमाणें त्यानें आपल्या मित्रांनाहि पराभूत करून टाकलें"— )

१८२९ सालीं तो राष्ट्रपति पदावरून निवृत्त झाला तेव्हां प्लायमाऊथ जिल्ह्याच्या मतदारांनीं त्याला काँग्रेसमध्यें आपला प्रतिनिधि होण्यास विनंती केली. त्याचे आप्त व मित्र त्याला नको म्हणत होते. बापाचें चरित्र लिहिण्यासाठीं त्याला वेळहि हवा होता. पण तरीहि त्यानें ती उमेदवारी पत्करली. पण "मी उमेदवार होऊन मतांची भीक मागत हिंडणार नाहीं आणि काँग्रेसमध्यें निवडून आल्यास जो पक्ष आणि जे मतदार आपणांस निवडून देतील त्यांच्यापासून मी पूर्ण स्वतंत्रणें वागेन" असें त्यानें त्याला विनंति करणाऱ्यांना बजावून उमेदवारी पत्करली. या वेळीं त्याच्या चरित्रांतील फार तेजस्वी असा कालखंड त्यानें अनुभवला. कारण आपलें सर्व वजन खर्चून व अविश्रांत परिश्रम करून त्यानें यावेळीं गुलामगिरीविरुद्ध लढा दिला.

ज्या काँग्रेसमधून २२ वर्षांपूर्वी मोठा अपमान पत्करून त्याला जावें लागलें त्या काँग्रेसमध्यें पुन्हां स्वतंत्र भूमिकेनें प्रवेश करणें हा त्याला हृदय उचंबळन येणारा प्रसंग होता. तो मोठ्या अभिमानानें आपल्या रोजनिशींत लिहितो : "२२ व्या काँग्रेसचा सभासद म्हणून मी निवडून आलों आहे. आजवरच्या कोणत्याहि नेमणुकीनें अथवा निवडणुकीनें मला इतका आनंद झालेला नाहीं. मी अमेरिकेचा अध्यक्ष म्हणून निवडून आलों पण, ती निवडणूक माझ्या हल्लींच्या निवडणुकीच्या अर्धाहि आनंद मला देणारी नव्हती."

# विभाग २रा

## काल-स्थल-निर्देश

राष्ट्राच्या जीवनांत जीं संकटें येतात त्या संकटांतून त्या राष्ट्राचे महापुरुष निर्माण होतात व ते धैर्यशीलतेचीं थोर कृत्यें करतात. अमेरिकेच्या इतिहासांत १८६१ सालीं उत्तर आणि दक्षिण यांची जी यादवी झाली तेवढा मोठा संकट-काल कधींच आला नव्हता. अमेरिकेच्या इतिहासांत इतर महत्त्वाचे प्रसंग आले हें खरें, पण त्यांचें महत्त्व मान्य करून सुद्धां या ग्रंथासारख्या ग्रंथांत ज्या तीन थोर धैर्यशील पुरुषांच्या कर्तृत्वाची उपेक्षा करता येणार नाहीं. ते तीन थोर पुरुष म्हणजे टेक्ससचा सिनेटर सॅम हाऊस्टन, मिसुरीचा सिनेटर थॉमस हार्ट बेंटन आणि मॅसॅच्युसेट्सचा डॅनियल वेब्स्टर हे होत. पहिले दोघे आपआपल्या घटक राज्यांत दीर्घकाल राजकीय वर्चस्वशाली झाले. पण, अखेर त्यांच्या कपाळीं अपयश आलें. तिसरा वेब्स्टर याला त्यानें दाखविलेल्या नीतिधैर्या-नंतर लगेच मृत्युहि आला. पण ज्या त्याच्या शत्रूंनीं त्याचा अखेरपर्यंत छळ केला त्यांनीं मृत्यूनंतरहि त्याची निंदा चालू ठेवलीच.

यांच्या धैर्यदर्शनाचा हा कालखंड म्हणजे १८६१ सालीं सुरू झालेल्या यादवीच्या पूर्वींचीं दहा वर्षे हा होय. त्या दहा वर्षांत राजकारणांत एकामागून-एक पेंचप्रसंग आले. अमेरिकेचें संयुक्त राज्य ज्या रज्जूंनीं बांधलें होतें ते या कालखंडांत एकसारखे तुटत होते. अशा संकटमय कालखंडांत राजकीय दृष्ट्या सर्वोत्तम तसेच अधमाधम पुढारीहि पुढें आले यांत आश्चर्य नाहीं. जबाबदारीच्या अधिकारावर असणाऱ्या प्रत्येकापुढें राष्ट्राशीं एकनिष्ठ रहावयाचें कीं स्वप्रदेशाशीं व घटकराज्याशीं एकनिष्ठ रहावयाचे असा रोकडा प्रश्न होता. उत्तरेकडील गुलामगिरीचे पुरस्कर्ते यांतील पुष्कळांना आपआपली बाजू न्यायाची आहे अशी खात्री असल्यामुळें त्यांना कोणती बाजू घ्यावी याचा निर्णय करण्याला मुळींच अडचण पडली नाहीं.

पण ज्यांचें मन स्वप्रदेशनिष्ठा व राष्ट्रनिष्ठा यांचे दरम्यान ताणलें गेलें आणि यादवी युद्ध टाळावें अथवा लांबणीवर टाकावें यासाठीं तडजोडीची भूमिका घेण्यासाठीं ज्यांनीं धडपड केली, त्यांना स्वदेशनिष्ठा कीं स्वप्रदेशनिष्ठा यापैकीं एकच एकांतिक बाजू घेणें शक्य नव्हतें. कोणतीहि एकांतिक बाजू घेण्यानें जुन्या निष्ठा व जुनी मैत्री तुटणार होती व राजकीय पराभव आणि पाणउतारा होण्याचा धोका होता.

उत्तर आणि दक्षिण यांच्या द्वंद्व युद्धाचा आखाडा अमेरिकेचें सिनेट हा होता. उत्तरेची लोकसंख्या सतत वाढत असून अमेरिकेच्या प्रतिनिधिगृहांत त्यांची बहुसंख्या मोठीमोठी होत होती. पण सिनेटमध्यें प्रत्येक राज्याला सारख्या संख्येचे प्रतिनिधि दिलेले असल्यामुळें एकूण अमेरिकेच्या संयुक्त राज्यांतील घटक राज्यांची संख्या वाढत नव्हती तोंवर, दक्षिणेला संख्याबलाचा अधिकार गाजवता येत होता. सिनेटमध्यें व्यक्तिस्वातंत्र्य असलेलीं राज्यें व गुलामगिरी असलेलीं राज्यें यांचा कसाबसा समतोल ठेवण्यांत आलेला असून एक राज्य नव्यानें संयुक्त घटनेंत येणार म्हटलें कीं, वाद-भांडण उत्पन्न होई. एकोणिसाव्या शतकाच्या पहिल्या अर्धांत सिनेटमध्यें जे फार मोठे वाद झाले त्यांचें रहस्य पुष्कळदां अमेरिकन संयुक्त घटनेंत नवीन राज्याला येऊं देण्याबाबतचा मतभेद हेंच असे.

१८२० सालीं मेन आणि मिसुरी, म्हणजे एक स्वातंत्र्यवादी व दुसरें गुलामगिरीवादी अशीं दोन राज्यें अमेरिकेच्या संयुक्त घटनेंत घेण्यांत आलीं. हेन्री क्ले या मुत्सद्यानें घडवून आणलेली पहिली मोठी तडजोड म्हणून ही योजना इतिहासांत प्रसिद्ध आहे. १८३६ व ३७ सालीं आरकॅन्सास आणि मिशिगन व १८४५ व ४६ सालीं फ्लोरिडा आणि आयोवा हीं राज्यें घेण्यांत आलीं तींहि अशींच जोडीजोडीनें घेण्यांत आलीं. पण १८५०सालीं या तडजोड वृत्तीवर फार ताण पडून ती तुटण्याची वेळ आली. कारण, मेक्सिकन युद्धानें बराच नवीन प्रदेश अमेरिकन घटनेंत आला. आणि गुलामगिरी ठेवावी कीं नष्ट करावी हा वाद उभयपक्षीं बळावला. या वादासंबंधानें सिनेट काय म्हणतें यावर लोकांचें लक्ष वेधलें. त्यांतहि क्ले, कल्हाऊन व वेब्स्टर या तीन प्रमुख पार्लमेंटरी पुढाऱ्यांनीं लोकांचें लक्ष विशेष खेंचून घेतलें. या तिघापैकीं डॅनियल वेब्स्टरला नाचक्की पत्करायला लागून मतदारांचा द्वेष सहन करावा लागला. ज्या घटक

राज्यानें त्याच्यावर प्रेम केलें होतें व त्याला आपुलकी दाखविली होती त्या घटक राज्यानेंहि त्याला राजकारणांतून फेंकून दिलें. बेन्टन व हाउस्टन या आणखी दोन पुढाऱ्यांचीहि हीच गत झाली.

वेब्स्टर, बेन्टन व हाउस्टन या तिन्ही धैर्यशीलांचीं चरित्रें आपण समजून घेणारच आहोंत. पण या तिघांच्याहि वर्तनाला धैर्याचीं कृत्यें असें कां म्हणावें लागलें हें समजण्यासाठीं आपण त्यांचा काल समजून घेतला पाहिजे. आणि त्यासाठीं हेन्री क्ले व जॉन कल्हाऊन यांचीहि योग्यता येथें थोडक्यांत समजून घेतली पाहिजे.

हेन्री क्ले हा केन्टुकी या राज्याचा प्रतिनिधि होता. तो धीट, हुकूमशाही स्वभावाचा पण मोठा आकर्षक असे. वागणुकींत अतिशय तापट असूनहि त्याच्या त्या वागणुकींत मोहकता इतकी होती कीं एकदां एका विरोधकानें आपण हेन्री क्लेच्या व्यक्तित्वाच्या मोहांत सांपडूं, या भीतीनें त्याची भेट घेण्याचेंच टाळलें.

जॉन कल्हाऊन हा हेन्री क्लेशीं कित्येक वर्षें लढला होता. पण तो सुद्धां त्याच्या व्यक्तित्वाच्या मोहांतून सुटूं शकत नसे. कल्हाऊन एके ठिकाणीं म्हणतो, "मला हेन्री क्ले आवडत नाहीं. तो दुष्ट आहे, ढोंगी आहे. त्याच्या सर्व योजना दुष्ट असतात. मी त्याच्याशीं बोलूंहि इच्छीत नाहीं. पण, तरीहि मी त्याच्यावर प्रेम करतोंच याला माझा नाइलाज आहे.

हेन्री क्लेवर आणखी किती तरी जणांचें असेंच प्रेम होतें. आपल्या देश-बांधवांचीं अंतःकरणें जिंकून घेण्याचा अद्वितीय गुण त्याच्या ठिकाणीं होता. त्याचें वय सिनेटच्या कायद्याप्रमाणें तीस वर्षांचें झालें नव्हतें तेव्हांच त्याला सिनेटचा सभासद निवडण्यांत आलें. पुढें त्याला प्रतिनिधिसभेंत पाठविण्यांत आलें असतां अगदीं पस्तीसाव्या वर्षी प्रतिनिधिसभेचा अध्यक्ष होण्याचा अद्वितीय मान त्याला मिळाला.

हेन्री क्ले हा वेब्स्टर अथवा कल्हाऊन यांच्या इतका बुद्धिमान नव्हता. पण अमेरिकेच्या क्षेत्रविस्ताराची त्याची कल्पना त्याच्या प्रख्यात सहकाऱ्यांच्या कल्प-नेच्या फारच पुढें गेली होती. वैयक्तिक आकर्षकतेच्या आणि अमेरिकन राष्ट्राचें क्षेत्र वाढविण्याच्या महत्त्वाकांक्षेच्या बळावर त्यानें १८२० सालीं, १८३३ सालीं व शेवटीं १८५० सालीं तीन मोठ्या तडजोडी घडवून आणल्या. त्यामुळें अमेरिकेचें संयुक्तराज्य १८६१ पर्यंत टिकून राहिलें. मात्र १८६१ पर्यंत उत्तरेची शक्ति

एवढी वाढली कीं, गुलामगिरीच्या पुरस्कारासाठीं अमेरिकन संयुक्त राज्यांतून फुटून जाण्याचा दक्षिणेचा प्रयत्न आतां व्यर्थ जाणार हें देवच बोलून चुकला होता.

हेन्री क्लेच्या जोडीचा तितकाच कर्तबगार पुरुष साऊथ कॅरोलिनाचा जॉन कल्हाऊन हा होता. "पोलादी माणूस" असें त्याचें वर्णन हेरिया मार्टिनो या ब्रिटिश स्त्रीनें केलें आहे. हा पोलादी माणूस ६ फूट, २ इंच उंच होता. तो येल विद्यापीठाचा पदवीधर असून एकोणतिसाव्या वर्षी कॉंग्रेसचा सभासद झाला. १८१२ सालच्या युद्धांत अमेरिकेला ढकलण्याचे कामीं हेन्री क्लेला त्यानें मदत केली. तो मुळचा राष्ट्रवादी होता. पण १८२० नंतरच्या काळांत साऊथ कॅरोलिनाच्या शेतीला अमेरिकन सरकारचें आयात-निर्यात जकातीचें धोरण जाचक होऊं लागलें, तेव्हां तो साऊथ कॅरोलिनाचा पक्षपाती झाला. कल्हाऊन हा संकुचित दृष्टीचा, अगदीं थंड, एकाच मुद्यावर हट्टून बसणारा व मोठा सामर्थ्यवान होता. वेब्स्टरच्या मतें "सिनेटमधला तो अतिशय कर्तबगार सदस्य होता. माझ्या सार्वजनिक आयुष्यांत भेटलेल्या कोणाहि मोठ्या माणसापेक्षां तो मोठा होता. त्याची तार्किकता एवढी प्रखर असे कीं, त्या गुणांत कल्हाउननें न्यूटन, कॅल्व्हिन् अथवा जॉन लॉक यांचाहि पराभव केला असता."

त्याच्या भाषणांतील अतिरेकी शब्दबाजी सोडली तर सिनेटमधलीं त्याचीं भाषणें आपल्या पल्लेदार, शिस्तबद्ध आणि समतोल गुणांनीं सिनेटवर मोठी छाप पाडीत. त्याच्या भाषणाच्या जोरदार ओघापुढें सर्व विरोध वाहून जाई. विशेष आश्चर्य म्हणजे तो जरी दिसण्यांत माथेफिरू दिसे तरी त्याचें व्यक्तित्व मोठें आकर्षक होतें. तो मोठा संवादकुशल होता आणि ज्यांना त्याचे तर्कशुद्ध युक्तिवाद झेपत नसत त्यांच्यावर आपल्या आकर्षक व्यक्तित्वानें छाप टाकून कल्हाऊन त्यांच्या भावना जिंकून घेत असे. सर्व दक्षिणेचें प्रेम त्यानें मिळविलें होतें. १८५० सालीं, त्यावेळीं माजलेल्या त्या मोठ्या वादाच्या ऐन भरांत कल्हाऊन मृत्यु पावला तेव्हां, सारी दक्षिण शोकमग्न झाली.

कल्हाऊनच्या मतें अमेरिकेच्या कॉन्स्टिटयूशनल कन्व्हेन्शननें म्हणजे घटना-परिषदेनें साऊथ कॅरोलिनाच्या सरकारवर अमेरिकन राज्यघटनेचा अंमल बसविलेला नाहीं. अमेरिकेच्या संयुक्त घटनेंत सामील झालेलीं राज्यें घटना-परिषदेअन्वयें सामील झालेलीं असून स्वतंत्र सत्ताधारी (सॉव्हरिन) राज्यें आहेत. अमेरिकन संयुक्त राज्याची कॉंग्रेस अमुक एका कायद्यान्वयें घटक

राज्याच्या सत्तेवर व स्वातंत्र्यावर आक्रमण करीत आहे कीं काय, हें ठरविण्याचा अधिकार त्या घटक राज्याचा आहे असें कल्हाऊनचें मत होतें.

कल्हाऊनच्या मतें पश्चिम प्रदेशाची हवा आणि भूप्रदेश यामुळें त्यांतील पुष्कळशा भागांत गुलामगिरी वाढणें अशक्य होतें. पण नैर्ऋत्य भागांत मात्र मेक्सिकोंतून जिंकलेल्या प्रदेशांतून गुलामगिरीचा पुरस्कार करणारी राज्यें मिळविता येतील आणि पश्चिमेकडल्या स्वातंत्र्यवादी राज्यांची संख्या सिनेटमध्यें जशी वाढेल तशीच दक्षिणेकडील गुलामगिरीवाद्यांची संख्या वाढून दोघांचें तुल्यबल ठेवता येईल असें कल्हाऊनला वाटत होतें. १८५० सालीं हेन्री क्लेच्या प्रयत्नानें जी मोठी तडजोड झाली तिची हीच भूमिका होती. कलह व फूट यांचे प्रवाह या वेळीं निकराला आले.

१८५० सालीं वॉशिंग्टनमध्यें झालेल्या या महानाटकांत प्रसिद्धीस आलेले तीन पुरुष म्हणजे वेब्स्टर, क्ले व कल्हाऊन हे १८१३ पासून एकमेकांचे सहकारी होते. त्यावेळीं ते तरुण, अहंकारयुक्त असून उत्साह आणि आशावाद यांनीं भरलेले होते. सारें जग आपणांसमोर आपल्या हातीं येण्याजोगें आहे असें त्यांना त्यावेळीं भासत होतें. पण त्या उमेदीच्या काळाला आतां म्हणजे १८५० सालीं चाळीस वर्षें होऊन गेलीं होतीं. त्यांच्या जीवनाचा अस्तकाल जवळ आला होता. तारुण्यांतील उमेद व तारुण्यांतील भ्रम आतां मावळले होते. पुन्हां एकदां रंगभूमीच्या मध्यभागीं ते आले, पण तो त्यांचा प्रवेश शेवटला ठरला. पुढील दोन वर्षांत तिघेहि मृत्यु पावले.

वास्तविक १८५० सालींच दक्षिण प्रदेश उत्तरेपासून फुटून निघायचा. पण, तो १८६१ पर्यंत फुटला नाहीं याला वेब्स्टरनें १८५० सालीं गाजवलेलें कर्तृत्व कारण झालें. हेन्री क्लेची तडजोडयोजना कॉंग्रेसला स्वीकारायला लावण्यासाठीं वेब्स्टरनें शिकस्त केली व त्यामुळेंच त्यावेळीं दक्षिण प्रदेश फुटून निघाला नाहीं. त्यानें या तडजोडीचा पुरस्कार कां केला, त्या पुरस्काराचा परिणाम काय झाला आणि त्याबद्दल त्याला किती शिव्या खाव्या लागल्या ही सर्व हकिगत तिसऱ्या प्रकरणांत येणार आहे.

मिसुरी हें सरहद्दीवरचें महत्त्वाचें राज्य १८६१ सालीं दक्षिणेच्या बाजूनें यादवींत सामील झालें नाहीं याला सिनेटर बेन्टन हा कारण होता. अमेरिकेची संयुक्त घटना टिकवून धरण्यासाठीं त्याच्या इतके प्रयत्न कोणींहि केले नाहींत. त्याचे प्रयत्न व त्याचा भोगवटा यांची हकिगत चौथ्या प्रकरणांत येणार आहे.

टेक्झास हें राज्य यादवींत दक्षिण प्रदेशातर्फें लढलें. पण टेक्झासनें दक्षिण प्रदेशाची बाजू घेऊं नये म्हणून सिनेटर हाऊस्टननें प्रयत्नांची शिकस्त करून आपल्या वार्धक्यांत आपल्या जीवनाचा सर्वनाश करून घेतला. त्याची कथा पांचव्या प्रकरणांत येईल.

प्रकरण : ३ —

# डॅनियल वेब्स्टर

२१ जानेवारी १८५० या रात्रीं वादळ भयंकर सुटलें होतें. पण एका अतिशय आजारी माणसाला ती रात्र आणि तें वादळ या दोन्हींचीहि पर्वा नव्हती. तो तसाच खोकत, घशांतून सूंऽ सूंऽ आवाज काढीत, रस्त्यांतील बर्फातून रखडत रखडत डॅनियल वेब्स्टरच्या घरीं आला. या आजारी माणसाचें नांव हेन्री क्ले. त्याच्या डोक्यांत एक योजना होती. अमेरिकेची संयुक्त घटना टिकवून धरणें हें त्या योजनेचें उद्दिष्ट होतें. आणि उत्तरेकडला प्रख्यात वक्ता व महामुत्सद्दी डॅनियल वेब्स्टर याचा पाठिंबा आपणांस मिळेल तरच आपली योजना यशस्वी होईल हें त्याला माहित होतें. म्हणून वेब्स्टरचें मन वळविण्यासाठीं तो आला होता. त्यासाठीं वेळ फार थोडा आहे हें त्याला माहित होतें. कारण त्याच दिवशीं दुपारीं राष्ट्रपति टायलर यानें कॉंग्रेसला पाठविलेल्या संदेशांत कॅलिफोर्निया या स्वातंत्र्यवादी राज्याचा अमेरिकन संयुक्त घटनेंत समावेश करा असा आदेश दिला होता. यामुळें दक्षिणेकडील गुलामगिरीवादी प्रतिनिधि चिडले होते. स्वातंत्र्य विरुद्ध गुलामगिरी या माजलेल्या वादाच्या आगींत यामुळें आणखी तेल पडणार होतें. संयुक्त घटना मोडण्याचा धोका उत्पन्न झाला होता.

पण हेन्री क्लेजवळ एक योजना होती. अमेरिकन राष्ट्राचें ऐक्य टिकविण्यासाठीं एक महान तडजोडयोजना तो सुचवीत होता. वेब्स्टरच्या आरामशीर व उबदार घरांत हेन्री क्ले यानें वेब्स्टरला एक तासपर्यंत आपल्या योजनेची रूपरेखा समजून दिली. दोघांनीं मिळून अमेरिकेचें संयुक्त राज्य टिकवावें कसें याची चर्चा केली. या ऐतिहासिक भेटीला जेवढें यश आलें पण तिचे दूरगामी परिणाम जितके विपरित झाले, इतकें यश आलेली पण इतके विपरीत परिणाम पावलेली भेट अमेरिकन इतिहासांत क्वचितच घडली असेल. कारण १८५०च्या या तडजोडीनें एक थोर शांतिसंस्थापक म्हणून हेन्री क्लेचा लौकिक कळसास पोचला.

पण त्याच तडजोडीला डॅनियल वेब्स्टरनें पाठिंबा देऊन ती यशस्वी केल्यामुळें वेब्स्टरचा राजकीय वध झाला आणि नंतर लवकरच घडलेल्या त्याच्या शारीरिक मृत्यूनंतरहि, पुढील ५० वर्षें, त्याचा केवळ धि:कारच होत राहिला.

ज्या डॅनियल वेब्स्टरला भेटण्यासाठीं त्या वादळी रात्रीं हेन्री क्ले त्याच्या घरीं गेला होता तो वेब्स्टर अमेरिकेच्या राजकीय इतिहासांत मोठा विलक्षण पुरुष होऊन गेला. वेब्स्टरचा एक जिवलग मित्र लिहितो : "वेब्स्टरच्या ठिकाणीं सामर्थ्य व दुर्बलता यांचें चमत्कारिक मिश्रण होतें. निर्जीव मृत्तिका आणि चेतनायुक्त ईश्वरांश दोन्हीहि त्याच्या ठिकाणीं होतीं." "क्षुद्र आकांक्षेचा मोठा माणूस" असें इमर्सननें त्याचें वर्णन केलें आहे.

तो थोर होता याबद्दल वादच नाहीं. दिसण्यांत, बोलण्यांत तो थोर होताच. थोर म्हणूनच त्याला वागवलें जाई आणि थोर माणसाची वागवणूकच तो मिळवीन असे. त्याचे गुण आणि दोष दोन्ही विचारांत घेऊन असें म्हणता येईल कीं अमेरिकन कॉंग्रेसच्या इतिहासांत तो सर्वश्रेष्ठ बुद्धिमान असा पुरुष होऊन गेला. आपल्या आकर्षक युक्तिवादानें आपल्या पक्षांत माणसें ओढून घेण्याचें कसब हेन्री क्लेच्या ठिकाणीं जसें होतें तसें वेब्स्टरमध्यें नव्हतें. कल्हाऊन ज्याप्रमाणें राज्यशास्त्राचें तत्त्वज्ञान मांडून दाखवीत असे तसेंहि वेब्स्टर करूं शकत नव्हता. पण अमेरिकन राष्ट्र हें एक आहे ही जी सर्व अमेरिकनांची अंतर्यामीची भावना, जी लोकांच्या अंत:करणांत भासमान होई पण व्यक्त होऊं शकत नव्हती, ती त्यानें जोमदारपणें व्यक्त करून प्रभावी करून टाकली ही वेब्स्टरची कामगिरी मोठी आहे.

१८१२ च्या युद्धाविरुद्ध त्यानें जें भाषण केलें तें त्याचें कॉंग्रेसमधील पहिलें भाषण. या पहिल्या भाषणामुळें त्याची कॉंग्रेसवर जेवढी छाप पडली तेवढी छाप त्यापूर्वी कोणाहि कॉंग्रेसमनानें आपल्या पहिल्या भाषणानें पाडली नव्हती. त्याकाळीं कॉंग्रेसमध्यें मॅसॅच्युसेट्स्‌मधील प्रचंड जनसमुदायापुढें आणि सुप्रीम कोर्टांत अत्युत्कृष्ट वकील म्हणून तो प्रसिद्धी पावला. सुप्रीम कोर्टांत डार्टमाउथ कॉलेज संबंधीच्या खटल्यामध्यें वेब्स्टरनें जें बचावाचें भाषण केलें त्यानें कठोर वृत्तीचा सरन्यायाधीश मार्शल हाहि वितळला. "महाराज, हें कॉलेज लहान असेल पण मोठींमोठीं माणसें त्यावर प्रेम करतात," असें त्यानें कोर्टास सांगितलें. त्याच्या वक्तृत्वाचा न्यायमूर्तींवर विलक्षण परिणाम झाला. प्लायमाऊथ

वसाहतीच्या दोनशेंव्या वाढदिवशीं वेब्स्टरनें जें भाषण केलें त्यासंबंधीं हार्वर्ड विद्यापीठाचा एक विद्यार्थी लिहितो: "इतकें प्रक्षोभक सार्वजनिक भाषण मीं आजपर्यंत ऐकलें नव्हतें. माझें रक्त तापून डोकीकडे इतकें वेगानें चढूं लागलें कीं माझा शिरोभंग होतो कीं काय असा मला दोनतीनदां भास झाला. त्यावेळीं माझें देहभान हरपलें होतें."

वीस वर्षांपूर्वी ज्यावेळीं अमेरिकेची संयुक्त घटना मोडण्याचा धोका उत्पन्न झाला होता त्यावेळीं सिनेटमध्यें साऊथ कॅरोलिनाचा सिनेटर हायेन याला उत्तर देण्यासाठीं वेब्स्टरनें जें अस्खलित भाषण केलें होतें त्यामुळें "स्वातंत्र्य आणि संयुक्त राज्य हें एक व अखंड असेंच राहिलें पाहिजे आणि तसें तें कायम राहिलें पाहिजे" हा त्याचा घोष आबालवृद्धांच्या तोंडीं झाला. आणि साऱ्या देशांत एकराष्ट्रीयत्वाची भावना निर्मिण्यास कारण झाला.

वेब्स्टर अगदीं संथपणें भाषण करी. मिनिटाला सरासरी शंभर शब्द तो बोले. त्याचा आवाज एखाद्या तंतुवाद्यासारखा गोड असून त्याच्या वक्तृत्वांत संगीती लय असे. त्याची कल्पनाशक्ति सुस्पष्ट होती. वस्तुस्थितिनिवेदनाच्या अखंड गोळीबारानें तो विरोधकांना चीत करीत असे. तो आत्मविश्वासानें आणि विचारपूर्वक बोलतो आहे असें दिसे. भाषण करतांना तो भव्य आणि आकर्षक दिसत असल्यामुळें सिनेटमधील त्याच्या भाषणाच्या वेळीं प्रेक्षकांच्या गॅलरींत अफाट गर्दी लोटत असे. अतिशय काळजीनें तो आपलीं भाषणें तयार करी. तो भाषणें लिहून काढीत नसे. पण असें सांगतात कीं, आपल्या भाषणाचें वाक्यन्-वाक्य तो मनामध्यें आगाऊ तयार करून ठेवीत असे. मनांतल्या मनांत त्या वाक्यांत दुरुस्तीहि करी आणि मनांत रचून, पाठ करून ठेवलेलें भाषण तसेंच्या तसें बोलून दाखवीं.

भाषण करतांना त्याच्या व्यक्तित्वाची जी छाप पडत असे तींत त्याच्या प्रभावाचें अर्धे रहस्य साठविलेलें होतें. तो भाषण करीत असता त्याच्याकडे पाहिलें म्हणजे हा माणसावर प्रभुत्व गाजवण्याकरितांच जन्मला आहे अशी खात्री होई. त्याची उंची सहा फुटांहून कमी होती. शरीरयष्टि सडसडीत होती पण खांदे हालविण्याची त्याची लकब मोठी डौलदार असल्यानें एकाद्या नटाप्रमाणें त्याचें दर्शन भव्य दिसे. त्याचें डोकें मोठें विलक्षण व भव्य आकाराचें होतें, असें

तत्कालीनांनीं लिहिलें आहे. एक तत्कालीन लेखक लिहितो. "वेब्स्टरचें दर्शन हें जिवंत असत्य होतें. कारण तो इतका थोर पुरुष आहे असें दिसत असे कीं जगांत इतका थोर पुरुष कुणी असणें शक्यच नाहीं."

आणि खरोखर डॅनियल वेब्स्टर जितका मोठा दिसत असे तितका मोठा तो नव्हताहि. त्याच्या त्या कणखर शरीरयष्टीमध्यें त्याच्या इतर सद्‌गुणाप्रमाणें नैतिक भावनेचा विकास होऊं शकला नाहीं. युनायटेड स्टेट्स बँकेचा चार्टर सिनेटमध्यें पुन्हा मंजूर करावयाचा होता. अशा वेळीहि सदर बँकेच्या अध्यक्षाला तो लिहीत असे, "माझी फी अजून मिळाली नाहीं." (सिनेटचा सभासद या नात्यानें अशी फी घेण्याचा त्याला कांहींहि अधिकार नव्हता. पण—) अशी फी मागण्याची त्याला मुळींच दिक्कत वाटत नसे. सिनेटमध्यें केलेल्या कामाबद्दल तो फी मागे ती देणगी म्हणून नव्हे तर आपल्या कामाचा तो मेहनताना आहे असेंच तो मानीत असे. १८३६ सालीं त्यानें सिनेटचा राजीनामा देण्याचें ठरविलें. वकिलीच्या धंद्यांतील नुकसान भरून काढणें हा त्याचा हेतु होता. पण मॅसॅच्यु-सेट्‌स्‌मधील धंदेवाल्या मित्रांनीं त्याचीं कर्जें देऊन टाकण्याचें ठरवून त्याला राजीनामा देऊं दिला नाहीं. दंतकथा अशी आहे कीं तो मृत्युशय्येवर असता कोणीतरी त्याचें दार ठोठावलें आणि खूपसे पैसे त्याच्या अंथरुणाशीं पोचविले. तो पैसे देणारा एक वृद्ध माणूस होता. "याच्या मरणाच्या वेळीं याला पैशाची तूट पडूं नये या बुद्धीनें आपण पैसे देत आहोंत" असें त्या वृद्धानें सांगितलें.

असे पैसे घेण्यांत कांहीं अनैतिक नाहीं असें वेब्स्टला वाटे ही आश्चर्याची गोष्ट आहे. युनायटेड स्टेट्‌स्‌चा सिनेटर म्हणून त्याला पगार मिळत असे. पण आपली बुद्धि कितीहि अलौकिक असली तरी ती बुद्धिमत्ता व आपली सेवाशक्ति अमेरिकन जनतेला त्या पगाराबदली राजीखुषीनें विकून टाकली आहे, अधिक पैसे मागण्याचा आपणाला अधिकार नाहीं ही गोष्ट त्यानें कधींच लक्षांत घेतली नाहीं. त्याला मिळणारा पगार हा फार अपुरा आहे या भावनेनेंच बहुधा सिनेटच्या कामासाठीं तो खाजगी लोकाकडून फी घेत असावा. पण न्यू इंग्लंडच्या धंदेवाल्यांचें हितरक्षण त्यानें जें केलें तें त्यानें केवळ त्याला मिळणाऱ्या पैशासाठीं केलें असें नव्हे, तर त्या बाबतींत आपल्या वैय्यक्तिक मताप्रमाणेंच तो वागला. खाजगी लोकांकडून पैसे घेण्याचें एक विचित्र व्यसन त्याला होतें. याहून अधिक महत्त्व त्यानें पैशाला दिलें नाहीं. त्यानें पैसा मुळींच साठवला नाहीं. नेहमीं तो कर्जबाजारी असे. आपण

कर्जबाजारी आहोंत याची त्यानें कधीं खंतहि बाळगली नाहीं. केव्हां केव्हां तो कर्ज परत करीत असे. पैसा जवळ असला म्हणजे कर्ज फेडून टाकी.

पण त्याचे असे वैय्यक्तिक दोष कांहींहि असोत. डॅनियल वेब्स्टर हा त्याच्या काळीं उत्कृष्ट वक्ता, अमेरिकन कोर्टांतला अग्रगण्य वकील, व्हिग पक्षांतला अत्यंत नाणावलेला पुढारी आणि पराक्रमी कल्हाऊनला मागें रेटूं शकणारा एकटा एक सिनेटर एवढी सर्व कीर्ति पावला होता. म्हणून आरंभीं दिल्याप्रमाणें आपल्या तडजोडीच्या थोर मसुद्यासाठीं या विलक्षण बुद्धिमंताचा पाठिंबा आपण मिळविला पाहिजे हें जाणूनच हेन्री क्ले त्या रात्रीं वेब्स्टरकडे आला होता. नंतर घडलेल्या घटनांनीं क्लेचा हा अंदाज खरा ठरवला.

डॅनियल शांतपणें विचारमग्न होऊन क्लेचें भाषण ऐकत होता. क्ले हा आजारी असून अमेरिकेची संयुक्त घटना आजच्या संकटकाळीं टिकवून कशी धरावी याची योजना त्यानें मोठ्या कष्टानें मांडली. (१) कॅलिफोर्निया हें स्वातंत्र्यवादी राष्ट्र संयुक्त घटनेंत घ्यावें. (२) न्यू मेक्सिको आणि उटा अशीं दोन घटकराज्यें बनवावीं. आणि गुलामगिरीला अनुकूल अथवा प्रतिकूल असे कायदे या प्रदेशाबाबत करूं नयेत. (नवीन प्रदेशांत गुलामगिरीला मज्जाव असला पाहिजे अशी मूळ राज्यघटनेंत योजना होती. तिला हें दुसरें कलम विसंगत होतें) (३) न्यू मेक्सिकोमध्यें टेक्झस्चा कांहीं प्रदेश घेतल्याबद्दल टेक्झसला भरपाई करावी. (४) कोलंबिया जिल्ह्यांत गुलामांच्या व्यापाराला बंदी असावी. (५) उलट 'फ्युजिटिव्ह स्लेव्ह लॉ', म्हणजे पळून गेलेल्या गुलामांना पुन्हां पकडण्याचा कायदा कडक स्वरूपांत मंजूर करून घेऊन दक्षिण राज्यांतून उत्तर राज्यांत पळून गेलेल्या गुलामांना पकडून दक्षिणेंतील त्यांच्या मालकांच्या हवालीं त्यांना करण्याची तजवीज करावी.

क्लेच्या तडजोडीच्या थोर मसुद्याचें हें स्वरूप होतें. दक्षिण राज्यांत गुलामगिरीचे जे एकांतिक पुरस्कर्ते होते त्यांच्या दृष्टीनें या मसुद्याचें पहिलें व चौथें कलम हीं उत्तरवासीयांची केवळ मनधरणी करण्यासाठीं होतीं. उलट दुसरें आणि पांचवें कलम म्हणजे दाक्षिणात्यांना ९० टक्के सवलती देऊन त्यांच्यापुढें लोटांगण घालणें असेंच उत्तरवासीयांना वाटलें. उत्तरेंत पळून आलेल्या गुलामांना पकडून दक्षिणेंत त्यांना त्यांच्या मालकांच्या हवालीं करणें ही योजना उत्तरवासीयांना अतिशय तिरस्करणीय वाटली. (तिचा अंमल पुढें कधीं कठोरपणें झाला नाहींच.)

इतकेंच नव्हे तर आपल्या राज्यांत त्या कायद्याचा अम्मल होता कामा नये असा उलटा कायदा मॅसॅच्युसेट्स् या घटक राज्यानें केला.)

अशा एकंदर परिस्थितींत मॅसॅच्युसेट्स्चा प्रतिनिधि डॅनियल वेब्स्टर हा आपल्या बाजूस येऊन या तडजोडीच्या मसूद्याची तरफदारी करील असें हेन्री क्लेला वाटलें कसें ? वेब्स्टर हा सर्व आयुष्यभर गुलामगिरीचा सतत विरोधक होता हें क्लेला माहीत नव्हतें काय ? सिनेटमधील एका भाषणांत वेब्स्टर बोलला होता : "मी गुलामगिरीचा प्रदेश वाढण्याला निकराचा विरोध करीन. गुलामगिरीच्या प्रदेशांचें प्रतिनिधित्व कोठेंहि, कोणत्याहि परिस्थितींत वाढूं देणार नाहीं. कोणी कितीहि मोह मला घालो, मोठमोठ्या लोकांचें कितीहि नुकसान होवो, कितीहि गटांच्या एकजुटीचा विरोध मला होवो, तडजोडीच्या योजना कितीहि येवोत, मी कशाचीहि पर्वा करणार नाहीं."

क्ले वेब्स्टरला भेटायला आला होता त्याच आठवड्यांत एका मित्राला लिहिलेल्या पत्रांत वेब्स्टर लिहितो : "तरुणपणापासून माझी अशी खात्री झाली आहे कीं गुलामगिरी हें राजकीय व नैतिक दृष्ट्या एक महापाप आहे. माझ्या आजवरच्या या मताशीं विसंगत अशी कोणतीहि गोष्ट अथवा तडजोड समोर आली तरी तिला माझा पाठिंबा मिळणार नाहीं.

पण क्लेच्या भेटीनंतर वेब्स्टरच्या डोक्यांत वेगळाच विचार आला. गुलामगिरी कीं व्यक्तिस्वातंत्र्य या मुद्यावर जर देशांत यादवी माजली तर गुलामगिरीच्या बेड्या अधिकच घट्ट होतील अशी त्याला भीति वाटली. शिवाय गुलामगिरीला त्याचा जितका निकराचा विरोध होता त्यापेक्षां अमेरिकेचें संयुक्त राज्य अभंग रहावें याबद्दल त्याला अधिक तीव्र आस्था होती. म्हणून त्या जानेवारीतल्या दुर्दैवी रात्रीं वेब्स्टरनें हेन्री क्लेला पाठिंबा देण्याचें वचन दिलें. आणि त्याच्या आयुष्यांतलें भयानक संकट त्यानें स्वतःवर ओढवून घेतलें. १८५० सालींच गुलामगिरी विरुद्ध व्यक्तिस्वातंत्र्य या मुद्यावर देशाची फाळणी होईल अशी भीति बाळगणाऱ्यांच्या मतासंबंधानें तिरस्कार बाळगणाऱ्यांमध्यें तो होता. पण दाक्षिणात्य पुढाऱ्याशीं जेव्हां त्यानें बोलणें केलें तेव्हां "देशाची परिस्थिति अशी आहे कीं गुलामगिरीवरच्या वादांत आज जर तडजोड केली नाहीं तर तिचा परिणाम अपरिहार्यपणें यादवींत होईल" अशी त्याला भीति वाटली. तो आपल्या मुलाला लिहितो "परिश्रम आणि मानसिक चिंता यांनीं

मी खचलों आहें. उत्तरीय आणि दाक्षिणात्य या दोघांचाहि एकांतिक मूर्खपणा जोरानें फोफावत आहे. कोणत्या हत्यारानें तो हाणून पाडूं, हल्लींच्या या संकटाला कसें तोंड देऊं हें मला कळेनासें झालें आहे. माझी उमेद सरली असून धीर खचला आहे."

१८५०सालीं दोन गट अमेरिकन संयुक्त घटनेंतून फुटूं पहात होते. न्यू इंग्लंडमध्यें गॅरिसन हा पुढारी जाहीरपणें सांगत होता कीं "मी गुलामगिरी नष्ट व्हावी या मताचा आहें. आणि गुलामगिरीवादी राष्ट्रें संयुक्त घटनेंतून काढून टाकावीं असें माझें मत आहे." उलट १८५०च्या फेब्रुवारींत कल्हाऊन हा दाक्षिणात्य पुढारी एका मित्राला लिहिलेल्या पत्रांत लिहितो : "देशाची फाळणी एवढाच पर्याय आम्हांपुढें उरला आहे." तारीख ४ मार्च रोजीं म्हणजे त्याच्या मृत्युपूर्वीं कांहीं आठवडे सिनेटमध्यें कल्हाऊन अशक्तपणामुळें बोलण्यालाहि असमर्थ होऊन बसला असता त्याचें भाषण वाचून दाखविण्यांत आलें. त्यांत तो म्हणतो "गुलामगिरी रद्द होण्यापेक्षां मी अमेरिकन संयुक्त घटनेंतून फुटून निघणें पत्करीन."

ही फुटून निघण्याची कल्पना लोकप्रिय करण्यासाठीं जूनमध्यें दक्षिणेंत नॅशव्हाईल येथें एक प्रचंड परिषद भरवावी असा ठराव दाक्षिणात्यांच्या एका सभेंत मंजूर झाला. कल्हाऊननेंच या परिषदेस प्रेरणा दिली होती. उभयपक्षीं फुटून निघण्याची मनोवृत्ति अगदीं परिपक्व झाली असून संयुक्त घटना टिकविण्याचे पुरस्कर्ते कुणीच उरले नव्हते. जॉर्जियाचा अलेक्झँडर स्टिफन्स हा दाक्षिणात्य असला तरी त्याला संयुक्त घटना मोडायची नव्हती. याच मताच्या इतरांना लिहिलेल्या पत्रांत तो म्हणतो: "संयुक्त घटना मोडून टाकावी याबद्दल दाक्षिणात्य सदस्यांची भावना दृढ झाली आहे. बारा महिन्यांपूर्वीं फाळणीच्या कल्पनेला जे शिवतहि नसत ते लोक आज फाळणीचा विचार गंभीरपणें करूं लागले आहेत. आतां तें संकट फार दूर नाहीं. आपल्या प्रजाराज्याचे तुकडे होणें अपरिहार्य दिसतें." वेब्स्टरचें प्रसिद्ध भाषण होण्यापूर्वीं सहा महिने दक्षिणेंतील सहा राज्यांनीं नॅशव्हाईल परिषदेचे हेतु मान्य करून त्यासाठीं प्रतिनिधिहि नेमले. २३ फेब्रुवारी रोजीं होरेस ग्रीली लिहितो :

" कॉंग्रेसमध्यें आज ६० सदस्य असे आहेत कीं त्यांना संयुक्त घटना मोडा-

वयाची असून त्यासाठीं ते कारस्थान करीत आहेत. नॅशव्हाईल परिषद भरणार, आणि गुलामगिरीवादी राष्ट्रांना संयुक्त घटनेंतून फोडून काढावयाचें हाच त्या परिषदेचा हेतु आहे यांत मुळींच शंका नाहीं. फुटून बाहेर गेल्यावर या गुलामगिरीवादी राज्यांचा स्वतंत्र राज्यांचा संघ (कॉन्फिडरसी) बनविण्यांत येणार आहे."

१८५० च्या आरंभींच्या महिन्यांत अशी संकटकालीन परिस्थिति देशांत होती.

फेब्रुवारीच्या शेवटीं मॅसॅच्युसेट्स्च्या सिनेटरनें आपला निर्णय ठरविला होता. क्लेनें सुचविलेला तडजोडीचा मसुदा ही एकच योजना यादवी टाळण्यास समर्थ आहे अशी मॅसॅच्युसेट्स्च्या सिनेटरची, डॅनियल वेब्स्टरची खात्री झाली होती. आपल्या एका मित्राला तो लिहितो: "मी अमेरिकेच्या संयुक्त घटनेच्या समर्थनार्थ एक सत्यपूर्ण असें भाषण करून माझी सदसद्विवेकबुद्धि सिनेटपुढें खुली करीन." त्यानें अशी भूमिका घेतल्यास त्याच्यावर केवढे हल्ले होतील याबद्दलचे इषारे, वेब्स्टर आपल्या भाषणाची तयारी करीत असतांना, त्याला मिळत होते. त्याचे मतदार आणि मॅसॅच्युसेट्स्चीं वृत्तपत्रें यांनीं 'तुम्ही आपली गुलामगिरीविरोधी भूमिका सोडूं नका,' असें त्याला बजावून सांगितलें. 'दाक्षिणात्यांविरुद्ध अधिक कडक भाषा वापरा.' अशाहि सूचना त्याला मिळाल्या. पण डॅनियल वेब्स्टरचा निश्चय ठरला होता. "मी माझें जहाज एकटाहि हांकारायला तयार आहें," असें त्यानें ६ मार्च रोजीं आपल्या मित्रांना सांगितलें. कित्येक वर्षांपूर्वी सिनेटमध्यें भाषण करताना तो बोलला होता :

"परिस्थिति बदलली म्हणजे मतें बदलतात. आणि त्यामुळें मतांची विसंगति समर्थनीय ठरते. पण तरीहि एक विसंगति अशी असते कीं ती मात्र गुन्हेगारीच मानली पाहिजे. सिनेटरचे स्वतःचे विचार आणि तो करतो तें मतदान, तसेंच एखाद्याची सदसद्विवेकबुद्धि आणि त्याचें वर्तन यांत विसंगति नसावी. अशी विसंगति केली असा आरोप माझ्यावर कोणीहि करूं शकणार नाहीं."

वरील उद्गारांत दर्शविल्याप्रमाणें तो आतां वागणार होता. बदललेल्या परिस्थितींत त्याचें मत आतां बदललें होतें. अशा प्रकारें १८५० मधील ७ मार्च हा दिवस उगवला. त्या दिवशीं त्यानें जें भाषण केलें त्या भाषणाचा विषय-

सूचक मथळा लोक पुढल्या वर्षीच विसरले व पुन्हां कधीहि त्या मथळ्याची लोकांना आठवण झाली नाहीं. त्या दिवशीं वेब्स्टरनें केलेल्या भाषणाचा मथळा " ७ मार्चचें भाषण " असाच लोकांच्या स्मरणांत राहिला आहे.

अलीकडे कित्येक महिने वेब्स्टरला निद्रानाशाची व्यथा जडली होती. आतां उरलेल्या आयुष्यांत हें भाषण हा एकच शेवटचा निकराचा राजकीय कर्तृत्वाचा प्रयत्न आपण करूं शकूं, असें त्याला वाटत होतें. त्या दिवशीं त्यानें भाषणासाठीं अंगांत शक्ति रहावी म्हणून ऑक्साईड ऑफ् आर्सेनिक व इतर औषधें घेतलीं. सकाळचा सर्व वेळ त्यानें मनांतल्या मनांत टिपणें करण्यांत घालविला. सिनेटची बैठक सुरू होण्यापूर्वीं दोन तास सिनेटचें सभागृह, गॅलरिज्, मागल्या खोल्या, दोन इमारतीमधील पूल वगैरे सर्व जागा प्रेक्षकांनीं भरून गेल्या आहेत असें सिनेटजवळच्या पहारेकऱ्यानें त्याला कळविलें. डॅनियल वेब्स्टरचें तें भाषण ऐकण्यासाठीं दूर अंतरावरून प्रवास करीत माणसें आलीं होतीं. परराष्ट्रीय मुत्सद्दी व प्रतिनिधी सभेचे सदस्य जेमतेम उभे राहण्यापुरती जागा मिळावी म्हणून धडपडत होते. श्रोत्यांच्या अफाट गर्दीची ही बातमी ऐकून वेब्स्टरच्या मनांतील त्वेष वाढला. सिनेट भरलें त्यावेळीं सभासदांना गर्दीतून वाट काढून आपल्या जागीं जाणें अगदीं कठीण झालें. कागदपत्रांच्या गठ्ठ्यावरहि लोक बसले होते. अनेक सिनेटरांनीं स्त्रियांना आपल्या जागा दिल्या आणि वेब्स्टरच्या भाषणाची वाट पहात ते जाण्यायेण्याच्या वाटेवर उत्सुकतेनें उभे राहिले.

सिनेटचे सभापति म्हणजे अमेरिकेचे उपराष्ट्रपति यांनीं हातोडा टेबलावर आपटल्यावर अधिवेशन सुरूं झालें. विस्कॉन्सिनचा सिनेटर वॉकर हा बोलायला उभा राहिला. आदल्या दिवसाचें अर्धवट भाषण तो संपवीत होता. सभापतींना तो म्हणाला " हा प्रचंड श्रोतृसमाज माझें भाषण ऐकायला आलेला नाहीं. एवढा श्रोतृसमाज खेंचून आणण्याचें सामर्थ्य ज्या एका माणसांत आहे त्याचें भाषण ऐकण्यास श्रोते उत्सुक आहेत. म्हणून मॅसॅच्युसेट्सच्या सिनेटरला बोलावयास मिळावें यासाठीं माझें भाषण संपविणें हें माझें कर्तव्य आहे व तसें करतांना मला आनंद वाटतो."

डॅनियल वेब्स्टर हळू हळू बोलायला उभा राहिला. त्याबरोबर सर्व श्रोतृसमाज अगदीं स्तब्ध झाला. त्याचें ते काळेभोर टपोरे विचारमग्न नेत्र, चेहऱ्यावरील गडद कांति, भव्य कपाळ इत्यादि व्यक्तिवैशिष्ट्यानें गेलीं तीस वर्षें

श्रोतृसमुदायावर एक प्रकारें दरारा बसविणारी त्याची भव्य व विलक्षण शरीरयष्टि नेहमींप्रमाणें लोकांच्या नजरेंत भरली. निळा कोट व पितळेचीं बटणें असा नेहमींचा पोषाख त्यानें अंगावर घातला होता. भाषण सुरूं करण्यापूर्वीं विचारमग्न मुद्रेनें त्यानें सभोवार एकदां नजर टाकली. त्या दिवशींइतके सिनेटर्स कधीं जमल्याचें त्यालाहि माहित नव्हतें. क्ले, बेन्टन, हाऊस्टन, जेफर्सन डेव्हिस, हेल्, बेल्, कॅस्, सीवर्ड, चेस्, स्टिफन डग्लस् इत्यादि सर्व बडे सिनेटर त्याला दिसले. पण एक चेहरा त्याला दिसला नाहीं. जॉन सी. कल्हाऊन हा आजारी असल्यामुळें तेथें हजर नसावा.

सर्वांचे डोळे वक्त्यावर खिळले. तेथें हजर असलेल्या वेब्स्टरच्या मुलाखेरीज कुणालाहि तो काय बोलणार हें माहित नव्हतें. एक वृत्तपत्र वार्ताहर लिहितो : "वक्त्याचा शब्द स्पष्टपणें ऐकूं यावा याबद्दल सर्व श्रोत्यांना इतकी उत्कंठा लागल्याचें माझ्या आयुष्यांत मी कधीं पाहिलेलें नाहीं."

वेब्स्टर ज्यावेळीं अंतःकरणाच्या थोर स्फूर्तीनें बोलत असे, "त्यावेळीं त्याच्या ओठावर तोफ चढविलेली आहे कीं काय असा भास होत असे" असे इमर्सननें वेब्स्टरविषयीं लिहून ठेवलें आहे. त्यादिवशीं श्रोत्यावर मोह टाकणारें आपलें वक्तृत्व गाजवण्यासाठीं त्यानें आपली सारी शक्ति एकवटली. पण या वेळच्या वक्तृत्वांत गुलामगिरीला त्याचा विरोध दिसला नाहीं. पळून गेलेल्या गुलामांना पकडून देण्याच्या कायद्याचा यावेळीं त्यानें निषेध केला नाहीं आणि या आपल्या भाषणानें देशाच्या इतिहासांतले व देशबांधवांच्या अंतःकरणांतलें आपलें स्थान तो गमावून बसला. वीस वर्षेपर्यंत राष्ट्रपतिपद त्याच्या हाताजवळजवळ येत होतें, तें मिळण्याची अखेरची संधिहि तो गमावून बसला. अमेरिकेची संयुक्त घटना अभंग रहावी, देशाची फाळणी होऊं नये यासाठीं त्यानें आपली कीर्ति आणि कारकीर्द यांची आहुथि दिली होती.

वेब्स्टर म्हणाला : "अध्यक्ष महाराज, मी आज बोलतों तें मॅसॅच्युसेट्स्चा प्रतिनिधि म्हणून नव्हे, उत्तरप्रदेशाचा प्रतिनिधि म्हणून नव्हे, पण अमेरिकेचा नागरिक आणि अमेरिकन संयुक्त राज्याच्या सिनेटचा सदस्य म्हणून बोलतों आहें ..अमेरिकेचें संयुक्त राज्य टिकावें या हेतूनें मी बोलणार आहें. त्यासाठींच माझें भाषण ऐकून घ्या."

त्याचें भाषण थोडेसें झालें होतें त्यावेळीं आजारपणानें वाकलेला हडकुळा

कल्हाऊन अंगाभोंवतीं काळा डगला गुंडाळून हळूहळू सभागृहांत आला. त्याला नाट्यपूर्ण रीतीनें त्याच्या खुर्चीवर इतरांनीं बसविलें. त्याचें अंग थरथर कांपत होतें. तो हालचालहि करूं शकत नव्हता. तो येऊन बसल्याचें वेब्स्टरला कळलें नाहीं. "साऊथ कॅरोलिनाचा प्रसिद्ध सिनेटर कल्हाऊन आजारीपणामुळें आज हजर राहूं शकला नाहीं" असा उल्लेख वेब्स्टरनें अनेक वेळां केला तेव्हां, 'साऊथ कॅरोलिनाचा सिनेटर आपल्या खुर्चींत बसला आहे' असे शब्द कल्हाऊननें आपल्या खुर्चीच्या हातांना घट्ट धरून आपल्या खोल, अशक्त पण, स्पष्ट व स्वाभिमानयुक्त वाणीनें उच्चारले. ते ऐकून वेब्स्टरच्या डोळयांत अश्रू आले व त्यानें मान लववून कल्हाऊनला वंदन केलें. कल्हाऊन थकला होता, त्यानें मान मागें टाकली. वेब्स्टरकडे तो पहात होता. पण त्याचें भाषण त्याला पसंत होतें कीं नापसंत होतें हें कल्हाऊनच्या मुद्रेवरून कळलें नाहीं.

वेब्स्टर तीन तास, अकरा मिनिटें बोलत होता. आपल्या टिपणांकडे त्यानें फार थोडचा वेळां पाहिलें. संयुक्त राज्याची कैफियत त्यानें आपल्या भाषणांत मांडली. वादांतील दोन्ही बाजूंचीं गाऱ्हाणीं मांडून उभयतांनीं समजुतीनें घ्यावें व स्वदेशाभिमानासाठीं समेट करावा अशी त्यानें विनंति केली. तो म्हणाला : "सिनेटचें काम गुलामगिरी टिकविणें अगर गुलामगिरी नष्ट करणें हें नाहीं. अमेरिकेचें संयुक्त राज्य टिकविणें हें सिनेटचें उद्दिष्ट असलें पाहिजे." "देशाची फाळणी शांततापूर्णतेनें होईल" असें मत मांडणाऱ्यांवर त्यानें अतिशय तर्कशुद्ध व दूरदृष्टीच्या युक्तिवादानें कठोर शब्दांत हल्ला केला. वेब्स्टर म्हणाला :

"शांततापूर्ण फाळणी होण्याचा चमत्कार डोळयांनीं पहाण्याचें तुमच्या व माझ्या नशिबीं नाहीं. या प्रचंड राष्ट्राचे तुकडे होतांना कांहींहि खळबळ होणार नाहीं असें मानण्याइतका मूर्ख कोण आहे ? फाळणीचे संभवनीय फायदे अथवा फाळणीचा उपयोग यासंबंधीं बोलण्याऐवजीं, भविष्यकाळाच्या त्या गडद अंधाराच्या दरींत उडी घेण्याच्या विचाराऐवजीं संयुक्त राज्य आणि स्वातंत्र्य यांची स्वच्छ, ताजी हवा उपभोगूंया. भावी काळांत आपल्या या राज्यघटनेंत इतर सर्व राज्यांतले लोक येणार आहेत. आजची आपली पिढी ही त्या भावी काळाला वर्तमानकाळ जोडणारी मजबूत व तेज:पुंज अशी सोनेरी साखळी आपण बनवूंया !"

टाळयांचा कडकडाट झाला नाहीं. फक्त लोकांच्या कुजबुजीनें गजबज झाली.

लोक चकित झाले. पण त्यांनीं टाळ्या वाजविल्या नाहींत. कदाचित लोक फार थक्क झाले म्हणून टाळ्या वाजवण्याचें त्यांना सुचलें नसावें. एक वार्ताहर घाई-घाईनें तार ऑफिसांत गेला व त्यानें आपल्या पत्राला तार केली : "वेब्स्टरनें फार मोठी जबाबदारी पत्करली आहे. त्याला यश येवो कीं अपयश येवो, त्यानें ज्या धैर्यानें ही भूमिका घेतली तीमुळें सर्व राष्ट्राच्या आदराला तो पात्र झाला आहे."

वेब्स्टर अखेरीस यशस्वी झाला. जरी उत्तरेंतल्या अनेकांनीं त्याचा धिःकार केला तरी मॅसॅच्युसेट्स्‌सारख्या बड्या घटक राज्याच्या या प्रतिनिधीनें राष्ट्रीय ऐक्य व स्वदेशाभिमान यासाठीं सलोखा करा अशी हांक दिली, यामुळें वॉशिंग्टन-मध्यें आणि दाक्षिणात्य प्रदेशांत दाक्षिणात्यांच्या हक्काबद्दल ही प्रामाणिक हमी मिळाली आहे अशी सर्वांची खात्री झाली. कल्हाऊनचें समाधान झालें नाहीं तरी पण चार्ल्स्टन येथील कल्हाऊनच्या 'मर्क्युरी' ह्या पत्रानें वेब्स्टरची पाठ थोपटून म्हटलें : " त्याचें भाषण उमदें, उदार व सलोख्याच्या वृत्तीचें होतें." न्यूऑर्लिन्सच्या 'पिकॅयून' या पत्रानें वेब्स्टरचा गौरव करून लिहिलें : " वेब्स्टरला जी गोष्ट वस्तुतः न्याय्य वाटली आणि राष्ट्राच्या शांततेच्या व सुरक्षिततेच्या दृष्टीनें अवश्य वाटली ती बोलून दाखवण्यांत त्यानें मोठेंच नैतिक धैर्य दाखविलें."

वेब्स्टरच्या या भाषणानें राष्ट्राची तावडतोब होणारी फाळणी टळली, रक्तपातहि टळला. सिनेटर विन्थ्रॉप् म्हणाला : " वेब्स्टरच्या भाषणानें दाक्षिणा-त्यांना शस्त्र खालीं ठेवायला लावून शांत केलें आणि नॅशव्हाईलची संकल्पित परिषद पाचोळ्यासारखी उडवून लावली." कांहीं दिवसांनंतर जर्नल ऑफ् कॉमर्स या नियतकालिकानें लिहिलें : " १८५० सालीं अमेरिकन संयुक्त राज्याचें खांब उखडून लावूं पहाणारी जी प्रादेशिक वृत्ति बळावली होती ती थोपवून मागें हटवण्यांत वेब्स्टरनें जेवढी कामगिरी केली तेवढी कामगिरी अमेरिकेच्या इतिहासांत दुसऱ्या कोणीं केली नाहीं. त्यासाठीं वेब्स्टरनें आपली लोकप्रियता जेवढी धोक्यांत घातली तेवढा धोका यापूर्वीं कुणीं पत्करलेला नव्हता."

ॲलन नेव्हिन्स, हेन्री स्टील, जेराल्ड जॉन्सन इत्यादींनीं "वेब्स्टरचें हें भाषण मुत्सद्देगिरीच्या श्रेष्ठ दर्जाचें होतें" असें म्हटलें असून "राष्ट्राची त्यानें ही शेवटची फार मोठी सेवा केली होती" असें मत व्यक्त केलें आहे. पण १९ व्या शतकाच्या उत्तरार्धांतील अनेक गुलामगिरीविरोधकांना वेब्स्टरचें तें भाषण

पसंत पडलें नाहीं. वेब्स्टरनें घडवून आणलेली तडजोड झाली नसती तर देशाची फाळणी झाली असती असें त्यांना वाटलें नाहीं. उलट नंतर घडलेल्या घटनावरून कांहीं लोकांना कितीहि तडजोड केली तरी फाळणीची प्रवृत्ति अटळ होती असेंहि वाटलें. पण दुसऱ्या कांहीं लोकांनीं असेंहि म्हटलें आहे कीं उत्तर आणि दक्षिण यांच्यांतील युद्ध दहा वर्षे पुढें ढकलून वेब्स्टरनें वादाचें क्षेत्र संकुचित केलें. त्यामुळें संयुक्त राज्य अखेरीस टिकण्याला मदतच झाली. वेब्स्टरनें जी सलोख्याची प्रवृत्ति दाखविली त्यामुळें दक्षिणेशीं आपण जास्तींत जास्त न्यायानें व सौजन्यानें वागलों अशी उत्तरीयांची भावना होऊन पुढील दहा वर्षांत दाक्षिणात्यांनीं या तडजोडीचा जो अनेक वेळां भंग केला त्यामुळें आपली अधिक दृढ एकजूट झाली असें मत उत्तरीयांनीं मांडलें. यादवी दहा वर्षे पुढें गेल्यामुळें उत्तरीयांचा रण-दृष्ट्याहि फायदा झाला. त्यांची लोकप्रियता, त्याची मतसंख्या, त्यांचें उत्पादन व रेल्वे या सर्वांची त्या दहा वर्षांत अफाट वाढ झाली. वेब्स्टरच्या पाठीराख्यापैकीं धंदेवाले व इतर व्यवसायवाले या सर्वांना ही गोष्ट लक्षांत येऊन त्यांनीं ७ मार्चच्या भापणाच्या लक्षावधि प्रति सर्व देशभर वाटल्या. वेब्स्टरनें या छापील प्रतींची अर्पणपत्रिका मॅसॅच्युसेट्स्च्या जनतेला उद्देशून खालीलप्रमाणें लिहिली होती—

"अपरिहार्य परिस्थितीमुळें मला गोड बोलण्याऐवजीं सत्य बोलावें लागत आहे. तुम्हांला खूष करणें मला खास आवडेल. पण त्यापेक्षां तुमचा बचाव करणें हें मी अधिक पसंत करतों. मग तुमचें माझ्याबद्दलचें मत कांहींहि होवो."

पण गुलामगिरी नाहींशी करण्याचा आग्रह असणाऱ्या लोकांना वेब्स्टरचा हेतु कळूं शकला नाहीं. अत्यंत बुद्धिमान अशा मतदारांनीं आपल्या प्रतिनिधीचा जितक्या तीव्रतेनें धिःकार केल्याचा अनुभव वेब्स्टरला आला तितक्या तीव्रतेनें थोड्याच मुत्सद्यांना आला असेल. रेव्हरंड थिओडोर पार्कर यानें वेब्स्टरचा धिःकार प्रार्थनामंदिरांतील आपल्या व्यासपीठावरून केला. गुलाम-गिरी-विरोधापायीं अमेरिकेची फाळणी झाली तरी त्याला त्याची पर्वा नव्हती. पळून आलेल्या गुलामांना आपण आपल्या तळघरांत आश्रय देऊन कायद्याला आव्हान देतों अशी बढाई तो मारीत असे. टेबलावर एक भरलेलें पिस्तूल आणि दौतीशेजारीं तरवार ठेवून तो आपली प्रवचनें लिहून काढी. माझ्या बचावासाठीं हीं हत्यारें मी जवळ ठेवतों असें तो म्हणे. वेब्स्टर-संबंधानें रेव्हरंड

पार्कर म्हणाला; "राष्ट्राच्या सदसद्विवेकबुद्धीशीं एवढा व्यभिचार केलेला माणूस ज्या जगांत हयात नाहीं. इतकें अधम कृत्य करणारा मनुष्य अमेरिकेच्या इतिहासांत झाला नाहीं." होरेस मॅन् म्हणाला : "वेब्स्टर हा निखळलेला तारा आहे. शुक्राची चांदणी आकाशांतून निखळली." लाँगफेलो विचारतो : "हाईन राक्षसावर पर्वत फेकणारा हाच टायरन काय ?" इमर्सन लिहितो : "याच्या शरीरांतील रक्ताचा थेंबन्थेंब लाजेनें खालीं पहातो आहे. वेब्स्टरची नैतिक भावना मेली, त्यामुळें राष्ट्राचा अध:पात झाला आहे. विल्यमकलन् ब्रायंट म्हणतो : "वेब्स्टरनें आजवर ज्या तत्त्वाचा पुरस्कार केला त्याचाच आज त्यानें त्याग केला असल्यामुळें त्याचे हेतु दुष्ट असले पाहिजेत असें वाटूं लागलें आहे."

जेम्स रसेल लोवेल याच्या मतें "वेब्स्टर हा क्षुद्र, मूर्ख व विश्वासघातकी माणूस होता. इतका नीच माणूस माझ्या ऐकण्यांत नाहीं."

वेब्स्टर सिनेटमधून गेल्यानंतर त्याच्या जागीं चार्ल्स सुम्नर येणार होता. त्या सुम्नरनें वेब्स्टरचें नांव तत्त्वच्युतांच्या यादींत घातलें. सुम्नर म्हणाला, "वेब्स्टरनें केलेल्या देशद्रोहामुळें उत्तरेची कंबर इतकी मोडली आहे कीं, उत्तरेवर एवढा आघात दुसऱ्या कोणींहि कधींहि केलेला नाहीं." सिनेटर विल्यम एच्. सीवर्ड यानें "वेब्स्टरनें स्वातंत्र्याचा विश्वासघात केला," असें मत दिलें. फनिल हॉल येथें एक जाहीर सभा झाली. त्या सभेंत वेब्स्टरचें भाषण हें एका शहाण्या मुत्सद्याला व चांगल्या माणसाला न शोभणारें होतें असा अभिप्राय व्यक्त केला गेला. त्या सभेनें "घटना अथवा कायदा कांहीहि म्हणो, आमच्या प्रदेशांत आश्रयासाठीं आलेल्या गुलामाला मॅसॅच्युसेट्स् राज्यांतून बाहेर घेऊन जाण्याला आम्ही कोणालाहि मुळींच परवानगी देणार नाहीं," असा ठराव केला. मॅसॅच्युसेट्स् कायदेमंडळानें वेब्स्टरच्या भाषणांतील विचारांच्या विरुद्ध ठराव मंजूर केले. त्यावेळीं एक सभासद म्हणाला, "वेब्स्टर हा भेकड असून सिनेट-मध्यें मॅसॅच्युसेट्स्च्या मताबद्दल गैरसमज निर्माण करतो आहे." दुसरा एक सभासद म्हणाला, "डॅनियल वेब्स्टरला ईश्वरानें दयाबुद्धीनें जर अधिक आयुष्य दिलें आणि आपल्या या कृतीबद्दल त्याला पश्चात्ताप होऊन त्यांचा कलंक धुवून निघेपर्यंत जर तो जगला तर वेब्स्टर सुदैवी ठरेल."

बोस्टनच्या 'कोरियर' पत्रानें म्हटलें, "वेब्स्टरशीं उत्तर भागांतील एकहि व्हिग सभासद सहमत नाहीं." बोस्टनचें "ॲटलास" हें पत्र पूर्वीं वेब्स्टरचें

पाठिराखें होतें; त्यानें लिहिलें "वेब्स्टरच्या भावना या आमच्या भावना नव्हेत आणि त्या न्यूइंग्लंडच्या व्हिग पक्षाच्या भावना नव्हेत, असेंहि म्हणण्याचें आम्हीं धाडस करतों." न्यूयॉर्क ट्रिब्यूनच्या मतें, वेब्स्टरचें भाषण त्या प्रसंगाला व वेब्स्टरलाहि अनुचित असें होतें." न्यूयॉर्क ईव्हिनिंग पोस्टनें लिहिलें, वेब्स्टरनें घेतलेली माघार ही विश्वासघाताची आहे....अलीकडे व्यक्तिस्वातंत्र्याचें त्यानें समर्थन केलें असतां आतां त्यानेंच त्याचा त्याग केला." गुलामगिरीविरोधी पत्रांनीं वेब्स्टरचें भाषण हें, "अवर्णनीय दुष्ट भाषण" अशी टीका केली.

एडमंड क्विन्सी यानें फारच कठोर टीका केली. "सिंहाचा कुतरडा झाला. ज्या मालकांनीं त्याच्यावर फेकलेले घाणेरडे तुकडे खायला मिळावे म्हणून तो त्यांचे हात चाटत होता त्यांच्यावरच हा उलटला." जॉन ग्रिनलिफ् व्हिट्टियर या सामान्यत: सौम्य टीका करणाऱ्या कवीनें 'इचॅबोड' (दु:खोद्गार) या नांवाची एक कविता लिहून अतिशय कठोर शब्दांत वेब्स्टरचा धि:कार केला. तो अमेरिकन वाङ्मयांत चिरंजीव झाला आहे. सदर कवितेचा भावार्थ:—

"त्याचा अध:पात झाला ! तो खलास झाला !
त्याच्या तोंडावर केवढें तेज होतें ! तें सारें मावळलें.
त्याच्या करड्या केसावरचें तेज पार गेलें !
कायमचें गेलें !
ज्यावर आम्हीं प्रेम केलें त्याच्यांतील पाशवी
शक्तीखेरीज सर्व गेलें !
या पतित देवदूताचा वैचारिक अहंकार
अजून मजबूत आहे, पण त्याचा आतां साखळदंड झाला आहे.
आतां त्याच्या मृत कीर्तीला आदरांजलि वाहा,
दृष्टि फिरवून मागें फिरा आपली लाज आपणच झाका."

पुढें कित्येक वर्षांनीं या कवितेबद्दलची आठवण सांगतांना व्हिट्टीअर म्हणतो, "मी माझ्या आयुष्यांतल्या अत्यंत दु:खदायक क्षणीं ही कविता लिहिली. डॅनिअल वेब्स्टर हा उद्धट, तिरस्करणीय राक्षस होता. म्हणून मी त्याच्यावर हा अतिशय कडक हल्ला केला."

वेब्स्टरनें या आपल्या भावी टीकाकारांना आधीच फटका मारून ठेवला होता. तो म्हणाला: "गुलामगिरीविरोधक आणि सुशिक्षित यांनीं पूर्वी मजवर

टीका केली होती तशीच ते आतांहि करतील. वॉशिंग्टनला व इतर अनेकांना अशाच शिव्या खाव्या लागल्या नाहींत काय ?" या सर्व टीकेला उत्तर द्या असें कोणीं म्हटलें कीं एक प्राचीन धर्मगुरु अशाच अडचणींत सापडला असतां त्यानें दिलेलें उत्तर वेब्स्टरनें बोलून दाखविलें.

तो म्हणाला: "बर्फ पडत आहे तोवर मी रस्ता साफ करणार नाहीं." पण अखेरीस न्यूइंग्लंडमधील एकाहि व्हिग पक्षीय माणसानें त्याची बाजू घेतली नाहीं, तेव्हां तो खिन्न झाला. वेब्स्टर या प्रसंगासंबंधानें लिहितो: "मी अशा एका वादांत सांपडलों होतों कीं, माझ्या नजिकच्या मित्रांतूनहि मला एखादा पुढारी अथवा अनुयायी मिळूं शकला नाहीं. देशाच्या हिताच्या दृष्टीनें अत्यवश्य अशा कांहीं व्यावहारिक गोष्टी साठीं मी भांडतों आहें. पण मॅसॅच्युसेट्स्‌मधून एकाचीहि मदत मला मिळत नाहीं. या ठिकाणीं एकटयानें उभे रहाण्याचा मला कंटाळा आला आहे. पांच महिने मी झगडतों आहें. पण माझ्या सहकाऱ्यांपैकीं कुणीहि माझ्या भावनाशीं ऐक्य दाखवीत नाहीं. ७ मार्चपासून असा एक क्षणहि गेला नाहीं कीं, ज्यावेळीं मला माझ्या चिंतेचें ओझें असह्य वाटलें नाहीं. निश्चितपणानें मला कधीं दोन घासहि खाता आले नाहींत."

आपले हेतु तो अशा प्रकारें समजून सांगून आपण गुलामगिरीला पूर्वींइतकेच विरोधी आहोंत असें सांगत असें. तरी पण तो म्हणे, "माझ्या भाषणांत मीं जें तत्त्व मांडले त्याचा मी पाठपुरावाच करीन. न्यूइंग्लंडमधील प्रत्येक खेड्यांत जाऊन मी माझें हें मत मांडीन. लोकांच्या मनांत आज जी खळबळ माजली आहे त्यांतून काय निष्पन्न होणार हें मला माहीत नाहीं. परंतु माझें कर्तव्य काय यासंबंधानें माझी ठाम खात्री झाली आहे. न अडखळता मी माझें तें कर्तव्य करीत राहीन. अतिशय प्रक्षोभजनक अशा काळीं भांडणाच्या ज्वाळा पेटविणे आणि भडकवणें हें सोपें असतें. त्या विझवणें फार कठीण असतें. आणि जो नेमस्तपणाचा सल्ला देतो त्याच्यावर कर्तव्यच्युतीचा आरोप येत असतो. ही लोकांची रीतच आहे."

तो आतां ७० वर्षांचा झाला होता, तरीहि आपण घेतलेल्या भूमिकेचे समर्थन करण्यासाठीं त्यानें व्याख्यानाचा दौरा काढला. एका भाषणांत तो म्हणतो "यादवी होण्याचा संभव अगदीं एक हजारांश असतां तरी तेवढाहि टाळण्यासाठीं मी जरूर तितका त्याग करण्यास तयार झालों असतों" शेवटीं जेव्हां क्ले, डग्लस

व वेब्स्टर यांच्या प्रयत्नास यश येऊन तडजोड मंजूर झाली तेव्हां वेब्स्टर उपरोधिकपणें म्हणाला. "आपणहि नेहमीं अमेरिकन संयुक्तराज्य अभंग रहावें याच मताचे होतों असें माझे अनेक सहकारी आतां म्हणत आहेत."

त्याच्या अनेक सहकाऱ्यांनीं असा गुप्त पाठिंबा त्याला दिला असे तो मानत होता, त्यामुळें आपल्याला राष्ट्रपतिपदाच्या उमेदवारीसाठीं हा पाठिंबा उपयोगी पडेल असें जें त्याला वाटत होतें त्याबाबत मात्र त्याची पूर्ण निराशा झाली. कारण त्याच्या त्या भाषणानें त्याचीं लोकप्रियता इतकी गेली होती कीं, मागाहून वाढूं लागलेली लोकप्रियता न्यूइंग्लंड व उत्तरप्रदेश यांतील सर्व मतदारांपर्यंत कधींच पोंहचली नाहीं. आपणाला राष्ट्रपतिपदाची उमेदवारी मिळावी अशी त्याची नेहमीं महत्त्वाकांक्षा होती, पण ती कधींच पूर्ण झाली नाहीं. ७ मार्चचें भाषण त्यानें जें केलें तें दक्षिण प्रदेशांतील मतदारांचा पाठिंबा अध्यक्षीय निवडणुकीसाठीं आपणांस मिळावा या हेतूनें केलें होतें अशी टीका वेब्स्टरच्या काळींहि झाली व नंतरच्या इतिहासकारांनींहि केली आहे. त्यांच्या कोणत्याहि प्रयत्नानें ही टीका पुसली जाऊं शकली नाहीं.

इमर्सननें वेब्स्टर हा ७ मार्चच्या भाषणाच्या बाबतींत स्वार्थबुद्धीनेंच वागला असें म्हटलें आहे. पण प्रोफेसर नेव्हिन्स म्हणतो; "मला हें खरें वाटत नाहीं. राष्ट्रपतिपदाची आकांक्षा बाळगणारा माणूस प्रथम आपल्या प्रदेशांतील माणसें आपल्या बाजूस ठेवण्याची काळजी घेईल. पण माउन्ट मॅन्सफील्डपासून मोनोमाय लाईटपर्यंत आपल्या भाषणाच्या धिःकारानें वातावरण दुमदुमून जाईल याची वेब्स्टरला खात्री होती." शिवाय आपला पक्ष दुभंगलेला असल्यानें पक्षांतील प्रत्येकजण वादांत एकांतिक भूमिका घेणाऱ्या वादग्रस्त व्यक्तीपासून केव्हांहि दूर राहील हें कळण्याइतकें शहाणपण वेब्स्टरला खास होतें. आजहि आपण असें पहातों कीं राजकीय पक्षांतील सदस्य हे वादांत एकांतिक भूमिका घेणाऱ्या व्यक्तीला दूर लोटून मोधम भूमिकेनें वागणाऱ्याला जवळ करतात. १८५२ ची व्हिग पक्षाची परिषद असेंच वागली. बोस्टनच्या व्हिग गटानें जेव्हां तडजोडीच्या मसुद्याचें श्रेय डॅनियल वेब्स्टर, हेनरी क्ले व इतर मुत्सद्दी यांना द्यावें असें म्हटलें, तेव्हां त्या तडजोडीच्या मसुद्याचें श्रेयहि वेब्स्टरला देण्यासाठीं कांहीं लोकांनी विरोध केला. सिनेटर कोल्व्हिन उपरोधिकपणानें म्हणाला: "मग बायबलांतल्या दहा आज्ञा मोझेसच्या संमतीनें मींच लिहिल्या असेच कां म्हणूं नये?"

१८५२च्या निवडणुकीसाठीं राष्ट्रपतिपदाची उमेदवारी वेब्स्टरला मिळूं शकली नाहीं म्हणून नाउमेद होऊन त्याच वर्षी वेब्स्टर मेला. ७ मार्चचें जें भाषण त्यानें केलें तें भाषण करताना आपल्या लोकप्रियतेंत यानें भर पडणार नाहीं हे तो जाणून होता. पण राष्ट्रपतिपद प्राप्त होण्याची महत्त्वाकांक्षा टिकविण्याकरितां जरूर ती लोकप्रियता हवी म्हणून अमेरिकेचें संयुक्त राज्य अखंड ठेवण्याची मनीषा सोडून द्यावयाला तो तयार नव्हता. मरेपर्यंत आपण आपल्या शीलाशीं सुसंगतच वागलों असा त्याला विश्वास होता. मृत्युशय्येभोवतीं असलेल्या पत्नी, मुलें, डॉक्टर या सर्वांस उद्देशून तो म्हणाला : "डॅनियल वेब्स्टरला न शोभेल असें मी वागलों नाहीं." अखेरपर्यंत तो अमेरिकन संयुक्त राज्याच्या निष्ठेस चिकटून राहिला. सिनेटमध्यें त्यानें जें शेवटचें भाषण केलें त्यांत तो म्हणतो :

"मी अखेरपर्यंत अमेरिकन संयुक्त राज्यासच चिकटून राहीन. मग व्यक्तिशः त्याचा परिणाम माझ्यावर कितीहि वाईट होवो. आजच्यासारख्या संकटकाळीं राष्ट्रावर जो बरावाईट प्रसंग येण्याचा संभव आहे त्या मानानें व्यक्तीस भोगावें लागणारें सुखदुःख क्षुल्लक आहे. वैयक्तिक सुखदुःखाची मला भीति नाहीं. या देशाच्या स्वातंत्र्यरक्षणासाठीं आणि राज्यघटनेच्या रक्षणासाठीं कितीहि यातना भोगाव्या लागल्या तरी त्या फार आहेत असें मी मानीत नाहीं."

प्रकरण : ४ —

# थॉमस् हार्ट बेन्टन

"अध्यक्ष महाराज..."

सिनेटचें सभागृह मोकळें होतें. १८५० मधील त्या दिवशीं तो काळयाभोर केसाचा आणि दणकट व दांडग्या शरीराचा सिनेटर बोलत होता. सभागृहांत थोडेच श्रोते होते. एक थोडासा भित्रा सिनेटर नुकताच बोलून गेला. त्यानें आपल्या भाषणांत या दांडग्या सिनेटराला भांडखोर म्हटलें होतें. हा दांडगा सिनेटर बोलूं लागला तेव्हां त्याच्या शिरा ताणलेल्या दिसूं लागल्या. त्याचे भव्य खांदे ताठ झाले. आपल्या निर्विकार मुद्रेनें आणि विषदिग्ध बाणासारख्या खर-खरीत आवाजानें तो "अध्यक्ष महाराज" असें बोलला, तेव्हां त्या भित्र्या सिने-टराच्या मनावर कांहीं तरी भीतीसारखा परिणाम झाल्याचें त्याच्या चर्चेवरून दिसून आलें. आपलें प्रचंड डोकें हलवून तो दांडगा सिनेटर म्हणाला "अध्यक्ष महाराज, मी कधींच भांडत नाहीं. पण केव्हां केव्हां प्रत्यक्ष लढतों आणि मी जेव्हां लढतों तेव्हां त्यानंतर एखादी प्रेतयात्रा मात्र निघते."

मिसूरीचा तो सिनेटर थॉमस हार्टबेन्टन बढाईनें बोलतो आहे असें कुणा-लाच वाटलें नाहीं. पूर्वीं एकदां त्यानें नऊ फुटांवरून एका जिल्हा वकिलाशीं द्वंद्वयुद्ध केलें होतें. त्यानंतर त्यानें कुणाला ठार मारलें नव्हतें हें खरें, पण थॉमस् हार्ट बेन्टन हा सिनेटमध्यें व सिनेटबाहेर अतिशय कठिण आणि दांडगा योद्धा होता ही गोष्ट सर्वांना माहित होती. आता तो पिस्तुलानें लढत नसे. त्याच्या वक्तृत्वांत विद्वत्ता असे, पण त्याचबरोबर उपरोध, संताप व शिवराळपणा याचीहि रेलचेल असे. त्याच्या राजकीय वाक्प्रहारांनीं त्याचे शत्रु रक्तबंबाळ व भग्न होऊन पळून जात, पण त्याला स्वतःला शत्रूच्या कसल्याच प्रहारांनीं कांहींहि इजा होत नसे. त्याची शरीरयष्टि मजबूत व दमदार असून त्याचा

अहंकारहि तसाच दांडगा होता. यामुळें तो मनानें जसा खंबीर होता तसेंच त्याचे कातडेंहि खूप जाड असे. कातडें जाड असण्याचें एक कारण म्हणजे, कातड्यासाठीं तो घोड्याचा ब्रश वापरी. रोमन घोडेस्वार असे ब्रश वापरीत म्हणून आपण तो ब्रश आपण वापरतों असें तो म्हणे. "खरोखरच तुमचा ब्रश खरखरीत आहे कां हो ?" असें विचारलें असता तो ओरडून सांगे, "कां हो, शंका कसली ? मी जर तुमच्या अंगाला त्या ब्रशानें स्पर्श केला तर तुम्ही 'खून...खून' म्हणून ओरडाल."

पण आतां सिनेटमध्यें त्याची तीस वर्षांची कारकीर्द संपत आली असून अखेरचा निकराचा लढा लढण्यांत तो गुंतला होता. यावेळीं मात्र तो विरोधकाची प्रेतयात्रा काढणार नसून, त्याचे विरोधक त्याचीच प्रेतयात्रा आतां काढणार होते. १८२१ पासून १८४४ पर्यंत मिसूरीच्या राजकारणांतला मुख्य म्हणून त्यानें सत्ता गाजविली. मिसुरीचा तो पहिला सिनेटर असून मिसूरीचा लाडका पुढारी होता. "सोन्याची वीट" असें नांव त्याला मिळालें होतें. पैशाकरितां तो धडपडत असे म्हणून त्याला हें नांव मिळालें. त्याच्या विरुद्ध कोणी चकार शब्दहि दुसऱ्याच्या कानांत कुजबुजला तरी त्या कुजबुजणाऱ्याचा राजकीय मृत्यु घडेल असें त्याच्या एका विरोधकानें म्हटलें आहे एवढा त्याचा दरारा होता. तो राजकारणांत तज्ज्ञ असा नव्हता. पण नेहमीं लोकांना न आवडणारी अशी बाजू तो समर्थनार्थ स्वीकारीत असे. हळू हळू तरुण राजकीय मुत्सद्यांशीं त्याचा संबंध सुटत चालला होता. पण या सर्व कालखंडांत त्याच्या नांवांत इतकी जादू भरलेली असे कीं, पुन्हा पुन्हा निवडून येण्यासंबंधानें त्याला विचारपूस करण्याचीहि गरज वाटत नसे. त्याला कुणाचें पाठबळ नको असे. काँग्रेसमधील वातावरणांत मिळणारी क्षुद्र मेहरबानी, काँग्रेसच्या भोंवतीं घोटाळणाऱ्यांची कृपा, या सर्वांचा तो तिरस्कार करी. यामुळें इतर राजकीय मुत्सद्दी त्याचा द्वेष करीत असत. पण मिसूरीच्या लोकांचा बेन्टन हा कायमचा आवडता होता. मिसूरीच्या कायदेमंडळांत निवडून येणाऱ्या डेमोक्रॅट पक्षाच्या सभासदांना बेन्टनला सिनेटसाठीं निवडून देण्याची शपथ घ्यावी लागे. अशी शपथ न घेणाऱ्याला पराभवाचा मानभंग पत्करावा लागण्याची भीति असे. बेन्टन हा एकाच राज्यांतून सतत तीस वर्षे निवडून आलेला व पहिलाच सिनेटर असल्यानें त्याला एवढें मोठेंपण प्राप्त झालें कीं, कोणत्याहि नव्या राज्यांतल्या सिनेटरला एवढें

मोठेपण कधीं मिळालें नाहीं. पश्चिम विभागाची वकिली त्यानें इतक्या दुर्दम सामर्थ्यानें केली कीं, तेवढें सामर्थ्य कोणीहि विरोधक दाखवूं शकले नाहीत. घोड्याचें एक्सप्रेस टपाल, टेलिग्रॅफ लाईन, दूरपर्यंत मोठ्या सडका इत्यादि फायदे त्यानें पश्चिम प्रदेशाला मिळवून दिले. अमेरिकेच्या पूर्व किनाऱ्यापासून पश्चिम किनाऱ्यापर्यंत जाणारी रेल्वे व लोकवसति आणि धनसाधनें यांनीं समृद्ध असा पश्चिम प्रदेश हें त्याचें आणखी सुखस्वप्न होतें. सिनेटचा पिता आणि लोकांचा नेता, अशा या बेन्टनचा पराभव कोण करूं शकेल, असें लोक म्हणत. तो स्वतः गर्वानें गर्जून म्हणे : "बेन्टनला कुणीहि विरोध करीत नाहीं. फार तर एखादा लव्हाळ्यासारखा पोंचट वकील विरोध करील. बेन्टन आणि लोकशाही हे सारख्या अर्थाचे शब्द आहेत."

पण १८४४ सालीं नशीबानें त्याचा पराभव त्याच्या ललाटावर लिहून ठेवला होता. मिसूरी हें गुलामगिरीचा पुरस्कार करणारें राष्ट्र होतें. दक्षिणेंतील इतर गुलामगिरीवादी राष्ट्रांशीं आपली एकजूट असली पाहिजे असें मिसूरीच्या लोकांना हळू हळू वाटूं लागलें. बेन्टनला आपल्या डेमोक्रॅटिक पक्षाबद्दल अथवा प्रदेशाबद्दल फारशी निष्ठा नसून संघराज्याबद्दल त्याची निष्ठा दृढ होती. संघराज्याच्या वतीनें तो रणांगणांत व कांग्रेसमध्येंहि लढला होता. त्याचा मतस्वातंत्र्याभिमान दणकट होता. आपल्या मतासाठीं काँग्रेसमध्यें व काँग्रेसबाहेर लढणें हें त्याचें ब्रीद होतें. अशा बेन्टनबद्दल मिसूरीच्या लोकांचा विश्वास कमी होऊन संशय वाढूं लागला.

१८४४ सालीं बेन्टनला मिसूरीच्या कायदेमंडळानें सिनेटसाठीं पुन्हा निवडून देण्याचा प्रसंग आला तेव्हां मतप्रचार मोहीम सुरू झाली. पण टेक्झस अमेरिकन राज्यास जोडून घेण्याच्या तहाचा ठराव हाणून पाडण्याच्या कारवाईंत भाग घेऊन बेन्टननें आपला प्रदेश व पक्ष यांविरुद्ध वर्तन केलें. टेक्झस जोडून घेण्याचा हा तह कल्हाऊननें योजला असून मेक्सिकन लोकांचे हक्क व त्यांनीं केलेला प्रतिकार यांचा विचार न करता गुलामगिरीवादी राज्यांची संख्या वाढावी आणि अमेरिकन संघराज्यांतून फुटून निघणाऱ्यांचा गट मोठा व्हावा हा दुष्ट हेतु टेक्झस जोडून घेण्यांत कल्हाऊनचा आहे असें बेन्टन म्हणाला. वास्तविक बेन्टन हा पश्चिमेकडे अमेरिकेचा प्रदेश वाढावा, अमेरिकेची सत्ता सर्व खंडभर वाढणें ही अमेरिकेची भाग्यरेखाच आहे असें मानीत होता. पण टेक्झस जोडून घेण्याच्या

धोरणास विरोध करून बेन्टन हा स्वतःच्या अमेरिकन विस्ताराच्या धोरणाशींच विसंगत वागत होता. यामुळें आपल्याविरुद्ध हल्ला करण्याला त्याच्या राजकीय विरोधकांना त्यानें खाशी संधि दिली. मिसूरींत टेक्झसतह लोकांना पसंत होता. पण आपण टेक्झसतहास विरोध करीत आहोंत ही गोष्ट आपल्या मतदारांना पसंत नसल्याचें आपणास माहित नाहीं असें बेन्टन म्हणे. बेन्टन सांगतो :

"लोकांना माझी भूमिका पसंत नसती व ही गोष्ट मला माहित असती तर मीं माझ्या जागेचा राजिनामा दिला असता. कारण लोकांची अमुक एक इच्छा आहे असें कळल्यानंतर मी लोकांच्या इच्छेविरुद्ध मत देणार नाहीं आणि माझें मत जर लोकांच्या इच्छेसारखें नसलें तर माझ्या मताविरुद्ध लोकांच्या बाजूनें मत देऊन माझ्या घटनात्मक व नैतिक कर्तव्याचा द्रोह मी करणार नाहीं."

पण टेक्झसतहास विरोध केल्यामुळें स्वपक्षाचा व स्वप्रदेशाचा विद्रोही असा शिक्का लोकांनीं त्याच्यावर मारला. यामुळें मिसुरी कायदेमंडळांतील प्रमुख सभासदांचा पाठिंबा त्यानें गमावला व मग सर्व प्रकारचे वैय्यक्तिक हल्ले त्याजवर होऊं लागले. मिसूरीच्या 'रजिस्टर' नें लिहिलें : "बेन्टन हा नुसता बोलघेवडा असून अंतःकरणांतून तो हुकुमशहा आहे. साऱ्या ख्रिस्ती प्रदेशांत हा जास्तींत जास्त गर्विष्ठ माणूस आहे. तो कुठेंहि जावो, कांहींहि करो उद्धट आणि सारासारविचारशून्य असा बोलघेवडा एवढाच त्याचा गुण व्यक्त होतो."

पण खुद्द निवडणुकीच्या दिवशींहि बेन्टननें आपल्या पक्षाच्या टेक्ससविषयक धोरणाचा धिःकार करण्याबाबत भीति बाळगली नाहीं. सिनेटच्या वाक्पीठावरून "कल्हाऊनने माझ्या विरुद्ध रान उठविलें आहे," असा त्यानें उघड आरोप केला. "टायलर आणखी इतर कांहीं साथीदार व मिसूरी राज्याचे पैसे खाणारीं ३०० वृत्तपत्रें यांची कल्हाऊनला साथ आहे. या वृत्तपत्रांपैकीं पुष्कळशीं पत्रें हा पैसा उघडपणें खात नाहींत इतकेंच." तरी पण सामान्य जनतेंत त्याची लोकप्रियता फार मोठी असल्यामुळें तो निवडून आला. त्याच्या पक्षाचें कायदेमंडळांत २७ इतकें मताधिक्य होतें. बेन्टनला मात्र फक्त ८ मतें अधिक मिळालीं. त्याच वेळीं गुलामगिरीवादी अशा ॲटचिसन् या डेमोक्रॅटिक उमेदवारालाहि सिनेटमधील दुसऱ्या एका अजून रिकाम्या व्हावयाच्या जागेसाठीं कायदेमंडळानें ३४ अधिक मतें देऊन निवडून आणलें. त्याला निवडून देणाऱ्या कायदेमंडळाचा यांत बेन्टनला एक अलिखित संदेश होता: "तुझ्या स्वातंत्र्यवादी जिभेला जरा लगाम

घाल आणि दक्षिण प्रदेशाच्या बाजूस उभा रहा. असे न करशील तर परिणाम् वाईट होणें अपरिहार्य" असा इषारा ॲटचिसनूला निवडून मिसूरी कायदेमंडळानें बेन्टनला दिला होता.

पण तरुणपणांत टेनेसीच्या आघाडीवर लढलेल्या बेन्टनला युद्ध—मग तें पशूशीं, राजकीय पुढाऱ्याशीं अथवा शेजाऱ्याशीं असो—टाळायचें ठाऊकच नव्हतें तो पूर्वी अँड्र्यू जॅक्सनशींहि लढला होता व त्यामुळेंच टेनेसींतील वकिली आणि राजकीय पुढारीपण सोडून त्याला मिसूरीला यावें लागलें होतें. पुढें वॉशिंग्टनला आल्यावर बेन्टन आणि जॅक्सन हे दोस्त झाले तेव्हां ते आपल्या पूर्वचरित्रांतील भांडणांबद्दल चर्चा करीत. पुढें पुष्कळ वर्षांनीं, "आपली अँड्र्यू जॅक्सनशीं ओळख आहे का," असें एका नवख्या माणसानें बेन्टनला विचारलें असता बेन्टन म्हणाला, "होय तर ! जनरल जॅक्सन हा फार थोर माणूस होता. एकदां मी त्याला गोळी घातली होती. पण पुढें जेव्हां युनायटेड स्टेट्स् बँकेशीं लढण्याचा प्रसंग आला तेव्हां जॅक्सननें मला फार मदत केली. 'बेन्टनला कोणी रानरेडा म्हणत. कुणी म्हणत 'ओक लाकडांतली तो गांठ' आहे. असा हा बेन्टन या वेळीं सिनेटमध्यें आला तो, रोजच्या रोज अखिल राष्ट्राच्या बाजूनें आपण लढण्यावर आपल्या राष्ट्राचें हित अवलंबून आहे अशी भावना बाळगूनच आला.

वर म्हटल्याप्रमाणें अवघीं आठ अधिक मतें पडून तो निवडून आला. यावरून त्याच्या पक्षानें जवळजवळ त्याचा पराभवच केला होता ही गोष्ट उघड होती. तरी पण ओरेगॉनच्या प्रश्नावर बेन्टननें पुन्हा आपल्या पक्षास व प्रदेशास विरोध केलाच. वास्तविक अमेरिकनांनीं नवेनवे प्रदेश काबीज करावे याबद्दल मिशूरीच्या लोकांत त्यानेंच उत्साह निर्माण केला होता. त्यामुळेंच मिसूरीचे लोक ओरेगॉनमध्यें रहाण्यास गेले होते. पण आतां "सारें ओरेगॉन अमेरिकेंत आलें पाहिजे," ही डेमोक्रॅटांची घोषणा अतिशय अवास्तव आहे असें त्यानें म्हटलें, तेव्हा बेन्टन हा स्वजनद्रोही व भेकड आहे असा आरोप त्याजवर करण्यांत आला. "कोणाहि माणसाची एवढी अकारण बदनामी झाली नसेल इतकी बेन्टनची झाली," असें बेन्टनच्या चरित्रकारानें लिहून ठेवलें आहे.

पण बेन्टननें आपला स्वतंत्र व जास्तजास्त एकाकी होत चाललेला मार्ग सोडला नाहीं. तो व्हिग पक्षाकडेहि गेला नाहीं. तो म्हणे, "व्हिग पक्ष माझें

महत्त्व काय जाणणार ? वर्षांतून बारा वेळां विणाऱ्या ससाच्या मादीला हत्तिणीचा गर्भ दोन वर्षें पोटांत रहातो कसा, हें कसें कळेल ?" कायदेमंडळाच्या लॉबींत घुटमळणाऱ्या खटपटचा लोकांकडून त्यानें पैशाची मदत घेण्याचें नाकारलें. एका जहाजाला सरकारची आर्थिक मदत मिळावी म्हणून वेन्टनचा पाठिंबा मिळविण्यासाठीं कांहीं खटपटचांनीं त्याला पैसे देऊ केले, तेव्हां तो म्हणाला: "हें पहा, हीं जहाजें बांधलीं गेलीं म्हणजे तुमच्यासारख्या हलकटांना हद्दपार करण्यासाठींच त्यांचा उपयोग केला जाईल." उलट मिसूरीच्या राजकीय पुढाऱ्यांशींहि त्यानें समेट करण्याचें नाकारलें.

फक्त घरांत असला म्हणजे मात्र बेन्टन स्नेहभावपूर्ण असे. जेसी बेन्टन फ्रिमॉन्ट ही त्याची मुलगी आपल्या स्मरणवहींत लिहिते. "घरांत असला म्हणजे बेन्टन शांत असे व विश्रांति घेई. बाहेरचें कलहाचें वातावरण तो घरांत येऊं देत नसे." पण संसारांत तो दुःखीच होता. त्याच्या पूर्ववयांत त्याचे दोन मुलगे मेले. त्याची बायको दीर्घकाळ शरीरानें व मेंदूनें आजारी असे. बेन्टनचें तिच्यावर अतिशय प्रेम होतें. एक दिवस बेन्टन हा एक फ्रेंच राजपुत्र व इतर पाहुणे यांचें स्वागत करीत असता, वेन्टनची बायको धडपडत तेथें आली. तिनें पेहेरावहि नीट केलेला नव्हता. ती नवऱ्याकडे मोठ्या कौतुकानें टक लावून पाहूं लागली. सर्व पाहुणे हा काय प्रकार आहे म्हणून चकित होऊन स्तब्ध झाले. पण सिनेटर बेन्टननें न डगमगता मोठ्या उमदेपणानें आपल्या पत्नीचा पाहुण्यांना परिचय करून दिला, तिला आपल्या शेजारीं बसवून घेतलें आणि पाहुण्यांशीं पुढें बोलणें चालूं केलें.

सिनेटमध्यें तो अगदीं एकाकी असे, तरी पण कठोरपणें व निर्दयपणें वागे. पुस्तकें व कागद यांचा ढिगारा त्याच्या टेबलावर पडलेला असे. सभागृहांत प्रेक्षक पुष्कळदां नसत आणि सिनेटचे सदस्य लक्ष देत नसत. तरीहि आकड्यांनीं व शेकडों कोष्टकांनीं भरलेलें भाषण तो करीत असे. ललित वाङ्मयांतील उदाहरणें तो सांगे, इतर सहकाऱ्यांवर मार्मिक व चमकदार अशा अलंकारिक कोट्या करी. या प्रकारच्या वक्तृत्वांत तो दर्दी होता. त्याच्या विचारांतहि नावीन्य असे. तो मेल्यानंतर त्याच्या विषयीं आलेल्या एका मृत्युलेखांत पुढीलप्रमाणें त्याचें वर्णन केलें होतें : "रोमन कायदा, ग्रीक तत्त्वज्ञान, व्हर्जिलचा जॉर्जिक्स ग्रंथ, अरेबियन नाईट्स्, हिरोडोटस अथवा सँकोपान्झा यांचे ग्रंथ, सेक्रेड कार्पेट्स्

अथवा जर्मनसुधारक अथवा ॲडॅम स्मिथ यांच्या ग्रंथांतील विधानें, फेनेलॉन अथवा हुडिब्रस यांचीं लिखाणें, नेक्लाचे आर्थिक अहवाल अथवा ट्रेंटच्या कौन्सिलचे रिपोर्ट, राज्यघटनेवरच्या वादांतील उतारे, मंत्रिमंडळाच्या अंतर्वर्तुळांतील कारस्थानें अथवा काँग्रेसच्या एखाद्या मरून गेलेल्या सभासदाच्या विसरलेल्या भाषणांतील उतारे इत्यादि सर्व साहित्य बेन्टन आपल्या भाषणांत इतक्या चतुराईनें व तत्परतेनें वापरी कीं त्याची विद्वत्ता पाहून श्रोत्यांना आश्चर्य वाटे."

बेन्टन उत्तर कॅरोलिनाच्या विद्यापीठांत जेमतेम एक वर्ष होता. तरीपण त्यानें विद्वत्ता एवढी मिळविली होती कीं, काँग्रेसचें सारें ग्रंथालय त्याच्या डोक्यांत आहे कीं काय असें ऐकणाऱ्यास वाटे. एखादा सिनेटर आपल्या भाषणांत एखादें नांव अथवा तारीख विसरला तर बेन्टन चटदिशीं ग्रंथालयांतून एखादें अप्रसिद्ध पुस्तक आणी आणि नेमक्या कोणत्या पानावर ती सर्व माहिती बिनचूक आहे याची खूण करून तें पुस्तक त्या सदस्याकडे पाठवीत असे. असें करतांना त्याला मोठा अभिमान वाटे. पश्चिम प्रदेशांत जेथें वसाहत व्हावयाची होती त्या प्रदेशाविषयींच्या ज्ञानाबाबत त्याची जिज्ञासा कधींहि तृप्त झाली नाहीं. त्याकरितां तो पुस्तकें वाचीत असेच, पण त्याचा एक समकालीन लेखक सांगतो त्याप्रमाणें जंगलांतले शिकारी व सापळे घालणारे लोक, जंगलांतले पहारेकरी, जंगली लोक, तांबड्या इंडियन टोळयांचे प्रमुख, ख्रिस्ती मिशनरी इत्यादि सर्वांना भेटून त्यांच्याकडून तो माहिती घेत असे.

पण ही सारी विद्वत्ता, दांडगी चिकाटी आणि भयंकर अहंकार यापैकीं कशानेंहि, यावेळीं जी प्रचंड लाट बेन्टनविरुद्ध उसळली व तिनें सिनेट आणि बेन्टनचें प्रदेश-राज्य याला घेरलें त्या लाटेपासून बेन्टनचा बचाव होऊं शकला नाहीं. गुलामगिरीवादाच्या सरशीची ही लाट होती. शेवटीं गुलामगिरी हा महत्त्वाचा वादविषय नव्हे हें बेन्टननें मान्य केलें. "१८२० सालीं मिसूरीबाबत जी तडजोड झाली आणि जीमुळें मिसूरी अमेरिकन संघराज्यांत सामील होऊन बेन्टन पहिला सिनेटर म्हणून निवडून आला तीमुळें गुलामगिरी ही तेव्हांपासूनच राजकीय वादांतून बाहेर गेली आहे, म्हणून सिनेटच्या वाक्पीठावर मी त्याची चर्चा करणार नाहीं. गुलामगिरी आणि देशाच्या फाळणीची कल्पना या संबंधानें चर्चा करून मी सिनेट विटाळणार नाहीं. हा वाद थांबवा एवढीच माझी प्रार्थना आहे. तुम्ही थांबवत नसाल तर मी माझें तोंड बंद करतों."

अशा रीतीनें गुलामगिरीविरोधाला शेवटीं बगल देण्याचा त्यानें प्रयत्न केला तरी पण, लोकमत त्याच्याविरुद्ध फार विथरून जाऊन तें आवरलें जाण्याच्या फार पलीकडे गेलें होतें. बेन्टन स्वत: वॉशिंग्टनला येताना आपल्या बरोबर आपले गुलाम आणत असे. पण गुलामगिरीची पद्धत दक्षिणी राज्यांनीं इतर प्रदेशांत पसरवावी याला त्याचा विरोध होता. 'देशाची फाळणी झाली तरी चालेल पण गुलामगिरी गेली पाहिजे,' उलट 'देशाची फाळणी झाली तरी चालेल पण गुलामगिरीचा प्रसार झाला पाहिजे' ह्या दोन्ही टोकाच्या प्रादेशिक राजकारणास त्याचा विरोध होता. गुलामांच्या दु:खाची जाहिरातबाजी करून उत्तरीयांनीं पक्षीय राजकारणाचा फायदा करून घ्यावा याचाहि तो निषेध करी. या दोन्ही बाजूंचे लोक आपआपलें राजकारण पुढें दामटता यावें म्हणून पश्चिम प्रदेशांत वसाहती वाढविण्यास आणि अमेरिकन संघराज्यांत नवीन घटक राज्यें घेण्यास विरोध करीत याचीहि बेन्टनला चीड येई.

टेक्सस आणि ओरेगॉन या दोन्ही प्रश्नांवर बेन्टनला जो निकराचा विरोध झाला त्यावरून त्याचा पाडाव सुरू झाला हें दिसून आलें. १९ फेब्रुवारी १८४७ रोजीं त्याच्या राजकीय अंताची घटका भरली. त्या दिवशीं जॉन सी. कल्हाऊन यानें अतिशय चिंताग्रस्त अशा सिनेटसमोर आपले प्रसिद्ध ठराव वाचले. अमेरिकन संघराज्याच्या प्रदेशांत गुलामगिरीचा प्रसार व्हावा कीं नाहीं याबाबत हस्तक्षेप करण्याचा अधिकार अमेरिकन कॉंग्रेसला नाहीं असें त्या ठरावांत म्हटलें होतें. बेन्टनच्या मतें कल्हाऊन आपल्या राष्ट्रपतिपदाच्या उमेदवारीसाठीं आणि अमेरिकेची फाळणी करण्याच्या उद्योगासाठीं या ठरावरूपानें दारूगोळा जमवीत होता. या ठरावानें कल्हाऊन हा गुलामगिरीवादी राष्ट्रांच्या एकजुटीसाठीं व गुलामगिरीच्या प्रसारासाठीं त्या राज्यांना कार्यक्रम देऊं पहात होता. सिनेटनें त्या ठरावावर ताबडतोब मतप्रदर्शन करावें अशी कल्हाऊननें मागणी केली. त्याबरोबर सभेंत गोंधळ उडाला. अशा वेळीं बेन्टन उभा राहिला हें पाहून कल्हाऊन आश्चर्यचकित झाला. बेन्टननें कल्हाऊनकडे एकदां तिरस्कारानें पाहिलें, त्या ठरावांचा धि:कार केला आणि आपल्या राजकीय भवितव्याबद्दल बेदरकार होऊन तो बोलूं लागला.

मि. बेन्टन—अध्यक्ष महाराज, आपणाला येथें कांहीं महत्त्वाचें कामकाज करावयाचें आहे. एखाद्या लांबट, तात्त्विक सिद्धान्तासाठीं कामकाज टाळावें असें मला वाटत नाहीं.

मि. कल्हाऊन—मि. वेन्टन हे मिसूरीतर्फे निवडून आलेले सिनेटर आहेत. गुलामगिरीचा पुरस्कार करणाऱ्या मिसूरीचे ते प्रतिनिधि आहेत. त्यांनीं या ठरावांना पाठिंबा द्यावा अशी माझी खास अपेक्षा आहे.

मि. वेन्टन—सिनेटर कल्हाऊन यांना माझ्या सर्व सार्वजनिक जीवनावरून ही गोष्ट माहित आहे कीं जगाला आग लावण्यासाठीं दारूगोळा रचण्याकरितां मी कांहीं सार्वजनिक कामकाज सोडणार नाहीं.

मि. कल्हाऊन—तर मग हे सदस्य यापुढें कोठें असावेंत हें मी कळून घेईन.

मि. बेन्टन—ठीक, ठीक. मी योग्य जागींच असलेला दिसून येईल. माझा देश व त्याचें संघराज्य यांच्याच बाजूला मी केव्हांहि असेन. (बेन्टननें पुढील आयुष्यांत लिहिलें आहे कीं मी त्यावेळीं "सिनेटमध्यें जेथल्या तेथें जें हें उत्तर दिलें ते भावी पिढ्यांनीं माझ्या संबंधानें स्मरणांत ठेवावें असें मला वाटतें.")

पुढें कल्हाऊननें गुलामगिरीवादी राज्यांतल्या कॉंग्रेसमनांच्या गुप्त बैठका रात्रींच्या वेळीं भरविण्यास सुरुवात केली. बेन्टनचा सहकारी व मिसूरीचा दुसरा प्रतिनिधि अॅटचिसन् याचा या बैठकींना पाठिंबा असे. पण बेन्टननें त्या बैठकांशीं पूर्ण असहकार पुकारला. साऊथ कॅरोलिनांतील कल्हाऊनच्या सहकाऱ्यांनीं बेन्टनला द्वंद्वयुद्धाचें आव्हान दिलें. पण 'तुमच्याशीं मला कांहीं कर्तव्य नाहीं' असें त्यानें त्यांना कळविलें. 'जॉन क्विन्सी अॅडॅम्स या गुलामगिरीच्या कट्टया विरोधकाच्या प्रशंसापर भाषण करूं नका' असा इषारा त्याला त्याच्या पक्षानें दिला असतां त्याकडे लक्ष देण्याचें त्यानें नाकारलें. शेवटीं १८४८ सालीं डेमोक्रॅटिक पक्षाच्या परिषदेंत गुलामगिरीच्या मुद्यावर जेव्हां दुफळी माजली तेव्हां त्या दुफळीबद्दल बेन्टननें खेद व्यक्त केला, गुलामगिरीच्या प्रश्नास महत्त्व देण्याचें नाकारलें आणि कोणत्याहि बाजूस आपण पाठिंबा देणार नाहीं असें सांगितलें. त्याला आतां पक्ष उरला नाहीं. भाषण करण्याला व्यासपीठ उरलें नाहीं. आणि सिनेटर निवडून येण्याला एकहि मतदारसंघ राहिला नाहीं.

१८४९ च्या आरंभीं बेन्टनच्या राजकीय जीवनाभोंवतींचा फांस आवळला गेला. कल्हाऊनचे ठराव दक्षिण राज्यांच्या अनेक कायदेमंडळानें मंजूर केले. तेव्हां कल्हाऊननें "बेन्टन हा गेल्या दहा वर्षांत दक्षिण प्रदेशाशीं द्रोहानें वागला आहे, तो आमच्या बाजूस असण्यापेक्षां विरोधकांच्या बाजूस जाण्यानें आम्हांला कमी इजा करील, सर्व देशद्रोह्यांना मिळतें तें बक्षिस त्याला मिळालें पाहिजे" या

शब्दांत बेन्टनचा धि:कार केला. मिसूरीच्या कायदेमंडळानें कल्हाऊनचे ठराव प्रचंड बहुमतानें पास केले. आणि इतर गुलामगिरीवादी राज्यांशीं सहकार्य करण्याची मनीषा व्यक्त करून आपल्या सिनेटरांनीं तसेंच मतदान करावें असा आदेश मिसूरीच्या सिनेटरांना दिला. या पिछेहाटीनें बेन्टन चिडला. हे ठराव वॉशिंग्टनमध्यें शिजले असून मिसूरीच्या जनतेचा त्यांना पाठिंबा नाहीं असें मत त्यानें व्यक्त केलें. या ठरावांत संघराज्याशीं करण्यांत आलेला राजद्रोह प्रच्छन्नपणें दिसतो आहे असें तो म्हणाला. या वेळेच्या परिस्थितीसंबंधानें बेन्टन म्हणतो:

"ते आणि मी यांचे दरम्यान यापुढें कायम एक उंच भिंत आणि खोल दरी उभी राहील. त्यांच्यांत व माझ्यांत यापुढें वैचारिक देवघेव, तडजोड व संघटना हे सर्व बंद. आम्हां सिनेटरांना जो मिसूरीच्या कायदेमंडळानें आदेश दिला आहे त्याविरुद्ध मी मिसूरीच्या जनतेकडे अपील करतों. त्यांनाहि जर हाच आदेश मान्य असेल तर त्यांची इच्छा अमलांत आणण्यासाठीं योग्य असा सिनेटर निवडण्याची मी त्यांना संधि देईन. ज्यामुळें संघराज्य मोडेल अथवा ज्यामुळें संघराज्याचा अर्धा भाग दुसऱ्या अर्ध्या भागाविरुद्ध लढायला उभा राहील असें मी स्वत: कांहींहि करणार नाहीं."

कायदेमंडळानें मंजूर केलेले वरील ठराव परत घ्यावे अथवा जनतेनें ते धुडकावून लावावे यासाठीं बेन्टननें आपल्या विरुद्ध असणाऱ्या मिसुरी राज्य-प्रदेशांत चढाईच्या स्वरूपाची वैचारिक मोहीम सुरू केली. दक्षिणेच्या बाजूनें बोलणारा कल्हाऊन याचा त्यानें जाहीरपणें धि:कार सुरू ठेवला. १८५० सालीं कल्हाऊन दीर्घकालीन दुखण्यानें वारला. त्याच्या मृत्यूपूर्वीं बेन्टन एका भाषणांत म्हणाला, "आतां ईश्वर त्याच्यावर धाव घालतो आहे तेव्हां मी माझा हात आवरतों." एकामागून एक शहरांत तो भाषणें करी. आपल्या भाषणांत उप-रोधिक व वीज कडकडावी असे प्रहारी युक्तिवाद तो करीत असे. संताप, विद्वेष व उपहास यांचाहि वर्षाव तो करी. तो भाषणांत चढाईखोर, निर्दय व कठोर होता. वैय्यक्तिक सूडभावना आणि एकांतिक वैरभावना यामुळें त्यानें सलोख्यानें मिळविता आले असते असे किती तरी मित्र गमावले. प्रचंड गर्दी जमलेल्या सभेंत तो म्हणे: "मित्रहो,—पण ऐकण्यासाठीं व सत्यावर विश्वास ठेवण्यासाठीं जे येथें आले आहेत त्यांनाच मी मित्र मानतों, इतरांना मानीत नाहीं हें ध्यानांत ठेवा,—कायदेमंडळानें मंजूर केलेले हे ठराव खोटे आहेत, आगलावे

आहेत; त्यांचा हेतु संघराज्याचे तुकडे करणें हा आहे. त्या ठरावांनीं सुचविलेले मार्ग हे देशद्रोहाचे असून बेकायदेशीरपणें सत्ता संपादन करणें हें त्यांचे उद्दिष्ट आहे...या ठरावांची सबंध कल्पना व ते मंजूर करण्यासाठीं योजलेले डावपेंच हें एक मोठें कपटजाल आहे....त्याचा हेतु मला सिनेटमधून काढून टाकणें आणि संघराज्य मोडूं पहाणाऱ्यांच्या वाटेंतला माझ्या कांटा काढणें हा आहे."

जज्ज नॅप्टन हा बेन्टनचा आयुष्यभरचा वैरी असून त्यानें ते ठराव लिहून काढले अशी बातमी होती. नॅप्टनवर कडाडून हल्ला करतांना बेन्टन एका भाषणांत म्हणाला: या ठरावांतील योजना अमलांत आणणाऱ्यांना अमेरिकन संघराज्याच्या कायद्यानुसार फांशीं द्यावें लागेल. आणि असा माणूस जर जज्ज असेल तर तो फांशीं जाण्याला विशेष पात्र ठरतो."

एके दिवशीं सभेमध्यें मिसूरी कायदेमंडळांतील समासदांचीं नांवें घेऊन तो टीका करीत होता. नांवें वाचता वाचता तो 'डी' ह्या अक्षराशीं आला. "येथें एका संघराज्यविध्वंसकाचा वास येत आहे" असें तो म्हणाला. तेव्हां मिसूरी कायदेमंडळांतील डेव्हिस नांवाचा एक सभासद उभा राहून बेन्टनचा निषेध करूं लागला. त्यावर बेन्टन तुच्छतेनें म्हणाला, "महाराज मी आपलें नांव उच्चारलें नाहीं. आपला मुखडा जरा सभेकडे वळवा....(डेव्हिसनें बावळटाप्रमाणें खरोखरच सभेकडे तोंड वळवलें)...नागरिकहो, हा माणसाचा मुखडा नसून कुत्र्याचा आहे असें समजा." आणखी एका सभेंत बेन्टनचा एक जुना मित्र टोपी काढण्याचे विसरून बेन्टनच्या भाषणांतच त्याला प्रश्न विचारूं लागला. बेन्टन संतापानें विचारतो, "कोण हा नागरिक ? मला बोलताना अडवितो म्हणजे काय ?" "कर्नल आयकॉक" असें दहाबारा जणांनीं मोठ्यानें ओरडून उत्तर दिलें. बेन्टन म्हणाला, "कोण म्हणतां, आयकॉक ? नव्हे, मित्रहो नव्हे, हा कॉक (कोंबडा) नव्हे. तो हेन (कोंबडी) आहे. टोपी काढा साहेब आणि मुकाट्यानें आपल्या जागेवर बसा."

दुसऱ्या एका शहरांत भाषण करताना त्यानें मिसुरी कायदेमंडळाचे ठराव हे कॅन्सर आहेत असें म्हटलें. त्या सभेंत त्याचे तीन विरोधक त्याचें भाषण मुकाट्यानें ऐकत बसले होते. त्यांना उद्देशून बेन्टन म्हणाला, "ते पहा, ख्रिस्ती धर्मानुसार लहान मुलाचें नांव ठेवण्याचा समारंभ चालू असतांना तेथें असलेल्या वेश्या जशा असंतुष्टपणें आपल्याशींच चुळबुळत बसतात तसे हे तिघे बसले

आहेत." एका नामवंत विरोधकानें वेन्टनवर केलेली टीका त्याच्या नजरेस आणण्यांत आली असताना बेन्टन म्हणाला, "बेंबीच्या देठापासून जिभेच्या मुळापर्यंत तो सारें खोटेंच बोलत आहे, असें माझें मत त्याला कळवा." एका सभेंत वेन्टनच्या मताबद्दल नापसंती दर्शविणाऱ्या मित्रानें केलेल्या स्वागताची उपेक्षा करून वेन्टन पुढें चालला असता त्या मित्रानें पुन्हा मान लववून वेन्टनला आपली आठवण दिली. तेव्हां बेन्टन म्हणाला, "या नांवाचा एक मनुष्य मला माहित होता. पण महाराज, आतां तो मेला—अगदीं ठार मेला आहे." फायेटी या शहरांत पाऊल टाकाल तर तुमचा मुडदा पडेल अशी धमकी बेन्टनला देण्यांत आली असता तो त्या शहरांत आला व आपल्या सभेंत व्यासपीठावर उभा राहून बोलूं लागला. त्याबरोबर कांहीं शस्त्रधारी लोकांनीं गोंगाट सुरू केला. 'इन्क्वायरर्' या पत्रांत त्या सभेसंबंधी पुढील बातमी प्रसिद्ध झाली. "बेन्टनचा अपमान करण्यासाठीं गोंगाट जे करीत होते ते १५ मिनिटांत वरमले. आणि पुढें चार तास पर्यंत सर्वांनीं वेन्टनचा मान राखून व मधूनमधून टाळयांचा गजर करून त्याचें भाषण ऐकलें."

पण त्यावेळीं गुलामगिरीच्या बाजूनें उसळलेली लाट एवढी मोठी होती कीं, एकट्या माणसाला अथवा एकटचा राज्यालाहि ती आवरता येणार नव्हती. विजयाच्या खात्रीनें आनंदून जाऊन उन्हाळयाच्या शेवटीं लिहिलेल्या एका पत्रांत कल्हाऊन आपल्या मित्राला लिहितो : "मिसूरींत वेन्टन आतां उभा राहूं शकणार नाहीं. त्याचा सहकारी ज. अॅटचिसन् म्हणतो कीं, वेन्टन सिनेटर म्हणून निवडून येणें हें तो पोप म्हणून निवडून येण्याइतकेंच शक्य आहे."

उलट बेन्टनचा एक मित्र लिहितो "वेन्टन इतका शिवराळपणा करतो याचें मला वाईट वाटतें. पण त्याचे विरोधकहि शिवराळपणांत मुळींच कमी नाहींत. डेमोक्रॅटिक वृत्तपत्रांपैकीं नऊ वृत्तपत्रें वेन्टनला देशद्रोही, तत्त्वद्रोही, गुंड, अग्यावेताळ इत्यादि शिव्यांनीं निंदीत आहेत.—बेन्टनचा पराभव होणार अशी भीति निश्चित आहे."

तरी पण बाह्यातकारी आत्मविश्वास प्रकट करून वेन्टननें आपल्या दौऱ्याच्या शेवटीं मिसूरीच्या जनतेला उद्देशून एक पत्र लिहिलें त्यांत बेन्टन म्हणतो :

"माझ्या विरुद्ध रचल्या गेलेल्या या कटाला कांहीं कारण असेल तर मी सडक्या मेंदूच्या मुत्सद्यांचा अगदीं स्वाभाविक वैरी आहे हेंच होय. आज संघ-

राज्य जसें आहे तसें मला हवें आहे त्यासाठीं कल्हाऊननें माझा दक्षिणविद्रोही म्हणून निषेध केला असून मिसूरींतील आपल्या अनुयायांना माझ्यावर हल्ला करण्यास चिथावलें आहे. हा कट आतां सिद्ध झाला आहे. संघराज्य मोडून टाकण्याचे हे ठराव कपटानें मंजूर केले आहेत. मी हे पाळणार नाहीं ही गोष्ट सर्वांना माहित होती. सर्व मिसूरी राज्यभर माझ्यावर हल्ला करण्यासाठीं लोक ठेवलेले होते. माझ्या निषेधाकरितां सभा भरविण्यांत आल्या त्यासाठीं वृत्तपत्रें कामीं लावण्यांत आलीं, अनेक सज्जनांची फसवणूक करण्यांत आली."

पण वेन्टनच्या या धिःकारांनीं त्याचे विरोधक शरमले नाहींत. १८४९ च्या डिसेंबरांत त्यांनीं एक पत्रक प्रसिद्ध केलें. त्यांत "बेन्टन हा अविचारी, अप्रामाणिक सूक्तासूक्त विचार न करणारा, जाणूनबुजून खोटें बोलणारा असा असून आपल्या स्वार्थी हेतूंसाठीं हा पक्षद्रोह करीत आहे असें लिहिलें होतें" पुढें कॉंग्रेसचें अधिवेशन भरलें असता कल्हाऊननें डेमोक्रॅटिक पक्षाच्या मध्यवर्ती समितीस सांगून वेन्टनचें नांव सर्व कमिटयांतून काढून टाकलें. फक्त परराष्ट्रसंबंध कमिटीवर त्याचें नांव ठेवण्यांत आलें. त्याबाबतहि ॲटचिसनच्या मध्यस्तीमुळें बेन्टनला या कमिटीवर ठेवण्यांत आलें अशी नवलकथा पिकविण्यांत आली होती.

बेन्टनचा अहंकार फार प्रचंड होता तरीहि आतां आपण निवडले जाणार नाहीं व सिनेटर या नात्यानें ही आपली शेवटची पाळी आहे हें त्याच्या लक्षांत आलें होतें. हें अरिष्ट टाळण्याचा कदाचित एक मार्ग होता. मिसूरीच्या डेमोक्रॅट पक्षाची परिषद बोलवून त्यांतील गुलामगिरीवादी गटांशीं असलेलें आपलें भांडण मिटविण्याचा प्रयत्न बेन्टननें केला असता तर पुन्हा समेट झालाहि असता. पण बेन्टन गर्जून म्हणाला: "सेंट लुईमध्यें जे सहा हजार लोक कॉलऱ्यानें मेले त्यांच्या मुडद्यांच्या सभेंत मी बसेन, पण मिसूरींतील गुलामगिरीवादी गुंडांच्या टोळींत मी बसणार नाही." निदान १८५० सालीं क्ले यानें सुचविलेल्या तडजोडीच्या ठरावावर बोलतांना दक्षिणेच्या बाजूनें बेन्टन एखादा शब्द उच्चारील काय, अथवा पुढील अनेक लढ्यासाठीं सिनेटमधील आपली आवडती जागा कायम राहावी म्हणून बेन्टन नुसतें मौन तरी धारण करील का ? छे, तें शक्य नव्हतें. मिसूरींतील बेन्टनचा एक सहकारी या काळासंबंधीं लिहितो : "पूर्ववयांत प्लुटार्चचें वाङमय वाचीत असता बेन्टननें निर्धार केला होता कीं राष्ट्राच्या हितासाठीं जरूर तर आपल्या सर्व राजकीय अस्तित्वाचीहि आपण आहुथि देऊ."

मिसुरीच्या कायदेमंडळातर्फे बेन्टनमागून सिनेटर म्हणून कोणास निवडावें यासंबंधानें जेव्हां मिसूरींत वादाळी सुरू झाली त्यावेळीं बेन्टन वॉशिंग्टनमध्ये होता. तो आपल्या भूमिकेस अटळपणें चिकटून राहिला. आपल्या मतदारांनी स्वीकारलेल्या मताबद्दल त्यानें धिःकार चालूच ठेवला. तत्त्वांचा द्रोह करण्या-ऐवजीं सर्वविध्वंसक असा पराभव पत्करण्याचा त्यानें निर्धार केला होता आणि नैतिक धैर्याच्या बाबतींत आपण आपल्या सर्व सहकाऱ्यांना वरचढ आहोंत हें त्यानें सिद्ध करून दिलें. "याचें कातडें गेंड्याचें आहे" असें क्ले यानें बेन्टनचें वर्णन केलें आहे. पश्चिमेकडील व दक्षिणेकडील अशा दोन्ही बाजूंच्या राजकीय मित्रांनीं बेन्टनचा त्याग केला होता. गुलामगिरीचा नाश करावा असे जे म्हणत होते ते, गुलामगिरीच्या पुरस्कर्त्यांइतकेंच संघराज्य भंगू पहात आहेत असें बेन्टन म्हणे. क्लेच्या तडजोडीवर शिवराळ हल्ला करताना बेन्टननें स्वतःचा एक स्वतंत्र मार्ग आंखला. त्या "तडजोडीच्या महामसुद्यांत" ज्या योजना होत्या त्यांच्यावर हल्ला करून बेन्टननें तिरस्कारपूर्वक त्यांचा उपहास केला, "ही तडजोड म्हणजे एक पोकळ ढोंग आहे. संघराज्य भंगू पहाणाऱ्यांना यांत फाजील सवलती दिलेल्या असून कॅलिफोर्नियाला यांत उगीचच गुरफटलें आहे. ही चूक होत आहे. मिसूरीच्या तडजोडींतील गुलामगिरीविषयक योजना कॅलिफोर्नियांत नेण्यानें कॅलिफोर्निया दुभंगेल अथवा कॅलिफोर्नियाचा संघराज्यांत प्रवेश करण्याचा दिवस लांबणीवर पडेल." बेन्टनला ही कल्पना अतिशय निंद्य वाटत होती. त्याचा जावई कर्नल जॉन फ्रिमॉन्ट यानें कॅलिफोर्नियाचें संशोधन व विकास केल्यामुळें तो कॅलिफोर्नियाचा वीर पुरुष ठरला होता. म्हणून कॅलिफोर्निया संघ-राज्यांत यावें याबद्दल बेन्टनला घाई झाली होती. आपल्या भाषणांत बेन्टन म्हणतो: "जर ही तडजोड घडून न आल्यानें कॅलिफोर्निया संघराज्यांत येऊं शकलें नाहीं तर केवढा अनर्थ होईल ! त्याबद्दल मग दोष कुणाला द्यायचा ? मी हा प्रश्न केंटुकीचे सिनेटर क्ले यांना विचारीत नाहीं. कारण गुन्ह्याची कबूली मागणारा प्रश्न विचारणें हें बेकायदा ठरेल. आपल्याच तोंडानें कोणीहि गुन्ह्याची कबूली द्यावी अशी येथल्या कायद्याची सक्ती नाहीं.

मि. क्ले—मी कायद्याच्या आड दडूं इच्छीत नाहीं.

मि. बेन्टन—मी स्वतः कायदा पाळतों व मी मनाचा उदार आहें. तेव्हां क्ले यांना कायद्याचा आसरा नको असला तरी मी त्यांना ती सवलत द्यायला

तयार आहें. पण कॅलिफोर्नियाला या घोटाळयांत अडकवण्याची जबाबदारी केवढी मोठी आहे याचा विचार क्ले हे करतील काय ? या गडबडींत कॅलिफोर्निया मरणार आहे. अध्यक्ष महाराज, हा अनेक घोडचुकांचा विनोद आतां पुरे. कॅलिफोर्नियाला संघराज्यांत प्रवेश मिळत नाहीं म्हणून यातना भोगाव्या लागत आहेत. न्यू मेक्सिकोला संरक्षण मिळत नाहीं म्हणून दुःख भोगावें लागत आहे. काँग्रेसमध्यें कामकाज खुंटून पडलें आहे. तेव्हां आतां परस्परविरोधी अशा अनेक अनावर ठरावांचा गळाठा लांबणीवर टाकावा अशी सूचना मी मांडतों. हे ठराव एकमेकांना विघ्न करणारे आहेत. ते आपण पुढें एकेक वेगवेगळे घेऊं आणि प्रत्येकाच्या गुणावगुणावरून त्यांचा निर्णय करूं."

त्याच वर्षीं आणखी एक अशीच नाटयपूर्ण घटना घडली. "सिनेटचा तीमुळें अभूतपूर्व अपमान झाला" असें तिचें वर्णन करण्यांत आलें आहे. दक्षिण प्रदेश बेन्टनवर किती चिडला आहे हें त्यामुळें उघड झालें. मिसिसिपीचा तिखट स्वभावाचा सिनेटर हेन्री फूटी हा कल्हाऊनचा अंधानुयायी नव्हता. पण त्यानें मिसूरींत बेन्टनचा पराभव करण्याच्या कारस्थानांत भाग घेतला असा संशय बेन्टनला आला होता. हेन्री फूटी यानें सिनेटमध्यें अनेकदां भाषणें करून बेन्टनच्या भूमिकेला इतक्या शिव्या दिल्या कीं, बेन्टननें आपल्या मिसूरींतील मोहिमेंतहि इतक्या शिव्या दिल्या नसतील. बेन्टननें त्याला दिलेल्या शिव्यांचा सूड घेण्यासाठीं बेन्टनच्या नजिक दिसणाऱ्या पराभवाचा उल्लेख करून फूटी उपरोधिकपणें बोलला. "आतां बेन्टनचें वय आणि त्यानेंच सिद्ध केलेला त्याचा भेकडपणा या ढालीमागें आतां बेन्टननें लपलें पाहिजे."

शेवटीं "सिनेट जर असल्या भेकड व खोटया आरोपापासून माझा बचाव करणार नसेल तर मी माझा स्वतःचा बचाव करणार आहे. मग त्यामुळें कितीहि नुकसान होवो," अशी प्रतिज्ञा बेन्टननें जाहीर केली. १७ एप्रिल रोजीं फूटीनें बेन्टनवर असाच एक शाब्दिक हल्ला केला असता बेन्टन त्याच्या अंगावर धांवून गेला. एका मित्रानें त्याला मागें खेंचल्यावर तो परतला. इतक्यांत फूटी यानें खसकन् पिस्तुल बाहेर काढून बेन्टनवर रोखलें. तेव्हां बेन्टननें नाटयपूर्ण रीतीनें कोटाचीं बटणें काढून छाती उघडी केली आणि ओरडला, "माझ्या जवळ पिस्तुल नाहीं, तोच पिस्तुल चालवूं दे. तो खुनी माणूस माझा खून करूं दे."

पण अखेर सिनेटर फूटीनें अगर दुसऱ्या कुणी गोळीबार केला नाहीं. सारें

मिसुरीच्या कायदेमंडळातर्फे बेन्टनमागून सिनेटर म्हणून कोणास निवडावें यासंबंधानें जेव्हां मिसूरींत वादाळी सुरू झाली त्यावेळीं बेन्टन वॉशिंग्टनमध्यें होता. तो आपल्या भूमिकेस अटळपणें चिकटून राहिला. आपल्या मतदारांनीं स्वीकारलेल्या मताबद्दल त्यानें धि:कार चालूच ठेवला. तत्त्वांचा द्रोह करण्या-ऐवजीं सर्वविध्वंसक असा पराभव पत्करण्याचा त्यानें निर्धार केला होता आणि नैतिक धैर्याच्या बाबतींत आपण आपल्या सर्व सहकाऱ्यांना वरचढ आहोंत हें त्यानें सिद्ध करून दिलें. "याचें कातडें गेंड्याचें आहे" असें क्ले यानें बेन्टनचें वर्णन केलें आहे. पश्चिमेकडील व दक्षिणेकडील अशा दोन्ही बाजूंच्या राजकीय मित्रांनीं बेन्टनचा त्याग केला होता. गुलामगिरीचा नाश करावा असे जे म्हणत होते ते, गुलामगिरीच्या पुरस्कर्त्याइतकेंच संघराज्य भंगू पहात आहेत असें बेन्टन म्हणे. क्लेच्या तडजोडीवर शिवराळ हल्ला करताना बेन्टननें स्वत:चा एक स्वतंत्र मार्ग आंखला. त्या "तडजोडीच्या महामसुद्यांत" ज्या योजना होत्या त्यांच्यावर हल्ला करून बेन्टननें तिरस्कारपूर्वक त्यांचा उपहास केला, "ही तडजोड म्हणजे एक पोकळ ढोंग आहे. संघराज्य भंगू पहाणाऱ्यांना यांत फाजील सवलती दिलेल्या असून कॅलिफोर्नियाला यांत उगीचच गुरफटलें आहे. ही चूक होत आहे. मिसूरीच्या तडजोडींतील गुलामगिरीविषयक योजना कॅलिफोर्नियांत नेण्यानें कॅलिफोर्निया दुभंगेल अथवा कॅलिफोर्नियाचा संघराज्यांत प्रवेश करण्याचा दिवस लांबणीवर पडेल." बेन्टनला ही कल्पना अतिशय निंद्य वाटत होती. त्याचा जावई कर्नल जॉन फ्रिमॉन्ट यानें कॅलिफोर्नियाचें संशोधन व विकास केल्यामुळें तो कॅलिफोर्नियाचा वीर पुरुष ठरला होता. म्हणून कॅलिफोर्निया संघ-राज्यांत यावें याबद्दल बेन्टनला घाई झाली होती. आपल्या भाषणांत बेन्टन म्हणतो: "जर ही तडजोड घडून न आल्यानें कॅलिफोर्निया संघराज्यांत येऊं शकलें नाहीं तर केवढा अनर्थ होईल ! त्याबद्दल मग दोष कुणाला द्यायचा ? मी हा प्रश्न केंटुकीचे सिनेटर क्ले यांना विचारीत नाहीं. कारण गुन्ह्याची कबूली मागणारा प्रश्न विचारणें हें बेकायदा ठरेल. आपल्याच तोंडानें कोणीहि गुन्ह्याची कबूली द्यावी अशी येथल्या कायद्याची सक्ती नाहीं.

मि. क्ले—मी कायद्याच्या आड दडूं इच्छीत नाहीं.

मि. बेन्टन—मी स्वत: कायदा पाळतों व मी मनाचा उदार आहें. तेव्हां क्ले यांना कायद्याचा आसरा नको असला तरी मी त्यांना ती सवलत द्यायला

तयार आहें. पण कॅलिफोर्नियाला या घोटाळयांत अडकवण्याची जबाबदारी केवढी मोठी आहे याचा विचार क्ले हे करतील काय ? या गडबडींत कॅलिफोर्निया मरणार आहे. अध्यक्ष महाराज, हा अनेक घोडचुकांचा विनोद आतां पुरे. कॅलिफोर्नियाला संघराज्यांत प्रवेश मिळत नाहीं म्हणून यातना भोगाव्या लागत आहेत. न्यू मेक्सिकोला संरक्षण मिळत नाहीं म्हणून दुःख भोगावें लागत आहे. काँग्रेसमध्यें कामकाज खुंटून पडलें आहे. तेव्हां आतां परस्परविरोधी अशा अनेक अनावर ठरावांचा गळाठा लांबणीवर टाकावा अशी सूचना मी मांडतों. हे ठराव एकमेकांना विघ्न करणारे आहेत. ते आपण पुढें एकेक वेगवेगळे घेऊं आणि प्रत्येकाच्या गुणावगुणावरून त्यांचा निर्णय करूं."

त्याच वर्षी आणखी एक अशीच नाटयपूर्ण घटना घडली. "सिनेटचा तीमुळें अभूतपूर्व अपमान झाला" असें तिचें वर्णन करण्यांत आलें आहे. दक्षिण प्रदेश बेन्टनवर किती चिडला आहे हें त्यामुळें उघड झालें. मिसिसिपीचा तिखट स्वभावाचा सिनेटर हेन्री फूटी हा कल्हाऊनचा अंधानुयायी नव्हता. पण त्यानें मिसूरींत बेन्टनचा पराभव करण्याच्या कारस्थानांत भाग घेतला असा संशय बेन्टनला आला होता. हेन्री फूटी यानें सिनेटमध्यें अनेकदां भाषणें करून बेन्टनच्या भूमिकेला इतक्या शिव्या दिल्या कीं, बेन्टननें आपल्या मिसूरींतील मोहिमेंतहि इतक्या शिव्या दिल्या नसतील. बेन्टननें त्याला दिलेल्या शिव्यांचा सूड घेण्यासाठीं बेन्टनच्या नजिक दिसणाऱ्या पराभवाचा उल्लेख करून फूटी उपरोधिकपणें बोलला. "आतां बेन्टनचें वय आणि त्यानेंच सिद्ध केलेला त्याचा भेकडपणा या ढालीमागें आतां बेन्टननें लपलें पाहिजे."

शेवटीं "सिनेट जर असल्या भेकड व खोटचा आरोपापासून माझा बचाव करणार नसेल तर मी माझा स्वतःचा बचाव करणार आहे. मग त्यामुळें कितीहि नुकसान होवो," अशी प्रतिज्ञा बेन्टननें जाहीर केली. १७ एप्रिल रोजीं फूटीनें बेन्टनवर असाच एक शाब्दिक हल्ला केला असता बेन्टन त्याच्या अंगावर धांवून गेला. एका मित्रानें त्याला मागें खेंचल्यावर तो परतला. इतक्यांत फूटी यानें खसकन् पिस्तुल बाहेर काढून बेन्टनवर रोखलें. तेव्हां बेन्टननें नाटयपूर्ण रीतीनें कोटाचीं बटणें काढून छाती उघडी केली आणि ओरडला, "माझ्या जवळ पिस्तुल नाहीं, तोच पिस्तुल चालवूं दे. तो खुनी माणूस माझा खून करूं दे."

पण अखेर सिनेटर फूटीनें अगर दुसऱ्या कुणी गोळीबार केला नाहीं. सारें

सिनेट त्या धक्क्यानें चकित झालें. एकमेकांवर चढाई करणाऱ्या दोघांचाहि सिनेटच्या एका स्पेशल कमिटीनें निषेध केला. तरी पण दोघांचा एकमेकांविरुद्ध तोंडीं गोळीबार चालूच राहिला. "वेन्टनचें चरित्र ज्यांत पुष्कळ आलें आहे असा एक ग्रंथ मी लिहिणार आहें". अशी फूटीनें बेन्टनला धमकी दिल्याचें बेन्टनला कळलें. बेन्टन म्हणाला, "फूटीला कळवा कीं मीहि एक पुस्तक लिहिणार आहें, पण त्यांत फूटीचा नामोल्लेख सुद्धां येणार नाहीं". (खरोखरच बेन्टननें पुढें असें पुस्तक लिहिलें.) लवकरच बेन्टनचा मिसूरींत पराभव होणार होता, त्याचा उल्लेख करून फूटीनें सिनेटमधील भाषणांत वेन्टनला टोमणा मारला "आजवर जरी आपण जुलमाला बळी पडलों असलों, वर्षानुवर्ष आणि खरोखर अशीं तीस वर्षे शांतपणें आपण हा जुलूम सहन केला असला तरी पण आपण आतां ईश्वराचे आभार मानूं या. आपण आतां हुश्श करून म्हणूं शकतों कीं, 'पहा, हा जुलमी राक्षस धुळींत कोसळला आहे. रोम पुन्हां स्वतंत्र झालें आहे' "

फूटीच्या या सर्व अपेक्षा संपूर्ण सफळ झाल्या. कॅलिफोर्नियाच्या विभागणीविरुद्ध बेन्टननें मत दिलें तेंच त्याचें सिनेटमधील महत्त्वाचें कृत्य ठरलें. जानेवारी १९५१ मध्यें वेन्टन-डेमोक्रॅट्स्, वेन्टन-विरोधी डेमोक्रॅट्स् आणि व्हिग्ज् यांच्यामध्यें कठोर वाक्युद्ध झालें. आणि मिसूरीच्या कायदेमंडळानें एका व्हिग पक्षीयाला बेन्टनच्या जागीं निवडून तीस वर्षेपर्यंत अलौकिक मुत्सद्दीगिरी गाजविलेल्या थॉमस हार्ट वेन्टन या थोर पुरुषाला त्या कायदेमंडळानें अपमानपूर्वक बडतर्फ केलें आणि वॉशिंग्टन सोडून घरीं परतण्यास फर्माविलें.

पण या उपमर्दानें वेन्टन खचला नाहीं. भलेपणा व लोकप्रियता असताना राजकारणांतून निवृत्त व्हावें हा सिधा मार्ग त्याच्या हट्टी स्वभावाला जमणारा नव्हताच. पुढील वर्षी तो सेंट लुईस मधून प्रतिनिधिसभेवर निवडून येण्यासाठीं उमेदवार म्हणून उभा राहिला. न्यू ऑर्लिन्सचें 'क्रिसेंट' हें पत्र त्याच्या विरोधी होतें. वेन्टनच्या या वेळच्या प्रचारमोहिमेसंबंधानें सदर पत्र लिहितें: "त्यानें आपल्या मोहिमेंत विरोधकांच्या सार्वजनिक व खाजगी जीवनावर झोड उडविण्याची थोडीहि संधि सोडली नाहीं. निवडणूकप्रचारांत देता येण्यासारख्या सर्व शिव्या त्यानें देऊन टाकल्या. तिरस्कार व उपहास व्यक्त करण्याकरितां त्यानें इंग्रजी भाषेचा सर्व शब्दकोश रिकामा केला. वैय्यक्तिक लोकप्रियतेच्या या अखेरच्या लाटेवर आरूढ होऊन तो निवडूनहि आला. पण यापुढें निवडून

येण्याचा कोणताहि संभव शिल्लक रहाणार नाहीं असें एक भयंकर भाषण त्यानें कॉंग्रेसमध्यें केलें. त्याच्याच पक्षानें कॅन्सस-नेब्रास्का बिल आणलें होतें. त्यावर बेन्टननें हल्ला चढविला. तें भाषण प्रखर शिव्या आणि धिःकार यामुळें संस्मरणीय ठरलें. त्यानें सुचविलेली मिसूरीची तडजोड कॉंग्रेसनें रद्द केल्याबद्दल भयंकर कठोर भाषण करून बेन्टननें राष्ट्रीय दृष्टिकोनाचा पुरस्कार केला. जॉर्जियाच्या एका प्रतिनिधीला उद्देशून बेन्टन म्हणतो: "आपण दाक्षिणात्य आहोंत या भावनेनें तो मतदान करतो आहे. हा माणूस प्रादेशिकवादी आहे. मी दाक्षिणात्य असलों तरी मी राष्ट्रीय प्रश्नावर राष्ट्रीय दृष्टीनें मतदान करतों. मी जन्मानें दाक्षिणात्य आहें. मतानेंहि मी दाक्षिणात्य आहें. माझें हित व माझे संबंध दाक्षिणात्य आहेत. दाक्षिणात्यांचा न्याय्य हक्क जेथें वादग्रस्त असेल तेव्हां मी दाक्षिणात्यांच्या बाजुस राहीन व दाक्षिणात्य या नात्यानें भोगावी लागतील तीं सुखदुःखें भोगीन. पण एखादा प्रश्न जेव्हां राष्ट्रीय असेल तेव्हां राष्ट्रीय दृष्टीनेंच मीं त्याबाबत निर्णय करीन."

१८५४ सालीं मात्र त्याचा सणसणीत पराभव झाला. त्याची बायको मेल्यानेंहि तो फार दुःखी झाला. पण अजूनहि तो नमतें घेण्यास तयार नव्हता. १८५५ सालीं तो सिनेटसाठीं उभा राहिला आणि पराभूत झाला. तो आतां ७४ वर्षांचा झाला होता. त्याची मुलगी जेसी बेन्टन फ्रिमॉन्ट आपल्या स्मृतिग्रंथांत लिहिते: "पिताजींना घशाच्या कॅन्सरचा भयंकर रोग झाल्याचें त्यांना कळलें तरीहि ते सार्वजनिक भाषणें करीत. त्यासाठीं कित्येक दिवस आगाऊ त्यांना पूर्ण मौन पाळावें लागे. तरीहि त्यांचीं भाषणें इतकीं कर्कश असत कीं, भाषण चालू असता व संपल्यावर त्यांच्या घशातून रक्त येई. व्हिग् आणि बेन्टनविरोधी डेमोक्रॅट अशा दोन्ही गटांच्या उमेदवारांचा पराभव करण्यासाठीं बेफाम भाषणें करीत त्यांनीं १२०० मैल प्रवास केला. अखेर निवडणुकीत पराभव झाला, पण त्यांचा ताठा मोडला नाहीं. त्या पराभवानंतर त्यांनीं आपले संस्मरणीय असे इतिहासविषयक ग्रंथ लिहिले."

ज्या भव्य ताठरपणासाठींच बेन्टनवर त्याचे मित्र प्रेम करीत व त्याचे शत्रु त्याचा द्वेष करीत, तो ताठरपणा बेन्टनच्या ठिकाणीं अखेरपर्यंत कायम होता. 'तीस वर्षांचा चित्रपट' या ग्रंथाच्या किती प्रति छापू असें प्रकाशकानें विचारण्याकरितां बेन्टनला निरोप पाठविला असता त्यानें गर्वभरानें उत्तर दिलें: "प्रकाशकांना सांगा, अमेरिकेंत गेल्या शिरगणतींत जितकीं कुटुंबें नोंदलीं गेलीं असतील तेवढ्या प्रति छापा म्हणजे झालें." आपण कांग्रेसमध्ये असताना

केवढी कर्तबगारी गाजविली याविषयीं बेन्टन म्हणतो: "मीं ज्या योजना स्वत: मांडल्या व ज्यांचा मी मुख्य पुरस्कर्ता होतो त्यांची नुसती यादी केली तरी तो बहुतेक काँग्रेसच्या साऱ्या कायद्यांचा इतिहास होईल. ही लांबलचक यादी या सर्व देशाच्या चारहि सीमापर्यंत सर्वांना माहित आहे. अगदीं घरगुती माहिती-प्रमाणें लोक ती पुन्हापुन्हा एकमेकांना सांगतात. आणि ज्यांच्या अंत:करणांत थोर पुरुष होण्याची महत्त्वाकांक्षा उदय पावू लागलेली असते अशीं मुलें त्या यादीचा अभ्यास करतात." तो मरेपर्यंत सतत काम करीत होता. शेवटींशेवटीं पेन हातानें धरवेना तेव्हां एक लेखक नेमून व त्याला मजकूर सांगून त्यानें आपलें लेखनकार्य पुढें चालविलें. अगदीं मरणापूर्वींहि तो विव्हळला नाहीं. मी सुखांत आणि समाधानांत आहें असें तो कुजबुजला. तो प्रखर चारित्र्यसंपन्न होता. त्याच्या मुलीसाठीं त्यानें फार थोडी पुंजी केली होती असें त्याच्या मरणानंतर दिसून आलें.

पराजयांत आणि मरणांतहि तो अखेर यशस्वीच ठरला. १८६१ सालीं झालेल्या यादवींत मिसूरी हें दाक्षिणात्य व गुलामगिरीवादी राष्ट्र दाक्षिणात्यांच्या बाजूनें सामील व्हावें, त्यानें उत्तरेपासून फुटून निघावें यासाठीं अनेकांनीं बेफाम प्रयत्न केले. पण मिसूरी राज्य दाक्षिणात्यांच्या बाजूस सामील झालें नाहीं अथवा उत्तरेपासून फुटून निघालें नाहीं याच्या अनेक कारणांपैकीं बेन्टननें संघ-राज्य अखंड रहावें या मताचा पूर्वीं केलेला पुरस्कार हें एक निर्णायक कारण होतें. बेन्टननें सिनेटर या नात्यानें केलेल्या कामगिरीचा शेवटचा रिपोर्ट आपल्या मतदारांना सादर केला होता, त्यांत तो म्हणतो :

"मी भरीव लोकप्रियतेला बहुमोलाची मानतों. चांगल्या माणसांनीं चांगल्या कामगिरीचा गौरव केला तर तो मूल्यवान असतोच. पण जी लोकप्रियता कोणतीहि चांगली कामगिरी न करता मिळते आणि एखादें दुष्कर्म केलें नसलें तरी नाहींशी होते अशी लोकप्रियता हा एक फक्त पोकळ बुडबुडा असतो. मला त्याचा तिरस्कार वाटतो ..मी तीस वर्षें सिनेटर आहें...माझ्या मतदारांची आगाऊच घडविलीं गेलेलीं मतें आणि प्रथमदर्शनीं माझ्या मतदाराचे झालेले ग्रह यांविरुद्ध मला केव्हां केव्हां वागावें लागलें आहे. पण माझे मतदार हे माझी भूमिका समजूत घेण्याइतके शहाणे आहेत आणि मला न्याय देण्या-इतकी न्यायबुद्धि त्यांच्यांत आहे, असा मला नेहमी विश्वास असे. या बाबतींत माझी कधींहि निराशा झालेली नाहीं".

पुढील इतिहासानें बेन्टनचा हा विश्वास खरा ठरविला !

प्रकरण : ५ —

# सॅम हाऊस्टन

१८५४ सालीं त्या दिवशीं अगदीं थोडेसे प्रभातकिरण सिनेटच्या सभागृहांत पडले असून तेथें अंधूक अंधूक दिसत होते. अशा वेळीं एक शेवटचा वक्ता सभापतीच्या नजरेला आपण पडावें म्हणून उभा राहिला. सिनेटर सारे थकले होते. त्यांच्या दाढया वाढल्या होत्या. सर्व रात्रभर सिनेटचें अधिवेशन चालल्यामुळें सर्व सभासद आपआपल्या खुर्च्यांत अगदीं गळून पडून लोळत होते. मतदान करा—मतदान करा...असें पुन्हा पुन्हा सांगून अगदीं खास पास होणाऱ्या त्या बिलावर आणखी कोणीं बोलूं नये अशी इच्छा व्यक्त करीत होते. पण टेक्ससचा सिनेटर सॅम हाऊस्टन हा असल्या विरोधानें सहजासहजीं माघार घेणारा नव्हता. त्यानें आपल्या खोल आणि गोड आवाजांत धीटपणानें आपलें जोरदार भाषण सुरूं केलें तेव्हां सर्व सभासद चकित झाले. आळस आणि मदडपणानें मेंदूला आलेली सुस्ती झटकून टाकून सर्व सदस्य ताठ बसले व त्याचें भाषण ऐकूं लागले. ज्या बिलावर अगदीं कठोर आणि संपूर्ण अशी चर्चा झाली होती व आतां संपली होती, तें कॅन्सस-नेब्रास्का बिल हें त्यावेळीं चर्चेचा विषय होते. अमेरिकन संघराज्याचें ऐक्य टिकविण्यासाठीं डेमोक्रॅटिक पक्षानें ती एक युक्ति योजली होती. दाक्षिणात्यांना त्यामुळें नव्या सवलती मिळाल्या होत्या. या नव्या योजनेप्रमाणें १८२० तील मिसुरीची तडजोड रद्द झाली होती. १८५०च्या तडजोडीनें गुलामगिरीच्या विस्ताराला झालेली बंदी या बिलानें रद्द होत होती. आणि आयोवापासून रॉकिझपर्यंतच्या प्रदेशांतील लोकांनीं गुलामगिरीसंबंधानें कांहींहि निर्णय ठरवावा अशी सवलत या बिलानें दिली होती. या विस्तीर्ण प्रदेशाच्या दक्षिणभागांत गुलामगिरी राहील व उत्तर भागांत व्यक्तिस्वातंत्र्य राहील असा निर्णय घेतला जाणार हें गृहीत धरण्यांत आलें होतें. डेमोक्रॅटिक पक्ष व दाक्षिणात्य यांच्या दृष्टीनें हें बिल मंजूर झालेंच पाहिजे होतें.

सॅम हाऊस्टन हा पुष्कळ वर्षें डेमोक्रॅटिक पक्षांत होता. जन्मानें, वसतीनें, आपुलकीच्या निष्ठेनें व तत्त्वज्ञानानें तो दाक्षिणात्य होता. पण सॅम हाऊस्टनचें एक स्वतःचें म्हणून विशेष व्यक्तित्व होतें. सिनेटच्या सभागृहांत त्या वेळेपर्यंत निवडून आलेल्या सभासदांमध्यें सर्वांपेक्षां अधिक स्वतंत्र वृत्तीचा, अत्यंत लोकप्रिय, मोठा जोमदार आणि नाटयपूर्ण व्यक्तित्वाचा असा हाऊस्टन होता. टेक्ससचा तो पहिला सिनेटर होता. पण मेक्सिकन सैन्याशीं झालेल्या सॅन जॅसिंटो येथील युद्धांतला वीर म्हणून तो लोकांत प्रसिद्ध होता. मेक्सिकन् सैन्याशीं लढणाऱ्या संख्येनें अगदीं कमी असलेल्या टेक्ससच्या स्वयंसेवकांचा तो सेनापति असून त्यानें मेक्सिकन सैन्याचा मोड करून सेनापतीला कैद केलें होतें. स्वतंत्र टेक्सस राज्याचा अध्यक्ष म्हणून त्यांचा गौरव करण्यांत आला होता. अमेरिकन कॉंग्रेसमधला टेक्ससचा प्रतिनिधि म्हणून तो निवडून आला असून टेक्सस ज्यावेळीं अमेरिकन संघराज्यांत सामील झालें त्यावेळीं तो टेक्ससचा पुन्हा अध्यक्ष झाला होता. यावेळीं त्याचें वय ६४ वर्षांचें असून कुणीहि त्याला उगीच दडपून टाकील असा त्याचा दर्जा क्षुद्र नव्हता. प्रादेशिक बंधनांनीं अथवा पक्षीय बंधनांनीं त्याचें तोंड बंद करणें शक्य नव्हतें.

सॅम हाऊस्टननें मिसूरी तडजोडीचा आढावा घेतला. १८२० सालीं टेनेसीचा तरुण कांग्रेसमन् या नात्यानें त्यानें मिसूरी तडजोडीस पाठिंबा दिला होता. उत्तर व दक्षिण यांमध्यें झालेली ही पवित्र तडजोड होय असें त्याचें मत असून ती घटनेचा भाग झालेली होती. त्याचवेळीं टेक्ससहि अमेरिकन संघराज्यांत आलें होतें. ही मिसूरी तडजोड रद्द करण्यास तो राजी नव्हता. १८५० ची तडजोडहि त्यानें मान्य केली होती. हाऊस्टननें या तडजोडीस पाठिंबा दिला यासाठीं 'टेक्ससवर करण्यांत आलेला क्रूर अत्याचार' या शब्दांत टेक्ससच्या ज्वलज्जहालांनीं हाऊस्टनचा निषेध केला होता. इतका निषेध सोसून ज्या तडजोडीस आपण पाठिंबा दिला ती १८५० ची तडजोड फेकून देण्यास हाऊस्टन तयार नव्हता. अगदीं घरगुती, कांहींशा खडबडीत पण जिव्हाळयाच्या वक्तृत्वानें त्यानें त्या थकलेल्या सभासदांना उद्देशून, "आपल्या या राष्ट्राला गुलामगिरीच्या मुद्यावर नव्या प्रक्षोभाग्नींत लोटूं नका" अशी त्यानें विनंति केली.

हें बिल पास होणार हें त्याला ठाऊक असलें पाहिजे. दक्षिणेकडील एकहि

90322

डेमोक्रॅट आपल्या बाजूला येणार नाहीं हेंहि त्याला माहित असलें पाहिजे. या बिलासंबंधानें हाऊस्टन कोणती भूमिका घेणार याची अफवा आधींच पसरली असल्यानें रिचमंड येथील 'इन्क्वायरर' या पत्रानें लिहिलें होतें. "या विश्वासघाताचें कशानेंहि समर्थन होणार नाहीं, अशा लोकद्रोही विश्वासघातक्याचा जो धि:कार होईल त्यापासून त्याचा कोणीहि बचाव करूं शकणार नाहीं." हाऊस्टनला हेंहि आपलें भवितव्य माहीत असलें पाहिजे. तो ताठ उभा होता. हनुवटी थोडीशी पुढें करून बोलत होता. अंगावर लष्करी गणवेश असल्यामुळें विचित्र नव्हे तरी तो मोठा नाटचपूर्ण दिसत होता. "तेज:पुंज जंगली" असें नामाभिधान मिळालेल्या हाऊस्टननें त्या दिवशीं केलेलें तें भाषण, ज्यानें थकलेल्या सभासदांचेंहि लक्ष वेधून घेतलें तें, त्याच्या आजवरच्या भाषणांत अद्वितीय असें होतें. तो म्हणाला :

"हें बिल ही अतिशय भयानक योजना आहे. याचे परिणाम भयंकर होतील असें दाक्षिणात्यांना बजावून सांगण्याचें माझें कर्तव्य पार पाडण्याच्या कामीं कच खाऊन मी स्वस्थ बसेन अशी तुमची अपेक्षा आहे काय ? तुम्हीं कितीहि दमदाटी केलीत, धि:कार केलांत तरी मला बोलायचें तें मी बोलेनच. मी गुलामगिरी-विरोधकांच्या बाजूस आहें अथवा गुलामगिरीवाद्यांच्या बाजूस आहें, यापैकीं कुठल्याहि आरोपाची मला पर्वा नाहीं. मी ज्या प्रदेशांत रहातों, जेथें माझे हितसंबंध गुंतले आहेत, माझ्या स्नेहभावाचीं माणसें जेथें आहेत त्या प्रदेशांतील प्रतिनिधींनीं एकजुटीनें केलेल्या विरोधापुढेंहि माझें कर्तव्य मीं पार पाडलें पाहिजे अशी माझ्या मनोदेवतेची मला प्रेरणा आहे...दाक्षिणात्यांचें समाधान करण्याची ही संधि हा एक वर आहे असें कोणीं म्हटलें तर मी तो वर फेंकून देत आहें. मला हें वरदान मुळींच नको. आमचीं मुलेंबाळें यापुढें शांतता, सलोखा व वैभव यांत रहाणार कीं अराजक, कलह, यादवी यांत रहाणार असा आज प्रश्न आहे. दुसरा पर्याय आपण टाळूं शकतों. आपण तो टाळूं असा विश्वासहि मला वाटतो....अमेरिकन संघराज्य टिकवायचें व त्याखालीं सलोख्यानें नांदावयाचें असें ज्या मिसूरी करारानें ठरलें आहे तो करार शाबूत ठेवा, नवे प्रक्षोभ माजवूं नका. आम्हांला शांतता द्या."

या प्रसंगासंबंधानें पुढील काळांत हाऊस्टननें लिहून ठेवलें आहे: "मीं

व्यक्त केलेलें तें मत लोकप्रिय नव्हतें. परंतु तें अत्यंत शहाणपणाचें आणि देशभक्तिपूर्ण होतें." तें मत त्यावेळीं लोकांना आवडलें नाहीं हें खरेंच. पहिल्यानें ज्यावेळीं सॅम हाऊस्टन सिनेटला गेला त्यावेळीं टेक्सस हें बालराज्य असून रेल्वे, जमिनी, कर्जें, सरहद्दीचे वाद इत्यादि प्रश्न त्याजपुढें होते. इतर दाक्षिणात्य राज्याबद्दल खास आपुलकी अजून टेक्ससमध्यें निर्माण झाली नव्हती. पण आतां टेक्ससमध्यें दीड लक्ष गुलामरूपीं संपत्ति सांचलेली होती. आणि बहुअंशीं दक्षिण राज्यांतून आलेल्या डेमोक्रॅटिक नागरिकांची मोठी वसाहत तेथें झाली होती. गुलामगिरीवादी अशा दाक्षिणात्य राष्ट्राशीं या नागरिकांचे हितसंबंध जडले होते. आणि या गोष्टीलाच हाऊस्टनचा विरोध होता. म्हणून, हाऊस्टननें सिनेटमध्यें आपल्या राज्याचा विश्वासघात केला, तो गुलामगिरीविरोधकांना सामील झाला, दक्षिण राज्याचा त्यानें विश्वासभंग केला, असे आरोप ते टेक्ससचे नागरिक हाऊस्टनवर करीत होते व त्याचा सूड घेण्याला आतुर झाले होते. टेक्ससच्या कायदेमंडळानें नेब्रास्का बिलाला ७३ विरुद्ध ३ मतांनीं मंजुरी देऊन हाऊस्टनच्या ज्या सहकाऱ्यानें तें बिल उचलून धरलें होतें त्याचा गौरव केला. आणि एका काळीं जो टेक्ससचा अद्वितीय कीर्तिमान वीर म्हणून प्रसिद्धीस आला त्या हाऊस्टनचा त्या कायदेमंडळानें धि:कार केला. तो टेक्सस राज्याच्या डेमोक्रॅटिक तत्त्वास धरून वागत नाहीं म्हणून त्याची निर्भत्सना केली. 'डलस हेरल्ड' या पत्रानें लिहिलें: "टेक्ससनें मोठ्या अभिमानानें ज्याला सिनेटमध्यें पाठविलें होतें त्यानें सिनेटमध्यें टेक्ससच्या मताबद्दल गैरसमज निर्माण करून टेक्ससचें प्रतिनिधित्व करण्याचा आपला हक्क गमावला आहे. सिनेटमध्यें टेक्ससच्या जागीं न बसता त्यानें आतां राजिनामा द्यावा हेंच चांगलें. हाऊस्टननें आपल्या मतदारसंघाचा विश्वासघात केला, त्याजवर अत्याचार केला, त्याजबद्दल गैरसमज पसरविला हें टेक्ससचें म्हणणें हाऊस्टननें ऐकून घेऊन टेक्ससपुढें पुन्हा मान लववावी म्हणजे पुन्हां एकदां टेक्ससचा आवाज एकच एक होईल. टेक्ससची अखंड आघाडी सिनेटमध्यें उभी राहील."

खरोखर सिनेटर हाऊस्टनचा 'अपराध' त्यानें नेब्रास्का-बिलाला विरोध केला एवढाच नव्हता. 'क्लार्क्स्व्हाईल स्टॅंडर्ड' या पत्रानें लिहिलें: "हाऊस्टनचें या वेळेचें वर्तन हें त्याचें पहिलेंच दुष्कृत्य नसून ओझें लादलेल्या उंटाच्या पाठीवरचें तें शेवटचें पीस होतें व तेवढ्यानें उंटाची कंबर मोडली होती."पूर्वी ओरेगॉन-

च्या प्रश्नावर जॉन कल्हाऊनशीं हाऊस्टन भांडला होता. तो त्यावेळीं म्हणाला होता, "मी दाक्षिणात्य असलों तरी अमेरिकन संघराज्य हा माझा ध्रुवतारा आहे आणि उत्तरप्रदेश दक्षिणप्रदेशाला उध्वस्त करील अशी भीति मला मुळींच वाटंत नाहीं. मग म्हातारे स्त्री-पुरुष अथवा सुंदर मुली यांनीं कसलींहि पत्रकें प्रसिद्ध केलेलीं असोत." हाऊस्टन व बेन्टन यांनीं प्रतिपक्षाच्या बाजूस त्यांना विजय मिळवून दिला याबद्दल कल्हाऊननें त्यांचा धि:कार केला. तेव्हां डिक्सी-च्या एका वजनदार वृत्तपत्रानें लिहिलें होतें: "दक्षिणेचा पराभव उत्तरेनें केला नसून दक्षिणेनेंच केला आहे. दाक्षिणात्य जर एकजूट असते तर त्यांना विजय मिळाला असता." या टीकेवर हाऊस्टन उत्तर करतो: "मी उत्तर अथवा दक्षिण जाणत नाहीं; मी फक्त संघराज्य ओळखतों."

"गुलामगिरीच्या बाबतींत संघराज्याला कोणताहि अधिकार नाहीं." अशा अर्थाचे जे कल्हाऊनचे ठराव होते त्याच्याशीं आपला कसलाहि संबंध नाहीं असें हाऊस्टननें जाहीर केलें. कल्हाऊन हा दाक्षिणात्यांत परमपूज्य ऋषीसारखा मानला जाई. सिनेटमधील एका भाषणांत हाऊस्टननें कल्हाऊनचा धि:कार केला आणि "कल्हाऊन हा संघराज्याचा दीर्घकाल विरोधक असून संघराज्य मोडून टाकण्याचे उद्योग उघडपणें करतो आहे, पण मी सॅम हाऊस्टन दाक्षिणात्यांचा प्रतिनिधि नसून सबंध अमेरिकन जनतेचा प्रतिनिधि आहे," असें त्यानें मत मांडलें. पण टेक्ससच्या कायदेमंडळानें कल्हाऊनचे ते ठराव मंजूर केले. १८५२ अथवा १८५६ या सालीं होणाऱ्या राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीस उमेदवार म्हणून हाऊस्टनचें नांव बोललें जात असून टेक्ससमध्यें एका काळीं अध्यक्ष असलेल्या हाऊस्टनची ती महत्त्वाकांक्षा होतीहि. पण टेक्ससच्या कायदेमंडळानेंच आतां त्याच्याबद्दल अविश्वास व्यक्त केला होता.

१८५० सालीं हेन्री क्ले यानें सिनेटपुढें मांडलेल्या महान तडजोडीस कल्हाऊननें विरोध केला असता हाऊस्टननें कल्हाऊनवर पहिला हल्ला चढविला होता. बायबलांतील उतारे त्यावेळीं वाचून दाखवून हाऊस्टन म्हणाला, "हे लोक अमेरिकेंतून फुटून निघण्याच्या गोष्टी बोलत आहेत. पण त्यांची समुद्रावरील लाटांपेक्षां अधिक योग्यता नाहीं. त्या लाटांवर जसा फेस नाचत असतो तसा यांचा निर्लज्जपणा त्यांच्या कृतीच्या रूपानें नाचत आहे. महाराज, टेक्ससच्या लोकांना संघराज्यांत प्रवेश मिळविण्यासाठीं किती प्रयास पडले हे तुम्हांला

माहीत आहे ना ? एक फटका मारून त्या लोकांना आतां आपण संघराज्यांतून बाहेर काढूं असें तुम्हांला वाटतें काय ? नाहीं महाराज...संघराज्यांत प्रवेश मिळण्यासाठीं आम्हीं रक्त सांडलें आहे...सर्वांच्या शेवटीं आम्हीं संघराज्यांत आलों, आतां बाहेर पडावयाचें असलें तर आम्हीं सर्वांच्या शेवटीं बाहेर पडूं... जे संघराज्याचे मित्र असतील त्यांनीं संघराज्याच्या सर्व दिशांतून यावेळीं शूर-वीराप्रमाणें पुढें यावें, राष्ट्रहिताच्या समान वेदींवर आपले मतभेद त्यांनीं अर्पण करावे आणि राज्यघटनेच्या भोवतीं आपल्या शरीरांची तटबंदी उभारावी. राज्यघटना अभंग राहिली पाहिजे. त्यासाठीं शूराप्रमाणें प्रयत्न करावे लागतील. सर्व बाजूंनीं दूषित ग्रहांच्या होणाऱ्या हल्ल्यांना तोंड द्यावें लागेल. पण स्वत:वर कितीहि दारुण प्रसंग येवोत, त्यांनीं संघराज्याच्या बाजूनें भक्कम भूमिका घेतली पाहिजे."

१८५४ च्या त्या वादळीं सकाळीं कॅन्सस-नेब्रास्का बिलाविरुद्ध भाषण करून हाऊस्टननें दाक्षिणात्यांना दुखविलें त्यापूर्वीं वर सांगितल्याप्रमाणें दाक्षिणात्यांशीं त्याचे अनेक झगडे झाले होते. त्या वेळचा झगडा तो "क्लार्क्स् व्हाइल्स स्टँडर्ड"नें म्हटलप्रमाणें उंटाच्या पाठीवरील शेवटच्या काडीसारखा ठरला. एका काळीं टेक्ससचा वीर म्हणून गाजलेल्या या सेनापतीची सिनेटची ही शेवटची खेप होय, असें मोठ्यानें बोललें जाऊं लागलें. त्याच्याबरोबर सिनेटमध्यें अनेक प्रसिद्ध सिनेटरांनीं काम केलें होतें. त्यांना हाऊस्टनचा तो चमत्कारिक पोषाख आवडत नसे. सिनेटमध्यें लांबलचक भाषणें चाललीं असतां आपल्याशीं पुटपुटत आणि हातांतली काठी तासत तो बसलेला असे. त्याच्या सहकाऱ्यांना त्याचें हें वर्तन आवडत नसे. पण हाऊस्टनला त्याच्या वक्तृत्वानें जी कीर्ति मिळाली व त्याच्या नांवाभोंवतीं जें एक तेजोवलय निर्माण झालें, ती कीर्ति व तें तेज त्याच्या सहकाऱ्यांना कधीं मिळूं शकलें नाहीं. हाऊस्टनचें धैर्य पूर्ण अनासक्तीचें असे, त्याचें व्यक्तित्व मोठें कणखर असे, यामुळें त्याच्या सहकारी मित्रांत हाऊस्टन-बद्दल आदर होता. आपल्या छोट्या आत्मचरित्राला लिहिलेल्या प्रस्तावनेंत हाऊस्टन लिहितो: "या पुस्तकामुळें मला कांहीं मित्र गमवावे लागतील. पण सगळे मित्र गेले आणि नवे कोणीहि मिळाले नाहींत तरी माझें स्वातंत्र्य कायम आहे तेवढें मला पुरें. मी हें पुस्तक प्रसिद्ध करणारच......" त्याच्या स्वभावांतला सरळपणा आणि कणखरपणा या लिखाणांत दिसून येतो.

एका शतकापूर्वी सॅम हाऊस्टन याच्या अंगीं जे परस्परविरुद्ध स्वभावगुण एकत्र राहिले होते तसे ते आज एकाद्या सिनेटराच्या अंगीं एकत्र राहूं शकणार नाहींत. हाऊस्टनच्या स्वतःच्या व हाऊस्टनचे उल्लेख असलेल्या अनेक रोजनिशा उपलब्ध आहेत. अनेक भाषणें व पत्रें अशीं उपलब्ध आहेत कीं त्याचें चरित्र व त्याच्या अंगचे गुण यांच्या अनेक बाजूंवर त्यामुळें प्रकाश पडतो. पण या सर्वांच्या मध्यभागीं हाऊस्टनचें जें व्यक्तिमत्व आढळतें तें अस्पष्ट आणि अंधुक दिसतें. तत्कालीन मित्रांनाहि हाऊस्टन दुर्बोध ठरला असून आजच्या इतिहास-लेखकांना काळजीपूर्वक वाचनानेंहि त्याचा उलगडा होत नाहीं. त्याच्या एखाद्या पत्रांत अथवा त्याच्या रोजनिशींतल्या एखाद्या नोंदींत क्षणमात्र गैरसावधपणानें लिहून त्यानें आपलें व्यक्तित्व खुलें केलेलें दिसतें. पण त्याचें एकंदर सर्व लिखाण वाचल्यावर तो पूर्वीसारखाच दुर्बोध रहातो. त्याचा ध्रुवतारा होता तरी कोणता ? वैयक्तिक महत्त्वाकांक्षा, टेक्ससचें हित अथवा राष्ट्राचें हित यापैकीं कोणत्या उद्दिष्टामागें लागून तो वागत होता, हें कोणीहि सांगू शकत नाहीं.

तो भयंकर महत्त्वाकांक्षी होता हें खरेंच. पण शेवटीं तत्त्वरक्षणाचा प्रश्न आला तेव्हां, त्या वेळेपर्यंत मिळविलेलें यश आणि भावी आकांक्षा या सर्वांची त्यानें तत्त्वासाठीं आहुति दिली. तो दाक्षिणात्य होता, तरी पण संघराज्याशीं तो सतत एकनिष्ठ राहिला. त्याचे स्वतःचे गुलाम असत, पण उत्तरेकडच्या लोकांना गुलामगिरीविरुद्ध अर्ज करण्याचा हक्क असावा याचें तो समर्थन करी. तो अतिशय दारुड्या होता आणि तरीहि त्यानें मितपानाची शपथ घेऊन ठेवली होती. चेरोकी इंडियन लोकांनीं त्याला आपल्या मुलासारखें वाढविलें. पण इंडियन लोकांच्या टोळीशीं लढण्यांतच लष्करी वीर म्हणून तो प्रसिद्धीस आला. तो टेनेसीचा गव्हर्नर होता. पण टेक्ससनें त्याला सिनेटर म्हणून निवडलें. तो मनाचा जितका उदार तितकाच सूड बुद्धीचा होता. स्वभावानें जेवढा प्रेमळ तेवढाच क्रूरहि होता. वागणुकींत तऱ्हेवाईक असे, पण स्वत्वाची जाणीव तो कधीं विसरत नसे. तत्त्वनिष्ठा व संधिसाधुत्व हीं दोन्हीहि त्याच्या ठिकाणीं होतीं. पण या त्याच्या परस्परविरोधी गुणावगुणांत त्याचा एक गुण सुसंगतपणें व्यक्त होई. त्याचें व्यक्तिमत्व दुर्दम होतें. तें कधीं भव्य दिसे, कधीं रानटी दिसे, कधीं गूढ दिसे,—पण नेहमीं मनोधैर्याचा तो मूर्तिमंत पुतळा आहे असा प्रत्यय येई. अनेकांना त्याचे अनेक गुणावगुण प्रतीत होत. पण स्वतःला व टेक्ससला तो

नेहमीं एकनिष्ठ राहिला. हाऊस्टनच्या जीवनांत जो कोलाहल दिसून येतो तो तत्कालीन अमेरिकन राष्ट्राच्या अंतःकरणांत यातना देणाऱ्या कोलाहलाचा प्रतीकभूत असा होता. यादवीच्या पूर्वीचे दिवस अमेरिकन राष्ट्राला अतिशय वादळी अनुभवाचे गेले. सरहद्द प्रदेशांत अनुभवावयास येणारी रानटी स्वरूपाची अस्वस्थता त्या काळीं अमेरिकेंत होती. सॅम हाऊस्टन हा सरहद्द प्रदेशांतच वाढल्यामुळें त्याच्याहि ठिकाणीं ती रानटी प्रवृत्ति होती.

अगदीं लहानपणीं तो हूड व स्वप्नरंजनी मुलगा असतांना टेनेसीच्या सरहद्दीवरील आपल्या घरांतून तो पळून गेला होता. इंडियनांच्या एका चेरोकी टोळीनें त्याला आपल्यांत घेऊन वाढविलें होतें. को-लों-नें असें त्यांनीं त्याचें नांव ठेवलें होतें. १८१३सालीं अँड्र्यू जॅक्सनच्या हाताखालीं हाऊस्टन इन्फन्ट्री ऑफिसर होता, त्यावेळीं त्याच्या उजव्या बाहूवर शत्रूच्या बंदुकींतील गोळ्यांनीं वर्षाव् करून त्याची चाळण करून टाकली होती. हॉर्स-शू येथील लढाईंत हा प्रकार घडला. त्याच्याबरोबरचे सैनिक भिऊन टेकड्यांत मागें राहिले. तेव्हां हाऊस्टन धाडस करून शत्रूवर चाल करून गेला आणि वर म्हटल्याप्रमाणें जखमी झाला. निसर्गतःच तो मोठा अभिनयपटु होता. त्याचें शरीर सुंदर व डौलदार होतें. शोभिवंत पोषाख व अलंकारिक भाषण याची त्याला मोठी हौस असे. टेनेसीमध्यें फिर्यादीचा वकील म्हणून तो भराभर मोठ्या लौकिकास चढला, कॉंग्रेसमध्येंहि निवडून आला आणि वयाच्या ३५ व्या वर्षीं गव्हर्नर झाला. तो गव्हर्नर असताना इतका लोकप्रिय झाला होता कीं तो राष्ट्रपति म्हणून निवडला जाईल अशी त्याचा मित्र जॅक्सन याला अपेक्षा होती. पण लोकप्रियतेच्या शिखरावर पोंचला असता त्यानें गव्हर्नरपदाचा राजीनामा दिला. तो त्यानें कां दिला हें कधींच कळलें नाहीं. एक कारण असें दिसतें कीं त्याच्या लग्नानंतर थोड्याच दिवसांत, त्याची तरुण आणि सुंदर पत्नी ही केवळ तिच्या महत्त्वाकांक्षी बापाच्या सक्तीमुळें त्याच्याशीं लग्न करायला तयार झाली होती पण तिचें प्रेम दुसऱ्या कुणावर तरी होतें असें, त्याला आढळून आलें. त्यामुळें त्याच्या भावनांचा चक्काचूर झाला. पूर्वीं त्यानें सुसंस्कृतीचें जग सोडून चेरोकींचा आश्रय घेतला होता. आतां तो दारुडा आणि व्यभिचारीहि झाला. अशा प्रकारें त्यानें वैयक्तिक जीवनांत वनवास पत्करला होता, तसाच त्यानें तो राजकारणांतहि पत्करला. पुढें पुष्कळ वर्षांनीं त्याचें मन पुन्हा समतोल झालें. तो ध्येयनिष्ठेनें

वागूं लागला तेव्हां, हाऊस्टन ज्याच्याशीं एकनिष्ठेनें वागे त्या जनरल जॅक्सननें हाऊस्टनला टेक्ससला पाठविलें. तेथें त्याच्या लष्करी शौर्याच्या कथा या अमेरिकन लोककथा झाल्या. पुढें त्याचें दुसरें लग्न झालें तें त्याच्या पसंतीचेंच झालें. पण रणांगणावरील साहस व प्रशंसा यांपैकीं कशानेंहि त्याच्या अंत:करणांतील खिन्नता व उदासवृत्ति नष्ट झाली नाहीं. १८५६ सालीं ही खिन्नता व उदासवृत्ति राजकीय पराभवाच्या दर्शनानें अधिकच तीव्रतेनें प्रतीत होऊं लागली, असें कांहीं इतिहासकारांचें म्हणणें आहे.

+ + + +

पण भावी पराभवाची कुजबुज ऐकून खिन्नपणानें स्वस्थ बसणें हा हाऊस्टनचा स्वभाव नव्हता. अंगावर दगड कोसळून तो आपणांस चिरडून टाकील असें दिसत असलें तरी टक्कर द्यायची अशी त्याची वृत्ति होती. सिनेटच्या पावसाळी सुटींत त्यानें टेक्ससमध्यें अनेक दौरे काढले. त्या दौऱ्यांत "कल्हाऊन हा एक अविचारी बोलघेवडा आहे, जेफर्सन डेव्हिस हा महत्त्वाकांक्षी तारा आहे, पण सर्पासारखा निष्ठुर व थंड आहे, उत्तरेकडील लोक माथेफिरू आहेत, तर दाक्षिणात्यांच्या महत्त्वाकांक्षा माथेफिरूपणाच्याच आहेत," इत्यादि स्वरूपाची टीका तो करीत असे. अनेक वर्षें लाल इंडियन टोळयांच्या अर्धरानटी अवस्थेंत त्यानें घालविलीं असल्यानें उच्चाधिकाराबद्दल त्याच्या ठिकाणीं फारसा आदर राहिला नव्हता. अँड्र्यू जॅक्सनला हाऊस्टन हा आदर्श महापुरुष असें मानीत असून जॅक्सनचा वैरी असलेल्या एका कॉंग्रेससदस्यावर हाऊस्टननें शारीरिक हल्ला चढविला होता. (या हल्ल्यासंबंधानें पुढें एकदां मित्राशीं बोलताना हाऊस्टन म्हणाला, "मी माझ्या आयुष्यांत इतक्या क्षुद्रपणें कधींहि वागलों नाहीं. मला वाटलें एका भयंकर कुत्र्याशीं मला लढावें लागेल. पण शेवटीं तो माणूस अगदीं भिकार कुतरड्यासारखा ठरला.")

१८५७च्या गव्हर्नरच्या निवडणुकीच्या वेळीं आपण उमेदवार असल्याचें जाहीर करून टेक्ससच्या अधिकारी वर्गावर हल्ला करण्याची मोहीम त्यानें काढली. तो आतां डेमोक्रॅट पक्षाचा प्रतिनिधि म्हणून रहाणार नव्हता. कोणत्याहि गटाचा अथवा एखाद्या वृत्तपत्राचाहि तो प्रतिनिधि नव्हता. सिनेटचा राजीनामा देण्याचेंहि त्यानें नाकारलें. सॅम हाऊस्टन व्यक्ति म्हणून गव्हर्नरपदाच्या निवडणुकीस उमेदवार होणार असें त्यानें जाहीर केलें. तो म्हणाला,

"मला टेक्ससच्या राजकारणाचें पुनरुज्जीवन करावयाचें आहे. लोकांना कांहीं तरी प्रक्षोभन हवें असतें ना ? इतर कोणाहि इतकें मी तें त्यांना देईन."

आणि खरोखरच लोकांच्या प्रक्षोभाला त्यानें भरपूर खाद्य पुरविलें. डेमोक्रॅटिक टेक्ससला इतका निकराचा निवडणूकलढा असा हा पहिल्यानेंच अनुभवावयास मिळाला. ते दिवस कडक उन्हाळ्याचे होते. घामानें अंगाला चिकटलेला शर्ट त्याला वरचेवर बदलावा लागे. टेक्ससच्या सर्व प्रदेशांत अगदीं कोन्याकोपऱ्या-पर्यंत त्यानें प्रखर शिव्यांनीं आणि विध्वंसक उपरोधानें भरलेलीं भाषणें लोकांना ऐकविलीं. तो सहा फुटाहून अधिक उंच होता. बाणासारखा तो ताठ उभा राही त्याचे मज्जातंतु दांडगे व डौलदार दिसत. दृष्टि मोठी खोचदार असून शत्रूवर तो तिरस्कार आणि उपहास ओकीत असे. सिनेटमधील सभ्यतेच्या मर्यादेमुळें जी जिभेची तीक्ष्णता त्याला लपवावी लागे, ती या सभांतून मोकाट सोडून तो आपल्या प्रतिस्पर्ध्यांच्या राजकीय उखाळ्यापाखाळ्या काढी. एका विरोधी वृत्तपत्रानें त्याच्या एका व्याख्यानाचें वर्णन—बरेंच यथार्थपणें—पुढीलप्रमाणें केलें होतें. "गर्व व शिवराळपणा यांचें मिश्रण या व्याख्यानांत झालेलें होतें—ऐतिहासिक सत्य त्यांत कांहीं नव्हतें—भाषेची सभ्यता व सफाई त्यांत शून्यच होती—चोर, गुंड, खुनी, हलकट अशा विशेषणांनीं आरंभापासून अखेरपर्यंत हें भाषण भरलेलें होतें."

या व्याख्यानांच्या दौऱ्यावर असतांना एका खेड्यांतील सरकारी इमारतींत एकदां त्याला बोलण्याची परवानगी नाकारण्यांत आली. तेव्हां हाऊस्टन म्हणाला "ठीक आहे—कांहीं हरकत नाहीं. मी कांहीं येथें कर भरत नाहीं. या इमारतीची एक वीट अथवा एक खिळाहि खरेदी करण्याला मीं पदरमोड केलेली नाहीं. पण माझा आवाज ऐकूं जाईल एवढ्या टप्प्यांत जर कोणी असा माणूस असेल कीं ज्याला माझें भाषण ऐकावयाचें आहे तर त्यानें पलीकडच्या त्या टेकडीपर्यंत माझ्याबरोबर यावें. टेक्ससच्या भूमीवर बोलण्याचा मला हक्क आहे. कारण माझ्या रक्तानें टेक्ससची जमीन मीं भिजविली आहे."

देशद्रोही आणि निर्बुद्ध असा त्याचा सर्वत्र दुर्लौकिक होऊं लागला. त्यावेळीं आपल्या पत्नीस लिहिलेल्या पत्रांत हाऊस्टन लिहितो : "यांनीं निंदेची घाण कितीहि माझ्या डोक्यावर ओतली तरी बदकाच्या अंगावर ओतलेलें पाणी जसें त्याला स्पर्श न करता वाहून जातें, त्याप्रमाणें ही निंदा मला स्पर्श न करता वाहून जाईल."

पण कॅन्सस बिलावर आणि दाक्षिणात्यांच्या इतर योजनांवर त्यानें जी भूमिका घेतली तीमुळें संतापलेल्या मतदारांना तो ती भूमिका समजून देऊं शकला नाहीं. यामुळें टेक्ससमध्यें हाऊस्टनला त्याच्या कारकीर्दीची पहिली राजकीय थप्पड बसली. गॅझेट नांवाचें पत्र त्याच्या विरुद्ध होतें. त्यानें लिहिलें: "हाऊस्टननें आतां सिनेटचा राजिनामा दिला पाहिजे. फक्त दैनिक भत्ता उकळण्यासाठीं केवळ भाकडपणें त्यानें त्या जागेवर बसून राहूं नये." पण आपला पराभव फार मोठ्या बहुमतानें होणार नाहीं अशी खात्री वाटून हाऊस्टन वॉशिंग्टनमधील आपले शेवटचे दिवस संपविण्यासाठीं आला. टेक्ससच्या दौऱ्यानें त्याचीं मतें अधिकच दृढ झालीं होतीं. सिनेटमधील एका सभासदानें "कॅन्ससनेब्रास्का बिलाला हाऊस्टननें विरोध केल्यामुळें हाऊस्टनचा पराभव निश्चित झाला आहे" असा त्याला टोमणा मारला. त्यावर हाऊस्टननें गोडपणें हासून उत्तर दिलें, "गोष्ट खरी आहे. माझ्या मतदारांनीं आपल्या सेवेंतून मला मुक्त करण्याची जी इषारत दिली तीमुळें मी सेवानिवृत्त होणार अशी माझी खात्री झाली असून ती बद्दल मला समाधानच वाटत आहे." त्याचें हें म्हणणें लौकरच खरें ठरलें. १० नोव्हेंबर १८५७ रोजीं टेक्ससच्या कायदेमंडळानें त्याला बडतर्फ करून दक्षिणेच्या बाजूनें अधिक चढाईनें बोलणाऱ्या एका पुढाऱ्यास हाऊस्टनच्या जागीं निवडलें.

आपल्या सहकारी सिनेटरांचा निरोप घेताना हाऊस्टन म्हणाला : "माझे हात निष्कलंक आहेत. माझें मन स्वच्छ आहे. मी मेल्यानंतर माझ्या थडग्यावरील पाटीवर पुढील शब्द लिहिले जावे—'त्यानें स्वदेशावर प्रेम केलें....तो देशभक्त होता. संघराज्याशीं तो एकनिष्ठ होता !' मला याहून अधिक मोठी प्रशंसा नको आहे. याच माझ्या गुणासाठीं आज हें आत्मार्पण मला करावें लागत असलें तर माझ्यावर सुरी चालवणाऱ्यांच्या विरुद्ध मी उभा आहें यांतच मला समाधान आहे."

पण सॅम हाऊस्टन सिनेटमधून सेवानिवृत्त झाला एवढ्यावरच आपण त्याची ही कथा संपवूं शकत नाहीं. तो टेक्ससमध्यें आपल्या शेतीवर परत आला पण दोन वर्षांपूर्वी ज्या गव्हर्नरानें निवडणुकींत आपला पाडाव केला होता तो टेक्ससला संघराज्यांतून फोडून काढूं पहात आहे असें जेव्हां हाऊस्टनला दिसून आलें तेव्हां तो आतां वयोवृद्ध झालेला टेक्सासचा योद्धा सॅम हाऊस्टन १८५९ सालीं गव्हर्नर-

पदासाठीं पुन्हा उमेदवार म्हणून उभा राहिला. यावेळींहि कोणताहि पक्ष, कोणतीहि संघटना उथवा कोणतेंहि वृत्तपत्र त्याच्या पाठीशीं नव्हतें. मतप्रचाराचें त्यानें फक्त एक भाषण केलें. अजूनहि गोड असणाऱ्या आपल्या त्या आवाजांत तो श्रोत्यांना म्हणाला: "अमेरिकन राज्यघटना व अमेरिकन संघराज्य यावरच माझा भरंवसा आहे. मी आयुष्यभर जॅक्सोनियन लोकशाहीवर विश्वास ठेवला, तिचाच पुरस्कार केला व अधिकारावर असता त्याच धोरणानें वागलों.—राजकारणांत मी सनातनी आहें. ज्या प्राचीन तत्त्वावर आमचें सरकार स्थापलें गेलें आहे त्या तत्त्वांना मी एकनिष्ठेनें चिकटून राहिलों आहें."

संघराज्यांतून फुटून निघणें आणि टेक्ससचा गुलामांचा व्यापार चालू करणें हे प्रश्न या निवडणुकींत वादग्रस्त नाहींत असे हाऊस्टनचे विरोधक पुन्हा पुन्हा सांगत. पण हाऊस्टननें त्याच मुद्यावर जोर दिला. आणि मेक्सिकन व इंडियन लोकांच्या दहशतवादापासून अधिक चांगल्या प्रकारें टेक्ससचें रक्षण करण्याचें आश्वासन त्यानें लोकांना दिलें. या वेळची प्रचारमोहीम उभय पक्षीं मोठी विद्वेषपूर्ण झाली. डेमोक्रॅटिक पुढारी आणि वृत्तपत्रें यांनीं हाऊस्टनवर शिव्यांचा वर्षाव केला, त्याजवर भेकडपणाचे व अनीतीचे आरोप यावेळीं पुन्हा करण्यांत आले. पण संघराज्यांतून फुटून निघण्याचा प्रश्न जरी अजून दूरचा होता तरी लोकांच्या मनावर हाऊस्टनच्या प्रचाराचा परिणाम हाऊस्टनला अनुकूल असा झाला. त्याच्या पूर्वायुष्यांतील त्याचे अनेक सहकारी तेथें होते; त्यांनीं त्याच्याकरितां खटपट केली. हाऊस्टनच्या विरोधकांनीं चालविलेला राज्यकारभार फार वाईट प्रकारें चालविला असल्यामुळें लोक चिडले व त्यामुळें ते हाऊस्टनला अनुकूल झाले. सिनेटमधून निवृत्त होण्यापूर्वीं त्यानें एका नीतिभ्रष्ट जजाची अब्रू चव्हाट्यावर आणली होती. यामुळें हाऊस्टनला नवी लोकप्रियता मिळाली होती. टेक्ससचा वीर म्हणून त्याला पूर्वीं एकदां जें लोकांचें प्रेम मिळालें होतें तें टेक्ससला हाऊस्टन परत आलेला पाहून पुन्हा एकदां भरतीच्या जोरानें उसळलें. या सर्व गोष्टींचा अनुकूल परिणाम होऊन दोन वर्षांपूर्वींचा त्याचा पराभव उलटला व यावेळीं हाऊस्टन गव्हर्नर म्हणून निवडून आला. दक्षिणेकडील हाऊस्टनच्या एकांतिक विरोधकांना दहा वर्षांत हा पहिला पराभव पत्करावा लागला होता, विरोधी वृत्तपत्रांचा अगदीं जळफळाट झाला. "हा देशद्रोही असून याचा इतका पाडाव झाला पाहिजे कीं याला पुन्हा डोकें वर काढता येऊं

नये," "दक्षिणेचा अत्यंत दुष्ट शत्रु असा दक्षिणी" इत्यादि प्रकारें कठोर शब्दांनीं वृत्तपत्रांनीं त्याची निंदा केली.

त्याच्या सर्व सार्वजनिक आयुष्यांत तो जुन्या जॅक्सोनियन राष्ट्रवादास चिकटून राहिला होता. त्या राष्ट्रवादाच्या अत्यंत कठोर कसोटीची ही वेळ होती. त्या वेळचे त्याला सर्वथैव विरुद्ध असणारें डेमोक्रॅटिक कायदेमंडळ हें खरेंखुरें लोकप्रतिनिधि नाहीं असें ठरवून त्यानें आपलें गव्हर्नरपदाचें पहिलें भाषण करताना जुनी परम्परा मोडली आणि कायदेमंडळाच्या संयुक्त अधिवेशनासमोर बोलण्याऐवजीं कॅपिटॉलच्या म्हणजे राजगृहाच्या पायऱ्यांवरून प्रत्यक्ष लोकांसमोर भाषण केलें. तेथें खुल्या मैदानावर जमलेल्या प्रचंड लोकसमुदायास उद्देशून हाऊस्टन म्हणाला: "मी लोकांचा गव्हर्नर आहें, कोणत्याहि एका पक्षाचा नाहीं. ज्यावेळीं टेक्ससनें आपलें भवितव्य अमेरिकन संघराज्यांत आणून टाकलें त्यावेळीं टेक्सस उत्तरेंत अथवा दक्षिणेंत सामील झालेलें नाहीं. अमेरिकन संघराज्याशीं जोडलेला तो संबंध प्रादेशिक नसून राष्ट्रीय आहे."

पण त्याच्या या निवडणुकीनें झालेल्या जखमा पुढें कधींच बुजल्या नाहींत. १८६० सालीं न्यूयॉर्कच्या एका पुढाऱ्यानें हाऊस्टन सर्व देशाचा पाठिंबा मिळवून विजयी होईल असें सांगून, डेमोक्रॅटिक नॅशनल कन्व्हेन्शनमध्यें राष्ट्रपति-पदासाठीं उमेदवार म्हणून हाऊस्टनचें नांव सुचविलें. तेव्हां गव्हर्नरपदाच्या निवडणुकींतील हाऊस्टनचा प्रतिस्पर्धी रनेल्स यानें त्यास विरोध केला. तो टेक्ससच्या शिष्टमंडळाचा पुढारी म्हणून आला होता. हाऊस्टनच्या नांवाचा उच्चार होताच रनेल्स ताडकन उठून म्हणाला, "महाराज, ईश्वरसाक्ष सांगतों कीं, गव्हर्नरपदाच्या निवडणुकींत अगदीं अलीकडे हाऊस्टननें मला उलथून पाडलें. त्याच्या प्रशंसेचा कोणताहि शब्द मला अतिशय यातना देतो."

१८६० सालीं गव्हर्नर या नात्यानें कायदेमंडळाला पहिला संदेश देताना वरीलसारख्या विरोधकांना उद्देशूनच हाऊस्टन म्हणतो:

"वाट चुकलेल्या या अत्युत्साही लोकांच्या वल्गना कांहींहि असोत अथवा संघराज्यांतून फुटून निघण्याची माथेफिरू आकांक्षा बाळगणारे लोक कितीहि धमक्या देवोत. सर्वांच्याच असलेल्या या आपल्या राष्ट्रीय मायभूमीबद्दल टेक्ससमधील सनातनी लोकांच्या अंत:करणांत वाटणाऱ्या जुन्या प्रेमाची ज्योत अजून पूर्वीच्याच तेजानें झळकत आहे. टेक्सस राज्यघटनेला मान देईल. आणि संघ-

राज्याच्या बाजूस राहील. राष्ट्र या नात्यानें आपला बचाव होण्याचा तोच एक मार्ग आहे. हा मार्ग आपण उध्वस्त केला तर अराजक आपल्या वाट्यास येईल.

दाक्षिणात्य कन्व्हेन्शनला टेक्ससनें प्रतिनिधि पाठवावेत असें आमंत्रण साऊथ कॅरोलिनाकडून आलें. "गुलामगिरी या आपल्या संस्थेवर, दाक्षिणात्यांच्या जन्मसिद्ध हक्कांवर हल्ले होत आहेत. त्यांना प्रतिकार करण्यासाठीं या," असें तें आमंत्रण होतें. हाऊस्टननें हें आमंत्रण औपचारिक रीत्या कायदेमंडळाकडे पाठविलें. पण त्याबरोबरच "संघराज्य हें कायम रहाणार आहे हें लक्षांत ठेवा, असा आदेशहि दिला व मोठ्या चातुर्यानें कारवाई करून त्यानें तें आमंत्रण नाकारावयास लावलें. "आपल्या या टेक्ससमध्यें कोणी एखादा ब्रूट्स निर्माण होऊन येथील राक्षसी प्रवृत्तीचा संहार करील काय?" असें भाषण करण्यास ज्यॉर्जियाचा सिनेटर आयव्हर्सन् याला हाऊस्टननेंच प्रेरणा दिली. १८६० च्या राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकींत संघराज्यांतून फुटून निघण्याची भावना अतिशय बळावली, तेव्हां लिंकन निवडून आला तर कोणती भूमिका घेतो हें आपण पाहूं, थोडा धीर धरा, अशी विनंति हाऊस्टन करूं शकला. पण स्वत: हाऊस्टन हा लिंकन बरोबर रिपब्लिकन कन्व्हेन्शनमध्यें उपराष्ट्रपतिपदाचा उमेदवार म्हणून उभा केला जाऊन त्याला कांहीं थोडीं मतेंहि विनाप्रयास मिळालीं. एवढ्यामुळेंच त्याचे विरुद्ध त्याच्या शत्रूंना युक्तिवादाचा खूप दारूगोळा सांपडला. पुढें ऑगस्टमध्यें हेंडरसन हें शहर मोठ्या गूढ परिस्थितींत जाळलें गेलें त्यावेळीं निग्रो लोकांवर त्या जळतीचा आरोप करण्यात येऊन निग्रोंचा खूप छळ झाला. निग्रो बंड करून जाळपोळ करीत आहेत अशा बातम्या उठल्या. त्यामुळें हा छळ आणखी वाढला. पण गव्हर्नर हाऊस्टन त्यावर कांहींहि करूं शकला नाहीं. वॅको येथें हाऊस्टननें भाषण करून संघराज्यांतून फुटून निघणें हें अविचाराचें आहे असें मत मांडलें. त्यानंतर तो आपल्या हॉटेलांत ज्या खोलींत झोपला होता त्याच्या मागील बाजूस विरोधकांनीं मोठा स्फोट घडवून आणला. सुदैवानें हाऊस्टला इजा झाली नाहीं. त्याच्या जीवितास अशा प्रकारें धोका उत्पन्न झाला असतांच सप्टेम्बरमध्यें तो आजारी पडला. पण जीविताचा धोका अथवा दुखणें या कशाचीच फिकीर न करता अखेरची एक विनंति करण्याकरितां तो आजारीपणाचें आंथरून सोडून लोकांपुढें आला. हाऊस्टन म्हणाला:

"एका प्रादेशिक वादानें दुसऱ्या प्रादेशिक वादाचा पराभव करावा अशी माझी

इच्छा नाहीं. प्रादेशिक वादाचा पराभव राष्ट्रवादानें करावा असें मी मागतों आहें. माझी ही भावना नवी नव्हे १८५६ सालीं अमेरिकन सिनेटमध्यें मीं ही भावना बोलून दाखविली. आजहि तीच भावना मी बोलतों आहें. त्यावेळीं मला देशद्रोही म्हणून हिणविण्यांत आलें तेंच आजहि घडतें आहे. घडूं दे, खुशाल घडूं दे ! मीं माझ्या देशासाठीं जे उपास काढले, जे श्रम केले, जीं संकटें सोसलीं त्यापैकीं कांहींहि न केलेले लोक मला आज देशद्रोही म्हणत आहेत. आणि याचें कारण मी राज्यघटनेच्या आज्ञेपुढें आणि त्या राज्यघटनेअन्वयेंच स्थापन झालेल्या सत्ताधाऱ्यांपुढें मान लववितों हें होय. मीं संघराज्यासाठीं जेवढे सोसले आहे तेवढें सर्व त्यांना सोसूं दे. म्हणजे माझ्या प्रमाणेंच त्यांच्या अंतःकरणांत संघराज्याबद्दलची भावना इतकी तीव्र होईल कीं संघराज्याला धक्का लागतोसें दिसतांच त्यांनाहि माझ्याप्रमाणें प्राणांतिक वेदना होतील...मला देशद्रोही म्हणणारे हे लोक कोण आहेत ? राष्ट्राच्या निशाणाखालीं कवाईत करून त्याचा बचाव करण्याला ते तयार आहेत काय ? माझें निशाण हें राष्ट्राचें निशाण आहे. जोंपर्यन्त हें निशाण माझ्या डोक्यावर मोठ्या डौलानें फडफडत आहे, माझे विरोधक ज्या संकंटप्रसंगांत नव्हते त्या संकटप्रसंगींहि जें हें निशाण माझ्या डोक्यावर फडफडत होतें तें असेंच फडफडत आहे, तोंवर मला कोणी देशद्रोही म्हटल्याचें मी विसरून जाईन."

अब्राहम लिंकन राष्ट्रपति म्हणून निवडून आला. त्याची विरोधी प्रतिक्रिया म्हणून ताबडतोब टेक्सस प्रदेशांत गुलामगिरीवादाचें निदर्शक असें 'लोन स्टार' हें निशाण सर्वत्र फडकविण्यांत आलें. वातावरणांत प्रक्षोभ अतिशय होता. आणि युद्ध सुरूं करण्याची ईर्षा सर्वत्र उत्पन्न झाली होती. "टेक्ससनें संघराज्यांत राहून संघराज्याच्या बाजूनें लढावें असा हाऊस्टननें दिलेला आदेश कोणीहि ऐकून घेईना. हाऊस्टनचा आदेश हा गुलामगिरीचा आदेश आहे असें सर्व वृत्तपत्रांनीं लिहिलें. संघराज्यांतून फुटून निघण्याचा विचार करण्यासाठीं कन्व्हेन्शन बोलावण्यांत आली आणि गव्हर्नर हाऊस्टनचा आदेश झुगारून देण्यांत आला. सॅम हाऊस्टननें सत्ताधारी गव्हर्नर म्हणून रहाण्यासाठीं निकरानें झगडण्याचें ठरवून राज्यकायदेमंडळाचें खास अधिवेशन बोलावलें. त्यानें दक्षिणेंतील व उत्तरेंतील एकांतिक मताच्या लोकांचा धिःकार केला. "संघराज्यांत आपले हक्क राखले जातील याबद्दल मी निराश झालेलों नाहीं." असें मत त्यानें

आग्रहानें मांडलें. असें हक्करक्षण संघराज्यांत होऊं शकलें नाहीं तर टेक्ससचें स्वतंत्र राज्य स्थापूं, पण दाक्षिणात्यांच्या छावणींत जाणें नको असें तो म्हणाला.

पण टेक्ससच्या कायदेमंडळानें संघराज्यांतून फुटून निघण्यासाठीं बोलावलेल्या कन्व्हेन्शनच्या पुढाऱ्यांना मान्यता दिली. संघराज्याचें टेक्ससमध्यें जे सेनापति होते त्यांनीं संघराज्याची बाजू सोडली. यामुळें कन्व्हेन्शनचे पुढारी संघराज्यांतून फुटून निघण्याचें धोरण पुढें दामटूं लागले. पण ज्या गव्हर्नर सॅम हाऊस्टनचा ते द्वेष करीत व त्याबरोबरच ज्याला भीतहि असत त्यानें कन्व्हेन्शनमध्यें प्रकट होऊन थोडा वेळ या पुढाऱ्यांना विघ्न आणलें. ज्या दिवशीं फुटून निघण्याचा वटहुकूम मंजूर करावयाचा होता त्या दिवशीं गव्हर्नर सॅम हाऊस्टन व्यासपीठावर ताठरपणें स्तब्ध बसून राहिला. त्याचे म्हणजे संघराज्याचे जे थोडेसे मित्र त्या सभागृहामध्यें होते त्यांना त्यामुळें धैर्य आलें. व्हार्टन हा इतिहासकार लिहितो : "सॅन जॅसिंटो या टेकडीवर आश्चर्यकारक अशा धाडसानें सॅम हाऊस्टननें पूर्वीं टेक्ससच्या युद्धांत चढाई केली होती, असें सॅम हाऊस्टनच्या धाडसाचें जे लोक कौतुकानें वर्णन करतात त्यांना मी सांगतों कीं ऑस्टिन येथें भरलेल्या संघराज्यांतून फुटून निघण्याच्या कन्व्हेन्शनमध्यें प्रवेश करून तेथें जमलेल्या लोकांना हाऊस्टननें ज्यावेळीं भयचकित केलें त्यावेळीं त्यानें दाखविलेलें धाडस सॅन जॅसिंटोच्या प्रसंगाच्या हजारपट मोठें होतें." हाऊस्टनच्या उपस्थितीमुळें जेम्स् डब्ल्यू. थ्रॉक मॉर्टन याला धैर्य येऊन त्यानें फुटून निघण्याच्या विरुद्ध आपलें मत दिलें. (अशीं एकूण सात मतें विरुद्ध पडलीं होतीं.) तेव्हां थ्रॉक मॉर्टनचा मोठ्या आरडाओरड्यानें धिःकार करण्यांत आला. त्यावर थ्रॉकमॉर्टन खुर्चीवर उभा राहून म्हणाला, "जेव्हां बेतालपणें प्रक्षुब्ध झालेले लोक देशभक्तांचा धिःकार करूं लागतात, अशा वेळीं देशाच्या भवितव्याबद्दल देशभक्तानें भीतिग्रस्त होणें स्वाभाविक आहे."

पण तो वटहुकूम त्या कन्व्हेन्शनमध्यें मंजूर होऊन जेव्हां एक महिन्यानंतर त्यावर सार्वमत घेण्यांत आलें त्यावेळीं थ्रॉकमॉर्टनच्या अर्थानें कोणीच 'देशभक्त' असा उरला नव्हता. ताबडतोब त्या लढवय्या माजी सिनेटरानें (हाऊस्टननें) टेक्सस संघराज्यांत रहावें यासाठीं एकट्यानें मतप्रचारमोहीम सुरू केली. तो सर्व टेक्सस राज्यांत हिंडत असता बेफाम चिडलेल्या जमावानें त्याच्यावर दगडफेक केली, देशद्रोही म्हणून त्याचा धिःकार केला. वॅको येथें त्याच्या प्राणावरहि

संकट आलें होतें. बेल्टन येथें एक सशस्त्र गुंड अचानक उठून त्याच्यावर धांवला. पण हाऊस्टननें त्याच्यावर टक लावून पहात आपले दोन्ही हात आपल्या दोन्ही पिस्तुलावर ठेवले व तो मोठ्यानें ओरडला, "सभ्य स्त्री-पुरुष हो, आपल्या जागीं स्वस्थ बसून रहा. एक कुत्रें दरींतल्या सिंहावर भुंकतें आहे. याहून या गोष्टीला अधिक महत्त्व नाहीं." सर्व राज्यभर अशा रीतीनें तो प्रचार करीत हिंडला आणि आपल्या सामर्थ्यवान उपरोधिक भाषणांनीं त्यानें आपल्या शत्रूंच्या बुद्धीचा गोंधळ उडवून टाकला. "संघराज्यांतून फुटून निघणाऱ्यांच्या पुढाऱ्यांबद्दल तुम्हांला काय वाटतें, तें प्रामाणिकपणें सांगा," असें त्याला विचारता हाऊस्टन म्हणाला, "त्याच्या ठिकाणीं कुत्र्याचे सर्व गुण आहे, फक्त विश्वासूपणा नाहीं." हाऊस्टन आतां ७० वर्षांचा झाला होता. पण अजूनहि त्याचे डोळे तीक्ष्ण होते. शुभ्र केस भव्य दिसत होते. त्याची उंच, ताठ शरीरयष्टि श्रोत्यावर छाप पाडीत होती. गॅल्व्हेस्टन् येथें त्यानें आपला दौरा संपविला. तेथें जमलेला जमाव चिडलेला होता व हाऊस्टनचा धिःकार करीत होता. त्या जमावाला उद्देशून हाऊस्टन आवेशानें म्हणाला, "संघराज्यांतून फुटून निघण्याच्या प्रयत्नामुळें रक्तपात होईल असें मी सांगतों. या माझ्या म्हणण्याची तुम्ही कुचेष्टा करतां. पण तुमच्या नशिबीं काय लिहून ठेवलें आहे तें मी तुम्हांला सांगतों. हजारों मूल्यवान माणसांचे प्राण तुम्ही गमवाल. लक्षावधि डॉलरचा खजिना रिकामा कराल आणि ईश्वर तुमच्या बाजूस आहे कीं नाहीं याबद्दल मला शंका आहे. संघराज्य टिकवून धरावयाचें असा उत्तरेनें निर्धार केला आहे हें लक्षांत ठेवा."

त्याची ही भविष्यवाणी कोणीं ऐकली नाहीं. २३ फेब्रुवारी रोजीं टेक्ससनें प्रचंड बहुमतानें फुटून निघण्याचा निर्णय ठरविला. २ मार्च रोजीं हाऊस्टनचा वाढदिवस होता. पूर्वीं टेक्सस स्वतंत्र झालें त्यावेळचाहि तोच स्वातंत्र्य-दिन होता. ऑस्टिनमध्यें भरलेल्या खास कन्व्हेन्शननें त्या दिवशीं टेक्सस संघराज्यांतून फुटून निघाल्याचें जाहीर केलें. अजूनहि गव्हर्नर हाऊस्टन आपली बाजू उभारण्याचा प्रयत्न करीत होता. या बाबतींत माझें मत मी कायदेमंडळाला कळवीन असें त्यानें जाहीर केलें. कन्व्हेन्शनचा कायदेशीर अधिकार कन्व्हेन्शननें फुटून निघण्याचा निर्णय जाहीर केल्यानंतर संपला. त्यासंबंधानें पुढील अधिकार गव्हर्नराचे आहेत असें हाऊस्टननें कन्व्हेन्शला कळविलें, तेव्हां कन्व्हेन्शनचे सभासद संतापले आणि त्यांनीं १०९ विरुद्ध २ इतक्या दणदणीत बहुमतानें

टेक्सस दाक्षिणात्य कॉन्फिडरसींत सामील झालें असें जाहीर करून १४ मार्च रोजीं सर्व सरकारी अधिकाऱ्यांनीं नव्या राज्याला आपली निष्ठा अर्पण करण्या-बद्दल हुकूम फर्माविला. त्यावर गव्हर्नर हाऊस्टनच्या सेक्रेटरीनें कन्व्हेन्शनला कळविलें कीं, "गव्हर्नर हाऊस्टन कन्व्हेन्शनचें अस्तित्व मानीत नाहीं आणि कन्व्हेन्शनचे हुकूम आपणांवर बंधनकारक आहेत असेंहि तो मानीत नाहीं."

१४ मार्च रोजीं जें दृश्य दिसलें त्या विषयीं तेथें हजर असलेला एक लेखक लिहितो: "कन्व्हेन्शनचें सभागृह गच्च भरून गेलें होतें...लोकांच्या अंगीं जणू वीज संचरली होती. त्यांच्या अंगीं त्वेष सळसळत होता. सूड घेण्याची संधि देणारें युद्ध केव्हां येतें या उत्कंठेनें लोकांचा संतापाग्नि प्रज्वलित झाला होता. संतापाच्या व ईर्षेच्या उद्गारांनीं वातावरण दुमदुमून गेलें होतें. संताप व विजयोत्साह यांच्या आरोळ्या ऐकूं येत होत्या. मध्येंच कोणी हौस्टनविरोधी प्रतिज्ञा करी तर दुसरा कोणी तिरस्काराचे उद्गार काढी. सॅम् हाऊस्टनचे शब्द मात्र कोणींहि ऐकून घेतले नाहींत.

ठरलेल्या वेळीं कन्व्हेन्शनच्या कारकुनाला सरकारी अधिकाऱ्यांची हजेरी घेण्यास फर्माविण्यांत आलें. त्या प्रचंड जमावांत एकदम शांतता पसरली. आपला जुना वीर पुरुष कोठें दिसतो का, म्हणून प्रत्येकाची दृष्टि त्या गर्दींतून शोध घेत होती.

"सॅम हाऊस्टन," कन्व्हेन्शनच्या कारकुनानें जोरानें नांव पुकारलें. "सॅम-हाऊस्टन...सॅम हाऊस्टन..." लोक तिरस्कारानें ओरडूं लागले. अमेरिकेच्या कॉन्फिडरेट राज्यांतील टेक्सस या राज्याचें गव्हर्नरपद अधिकृत रीत्या रिकामें झालें आहे असें जाहीर करण्यांत आलें. लेफ्टनंट गव्हर्नर एडवर्ड क्लार्क हा "क्षुद्र तिरस्करणीय, नाचरा आणि उद्धट माणूस त्या अधिकाराची शपथ घेण्यासाठीं पुढें आला. (एडवर्ड क्लार्क हा हाऊस्टनचा वैय्यक्तिक व राजकीय मित्र असल्यानें हाऊस्टनच्या गव्हर्नरपदाच्या तिकिटावरच त्याच्या जोडीला लेफ्टनंट गव्हर्नर म्हणून निवडून आला होता. त्यानें गव्हर्नरपदाची शपथ घेतल्यावर तो गव्हर्नर-च्या कचेरींत जाऊन सरकारी कपाटाचा ताबा मागूं लागला. तेथें हाऊस्टन पाठमोरा खुर्चीवर बसला होता. हळू हळू खुर्ची फिरवीत तो क्लार्कला सामोरा झाला. "कोण हो, तुम्ही ? तुमचें नांव काय ?" असा प्रश्न हाऊस्टननें त्याला मोठ्या तिरस्कारानें केला.)

कन्व्हेन्शनमध्यें शपथविधि चालू असता सॅनजॅसिंटोचा हा वीर पुरुष आयुष्यभर मिळालेला राजकीय लौकिक आणि लोकांच्या बद्दलचें प्रेम बाजूस सारून भग्न अंतःकरणानें, गव्हर्नर या नात्यानें शेवटचा संदेश लोकांना उद्देशून कसाबसा लिहीत होता.

"नागरिक बंधू हो, मी ही नवी शपथ घेण्याचें साफ नाकारतों. तुमचे हक्क व स्वातंत्र्य यांना मी वंदन करतों. पण तेच पायदळीं तुडविले गेले आहेत हें लक्षांत ठेवा. माझी सद्सद्विवेक बुद्धि व माझें पौरुष याबद्दल मला आदर आहे. मी ही शपथ घेणार नाहीं...पण टेक्ससवर माझें इतकें प्रेम आहे कीं मी टेक्ससवर यादवी आणि रक्तपात याचें संकट आणणार नाहीं. टेक्ससचा गव्हर्नर म्हणून शांततेनें माझा अधिकार मला गाजविता येत नसेल तर तो अधिकार टिकविण्याचा मी प्रयत्न करणार नाहीं. हा अधिकार चालविणें आतां मला अशक्य झालें असल्यानें मी शांतपणें अधिकार सोडून दूर जातों. मी ज्या तत्त्वांसाठीं लढलों तीं तत्त्वें मीं सोडण्याचें नाकारलें म्हणून मला पदच्युत करण्यांत आलें आहे. ज्या टेक्ससच्या स्वातंत्र्यासाठीं मी रणांगणावर लढलों त्यानें हा घाव माझ्यावर घालावा याचें मला दुःख होतें."

# विभाग ३ रा

## कालः स्थलः परिचय

उत्तर आणि दक्षिण यांच्यामध्यें जें यादवी युद्ध झालें तें दोन्ही पक्षीं फार महाग पडलें. आणि तरीहि तें संपल्यानंतर राजकीय आघाडीवर शांतता व एकजूट निर्माण झाली नाहीं. अॅप्पॅमिटॉक्स येथें शेवटची लढाई झाली व हा गृहकलह थांबला. पण त्यामुळें, युद्धकाळांत राजकीय आक्रमणें, आर्थिक लूट, आंतर प्रादेशिक विद्वेष यांनीं जो राष्ट्रशरीराचा छळ चालविलेला होता आणि राष्ट्र जें दुभंगून टाकलें होतें त्यांचा शेवट झाला नाहीं. मॅसन्‌डिक्सन रेषेच्या दोन्ही बाजूस जो तीव्र वैरभाव पसरला होता आणि ज्यानें डॅनियल वेब्स्टर, थॉमस् हार्ट बेन्टन, सॅम हाऊस्टन इत्यादींना लोकक्षोभांत भाजून काढलें होतें तो वैरभाव युद्ध संपल्यानंतरहि २० वर्षेपर्यंत तसाच धुमसत राहिला. उत्तरेकडील कांहीं लोकांना राष्ट्राच्या जखमा बांधावयाच्या होत्या आणि दक्षिणेंतील लोकांना दयेनें आणि न्यायानें वागवावयाचें होतें. खटला झालेला अँड्र्यू जॉन्सन आणि त्याच्यावर खटला झाल्या वेळीं त्याच्या बाजूस राहिलेले सिनेटर हे या मताचे होते. पण त्यांच्या विरोधकांनीं त्यांच्या ठिकाणीं देशभक्ति नाहीं असें म्हणून त्यांचा छळ केला. दक्षिणेंत कांहीं लोक असे होते कीं आपणांतील प्रादेशिक अहंकाराचें वेड आतां निघालें आहे असें दाखवूं इच्छीत होते. मिसिसिपीचा ल्युसियस् क्विन्टस् सिनसिनॅटस् लामार व याच्यासारखे इतर कांहीं लोक या मनोवृत्तीचे होते. त्यांच्यावर त्यांच्या मतदारबांधवांकडून "स्वपक्ष सोडून विजेत्या शत्रूस जाऊन मिळालेला फितुर" असे आरोप करण्यांत येऊं लागले. कॉन्फिडरसी पक्षाचा सेनापति बॉब्टूम्स यानें काँग्रेसकडे माफीचा अर्ज केला नव्हता. "तूं माफीचा अर्ज कां केला नाहींस", असें त्याला विचारता तो स्वाभिमानयुक्त गंभीरपणें म्हणाला, "क्षमा कशासाठीं ? मी कुठें अजून उत्तरेला क्षमा केली आहे ?"

हळू हळू गुलामांना मुक्ति देणें आणि समाजपुनर्घटना करणें यावरचे वाद कमी कमी झाले. नवे नवे पश्चिम प्रदेश अमेरिकेंत येऊं लागले. युद्धांत तुडविल्या गेलेल्या दक्षिणेंतले जुने प्रश्न संपले नवे प्रश्न उभे राहिले, सिनेटमध्यें नवे प्रतिनिधि आले. आतां तेथें सर्वश्रेष्ठ घटनापंडित येत नव्हते. अमेरिकन सार्वजनिक जीवनांत आतां घटनात्मक प्रश्नांना महत्त्व येत नव्हतें. पैसा विपुल होत होता. वैभवाचे मजल्यावर मजले चढत होते.· राजकीय संघटना अधिकाधिक बलवान होऊं लागल्या. नैतिक अध:पात अगदीं निर्लज्जपणें होऊं लागला. त्यामुळें राष्ट्राचें स्वरूप बरेंच पालटलें. लोकशाही कायदेमंडळ हें राष्ट्राच्या जीवनाचें प्रतिबिंब असावें लागतें; तसेंच अमेरिकन सिनेट होतें. बदललेल्या परिस्थितींत त्याचेंहि रूप बदललें. या गरजणाऱ्या कालखंडांत घटनात्मक चर्चा करणारे वक्ते न येता आर्थिक संघटनांचीं वकिलपत्रें घेतलेले वक्ते व राजकीय संघटनांचे म्होरके यावेळीं सिनेटमध्यें आले होते. देशांतल्या पुष्कळ अतिशय बुद्धिमान लोकांना कंटाळवाण्या व कोणाच्याहि लक्षांत न येणाऱ्या राजकीय पुढारीपणापेक्षां उद्योगधंदे आणि बँका यांमध्यें अधिक पैसा व कीर्ति मिळण्याची संधि आलेली होती. यामुळें कायदेमंडळाच्या वाट्याला बुद्धिमान माणसें थोडींच येत. (एक तत्कालीन संपादक लिहितो:" डॅनियल वेब्स्टर जर त्या काळीं हयात असता तर तो कर्जबाजारी राहिला नसता व सिनेटमध्येंहि राहिला नसता.) पश्चिम प्रदेशाचा विकास सुरू होताच ११ घटक राज्यें संघराज्यांत सामील करण्यांत आलीं. त्यामुळें २२ नवे सिनेटर आले. आणि सिनेटचें ते जुनें वातावरण संपूर्ण बदलून गेलें. गटबाजी, 'फ्री सिल्व्हर' सारख्या माथेफिरूपणाच्या चळवळी यांनीं अंतर्गत आर्थिक प्रश्नावर सिनेटमध्यें कलह निर्माण केले. सर्व वाद आतां विशिष्ट प्रदेशाभिमान, नद्या, बंदरें यांच्या योजना, धंद्यांना जकातीचें संरक्षण याविषयीं चालत. त्यास उद्देशून एक सिनेटर तक्रार करतो: "आम्ही एकेक जण आतां बटाट्याचीं शेतें आणि कोबीचीं शेतें झालों आहोंत." विल्यम अॅलन व्हाईट म्हणतो: "पूर्वीचे सिनेटर एकेक घटक राज्याचे प्रतिनिधि होते. पण आतांचे सिनेटर विशिष्ट गटांचे व धंद्यांचे प्रतिनिधि झाले आहेत."

व्हाईट लिहितो "उदाहरणार्थ एक सिनेटर पॅसिफिक रेल्वेचा प्रतिनिधि होता, दुसरा न्यूयॉर्क सेंट्रल रेल्वेचा होता, तिसरा विमाधंद्यांचा प्रतिनिधि होता ...कोळसा आणि लोखंड यांच्या गटाच्या ताब्यांतला एक गट होता...कापूस-

वाल्यांचे सहा प्रतिनिधि होते. असेच आणखी इतर हितसंबंधांचे प्रतिनिधि होते. जुन्या काळचे सरंजामदार सरदार निरनिराळ्या जहागिऱ्यांचे प्रतिनिधि असत त्याप्रमाणें आतांहि संरजामदारी अथवा जहागिरदारी होती....ते बडे मान्यता पावलेले लोक होते. निरनिराळे आर्थिक गट आपआपल्या विशिष्ट बाण्यानें वागत."

त्या गरजणाऱ्या काळांत नव्या सिनेटराचीं स्वभाववैशिष्टचें कोणतीं होतीं यासंबंधानें सिनेटर डेव्हिसचा एक काल्पनिक संवाद व्हाईटनें दिला आहे. डेव्हिस एका नव्या सिनेटराला सांगतो, "सिनेटच्या सभागृहामधील वाटेवरून हे सदस्य चालू लागले म्हणजे कोल्हा, गिधाड, मेंढरें मारणारा कुत्रा, गोरिला, सुसर, म्हातारी चिवचिवणारी कोंबडी, कबूतर अथवा टर्की खाणारा प्राणी असे त्यांच्या संबंधानें लोक बोलत." व्हाईट पुढें लिहितो: "एक पश्चिमेकडला लोभी सदस्य आपलें तुंदिल शरीर डोलत आणि कावेबाज उद्धट मुद्रा दाखवीत चालला असतां जज्ज डेव्हिसनें त्यांच्याकडे बोट करून 'लांडगा आलारे लांडगा आला, भेकड, खादाड लांडगा'....असे उद्‌गार काढले."

सत्ता आणि इभ्रत या दोन्ही बाबतींत १९व्या शतकाच्या शेवटीं सिनेट अत्यंत खालच्या दर्जाला आलें होतें. राष्ट्रपति ग्रँट याची मुदत संपल्यानंतर थोड्याच काळांत सिनेटचा हा अधःपात सुरू झाला. त्यापूर्वीं अमेरिकन सरकार हें जवळ जवळ पार्लमेंटरी पद्धतीचें होतें (म्हणजे सिनेट व प्रतिनिधिसभा यांत ज्या पक्षाचें बहुमत असे त्या पक्षाच्या हुकुमतीनें अध्यक्षाला चालावें लागे.) ज्या सिनेटनें राष्ट्रपति जॉन्सन यांजवर खटला चालवून त्याचा अपमान केला त्याच सिनेटनें राष्ट्रपति ग्रँट यांजवर प्रभुत्व गाजविलें. पूर्वीं राष्ट्रपतीच्या कॅबिनेटचे सभासद हे सिनेटच्या सभासदाच्यापेक्षां वरच्या दर्जाचे मानले जात. पण जॉन्सन आणि ग्रँट यांच्या कारकिर्दींत ही परिस्थिति बदलली होती. जेवणाच्या टेबलावर सिनेटराचें पान कॅबिनेटच्या सभासदाच्या वरचें असलें पाहिजे असें आतां सिनेटर म्हणूं लागले होते. जॉर्ज फ्रिस्बिहोअर एक आठवण सांगतो: "सिनेटर जर व्हाईट हाऊसमध्यें (राजगृहांत) गेले तर ते सल्ला घ्यायला जात नसून सल्ला द्यायला जात असत." (सिनेट वा प्रतिनिधिसभा यांचें अमेरिकेंत त्या काळीं प्रस्थ किती माजलें होतें हें अँन्सन बर्लिंगेम हा प्रतिनिधिसभेचा सदस्य ब्रिटिश लोकसभेला भेट देण्यास गेला असता दिसून आलें. बर्लिंगेम हा ब्रिटिश लोकसभेच्या प्रेक्षकांच्या गॅलरींत एका खुर्चीवर बसला होता. तेथें एक चोपदार आला व त्याला म्हणाला येथें बसूं नका, उठा ही सगळी गॅलरी सरदारांच्या करितां

राखून ठेवली आहे. त्यावर जवळ बसलेला एक म्हातारा सरदार त्या चोपदाराला म्हणाला, 'अहो, त्यांना तेथें बसूं द्या. त्यांच्या देशांत म्हणजे अमेरिकेंत ते सरदारच आहेत.' पण बर्लिगेम् तेथें बसून न रहाता उठला आणि जाता जाता म्हणाला, "छे छे, मी सरदार नाहीं. माझ्या देशांत मी राजा आहें. या सरदारांच्या रांगेंत बसून मला कमीपणा येईल.') पण कॉंग्रेसवाल्यांची ती सत्ता राष्ट्रपति ह्यायेस, गार्फिल्ड आणि आर्थर यांनीं नष्ट केली. राष्ट्रपतीनें निरनिराळ्या अधिकारांच्या जागीं कोणास नेमावें यासंबंधानें सिनेटचे सभासद हुकुमशाही गाजवीत, ती वरील चार राष्ट्रपतींनीं हाणून पाडली. आणि राज्यघटनेंतील परस्परविरुद्ध दिशांनीं खेचणाऱ्या नियमांनीं (चेक्स् अॅंड बॅलन्सेस) राज्यघटनेला समतोल आणला.

आर्थिक प्रश्नांनीं प्रादेशिक व घटनात्मक प्रश्न मागें टाकले. त्यापूर्वींच सिनेटची सत्ता व इभ्रत कमी होणार अशीं लक्षणें दिसूं लागलीं होतीं. ब्रिटिश व कानडीयन मुत्सद्दी १८५४ सालीं झालेल्या रेसिप्रॉसिटी तहासंबंधानें सांगतात: "हा तह घडवून आणतांना तो शॅम्पेन दारूच्या लाटांवर तरंगत धडवून आणावा लागला....तुम्हाला जर डुकराकडून एकादें काम करून घ्यावयाचें असेल तर त्याला योग्य असेंच वागविलें पाहिजे." बहुधा याच उपमेचा उपयोग करून एक कॅबिनेटचा सभासद १८६९ सालीं हेन्री अॅडॅम्सला म्हणाला: "तुम्ही कॉंग्रेसवाल्याशीं मोठ्याशा खुबीनें वागूं नका. कांग्रेसमन् हा शुद्ध डुक्कर आहे. एक काठी घेऊन त्याच्या त्या पुढें आलेल्या नाकाडावर लगावा म्हणजे तो वठणीवर येईल." हेनरी अॅडॅम्सनें या उपहासाला मूक संमति दिली. पण सिनेटर हे उपहासाच्या पलीकडे गेलेले मूर्ख आहेत असें त्याला वाटे. हेन्री अॅडॅम्स विचारतो "कॉंग्रेस वाल्यांना जर डुक्कर म्हणावयाचें तर सिनेटरांना आणखी वाईट नांव काय देणार ?"

पण सत्ता आणि लोकांची पसंती या दृष्टीनें सिनेट १९ व्या शतकाच्या उत्तरार्धांत खालावूं लागलें होतें हें खरें असलें तरी तिथें सगळींच डुकरें आणि सगळेच लांडगे नव्हते. अनेक लोक त्यांत आदरणीय होते, अनेक धैर्यशील होते. राष्ट्रपति जॉन्सन याला घटनात्मक गुन्हेगार ठरविण्यासाठीं झालेल्या खटल्यांत एडमंड रॉस आणि त्याच्या बाजूचे कांहीं सदस्य यांनीं सिनेटच्या हातून कायदेशीर अधिकारांचा होत असलेला दुरुपयोग मोठ्या धैर्यानें टाळला आणि या राष्ट्राचा बचाव केला. ल्युसियस लामार यानें आपल्या आर्जवी पण कणखर निर्धाराच्या मुत्सद्देगिरीनें, यादवींत मोडलेल्या राष्ट्राला पुनः सांधून भावी साहसांना तोंड देण्यासाठीं राष्ट्र समर्थ केलें.

प्रकरण : ६ —

# एडमंड जी. रॉस

"ज्यानें एका राष्ट्रपतीचा बचाव केला" तो विसरल्या गेलेल्या, कोणास फारशा माहित नसलेल्या, कोठेंतरी बाजूस पडलेल्या अशा एका थडग्यांत पहुडलेला आहे. राष्ट्रपतीच्या बचावाची जी कामगिरी त्यानें केली ती कामगिरी इतिहासांत एवढी मोठी होती कीं त्यानें कदाचित आमच्यासाठीं व भावी पिढ्यासाठीं अमेरिकेचें सनदशीर घटनात्मक राज्य टिकवून धरलें असेल. ही घटना १८६८ सालीं घडली. एका इतिहासकारानें लिहिलें आहे: "अध्यक्षाच्या बचावाची ती कामगिरी अमेरिकेच्या इतिहासांत सर्वश्रेष्ठ शौर्यशाली अशी होती. रणांगणावरील कोणत्याहि शौर्यशाली कृत्यापेक्षां हें काम त्यावेळीं अधिक कठीण ठरलें. पण अमेरिकेच्या ज्या या सिनेटराचें नांव फारसें कोणास आठवतहि नाहीं, तो कॅन्ससचा प्रतिनिधि एडमंड जी. रॉस हा होय.

लिंकनच्या काळीं झालेल्या यादवीनंतर एक नवा वाद माजला. दक्षिणेचा उत्तरेनें यादवींत पराभव केला होता. या पराभूत दक्षिणेशीं सलोख्यानें वागायचें असें अध्यक्ष जॉन्सन याचें धोरण होतें. पण उलट कांग्रेसचे उत्तरेंतले रिपब्लिकन पक्षांतले जहाल पुढारी, 'दक्षिण ही पराभूत आहे, घटनेंतील हक्क ती गमावून बसली आहे, दाक्षिणात्यांना पराभूतांप्रमाणें वागवलें पाहिजे," असें म्हणत होते. हा वाद निकराला येऊन जहाल रिपब्लिकनांनीं दक्षिणेशीं स्नेहानें वागूं पाहणाऱ्या राष्ट्रपति अँड्र्यू जॉन्सन यांजवर खटला भरला. त्या खटल्याच्या कामांत त्यावेळीं अत्यंत अप्रसिद्ध असलेल्या एडमंड रॉस यानें नाट्यपूर्ण अशी शौर्याची कामगिरी केली. त्यावेळीं माजलेलें भांडण विशेषत: कार्यकारी सत्ता व कायदे करणारी सत्ता यांच्यामधलें होतें. अॅन्ड्र्यू जॉन्सन हा दक्षिणेंतील टेनेसीचा होता. अमेरिकन संघराज्यांतून फुटून निघण्याला दक्षिणेतर्फे त्यानें एकट्यानें विरोध केला होता. लिंकनच्या धोरणाचा त्यानें पुरस्कार केला होता आणि लिंकनचा खून झाल्यामुळें

तो राष्ट्रपतिपदावर आला होता. पण तो धैर्यशील असला तरी वागणुकींतील चातुर्य त्याच्या ठिकाणीं कमी होतें. काँग्रेसमधील एकांतिक मताचें सदस्य हे लिंकनच्या मरणापूर्वी त्याच्याशीं भांडलें होते हें जॉन्सनला ठाऊक होतें. लिंकनचें धोरण दक्षिण व उत्तर यांच्या संबंधांची पूनर्घटना करतांना, घटनेला धरून पण औदार्यानें वागावें असें होतें. त्याला काँग्रेसमधील जहाल सभासदांनीं विरोध केला होता. त्या धोरणाला ते आतां पुन्हा विरोध करणार हे जॉन्सन जाणून होता, पण जॉन्सनचा स्वतःचा स्वभावहि भांडखोर होता. दक्षिणेनें अमेरिकन संघराज्यांतील आपलें स्थान विलंबावांचून व शक्यतों वादविवादावांचून परत मिळवावें या लिंकनच्या जॉन्सननें स्वीकारलेल्या धोरणाशीं लोकसभागृहाचें सहकार्य थोडेंफार मिळणें शक्य असतें तर तेंहि अँड्र्यू जॉन्सनच्या भांडखोर स्वभावामुळें अशक्य झालें.

१८६६ च्या सुमारास एडमंड रॉस हा सिनेटमध्यें आला. त्यावेळीं कार्यकारी सत्ता आणि कायदे करण्याची सत्ता या सरकारच्या दोन शाखा एकमेकांवर भुंकत होत्या, संतापत होत्या, एकमेकांचा गळा दाबीत होत्या. कायदेमंडळांत बिलांमागून बिलें आलीं. तीं तेथें जशीं मंजूर होत तशीं राष्ट्रपति तीं फेंटाळून लावी. एखादें बिल घटनाविरोधी आहे म्हणून अथवा दुसरें दक्षिणेला फार कठीण वागवणूक देणारें आहे म्हणून अथवा तिसरें एखादें शांततेच्या काळांत फार दीर्घकाळ लष्करी कायदा चालू ठेवणारें आहे म्हणून अथवा चौथें एखादें कार्यकारी सत्तेच्या क्षेत्रांत कायदेमंडळ फाजील हस्तक्षेप करतें म्हणून इत्यादि कारणांनीं राष्ट्रपति जॉन्सननें सर्व बिलें फेटाळलीं. अध्यक्षानें अशा रीतीनें बिलें फेंटाळलीं तरीं काँग्रेस तीं पुन्हा मंजूर करून त्यांना कायद्याचें रूप देत असे. अध्यक्षानें बिल धुडकावल्यानंतर त्याच्या पाठिंब्याशिवाय त्याला कायद्याचें रूप देण्याचा प्रसंग हा अमेरिकन इतिहासांत पहिलाच होता.

अॅन्ड्र्यू जॉन्सननें फेटाळलेल्या सर्वच बिलांना पुन्हा बहुमत मिळूं शकलें असें नाहीं. म्हणून आपला हाडवैरी असा जो हा राष्ट्रपति अॅन्ड्र्यू जॉन्सन त्याच्याविरुद्ध आणखी एक पाऊल पुढें टाकून त्याला कायमचा चिरडून टाकण्याचा जहाल रिपब्लिकनांनीं निर्धार केला. (या राजकीय लढ्यांतील त्यांची सूडभावना इतकी तीक्ष्ण झाली होती कीं ज्या दाक्षिणात्यांशीं त्यांना रणांगणावर लढावें लागलें त्या सर्व दाक्षिणात्यापेक्षांहि एकट्या अॅन्ड्र्यू जॉन्सनबद्दल त्यांना

अधिक तीव्र शत्रुत्व वाटूं लागलें होतें.) आणखी एक पाऊल म्हणजे सिनेटमध्यें कायमचें दोन तृतीयांश बहुमत राष्ट्रपतीविरुद्ध असणें हें. राष्ट्रपतीनें एखादें बिल जर धुडकावलें तर तें बिल पुन्हा मंजूर करण्यासाठीं सिनेटमध्यें दोनतृतीयांश बहुमताची घटनेप्रमाणें गरज होती. त्याच बरोबर राष्ट्रपतीला घटनाभंगाचा गुन्हेगार ठरवून त्याला पदच्युत करण्यासाठींहि दोन तृतीयांश बहुमताची गरज होती. जॉन्सनला पदच्युत करण्याची ही महत्त्वाकांक्षा मात्र त्या पक्षानें अर्थातच गुप्त ठेवली होती.

सिनेटमध्यें जहाल रिपब्लिकनांना अध्यक्षानें फेटाळून लावलेल्या बिलांना पुन्हा पाठिंबा देण्यासाठीं जे दोन तृतीयांश बहुमत हवें असे तें नेहमींच पुरेशा खात्रीनें मिळत नसे इतकें तें अस्थिर असे. तें दृढ व स्थिर करणें हें त्यांचें आतां प्रमुख उद्दिष्ट ठरलें. नवीन घटक राज्यें संघराज्यांत घेताना विशेषत: दाक्षिणात्य राज्यांना संघराज्यांत घेण्याचे वेळीं त्यांची लायकी ठरवितांना, सिनेटमधील जहाल रिपब्लिकन पक्षाला दोनतृतीयांश बहुमत कसें मिळेल या एकाच कसोटीनें ते पहात. जॉन्सनच्या बाजूच्या एका सिनेटराला अत्यंत संशयास्पद अशा उपायानें सिनेटमध्यें बसण्यास बंदी करण्यांत आली. राष्ट्रपतीनें नकार दिला असतांहि नेब्रास्का राज्याला संघराज्यांत प्रवेश देऊन राष्ट्रपतीविरुद्ध जहाल रिपब्लिकनांनीं सिनेटमध्यें दोन मतें उभीं केलीं. कोलोरॅडोला प्रवेश देण्याबाबतहि राष्ट्रपतीनें नकार दिला. (कोलोरॅडो प्रदेशांत वसति अगदीं विरळ असून संघराज्यांत सामील होण्याबाबत तेथल्या जनतेनें सार्वमतानें विरोध केला होता.) राष्ट्रपतीच्या या नकाराविरुद्धहि रिपब्लिकनांनीं कारवाया केल्या. पण अखेर कोलोरॅडोला संघराज्यांत प्रवेश मिळणें अशक्य झालें. पुढें घडलेल्या एका दु:खकथेमुळें कॅन्ससचा प्रवेश संघराज्यांत होऊन राष्ट्रपतीविरुद्ध नवीं मतें मिळण्याचा संभव उत्पन्न झाला.

कॅन्ससचा सभासद जिम लेन हा "सनातनी" रिपब्लिकन असून लिंकनचें पुनर्घटनात्मक धोरण पुढें चालविण्याच्या जॉन्सनच्या धोरणास तो अनुकूल होता. पण त्याचें सरहद्द राज्य कॅन्सस हें संघराज्यांतील अत्यंत जहाल राज्य होतें. १८६६ सालीं राष्ट्रपति जॉन्सननें सिव्हिल राईट्स् बिलाला नकार (व्हिटो) दिला. त्या नकाराला लेननें पाठिंबा दिला. आणि अर्क्यान्सस या राज्याला मान्यता देण्याचें सरकारी बिल जिम लेन् यानें सिनेटमध्यें सादर केलें. तेव्हां जिम लेन हा जॉन्सनच्या बाजूनें वागतो असें पाहून कॅन्सासच्या लोकांना चीड

आली. लॉरेन्समध्यें एक मोठी सभा भरून तिनें सिनेटर जिम लेन याचा धिःकार केला. आणि या धिःकाराचे ठराव तावडतोब प्रसिद्ध केले. जिम लेन्‌वर कांहीं आर्थिक गैरकृत्यांचेहि आरोप आले होते. अशा प्रकारें पाणउतारा होऊन, मनानें खचून, शरीरप्रकृति बिघडून जिम लेन् निराश झाला व १ जुलै १८६६ या दिवशीं त्यानें आत्महत्या केली. जहाल रिपब्लिकनांनीं यावर खोटे अश्रू ढाळले. पण त्याच बरोबर जॉन्सनला विरोधी असा नवा सिनेटर निवडून आणण्याची नवी संधि आलेली पाहून ते हरकले.

आपल्या मार्गातला हा काटा निघाल्यानंतर लेन्‌च्या मागून कोणाला सिनेटर निवडावे याबाबत ते कॅन्ससकडे उत्सुकतेनें पाहूं लागले. आणि लॉरेन्सच्या सभेमध्यें जिम लेन्‌विरुद्ध ज्यानें ठराव मांडला तो एडमंड जी. रॉस हाच सिनेटर म्हणून निवडून आला हें पाहून त्यांच्या हर्षाला मर्यादा राहिली नाहीं.

रॉस कोणत्या बाजूस राहील याबद्दल शंका घेण्याला काहीं कारणच नव्हतें. दक्षिणेंतील गुलामगिरीवादी राज्यांना त्यानें सतत निकरानें विरोध केला होता. १८५४ सालीं तो २८ वर्षांचा होता. तेव्हां मिल्वाकी येथें पळून आलेल्या गुलामांना पकडून नेण्याचें काम चालू असतां त्या गुलामांना सोडवून घेणाऱ्या जमावांत रॉस होता. १८५६ सालीं गुलामगिरीविरोधी असे कित्येक लोक कॅन्ससमध्यें वसतीला आले आणि कॅन्ससमध्यें व्यक्ति-स्वातंत्र्य कायम ठेवण्याचा त्यांनीं निर्धार केला. गुलामगिरीवादी लोकांनीं कॅन्ससवर हल्ला चढविला असतां रॉस हा कॅन्सस फ्रीस्टेट आर्मींत सामील झाला. गुलामगिरीवाद्यांना प्रतिकार करण्याकरितां ही स्वयंसेना उभारली होती. त्याच वेळीं रॉस्‌नें गुलामगिरीवादी डेमोक्रॅटिक पक्षाचा राजीनामा दिला. १८६२ सालीं यादवींत भाग घेण्याकरितां संघराज्याच्या सैन्यांत सामील व्हावें म्हणून रॉसनें आपल्या वृत्तपत्रकचेरींतील कामाचा राजिनामा दिला. या यादवींतून तो मेजर होऊन बाहेर पडला. लॉरेन्स येथें जिम लेन्‌च्या धिःकाराच्या कामीहि त्यानें पुढाकार घेतला. रॉसच्या या सन्मान्य पूर्व चरित्रामुळें रॉस हा जॉन्सनविरुद्ध उभे करावयाच्या सिनेटमधील दोन तृतीयांश सदस्यांतील एक कणखर सदस्य आहे, अशी त्या जहाल रिपब्लिकनांची खात्री झाली.

जॉन्सनला पदच्युत करण्याची अशा प्रकारें संपूर्ण तयारी झाली. १८६७ च्या आरंभीं प्रतिनिधिसभागृहानें अधिकार-मुदत ( टेन्युअर-ऑफ्-ऑफिस ) बिल मंजूर केलें. ज्या अधिकाऱ्याच्या नेमणुकीला सिनेटची मंजूरी लागते त्या अधि-

कायाला सिनेटच्या मंजुरीशिवाय काढून टाकूं नये असें त्या बिलानें ठरविलें होतें. या बिलास राष्ट्रपति जॉन्सन यानें नकार दिला.

एडविन स्टॅन्टन हा युद्धमंत्री लिंकनच्या वेळचा असून तोच जॉन्सनच्या वाटयास आला होता. जो जहाल रिपब्लिकनांच्या हातचें खेळणें असून पराभूत दक्षिणेवर तो हुकूमशहा होऊं पहात होता. जॉन्सननें ५ ऑगस्ट १८६७ रोजीं 'ताबडतोब राजीनामा दे' अशी त्याजकडे मागणी केली. स्टॅन्टननें उद्धटपणानें कॉंग्रेसच्या पुढील बैठकीपूर्वी आपण राजिनामा देणार नाहीं असें उत्तर दिलें. जॉन्सन असा उपमर्द सहन करणारा नव्हता. पुढील आठवाडयांत जॉन्सननें स्टॅन्टनला नोकरीवरून तहकूब करून जनरल ग्रँट याला त्याच्या जागीं नेमलें. १३ जानेवारी १८६८ रोजीं सिनेटनें राष्ट्रपति व ग्रँट यांना नोटीस देऊन कळविलें कीं, स्टॅन्टनला दिलेली नोकरीची तहकुबी आपणांस मान्य नाहीं. तेव्हां स्टॅन्टन आपल्या जागीं आला व ग्रँट निघून गेला. पण ही परिस्थिति सर्वांनाच असह्य होती. युद्धमंत्री कॅबिनेटच्या सभांना हजर राहूं शकत नव्हता. अथवा राज्य-कारभारांत इतर सदस्याशीं सहकार्य करूं शकत नव्हता. २१ फेब्रुवारी या दिवशीं राष्ट्रपति जॉन्सननें युद्धमंत्री स्टॅन्टन याला कामावरून एकदम काढून टाकलें. आपण हे गैरसनदशीर रीत्या वागत आहोंत हें जॉन्सनला ठाऊक होतें. त्याला एकदां न्यायासनामार्फत कसोटीच पहावयाची होती.

पण स्टॅन्टननें ताबा देण्याचें नाकारलें आणि आपल्या भोवतीं बचावाची तयारी करून तो बसला. त्यामुळें सर्व राष्ट्रभर राष्ट्रपतीच्या विरुद्ध लोकमत खवळलें. राष्ट्रपतीनें जाणूनबुजून कायदा मोडला होता व कॉंग्रेसची इच्छा धुडकावली होती. यापूर्वी राष्ट्रपतीविरुद्ध आणलेले घटनाभंगाच्या आरोपांचे ठराव प्रतिनिधिसभेच्या कमेटींत व अधिवेशनांत नापास झाले होते तरी २४ फेब्रुवारी रोजीं एक ठराव तांतडीनें आणून मंजूर करून घेण्यांत आला. त्याला प्रचंड मताधिक्य मिळालें होतें. प्रत्येक रिपब्लिकनानें त्या ठरावास अनुकूल मत दिलें होतें. पेन्सिल्व्हानियाचा पांगळा सदस्य थाडियस स्टिव्हन्स हा अगदीं माथे-फिरू होता. कुऱ्हाडीच्या धारेसारखें त्याचें तोंड होतें. कांग्रेसच्या दोन्ही सभा-गृहांना त्यानें ताकिद देऊन सांगितलें : "जॉन्सनसारखा गुन्हेगार सुटून जावा यासाठीं कोण भेकड सदस्य या ठरावाच्या विरुद्ध मत देतो तें मला दाखवा. म्हणजे याचा दुर्लौकिक भावी पिढयांपर्यंत पोचेल असा मी बंदोबस्त करून टाकतों."

प्रतिनिधिसभागृहापुढें राष्ट्रपति जॉन्सन यांजवर, त्यानें घटनाभंगाचा गुन्हा केल्याचा आरोप ठेवणारा ठराव येऊन तो मंजूर झाला व प्रतिनिधि-सभागृहानें राष्ट्रपति जॉन्सनला याप्रमाणें गुन्हेगार ठरविलें. नंतर आर्टिकल्स ऑफ इंपीचमेंट (घटनाभंगाच्या गुन्ह्यासाठीं चालवावयाच्या फिर्यादीसंबंधीचा घटनेंतला भाग) याखालीं ता. ५ मार्च रोजीं सीनेटपुढें खटला सुरू झाला. सिनेट अगदीं चवताळलें असून जॉन्सनला शासन करण्यास अगदीं आतुर झालें होतें. सिनेटचे सभापतिपद या खटल्यापुरतें सरन्यायाधीशांना देण्यांत आलें होतें. इंग्लंडांत पहिल्या चार्ल्सवर हायकोर्टांत झालेला खटला, सोळाव्या लुईवर फ्रेंच कन्व्हेंशन मध्यें झालेला खटला, इंग्लंडांत हौस ऑफ लॉर्ड्स् पुढें झालेला वॉरन हेस्टिंग्जवरील खटला इत्यादि जगप्रसिद्ध खटल्यांइतका महत्त्वाचा जॉन्सन वरील हा खटला होता. या सर्व प्रसिद्ध खटल्यांत असलेल्या गोष्टींतील दोन गोष्टी जॉन्सनच्या खटल्यांत नव्हत्या. ज्या कारणासाठीं जॉन्सनवर खटला करण्यांत आला तें कारण राष्ट्राच्या कल्याणास मूलभूत अवश्य असें नव्हतें आणि आरोपी खटल्याच्या सर्व काळांत कोर्टांत हजर नव्हता.

पण या दोन गोष्टींखेरीज त्या प्रसिद्ध खटल्यांत कोर्टाच्या आवारांत जें नाट्यपूर्ण दृश्य होतें तें मात्र सर्वच्या सर्व जॉन्सनच्या खटल्यांत हजर होतें. "मी निःपक्षपातीपणानें न्यायदान करीन" अशी शपथ सरन्यायाधीशानें प्रत्येक सिनेटराला घ्यायला लावली. (बेंजामिनवेड हा ओहिओचा ज्वलज्जहाल सिनेटर सिनेटला सभापति असून राष्ट्रपति जॉनसन पदच्युत झाल्यास तोच राष्ट्रपति व्हायचा होता. त्यालाहि वरील शपथ घ्यावी लागली.) सिनेटतर्फे फिर्यादी-पक्षाचा मुख्य वकील म्हणून जनरल बेंजामिन बटलर हा काम चालवीत होता. 'न्यू ऑर्लीन्सचा खाटिक' असें विशेषण त्याला लावण्यांत येऊं लागलें होतें. तो मॅसॅच्युसेट्स्चा प्रतिनिधि असून बुद्धिमान पण उद्धट व नुसता अफाट वक्ता होता. खटला चालू असतां तो पाहण्यासाठीं गॅलरींत एक हजार तिकिटें देण्यांत आलीं होतीं. प्रत्येक सिनेटरला चार तिकिटें देण्याची मुभा होती. त्यांतलें एकेक तरी मिळविण्यासाठीं तिकिटेच्छूंनीं सर्व सूक्तासूक्त मार्ग वापरले होते.

५ मार्च पासून १६ मे पर्यंत हें नाटक चाललें. अकरा आर्टिकल्स ऑफ इंपीचमेंटपैकीं पहिल्या आठावरील आरोप 'अधिकारीमुदतकायद्याचा भंग करून स्टॅन्टनला बडतर्फ करणें व नवा युद्धमंत्री नेमणें' याविषयीं होते. नवव्या

आर्टिकल खालीं करण्यांत आलेला आरोप जॉन्सननें एका सेनापतीशीं संभाषण करून त्याला सैन्यखर्चासंबंधीचा कायदा मोडण्यास चिथाविलें अशा अर्थाचा होता. दहाव्या आर्टिकलखालचा आरोप "जॉन्सननें अमेरिकेच्या कायद्याविरुद्ध व कॉंग्रेसविरुद्ध बेताल, प्रक्षोभक आणि निंदाव्यंजक भाषणें केलीं" अशा अर्थाचा होता. अकराव्या आर्टिकलखालीं करण्यांत आलेला आरोप पूर्वीच्या सर्व आरोपांत आलेल्या आरोपांची गोळाबेरीज असलेला व मोघम असा होता. ज्यांची आरोपाच्या मूळ मुद्यांना संमति नव्हती पण ज्यांना जॉन्सनला शिक्षा ठोठावयाची इच्छा होती अशा सर्वांना समान भूमिका मिळावी म्हणून हा मोघम आरोप थाडिअस स्टीव्हन्स यानें तयार केला होता. सर्व आरोपपत्र कसेंतरी घाईघाईनें तयार करण्यांत आलें असून बटलरनें त्या आरोपांचें समर्थन करण्यासाठीं मोठें प्रक्षोभक भाषण केलें. जॉन्सनच्या विद्वान व कर्तबगार वकीलानें बऱ्याच परिणामकारकपणें त्या आरोपास उत्तरें दिलीं. "अधिकारी मुदत कायदा [टेन्युअर-ऑफ-ऑफिस ॲक्ट] हा घटनाभंग करणारा असल्यानें तो बेकायदा आहे, तो कायदेशीर असला तरी पूर्वी सांगितलेल्या कारणामुळें स्टॅन्टनला त्या कायद्याचा फायदा मिळणार नाहीं, स्टॅन्टनला काढून टाकणें हें कायदेशीर आहे कीं नाहीं हें ठरविण्याचा उपाय म्हणजे स्टॅन्टननें बडतर्फी घेऊन आपल्या हक्कासाठीं कोर्टांत दावा लावणें हाच होय" इत्यादि मुद्दे जॉन्सनच्या वकीलानें मांडले.

पण खटला जसजसा पुढें चालू लागला तसतसे रिपब्लिकन्स अधिकाधिक अधीर झाल्याचें दिसूं लागलें. खटला ज्या आरोपांवर चालला होता त्या आरोपांवर न्याय्य रीतीनें तो न चालविता रिपब्लिकनांचें राजकारण जॉन्सननें ऐकलें नाहीं एवढा डूक मनांत धरून, खऱ्या अथवा काल्पनिक आरोपांखालीं जॉन्सनला राजगृहांतून हाकलायचा असा त्या रिपब्लिकनांचा निर्धार झालेला दिसला. राष्ट्रपतीच्या बाजूनें परिणामकारक ठरेल असा पुरावा वगळण्यांत आला. खटला संपून निर्णय लागण्यापूर्वी बहुतेक सिनेटरांनीं निर्लज्जपणें आपला निर्णय सांगूनहि टाकला. लांच देणें, दडपण आणणें इत्यादि प्रकार धूमधडाक्यानें चालले होते. चाललेला खटला व त्यांत येणारा पुरावा इकडे कोणाचेंच लक्ष नव्हतें. जॉन्सनला शिक्षा करण्यासाठीं किती मतांची जरूरी आहे व तेवढी मिळतात कीं नाहीं या एकाच गोष्टीसाठीं खटपट चालू होती.

( दक्षिणेंतलीं संघराज्यानें मान्यता न दिलेलीं राज्यें वगळता ) संघराज्यांत

त्यावेळीं एकूण २७ राज्यें होतीं. म्हणून जॉन्सनवर आरोप शाबीत करण्यासाठीं एकूण ५४ या सिनेट सदस्यसंख्येच्या दोन तृतीयांश म्हणजे ३६ मतें आवश्यक होतीं. चौपन्नांपैकीं १२ मतें डेमोक्रॅटांचीं असल्यानें तीं गेलींच होती. बाकीच्या म्हणजे ४२ रिपब्लिकनांपैकीं फक्त सहाच मतें न मिळालीं तरी चालण्यासारखें आहे हें रिपब्लिकनांना माहीत होतें. रिपब्लिकन गटाची प्राथमिक बैठक भरली तेव्हां सहा धैर्यवान रिपब्लिकनांनीं जॉन्सनवर आरोप शाबीत धरता येईल इतका पुरावा पुढें आलेला नाहीं असें ठासून सांगितलें. यामुळें जहाल रिपब्लिकनांना निराशेनें धक्काच बसला. "सारी बदमाषी ! आपल्याच मित्रांच्या सभागृहांत अमेरिकन लोकराज्याचा विश्वासघात झाला आहे" असें फिलॅडेल्फियाच्या 'प्रेस' या वृत्तपत्रानें लिहिलें.

बाकीचे ३६ जरी एकजूट राहतील तरी जॉन्सनला खास शासन होऊं शकेल. पण त्यासाठीं आतां सर्वांनीं एकजूट राहायलाच हवें होतें. अशा स्थितींत प्राथमिक मतदानाच्या वेळीं एका रिपब्लिकन सिनेटरानें आपला निर्णय सांगण्याचें नाकारलें. कॅन्सासचा एडमंड जी. रॉस हें त्याचें नांव. कॅन्सास हा जॉन्सनविरोधी रिपब्लिकनांचा बालेकिल्ला ! तेथल्या एका सिनेरानें साशंक राहावें हा अत्याचार आहे असें वाटून रिपब्लिकन संतापले. मॅसॅच्युसेट्स्‌चा सिनेटर सुम्नर म्हणाला, "जॉन्सनचा गुन्हा, विशेषत: कॅन्सासच्या सिनेटराला उघड दिसायला पाहिजे. कॅन्सासचा माणूस सबबी सांगून आपल्या राष्ट्राविरुद्ध वर्तन करील असें मला कधींच वाटलें नाहीं."

रॉस सिनेटमधील आपल्या जागीं बसला तेव्हांपासून त्याचें मत आपल्या बाजूस पडेल याबद्दल रिपब्लिकनांना खात्री होती. वर सांगितल्याप्रमाणें त्याचा सर्व पूर्वेतिहास रिपब्लिकनांना भक्कम पाठिंबा देणारा होता. सिनेटमध्यें येताच त्यानें जी पहिली गोष्ट केली ती म्हणजे जहाल रिपब्लिकनांचें धोरण आपणांस मान्य आहे अशा अर्थाचें निवेदन रॉसनें वाचून दाखविलें. त्यानंतर रिपब्लिकनांच्या सर्व योजनांना तो अगदीं मुकाट्यानें पाठिंबा देत गेला. अँड्र्यू जॉन्सनबद्दल व्यक्तिश: अथवा राजकीय दृष्ट्या आपणांस मुळींच सहानुभूति नाहीं ही गोष्ट त्यानें स्पष्ट केली होती. स्टॅन्टनला जॉन्सननें काढून टाकल्यावर अशी बडतर्फी बेकायदा आहे असें ठरविणाऱ्या रिपब्लिकनांच्या ठरावावर त्यानें बहुमताच्या बाजूनें मत दिलें होतें. रॉसचा कॅन्सासमधूनच निवडून आलेला

सहकारी सिनेटर पॉमेरी हा जॉन्सनविरोधी रिपब्लिकनांचा ज्वलज्ज-हाल पुढारी होता. तेव्हां रॉसचें निर्वाणीचें हें ३६ वें मत हक्कानेंच आपल्या बाजूस पडलें पाहिजे असा रिपब्लिकनांनीं हट्ट धरला आणि कोणत्याहि उपायांनीं तें आपल्या बाजूस मिळवायचें असा त्यांनीं निर्धारच केला. 'इंपीचमेंट ऑफ् ॲन्ड्र्यू जॉन्सन' या ग्रंथांत डी विट लिहितो, "आतांपर्यंतच्या सर्व झगड्याच्या यशापयशाची अंतिम जबाबदारी सिनेटर रॉस याच्या संशयास्पद मतावर येऊन पडली."

प्रतिनिधिगृहात जॉन्सनविरुद्ध खटला चालून त्याला अपराधी ठरविण्यांत आलें तेव्हां रॉस हाहोडे आयलंडचा सिनेटर स्प्राग याला म्हणाला होता कीं "ठीक, स्प्राग, आतां सिनेटमध्यें हा खटला चालणार आहे. आणि मी जरी रिपब्लिकन असून जॉन्सन व त्यांचीं धोरणें यांना विरुद्ध असलों तरी पण या पृथ्वीतलावर कोणाहि आरोपीला जास्तींत जास्त जेवढा न्याय मिळेल तेवढा जॉन्सनला मिळावा अशा प्रकारें सिनेटमध्यें खटल्याचें कामकाज चालविलें गेलें पाहिजे असें माझें मत आहे. येथपासूनच "रॉस कचतो आहे" अशी कुजबुज सुरू झाली होती. त्या काळासंबंधानें रॉस नंतर सांगतो, " एक दिवसहि त्यानंतर असा गेला नाहीं कीं तुम्हीं जॉन्सनला गुन्हेगार ठरविण्याच्या बाजूस उभे राहिले पाहिजे असे संदेश टपालानें, तारेनें अथवा व्यक्तिशः मला आले नाहींत. आणि ज्यांच्या भेटीनें मनाला खास दुःख होतें अशी पुष्कळशीं माणसें 'हां अगदीं कडक व्हा, नरमाई नाहीं हां चालायची' असें मला भेटून बजावून गेलीं."

साऱ्या देशभर आणि जीवनाच्या सर्व क्षेत्रांत लोकमताचा प्रक्षोभ इतका वाढला होता कीं देशापुढें एकादें मोठें युद्ध उभें आहे असेंच लोकांना वाटत असावें असें सिनेटरांच्या तत्कालीन पत्रव्यवहारावरून वाटतें. देशांतील सर्वांत प्रभावी पक्ष जणु सरकारी फिर्यादी या भूमिकेंत होता. त्याला खटल्यांत विलंब सहन होत नव्हता आणि जॉन्सनच्या बचावाच्या बाजूचें कांहींहि ऐकायची इच्छा नव्हती. खटल्याच्या काळांत राजकारणांतील असंतुष्टांचीं फार मोठी गर्दी वॉशिंग्टनमध्यें जमली होती प्रतिनिधिगृहाचे साऱ्या राज्यांतील सदस्य तेथें जमले असून जवळ जवळ एकमतानें राष्ट्रपति जॉन्सन पदच्युत झाला पाहिजे अशी मागणी करीत होते. जॉन्सनला गुन्हेगार ठरविण्याविरुद्ध असणाऱ्या सिनेटरांचा रात्र-दिवस पिच्छा पुरवून लोकांनीत्यांना विनंत्या केल्या, आर्जवें केलीं व धमक्याहि दिल्या.

'जॉन्सन गुन्हेगार नाहीं' असें म्हणणाऱ्यांना परत आपल्या राज्यांत आल्यावर मार खावा लागेल अशाहि धमक्या वृत्तपत्रांनीं दिल्या."

रॉस व त्याचे इतर साशंक रिपब्लिकन सहकारी यांना उपद्रव सुरू झाला, त्यांच्यावर गुप्त हेर ठेवण्यांत आले व इतर सर्व प्रकारचें दडपण त्यांचेवर आलें, त्यांच्या राहण्याच्या जागेभोवतीं पाळत ठेवण्यांत आली त्यांचे सामाजिक संबंध जेथें येत तेथली पाहणी करण्यांत आली, त्यांची प्रत्येक हालचाल व त्यांचे सोबती यांच्या नोंदी नोटबुकांत होऊं लागल्या. रिपब्लिकन पक्षाच्या वृत्तपत्रांत त्यांना इषारे देण्यांत येऊं लागले, त्यांच्या मतदारांकडून त्यांना लांबलांब प्रवचनें ऐकविण्यांत येऊं लागलीं. राजकारणांत तुम्हांला धुळीला मिळवूं, तुमचा खून पाडूं अशाहि धमक्या येऊं लागल्या. स्टॅन्टन आपल्या युद्धखात्यांत स्वतांभोवतीं संरक्षणार्थ पिंजरा उभारून बसला होता, तेथें तो रात्रंदिवस झटून लष्करी लोकांचें दडपण त्या साशंक सहकाऱ्यावर आणीत होता. फिलॅडेल्फियाचें 'प्रेस' हें पत्र लिहितें, "देशाच्या प्रयेक विभागांतून तारांचे प्रचंड ढीग सिनेटरांच्या अंगावर येऊन कोसळत होते. सामान्य लोकांनीं यादवींत आपलें जीवित व वित्त देशासाठीं अर्पण केलें होतें. त्यांना दाक्षिणात्याशीं सलोख्यानें वागूं पाहणाऱ्या जॉन्सनवर सूड घेतल्यावांचून आपला स्वार्थत्याग निष्फल होईल असें वाटत असल्यानें हा लोकसागर सूडभावनेनें नुसता खवळला होता." न्यूयॉर्कच्या 'ट्रिब्यून' पत्रानें लिहिलें, "विशेषत: एडमंड रॉसचा छळ, शिकारी कोल्ह्याचा पिच्छा पुरवून छळ करतात तसा, उभय पक्षांनीं चालविला होता. दोन्ही पक्षांचे लोक त्यास प्रश्न विचारून विचारून हैराण करीत होते. आर्कोला पूल काबीज करण्यासाठीं तुंबळ रणकंदन चालू असता एकदां एका बाजूच्या व पुन्हा दुसऱ्या बाजूच्या सैनिकांनीं जसा अनेकदां तो पूल तुडविला तशी रॉसची परिस्थिति झाली होती." रॉसचा इतिहास व त्याचें वॉशिंग्टनमधील जीवन याची संपूर्ण तपासणी करण्यांत आली. त्याचे मतदार व त्याचे सहकारी वॉशिंग्टनमध्यें सतत त्याचा पाठलाग करून त्याच्या मताचा कांहीं अंदाज लागतो काय तें पाहात होते. सगळयांचे डोळे रॉसकडे लागले होते, त्याचें नांव सर्वांच्या ओठावर होतें, प्रत्येक पत्रांत रॉसचे हेतु कोणते याची चर्चा होत असे. तो प्रत्येक बाजूकडे आपली अनुमति असल्याचें सूचित करी असा पुरावा मिळतो. त्याला भेटणारा प्रत्येक जण रॉस आपल्या बाजूस आहे असें सांगे. त्यानें मौन पाळलें पाहिजे अशी कायद्याची सक्ती

होते व तो कायदा पाळून रॉसनें दोन्ही बाजूच्या लोकांना पूर्ण संशयांत ठेवलें होतें.

पण रॉसला राजकीय धकाधकीचा अनुभव कांहींच नव्हता. सिनेटमध्यें मोठेसें नांवहि त्यानें मिळविलें नव्हतें. सिनेटर म्हणून मिळणाऱ्या वेतनाखेरीज वेगळी कांहीं मिळकतहि त्याला नव्हती. इत्यादि कारणांनीं रॉसला प्रतिकूल टीका सहन होणार नाहीं आणि कारवाईकुशलांच्या हातचें तो सहज खेळणें होऊं शकेल असें मानलें जाऊं लागलें. कॉंग्रेसमेन व सिनेटर्स यांच्या एका समितीनें कॅन्सासला व इतर साशंक सिनेटरांच्या राज्यांना पुढील तार पाठविली. "या खटल्यांत जॉन्सन निर्दोषी ठरून खटला वाया जाईल तर देशाच्या शांततेला व रिपब्लिकन पक्षाच्या ध्येयाला फार मोठा धोका आहे. आपल्या सिनेटरांना पत्रांनीं, ठरावांनीं, शिष्टमंडळांनीं लोकमत कळवा." कॅन्सासच्या कायदेमंडळाचा एक सिनेटर रॉसला कॅपिटॉलवर भेटला. स्टॅन्टननें पाठविलेला एक सेनापति रॉसला भेटण्याच्या निर्धारानें पहाटें चारपर्यंन्त त्याच्या बिऱ्हाडीं मुक्काम ठोकूनच बसला. सिनेटर रॉसच्या मनांत काय आहे तें कळून घेण्यासाठीं त्याच्या भावाला एकानें पत्र लिहून २० हजार डॉलर देऊं केलें. रॉससंबंधानें बोलतांना ग्रफबेन बटलर म्हणाला "पोतेंभर पैसे तयार आहेत. त्या हलकटाला हवेत तरी किती ?" जॉन्सन गुन्हेगार आहे कीं नाहीं याचा निर्णय ठरविण्यासाठीं पहिलें मतदान ज्या दिवशीं व्हायचें होतें त्याच्या आदल्या रात्रीं रॉसला त्याच्या मतदार संघांतून पुढील तार आली.

"कॅन्सासनें पुरावा ऐकला आहे. राष्ट्रपति जॉन्सन याला गुन्हेगार ठरवाच अशी आमची मागणी आहे." **डी. आर. अँथनी व इतर एक हजार सह्या**

खटला संपायच्या दिवशीं म्हणजे १६ मे रोजीं रॉसनें पुढील उत्तर त्या तारेस पाठविलें.

"डी. आर्. अँथनी व इतर हजार सद्‌गृहस्थ यांना—जॉन्सनला गुन्हेगार अथवा निरपराधी यापैकी काय ठरविण्याचा बाजूनें मीं मत द्यावें हें ठरविण्याचा अधिकार तुम्हांला आहे असें मी मानत नाहीं. राजघटना व कायदे यांच्या आधारानें मीं निःपक्षपाती न्याय देण्याची शपथ घेतली आहे. आणि माझी न्यायनिष्ठ तर्कदृष्टि आणि देशाचें जास्तींत जास्त हित या दृष्टीनें योग्य असेंच मत व्यक्त करण्याचें धैर्य माझ्या ठिकाणीं असेल असा मला भरंवसा वाटतो."

—ई. जी. रॉस

त्या दिवशीं सकाळीं रॉस जेवत असतां गुप्त हेर त्यावर पाळत ठेवीत होते. अखेरच्या मतदानापूर्वी १० मिनिटें रॉसच्या कॅन्सासच्या सहकाऱ्यानें थाडिअस स्टीव्हन्ससमक्ष धमकी दिली कीं "तूं जर जॉन्सन निर्दोषी आहे असें मत देशील तर तुझ्यावर खोटे आळ आणून तुझा राजकीय खून पाडूं, ध्यानांत ठेव."

शेवटीं तो दुर्दैवी क्षण आलाच. आतां पळून जाता येणार नव्हतें. त्या प्रसंगाचें रॉसनेंच पुढील प्रमाणें वर्णन केलें आहे. "प्रेक्षकांच्या गॅलऱ्या गच्च भरल्या होत्या. प्रवेशतिकिटांची मागणी अफाट वाढली होती व त्यांचा भावहि फारच वाढला होता. प्रतिनिधिगृहाची बैठक तहकूब होऊन सभासद सीनेटसभागृहांत आले होते. सिनेटसभागृहांतील प्रत्येक खुर्ची सिनेटर, कॅबिनेट अधिकारी अथवा राष्ट्रपतीचा सल्लागार अथवा प्रतिनिधिगृहाचा सभासद यांपैकीं कोणी ना कोणी व्यापली होती." प्रत्येक सिनेटर आपल्या जागीं बसला होता. आमोवाचा ग्राइम्स हा सभासद अत्यंत आजारी असल्यानें शब्दशः त्याला उचलून आणून बसविलें होतें.

अकरावें आर्टिकल व्यापक असून त्यावर सर्वांचें एकमत आहे असें मानलें जात होतें. म्हणून त्यावर पहिल्यानें मतदान घ्यावें असें ठरलें. "आतां मतदान सुरू होईल" असें जाहीर करतांना सर न्यायाधीश प्रेक्षकांना बजावण्यासाठीं म्हणाला, "गॅलरींतील नागरिकांनीं व परकी लोकांनीं संपूर्ण शांतता आणि शिस्त पाळली पाहिजे." पण हें त्यानें सांगण्यापूर्वींच सारें सभागृह व प्रेक्षक अगदीं मृत्यू पावल्याप्रमाणें शांत झालें होतें. एक कांग्रेसमन त्यावेळचें वर्णन करतो, "प्रतिनिधिगृहाचे कांहीं सभासद त्या अनिश्चिततेच्या ताणानें फिके पडले व आजारी झाले." रॉस लिहितो "स्तब्धता इतकी होती कीं वसल्याबसल्या पाय हलविणें रेशमी कपडे हलणें, पंखे हलविणें यांचेहि आवाज ऐकूं येत नव्हते."

सर्वांच्या मनावर विलक्षण ताण पडलेल्या त्या क्षणीं मतदान सुरू झालें. एडमंड रॉस पर्यंत सर न्यायाधीश प्रश्न विचारीत आले, तेथपर्यंत २४ जणांनीं 'जॉन्सन गुन्हेगार' असें सांगितलें होतें. आणखी दहाजण निश्चित याच मताचे होते आणि आणखी एकजण जवळजवळ निश्चित होता. राष्ट्रपति जॉन्सनला दोषी ठरविण्यासाठीं अवश्य तीं ३६ मतें मिळण्याला एक रॉसचेंच मत आतां हवें होतें. पण कॅन्सासचा हा तरुण सिनेटर कसें मतदान करील हें कोणासच माहीत नव्हतें. सरन्यायाधीशानें रॉसला प्रश्न विचारला त्यावेळीं सरन्यायाधीशाच्या आवाजांत

त्याच्या मनावरील ताण व भावनोद्रेक व्यक्त झालेला दिसला. सरन्यायाधीश रॉसला म्हणाला, "मि. सिनेटर रॉस, तुमचें मत काय ? या आर्टिकलमध्यें राष्ट्रपति जॉन्सन यानें मोठेंच दुर्वर्तन केल्याचा आरोप त्याजवर आहे. तो तसा दोषी आहे कीं नाहीं ?" सर्वांनीं अगदीं स्तब्धपणें रॉसकडे डोळे लावले व कान टवकारले. गेल्या दहा वर्षांतील सर्वांच्या साऱ्या आशा आणि भीति, द्वेष आणि तेढ या भावना आतां या एकट्या सिनेटरावर खिळल्या होत्या.

त्या प्रसंगासंबंधानें रॉसनेंच पुढील काळांत लिहिलें आहे, "माझी ऐकण्याची व पहाण्याची शक्ति अस्वाभाविक इतक्या प्रमाणांत वाढलेली नाहीं ना, अशी मला त्यावेळीं शंका आली. मला त्या प्रचंड जमावांतील प्रत्येक चेहरा अगदीं स्पष्ट दिसत होता. कांहीं जण ओठ थोडे विलग करून उत्कंठेनें थोडेसें पुढें वाकून पाहात होते. दुसऱ्या कांहींनीं वर हात करून जणू कांहीं त्यांच्यावर पडणारा कोणाचा तरी टोला ते निवारत आहेत असा आविर्भाव केला होता. आणि माझ्यावर लावलेल्या प्रत्येकाच्या नजरेंत दुःखपूर्ण उत्कंठा होती. लोकांनीं पंखे मिटले होते. कोणाचें पाऊलहि हालत नव्हतें, कपडा हलल्याचा आवाज होत नव्हता, कुजबुजहि ऐकूं येत नव्हती....प्रत्येकाच्या चेहऱ्यावर आशा व भीति यांचें मिश्रण झालेलें दिसत होतें. क्षणांत आशा, क्षणांत भीति अशा त्या भावना बदलतानाहि दिसत होत्या...सिनेटर आपल्या डेस्कवर वाकले, कांहींनीं कानामागें हात धरले होते...त्यावेळची माझी ती जबाबदारी फारच मोठी होती. आणि माणसाला भूत दिसल्याचा फास झाला कीं तो जसा त्याला झटकून घालवूं पाहतो अथवा त्याला टाळण्यासाठीं पळ काढूं पाहातो त्या प्रमाणें माझ्यावरील त्यावेळची ती भयंकर जबाबदारी—जी अनेक दुर्देवी घटनांनीं एकत्र येऊन माझ्या डोक्यावर लादली होती—ती टाळण्याचा जर त्यावेळीं मीं प्रयत्न केला असला तर त्यांत कांहींच आश्चर्य नव्हतें...मला शब्दशः थडगें खणलेलें दिसूं लागलें. मैत्री, दर्जा, वैभव इत्यादि ज्या अनेक गोष्टीमुळें महत्त्वाकांक्षी माणसाला जीवन इष्ट वाटूं लागतें त्यांतील प्रत्येक बाब माझ्या एका शब्दासरशीं, कदाचित कायमची दूर जाणार होती. मनावर एवढें दडपण असल्यामुळें माझें उत्तर हवेंत थरथरत गेलें आणि श्रोत्यापर्यन्त पोचलेंच नाहीं त्यांत आश्चर्य नाहीं, तेव्हां त्या सभागृहांत दूर बसलेल्या सिनेटरांनीं पुन्हा स्पष्टपणें उत्तर द्या अशी मागणी केली तेंहि स्वाभाविकच घडलें."

नंतर मात्र दुसऱ्यांदां जें उत्तर रॉसनें दिलें तें अशा आवाजांत दिलें की त्या बद्दल गैरसमज उरला नाहीं. 'निर्दोषी' असें तें परिपूर्ण, स्पष्ट, ठाम व निःसंदिग्ध उत्तर होतें. तें सत्कृत्य पार पडलें. राष्ट्रपतीचा बचाव झाला. खटला जवळ-जवळ संपला व आरोपाची शाबिती झाली नाहीं. नंतरच्या सभासदांच्या नांवांचा पुकार निरर्थक होता. एकमत कमी पडल्यानें आरोपाची शाबिती चुकली होती. सभागृहांत सर्वत्र गडबड माजली. शेवटीं सरन्यायाधीशानें जाहीर केलें कीं "या आर्टिकलवर ३५ सदस्यांनीं 'दोषी' असें मत दिलें व १९ नीं निर्दोषी असें मत दिलें यामुळें राष्ट्रपति निर्दोषी ठरला आहे."

यानंतर सीनेटला दहा दिवसांची सुटी झाली. ते दहा दिवस अत्यंत खळबळीचे गेले. कारण त्यांत बाकीच्या आर्टिकल्स-संबंधानें मतें मिळविण्यासाठीं ओढाताण खूप झाली. दक्षिणेंतील नवीन सहा राज्यांचे सिनेटर जॉन्सनच्या विरुद्ध मतें देतील अशी खात्री वाटल्यामुळें त्या सहा राज्यांना अमेरिकन संघराज्यांत प्रवेश देण्याचा प्रयत्न झाला. पण ती गोष्ट जरूर तितक्या दिवसांत होऊं शकली नाहीं. या बाकीच्या आर्टिकल्सबाबतहि रॉसनें आगाऊ आपलें मत ठरविण्याचें नाकारलें. ज्याचें मत आगाऊ हेरता येत नव्हतें असा तो एकटाच होता. त्याच्यावर पुन्हा-पुन्हा भयंकर दडपण आलें. "डी. आर्. अँथनी व इतर हजार जण" यांजकडून रॉसला पुन्हा तार आली. "सर्व खोटी साक्ष देणारे व क्षुद्र लोक यांचा कॅन्सास तिरस्कार करते तसाच तुझा करीत असून तूं आमचा प्रतिनिधि नाहींस असें आम्ही जाहीर करतों." रॉसच्या चरित्रांतली प्रत्येक गोष्ट तपासून तिचा विपर्यास करण्यांत आला. सिनेटर पॉमेरी यानें एक धंदेवाईक साक्षीदार शोधून काढून प्रतिनिधिसभेच्या खास कमिटीपुढें "मोबदला मिळेल तर आपण मत बदलूं" असें रॉसनें म्हटल्याचें त्याला सांगायला लावलें. (पॉमेरीच्या दुर्दैवानें या साक्षीदारानें उत्साहाच्या भरांत असेंहि सांगितलें कीं ४० हजार डॉलर दिल्यास 'निर्दोषी' असा निर्णय देणारीं तीन मतें आपण मिळवूं असें सिनेटर पॉमेरी म्हणत होता.) रॉस एका कमिटीचा अध्यक्ष होता व राष्ट्रपतीची अनेक बिलांना संमति मिळविण्यासाठीं तीं बिलें घेऊन चालला होता. त्याला पाहून जेम्स ब्लेन म्हणाला, "तो पहा तो हलकट माणूस राष्ट्रपतीकडे आपला पगार घेण्यासाठीं चालला आहे." (पुढें दीर्घ कालांतरानें मात्र ब्लेननें कबूल केलें कीं "संतापाच्या व चिडाचिडीच्या त्या काळीं निंदेचा अतिरेक होऊन निष्कलंक चारित्र्याच्या मुत्सद्यांना फार मोठा अन्याय झाला.")

खटल्याच्या बाकीच्या आर्टिकल्सच्या बाबतींत रॉसला रिपब्लिकनांनीं आपणाकडे वळवून घेतलें अशा अफवा उठल्या. सिनेट पुन्हा भरलें त्यावेळीं खटल्याच्या कार्यक्रमाबाबतच्या मुद्यावर पूर्वींच्या त्या सात 'प्रतिगाम्यां'पैकीं एकटचा रॉसनेंच बहुसंख्यांच्या बाजूनें मतदान केलें. पण 'दोषी' कीं 'निर्दोषी' हें ठरविणारीं दोन आर्टिकलें जेव्हां वाचलीं गेलीं तेव्हां रॉसचें नांव पुन्हा उच्चारलें गेलें आणि दहा दिवसांपूर्वींच्या सारख्याच तीव्र उत्कंठेच्या वातावरणांत रॉसनें शांतपणें 'निर्दोषी' असें अगदीं स्पष्ट उत्तर देऊन टाकलें.

जॉन्सनबद्दल रॉसला खरोखर तिटकारा होता. तरीहि रॉसनें जॉन्सनला निर्दोषी कां ठरविलें ? त्यानें स्वत: पुढें अनेक वर्षांनंतर स्क्रिब्नर्स मॅगझिन आणि फोरम यांत लेख लिहून आपली भूमिका स्पष्ट केली.

रॉस लिहितो: "व्यापक दृष्टीनें पाहिले असता जॉन्सनवर झालेल्या खटल्यांत जॉन्सन ही व्यक्ति महत्त्वाची नसून कायदेकारी सत्ता व कार्यकारी सत्ता या ज्या सरकार या संस्थेच्या दोन परस्परसंयोगी शाखा, त्यापैकीं कार्यकारी सत्तेचें जें स्वातंत्र्य त्या स्वातंत्र्यावर तो खटला झाला होता....राष्ट्रपतिपदावरील व्यक्तीचा जर उपमर्द झाला, राजकारणांतून बहिष्कृत होऊन राष्ट्रपतिपदावरून त्याला जर पदच्युत व्हावें लागलें आणि त्यासाठीं पुरेसा पुरावा नसता केवळ पक्षबाजीच्या कारणांनीं राष्ट्रपतीचा असला उपमर्द होत असला तर त्यामुळें राष्ट्रपतिपदाचा दर्जा खालावेल, सरकार या संस्थेंतील एक संयोगी शाखा म्हणून राष्ट्रपतिपदाचें महत्त्व रहाणार नाहीं. त्यानंतर मग कायदेकारी सत्तेपुढें राष्ट्रपतीला सदा नमतें घ्यावें लागेल. आमची राजकीय घटना समतोल व सुन्दर बनविलेली आहे. तिच्यांत आमूलाग्र बदल करून काँग्रेसमधील पक्षबाजी-ची हुकुमशाही अमेरिकेंत सुरू होईल. इतका अदृश्य पण भयंकर धोका आपल्या सरकारपुढें कधींच आला नव्हता. अमेरिकन राजकारणांत गटबाजीचा दोष अतिशय तीव्र असून अशा गटबाजीच्या हातीं राज्यसत्ता जाणें एवढा तो मोठा धोका होता. अँन्ड्र्यू जॉन्सन जर गटबाजीस बळी न पडलेल्या सदस्यांच्या मतानें निर्दोषी ठरला तर अमेरिका गटबाजीच्या राजकारणांत सापडण्याच्या धोक्यांतून सुरक्षित पार पडेल आणि प्रचंड बहुमतांच्या वर्चस्वामुळें जी एक प्रकारची असहिष्णुता निर्माण होते व ज्यामुळें ती बहुमताची सत्ता धोक्याची

होते तें संभाव्य संकट अमेरिकेवर येण्याचें टळेल, असा विचार करून मी जॉन्सनला निर्दोषी ठरविलें."

"माझें थडगें उकरलें जात असलेलें मला दिसत होतें," असे रॉसचे उद्गार वर दिले आहेत त्यांत मुळींच अतिशयोक्ति नव्हती. कॅन्ससच्या सुप्रीम कोर्टाच्या एका जज्जानें रॉसला तार करून कळविलें कीं, "जुडास इस्कॅरियट ह्यानें आत्महत्या करण्यासाठीं जी दोरी वापरली ती हरवली आहे, पण जिम लेन् यानें आत्महत्येसाठीं जें पिस्तुल वापरलें तें पिस्तुल घेऊन तूं आपला कपाळमोक्ष कां करीत नाहींस ? "

कॅन्ससच्या एका वृत्तपत्राच्या अग्रलेखांत पुढीलप्रमाणें अगदीं किंचाळून लिहिलें होतें. "गेल्या शनिवारीं कॅन्ससतर्फे निवडून आलेला अमेरिकन सिनेटर एडमंड जी. रॉस यानें स्वतःला विकून टाकलें आणि त्याला निवडून देणाऱ्या कॅन्ससच्या कायदेमंडळाचा विश्वासघात केला. त्यानें आपल्या उज्ज्वल पूर्वेतिहासाला हरताळ फांसला, हलक्या मनानें वागून आपल्या मित्राशीं तो खोटें बोलला आणि स्वतःच गंभीरपणें दिलेल्या शपथा त्यानें मोडल्या....आधीं त्याची अक्कल बेताचीच आहे. त्या बेताच्या अकलेचा पूर्ण उपयोग करून आपल्या राष्ट्राच्या मृत्यूच्या हुकूमनाम्यावर त्यानें सही केली. हें दुष्कृत्य त्यानें जाणून बुजून केलें. कारण, या तत्त्वद्रोह्याचें प्रेम तत्त्वापेक्षां पैशावर अधिक होतें. मित्र, स्वाभिमान, राष्ट्र या सर्वांपेक्षां तो पैशाला अधिक किंमत देत होता. मनानें खुजा, क्षुद्र, कींव करण्यासारखा हा नीच माणूस आहे. याचें व्यक्तित्व इतकें हलकें आहे कीं त्याच्याजवळ मानवतेला भूषणभूत असा दर्जा मुळींच नसून पापमार्गानें मिळविलेला एक पैसाहि त्याच्यापेक्षां अधिक वजनदार असेल."

रॉसचें राजकीय भवितव्य येथें संपलें. 'न्यूयॉर्क ट्रिब्यून'च्या मतें तो एक देशद्रोही, भुक्कड माणूस होता. फिलाडेल्फियाच्या 'प्रेस' या पत्रानें लिहिलें, "रॉसच्या क्षुद्रतेला साजेसेंच क्षुद्र वर्तन त्यानें केलें. रॉस् आणि त्याचे हट्टी सहकारी हे कीर्तीच्या कड्यावरून दुष्किर्ति आणि मृत्यु याच्या खोल दरींत आकर्षिले गेले." फिलाडेल्फियाच्या इन्क्वायरर या पत्रानें लिहिले, "त्यांनीं स्वतःवर खटला केला, स्वतःला शिक्षाहि करून घेतली आहे. त्यांची गय करणें अथवा त्यांना क्षमा करणें योग्य नाहीं."

पुढें स्टॅन्टननें राजीनामा दिला आणि वॉशिंग्टन थोडेसें शांत झालें. जॉन्सननें

खटल्याच्या बाकीच्या आर्टिकलसच्या बाबतींत रॉसला रिपब्लिकनांनीं आपणाकडे वळवून घेतलें अशा अफवा उठल्या. सिनेट पुन्हा भरलें त्यावेळीं खटल्याच्या कार्यक्रमाबाबतच्या मुद्यावर पूर्वींच्या त्या सात 'प्रतिगाम्यां'पैकीं एकट्या रॉसनेंच बहुसंख्यांच्या बाजूनें मतदान केलें. पण 'दोषी' कीं 'निर्दोषी' हें ठरविणारीं दोन आर्टिकलें जेव्हां वाचलीं गेलीं तेव्हां रॉसचें नांव पुन्हा उच्चारलें गेलें आणि दहा दिवसांपूर्वींच्या सारख्याच तीव्र उत्कंठेच्या वातावरणांत रॉसनें शांतपणें 'निर्दोषी' असें अगदीं स्पष्ट उत्तर देऊन टाकलें.

जॉन्सनबद्दल रॉसला खरोखर तिटकारा होता. तरीहि रॉसनें जॉन्सनला निर्दोषी कां ठरविलें ? त्यानें स्वत: पुढें अनेक वर्षांनंतर स्क्रिब्नर्स मॅगझिन आणि फोरम यांत लेख लिहून आपली भूमिका स्पष्ट केली.

रॉस लिहितो: "व्यापक दृष्टीनें पाहिले असता जॉन्सनवर झालेल्या खटल्यांत जॉन्सन ही व्यक्ति महत्त्वाची नसून कायदेकारी सत्ता व कार्यकारी सत्ता या ज्या सरकार या संस्थेच्या दोन परस्परसंयोगी शाखा, त्यापैकीं कार्यकारी सत्तेचें जें स्वातंत्र्य त्या स्वातंत्र्यावर तो खटला झाला होता....राष्ट्रपतिपदावरील व्यक्तीचा जर उपमर्द झाला, राजकारणांतून बहिष्कृत होऊन राष्ट्रपतिपदावरून त्याला जर पदच्युत व्हावें लागलें आणि त्यासाठीं पुरेसा पुरावा नसता केवळ पक्षबाजीच्या कारणांनीं राष्ट्रपतीचा असला उपमर्द होत असला तर त्यामुळें राष्ट्रपतिपदाचा दर्जा खालावेल, सरकार या संस्थेंतील एक संयोगी शाखा म्हणून राष्ट्रपतिपदाचें महत्त्व रहाणार नाहीं. त्यानंतर मग कायदेकारी सत्तेपुढें राष्ट्रपतीला सदा नमतें घ्यावें लागेल. आमची राजकीय घटना समतोल व सुन्दर बनविलेली आहे. तिच्यांत आमूलाग्र बदल करून कॉंग्रेसमधील पक्षबाजी-ची हुकुमशाही अमेरिकेंत सुरू होईल. इतका अदृश्य पण भयंकर धोका आपल्या सरकारपुढें कधींच आला नव्हता. अमेरिकन राजकारणांत गटबाजीचा दोष अतिशय तीव्र असून अशा गटबाजीच्या हातीं राज्यसत्ता जाणें एवढा तो मोठा धोका होता. अँन्ड्रयू जॉन्सन जर गटबाजीस बळी न पडलेल्या सदस्यांच्या मतानें निर्दोषी ठरला तर अमेरिका गटबाजीच्या राजकारणांत सापडण्याच्या धोक्यांतून सुरक्षित पार पडेल आणि प्रचंड बहुमतांच्या वर्चस्वामुळें जी एक प्रकारची असहिष्णुता निर्माण होते व ज्यामुळें ती बहुमताची सत्ता धोक्याची

होते तें संभाव्य संकट अमेरिकेवर येण्याचें टळेल, असा विचार करून मी जॉन्सनला निर्दोषी ठरविलें."

"माझें थडगें उकरलें जात असलेलें मला दिसत होतें," असे रॉसचे उद्गार वर दिले आहेत त्यांत मुळींच अतिशयोक्ति नव्हती. कॅन्ससच्या सुप्रीम कोर्टाच्या एका जज्जानें रॉसला तार करून कळविलें कीं, "जुडास इस्कॅरियट ह्यानें आत्महत्या करण्यासाठीं जी दोरी वापरली ती हरवली आहे, पण जिम लेन् यानें आत्महत्येसाठीं जें पिस्तुल वापरलें तें पिस्तुल घेऊन तूं आपला कपाळमोक्ष कां करीत नाहींस ? "

कॅन्ससच्या एका वृत्तपत्राच्या अग्रलेखांत पुढीलप्रमाणें अगदीं किंचाळून लिहिलें होतें. "गेल्या शनिवारीं कॅन्ससतर्फे निवडून आलेला अमेरिकन सिनेटर एडमंड जी. रॉस यानें स्वत:ला विकून टाकलें आणि त्याला निवडून देणाऱ्या कॅन्ससच्या कायदेमंडळाचा विश्वासघात केला. त्यानें आपल्या उज्ज्वल पूर्वेतिहासाला हरताळ फांसला, हलक्या मनानें वागून आपल्या मित्राशीं तो खोटें बोलला आणि स्वत:च गंभीरपणें दिलेल्या शपथा त्यानें मोडल्या....आधीं त्याची अक्कल बेताचीच आहे. त्या बेताच्या अकलेचा पूर्ण उपयोग करून आपल्या राष्ट्राच्या मृत्यूच्या हुकूमनाम्यावर त्यानें सही केली. हें दुष्कृत्य त्यानें जाणून बुजून केलें. कारण, या तत्त्वद्रोह्याचें प्रेम तत्त्वापेक्षां पैशावर अधिक होतें. मित्र, स्वाभिमान, राष्ट्र या सर्वांपेक्षां तो पैशाला अधिक किंमत देत होता. मनानें खुजा, क्षुद्र, कींव करण्यासारखा हा नीच माणूस आहे. याचें व्यक्तित्व इतकें हलकें आहे कीं त्याच्याजवळ मानवतेला भूषणभूत असा दर्जा मुळींच नसून पापमार्गानें मिळविलेला एक पैसाहि त्याच्यापेक्षां अधिक वजनदार असेल."

रॉसचें राजकीय भवितव्य येथें संपलें. 'न्यूयॉर्क ट्रिब्यून'च्या मतें तो एक देशद्रोही, भुक्कड माणूस होता. फिलाडेल्फियाच्या 'प्रेस' या पत्रानें लिहिलें, "रॉसच्या क्षुद्रतेला साजेसेंच क्षुद्र वर्तन त्यानें केलें. रॉस् आणि त्याचे हट्टी सहकारी हे कीर्तीच्या कड्यावरून दुष्कीर्ति आणि मृत्यु याच्या खोल दरींत आकर्षिले गेले." फिलाडेल्फियाच्या इन्क्वायरर या पत्रानें लिहिले, "त्यांनीं स्वत:वर खटला केला, स्वत:ला शिक्षाहि करून घेतली आहे. त्यांची गय करणें अथवा त्यांना क्षमा करणें योग्य नाहीं."

पुढें स्टॅन्टननें राजीनामा दिला आणि वॉशिंग्टन थोडेसें शांत झालें. जॉन्सननें

त्याचा राष्ट्रपतिपदाचा उरलेला काळ पुरा करून तो पुन्हा टेनेसीतर्फे विजय-भरानें सिनेटर म्हणून निवडून आला. ज्या सात रिपब्लिकनांनीं जॉन्सनचा बचाव केला होता ते मात्र निवडून येऊं शकले नाहींत. रॉसवर विपरीत प्रसंग आला. त्यानें आपण जें मतदान केलें तें कां केलें याचा खुलासा केला. बेन् बटलर यानें रॉसच्या वर्तनाची चौकशी करण्याकरितां कमिटी नेमून घेतली होती. त्या कमिटीनें जे खोटेनाटे आरोप केले त्यांचा रॉस्नें धिःकार केला. जनरल बेन बटलर हा मनाचा हलका असून त्याची मनोवृत्ति घाणेरडी आहे, असें रॉसनें जाहीरपणें म्हटलें, त्याच्या दुर्दैवानें त्यानें सिनेटमधील आपली जागा मुदत संपेपर्यंत सोडली नाहीं. देशद्रोही रॉस् असा उल्लेख अनेकजण पुन्हापुन्हा त्याच्या संबंधानें करीत. त्याच्या बरोबरचे कॉंग्रेसमेन अथवा रस्त्यावरचे नागरिकहि रॉसशीं संबंध ठेवणें हें बदनामीकारक आहे असें मानतात अशी रॉसनें तक्रार केली आहे.

रॉस व जॉन्सनला निर्दोषी ठरविणारे त्याचें इतर रिपब्लिकन सहकारी हे पुन्हा सिनेटमध्यें निवडून येऊं शकले नाहींत. त्यांच्या पक्षसंघटनेचा फायदा त्यांतल्या एकालाहि मिळाला नाहीं. रॉस १८७१ सालीं कॅन्ससला परतला. त्यावेळीं त्याला व त्याच्या कुटुंबीयांना सामाजिक छळ अतोनात सोसावा लागला. त्यांच्यावर शारीरिक हल्लेहि झाले आणि दारिद्र्यहि त्यांना आतोनात सोसावें लागलें.

एडमंड रॉस हा कोण होता ? तो अगदींच सामान्य मनुष्य होता. एकहि सार्वजनिक कायदा त्याच्या नांवाशीं जोडलेला नाहीं. एकाहि इतिहासाच्या पुस्तकांत कोठें त्याचें चित्र नाहीं. 'सिनेटमधील मोठीं कामें करणारीं बडीं माणसें' या यादींत त्याचें नांव नाहीं अगर त्याचें काम नोंदलेलें नाहीं. त्याचें एकुलतें एक शूर कृत्य आतां विसरलें गेलें आहे. एडमंड रॉस् काय झाला असता ? प्रश्न आहे तो खरोखरी हा आहे. त्याला भाषाप्रभुत्व चांगलें होतें. त्याची राजकीय पार्श्वभूमि चांगली होती. सिनेटमध्यें त्यानें मोठी कीर्ति मिळविली असती आणि सिनेटमधील आपल्या दीर्घकालीन कारकिर्दींत इतर अनेक सहकाऱ्यांच्यापेक्षां अधिक इ[illegible]त व अधिक सामर्थ्य त्यानें मिळविलें असतें, पण सद्सद्विवेकबुद्धीचें एक कृत्य करण्याकरितां हें सर्व उत्कृष्ट भवितव्य त्यानें खुषीनें झुगारून दिलें.

खटला संपल्यानंतर त्यानें आपल्या बायकोला पत्र लिहिलें होतें. "लक्षावधि लोक आज मला शाप देत आहेत. पण अमेरिकेच्या जीवनावर आजपर्यंत आलेल्या कोणत्याहि संकटापेक्षां अधिक मोठ्या अशा संकटांतून मीं अमेरिकनांना वांचविलें आहे याबद्दल उद्यांची पिढी मला दुवा देईल. या प्रकरणीं माझें सर्व बाजूंनीं नुकसान किती झालें हें मात्र एका परमेश्वराखेरीज इतर कुणालाहि कळणार नाहीं." पुढें वीस वर्षेपर्यंत सतत कोणत्याहि पक्षाच्या राष्ट्रपतीनें अधिकार-मुदत (Tenure of office) कायद्याला नकार दिला व वीस वर्षांच्या शेवटीं कॉंग्रेसनें तो कायदा नामंजूर करून टाकला. पुढें कांहीं दिवसांनीं सुप्रीम कोर्टानें जॉन्सनच्या या वेळच्या परिस्थितीचा "आमच्या सरकारांत त्यावेळीं परस्परविरोधी घटना होत्या" असा उल्लेख करून अधिकार-मुदत कायद्याचें तत्त्व घटनाबाह्यच ठरविलें. अशा प्रकारें रॉसच्या त्या धैर्यशील वर्तनाचा अप्रत्यक्षपणें पुढील काळांत गौरव झाला. पुढें रॉस न्यू मेक्सिकोला गेला. तेथें त्याला प्रादेशिक गव्हर्नर नेमण्यांत आलें. मृत्यूच्या पूर्वी त्याला यादवींतील त्याच्या कामगिरीबद्दल खास पेन्शन मिळालें. त्यावेळीं त्याचा गौरव करण्याची संधि साधून वृत्तपत्रांनीं व जनतेनें राष्ट्राच्या इतिहासांतील एका कसोटीच्या प्रसंगीं आपल्या तत्त्वनिष्ठेच्या बळावर रॉसनें राष्ट्राचा एका भयानक दहशतवादापासून बचाव केला असें म्हणून त्याची पाठ थोपटली.

"कोणत्याहि प्रकारच्या सरकाराचा ज्या राज्यपद्धतीनें विध्वंस झाला असता अशा राज्यपद्धतीपासून आपण देशाचा बचाव केला हें त्याचें पूर्वीचें म्हणणें लोकांनीं व वृत्तपत्रांनीं आतां मान्य केलें. ज्या कॅन्ससच्या वृत्तपत्रांनीं व राजकीय पुढाऱ्यांनीं एका काळीं त्याचा कठोर शब्दांत धिःकार केला होता त्यांनीं आतां कायदेकारी सत्तेच्या गुंडगिरीपासून रॉसनें राष्ट्राचा बचाव केला अशी रॉसची प्रशंसा केली.

"सिनेटर रॉस यानें आपल्या निर्धारानें व धैर्यानें युद्धापेक्षांहि मोठ्या संकटापासून राष्ट्राला वांचविलें आणि त्याचा स्वतःचा मात्र इतिहासांत कुणाचा झाला नाहीं इतका क्रूर छळ झाला...असहिष्णुतेची एक भयंकर आग त्याकाळीं उसळली होती. तिला रॉस बळी पडला यांत आपला राजकीय मृत्यु आहे हें ठाऊक असूनहि त्यानें आपलें कर्तव्य केलें. तो आपल्या सद्सद्विवेकबुद्धीला व उच्च देशाभिमानास जागून वागला. त्याचा अतिशय वाईट परिणाम आपणांस भोगावा लागेल याची पर्वा न करता त्यानें न्याय्य असें वर्तन केलें.

# ते सहा धैर्यवान रिपब्लिकन्स

रॉसची ही कथा सांगितल्यानंतर, जे सहा रिपब्लिकन रॉसच्या बाजूस मोठ्या धैर्यानें राहिले व ज्यांनीं अँन्ड्र्यू जॉन्सनला निर्दोषी ठरविलें त्या सहा रिपब्लिकनांसंबंधानें पुरेसा निर्देश केल्यावांचून रॉसचें चरित्र मला संपविता येत नाहीं. त्या सात जणांपैकीं एडमंड रॉस याला त्या खटल्यापूर्वी व नंतर बाकीच्या सहा जणांपेक्षां अधिक दुःख भोगावें लागलें. आपल्या सदसद्विवेक बुद्धीस काय वाटतें हें ठरविण्यासाठींहि त्याला फार मानसिक यातना सोसाव्या लागल्या. आणि १६ मे पूर्वी आपलें मत न सांगता त्यानें मौन धारण केल्यामुळें लोकांच्या तीक्ष्ण कुतूहलाचा व चिंतेचाहि विषय तो स्वत: झाला. त्याची कथा ही त्याच्या मतदानाप्रमाणेंच जॉन्सनच्या खटल्यांतील केंद्रीभूत घटना आहे. पण रॉस-प्रमाणेंच बाकीच्या त्याच्या सहा रिपब्लिकन सहकाऱ्यांचीहि स्मृति लोकांनीं मनोधैर्याची श्रेष्ठ उदाहरणें म्हणून कायम ठेवली पाहिजे. या सातांपैकीं कुणालाहि सिनेटवर निवडून येता आलें नाहीं. धमक्या, लांच व जुलुमी सक्ति हे उपाय त्यांच्या सहकारी रिपब्लिकनांनीं त्यांना नमविण्याकरितां या सातहि जणांवर वापरले. आणि त्यांनीं जॉन्सनला निर्दोषी ठरविण्याकरितां जें मतदान केलें त्यामुळें झालेल्या तीक्ष्ण टीकेचा छळ सर्वांना सोसावा लागला.

(१) विल्यम पिट् हेसेंडन् हा मेन् राज्याचा सिनेटर त्या काळच्या वक्त्यांत व वकिलांत बराच वरचढ होता. रिपब्लिकन पक्षाचा तो वडीलधारा पुढारी होता. तो स्टॅन्टनचा चहाता असून जॉन्सन त्याला आवडत नसे. पण खटला चालू झाल्यानंतर हा खटला सारा महामूर्खपणा आहे अशी त्याची खात्री झाली.

फेसेंडन् या प्रकरणासंबंधानें सांगतो: "राष्ट्रपतीबद्दल सर्वांचेंच मत अतिशय वाईट आहे; तें स्वाभाविक असून या राष्ट्रपतीचा पाडाव करावा असें सर्वांना वाटतें. पण व्यक्तिश: मला कोणतेहि परिणाम भोगावे लागोत, राजकारणी म्हणून जॉन्सनबद्दल माझें मत वा भावना कांहींहि असोत, मी जॉन्सन हा दोषी कीं

निर्दोषी याविषयीं माझ्या सदसद्विवेकबुद्धीविरुद्ध निर्णय देणार नाहीं- त्यापेक्षां राजकारणांतून निवृत्त होऊन उरलेल्या आयुष्यांत मी बागायती शेती करीत बसेन. माझा देशद्रोही म्हणून धिःकार होईल. कदाचित् माझी प्रतिमा फांसावर चढविली जाईल. जॉन्सनवर खटला करावा या मताच्या वर्तमानपत्रांनीं माझ्यार शिव्यांची लोखोली वाहिलीं, अनेक मित्रांच्याकडून मला पत्रें आलीं व मीं जर जॉन्सनला दोषी ठरविले नाहीं, तर माझें राजकीय थडगें बांधून तयार आहे असें इषारे त्यांत देण्यांत आले होते. खुनाच्याहि धमक्या आल्या होत्या. ज्यांची मीं एकनिष्ठेनें दीर्घकाल सेवा केली, त्यांनीं माझ्या या उतारवयांत माझ्यावर असे तीव्र विद्वेषाचे बाण मारावेत हें खरोखर असह्य वाटतें. जनता ही प्रक्षुब्ध झाली, दूषित पूर्वग्रह आणि दूषित भावना यांनीं तिच्या मनांत एकदां पेट घेतला की मग ती जनता शुद्ध पशु होते. कांहीं झालें तरी मी माझा स्वाभिमान सांभाळून राहीन. माझी सदसद्विवेकबुद्धि स्वच्छ राहील. माझ्या हेतुबद्दल कालांतरानें कां होईना मला न्याय मिळेलच."

फेसेंडन हा सर्वांकडून आदरिला जात होता. त्याला जॉन्सनच्या विरुद्ध बाजूस घेण्याचा जहाल रिपब्लिकनांनीं निर्धार केला होता. मतदानाच्या वेळीं त्यांचें नांव पहिल्यानें पुकारलें जावयाचें होतें. त्याच्या मेन राज्यांतून त्याला आलेलीं पत्रें शिवराळ होतीं, धमकीचीं होतीं, जॉन्सनविरुद्ध मतदान करा अशी विनंति करणारींहि होती. एका चिडलेल्या जमावापुढें बोलताना वेंडेल फिलिप्स फेसेंडनच्या संबंधानें म्हणाला, "एखादी मुत्सद्देगिरीची कल्पना फेसेंडनच्या डोक्यांत शिरण्याला सहा महिने लागतात. तो अगदीं निर्बुद्ध आहे असें नव्हे. त्याच्या डोक्यांत विषय शिरायला वेळ लागतो."

फेसेंडन्नें टपाल व वृत्तपत्रें पहाण्याचें बंदच केलें. मेनमधील त्याच्या एका जुन्या राजकीय मित्रानें त्याला सांगितलें कीं, "शेतामध्यें इतर कावळ्यांना भिवविण्यासाठीं कावळ्याला ठार मारून त्याला उलटा टांगतात तसा जॉन्सनला पायांनीं टांगून घाल. या राज्यांतील प्रत्येक स्वदेशनिष्ठ माणसाचें हें मत आहे." हें ऐकून मात्र हेसेंडनला संताप आला. त्यानें आपल्या मित्राला कळविलें,

"मी न्यायाधीश म्हणून वागतो आहें. तुझ्या सारख्या ज्या माणसाच्या डोक्यावर कोणतीहि जबाबदारी नाहीं आणि ज्या तूं पुरावाहि ऐकला नाहींस, अशा माणसानें मीं निर्णय काय द्यावा आणि शिक्षा काय द्यावी हें सांगावें असा

तुला काय अधिकार आहे ? माझ्या सर्व मित्रांनीं व मतदारानीं एक गोष्ट ध्यानांत ठेवावीं कीं जॉन्सनचा न्याय करावयाला ते बसले नसून मी बसलों आहे. नि.पक्षपाती न्याय देण्याची शपथ त्यांनीं घेतली नसून मीं घेतली आहे. मी जी कृति करीन व तिचे जे परिणाम होतील त्याबद्दल परमेश्वराला ते जबाबदार नसून मी जबाबदार आहें."

जॉन्सनला निर्दोषी म्हणून जाहीर करणारा पहिला सिनेटर हा जो विल्यम पिट फेसेंडन त्याच्या टीकाकारांनीं त्याच्यावर शिव्यांचा सतत वर्षाव चालू ठेवल्यामुळें पुन्हा सिनेटर म्हणून निवडून येणें त्याला अशक्यच झालें. तो वयोवृद्धहि होता. त्या सातांत तो सर्वांआधीं मृत्यु पावला.

(२) या सातांपैकीं मिसूरीचा सिनेटर जॉन बी. हेंडर्सन हा वयानें सर्वांत लहान होता. राज्यघटनें अन्वयें गुलामगिरी रद्द करण्यासाठीं त्यानें राज्यघटनेला १३ वी उपसूचना सिनेटमध्यें मांडली, त्यावेळीं त्याचें धैर्य अगदीं कसोटीला लागलें. मिसूरीचा तो प्रतिनिधि असून मिसूरी हे गुलामगिरीवादी राष्ट्र होतें. आणि गुलामगिरीवादी राष्ट्राकडूनच गुलामगिरी नष्ट करण्याचें बिल मांडलें गेलें, तरच ते मंजूर होईल असा दृढ संभव होता म्हणून त्यानें हें काम पत्करलें. त्यामुळें आपलें राजकीय भवितव्यहि नष्ट होईल हें त्याला माहीत होतें. पण गुलामगिरी गेलीच पाहिजे अशी त्याची खात्री झाली असल्यानें त्यानें गुलामगिरी नष्ट करण्याचें बिल मांडण्याचें धैर्य दाखविलें. पुढें मिसूरींतील रिपब्लिकनांचें एक मोठें शिष्टमंडळ हेंडर्सनच्या भेटीस गेलें. त्याच्या कचेरींत जाऊन या शिष्टमंडळानें "दुष्ट जॉन्सनला दोषी ठरव, आम्ही याहून दुसरा मार्ग सहन करणार नाहीं" असें हेंडर्सनला दम देऊन बजावलें. तेव्हां हेंडर्सनचें धैर्य डळमळलें. त्यानें नमतें घेऊन आपण सिनेटचा राजीनामा देत आहों असें गव्हर्नरला कळविण्याचें मान्य केलें. यामुळें जॉन्सनला दोषी ठरविणारा सिनेटर निवडून देणें शक्य होणार होतें. पण अशा नव्या सिनेटरला मतदानाचा अधिकार मिळणार नाहीं अशी शंका निघाली तेव्हां आपल्या मताची जॉन्सनला दोषी ठरविण्यासाठीं निर्वाणीची आवश्यकता आहे कीं काय याबद्दलहि त्यानें खात्री करून घेण्याचें मान्य केलें.

त्याचें मन अशा प्रकारें चलबिचल पावत असतां मिसूरींतून एक उद्धट व धमकीवजा तार त्याला आली. त्यामुळें हेंडर्सनचा स्वाभिमान जागा झाला.

त्यानें त्या तारेस ताबडतोब तारेनेंच उत्तर धाडलें, " माझ्या मित्रांना सांगा कीं कायदा व सदसद्विवेक बुद्धि यांना साक्ष ठेवून न्याय्य निर्णय देण्याची मीं शपथ घेतली आहे. आणि प्रामाणिक माणसाप्रमाणें मी ही शपथ पाळणार आहें.

त्याप्रमाणें जॉन हेंडर्सन यानें 'जॉन्सन निर्दोषी' असें आपलें मत नोंदलें. पण सिनेटर या नात्यानें त्यानें केलेलें महत्कृत्य असें तें शेवटचेंच ठरलें. मिसूरींत त्याचा धिक्कार झाला, त्याला अनेक धमक्या मिळाल्या, त्याची प्रतिमा जाळण्यांत आली. इतकी शोभा झाल्यावर त्यानें सिनेटमध्यें पुन्हा निवडून येण्याचा प्रयत्नच केला नाहीं. पुढें कांहीं वर्षांनीं त्याच्या पक्षानें त्याची सेवा लक्षांत घेतली आणि सिनेटरहून खालच्या दर्जाच्या जागेवर त्याला निवडून आणलें. पण ज्या सिनेटची थोरवी हेंडर्सननें टिकविली होती त्या सिनेटमध्यें त्याला परत येता आलें नाहीं.

(३) पीटर व्हॅनविंकल हा वेस्ट व्हर्जीनिया राज्याचा सिनेटर. १६ मे रोजीं जॉन्सनच्या खटल्यांत जें मतदान झालें त्यावेळीं याचें शेवटचें मत अनिश्चित मत होतें. रॉससारखाच तोहि अगदीं सामान्य माणूस होता. पण त्याचें नांव जजानें पुकारताच 'निर्दोषी' असा निर्णय त्यानें अगदीं निस्संदिग्धपणें उच्चारून, रॉसनें आपल्या निर्णयानें आधींच संपुष्टांत आणलेली रिपब्लिकनांची आशा संपूर्ण मालवून टाकली. व्हॅन विंकल हा वेस्ट व्हर्जीनियाचा पहिला सिनेटर होता. स्टॅन्टनला जॉन्सननें काढून टाकलें हें त्याला पसंत नव्हतें. तरीहि त्यानें 'जॉन्सन निर्दोषी' असाच निर्णय दिला. यांत त्यानें जें धैर्य दाखविलें त्याबद्दल 'वेस्ट व्हर्जीनियाचा विश्वासघातकी' अशी निंदा त्याला सोसावी लागली. व्हीलिंग इंटेलिजन्सर' या पत्रानें त्याची वरील प्रकारें निंदा करून व्हॅन विंकल यानें वेस्ट व्हर्जीनियांतील प्रत्येक स्वदेशनिष्ठ नागरिकाबद्दल गैरसमज निर्माण केला आहे असा अभिप्राय व्यक्त केला. यामुळेंच सिनेटमधील त्याची मुदत संपल्यावर राजकारणांतून त्याला कायमचें निवृत्त व्हावें लागलें.

(४) इलिनॉइस राज्याचा सिनेटर जॉन ट्रंबुल हा मोठा अनुभवी सिनेटर होता. अॅबे लिंकनचा त्यानें सिनेटच्या उमेदवारींत पराभव केला होता. त्यानें पुनर्घटनेचीं अनेक बिलें तयार केलीं तीं जॉन्सननें फेटाळलीं होतीं, आणि स्टॅन्टनला काढून टाकलें याबद्दल जॉन्सन विरुद्ध आलेल्या निंदाव्यंजक ठरावाला ट्रंबुलनें पाठिंबा दिला होता.

पण अखेरीस आपल्या सदसद्विवेकबुद्धीस कौल लावून त्यानें जॉन्सन निर्दोषी असा निर्णय दिला, तेव्हां त्याच्यावर लोकनिंदेचें काहूर उठलें. "याच्यावर प्रचंड दडपण आलें, आणि स्वार्थापुढें त्याची मुत्सद्दीगिरी डळमळली" असें फिलाडेलफिया प्रेस'नें लिहिलें. शिकागोंत भरलेल्या रिपब्लिकन कन्व्हेन्शननें ठराव केला कीं, "यूनिअन रिपब्लिकनांनीं निवडून दिलेला कोणीहि सिनेटर यावेळीं कच खाईल व विश्वासघात करील तर त्याच्या कीर्तीस कलंक लागला असें मानून या स्वातंत्र्यवादी सरकारनें आपण जिवंत असेपर्यंत अशा सिनेटराचा धिःकारच करावा. इलिनॉइसच्या एका रिपब्लिकनानें ट्रंबुलला तंबी दिली कीं, "शिकागोच्या रस्त्यावरहि येऊं नको, लोक तुझ्यावर इतके संतापले आहेत कीं तूं दृष्टीस पडताच लोकांचे प्रतिनिधि तुला पकडून सोईस्कर अशा दिव्याच्या खांबावर तुला फाशीच देतील."

ट्रंबुलची सार्वजनिक कारकीर्द मोठी तेजस्वी होती. त्यानें पक्षाची निष्ठेनें सेवा केली होती. पण जॉन्सनला आपण निर्दोषी ठरविलें तर हें सर्व वाया जाऊन आपला पक्ष आपला धिक्कार करणार हें ट्रंबुल जाणून होता. "जॉन्सनच्या खटल्याविषयीं आपली भूमिका नमूद करतांना ट्रंबुल लिहितो,

"अँड्र्यू जॉन्सन हा राष्ट्रपतिपदावर राहण्यास योग्य माणूस आहे कीं नाहीं किंवा आतां तो राष्ट्रपतिपदावर राहावा कीं नाहीं हा या खटल्यांतील निर्णयाचा मुद्दाच नव्हे. आजचा काँग्रेसमधील प्रक्षोभ उद्यां निवळून जाईल आणि मग राष्ट्रपतीवर खटला करून त्याला दोषी ठरविण्याला पुरेसें कारण नव्हतें ही गोष्ट लक्षांत येईल. पण त्यावेळीं अशी बुद्धि सुचण्याचा उपयोग नाहीं. एकदां पायंडा पडला म्हणजे मग प्रतिनिधिगृहांतील बहुसंख्यांना व सिनेटमधील दोन तृतीयांशांना महत्त्वाची वाटेल अशा कोणत्याहि गोष्टीबाबत राष्ट्रपतीचें मत विरुद्ध असल्यास आपल्या मतानुसार स्वतंत्र निर्णय ठरविणें भावि राष्ट्रपतीला सुरक्षित होणार नाहीं. आपली राज्यघटना, मजबूत राहावी म्हणून तिच्यांत जे अनेक ताण व तोल ( चेक्स अँन्ड बॅलन्सेस ) मोठ्या काळजीनें निर्मून ठेवले आहेत यांचें मग भवितव्य काय ? ते सारे तुटून मोडून जातील....असा परिणाम घडून येण्याला मीं कारण होऊं नये. यासाठीं मी कर्तव्यबुद्धीनेंच वागेन. कालांतरानें वातावरण शांत झाल्यावर माझ्या हेतूबद्दल मला न्याय मिळेलहि. पण तोंपर्यंत मित्र व प्रेमी माणसें मला सोडून जातील हा धोका आहे तो मी पत्करतों."

(५) टेनेसीचा सिनेटर जोसेफ स्मिथ फौलर हाहि रॉस, हेंडरसन व व्हॅन विंकल यांचे प्रमाणें पहिल्यानेंच सिनेटर झाला होता. तो पूर्वी नॅशव्हाइल येथें प्रोफेसर होता. याला पहिल्यानें जॉन्सन दोषी आहे असें वाटलें. पण प्रतिनिधि-सभेमध्यें ज्या घाईनें जॉन्सनचा खटला ओढून काढण्यांत आला ती घाई माथेफिरूपणाची द्योतक आहे असेंहि त्याला दिसलें. जॉन्सन विरुद्ध मांडलेला सारा पुरावा खोट्यावर आधारला होता. ज्या बेन बटलरनें या खटल्यांत पुढाकार घेतला तो फौलरच्या मतें नीतिभ्रष्ट व नीच माणूस होता. बटलरला अमेरिकेच्या सिनेटला फाशीच्या खांबाचें रूप द्यायचें होतें असें फौलरला वाटलें. "सध्यांच्या वेड्यावाकड्या परिस्थितीनें जे मुत्सद्दी आघाडीवर आणले आहेत व जे संपलेल्या यादवींतले निखारे जळते ठेवूं पाहात आहेत त्यांनीं माझी वेसण खेचून मला नाचवावें हें मला मंजूर नाहीं" असें फौलर म्हणाला. त्याला धमक्या देण्यांत आल्या, त्याच्यावर खोटे आरोप ठेवून त्याची तपासणी करण्यांत आली, जहाल रिपब्लिकनांनीं जाहीरपणें त्याची बदनामी चालविली, यामुळें १६ मे रोजीं सरन्यायाधीशानें त्याचें नांव उच्चारलें तेव्हां फौलरचा धीर इतका खचला होता कीं उत्तर देतांना तो अडखळला, आणि त्यानें 'दोषी' असा शब्द उच्चारला असाच सर्वांचा समज झाला. त्याबरोबर सर्व सिनेटमध्यें विजयोत्साहाची लाट पसरली. 'जॉन्सन दोषी ठरला, आतां रॉसच्या मताची गरजच नाहीं' असें जो तो म्हणूं लागला. पण फौलरनें हा गैरसमज पसरलेला पाहून 'निर्दोषी' असा शब्द पुन्हा स्पष्टपणें उच्चारून टाकला.

त्याला पुन्हा निवडून येणें अशक्य आहे, हें तो समजून चुकलाच होता. दोन वर्षांनीं त्याची सिनेटमधली मुदत संपल्यावर तो राजकारणांतून निवृत्त झाला. आपण जॉन्सनला निर्दोषी ठरविलें याच्या समर्थनार्थ त्यानें फक्त एक वाक्य नमूद करून ठेवलें आहे. तो म्हणतो "ईश्वरी प्रेरणा लक्षांत घेऊन माझा देश व भावि पिढ्या यांच्या हिताच्या दृष्टीनें मला जें योग्य वाटलें तसा मी वागलों."

(६) आयोवाचा सिनेटर जेम्स बी. ग्राइम्स हा मोठा वजनदार असून जॉन्सनवरचा खटला हा लोकक्षोभ माजविण्यासाठीं आहे आणि साऱ्या पृथ्वीवर जितकी क्षुद्र व बेजबाबदार माणसें नसतील इतक्या या क्षुद्र व बेजबाबदार लोकांनीं पिकविलेल्या खोट्या गोष्टींनीं हा प्रक्षोभ त्यांना माजवायचा आहे अशी ग्राइम्सची खात्री झाली.

दुर्दैवानें त्याच्यावर शिव्या व धमक्या यांतीं जे हल्ले झाले त्यामुळें त्याला मतदानापूर्वीं दोन दिवस अर्धांगाचा झटका आला आणि तो अंथरुणाला अगदीं खिळलाच गेला. पण त्याच्या आजारामुळें मतदानाचा दिवस लांबणीवर टाकण्यास जहाल रिपब्लिकनांनीं विरोध केला. ग्राइम्स हा जॉन्सनला निर्दोषी ठरविणार हें त्यांना माहीत होतें. तो आजारीपणामुळें १६ मे ला सिनेटच्या बैठकीस हजर राहूं शकणारच नाहीं अथवा निर्दोषी असा निर्णय देण्यानें आपलें राजकीय भवितव्य नष्ट होण्याचा धोका टाळण्यासाठीं आजारीपणाची सबब सांगून १६ मे ला गैर-हजर राहील अशी जहाल रिपब्लिकनांना आशा वाटली. सिनेटमधील प्रेक्षकांच्या गॅलरीमध्यें "म्हातारा आणि दुष्ट असा ग्राइम्स मेला, त्याचा मखोटा पुन्हा पहावा लागणार नाहीं" अशा अर्थाची गाणीं लोक गात होते. न्यूयॉर्क ट्रिब्यून मध्यें होरेस ग्रीलीनें लिहिलें, "आपल्या इतिहासांत बेनेटिक्ट आर्नोल्ड, आरनबर, जेफर्सन डेव्हिस, इत्यादि खलपुरुष होऊन गेले, त्यांतलाच ग्राइम्स हा आहे. हीं माणसें म्हणजे दुर्दिनाचे इशारेच होत. प्रत्येक पिढींत असा इषारा देणारा खल-पुरुष झालाच पाहिजे अशी नियति दिसते."

पण जेम्स ग्राइम्सचें शारीरिक व मानसिक धैर्य फार मोठें होतें. १६ मे रोजीं मतदान सुरू होण्यापूर्वीं आयोवाच्या त्या सिनेटराला चार माणसांनीं धरून उचलून आणून सिनेटमधील त्याच्या खुर्चीवर बसविलें. त्यानें पुढें नमूद करून ठेवलें आहे कीं, "फेसेंडननें आपला हात धरून मोठ्या हर्षानें स्मित केलें. मला ती स्मृति आजहि इतकी आनंदाची व अभिमानाची वाटते कीं आयुष्यांत मिळूं शकणारा जास्तींत जास्त मोठा मान मी त्यापुढें तुच्छ लेखतों." "तुम्ही खुर्चींत बसूनच मत सांगितलें तरी चालेल असें सरन्यायाधीशानें त्याला सांगितलें. पण सिनेटर ग्राइम्स मित्रांच्या साहाय्यानें धडपडत आपल्या पायावर उभा राहिला व निर्धाराच्या आवाजांत 'निर्दोषी' असा शब्द उच्चारून त्यानें साऱ्या सभागृहास चकित करून सोडलें.

त्याची प्रतिमा लोकांनीं निषेधार्थ जाळली. 'वेडा', 'नपुसंक' अशा शिव्या वृत्तपत्रांनीं त्याला दिल्या, त्याच्या राज्यानें त्याचा 'हा प्रतिनिधि नव्हे असें सांगून धिक्कार केला. त्या दुखण्यांतून ग्राइम्स बरा झालाच नाहीं. मरणापूर्वीं तो आपल्या एका मित्राला लिहितो,

"त्या खटल्यांतल्या त्या अस्वस्थ क्षणीं अनेकांनीं वृत्तपत्रें व पक्षपुढारी यांच्या

धिक्काराला व विद्वेषाला भिऊन आपल्या सदसद्विवेक बुद्धीविरुद्ध वर्तन केलें व तशी कबूलीहि मागाहून दिली. पण मीं घेतलेली शपथ व माझी सदसद्विवेक बुद्धि यांना जागून निर्णय देण्याचें धैर्य माझ्या ठिकाणीं राहिलें याबद्दल मी ईश्वराचे आभार मानतों....मी पक्षाच्या हुकुमाप्रमाणें खोटें बोललों नाहीं, ही कदाचित पक्षाच्या दृष्टीनें माझी चूक झाली असेल, पण माझा दृष्टिकोण वेगळा आहे.... मी माझ्या जबाबदारीवर न्यायाधीश झालों. या दृष्टीनें मी माझ्या सदसद्विवेक-बुद्धीला व ईश्वराला जबाबदार आहें. अशा खटल्यांत माझ्या सदसद्विवेकबुद्धी-विरुद्ध वागण्यास मला या पृथ्वीवरील कोणतीहि शक्ति आदेश देऊं शकणार नाहीं. मग अशी शक्ति माझ्या मित्रांच्या पक्षाची अथवा शत्रूंच्या पक्षाचीहि असो."

प्रकरण : ७ वें—

# लुसिअस क्विंटस सिनसिनॅटस लामार

प्रतिनिधिसभेचा अध्यक्ष व अनुभवी मुत्सद्दी जेम्स जी. ब्लेन हा इतका कठोर अंतःकरणाचा होता कीं त्याच्या डोळयांत दुःखाश्रु आलेले कोणींहि कधीं पाहिले नव्हते. पण आज निःसंकोचपणें तो अश्रु ढाळीत असून त्याच्या गालावर ते अश्रु ओघळत होते. प्रतिनिधिगृहांतील सर्व सदस्यांच्या व प्रेक्षकांच्या समोर तो होता आणि त्यांच्यापासून तो आपल्या भावना लपवूं शकला नाहीं. पण बहुतेकांचें लक्ष ब्लेनकडे नसून ते स्वतांच अश्रु ढाळीत होते व ते लपविण्याचा प्रयत्न कोणीच करीत नव्हते. १८७४ मधला तो अगदीं नाटयपूर्ण दिवस होता. अशा प्रकारें अश्रुपात करणारांत रिपब्लिकन्स व डेमोक्रॅट्स् होते. यादवींतील जखमांचे वण ज्यांच्या अंगावर आहेत असे कसलेले लढवय्ये त्यांत होते. राजकारणांतील लढ्यांतले उभय बाजूचे वीर त्यांत होते. सर्वजण अगदीं खिन्न अंतःकरणानें स्तब्ध राहून मिसिसिपीच्या त्या नवीन कॉंग्रेसमनाचें आर्जवी भाषण ऐकत होते. तो अगदीं सहज व स्पष्ट बोलत होता. नेहमीं अनेकांच्या भाषणांत दिसून येणारा अलंकारिक भाषेचा प्रयत्न या वक्त्याच्या भाषणांत नव्हता. आपल्या गोड व उंच आवाजांत त्यानें उत्तर आणि दक्षिण यांनीं न्यायानें व प्रेमानें वागावें अशी विनंति केली तेव्हां सर्वांची अंतःकरणें अगदीं हेलावलीं.

त्याच्या त्या भाषणानें सर्वांच्या अंतःकरणास दुःखाचे पाझर फुटले हें अगदीं खरें. पण त्या भाषणाचा आपणावर असा परिणाम झाला म्हणून अनेकांना आश्चर्यहि वाटलें. कारण दक्षिणेंतल्या मिसिसिपी राज्याचा प्रतिनिधि ज्याच्या मृत्यूसंबंधानें शोक व्यक्त करण्यासाठीं तें हृदयद्रावक भाषण करीत होता, तो इसम म्हणजे दक्षिणेचा निर्दय शत्रु आणि जहाल रिपब्लिकन पक्षाचा पुढारी चार्ल्स सुम्नर हा होय. यादवीनंतरच्या पुनर्घटनेच्या काळांत या सुम्नरनें दक्षिणेला इतकें जुलुमानें व दहशतीनें वागविलें होतें कीं दक्षिणेला त्याचा विसर

पडणें शक्य नव्हतें. डॅनिअल वेब्स्टरनें दक्षिणेला संघराज्यांत टिकवून धरण्याचा प्रयत्न केला असतां सुम्नरनें त्याला देशद्रोही म्हणून शिवी दिली होती. जॉन्सन-वरील खटल्यांत काँग्रेसचें राज्य गुंडगिरीचें होऊन तें दक्षिणेला भाजून काढील अशी भीति निर्माण झाली असता एडमंड रॉसनें जॉन्सनला निर्दोषी ठरवून ती भीति निवारली. यासाठीं चार्ल्स सुम्नरनें रॉसचा अतोनात छळ करविला होता. कांहीं वर्षांपूर्वीं सुम्नरवर सिनेटच्या व्यासपीठावर साउथ कॅरोलिनाच्या ब्रुक्स या सिनेटरानें इतका भयंकर भडिमार केला होता कीं त्यामुळेंच सुम्नरचें मरण जवळ आलें. तो सुम्नर आतां मेला होता. आणि लुसिअस लामार, कीं जो यादवीपूर्वीं दाक्षिणात्यांतील आजपर्यंतच्या सर्व वक्त्यांत उत्तरेविरुद्ध शिवराळ वक्ता म्हणून नाणावला होता, तो यावेळीं प्रतिनिधि-सभेंत उभा राहून सुम्नरच्या मृत्यूसंबंधानें शोक व्यक्त करतांना सुम्नरची प्रशंसा करीत होता !

लामार आपल्या भाषणांत म्हणाला, "सुम्नर मरण्यापूर्वीं, दक्षिण व उत्तर यांतील अविश्वास व कलह याचें कारण संपलें आहे असें मानूं लागला होता...हीच भावना दक्षिण व उत्तर यांतील प्रचंड जनसंख्येची नाहीं काय ? निदान असायला नको काय ? माणसानें आपल्या कोमल व करुणापर वृत्ति व्यवहारांत आणाव्या असें सुम्नरचें सांगणें असे. त्याच्या शारीरिक अवशेषांना अभिवादन करतांना आपल्यामध्यें गैरसमज व अविश्वास कायमपणें पेरणाऱ्या एकमेकांच्या अंतःकरणांतल्या भावना लपविण्याऐवजीं काढून टाकून...आपल्या भावनांत व अंतःकरणांत आपण एकजूट व्हावें अशी आपली कळकळीची इच्छा आहे अशी प्रामाणिक कबूली आपण एकमेकांजवळ कां देऊं नये ? आज आपण ज्याचेबद्दल शोक करीत आहों तो आदर्श पुरुष होता. आपण एकमेकाबद्दल जे वैरभावनेनें बोलतों तें त्याला शोचनीय वाटत असे. तो आपल्या कबरेंतून 'देशबांधव हो, एकमेकाला ओळखा म्हणजे तुम्ही एकमेकांवर प्रेम करा' असें आपणांस सांगो व त्याचा हा संदेश या विस्तीर्ण देशांतील प्रत्येकाच्या अंतःकरणापर्यंत पोचो असें मी इच्छितों ."

या भाषणाचे वेळीं पसरलेली शांतता संमिश्र होती. कांहीं जण खरोखरच ईश्वरध्यान करीत होते. पण कांहीं जण त्या भाषणानें आश्चर्यचकित झाले होते.

नंतर सभागृहाच्या सर्व भागांत अगदीं स्वयंस्फूर्त असा टाळ्यांचा कडकडाट ऐकूं आला. "अरे बाप रे, काय हें भाषण !" न्यूयॉर्कचा कॉंग्रेसमन लिमान ट्रेमेन म्हणाला, "साऱ्या देशभर हें भाषण दुमदुमून राहील."

अमेरिकेच्या राजकीय इतिहासांत एवढा राजकीय परिणाम करणारीं भाषणें थोडींच झालीं असतील, एका रात्रींत लामार हा कॉंग्रेसमध्यें व साऱ्या राज्यांत पहिल्या दर्जाचा मुत्सद्दी म्हणून गणला जाऊं लागला. याहून अधिक महत्त्वाची गोष्ट ही कीं दक्षिण आणि उत्तर यांच्या संबंधांना त्यानें एकदम कलाटणी मिळाली. सुम्नरसंबंधानें हें प्रशंसापर भाषण लामारनें केल्यानंतर दोन आठवड्यांनीं मिसूरीचा प्रतिनिधि कार्लश्रूज यानें बोस्टन येथें दहा हजार नागरिकांपुढें भाषण करून दक्षिण व उत्तर यांच्या संबंधांत लामार यानें क्रांति घडवून आणली आहे या शब्दांत लामारचा गौरव केला. "लामारचें भाषण हें दक्षिण प्रदेश संघराज्यांत परत आल्याचें द्योतक आहे" असा अभिप्राय बोस्टनच्या ग्लोब पत्रानें दिला. "यादवीनंतरच्या काळांत एका दाक्षिणात्यानें केलेलें संस्मरणीय व आशादायी भाषण" असा लामारच्या त्या भाषणाचा उल्लेख बोस्टनच्या ॲडव्हर्टायजरनें केला.

दक्षिणेंतल्या व उत्तरेंतल्याहि कांहीं लोकांनीं त्या भाषणाचा विपरीत अर्थ करणें हें स्वाभाविक होतें. दक्षिणेंतील कॉन्फिडरेट राज्यांवर फेडरल वर्चस्व गाजविण्यांतच ज्यांची राजकीय सत्ता टिकणार होती, त्यांनीं उत्तर व दक्षिण यांमधील वैराच्या जखमा बुजविण्याच्या प्रत्येक प्रयत्नास प्रतिकार सुरू केला. जेम्स ब्लेननें आपले अश्रु वाळून गेल्यानंतर, लामारनें सुम्नरच्या प्रशंसापर अशा केलेल्या भाषणाबद्दल पुढील अभिप्राय लिहून ठेवला आहे. "सुम्नर-संबंधानें लामारनें इतकें प्रशंसापर व विवेचक भाषण केलें कीं सुम्नर ज्या गोष्टींना कमालीची दुष्ट भूमिका असें मानीत असे त्या गोष्टी लामारनें सुम्नरच्या प्रशंसापर असें भाषण करूनच मोठ्या चातुर्यानें सुम्नरच्या गळ्यांत बांधल्या. लामारनें केलेलें समर्थन ही त्याच्या बुद्धिचातुर्याची परिसीमा म्हटली पाहिजे.

कांहीं दाक्षिणात्यांना चार्ल्‌स्‌ सुम्नर हा यादवीपूर्वकाळांतला गुलामगिरी विरोधकांचा खलनायक आणि यादवीनंतरच्या पुनर्घटनाकाळांतलाहि खलनायक असें वाटे. त्यांनीं लामारचें भाषण हें दाक्षिणात्यांचा विश्वासघात करणारें आहें असें मानलें. "कोलंबस येथील 'डेमोक्रॅट', कँटनचें 'मेल' मेरीडीअनचें 'मर्क्यूरी'

इत्यादि मिसिसिपीच्या वृत्तपत्रांनीं व तसेंच लामारच्या कांहीं मित्रांनींहि, लामारनें दाक्षिणात्यांचीं तत्त्वें व स्वाभिमान यांचा उत्तरेपुढें त्याग केला अशी टीका केली.

आपल्या पत्नीला पाठविलेल्या पत्रांत लामार लिहितो, "मीं दक्षिणेच्या निशाणाचा उपमर्द केला असें येथें वॉशिंग्टनमध्यें कोणीहि मानीत नाहीं. पण दक्षिणेंतील पत्रांनीं माझ्यावर भडिमार चालविला आहे...आपल्या दक्षिणी लोकांनीं इतकें दु:ख सोसलें आहे, ज्यांच्यावर त्यांनीं विश्वास ठेवणें अत्यंत सयुक्तिक होतें अशांनीं त्यांचा इतके वेळां विश्वासघात केला आहे कीं दक्षिणें-तल्या एकाद्या माणसानें उत्तरेला उद्देशून सद्भाव व्यक्त केला तर त्याजकडे दक्षिणेनें संशयानें पाहावें हें अगदीं स्वाभाविक आहे...त्या माझ्या भाषणानें मीं काय केलें ? जेथें पूर्वीं वैरभावनाच फक्त होत्या तेथें मीं सहानुभूति निर्मिली आहे. अशा परिस्थितींत दक्षिणेनें जर माझा धिक्कार केला तर मी त्यांच्या त्या भावनेची उपेक्षा करणार नाहीं. पण त्याबद्दल त्यांच्यावर रागावणारहि नाहीं. मीं दक्षिणेच्या हिताची गोष्ट केली आहे या भावनेनें माझ्या मनाला आनंदच वाटेल दक्षिणेच्या त्रस्त व अविवेचक भावनांना साथ न देता दक्षिणेची खरीखुरी सेवा करण्याचा प्रयत्न एकाद्या सार्वजनिक पुढाऱ्यानें करावा अशी आतां वेळ आली आहे. मी दक्षिणेचीच सेवा करीन, दुसऱ्या कोणाचीहि करणार नाहीं आणि दक्षिणेंतल्या लोकांना माझें असें वागणें पसंत नसेल तर मुकाट्यानें मीं सार्वजनिक जीवनांतून निवृत्त होऊन खाजगी जीवन घालवूं लागेन."

पण लामारवर हल्ला करणाऱ्यांची संख्या फार थोडी होती. उत्तरेंत व दक्षिणेंत एक गोष्ट सर्वमान्य झाली कीं लामारनें ज्यावेळीं खरोखर मोठे अनर्थ-कारी भाषण करणें स्वाभाविक ठरलें असतें त्यावेळीं त्यानें इतकें उमदें भाषण केलें कीं सर्वांना तो सर्वांचाच मोठा विजय आहे असें वाटलें. इतिहासांतील तो चमत्कारिक योगायोग व एका व्यक्तीच्या भाग्योदयाचा क्षण यांच्या प्रेरणेनें वॉशिंग्टनमध्यें त्या दिवशीं योग्य प्रसंगाला योग्य माणूस मिळाला ही गोष्ट सर्वांना स्पष्टपणें दिसली.

× × ×

लामार हा माणूस कोण होता ? ल्युसियस क्विंटस सिन्सिनॅटस् लामार हा १८७४ सालीं सार्वजनिक पुढारी झाला होता. क्षुद्र मुद्दे, राजकारणांतील

क्षुल्लक घटना अथवा वैय्यक्तिक स्वार्थाच्या बाबी यांपैकीं कशानेंहि त्याच्या बुद्धीला आतां बंध पडत नसे. पक्षीय, वैयक्तिक अथवा प्रादेशिक स्वार्थानें त्याची राष्ट्रहितबुद्धि अथवा सत्यनिष्ठा यांत कमतरता येत नसे. तो जितका थोर मुत्सद्दी होता तितकाच थोर पंडितहि होता. आणि तत्कालीन विचारवंतांत अगदीं थोडच्या मूलग्राही विचारवंतांपैकीं तो एक होता. हेन्री ॲडॅम्सच्या मतें " ल्युसियस लामार हा अमेरिकेंतल्या त्या वेळच्या गोड माणसांत अत्यंत शांत व मोठा सयुक्तिक होता. सामाजिक रहाणींत दिसून येणारा त्याच्या स्वभावांतील गोडवा अत्यंत वैशिष्टचपूर्ण होता......आणि यापेक्षांहि विशेष म्हणजे त्याची वागणूक मोठी विनोदयुक्त व खुबीदार असे." वॉशिंग्टनमधला प्रसिद्ध वार्ताहर हेन्री वॉटरसन म्हणतो: " लामार हा मोठा आकर्षक आणि प्रेम लाऊन घेणारा माणूस आहे......मला विशेषतः असें वाटतें कीं, वॉशिंग्टनमध्यें मला भेटलेल्या सर्व मोठ्या माणसांत तो बुद्धिमान आहे." सिनेटर होवर एकदां म्हणाला :

" अमेरिकेंतील सार्वजनिक पुढाऱ्यांत ज्यांच्या अंगीं खास थोरवी आहे अशीं माणसें नाहींत, असे माथ्यू आरनोल्ड म्हणत असे. पण लामारच्या अंगीं अशी थोरवी नाही असें कोणीहि म्हणूं शकला नसता. त्याचा स्वभाव व त्याच्या अंगचे गुण इतके श्रेष्ठ होते कीं, कोणत्याहि देशांत लामार हा ठळकपणें चमकला असता. तो मोठा संस्मरणीय, आकर्षक आणि उमद्या स्वभावाचा माणूस होता."

विल्यम प्रिस्टन जॉन्सन हा वॉशिंग्टनचा प्रसिद्ध वार्ताहर लिहितो, " लामार घराणें हें मुळचें ह्युजिनॉट या ख्रिस्ती धर्मपंथाचें आहे. अलौकिक बुद्धिमत्तेची देणगी त्या साऱ्या घराण्यालाच मिळालेली होती. त्या घराण्यांत जो जो जन्मला त्याच्या ठिकाणीं त्या घराण्याची स्फूर्ति, त्याचें यश आणि त्याचें दारिद्र्य या या सर्वांचा भोगवटा त्याला मिळाला." ल्युसियसच्या बापाच्या घरीं घरांतल्या माणसांचीं नांवें पुकारलीं जात, त्यावेळचा तो अनुभव मोठा संस्मरणीय असे. ल्युसियसचा एक चुलता मिरॅबो बोनापार्ट हा होता. सॅन जॅसिन्टो या टेकडीवरील लढाईंत त्यानें केलेल्या हल्ल्यामुळें मेक्सिकन सैन्याची फळी तुटली. आणि मिरॅबो बोनापार्ट हा टेक्सस प्रजासत्ताकाचा दुसरा अध्यक्ष झाला. जेफर्सन जॅक्सन, थॉमस रॅन्डॉल आणि लॅव्होसीर ली ग्रँड ही लामारच्या नातलगांतीलच नामावलि असून ज्यांनीं हीं नांवें ठेवलीं त्यांना प्रथम इतिहास, पुढें राजकारण, राजकारणा-

पासून रसायनशास्त्र इत्यादि विषयांत गोडी वाटूं लागली असावी असें त्या नांवांच्या निवडीवरून दिसतें. याच अलौकिक बुद्धिमत्तेंत एक थोडी खिन्नतेची तीव्र छटा होती. ल्युसियस लामारच्या बापाच्या अंगीं ती प्रतीत झाली. ३७ व्या वर्षी जॉर्जियाच्या वकीलमंडळांत तो मोठ्या दर्जावर चढणार हें उघड दिसत होतें. पण त्याकाळीं त्याला विलक्षण मानसिक खिन्नता आली होती. या मन:स्थितींत एक दिवस त्यानें आपल्या पत्नीचें चुंबन घेतलें, मुलांचा निरोप घेतला आणि सरळ बागेंत चालत जाऊन त्यानें स्वत:वर पिस्तूल उडविलें.

अशी खिन्नता आणि चिंतामग्नता यांचा काळा धागा ल्युसियस लामारच्या सर्व आयुष्यांत विणला गेला होता. जरी या खिन्नतेनें त्याच्यावर प्रभुत्व गाजविलें नाहीं तरी तत्कालीन लोकांनीं नमूद करून ठेवलें आहे त्यावरून पहाता तो सदा आपल्याच विचारांत मग्न असे. तो मनाचा अतिशय हळवा होता आणि अनेक प्रसंगीं स्वभावत:च खिन्न दिसत होता असें कळतें. त्याचें तारुण्य एकंदरींत सुखाचें गेलें. तो त्या वेळीं एका मळयावर रहात होता. तेथें त्यावेळीं ज्योल हॅरिस हा अंकल रेमस आणि ब्रेर रॅबिट यांच्या कथा जमवीत असे. पुढील काळांत स्वत: लामारहि दक्षिणेंतील ग्रामीण लोककथा सांगण्यांत मोठा चतूर म्हणून प्रसिद्धीस आला. लंडनमध्यें दक्षिणी कॉन्फिडरसीचा प्रतिनिधि म्हणून लामारनें किती चांगलें काम केलें असतें हें सांगताना एकदां हेन्री अॅडॅम्स म्हणाला : "लंडनमधील वरिष्ठ वर्गाला लामारच्या अस्तित्वानें अतिशय आनंद झाला असता. त्यानें आपल्या ग्रामीण लोककथांनीं त्यांना रिझविलें असतें व त्यांच्यांत मोठें यश मिळविलें असतें. त्याच्या वागणुकीमुळेंहि त्यानें त्यांचें प्रेम जिंकलें असतें. त्याच्या वक्तृत्वानें कोणत्याहि श्रोतृसमाजाला भारून टाकलें असतें."

लामारचें लहानपण त्याच्या आईच्या मार्गदर्शनाखालीं गेलें. लहानपणापासूनच त्याच्या ठिकाणीं वाचनाची अतिशय गोडी दिसून आली. पुढें पुष्कळ वर्षांनीं तो लिहितो : "पुस्तकाविषयीं म्हणाल तर माझ्या भोवतीं पुस्तकांचा गराडा पडलेला असे. माझ्या हातीं माझ्या आईनें जें पहिलें पुस्तक दिलेलें मला आठवतें तें म्हणजे फ्रँकलिनचें आत्मचरित्र हें असावें. दुसरा ग्रंथ म्हणजे रोलिनचा "इतिहास" हा ग्रंथ. (पुष्कळ वर्षांपूर्वी याच ग्रंथाचें अध्ययन नऊ वर्षाच्या जॉन क्विन्सी अॅडॅम्सनें चालविलें होतें हें आपण पाहिलें आहे.) लामार हा मुत्सद्देगिरी आणि कायदा यांमध्यें बहुश्रुत झाला. पण सोप्या ललित वाङमयाचीहि

त्याला विलक्षण गोडी होती. पुढें पुष्कळ वर्षांनीं एक दिवस तो राजगृहांत कॅबिनेटच्या सभेसाठीं जात असता, त्याच्या कागदपत्राच्या पिशवींतून अनेक पुस्तकें अकस्मात गळून पडलीं. तीं आसपास असलेल्या अनेक वार्ताहरांनीं गोळा करून त्याला दिलीं. त्या सर्व स्वस्त किंमतीच्या कादंबऱ्या होत्या असें त्यांना आढळून आलें.

लामार ज्या ईमोरी कॉलेजांत शिकला तें कॉलेज घटक राज्यांच्या हक्कांच्या पुरस्कर्त्यांचें आगर होतें. त्या कॉलेजचा अध्यक्ष हा प्रसिद्ध लाँग स्ट्रीट कुटुंबांतला असून कल्हाऊनचा तो जहाल अनुयायी होता. त्याचें लामारच्या मनावर जें वजन पडलें होतें तें फार तीव्र होतें. पुढें लामारनें त्याच्या मुलीशीं लग्न केलें तेव्हांपासून तर हें वजन अधिकच वाढलें. ज्या वेळेला लाँग स्ट्रीट जॉर्जिया सोडून मिसिसिपींतील ऑक्सफोर्ड विद्यापीठाचा अध्यक्ष होण्यासाठीं गेला त्यावेळीं वकिली आणि कायद्याचा प्रोफेसर म्हणून काम करण्यासाठीं लामार सासऱ्याबरोबर गेला. तेथें त्या आक्सफोर्ड विद्यापीठांत लामारला सार्वजनिक जीवनाची संधि मिळून त्याचें सार्वजनिक जीवन सुरू झालें.

५ मार्च १८५० रोजीं मिसिसिपी राज्याच्या कायदेमंडळानें अनेक ठराव पास करून मिसिसिपीच्या प्रतिनिधींनीं कॅलिफोर्नियाला संघराज्यांत प्रवेश देण्याविरुद्ध मत द्यावें असें फर्माविलें. सिनेटर फूटीनें मोठें धैर्य दाखवून हा आदेश झुगारून लावला. नंतर सिनेटर फूटी परत मिसुरीला येऊन गव्हर्नर-पदासाठीं उमेदवार म्हणून उभा रहाणार होता. तेव्हां संघराज्यांच्या हक्कांचा पुरस्कार करणाऱ्या डेमोक्रॅटांच्या एका कमेटीनें लामारचें मन वळवून त्याला फूटीशीं वादविवाद करण्याला तयार केलें. लामार त्यावेळीं अवघा ३६ वर्षांचा होता. मिसिसिपी राज्यांत तो नवखा होता. तत्कालीन राजकीय जीवनांतहि तो नवीन होता. आणि फूटीसारख्या त्या काळच्या आक्रमक व वादचतुर मुत्सद्याशीं वाद घालण्याची तयारी करण्याकरितां लामारला फक्त कांहीं तासांचा अवधि देण्यांत आला होता, पण त्याचें आयत्या वेळचें तें भाषण फार यशस्वी झालें. मिसिसिपी कायदेमंडळानें दिलेल्या आदेशाची फूटीनें उपेक्षा केल्याबद्दल लामारनें त्याची खूपच खरडपट्टी काढली. त्याचें हें भाषण विद्यार्थ्यांना एवढें आवडलें कीं त्या वादविवादच्या शेवटीं त्यांनीं लामारची आपल्या खांद्यावरून मिरवणूक काढली. (पुढें २८ वर्षांनन्तर स्वत: लामारनें मिसिसिपी कायदे-मंडळाच्या आदेशाचा असाच अवमान केला.)

त्यानंतर स्वाभाविकच कल्हाऊन व जेफर्सन डेव्हिस यांच्या मताचा कट्टर अनुयायी म्हणून लामार काँग्रेसमध्यें निवडून आला. काँग्रेसमध्यें अलेक्झॅन्डर स्टिफन्स, रॉबर्ट टूम्स इत्यादि संघराज्यवादी पुढाऱ्यांनीं फुटून निघण्याच्या भावनेची लाट अडविण्याचा व्यर्थ प्रयत्न चालविला होता त्यावेळीं लामार हा दक्षिण बाजूंतील फुटून निघणाऱ्यांचा पुढारी होता. प्रतिनिधिसभेंत एकदां तो म्हणाला; "आपलें स्वदेशाभिमानाचें क्षेत्र खूपच वाढलें आहे अशी ऐट इतर लोक मारत असतील. संघराज्याबद्दलचें व्यापक व विस्तारित प्रेमहि ते दाखवीत असतील. पण मी ज़ाहीरपणें कबूल करतों कीं दक्षिणेचें हितरक्षण ही गोष्ट दक्षिणेच्या स्वाभिमानरक्षणाला दुय्यम ठरेल." पुढें कांहीं वर्षांनीं त्यानें म्हटलें आहे कीं, "दक्षिणेची समाजव्यवस्था मजबूत नसेल असा संशय आपणास केव्हांच आला नव्हता. पण गुलामगिरी पाळणारें राष्ट्र युद्धांत टिकत नाहीं हें पाहिल्यावर मात्र माझें मत बदललें." पण संघराज्यांतून फुटून निघण्याच्या धोरणाचा पुरस्कार करताना त्याचा परिणाम काय होणार याकडे त्याचें दुर्लक्ष नव्हतें. त्या वेळच्या एका पत्रांत तो लिहितो : "देशाची फाळणी निव्वळ शांततेनें होणार नाहीं—ज्यावेळीं संघराज्यावरील सूर्य मावळेल त्यावेळीं तो लढणाऱ्यांच्या रक्तांत बुडून जाईल."

हेन्री अॅडॅम्स सांगतो, "१८६० च्या सुमारास लामार हा दाक्षिणात्यांतील ज्वलज्जहाल पुढारी गणला जात असे." दक्षिणेला संघराज्याकडून न्याय मिळण्याबाबतच्या सर्व आशा नष्ट झाल्यावर तो चार्लस्टन येथें भरलेल्या डेमोक्रॅटिक कन्व्हेन्शनमधून जेफर्सन डेव्हिसबरोबरच बाहेर पडला. अशा प्रकारें संघराज्याशीं जोडणाऱ्या साखळींतला आणखी एक दुवा त्यानें तोडला. यादवीपूर्व काळांतील त्याची कारकीर्द १८६१ सालीं कळसास पोचली. मिसिसिपीचा संघराज्याशीं असलेला संबंध तोडून टाकण्याच्या वटहुकूमाचा मसुदा त्यानेंच लिहिला. वाऱ्याचें बीज पेरलें गेलें. त्यांतून उगवणारा झंजावात लामार व मिसिसिपी यांना आतां भोगावा लागणार होता.

दोघांवरहि त्या झंजावाताचा भयंकर मारा झाला. यादवीनंतरच्या काळांत दक्षिणेला पदोपदीं जें दुःख भोगावें लागलें व कसोटीच्या प्रसंगांना तोंड द्यावें लागलें त्याचें मुख्य कारण ज्यांनीं त्या प्रदेशाचें नेतृत्व यशस्वी रीतीनें केलें असतें अशी अपेक्षा होती तींच माणसें युद्धांत गमावलीं हें होय. उत्तरेमध्यें सत्ताधारी

गट बराच मोठा व व्यापक असे तर दक्षिणेंतील सत्ता फार थोड्यांच्या हातीं असे. आणि ह्या सत्ताधारी वर्गांत मद्यपींचा भरणा मोठा होता. अमेरिकेंत गेलेल्या लामार कुटुंबांतील ज्या वंशजांनीं लेफ्टनंट कर्नल अथवा त्याहून अधिक दर्जाच्या जागेवर काम केलें होतें अशा तेरा जणांपैकीं सात जण त्या यादवी युद्धांत मारले गेले. लामारचा लहान भाऊ जेफर्सन मेरॅबो हा सर्वांत अधिक तेजस्वी असा मानला जाई, तोहि युद्धांत मारला गेला. ल्युसियस लामारचा चुलत भाऊ जॉन, ज्याच्याजवळ दक्षिणेंत जास्तींत जास्त गुलाम होते, तो जेफर्सन मेरॅबोच्या शेजारींच मारला गेला. पुढें दोन वर्षांनीं लामारचा आणखी एक भाऊ फिफ्थ फ्लोरिडा पलटणीचा कर्नल हा पिटर्स्‌बर्गच्या घनघोर युद्धांत मरून पडला. लामारचे दोन कायदेपंडित भागीदारहि मेले. विल्यम्स् बर्क येथें कर्नल मॉट हा, लामार त्याच्या शेजारीं उभा राहून लढत असतांच, मेला. जेम्स ऑट्रे हा मूरफ्रिजबरो येथील कत्तलींत मेला. त्या तीन वकील भागीदारांची पाटी, त्यांची कचेरी कोसळून जाऊन, जवळच्या नदींत तरंगताना आढळली. त्यांच्यावर कोसळलेल्या दुर्दिनाची निदर्शक अशी ती घटना होती.

लामारला ॲपॉप्लेक्सीचें दुखणें होऊन त्याच्या लष्करी कारकीर्दीचा शेवट झाला. त्याच्या सर्व आयुष्यभर या दुखण्यानें त्याची पाठ पुरविली. अत्यंत मनःक्षोभाच्या काळीं मृत्यूसारखें हें दुखणें त्याच्या डोक्यावर टांगलेलें असे. हें दुखणें जडल्यानंतरचा यादवींतला काळ कॉन्फिडरेट सरकारचा राजकीय एजंट म्हणून त्यानें घालविला. युद्ध संपलें त्यावेळीं लामारच्या सर्व आशा व श्रम यांचा चुराडा झाला होता. तो उध्वस्त भूतकाल सोडून देऊन परदेशास जावें असें दडपण त्याजवर सतत येत होतें. वर्ट आर्मीस्टेड केट या त्याच्या चरित्रलेखिकेनें लिहिलें आहे कीं, "आपण पुढारी या नात्यानें नालायक ठरलों असें त्याला वाटलें. आपण पुढारी या नात्यानें लोकांना अशा भयानक संकटांत घातलें कीं तेथून परत येण्याला रस्ताच उरला नाहीं." पण रॉबर्ट ली याचा उपदेश लामारनें पाळला. दक्षिणेच्या पुढाऱ्यांनीं स्वदेश सोडून न जाता आपआपल्या राज्याच्या नशिबीं येणारा भोगवटा सोसावा असें रॉबर्ट लीनें सांगितलें होतें. त्याप्रमाणें १८६५ पासून १८७२ पर्यंत मिसिसिपी राज्य पुनर्घटनाकालीन घोर संकटांतून जात असता, लामार हा मिसिसिपीमध्यें वकील व कायद्याचा शिक्षक या नात्यानें शांतपणें कार्य करीत राहिला.

मिसिसिपी राज्याला या काळांत जितक्या यातना भोगाव्या लागल्या इतक्या इतर राज्यांना भोगाव्या लागल्या नाहींत. ॲडलबर्ट एम्स हा मिसिसिपीचा पहिला सिनेटर व नंतर गव्हर्नर झाला. तो मेनचा रहाणारा असून न्यू-ऑर्लिन्सचा खाटिक म्हणून प्रसिद्धी पावलेल्या वेन् बटलरचा तो जांवई होता. त्यानें कॉंग्रेसच्या कमिटीपुढें एक कबुली दिली. तो म्हणाला, "मी सिनेटवर मिसिसिपीतर्फे निवडून आलों म्हणूनच मग मिसिसिपींत राहिलों. तेथील परिस्थिति रहाण्याला असह्य होती." त्याला गव्हर्नरपदावर ज्या बहुमतानें निवडलें तें बहुमत बंधमुक्त गुलाम आणि जहाल रिपब्लिकन्स यांचें बनलें होतें. फेडरल सरकारच्या बागनेटानें हें बहुमत टिकविण्यांत व वाढविण्यांत आलें होतें. चोरीच्या आरोपाखालीं ज्यावर न्यूयॉर्कमध्यें खटला चालला होता अशा कार्डोझा नामक एका माणसाला सरकारी शाळांचा प्रमुख नेमण्यांत आलें होतें. लेफ्टनंट गव्हर्नर व सेक्रेटरी ऑफ् स्टेट या जागांवर दोन माजी गुलाम होते. मिसिसिपीच्या उत्तर भागांतील विस्तीर्ण मुलूख उध्वस्त झाला होता. सर्वसामान्यतः कर जेवढे असूं शकतील त्याच्या चौदापट अधिक कर वाढले होते. पुनर्घटना करणाऱ्या सरकारचा उधळपट्टीचा खर्च चालविणें आणि राज्य सरकारचें व राष्ट्रीय सरकारचें कर्ज फेडणें यासाठीं हे कर लादलेले होते.

दक्षिण प्रदेश या सर्व बाजूंनीं यातनामय असलेल्या कालांतून जात असतां, लामारच्या लक्षांत एक गोष्ट आली कीं, उत्तरेशीं आपलीं जीं प्राचीन भांडणें आहेत तीं नुसतीं भांडत रहाण्यांत दक्षिणेचें हित नाहीं. तर सलोखा वाढवून फेडरल राज्याशीं आपले संबंध अधिक चांगले करणें आणि लष्करी सत्ता मागें घ्यायला लावणें हाच दक्षिणेच्या प्रगतीचा मार्ग होता. ही गोष्ट कशी घडून येईल ? दक्षिण ही अमेरिकन राजकारणांतील प्रक्षोभकारण नाहीं, तेथील परिस्थिति प्रक्षुब्ध रहाणार नाहीं, अमेरिकेंतील प्रक्षोभाची मापक ही भूमिका घेण्याला दक्षिण तयार नाहीं, हें उत्तरेच्या लक्षांत आलें म्हणजेच तेथील लष्करी सत्ता काढून घेतली जाईल असें लामारचें मत होतें. दक्षिणेंतील लोकांचे घटनेनें दिलेले नागरिक हक्क काढून घेतले असतां उत्तरेंतल्या लोकांच्या स्वातंत्र्यावर गदा येईल ही गोष्ट उत्तरेच्या लक्षांत यावी अशी लामार अपेक्षा करीत होता. आपल्या देशाचें भाविकालीन सुख सर्व राज्यांतील व सर्व प्रदेशांतील लोकांत परस्परसलोखा व सहकार्य नांदण्यावर अवलंबून आहे, ही गोष्ट त्याला पटूं लागली.

अशा धोरणाला दोन बाजूंनीं विरोध होता. एका बाजूस उत्तरेंतलें रिपब्लिकन पुढारी होते. दक्षिणेंतल्या लोकांपुढें 'रक्तानें माखलेले शर्ट फडफडावून' त्यांनीं यादवींतल्या त्यांच्या पराभवाची आठवण देत राहावें म्हणजेच उत्तरेंत व पूर्वेंत विशेषत: संघराज्याच्या सैन्यांत आपणास पाठिंबा राहील असें या रिपब्लिकनांना वाटे. १८६८ च्या निवडणुकांनीं या रिपब्लिकनांची खात्री झाली होती कीं जर दक्षिणेंतील राज्यावर पुन्हा डेमोक्रॅट पक्षाचें प्रभुत्व झालें तर उत्तरेंतल्या डेमोक्रॅटांच्या साह्यानें ते पुन्हा रिपब्लिकनांना सबंध राष्ट्राच्या क्षेत्रांत कायमचे अल्पसंख्याक बनवितील. म्हणून दक्षिणेशीं उत्तरेनें आपली तेढ कायम ठेवणें अवश्य आहे असें या रिपब्लिकनांना वाटे. उलट दक्षिणेंत कांहीं पुढारी असें होते कीं दक्षिणेचा पराभव झाला आहे व दक्षिण प्रदेश उत्तरीयांनीं व्यापला आहे असें मानून दक्षिणी जनता उत्तरेचा जो द्वेष करीत होती ती दाक्षिणात्यांची द्वेषभावना कुरवाळून लोकप्रियता व वजन सुलभतेनें मिळेल असें त्यांना वाटे. म्हणून त्यांना उत्तरेशीं सलोखा नको होता.

या दोन्ही परस्परविरोधी गटांच्या मार्गाहून लामारचा मार्ग भिन्न होता. त्याला आतां असें वाटूं लागलें होतें कीं "मी आणि माझ्यासारखे दक्षिणेंतील इतर प्रतिनिधि यांनीं उत्तर व दक्षिण यांतील तेढी भावना नाहींशी करून दोघांत शांतता व सलोखा निर्माण करता येण्यासाठीं करता येईल तें सारें करावें एवढाच दक्षिणेचें व साऱ्या देशाचें हित साधण्याचा मार्ग आहे."

१८७३ सालीं लामार प्रतिनिधिगृहांत निवडून आला आणि चौदाव्या घटना दुरुस्तीअन्वयें दक्षिणेवर ज्या अनेक अपात्रता लादण्यांत आल्या होत्या त्या रद्द करण्यासाठीं लामारनें केलेला अर्ज मंजूर झाला. पुढें सुम्नर मेल्यावर मॅसॅच्यूसेट्स्चा प्रतिनिधि हौअर यानें सुम्नरच्या प्रशंसापर भाषण करण्यास लामारला विनंति केली. स्नेहाचा हात उत्तरेपुढें करण्यास जी योग्य अशी संधि येण्यासाठीं लामार दीर्घ काल वाट पाहात होत ती अशा प्रकारें मिळताच लामारनें ती साधून घेतली. त्याला या कामी परिपूर्ण यश मिळावें अशा प्रकारें सर्व गोष्टी जमून आल्या. लामार यादवीपूर्वी दक्षिणेनें संघराज्यांतून फुटूं नये या मताचा होता. कॉन्फिडरेट सरकारची त्यानें एकनिष्ठेनें सेवा केली होती. उलट सुम्नरबद्दल मिसिसिपींत व साऱ्या दक्षिणेंत सर्वत्र द्वेष पसरला होता. वक्ता या नात्यानें लामार हा अतिशय चतुर होता. या सर्व परस्पर भिन्न

घटनांचा संयोग घडून येऊन त्यांनीं लामारच्या पदरांत यशाचें माप टाकलें. कारण त्याला अनुकूल असणाऱ्या या सर्व घटनांना लामारच्या आकर्षक वक्तृत्वानें विशेष उठाव दिला. हेन्री ग्रॅडी लिहितो, "लामारचा फिकट पण स्पष्ट वर्ण, त्याचे सुन्दर करडे डोळे, गालाशीं उंच हाडें, गडद पिंगट केस आणि बोलतांना स्पष्ट दिसणारी त्याच्या ओठाची हालचाल या सर्व दर्शनानें लामारच्या वक्तृत्वांत सौंदर्याची मोठीच भर पडली." लामारनें केलेली सुम्नरची प्रशंसा या वेळीं इतकी संस्मरणीय ठरली कीं एक नवीन प्रकारचा मुत्सद्दी दक्षिणेंतून पुढें येत आहे असें सिद्ध करून देण्यासाठीं लामारला या पहिल्या संधीचा उपयोग करता आला. पण ही संधि शेवटची नव्हती. याच दिशेनें आणखी पुष्कळ कामगिरी लामारनें पुढें केली.

मिसिसिपीच्या नागरिकावर लामारच्या या भाषणाचा विविध परिणाम झाला. ज्यांना सुम्नरची इतकी प्रशंसा लामारनें करावी हें आवडलें नाहीं त्यांना लामारचा सर्व तर्कवाद अतिशय चुकीचा आहे असें वाटलें. त्याबद्दल लामारला माफी करायला ते तयार नव्हते. दुसऱ्या कांहींना तें भाषण आवडलें नाहीं पण लामार प्रामाणिकपणें व कळकळीनें बोलत आहे याबद्दल त्यांना खात्री पटली. एकंदरीनें सुम्नरच्या भावना सर्वांना पटल्या व त्याची भूमिका सर्वांच्या लक्षांत आली. या भाषणानें त्याची लोकप्रियता एकदम खूप वाढली आणि १८७६ सालीं मिसिसिपींत डेमोक्रॅटिक पक्षाच्या हातीं सत्ता गेली तेव्हां लामारला मिसिसिपी कायदेमंडळानें अमेरिकन कायदेमंडळासाठीं निवडून दिलें. पण प्रतिनिधि-गृहांतून सिनेटमध्यें प्रवेश करण्यापूर्वीं लामारनें एका प्रक्षुब्ध वादांत आपला पक्ष सोडला, आपला गट सोडला आणि यामुळें त्यानें आपल्या अनेक पाठीराख्यांना दुखविलें, ती कथा अशी.

१८७६ च्या राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकींत हायेस व टिल्डेन या दोन उमेद-वारांत कमालीची चुरस लागली होती. शेवटीं डेमोक्रॅट उमेदवार टिल्डेन निव-डून आला. तो अगदीं निमुळत्या बहुमतानें निवडून आला. हायेसनें एकाद्या तत्त्वनिष्ठ माणसाप्रमाणें प्रथम पराभव मान्य केला. पण त्याचे पाठीराखे स्वस्थ बसणार नव्हते. त्यांनीं 'न्यूयॉर्क टाइम्स' ची मदत घेऊन टिल्डेनचा उघड दिसणारा विजय दक्षिण कॅरोलिना, लुइसिआना व फ्लोरिडा या राज्यांतील जवळ जवळ सारख्या पडलेल्या मतदानाच्या आधारें संशयास्पद ठरविला. आणि

मग उत्तरेच्या कच्छपीं असलेल्या या तीन राज्यांतील निवडणुकींचे निकाल बनावट करवून त्यांनीं या संशयाचें रूपांतर हायेसच्या विजयांत करून टाकलें. आतां समेट न झाल्यास युद्ध माजणार लष्करी-दडपशाही स्थापन होणार अशा अफवा उठल्या. तेव्हां काँग्रेसनें लवाद नेमण्याचें ठरविलें. लवाद म्हणून बाह्यत: नि:पक्षपातीपणाच्या देखाव्याचें निवडणूककमिशन नेमण्यांत आलें. वास्तव पद्धतीनें चौकशी होईल तर रिपब्लिकन पक्षाचें उघड दिसणारें कपट सिद्ध होईल असा विश्वास लुसीअस लामारला वाटला. आणि म्हणून त्यानें लवादास संमति दिली. यादवीच्या धक्क्यानें तो खचला होता व त्याचा दृष्टिकोन व्यापक झाला होता म्हणून यादवीची पुनरावृत्ति तो टाळूं पाहात होता.

पण अखेर कमिशननें पक्षीय दृष्टीनेंच काम केलें आणि वादग्रस्त राज्यांतील १८५ मतें हायेसला व १८४ मतें टिल्डेनला मिळालीं असें ठरवून हायेसला विजयी ठरविलें. यामुळें आणखी चार वर्षें रिपब्लिकनांची सत्ता राहणार, त्यामुळें आणखी चार वर्षें दक्षिण प्रदेशाचें पारतंत्र्य व पिळणूक चालू राहणार आणि अमेरिकन राष्ट्रांत समान दर्जा व मानाचें स्थान दक्षिणेला आणखी चार वर्षें तरी मिळणार नाहीं अशी परिस्थिति निर्माण झाली. 'लामारनें पुढें मोठी जागा मिळण्याचें वचन घेऊन आपलें मत व दक्षिणेची अब्रु विकून टाकली' असा लामारवर आरोप करण्यांत आला. 'आपल्या राज्याच्या बाजूनें लढण्याचा प्रसंग आला असता हा भेकडपणानें वागतो' असाहि आरोप लामारवर झाला. 'विजयाच्या ऐन अखेरच्या वेळीं लामारनें आपली बाजू विश्वासघातानें सोडली' असें त्याचे विरोधक म्हणूं लागले. आतां लामार सिनेटमध्यें निवडून आला होता व त्याच्या फेरनिवडणुकीचा प्रश्न सहा वर्षांशिवाय येणार नव्हता. तरी पण त्यावेळीं या विश्वासघाताचें प्रायश्चित्त न विसरता त्याला देण्याचा त्याच्या शत्रूंनीं निर्धार केला.

पण लामार कायदा पाळणारा व स्वाभिमानानें वागणारा होता. त्यानें कमिशनला मान्यता देऊन तें स्थापलें जाण्यास साहाय्य केलें होतें. अर्थात् कमिशनचा निर्णय त्याच्या मनाला कितीहि धक्का देणारा असला तरी लामार तो अमान्य करूं शकत नव्हता. आतां हायेसला राष्ट्रपति होऊं देण्यास विरोध करायचा तर युद्धच केलें पाहिजे आणि पुन्हा युद्धाच्या वाटेनें जाण्यांत सर्वनाश आहे असें वाटून लामारनें कमिशनच्या निर्णयास पाठिंबा देण्याचें ठरविलें. दक्षिणेला संतापण्याला

कारण केवढेहें सबळ असलें तरी यावेळीं पराभव पत्करणें हाच मार्ग दक्षिणेच्या दृष्टीनें बरा असें त्याचें मत झालें. त्याच बरोबर त्यानें चातुर्यानें वागून दक्षिणेवरील लष्करी सैन्यें उठविणें व महत्त्वाच्या दक्षिणी राज्यांना पूर्ण अंतर्गत स्वायत्तता देणें या गोष्टींबावत हायेककडून वचन मिळविलें. दक्षिणेंतील अनेक मुत्सद्दी या वेळीं उघड उघड युद्धाच्या गोष्टी बोलूं लागले होते. अशा वेळीं दक्षिणेंसाठीं महत्त्वाच्या सवलती मिळवून लामारनें त्यांची जी सेवा केली ती कोणाच्या लक्षांत प्रथम फारशी आलीच नाहीं. दक्षिणेंत त्याच्या विरुद्ध फार मोठें वादळ उठलें होतें. पण लामारनें त्याची पर्वा केली नाहीं. आतां सीनेटमध्यें पक्षातीत व प्रदेशातीत भूमिकेनें मोठी मुत्सद्दीगिरी गाजविण्याचा जास्तींत जास्त बिकट प्रसंग त्याच्यावर येणार होता. त्यासाठीं आतां लामार तयार झाला होता.

कॉन्फिडरेट राज्यांतील वरिष्ठ दर्जाच्या अधिकारावर पूर्वी असून आतां सिनेटमध्यें निवडला गेला असा लामार हा पहिलाच दाक्षिणात्य पुढारी होता. वीस वर्षांपूर्वी लामार कट्टर प्रादेशिकवादी काँग्रेसमन असून संघराज्यांतून मिसिसिपीनें फुटून निघावें अशा आशयाच्या वहहुकुमाचा मसूदा लिहिण्यासाठीं त्यानें काँग्रेसचा राजीनामाहि दिला होता ही गोष्ट अनेक सिनेटर्स विसरले नव्हते. यावेळीं तो सिनेटमध्यें आला पण ती त्याला अनुकूल वेळ नव्हती. डेमोक्रॅटांच्या आश्रयाखालीं बंडखोर व देशद्रोही माणसें आहेत असें रिपब्लिकन उघड उघड बोलत होते. उलट "दक्षिणेंतील फितुरांचें साहाय्य घेऊन उत्तरेनें पुनर्घटनेच्या नांवाखालीं दक्षिणेवर जुलूम चालविला आहे" असें मानणाऱ्या दाक्षिणात्यांनीं असहिष्णुता व सूड बुद्धि माजविण्यासाठीं भडक भाषणें करून प्रादेशिक अविश्वास अधिकच भडकविला.

१८७७ सालचा बहुतेक काळ लामार थकून व आजारानें असमर्थ होऊन घरींच राहिला होता. त्याकाळीं दक्षिणेंत व पश्चिमेंत एक मोठी वादळी चळवळ चालू झाली व पुढील सबंध पिढीएवढा काल तिनें सारें राष्ट्र व सारे राजकीय पक्ष यांना ग्रासून टाकलें. "अनिर्बंध चांदी" (फ्री सिल्व्हर) असें त्या चळवळीचें नांव होतें. या चळवळीचा निर्माता विल्यम जेनिंग्ज ब्रायन हा असून तो लोकांपुढें आलेला नव्हता. पण मिसूरीचा प्रतिनिधिगृहांतला प्रतिनिधि ब्लॅंड (याला 'सिल्व्हर डिक' हें नांव लोकांनीं दिलें होतें.) यानें प्रतिनिधिगृहांत एक बिल आणलें. टांकसाळेंत कोणीं कितीहि चांदी आणली तरी तिचें नाणें पाडून मिळावें

अशी त्या बिलांत मागणी करण्यांत आली होती. पश्चिम प्रदेशांत रुप्याच्या खाणी सापडून चांदीच्या निर्मितीस बहर आला होता. यामुळें सोन्याच्या प्रमाणांत चांदीची किंमत एकदम उतरूं लागली. अशा वेळीं चांदीचें नाणें भराभर पाडून घेऊन चलनफुगवट करणें हाच चांदीउत्पादकांना चांदींत फायदा मिळविण्याचा सोपा मार्ग दिसला.

मिसिसिपींत ही मागणी फार लोकप्रिय झाली. १८७३ सालीं अमेरिकेंत अतिशय मंदी आली. आणि आधींच दरिद्री झालेल्या दक्षिणेंतील राज्यांना या मंदीचा फार मोठा धक्का बसला. हजारोंचे धंदे बुडाले, बेकारी भडकली व कामगारांच्या मजूरीचे दर उतरले. युद्धकाळीं धान्याच्या किंमती अत्युच्च पातळीवर गेल्या होत्या, त्या आतां भुईसपाट झाल्या आणि रोकडीसाठीं उतावीळ झालेले मिसिसिपीचे शेतकरी ज्या बिलानें त्यांच्या मालांच्या किंमती वाढतील, त्यांचीं कर्जें कमी होतील व पैसा सुलभ होईल अशा कोणत्याहि बिलाला पाठिंवा देण्याला तयार झाले. आज पैसा स्वस्त करून पूर्वप्रदेशांतल्या बँकांचीं कर्जें दक्षिणेनें देऊन टाकलीं नाहींत तर आपण पूर्वेकडील बँकांच्या कर्जांत कायमचें राहूं अशीं दक्षिणेला भीति वाटली.

चांदीबद्दल लोकांत आतां एक नवीच ईर्षा निर्माण झाली होती. सोनें हा श्रीमंतांचा पैसा तर चांदी हा गरीबांचा पैसा असें लोक म्हणूं लागले. गवत पिकविणारीं खेडीं आणि लहान शहरें यांचा पैसा म्हणजे चांदी आणि न्यूयॉर्कच्या सराफ बाजाराचा (वॉल स्ट्रीट) पैसा म्हणजे सोनें असें मानलें जाऊं लागलें. धान्यकिंमती कोसळत होत्या, व्याजाचें दर वाढले होते, कर्जें वाढलीं होतीं व आणखी अशा अनेक अडचणी उद्‌भवल्या होत्या. त्या सर्व अडचणींचें निवारण चांदी करणार होती. जॅक्सन व बेन्टन यांच्या काळापासून डेमोक्रॅटिक पक्ष वास्तविक चलनटंचाईचा पुरस्कर्ता होता. पण आतां चलनफुगवटीचें धोरण लोकांना पसंत आहे असें पाहून त्या पक्षानें लोकप्रियता मिळविण्यासाठीं त्या धोरणाचा पुरस्कार चालविला. आणि दारिद्र्यानें पिडलेल्या मिसिसिपींतून निवडून गेलेला डेमोक्रॅटिक सिनेटर लामार चांदीच्या बाजूनें लढेल अशी लोकांनीं अपेक्षा केली.

पण लामार हा पंडित आणि प्रोफेसर होता. त्यानें या प्रश्नाकडे आपल्या सहकाऱ्याहून कांहींशा वेगळया दृष्टीनें पाहिलें. आपले मतदार काय म्हणतात

यांकडे त्यानें फारसें लक्ष दिलें नाहीं. या वादाच्या दोन्ही बाजूंनीं लिहिलेले सारे प्रबंध त्यानें वाचून काढले. त्याच्या या अभ्यासावरून त्याची खात्री झाली कीं (त्याचें हें मत बहुधा चूक असावें) मजबूत चलन हेंच मजबूत आर्थिक धोरण होय. वास्तविक सराफबाजारांतले सरकारचे कर्जरोखेदार हे माजले होते, त्यांचीं कर्जें हलक्या चलनांत फेडून टाकायला काय हरकत होती? ब्लँड याच्या बिलानें हीच योजना केली असून मॅथ्यू यानें त्या आशयाचा ठरावहि आणला होता. पण लामारच्या मतें असें करणें हा नैतिक अन्याय होता व ती व्यावहारिक चूक होती. त्यामुळें आपला जगांतला आर्थिक दर्जा खालावेल, जमाबंदीचें कायम धोरण म्हणून तें योग्य ठरणार नाहीं आणि आर्थिक संकट निवारण्यासाठीं अवलंबलेला कपटाचा मार्ग असें स्वरूप सरकारच्या आर्थिक धोरणाला येईल असें लामारचें मत झालें.

२४ जानेवारी १८७८ रोजीं सिनेटमध्यें त्यानें आपलें पहिलें भाषण केलें तें विद्वत्ताप्रचुर होतें. त्या भाषणांत लामारनें मिसिसिपीच्या नागरिकांची मागणी चुकीची आहे असें सांगून चांदीसंबंधीचें बिल व ठराव याच्या समर्थनार्थ तपशीलवार मांडण्यांत आलेलीं कारणें कृत्रिम व अतिरेकी आहेत असें सांगितलें. दुसरे दिवशीं मॅथ्यूच्या ठरावावर मतदान झालें. लामारच्या फार पूर्वीं निवडल्या गेलेल्या एका विद्वान निग्रो सिनेटरानें मॅथ्यूच्या ठरावास अनुकूल मत दिलें. वास्तविक या सिनेटरला निवडणारें राज्य 'उत्तरेच्या कच्छपीं लागलेलें' होतें, तरीहि त्यानें उत्तरेस पसंत नसणाऱ्या या मॅथ्यूच्या ठरावास पुष्टि दिली. उलट लामारनें आपल्या मिसिसिपी राज्याचें मत अवमानून ठरावाविरुद्ध मत दिलें.

सिनेटर लामारनें केलेल्या त्या विद्वत्ताप्रचुर व उच्च मुत्सद्यास शोभणाऱ्या भाषणाबद्दल देशाच्या अनेक विभागांतून लामारची प्रशंसा झालेली ऐकूं आली. पण मिसिसिपींत त्याचा फक्त धिक्कारच झाला. ३० जानेवारी रोजीं मिसिसिपीच्या कायदेमंडळानें एक ठराव करून लामारच्या ज्या सहकाऱ्यानें मॅथ्यूच्या ठरावाला पाठिंबा दिला होता व "आपल्या मतदारांच्या भावना रास्तपणें व्यक्त केल्या होत्या" त्याचें अभिनंदन केलें (वास्तवीक तो सिनेटर निग्रो असल्यानें मिसिसिपीला आवडण्यासारखा नव्हताच.) आणि लामारला थप्पड देण्यासाठीं त्याचा उल्लेखहि त्या ठरावांत करण्याचें टाळलें. लामारला हा ठराव फार

झोंबला. मिसिसिपीच्या प्रतिनिधिगृहाच्या अध्यक्षानें लामारला यावेळीं एक पत्र लिहून हा ठराव म्हणजे निवळ अत्याचार आहे असें आपलें मत त्याला कळविलें. सदर अध्यक्ष लिहितो :

"पण लोक कठिण आर्थिक परिस्थितीनें गांजलेले आहेत. त्यांचें संकट जाईल असा कोणताहि उपाय हातीं घेण्याला ते उतावीळ झाले आहेत. तो उपाय काय आहे व तो उपाय ठरतो कीं अपाय ठरतो हें त्या बिचाऱ्यांना काय माहित ?"

मिसिसिपी कायदेमंडळ वरील ठराव करून थांबलें नाहीं. ४ फेब्रुवरीला मिसिसिपीच्या दोन्ही सभागृहांनीं एक ठराव करून "लामारनें ब्लँडच्या चांदी बिलाला पाठिंबा द्यावा व मिसिसिपीचा प्रवक्ता म्हणून तें बिल पास करून घेण्यास मदत करावी असा आदेश त्याला दिला.

या ठरावानें लामार चिडला. कायदेमंडळांतील प्रतिनिधीला बंधनकारक सूचना देण्याचा मतदारसंघांचा हक्क आहे ही कल्पना दक्षिणी राज्यांत फार जुनी व मूलग्राही आहे ही गोष्ट लामारला माहीत होती. पण लामारला ती गोष्ट मान्य नव्हती. आपल्या पत्नीस धाडलेल्या पत्रांत तो म्हणतो, "मी हें ऐकणार नाहीं. त्यापेक्षा मी राजकारण कायमचें सोडीन." त्यानें मिसिसिपी कायदेमंडळांतल्या एका मित्राला आपलें हें मत समजाऊन सांगितलें. तो म्हणाला "या कायदेमंडळानें फेडरल धोरणासंबंधानें मतप्रदर्शन करावें. तो त्याचा हक्क आहे आणि सिनेटराला जेव्हां आपण कसें वागावें यासंबंधानें संशय असेल त्यावेळीं त्या कायदेमंडळाच्या मताप्रमाणें त्यानें वागावें हें अवश्य आहे. पण या विशिष्ट बाबतींत त्यांच्या सूचना आणि माझीं आयुष्यभरचीं ठाम मतें यांत कट्टर विरोध आहे. मी जर त्यांच्या सांगण्याप्रमाणें माथ्यूच्या ठरावावर मत दिलें असतें तर मी माझ्या सदसद्विवेकबुद्धीविरुद्ध वागलों असें झालें असतें. मी सदसद्विवेकबुद्धीविरुद्ध कधींहि वागलेलों नाहीं. एकादा सिनेटर व त्याच्या राज्यांतले त्याचे मित्र यांची एकमेकाबद्दलची भक्ति कितीहि असो, तो सिनेटर जर त्या मित्रांच्या मताप्रमाणें सिनेटमध्यें वागणार असेल तर मग त्याने सिनेटपुढें येणाऱ्या विषयावर खूप अभ्यास व तयारी करून तो ती वाया घालवील आणि मग आपल्या प्रदेशांतील मतदारांच्या रोज बदलणाऱ्या मतांचा मामूली वकील तो होईल.....कोणाहि थोर मुत्सद्याची थोरवी यामुळें कमी होणार असून तो रोज बदलणाऱ्या चालू लोकमताचा कर्णा होऊन बसेल. त्याच्या भाषणांत त्याचे परिपक्व झालेले विचार येणार नाहींत."

लामार सार्वजनिक जीवनांत यादवीनंतर जो आला तो विशिष्ट निर्धाराचें तत्त्वज्ञान उराशीं बांधून आला होता. म्हणून केवळ आपल्या प्रदेशांतील लोकमत आपल्याविरुद्ध आहे एवढ्यामुळें तो नमणार नव्हता. उत्तरेशीं अगदीं योजनापूर्वक अजीजीनें वागून उत्तरेकडून स्वतांसाठीं व आपल्या प्रदेशासाठीं सन्मान मिळवूं पाहणाराहि तो नव्हता. पण अनिर्बंध चांदीचें तें बिल अयोग्य आहे असा एकदां त्याचा निर्णय झाल्यानंतर त्याला हें सिद्ध करून देण्याची उत्कंठा लागली होती कीं मुत्सद्दीगिरी दक्षिणेंत अजीबात मेलेली नाहीं आणि राष्ट्राबद्दलचें आपलें कर्तव्य पार पाडण्याची व स्वाभिमान राखण्याची दक्षिणेचीहि इच्छा आहे. या अनिर्बंध चांदीच्या बिलाबाबतींत त्याचें विशेषेकरून असें म्हणणें होतें कीं "दक्षिणेनें संकुचित दृष्टीनें निवळ प्रादेशिक हिताची भूमिका घेऊं नये. अलीकडे पुष्कळ वर्षें असें दिसूं लागलें होतें कीं दक्षिणेंतील डेमोक्रॅटिक पक्ष अमेरिकन संघ सरकारनें यादवीच्या काळांत काढलेलीं कर्जें फेडण्यास नकार देऊं पाहात आहे. कारण संघसरकारनें यादवीच्या काळांत काढलेल्या कर्जांची जबाबदारी दक्षिणेवर आहे असें मानण्याला डेमोक्रॅटिक पक्ष तयारच नाहीं." दक्षिणेपैकीं लामारनें मात्र एकट्यानें 'अनिर्बंध चांदी'च्या बिलाला विरोध केला. त्याच्याबरोबर जॉर्जियाचा सिनेटर बेन हिल हा आणखी एक अपवाद होता. तो म्हणाला, "यादवीच्या काळांत उत्तर सरकारचे कर्जरोखे खरीदणाऱ्यांचे पैसे बुडावे यासाठीं मी प्रयत्नाची शिकस्त करीत होतों. पण आतां मात्र ज्यांनीं ६० सेंटला एक डॉलरचा कर्जरोखा या दरानें कर्जरोखे खरीदले त्यांनाहि त्यांचा सगळा डॉलर परत मिळावा असें माझें मत आहे."

एका आठवड्यानें ब्लँडचें ते 'अनिर्बंध चांदी' बिल सिनेटमध्यें अखेरच्या मतदानासाठीं आलें. वाद संपत आला असतां सिनेटर लामार अनपेक्षितपणें उभा राहिला. त्याच्या हातांत टिपणें नव्हतीं. कारण सिनेटमध्यें बसणाऱ्यांपैकीं आयत्या वेळच्या स्फूर्तीनें बोलण्यांत तो फारच हुशार होता. (तो म्हणे- "टिपणें लिहून काढलीं कीं मनांत विचार येण्याचे बंदच होतात आणि बोलणें आठवतांना मज्जातंतूवर फार ताण पडतो.) टिपणाऐवजीं त्याच्या हातीं मिसिसिपीच्या राज्याचा शिक्का असलेला एक सरकारी कागद होता. तो त्यानें चोपदाराकरवी अध्यक्षाच्या डेस्कवर पोचविला. त्यानें आपल्या सहकाऱ्यांची

माफी मागितली आणि म्हणाला, "मीं जरी 'अनिर्बंध चांदी' बिलावर मत व्यक्त केलें असलें तरी पण मला येथें आणखी एक कर्तव्य करावयाचें आहे. तें कितीहि दुःखदायक असलें तरी तें स्पष्टपणें अवश्य आहे. मीं अध्यक्षांच्या डेस्कवर ठेवलेले ठराव वाचले जावे."

लामारच्या मनांत काय आहे, ते ठराव कसले हें सिनेटरांना कांहींच कळेना. सिनेटचा कारकून एकसुरांत ते ठराव वाचूं लागला आणि सर्व सिनेटर कान टवकारून ऐकूं लागले. मिसिसिपी कायदेमंडळानें त्या ठरावांत म्हटलें होतें कीं आपल्या सिनेटरांनीं 'अनिर्बंध चांदी' बिलाला पाठिंबा द्यावा. कारकुनानें त्या सूचना वाचल्यानंतर सर्व सिनेटरांचे डोळे लामारकडे लागले. तो काय बोलणार याची कोणासच कांहीं कल्पना नव्हती. वॉशिंग्टनच्या 'कॅपिटोल' पत्राचा वार्ताहर त्या प्रसंगाचें वर्णन करतो. "या सूचनानंतर सिनेटर लामारची परिस्थिति त्या बिलाबाबत त्याला मोठ्या अडचणींत घालणारी झाली होती हें सर्व सिनेटरांच्या ध्यानांत होतें. यामुळें त्याचें भाषण ऐकण्यासाठीं सिनेटर एकदम इतके स्तब्ध झाले कीं सारें सभागृह एक भलें मोठें थडगेंच आहे कीं काय असें बाटूं लागलें. सिनेटच्या त्या व्यासपीठावर लामारची आकृति भव्य दिसत होती. पण तो अगदीं एकाकी आहे हेंहि लक्षांत येत होतें. तो शांत पण जोरदार आवाजांत बोलत होता. त्याच्या भावनोद्रेकाबरोबर त्याचा आवाज कंप पावूं लागला व त्याचें सारें शरीरहि कंपित झालें."

लामार आपल्या भाषणांत म्हणाला, "अध्यक्ष महाराज हे ठराव आणि माझीं मतें यांचे दरम्यान खोल खंदक आहे. मी या ठरावांतला आदेश मानणार नाहीं व बिलास अनुमति देणार नाहीं. माझ्या राज्यांतील तरुणांना त्यांच्या शिक्षणाच्या कामीं मीं मदत केली आहे. मीं त्यांच्या मनावर हें बिंबवण्याचा प्रयत्न केला आहे कीं सत्य हें असत्यापेक्षा अधिक चांगलें, प्रामाणिकपणा हा मुत्सद्दीगिरीपेक्षा अधिक चांगला, धैर्य हें भेकडपणापेक्षा अधिक चांगलें. मीं जे धडे तरुणांना शिकविले तेच आज माझ्या समोर उभे असून मी सत्य पाळतों कीं असत्य वागतों, प्रामाणिकपणा दाखवितो कीं कावेबाजपणाचा अवलंब करतों, माझ्या जनतेशीं निष्ठेनें वागतों कीं त्यांचा द्रोह करतों, याबावत माझी आज येथें परीक्षा आहे. माझ्या कायदेमंडळाला माझें वर्तन नापसंत असून त्यांना माझा राग आला आहे. पण या ठरावांतील त्यांच्या आदेशाप्रमाणें मी वागू शकत नाहीं.

मी 'अनिर्बंध चांदी' बिलाला विरोध कां करतों याची कारणें माझ्या लोकांना मी सांगणार आहें. त्यावेळीं मग मी माझ्या मतांना चिटकून राहिलों यामुळेंच मी त्यांचा प्रतिनिधि होण्यास अपात्र ठरलों कीं काय हें त्यांनीं ठरवावें. हा 'अनिर्बंध चांदी' बिलाचा प्रश्न गुंतागुंतीचा व म्हणून समजण्यास कठिण आहे. मी त्याचा दीर्घ काल, चिकाटीनें अभ्यास केला आहे. पूर्ण प्रामाणिकपणें व एकाग्रतेनें या प्रश्नांत लक्ष घातलें आहे. परमेश्वरानें मला दिलेली सर्व बुद्धि मीं या बिलावर विचार करण्यांत खर्च केली आहे. इतक्या परिश्रमानंतर माझें जें मत बनलें तें केवळ मिसिसिपीच्या कायदेमंडळाच्या मताहून वेगळें आहे एवढ्यासाठीं त्या कायदेमंडळानें माझा त्याग करावा कीं काय हें त्यांनीं ठरवावयाचें आहे...पण त्यांचा आज निर्णय कसाहि असो. अशी वेळ लवकरच येईल कीं त्यावेळीं माझें आजचें वर्तन त्यांना शहाणपणाचें व न्यायाचें वाटेल. माझें कर्तव्य आज काय आहे याबद्दल माझी जी खात्री आहे तेंच माझें आजचें बळ असून त्याच बळावर लोकमत अशा प्रकारें वळण्याची मी वाट पाहात राहीन. एका थोर अमेरिकनानें म्हटलें आहे कीं 'सत्य हें सर्वशक्तिमान असतें.. जनता न्याय देतेच देते.' माझी या वचनावर श्रद्धा आहे."

लामारचें भाषण संपल्यानंतर दोन्ही बाजूचे सिनेटर त्याच्या डेस्कभोवतीं जमून त्याच्या धैर्याची प्रशंसा करूं लागले. आपले भाषण व विरोधी मत यांचा कांहींहि उपयोग न होता बिल प्रचंड बहुमतानें मंजूर होईल आणि राष्ट्रपति हायेक यानें नकार दिला तरी मागून त्याचा कायदा होणार हें तो जाणून होता. त्यानें जाणून बूजून आपल्या कायदेमंडळाच्या आदेशाचा भंग केला यामुळें अनेकांना धक्काच बसला. पण हें त्याचें धैर्य सर्वथैव वाया गेलें नाहीं. सर्व उत्तर प्रदेशांत त्याच्या भाषणाची प्रशंसा झाली. दक्षिणेबद्दलचा उत्तरीयांचा अविश्वास कमी झाला. राष्ट्रीय कर्ज व राष्ट्रीय पत यासंबंधानें दक्षिणेबाबत पूर्वीं उत्तरेला जो संशय वाटत असे तो आतां तितका राहिला नाहीं. 'हार्पर्स वीक्ली' हें पत्र लिहितें,

"लामारनें आपल्या राज्याच्या सार्वत्रिक व दृढ अशा लोकमताविरुद्ध वर्तन केलें पण त्यामुळें लामार जितका सर्व राष्ट्राच्या विश्वासास पात्र ठरला आहे तितका दुसरा कोणीहि आजवर ठरला नाहीं. कारण आपल्या राज्यानें अत्यंत ठाम असा अधिकृत आदेश दिला असतां त्याविरुद्ध अखिल राष्ट्रहितासाठीं इतक्या धैर्यानें

आजवर कोणी आपल्या तत्त्वांना चिकटून राहिला नाहीं......मिसिसिपीच्या या डेमोक्रॅटिक सिनेटरनें एवढें पौरुष या प्रकरणीं दाखविलें आहे कीं अमेरिकेंतल्या अति थोर मुत्सद्यालाच तें शोभेल."

'नेशन' पत्र आपल्या संपादकीय लेखांत लिहिते, "लुसिअस लामारनें आपण आपल्या राज्यकायदेमंडळाचे आदेश कां अमान्य करतों याचा जो खुलासा केला तो शौर्य, उमदेपणा, कारुण्य या दृष्टींनीं कॉंग्रेसच्या इतिहासांत अद्वितीय ठरेल. त्याच्या मतदानाने सिनेटमधली जागा त्याला गमवावी लागेल."

हें भविष्य खास खरें ठरणारसें दिसलें. मिसिसिपीच्या त्या सिनेटरावर ताबडतोब व जोराचा हल्ला झाला. त्यानें आपला प्रदेश व आपले लोक यांचा त्याग केला नव्हता काय ? एक राजकीय वक्ता म्हणाला, "त्यानें शत्रूला जाऊन मिळण्याची इतकी घाई केली कीं, आपल्या मेलेल्या बांधवांच्या थडग्यांवरून ठेचा खात तो धावत सुटला." त्याचा जुना मित्र जेफर्सन डेव्हिस संतापून म्हणाला, "लामारनें कायदेमंडळाचा आदेश झुगारून लावला हा आमच्या शासन पद्धतीवर झालेला हल्लाच होय. दक्षिणेंतील डेमोक्रॅटिक पक्षाच्या दीर्घकालीन व्यवहारपद्धतीवरहि हा हल्ला झाला आहे. लामारनें आपल्या कायदेमंडळाचा आदेश मानला नाहीं आणि राजीनामा देण्याचेंहि नाकारलें यामुळें मिसिसिपीचें प्रतिनिधित्व योग्य प्रकारें करूं शकेल असा प्रतिनिधि निवडणेंहि आम्हांला अशक्य झालें. मिसिसिपीच्या लोकांना स्वतांचें राज्य चालविण्यापुरती अक्कल नाहीं असेंच लामार जगाला दाखवीत आहे" लामारला जेफर्सन डेव्हिसची ही टीका फार झोंबली.

(जेफर्सन डेव्हिस हा लामारचा यादवींतला वरिष्ठ अधिकारी होता. जरी यावेळीं त्यानें लामारला अगदीं झोंबणारी टीका लामारवर केली तरी पुढें एका प्रसंगीं लामार डेव्हिसच्या बाबतींत अत्यंत उमदेपणानें वागला. मेक्सिकन युद्धांत जेफर्सन डेव्हिसनें भाग घेतल्याबद्दल त्याला पेन्शन देण्याला सिनेटर होअरनें विरोध केला. तेव्हां डेव्हिसच्या बाजूनें लामारनें केलेलें उत्कृष्ट वक्तृत्व संस्मरणीय ठरलें. लामार त्यावेळीं म्हणाला,

"होअरनें डेव्हिसला पेन्शन देण्यास विरोध केला पण तसें करण्याला मुळींच धैर्य लागत नाहीं......होअर हा स्वतःला ख्रिस्तानुयायी मुत्सद्दी समजतो असें मला वाटतें. ख्रिस्ती पुराणांतून त्याला अधिक चांगला धडा शिकता आला असता प्रोमेथिअसला जेव्हां शिळेला बांधण्यांत आलें त्यावेळीं त्याच्या नाजूक जखमांत

चोच खुपसली तीं गरुडानें नव्हे तर गिधाडानें !" लामारच्या त्या भाषणासंबंधानें एका तत्कालीन वर्णनांत लिहिलें आहे कीं लामारनें जेव्हां जेव्हां चवताळून 'गिधाड' हा शब्द उच्चारला तेव्हां लांब हात करून होअरकडे बोट दाखविलें.)

लामार हा सिनेटमध्यें एकदांच आला व तो पुन्हा निवडला जाणार नाहीं असें सर्वांनाच वाटलें, पण त्याच्या जागीं दुसऱ्या कुणाला पाठवायचें हा प्रश्न होता. लामारचें मिसिसिपीवर अत्यंत प्रेम असल्यानें मिसिसिपींत झालेल्या कडक टीकेमुळें तो फार खिन्न झाला. पत्नीला लिहिलेल्या पत्रांत तो म्हणतो, "सिनेट-मधील जागा सोडण्यानें कुटुंबाला अन्याय होणार नाहीं इतकी माझी आर्थिक परिस्थिति दुर्दैवानें चांगली नाहीं. तुझ्या खेरीज बाकीच्या जगाशीं माझा जो संबंध येतो तो अत्यंत दुःखदायी आहे....उत्तरेंतून माझ्या गौरवपर अनेक पत्रें येतात. दक्षिणेंतून थोडीं येतात. मीं दक्षिणेवर अनासक्तीनें प्रेम केलें. दक्षिणेचें हित कशांत आहे तें मीं काळजीपूर्वक तपासलें आणि दक्षिणेच्या हातून होणारी चूक टाळण्या-साठीं मी उघडया छातीनें लढलों. अशा माझाहि दक्षिणचे लोक धिक्कार करणार काय ? सार्वजनिक पुढाऱ्यानें न्याय्य भूमिका स्वीकारल्यामुळें त्याला आपल्या पाठीराख्यांचें प्रेम व विश्वास गमविण्याची पाळी यावी ही खरोखर असह्य अशी सुळावर चढविण्याची शिक्षाच आहे."

पण लुसिअस लामारचा चुलता टेक्सासचा मिराबो लामार आणि त्याच्या कुटुंबांतले इतर शूर पुरुष यांच्याप्रमाणें लुसिअर लामार हा सर्व बाजूंनीं संकटें कोसळलीं तरी डगमगणारा नव्हता. तो म्हणाला, "मी कायदेमंडळाच्या आदेशाचा अपमान केला हें मला कबूल आहे. पण अखेर लोक हेच सर्वसत्ताधारी असून मला आदेश देणाऱ्या कायदेमंडळाचे लोकच मालक आहेत. त्या लोकांनाच मी आतां आवाहन करतों." अशी घोषणा करून त्यानें मिसिसिपींत लागोपाठ दौरे काढले. अनेक सभागृहांत व खुल्या मैदानावर प्रचंड श्रोतृसमुदायापुढें त्यानें भाषणें केलीं, या सभांतून लामारनें प्रांजळपणें कबूली दिली कीं, "माझ्या मतदार-संघाला मीं नाराज केलें हें मला माहीत आहे. आणि ज्या प्रादेशिक हिताचा मीं आजवर कैवार घेतला त्या प्रादेशिक हिताच्या बाजूनें राहून लोकप्रियता टिकविणें हें आज मला सोपें होतें. पण आतां प्रादेशिक हिताचीं दडपणें न स्वीकारता राष्ट्रीय हिताच्या दृष्टीनें मतदान करून दक्षिण व उत्तर यांच्यामध्यें परस्पर विश्वास निर्माण करणें हें मला अधिक इष्ट वाटतें."

सर्व सभांना येणारे श्रोते त्याची हुर्यो करण्यासाठीं येत. पण तीन तीन, चार चार तास आवेशपूर्ण व प्रतिभासंपन्न भाषणें करून लामार सर्व श्रोत्यांना मंत्रमुग्ध करी. त्या भाषणांसंबंधानें पुढें अनेकांनीं लिहिलें आहे "लामार हा पर्वताच्या कड्यावरून कोसळणाऱ्या धवधव्याप्रमाणें बोले. अशा धबधब्यापुढें ज्याप्रमाणें हत्तीसारखे शिलाखंडहि वाहून जातात त्याप्रमाणें लामारला झालेला सारा विरोध वाहून जात आहे असें वाटे."

पण वादग्रस्त मुद्यांना बगल देऊन लोकांच्या भावनांना झोके देण्याचे डाव-पेच त्यानें आपल्या भाषणांत केले नाहींत. उलट त्याचीं भाषणें त्याच्या भूमिकेचा पांडित्ययुक्त खुलासा करणारीं असत. तो सिनेटच्या घटनेचा इतिहास सांगून सिनेटचा राज्यकायदेमंडळाशीं काय संबंध आहे तें समजाऊन सांगे. बर्क, कल्हाऊन, वेब्स्टर व इतर प्रसिद्ध सिनेटरांचीं निवेदनें व उदाहरणें लोकांपुढें मांडी. त्यांचाहि त्यांना निवडणाऱ्या कायदेमंडळाशीं कसा मतभेद झाला होता हें सांगून लामार म्हणे, "माझी न्यायबुद्धि आणि मतें यांचा केवळ लोकांच्या टाळ्या मिळवण्यासाठीं त्याग करण्यापेक्षा मीं ज्या थोर पुरुषांचे दाखले तुम्हांला दिले त्यांच्या उदाहरणाचें अनुकरण करणें बरें नव्हे काय ?"

प्रत्येक सभेंतल्या भाषणांत युद्धांत खरोखरच घडलेली एक घटना तो उदाहरणादाखल देत असे. शत्रूनें केलेली कोंडी फोडून सॅव्हाना बंदराकडे जायला निघालेल्या एका जहाजावर कॉन्फिडरेट सरकारचे लष्करी व मुलकी अधिकारी होते. त्यांत लामारहि होता. त्या बड्या अधिकाऱ्यांनीं आपसांत सल्लामसलत करून जहाज पुढें न्यावें असें ठरविलें. दरम्यान जहाजाच्या कप्तानानें बिली सुमर्स या खलाशाला बंदरांत फेडरल सरकारचीं जहाजें आहेत काय तें पाहाण्यासाठीं शिडाच्या शेंड्यावर पाठविलें होतें. तेथून त्याला बंदरांत दहा जहाजें दिसलीं असें तो म्हणाला. पण त्या बड्या ऑफिसरांच्या माहितीप्रमाणें फेडरल सरकारचें आरमार सॅव्हानांत नव्हतें व तें कोठें होतें तें त्यांना माहीत होतें. "म्हणून बिली सांगतो तें चूक आहे तुम्हीं जहाज पुढें न्या" असें त्या अधिकाऱ्यांनीं कप्तानाला फर्माविलें. पण कप्तानानें त्या अधिकाऱ्याचा आदेश ऐकण्याचें नाकारलें. तो म्हणाला, " तुम्हांला लष्करी बाबतींत माझ्यापेक्षा पुष्कळच अधिक माहिती आहे हें मी जाणतों, पण बिली सुमर्सनें शिडाच्या शेंड्यावरून अतिशय सामर्थ्यवान अशा दुर्बिणींतून पाहिलें असतां त्याला बंद-

रांत शत्रूचीं जहाजें दिसलीं. त्या बंदरांत आत्तां या वेळीं परिस्थिति काय आहे हें बिलीला तुमच्यापेक्षां अधिक माहित असण्याची शक्यताच अधिक आहे."

पुढें असें आढळून आलें कीं बिलीची माहितीच खरी होती. ती माहिती उपेक्षून जर तें जहाज पुढें हाकारलें गेलें असतें तर जहाज व त्यावरील लोक सारे पकडले गेले असते. हें उदाहरण सांगून लामार म्हणत असे, "बिली सुमर्स ज्याप्रमाणें त्या लष्करी अधिकाऱ्यांपेक्षा अधिक शहाणा नव्हता त्याप्रमाणें मीहि मिसिसिपी कायदेमंडळाहून अधिक शहाणा नाहीं. पण मी अमेरिकन सिनेटचा सदस्य असल्यानें माझ्या मतदारांचें हित कशांत आहे हें समजण्याची जास्तींत जास्त संधि मला आहे."

वरील कथा सांगून एका सभेंत लामार म्हणतो, "...अशा रीतीनें तुम्हीं मला वस्तुस्थिति पाहाण्यासाठीं शिडाच्या वरच्या टोकाला पाठविलें. तेथें उभा राहून मला काय दिसतें तें मी तुम्हांला सांगतों आहे. मीं खालीं उत्तरावें असें तुम्ही मला सांगत असाल तर मी मुळींच कुरकूर न करता तुमचा आदेश पाळतों. पण मला जें खरोखर तेथून दिसतें आहे त्याविषयीं मी तुम्हांला खोटें सांगणार नाहीं. जर तुम्ही मला परत सिनेटमध्यें जा म्हणत असाल तर मी तुम्हांला एवढेंच सांगतों की मी देशप्रेम, सत्य व परमेश्वर यांना स्मरून वागेन...माझें नेहमीच असें मत आहे कीं लोकांच्या सत्तेवर स्थापन झालेल्या लोकराज्यांतील सार्वजनिक पुढाऱ्याचें पहिलें कर्तव्य हें आहे की, त्यानें आपल्या मतदारापुढें आपलीं मतें स्पष्टपणें व कळकळीनें मांडावी. मिसिसिपीच्या जनतेचा मजवर विश्वास असावा ही गोष्ट मला फार मोलाची वाटते. पण मी कसें वागणें योग्य हें ठरवितांना लोकप्रियतेची कसोटी मी मानीत नाहीं. जनतेच्या मनाला मी अतिशय मान देतों. पण माझें असेंहि मत आहे कीं सदसद्विवेकबुद्धीस विचारून जेव्हां एकादा माणूस आपला मार्ग ठरवितो त्यावेळीं सामान्य निर्धाराच्या माणसालाहि केवढ्याहि कठिण प्रसंगास तोंड देण्याची शक्ति येते."

लामारचा हा दौरा अतिशय यशस्वी झाला. "त्याचें भाषण ऐकायलाहि तयार नसण्याइतके जे विरोधी होते असे लोक टेबलावर व बाकांवर उभे राहून लामारच्या अभिनंदनार्थ टोप्या उंचावूं लागत आणि घसा फुटेपर्यंत ओरडून जयजयकार करीत." इतर लोक लामारच्या भाषणावर चिंतन करीत शांतपणें घरीं जात. याझू कौंटींत लामारचे विरोधक फार मोठ्या संख्येनें होते. तेथें

झालेल्या भाषणासंबंधानें 'याझू सिटी हेरल्ड' हें पत्र लिहितें, "लामार येथें आला त्यावेळीं शिकाऱ्यांनीं कोंडलेल्या सिंहाच्या भूमिकेंत होता. पण आपल्या भाषणानें त्यानें शेकडों लोकांचे गैरसमज दूर केले. त्याचीं कांहीं विषयावरचीं मतें मिसिसिपीपेक्षां न्यूइंग्लंडच्या लोकांना अधिक पटणारीं आहेत असें याझू कौंटींतल्या लोकांना वाटे. पण हा गैरसमज लामारनें दूर केला." त्यानंतर थोड्या दिवसांनीं याझू डेमोक्रॅटिक कौंटी कन्व्हेन्शननें एक ठराव केला. त्यांत तेथल्या कायदेमंडळ प्रतिनिधींना आदेश दिला होता कीं, "त्यांनीं लामारला अमेरिकन सिनेटमध्यें निवडून द्यावें, तोच आमचा कायमचा प्रतिनिधि आहे, त्यालाच मदत करावी."

अखेर लामारच्या दौऱ्याचा हेतु सफल झाला. तीन वेळां मिसिसिपीच्या जनतेच्या इच्छेविरुद्ध तो वागला होता. चार्ल्स सुम्नरची लामारनें केलेली प्रशंसा मिसिसिपींत कांहीं लोकांना आवडली नव्हती, राष्ट्रपतिपदाचा रिपब्लिकन उमेदवार हायेस याला निवडून आणणाऱ्या इलेक्शन कमिशनला त्यानें पाठिंबा दिला होता आणि 'अनिर्बंध चांदी'चें बिल मिसिसिपीला पसंत असता लामारनें त्याला विरोध केला होता. पण या तिन्ही प्रसंगीच्या लामारच्या वर्तनाची गय करून मिसिसिपीनें अमेरिकन सिनेटमधील जागेसाठीं लामारला आपला पाठिंबा चालू ठेवला. त्यानें जी कळकळ व धैर्य दाखविलें होतें त्याबद्दल त्याची पाठ थोपटून लामारच्या उरलेल्या राजकीय आयुष्यांत मिसिसिपीनें लामारवर प्रेम केलें व त्याला आपला पाठिंबा पुन्हा दिला. प्रचण्ड मताधिक्यानें तो पुन्हा सिनेटमधील डेमोक्रॅटिक गटाचा अध्यक्ष झाला, पुढें तो गृहमंत्री झाला आणि शेवटीं अमेरिकेच्या सुप्रीम कोर्टाचा जज झाला. यादवीनंतर एकोणिसावें शतक संपेपर्यंतच्या काळांत दक्षिणेनें अमेरिकन राष्ट्राला दिलेल्या मुत्सद्यांत जास्तींत जास्त अलौकिक गुणांचा मुत्सद्दी असें त्याचें यथार्थतेनें वर्णन करण्यांत येतें. १८७८ मध्यें त्याच्यावर जे कठोर हल्ले झाले त्या वेळीं लामारनें आपली भूमिका पुढीलप्रमाणें मांडली होती.

"या राष्ट्राच्या सार्वजनिक पुढाऱ्यांनीं या साऱ्या राष्ट्राच्या भावी टिकाऊ हिताकडे व वैभवाकडे लक्ष देऊन खऱ्या अर्थानें आपल्या मतदारांचें प्रतिनिधित्व केलें पाहिजे. असें न करता मतदारांच्या हुकुमाची तामिली करणारे आपण हमाल आहों असें जर ते वागतील तर या राष्ट्राचें स्वातंत्र्य आणि त्याचे थोर हितसंबंध मुळींच सुरक्षित राहणार नाहींत."

# विभाग ४ था

## काल-स्थल-निर्देश

यापुढें ज्या दोन माणसांचीं चरित्रें सांगायचीं आहेत ते दोघेहि रिपब्लिकन व मध्य पश्चिम भागांतले होते. दोघेहि अतिशय प्रामाणिक होते. विसाव्या शतकाचा एकंदर सिनेटवर कोणता परिणाम झाला व विशेषत: राजकीय धैर्याबाबत वातावरण कसें होतें तें या दोघांच्या चरित्रावरून दिसून येतें. हे दोन पुरुष म्हणजे जॉर्ज नोरिस व रॉबर्ट टॅफ्ट हे होत. ते दोघे सिनेटमध्यें एकत्र असें १७ वर्षांपूर्वीं फार थोडा काळ होते. ते दोघेहि कायदेमंडळाच्या कामकाज पद्धतींत दर्दी होते. ते मूलत: परस्परविरोधी अशा गटांचे पुढारी होते. आपापल्यापरीं त्या दोघांनीं घटनाशास्त्रांतलीं मोठीं तत्त्वें प्रतिपादिलीं. त्यांच्या व इतर अशाच पुढाऱ्यांच्या थोरवीमुळें अमेरिकन सिनेटची इभ्रत व त्या सिनेटबद्दलचा लोकांचा आदर यांत बरीच मोठी वाढ झाली ही या अशा थोर पुरुषांचीं फार मोठी कामगिरी होय. कारण एकुणिसाव्या शतकाचा शेवट होऊन विसावें शतक जन्मास आलें त्या सुमारास बुद्धिमान व कर्तबगार लोकांना कीर्ति आणि सत्ता मिळविण्याचा उपाय राजकारण हा नसून उद्योगधंद्याचें क्षेत्र त्या दृष्टीनें आकर्षक होतें. म्हणून जनतेची राजकारणाबद्दलची वृत्ति सहानुभूतिशून्यतेची, बेफिकीरीची, अवमानाची व कांहींशी करमणुकीचीहि होती.

साऱ्याच राजकारणाची इभ्रत घटली तशी ती सिनेटचीहि घटली होती. कारण १९०० सालीं जे प्रतिनिधि निवडून आले त्यांत बड्या आर्थिक संघटनांचे वकील आणि क्षुद्र राजकीय म्होर्के यांचा विशेष भरणा होता. यादवीच्या पूर्वीच्या काळांत सिनेटमध्यें जो प्रक्षोभ होता, जें एक नाट्यमय वातावरण होतें तें १९००च्या सुमारास राहिलें नव्हतें. तसेंच जॉन्सन व ग्रँट हे राष्ट्रपति असतांना जी सत्ता व जी इभ्रत सिनेटला होती व जी तिनें अगदीं मुर्दाडपणें वापरली त्यांतलेहि आतां कांहींच राहिलें नव्हतें. याचें अंशत: कारण कायद्याचे विषय

फार आणि किचकट झाले होते. कल्हाऊन, क्ले, वेब्स्टर वगैरेंचीं नांवें जशीं घरोघर सर्वतोमुखीं असत तशीं आतां कोणा सिनेटरांचीं नांवें लोकांच्या तोंडीं नव्हतीं. १८५०च्या त्या महान तडजोडीच्या काळीं अथवा जॉन्सनच्या खटल्याच्या वेळीं लोक सिनेटमधील वादविवादाकडे काळजीपूर्वक लक्ष पुरवीत. पण आतां तेथल्या वादविवादांत लोकांना इतका रस उरला नव्हता. साठ सत्तर वर्षांपूर्वीं शाळेंतलीं तेजस्वी मुलें वेब्स्टरनें हायनेला दिलेलें प्रसिद्ध उत्तर पाठ करीत. पण आतां राजकारण हा व्यवसाय म्हणून कोणालाच नको झाला होता.

विसावें शतक सुरू झालें त्यावेळीं जे कांहीं नागरिक सिनेटमध्यें काय चालतें याकडे मुद्दाम लक्ष देत ते त्यांना सिनेटचा अभिमान वाटे म्हणून नव्हे तर सिनेटची भीति वाटे म्हणून. याचवेळीं साऱ्या देशभर सुधारक, समाजदोषनिवारक, सरकार सुधारण्याची चळवळ करणारे, असे खूप लोक पुढें आले. त्यांचे सिनेटमध्यें येणारे प्रतिनिधि ध्येयवादी, स्वतंत्र वृत्तीचे, कर्तबगार व विशेष मुत्सद्दीगिरी अंगीं असणारे असे होते. पूर्वीच्या कालखंडांत या लोकांना मोठी कीर्ति मिळाली असती. अलीकडे सिनेटरांना आपल्या मतदाराबद्दल व मतदारांना सिनेटराबद्दल जी अनास्था वाटूं लागली होती ती प्रवृत्ति थांबविण्यासाठीं या सुधारकांनीं सिनेटमध्यें व सिनेटबाहेर जोराची चळवळ केली, आणि फार दिवसांपासून निवडणूकयंत्रणेंत जी एक सुधारणा घडवून आणणें इष्ट झालें होतें ती सुधारणा त्यांनीं घडवून आणली. ती सुधारणा म्हणजे राज्यकायदेमंडळाचा सिनेटर निवडण्याचा अधिकार काढून घेऊन तो लोकांना देऊन टाकणें ही होय.

१९१३ सालीं राज्यघटनेची १७वी दुरुस्ती मंजूर झाली. १७८७ सालीं राज्यघटनेच्या निर्मात्यांना सामान्य जनतेबद्दल एक प्रकारचा अविश्वास वाटे. १९१३च्या घटनादुरुस्तीमुळें पुढाऱ्यांची जनतेबद्दलची ही अविश्वासाची वृत्ति साफ बदलली आहे असें दिसून आलें. पण त्याचबरोबर राज्यकायदेमंडळाबद्दल लोकांचा आदरहि बराच कमी झाला. कारण सिनेटर निवडण्याचा लोकांचा अधिकार बव्हंशीं कायदेमंडळाभोवतालचे खटपटच (लॉबीस्ट) आणि राजकीय संघटना यांनीं बळकावला असल्याचें लोकांच्या प्रत्ययास आलें. विल्यम लिऑन्स फेल्प्स हा एका रेल्वेशाखेचा अध्यक्ष होता. तो म्हणाला, "मला स्वतःला अमेरिकेचा सिनेटर होण्याची मुळींच इच्छा नाहीं. कारण मीं स्वतांच अनेकांना सिनेटर बनविलें आहे." फेल्प्सच्या याच उद्गाराचा उल्लेख करून डब्ल्यू. ई.

चॅन्डलर हा न्यू इंग्लंडचा सिनेटर संदिग्धपणें म्हणाला, "मी सिनेटमधून निवृत्त झालों याचें कारण हीच आगगाडी माझ्या अंगावरून गेली."

राज्यघटनेच्या सतराव्या दुरुस्तीनें सिनेटला तत्त्वत: व व्यवहारांत ताबडतोब अधिक लोकमतानुवर्ती केलें याबद्दल मुळींच संशय नाहीं. पण याचा परिणाम फार दूरवर पोचणारा झाला नाहीं. सिनेटचें स्वरूप व घटना सुधारकांना वाटली होती तेवढी बदलली नाहीं. पेन्सिल्व्हानियाचा सर्वप्रमुख पुढारी सिनेटर बॉइस पेनरोज एका सुधारक मित्राला म्हणाला.

"लोक ? मी त्यांना कधींच भीत नाहीं. मी कसा आहें ? कोणत्याहि राज्यकायदेमंडळानें मला सिनेटमध्यें निवडून दिलें नसतें. हॅरिसबर्गमध्येंहि मला कोणीं निवडलें नसतें. पण लोकांनीं, काय सांगूं तुला, माझ्या प्रिय लोकांनीं मला माझ्या विरोधकांपेक्षा पाच लक्ष अधिक मतें देऊन निवडून दिलें. तूं आणि तुझ्यासारख्या सिनेटरांची अशी कल्पना होती कीं प्रत्यक्ष निवडणुकीमुळें माझ्यासारखीं माणसें कायदेमंडळाबाहेर फेकलीं जातील. पण लोक माझ्या बाजूलाच आहेत. मला लोक आवडतात."

सिनेटरांच्या निवडणुकी प्रत्यक्ष पद्धतीनें होऊं लागल्यामुळें किती अधिक चांगल्या गुणाचे सिनेटर निवडून आले हे आकड्यांनीं अथवा शास्त्रीय पद्धतीनें कळण्याला कांहीं मार्ग नाहीं. सिनेट अथवा सिनेटर यांची एकांतिक निंदा व एकांतिक प्रशंसा अजून पुष्कळ होतेंच आहे. ही टीका पुष्कळदां कांहीं थोडींच उदाहरणें अथवा फक्त विशिष्ट प्रकारचे अनुभव यांवर आधारलेली असते. उदाहरणार्थ वुड्रो विल्सनला व्हर्साय तह आणि राष्ट्रसंघ या बाबतींत सिनेटनें थप्पड दिल्यानंतर न्यू जेरेसींतून त्यानेंच सिनेटवर निवडून यावें अशी सूचना त्याला करण्यांत आली. तेव्हां ती नाकारतांना विल्सन म्हणाला, "अमेरिकेबाहेर सिनेटला कवडीचीहि किंमत नाहीं. खुद्द अमेरिकेंत सिनेटबद्दल लोकांना अतिशय तिरस्कार वाटतो. गेल्या पन्नास वर्षांत सिनेटमध्यें एकादाहि चांगला विचार जन्माला आलेला नाहीं." १९२० सालीं विल्सनच्या या मताचे अनेक लोक होते आणि आजहि कांहीं लोकांचें सिनेटबद्दल हेंच मत असेल.

पण विल्सन ज्यावेळीं प्रोफेसर होता आणि राजकारणाचें वारें त्याच्या डोक्यांत शिरलें नव्हतें, त्यावेळीं अमेरिकन सिनेट हें जगांतील कोणत्याहि कायदेमंडळापेक्षा अधिक कर्तबगार व सामर्थ्यवान आहे असें त्याचें मत होतें. सिनेटचें

हें सामर्थ्य आणि सिनेटरामध्यें विशेष कर्तबगारी असण्याची गरज उत्पन्न होण्याचें अंशत: कारण म्हणजे फेडरल कायदेमंडळ राज्यांच्या प्रदेशाबाबत अधिकाधिक कायदे करूं लागलें हें होय. पण याहून अधिक मोठें कारण म्हणजे सिनेटचें सामर्थ्य परराष्ट्रधोरणाबाबत अधिकाधिक वाढूं लागलें हें होय. हें सामर्थ्य, अमेरिकेचा आंतरराष्ट्रीय दर्जा वाढत गेला, तसतसें अधिकाधिक वाढत गेलें. या सामर्थ्यामुळें विसाव्या शतकांत सिनेटचें महत्त्व प्रत्यक्ष परिणामाच्या दृष्टीनें इतकें वाढलें कीं, वेब्स्टर, क्ले आणि कल्हाऊन यांच्या वेळचें तेजस्वी वाटणारें पण गुलामगिरीबाबत वर्षोगणतीं निष्फळपणें वाद घालणारें सिनेट आजच्या सिनेटच्या मानानें अगदींच दुबळें व फिक्कें वाटतें.

१८५० सालीं अंतर्गत वादाळीमुळें धैर्यवान सिनेटरांची गरज होती तशीच आज आंतरराष्ट्रीय वादंगांत सापडलेल्या या अमेरिकन राष्ट्राला धैर्यवान सिनेटरांची गरज आहे. जॉर्ज नॉरिस वॉशिंग्टनला येण्यापूर्वीं शंभर वर्षे जॉन क्विन्सी अॅडॅम्सला आजची ही गरज पटली होती. पण आज अमेरिकन सिनेटमध्यें अमेरिकेच्या जागतिक स्थानामुळें जे अवघड प्रश्न व पुन्हापुन्हा पेचप्रसंग येत आहेत त्यांची जॉन क्विन्सी अॅडॅम्सला कल्पनाहि येणें शक्य नव्हतें. जॉर्ज नॉरिसला ज्या प्रश्नामुळें सदसद्विवेकबुद्धि व मतदारसंघ यांतलें काय निवडावें हा प्रश्न पडतो आणि बॉब टॅफ्टला तत्त्वें आणि लोकप्रियता यांतलें एकच कांहीं तरी पत्करलें पाहिजे अशी सक्ती होतें ते आजचे प्रश्न अगदीं नवे आहेत.

विसाव्या शतकांतल्या राजकीय धैर्याच्या कथा याच अथवा एवढ्याच आहेत असें नव्हे. कदाचित् या कथा सर्वश्रेष्ठ अथवा विशेष महत्त्वाच्याहि नसतील. पण सिनेट, त्याचे सभासद व तेथें चालणारें कामकाज यांत जो बदल होत आहे त्यामुळें लोकांत मान्यता नसलेल्या उच्च तत्त्वासाठीं स्वार्थत्याग करणाऱ्यांचीं स्फूर्तिदायक उदाहरणें हल्लीं कमी घडतात. कदाचित् आजहि अशीं कांहीं माणसें असतील कीं भावि इतिहासकाराला निर्विकार दृष्टीनें त्यांचेकडे पाहणें शक्य होऊन एकादे दिवशीं इतिहासांत नमूद करण्यासारखे राजकीय धैर्य त्यांच्या ठिकाणीं होतें हें तो दाखवून देईल. पण आपण आजकालच्या दृष्टीनें त्यांच्या इतके जवळ आहोंत कीं त्या थोर माणसांची थोरवी आम्हांला दिसूं शकत नाहीं. एडमंड रॉस अथवा थॉमस हार्ट बेंटन यांना एकएका मूलग्राही तत्त्वासाठीं ज्याप्रमाणें आपलें सारें भवितव्य धोक्यांत घालावें लागलें तसा

प्रसंग कदाचित् विसाव्या शतकांतील आजच्या सिनेटरावर येत नसावा. कदाचित् सॅम् हाऊस्टन व जॉन क्विन्सी ॲडम्स यांच्या धैर्यशील कृत्यांमुळें त्यांचें सर्व राजकीय भवितव्य चिरडून टाकण्याइतका जो लोकक्षोभ माजला, तितका लोकक्षोभ आजच्या धैर्यवंतांच्या कृत्यांमुळें माजत नसेल. पण आजच्या परिस्थितीसंबंधानें एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे की, डॅनियल वेब्स्टरचीं प्रसिद्ध आणि स्पष्ट अशीं वंडखोर भाषणें जितक्या मतदारांपर्यंत पोंहचलीं त्याच्या हजारपट मतदारांना एखाद्या वृत्तपत्रानें एखाद्या सिनेटराचा केलेला निषेध हल्लीं वाचायला मिळतो. अर्थात विसाव्या शतकांतील राजकीय धैर्याच्या कृत्यांमध्यें एक वैशिष्ट्यपूर्ण नाट्य असून त्यांच्यापासून उत्पन्न होणारा प्रक्षोभ आणि त्यांच्यापासून मिळणारी स्फूर्ति यांतहि वैशिष्ट्य आहे.

प्रकरण ८ वें

# जॉर्ज नोरिस

दुपारीं बरोबर १ वाजतां १९१० च्या हिवाळयांतल्या एका दिवशीं वॉशिंग्टन-मध्यें प्रतिनिधिगृहांत अध्यक्षपदावर असलेला पेन्सिल्व्हानियाचा प्रतिनिधि जॉन डॅल्झेल हा खुर्चीवरून खालीं उतरला आणि रोजच्याप्रमाणें सभागृहांतून बाहेर पडून कॅपिटॉल हॉटेलांत कॉफी घेण्यासाठीं निघाला. ही घटना रोज घडणारी असल्यानें तींत अस्वाभाविक कांहीं नव्हतें. सभागृहाचा कायमचा अध्यक्ष ज्यो कॅनन हा असून त्याचा पहिला असिस्टंट डॅल्झेल हा होता. तो बरोबर १ वाजतां रोज खुर्ची सोडून जात असे आणि त्याच्या जागीं आयोवाचा प्रतिनिधि वॉल्टर स्मिथ हा येत असे. पण जानेवारींतल्या त्या दिवशीं दुपारीं डॅल्झेल सभा-गृहांतल्या वाटेवरून चालला असता अगदीं साधा पोषाख घातलेला एक ओबड-धोबड दिसणारा प्रतिनिधि मोठी काळजीपूर्वक पाळत ठेवून चमत्कारिक रीतीनें समाधान मानीत होता. डॅल्झेल सभागृहाच्या दारापर्यंत पोंहचला असेल तोंच नेब्रास्काचा हा ओबडधोबड प्रतिनिधि जॉर्ज नोरिस त्यावेळीं सभागृहांत बसलेल्या वॉल्टर स्मिथ जवळ गेला व "मला दोन मिनिटें बोलण्याला परवानगी द्या" अशी त्यानें मागणी केली. वॉल्टर स्मिथ हा रिपब्लिकन पक्षाच्या सत्ताधारी अशा कॅनन-डॅल्झेल गटांतला होता, पण तो नोरिसचा वैय्यक्तिक मित्र होता. म्हणून स्मिथनें नोरिसला होकार दिला.

पण नोरीसनें मांडलेल्या सूचनेनें स्मिथ चकित झाला. त्यावेळीं सभागृहा-समोर बॅलिंजर-पिनशॉट कॉनझर्वेशन वादासंबंधानें एक संयुक्त चिकित्सा कमिटी बसवावी असा ठराव होता. नोरीसनें त्याला एक उपसूचना सुचविली. कमिटी नेमायची असल्यास कमिटीच्या सभासदांचीं नांवें सुचविण्याचा अधिकार अध्यक्षाला देण्याचा प्रघात आहे. पण त्याऐवजीं सर्वच प्रतिनिधिसभेला आपल्यांतले सदस्य समितीवर नेमण्याचा अधिकार असावा अशी उपसूचना नोरीसनें मांडली होती.

त्यामुळें सभेंत गडबड उडून कॅनन व डॅल्झेल यांच्या शोधार्थ चोपदार धावूं लागले. सभागृहाचा अध्यक्ष ज्यो कॅनन हा सभागृहाचा अगदीं "झार" होता ! त्याच्या अनियंत्रित सत्तेला नोरिसच्या उपसूचनेनें अगदीं पहिल्यांदा आज मर्यादा घालण्याचा प्रयत्न होत होता. नोरिस म्हणाला, "माझ्या उपसूचनेचा हेतु एवढाच आहे कीं, राज्यकारभाराच्या पांघरुणांत तपासणी गुंडाळली न जाता ती न्याय्य आणि खुली व्हावी." नोरिसला पिनशॉटच्या अनुयायांचा पाठिंबा मिळाला. रिपब्लिकनांतले बंडखोर आणि जवळजवळ सारे डेमोक्रॅट्स् नोरीसला मिळून १४९ विरुद्ध १४६ एवढ्या निमुळत्या बहुमतानें त्याची उपसूचना पास झाली.

अध्यक्ष ज्यो कॅनन याच्या प्रचंड सत्तेला हा पहिला मोठा फटका असून तो लक्षांत ठेवण्याचा त्यानें निर्धार केला. उलट जॉर्ज नोरिसला या तपासणीच्या ठरावावर मिळालेला विजय ही त्याच्या उद्दिष्टाची फक्त पहिली पायरी होती. भराभरा कसा तरी खरडलेला दुसरा एक ठराव त्याच्या झिरझिरीत कोटाच्या आंतल्या खिशांत होता. कित्येक वर्षांपूर्वी लिहून त्यानें तो ठेवून दिला होता. सभागृहाचे नियम ठरविण्याची कमिटी अध्यक्षानें न नेमता सभागृहानें नेमावी असा त्या ठरावाचा आशय होता. ही कमिटी प्रतिनिधिगृहाचा कार्यक्रम ठरवीत असे आणि त्या कमिटीवर सभापतीचें सर्वप्रभुत्व असे. नोरीसला ही पद्धत मोडून टाकावयाची होती.

१९१० मधल्या सेंट पॅट्रिकदिनीं नोरिस सभागृहामध्यें प्रतिनिधिसभेच्या "झार"ला उद्देशून बोलायला उठला. फक्त कांहीं मिनिटांपूर्वीं कॅननने असें रूलिंग दिलें होतें कीं, "एका सभासदानें शिरगणतीचें बिल जें आणलेलें होतें तें नियम-बाह्य समजावें. कारण घटनेअन्वयें शिरगणती घेण्याची तजवीज केली असल्यानें तेंच काम करण्यासाठीं या बिलाची गरज नाहीं." नोरिस म्हणाला, "अध्यक्ष महाराज, घटनेनें परवानगी दिलेला असा एक ठराव मी मांडतों आहें." "सभ्य-गृहस्थानें ठराव मांडावा," कॅननने उत्तर दिलें. आपल्यावर आतां मोठा हल्ला होणार आहे ही गोष्ट त्याच्या भाबड्या मनात त्यावेळीं आली नाहीं. जॉर्ज नोरिसनें आपल्या कोटाच्या खिशांतून तो फाटका कागद बाहेर काढला आणि कारकुनाला वाचायला सांगितलें.

रिपब्लिकन पुढारी मंडळांत वातावरण भीतिग्रस्त झालें. कपडे ठेवण्याच्या

खोलींत नोरिसच्या संकल्पित ठरावासंबंधानें कांहीं अफवा आधींच उठल्या होत्या. परंतु रिपब्लिकन सभासदांना त्यावेळीं तो एक तुच्छतापूर्वक विनोद करण्याचा विषय वाटला. रूल्स कमिटींतच त्या ठरावाला गाडून टाकण्याची शक्ति आपणांत आहे हें त्यांना माहित होतें. पण आतां कॅननें सेन्सस बिलावर जें रूलिंग दिलें होतें त्यामुळें नोरिस आणि त्याचा ठराव यांना कॅननवर हल्ला करायला वाव मिळालेला होता. नोरिसची सूचना राज्यघटनेंत प्रतिनिधिगृहाचे नियम ठरविण्याची जी व्यवस्था आहे तिला धरूनच होती. नोरिसला सर्व बंडखोर रिपब्लिकन व सर्व डेमोक्रॅट पक्षीय ह्यांची फौज कॅननविरुद्ध उभी करता आली. कॅनन आणि त्याचे सहकारी हे पार्लमेंटरी कारवाईंत दर्दी होते. नोरिसची मागणी एकदम मान्य करण्यास ते तयार नव्हते. त्यांनीं सभागृहास तहकुबी मागितली, मधली सुटी मागितली, कोरम अशक्य करण्याचा प्रयत्न केला. रिपब्लिकन पक्षाचे पुष्कळसे विश्वासू सभासद सेंट पॅट्रिक दिनाच्या परेडला गेले असल्यामुळें ते मतदानाला परत येईपर्यंत नोरिसचा ठराव नियमांत बसतो कीं नाहीं यावर त्यांनीं चर्चा चालविली. रिपब्लिकन पक्षाच्या बंडवाल्यांत जे लेचे-पेचे होते त्यांचा धीर खचावा म्हणून त्यांनीं सभागृहाचें काम सतत लांबवत ठेवलें. पण सर्व रात्रभर ते बंडखोर आपल्या जागीं बसून राहिले. आपण थोडीशी डुलकी घ्यायला गेलों तर कॅनन अकस्मात आपल्या गैरहजेरींत सर्वाधिकार गाजवील अशी त्यांना भीति वाटत होती. शेवटीं धमक्या व तडजोड याविषयींचे सर्व प्रयत्न फसले. सभापति कॅननें अपेक्षेप्रमाणें ठराव नियमबाह्य ठरविला. तेव्हां नोरिसनें सभापतीच्या रूलिंगवर ताबडतोब सभागृहाचें मत मागितलें. डेमोक्रॅट्स आणि बंडखोर रिपब्लिकन्स यांचा पाठिंबा नोरिसला मिळाल्यामुळें १८२ विरुद्ध १६० एवढ्या मतांनीं सभापतीचें रूलिंग सभागृहानें नामंजूर केलें. आणि याहूनहि अधिक मोठ्या मताधिक्क्यानें नोरिसचा मूळ ठराव सभागृहानें मंजूर केला. तेव्हां हुकुमशाही प्रवृत्तीच्या आणि निष्ठुर स्वभावाच्या त्या सभापतीनें सभापति-पदाचा राजीनामा दिला. पण नोरिसचा विरोध सभापतीला नसून त्याच्या हुकुमशाही सत्तेला होता. सभापतीची हुकुमशाही सत्ता रद्द करावी एवढें-च त्याला हवें होतें. त्याला सभापतीला शिक्षा करायची नव्हती. म्हणून नोरिसनें राजीनामा स्वीकारण्याच्या विरुद्ध मत दिलें. पुढें पुष्कळ वर्षांनीं कॅनन नोरिसला म्हणाला:

"नोरिस, आपल्या प्रखर वादविवादाच्या काळीं तूं मला अन्याय केलास असें एकहि उदाहरण मला देता येणार नाहीं. तुझ्या आणखी कितीतरी मित्रांसंबंधीं मात्र मी असें बोलूं शकणार नाहीं. आणि मी तुला असें सांगूं इच्छितों कीं, तुझ्या त्या नीच मित्रमंडळापैकीं कोणालाहि सिनेटला पाठवावयाचें असलें तर इतर कोणाहिपेक्षां मी तुला तेथें पाठवीन."

कॅननशाहीचा पाडाव अशा रीतीनें झाल्यामुळें सरकार आणि राष्ट्र यांच्या मानेभोंवतीं जी सनातनी रिपब्लिकन पुढाऱ्यांची पक्कड बसली होती ती ढिली झाली त्याबरोबरच नोरिसला त्यांच्याकडून ज्या कांहीं सवलती वगैरे मिळत त्याहि बंद झाल्या. कॅनन झारसारखें वर्तन करीत असल्यामुळें प्रतिनिधिगृहाच्या सभापतीची सत्ता केव्हां केव्हां एवढी वाढलेली दिसे कीं ती राष्ट्रपतीच्या आणि अमेरिकन सिनेटच्या सत्तेबरोबरीची आहे कीं काय असा भास होई. या सत्तेमुळें राजकीय पक्ष हा इतर कोणत्याहि बाबीपेक्षां अधिक महत्त्वाचा मानला जाई. पक्षांतील सभासदांनीं पक्षनिष्ठ राहिलें पाहिजे या दंडकावर ही सत्ता आधारलेली होती. अनेकांना पक्षनिष्ठेमुळें वैय्यक्तिक फायदे होत. पक्षाचें बळ वाढविण्यासाठीं राजकीय संघटनाहि केल्या जात. पूर्व प्रदेशाखेरीज इतर सर्वत्र रिपब्लिकन पक्षाच्या या सत्ताबाजीविरुद्ध लोकमत होतें. पण त्या सत्तेचा कित्येक वर्षें पाडाव होऊं शकत नव्हता. "पण" एक संपादक लिहितो, "दोनशें सभासदांनीं एकवट शक्तीनें बनविलेल्या सामर्थ्यशाली राजकीय यंत्राला कोणताहि विशेष दर्जा नसलेल्या एका सामान्य माणसानें त्यांचाच डाव त्यांच्यावर उलटवून मागें हटविलें आहे. जॉर्ज नोरिस असें त्याचें नांव असून हा माणूस समजून घेतला पाहिजे व त्याजवर नजर ठेवली पाहिजे."

× × ×

खरोखरच जॉर्ज नोरिस असा गृहस्थ ठरला कीं त्याचेवर लोकांचें लक्ष राहावेंच. कारण वर सांगितल्याप्रमाणें कॅननवर त्यानें विजय मिळविल्यानंतर लवकरच तो सिनेटमध्यें निवडून आला आणि तेथें अमेरिकन राजकारणांतील अत्यंत धैर्यवान पुरुष अशी कीर्ति त्याला मिळाली. कॅननच्या पराभवाबद्दल नेब्रास्कांतील थोडेसे रिपब्लिकन रुष्ट झाले तरी नेब्रास्कांत त्या घटनेचें चांगलें स्वागत झालें. पण नोरिससारख्या तरुणाला रिपब्लिकन पक्षाच्या या

सामर्थ्यवान पुढाऱ्याविरुद्ध हल्ला चढविण्यासाठीं मोठेंच धैर्य दाखवावें लागलें. कारण पक्षनिष्ठेच्या देखाव्यानें मिळणारीं सुखें व स्नेह यावर त्याला उदक सोडावें लागलें. पुढें सिनेटमध्यें गेल्यापासून तो आपल्या पक्षाशीं भांडला इतकेंच नव्हे तर आपल्या मतदारांच्या मताशींहि त्याचें भांडण झालें. "सदसद्विवेकबुद्धि गमावून विजयश्रीच्या रथांतून मिरवण्यापेक्षा सदसद्विवेकबुद्धि शाबूत ठेवून राजकीय दृष्ट्या मरून जाण्यांतहि मी आनंद मानीन" या शब्दांत नोरिसनें एकदां आपली तत्त्वनिष्ठा व्यक्त केली होती. नोरिस म्हणतो,

" देशांतील दोनहि पक्षांचा विश्वास गमावून म्हातारपणींहि जगत राहण्यापेक्षा आपल्या कर्तव्याचरणांत मी कधीं कचरलों नाहीं व माझ्या निष्ठेला मी चिकटून राहिलों असें माझ्याबद्दलचें स्मरण शत्रूंना व मित्रांना असेल अशा स्थितींत मी माझ्या थडग्यांत शांतपणें पडून राहणें हें अधिक पसंत करतों."

ध्येयवादी, स्वतंत्र वृत्तीचा, शूर, ठाम मतें असणारा, निर्भय धैर्याचा, कळकळीचा आणि प्रामाणिक अशा सिनेटर जॉर्ज नोरिस याचे हे शब्द आहेत. तो सर्वगुणसंपन्न, निर्दोष, आदर्श पुरुष होता अशी बतावणी येथें करण्याची जरूरी नाहीं. उलट पुष्कळदां विचारापेक्षा भावनेवर तो अधिक जोर देई, कुणाचाहि धिक्कार करतांना शिव्या अतीशय वापरी, आणि एकाद्या प्रश्नाच्या अंगभूत मुद्यावर हल्ला करण्याऐवजीं अतिरेकी वैयक्तिक हल्ले करण्याची प्रवृत्ति त्याच्या ठिकाणीं अधिक होती. पण त्याला जी गोष्ट न्याय्य वाटे तीपासून तो कोणत्याहि दडपणानें मागें हटत नसे. लोकांना नेहमीं साहाय्य करीत राहण्याचा त्याचा निर्धार होता आणि लोकांना युद्ध आणि दारिद्र्य या दोन संकटांपासून आपण वाचवूं अशी दुर्दम आशा तो कायमची बाळगून असे.

दारिद्र्य हें किती भयंकर आहे याचा त्याला त्याच्या बाल्यावस्थेपासून परिचय होता. जॉर्ज अवघा चार वर्षांचा असतांना त्याचा बाप वारला. त्याला दहा बहिणी व आई असून वयाला वीस वर्षें होण्यापूर्वींच ओहिओंतील शेतीवर त्याला या आपल्या कुटुंबाचा सांभाळ करावा लागला. त्याचा एक बराच मोठा भाऊ यादवींत वारला. जॉर्जला तो माहीतहि नव्हता. पण जखमी होऊन मरण्यापूर्वीं त्यानें एक पत्र लिहून ठेवलें होतें. जॉर्जनें तें पत्र जपून ठेवलें होतें. भावाचा जखमी होऊन मृत्यु व त्याचें तें पत्र यामुळें जॉर्जला युद्धाच्या भयानकतेची कल्पना चांगली आली होती. १९१७ सालीं अमेरिकन लोकांना युरोपीयन युद्धांत

सामील होण्याची खुमखुमी आली होती त्यावेळीं नोरिसला आपल्या मातेचें दुःख आणि तिचा युद्धविद्वेष यांचा विसर पडूं शकला नाहीं.

खेड्यांतील शिक्षक, लहान शहरांतील वकील, न्यायाधीश इत्यादि व्यवसाय करीत असतां, नेब्रास्काचे लोक व पश्चिम प्रदेश यांची तो ओळख करून घेत होता. खुल्या विस्तीर्ण शेतांना कुंपणें पडत आहेत, लोक घरादारांना मुकत आहेत आणि शेतीवरील कामगार शहरांत जाऊन तेथें बेकारींत भर घालीत आहेत हें त्याला दिसत होतें.

एकोणिसावें शतक अस्तास चाललें होतें व विसावें शतक उदय पावत होतें. यावेळीं अमेरिका बदलत होती. अमेरिकेचे धंदे व शहरें वाढत होतीं. अमेरिकेचें जगांतील वजनहि वाढत होतें. पण जॉर्ज नोरिस बदलला नाहीं, बदलावें अशी त्याची इच्छाच नव्हती. त्याच्या खडबडीत शरीरावर अजूनहि मळकट काळे कपडे तो चढवीत असे. पांढरे शर्ट व साधे टाय हेच तो आयुष्यभर घालीत राहिला. त्याची वागणूक अगदीं सौम्य होती, त्याचा प्रामाणिकपणा संशयातीत होता आणि राजकारणी लोकांच्या बैठकींत गप्पाष्टकास जाण्याचें टाळून तो संध्याकाळचे वेळीं शांतपणें वाचीत राही. यामुळें धंदेवाल्या मुत्सद्यापासून तो नेहमीं दूरच असे. पण त्या सर्वांपेक्षाहि नोरिसची लोकप्रियता नेहमींच जास्त राहिली.

पण त्याची राजकीय जीवनाची कारकीर्द सु होऊन वॉशिंग्टनमध्यें तो चाळीस वर्षे राहिला. त्या काळांत नोरिसचा राजकीय दृष्टिकोन मात्र बदलत गेला. १९०३ सालीं जेव्हां नेब्रास्काच्या मैदानांतून बाहेर पडून पहिल्यानेंच प्रतिनिधिगृहांत तो आला त्यावेळीं तो कट्टर सनातनी रिपब्लिकन होता. त्या काळांतील आपल्या परिस्थितीसंबंधानें नोरिस लिहितो, "मला माझ्या दर्जासंबंधानें विश्वास होता, माझीं मतें सयुक्तिक नव्हतीं, पण ठाम होतीं आणि माझा पक्ष व माझीं मतें यांविरुद्ध कांहींहि असो, त्यापुढें नमतें घ्यायचें नाहीं असा माझा निर्धार होता. पण एकामागून एक पुढाऱ्यावरील माझी श्रद्धा विरून जाऊं लागली....मला असें दिसून आलें कीं विरोधी पक्षावर मी ज्या ज्या दोषांचा आरोप करीत होतों ते सर्व दोष माझ्या पक्षाचे अंगीं होते."

जॉर्ज नोरिसनें धैर्यानें व स्वतंत्र बाण्यानें जे अनेक धडे दिले त्यांचा सर्व इतिहास एका प्रकरणांत देणें शक्यच नाहीं, वीजशक्ति जनतेला मिळवून

देण्याच्या क्षेत्रांत त्यानें जी कामगिरी केली ती बरीच टिकाऊ स्वरूपाची आहे. नेब्रास्का हा नोरिसचा मूळ प्रदेश. पण तेथून एक हजार मैल अंतरावर असलेल्या टेनेसी खोऱ्यांतील नागरिकांना त्यानें कमी किंमतींत वीज मिळवून देण्यासाठीं जो लढा दिला तो इतिहासांत अजोड आहे. त्याच्या जीवनांत त्यानें ज्यांत अतुल धैर्य दाखविलें असे त्याचे तीन लढे विशेष नमूद करण्यासारखे आहेत. प्रतिनिधिगृहाचा झार ज्यो कॅनन याची सत्ता त्यानें कशी उलथून पाडली हें वर सांगितलेंच. १९१७ सालीं 'सशस्त्र जहाज' बिलाला त्यानें जो निवळ आडमुठे-पणानें विरोध केला व १९२९ सालीं अल् स्मिथ याच्या राष्ट्रपतिपदाच्या उमेद-वारीस त्यानें जो पाठिंबा दिला हीं त्याचीं कृत्यें मोठ्या धैर्यशीलतेची द्योतक ठरलीं.

१९१७ च्या आरंभीं राष्ट्रपति वुड्रो विल्सन यानें मोठ्या दुःखानें सशस्त्र तटस्थतेचें धोरण स्वीकारलें आणि काँग्रेसच्या संयुक्त अधिवेशनांत त्यानें अमेरिके-च्या व्यापारी जहाजावर शस्त्रास्त्रें चढविण्याची मागणी केली. अमेरिकन जन-तेनें या मागणीस ताबडतोब पाठिंबा दिला. जर्मन कायसरनें अनियंत्रितपणें पाणवुड्यांचें युद्ध चालू केलें असून ब्रिटिश बेटांची कोंडी करावी व उपासमारीनें त्यांना शरण आणावें असें कैसरनें योजलें होतें. त्याप्रमाणें अमेरिकन परराष्ट्र-मंत्री लान्सिंग याला कैसरनें मोठ्या सभ्यपणें कळविलें कीं "युद्धाच्या क्षेत्रांत आलेलें प्रत्येक अमेरिकन जहाज टॉर्पेडो मारून बुडविण्यांत येईल." अमेरिकन जहाजें शोधलीं गेलीं, पकडलीं गेलीं व बुडविलीं गेलीं होतीं. अमेरिकन खला-शांना सोसाव्या लागणाऱ्या कथांनीं वृत्तपत्रांचे रकानेच्या रकाने भरून चालले होते.

सदर बिलावर वादविवाद चालू असतां वृत्तपत्रांना अमेरिकेविरुद्ध रचलेल्या एका कटाचा सुगावा लागला. मेक्सिकोंत जर्मनीचा जो वकील होता त्याला जर्मनीचा उपराष्ट्रमंत्री झिमर्मन याचेकडून एक संदेश गेला होता. त्या संदेशांत या कटाची बातमी होती. झिमर्मननें त्या वकीलाला एक पत्र पाठविलें होतें असें म्हणतात. ( हें पत्र खरें कीं खोटें ? अनेकांनीं ही शंका घेऊन याच वेळीं ब्रिटिश व अमेरिकन सरकारांनीं हें पत्र उघडकीला आणलें यांत त्यांचा कांहीं डाव आहे असें म्हटलें होतें. ) या पत्रांत मेक्सिको आणि जपान यांची अमेरिकेविरुद्ध संयुक्त आघाडी उभारावी अशी योजना होती. आणि अमेरिकेवर हल्ला चढविण्यासाठीं

मेक्सिकोचा उपयोग करण्याची परवानगी जर मेक्सिकोनें दिली तर सत्तर वर्षांपूर्वी सॅम हौस्टन यानें जिंकून घेतलेले मेक्सिकोचे प्रदेश परत मेक्सिकोला देण्यांत येतील असा सौदा जर्मनीनें केला आहे, इत्यादि स्वरूपाची ही कटाची बातमी होती.

झिमर्मनच्या गुप्त पत्रांतील ही बातमी वृत्तपत्रांना कळली तेव्हां 'सशस्त्र जहाज' बिलाला प्रतिनिधिगृहांत जो कांहीं विरोध होता तो ताबडतोब मावळला. प्रतिनिधिगृहानें ४९३ विरुद्ध १३ एवढ्या प्रचंड बहुमतानें हें बिल मंजूर केलें. राष्ट्रपतीच्या धोरणास जनतेचा जो संपूर्ण पाठिंबा होता त्याचें द्योतक असेंच प्रतिनिधिगृहाचें हें कृत्य होतें. नेब्रास्काच्या प्रतिनिधींनींहि त्या बिलास प्रचंड पाठिंबा देऊन नेब्रास्काची भावना व्यक्त केली होती.

पण २ मार्च १९१७ रोजीं सिनेटमध्यें 'सशस्त्र जहाज' बिलाला विस्कॉन्सिनचा ला फॉलिट व नेब्रास्काचा जॉर्ज नोरिस यांच्या नेतृत्वाखालीं दोन्ही बाजूंतल्या कांहीं थोड्या सिनेटरांनीं एकजुटीनें विरोध केला. नोरिस हा नेब्रास्काचा सिनेटर म्हणून नवा होता. त्यापूर्वींच्या वर्षी नेब्रास्कानें डेमोक्रॅटिक पक्षाच्या गव्हर्नराला, सिनेटराला व राष्ट्रपतीला निवडणुकींत पाठिंबा दिला होता. जॉर्ज नोरिसचें पुढारीपण त्याच्या प्रदेशांत अजून दृढमूल झालें नव्हतें व विल्सन आणि त्याचीं धोरणें यांना लोकांचा पाठिंबा आहे कीं नाहीं याची नोरिसला खात्री नव्हती.

पूर्वींच्या कांहीं महिन्यांत नोरिसनें राष्ट्रपतीला परराष्ट्रधोरणविषयक मुद्यावर पाठिंबा दिला होता. जर्मनीशीं असलेले राजनैतिक संबंध तोडणें हा एक मुद्दा त्यांत होता. नोरिस हा शांततावादाबद्दल अगदीं लढाऊ भूमिका घेणारा होता. अमेरिकेनें बाकीच्या जगाच्या व्यवहारापासून अलग राहावें असें तो मानणारा होता. तरीपण सर्वच आंतरराष्ट्रीय प्रश्नावर अडवणुकीचें धोरण अवलंबावें असा त्याचा स्वभाव नव्हता. राष्ट्रपतीची प्रत्येक विनंति क्षुद्र पक्षबाजीच्या भूमिकेवरून अमान्य करणारा तो नव्हता. ( खरोखर दुसरें महायुद्ध जवळ आलें त्या सुमारास त्याचा अलगवाद (आयसोलेशनिझम्) अगदींच संपुष्टांत आला होता. )

पण जॉर्ज नोरिस युद्धाचा फार द्वेष करी. बडे धंदेवाले युद्धाच्या दिशेनें जाण्याला अमेरिकेला प्रेरणा देत आहेत, बडे धंदेवाले राष्ट्राला निरुपयोगी अशा रक्तपातमय युद्धांत लोटीत आहेत, असें त्याला वाटे. नोरिसच्या मतें राष्ट्रपतीनें

लोकांना मुळींच विश्वासांत न घेता लोकांत घबराट वाढवून लोकांनीं सिनेटला युद्धनिर्णयाकडे रेटावें अशी खटपट चालविली आहे. 'सशस्त्र जहाज'बिल हें अमेरिकनांचे बळी देऊन दारूगोळा कारखानदारांचे नफे वांचविण्याचा मार्ग आहे असें नोरिस म्हणे. त्याला अशी भीति वाटली कीं जर्मनीचा अमेरिकेवर हल्ला होण्यापूर्वी अथवा काँग्रेसमध्यें अधिक वादविवाद न होता या 'सशस्त्र जहाज'बिलामुळें अमेरिका युद्धयमान राष्ट्र म्हणून या युद्धांत गोविली जाईल. त्या बिलानें सरकारला जे अफाट अधिकार दिले होते त्यांची नोरिसला भीति वाटली आणि काँग्रेसमधून तें बिल ज्या पद्धतीनें सर्व मतभेद दडपून टाकून ओढून काढलें जात होतें त्याबद्दल नोरिसला राग आला होता. नोरिसचें या प्रकरणाविषयीचें मत बरोबर होतें कीं चूक होतें हा मुद्दा आतां महत्वाचा नाहीं. आपल्या मताच्या सिद्धीसाठीं तो ज्या धैर्यानें वागला तें धैर्य आज विचारांत घ्यायचें आहे.

नोरिस एकदां म्हणाला, "लोकांना कदाचित खरें वाटणार नाहीं. पण मला खरोखरच युद्ध करणें आवडत नाहीं." १९१७ सालीं त्याला 'युद्ध करणें' आवडत असो कीं नसो, त्यानें आपल्या राजकीय आयुष्यांतला मोठ्यांत मोठा, कठिणांत कठिण व अत्यंत हाडवैराचा लढा देण्यासाठीं तयारी केली एवढें खास. नोरिसनें 'सशस्त्र जहाज' बिलाला उपसूचना आणली. ही विसावी उपसूचना होती. ४ मार्च रोजीं ६४ वी काँग्रेस बरखास्त होऊन नवीन राष्ट्रपतीची कारकीर्द सुरू व्हायची होती. सिनेटचें मतदान त्यापूर्वी झालें नाहीं तर बिल पास होणें टळत होतें. नवी काँग्रेस जी निवडली गेली होती ती "विलसननें अमेरिकेला युद्धाच्या बाहेर ठेवलें" याबद्दल विलसनचा जयघोष करणाऱ्यांची होती. म्हणून ही नवी काँग्रेस 'सशस्त्र जहाज' बिलाला विरोध करील अथवा निदान या बिलाचा अधिक काळजीपूर्वक विचार तरी करील अशी नोरिस व त्याचा लहानसा गट यांची अपेक्षा होती. पण पुढील दोन दिवसांत मतदान होऊं नये अशी तजवीज करावी कशी ? 'अडवणूक' (फिलिबस्टर) एवढा एकच उपाय येथें होता.

सिनेटमध्यें अशा प्रकारें अडवणूक करणें नोरिसला स्वतांलाच चीड आणणारें वाटे. सिनेटच्या नियमावलीचा अडवणुकीसाठीं उपयोग करता येऊं नये यासाठीं सिनेटचे नियम बदलावे असें स्वतां नोरिसचेंच मत होतें. पण युद्ध कीं शांतता, हाच प्रश्न वादांत पडून त्याला आवडणाऱ्या शांततेला धोका निर्माण झाला

तेव्हां त्यानेंच अडवणुकीच्या पद्धतीचा आश्रय केला. त्याच्या सिनेटमधील गटाचा तोच पुढारी होता. वादविदांत खंड पडूं नये व तें बिल कॉंग्रेस बरखास्त होईपर्यंत मतदानापर्यंत पोचूं नये यासाठीं त्यानें दीर्घकाल बोलणाऱ्यांची एक माळच लावून ठेवली.

नोरिसच्या सिनेटमधील कांहीं जिवलग मित्रांना सुद्धा त्याच्या या वर्तणुकीचा राग आला व आश्चर्य वाटलें. सर्व घटक राज्यांत जर्मनीविरोधी प्रक्षोभ जो माजत होता तो पाहून एक सिनेटर म्हणाला, "ज्या राज्यांत बायकी स्वभावाचींच माणसें असतील अशाच राज्याचे प्रतिनिधि नोरिसच्या धोरणाला पाठिंबा देतील. खुद्द नेब्रास्कानेंहि आपल्या तरुण सिनेटराची, नोरिसची भूमिका मान्य केली नाहीं. सिनेटमध्यें वादविवाद जोरांत आला असतां नेब्रास्काच्या वृत्तपत्रांनीं लिहिलें कीं प्रतिनिधिगृहांत बिलाला जो प्रचंड पाठिंबा मिळाला त्यांत नेब्रास्काच्या लोकांच्या भावनाच प्रगट झाल्या आहेत. यांत नोरिसला प्रच्छन्न इशाराच होता. नेब्रास्काच्या कायदेमंडळानें आधींच एकमतानें ठराव केला होता कीं "नेब्रास्का राज्यांतील कोणत्याहि पक्षाच्या, कोणत्याहि प्रदेशांत जन्मलेल्या प्रत्येक नागरिकाचा अमेरिकेच्या अध्यक्षाला, अमेरिकन नागरिकांचे हक्क, आपल्या राष्ट्राचा दर्जा, स्वाभिमान आणि निशाण यांच्या संरक्षणासाठीं जें जें करावें लागेल त्या सर्व बाबतींत, संपूर्ण पाठिंबा आहे."

पण नोरिस आपल्या सदसद्विवेकबुद्धीस कौल लावून वागणारा होता. नोरिस म्हणाला, "आपली सदसद्विवेकबुद्धि सोडून कॉंग्रेसचा प्रत्येक सभासद रोजच्या रोज व्यक्त होणाऱ्या लोकमतालाच जर मान देऊं लागला तर तो स्वतां एक स्वयंसंचालित यंत्रच बनतो. मग कॉंग्रेसमध्यें स्वदेशाभिमान, शिक्षण आणि धैर्य यांची गरज काय ?......" अशा रीतीनें आपल्या सदसद्विवेकबुद्धीच्या प्रेरणेसच आपला ध्रुवतारा बनवून नोरिस आपल्या लहानशा गटाचें धैर्य टिकविण्याकरितां, वादविवाद चालू राहावा म्हणून नवे वक्ते मिळविण्याकरिता आणि आपली अडवणूक थांबावी यासाठीं विरोधकांनीं अमलांत आणलेली प्रत्येक योजना हाणून पाडण्याकरिता अहोरात्र काम करूं लागला.

नोरिस पुढें आपली आठवण सांगतो, "पुष्कळ सिनेटर माझ्याकडे येत आणि पक्षशिस्त व राजकीय सोय यासाठीं आपण राष्ट्रपतीच्या भूमिकेस उचलून धरीत आहों पण तुमच्या अडवणुकीस यश यावें अशी आमची इच्छा आहे असें

मला सांगत. मी म्हणे, 'वक्त्यांची संख्या यावेळीं मला वेळ भरून काढण्यास पुरेशी मिळायला हवी, मग तीं मतें ते कांहींहि मांडोत.' हें ऐकून राष्ट्रपतीच्या बाजूचे दोन वक्ते माझ्याशीं करार करून विलाच्या बाजूनेंच पण दीर्घकाल बोलले."

रात्रदिवस वादविवाद चालू राहिला. ४ मार्च रोजीं सिनेटमध्यें सर्वजण थकले होते व सर्व अव्यवस्था माजली होती.

नोरिसनें या प्रसंगासंबंधानें पुढें लिहिलें आहे, "ते जुने क्षण स्मरणांत अगदीं ठळकपणें राहिले आहेत. त्या सभागृहांत माणसें भावनेचीं गुलाम झालीं. उभयपक्षीं संताप आणि तेढ माजून जे खटके उडाले त्याला माझ्या अंदाजानें अमेरिकन इतिहासांत जोड नाहीं. तासाचा काटा घड्याळांत मध्यान्हीवर आला तेव्हां सभापतीनें बैठक तहकूब झाल्याचें जाहीर केलें. अडवणूक विजयी झाली होती. अमेरिकन जहाजावर शस्त्रें ठेवण्यास अधिकार देणारा अहवाल सिनेटची मंजूरी मिळवूं शकला नाहीं...साऱ्या देशभर वातावरण अतिशय तापलें होतें. सिनेट-मध्यें हें तापमान फारच वाढलें होतें. त्या दिवसापासून आतांपर्यंत माझें असें मत झालें आहे कीं मीं अडवणुकीचें धोरण अवलंबिलें तें योग्यच होतें. त्याबा-बतींत मीं जें जें कांहीं केलें त्याबाबत मीं कधींच दिलगिरी व्यक्त केली नाहीं. आम्हांला प्रामाणिकपणें वाटलें कीं त्या झगड्यांतील आमच्या वर्तणुकीनें आम्हीं अमेरिकन युद्धांत सामील होण्याचें संकट टाळलें."

पण नोरिसचा हा विजय क्षणजीवी ठरला. कारण राष्ट्रपतीनें ताबडतोब काँग्रेसचें जादा आधिवेशन बोलावलें आणि सिनेटची चर्चा थांबविण्याचा नियम मंजूर करून घेतला. (नोरिसनें अर्थातच या नियमास पाठिंवा दिला.) शिवाय राष्ट्रपतीनें असेंहि जाहीर केलें कीं "आम्ही कायद्यांची अधिक बारकाईनें तपा-सणी केली असता आम्हांस असें आढळून आलें आहे कीं, काँग्रेसची परवानगी न घेता जहाजावर शस्त्रास्त्रें चढविण्याचा अधिकार राष्ट्रपतीला आहे." या बरोबरच "हट्टी माणसांच्या एका लहानशा गटानें, इतर कोणाच्याहि मताची पर्वा न करता केवळ स्वतःच्या मतानें, अमेरिकेच्या महान सरकारला हताश व जगाच्या दृष्टीनें तुच्छ करून सोडलें" असा राष्ट्रपतीनें नोरिसगटाला फटकाहि मारला.

सद्सद्विवेक बुद्धीस स्मरून जीं माणसें आपल्या बुद्धीस दिसलें तें आपलें कर्तव्य आचरण्याचा प्रयत्न करीत होती, त्यांच्यावर राष्ट्रपतीनें क्रूर आरोप करून त्यांच्यावर अन्याय केला असें मत नोरिसनें व्यक्त केलें. पण केवळ राष्ट्र-

पतीनेंच नोरिसगटाचा धिक्कार केला असें नव्हे; त्यांची प्रशंसा फक्त जर्मन पत्रांनींच केली व तीहि यांना दुर्दैवाचीच ठरली. पण अमेरिकेंत यांच्यावर एवढा सार्वत्रिक हल्ला झाला कीं त्या हल्ल्याच्या सार्वत्रिकतेला व कठोरपणाला अमेरिकन वृत्तपत्रांच्या इतिहासांत जोडच नाहीं. लुइसव्हाइलचें कोर्टिअरजर्नल यानें 'चिरंजीव तिरस्काराचें कृत्य' असें नोरिसगटाच्या वर्तनाचें वर्णन केलें. कार्नेजी हॉलमध्यें जमलेल्या एका सभेनें "नोरिसगटाचें कृत्य हें निंद्य व देशद्रोहात्मक असून आपल्या देशाच्या तारांकित निशाणाचें रक्षण करण्याचें यांनीं टाळलें." या शब्दांत नोरिसगटाचा धिक्कार केला. नोरिस ला फॉलेटी व त्यांचे पाठीराखे यांचीं नांवें जेव्हां उल्लेखिलीं जात तेव्हां 'देशद्रोही' 'यांना फाशी द्या' असे ओरडून श्रोते त्यांचा धिक्कार करीत. न्यूयॉर्कचा मेयर दुसऱ्या एका सभेंत म्हणाला, "अमेरिकन लोकांची दोन वर्गांत विभागणी करण्याची वेळ आतां आलेली असून अमेरिकन व देशद्रोही असे ते दोन वर्ग गणले पाहिजेत."

हार्ट फोर्डच्या क्यूरंट या पत्रानें 'राजकीय गुंड' असें नोरिसगटाचें वर्णन केलें. न्यू यॉर्कच्या सन या पत्रानें नोरिस प्रभृति बारा सिनेटर हे नीतिभ्रष्ट आहेत असें म्हटलें. प्रॉव्हिडेन्सच्या जर्नल या पत्रानें "यांचें कृत्य हें देशद्रोहापेक्षां फारसें कमी नाहीं" असें मत व्यक्त केलें. 'न्यूयॉर्क टाइम्स' म्हणतो "यांचा हेतु देशद्रोहाचा होता हा कलंक यांच्या नांवास कायमचा चिकटून राहील. न्यू यॉर्क हेरल्डनें भाकित केलें कीं "यांचीं नांवें बेनेडिक्ट अर्नोल्डच्या नांवाशीं जोडलीं गेलीं नाहींत तर हे लोक भाग्यवान म्हणावे लागतील."

आपल्या स्वतंत्र व स्पष्ट मतप्रदर्शनाबद्दल अपरिहार्यपणें निर्दय हल्ले होत असता ते सोसण्याची संवय नोरिसला पुढील दहा वर्षांत लागणार होती. सिनेटच्या सभागृहांतच त्याला 'बोल्शेव्हिक' म्हटलें जाणार होतें; प्रगतीचा वैरी, देशद्रोही व आणखी कितीतरी विशेषणें त्याला सोसावी लागणार होती. पण यावेळी त्याचें मन अजून हळवें होतें. त्याच्या मित्रांनीं सुद्धा त्याला जेव्हां निंदून त्याचा त्याग केला तेव्हां नोरिसला फार वाईट वाटलें. एके दिवशीं दुपारीं नोरिस व ला फॉलेटी हे एका ट्रॉली गाडींत जाऊन बसले तेव्हां त्याच्या संगतीं बसणें नको म्हणून सारे उतारू खालीं उतरले व ट्रॉली रिकामी झाली. त्याला येणारीं पत्रें शिव्यांनीं भरलेलीं असत. अनेक पत्रांत नोरिसचीं चित्रें असून त्याच्या अंगावर जर्मन गणवेष व खूपशीं पदकें त्यावर लावलेलीं दाखविण्यांत येत.

नेब्रास्काचीं वृत्तपत्रेंहि आपल्या नवीन सिनेटराला शिव्या देण्याच्या या सत्रांत सामील झालीं. ओमाहाच्या 'वर्ल्ड हेरल्ड' या पत्रानें पहिल्या पानावर "यादवीनंतर अमेरिकेवर आलेल्या मोठ्यांत मोठ्या संकटकाळीं सरकारला निष्क्रिय करून टाकणारे बारा सिनेटर" असें संबोधून त्यांचा नांवांची यादी दिली होती आणि टीका करतांना लिहिलें होतें, "नोरिसला असें वाटलें तरी कसें आणि शुद्धीवर असलेल्या दुसऱ्या कोणालाहि हें कसें पटेल कीं अशा अत्याचारापुढें अमेरिकन सरकार नेभळेपणें नमतें घेईल ?"

लिंकनच्या 'स्टार' या पत्रानें लिहिलें, "विल्सनच्या आधिपत्याखालीं अनियंत्रित राज्यसत्ता स्थापन होईल ही नोरिसची भीति भयंकर चुकीची आहे. कदाचित नोरिस विनोद करीत असावा. तसें नसेल तर नोरिसच्या मित्रांनीं त्याचा मेंदू एकदां तपासून घ्यावा." ओमाहा येथील 'बी' या पत्रानें लिहिलें कीं, "नोरिसला वाटणारी राष्ट्रपतीच्या अनियंत्रित सत्तेची भीति ही नोरिसच्या साध्या व्यवहारज्ञानशक्तीला शोभणारी नाहीं.

"नोरिसच्या सदसद्विवेकबुद्धीनें त्याचा राजकीय मृत्यु घडवून आणला" असें वॉशिंग्टनमध्यें लोकमत असल्याचें वॉशिंग्टनच्या एका वार्ताहरानें लिहिलें होतें. नेब्रास्काच्या कायदेमंडळानें अगदीं उतू जाणाऱ्या उत्साहांत एक ठराव मंजूर करून अध्यक्ष विल्सन व त्याचीं धोरणें यावर त्या राज्याचा संपूर्ण विश्वास असल्याची ग्वाही दिली.

"माझेच लोक इतक्या एकमतानें माझा धिक्कार करतात आणि मी त्या माझ्या राज्याचें मत चुकीचें मांडतों असें म्हणतात" याबद्दल नोरिसला फार खेद झाला. लोकप्रिय होण्यासाठीं योग्य असें वागावें असें त्याचें मत कधींच नव्हतें. "माझ्या अंतःकरणास जें लोकहिताचें आहे असें पटलें तें करण्याचा प्रयत्न मी करीत आलों....पण लोकांना जर मी त्यांचें प्रतिनिधित्व करावें असें वाटत नसेल तर मी माझ्या सिनेटमधील जागीं राहण्यास तयार नाहीं," असें ठरवून नोरिसनें एकदम आपला निश्चय जाहीर केला कीं "मी सिनेटमधील माझ्या जागेचा राजीनामा देतों, तुमचा हा उमेदवार तुम्हांला पुन्हा हवा कीं नको असें विचारून निवडणुकीस उभा राहतों. म्हणजे माझ्या मतदारांना मीं त्यांची बाजू वॉशिंग्टनमध्यें योग्य प्रकारें मांडली कीं अयोग्य प्रकारें मांडली हें जाहीरपणें सांगता येईल." नेब्रास्काचा गव्हर्नर व रिपब्लिकन पक्षाचा नेब्रास्कां-

तील अध्यक्ष यांना त्यानें पत्रें पाठविलीं त्यांत "माझ्या जागेची पुन्हा खास निवडणूक करा, त्या निवडणुकीचा निर्णय मी मान्य करीन आणि सिनेटरला परत बोलावता येऊं नये यासंबंधानें घटनेंत जीं संरक्षणबंधनें आहेत त्यांचा मी फायदा घेणार नाहीं," असें नोरिसनें त्या पत्रांत कळविलें.

नोरिसचा हा निश्चय ऐकून सिनेटमधील त्याच्या मित्रांना आश्चर्य वाटलें. लोकप्रक्षोभाची उसळलेली लाट आणि नोरिसच्या विरोधकांचा पैसा यामुळें नोरिसचा पराभव निश्चित होईल व 'युद्ध करा' अशी ही लोकांची आज्ञाच आहे असा याचा अर्थ केला जाईल अशी भीति नोरिसच्या मित्रांना व त्याला स्वत:लाहि वाटली. तरी पण, "मी सिनेटर ह्या नात्यानें केलेली कामगिरी जर लोकांच्या इच्छेविरुद्ध आहे, तर नेब्रास्काच्या लोकांचें सिनेटमध्यें प्रतिनिधित्व करण्यास आपण मुळींच तयार नाहीं," असें त्यानें गव्हर्नरला लिहिलेल्या पत्रांत कळविलें. सदर पत्रांत नोरिस लिहितो :

"माझा जो धि:कार झाला आहे त्यावरून मला असें दिसून येतें कीं, मी ज्या लोकांचें प्रतिनिधित्व करतों आहें त्यांना मी अवलंबत असलेला मार्ग मुळींच पसंत नसण्याचा दाट संभव आहे. म्हणून ही बाब त्यांच्या निर्णयावर सोपवावी हेंच मला न्याय्य वाटतें. अर्थात माझ्या मतदारसंघानें अगदीं एकजुटीनें मला आदेश दिला. तरी लोकांच्या त्या आदेशाप्रमाणें वागून युद्ध पुकारण्याचा काँग्रेसचा जो खास हक्क तो सोडून देणें व त्याप्रकारें सिनेटर या नात्यानें मीं घेतलेली शपथ मोडणें हें मी कधींहि मान्य करणार नाहीं......माझें हें वर्तन नेब्रास्काच्या जनतेच्या मताविरुद्ध असेल तर मला परत बोलावून दुसऱ्या कोणास तरी माझ्या जागीं निवडावें...पण मीं पत्करलेला मार्ग हाच न्यायाचा मार्ग आहे याबद्दल माझी इतकी खात्री झाली आहे कीं, जर या देशांतल्या बुद्धिमान व देशभक्त नागरिकांना या प्रश्नाच्या दोन्ही बाजू ऐकून घेण्याची एकदां संधि मिळेल तर जगांतील सर्व ख्रिस्ती राष्ट्रांत असलेला पैसा आणि पैशाच्या बळावर उभी करता येणारी राजकीय यंत्रणा ही आमच्या वाडवडिलांनीं रणांगणावर लढून राज्यसत्ता चालविण्याचें जें तत्त्व प्रस्थापित केलें त्याचा पराभव करूं शकणार नाहीं...मी जर चूक असलों तर मीं सेवानिवृत्त झालें पाहिजे इतकेंच नव्हे तर माझी इच्छाहि तशीच आहे. माझ्या सिनेटरपदाच्या कामांत मी वृत्तपत्रगटांचे आदेश पाळले पाहिजेत किंवा

अमेरिकेच्या राष्ट्रपतीचाहि रबरी शिक्का मीं झालें पाहिजे अशी अपेक्षा असेल तर मी सिनेटमधील माझ्या जागीं रहाण्यास तयार नाहीं."

सिनेटर नोरिस ह्यानें लिंकन येथें आपली भूमिका स्पष्ट करण्याकरितां एक सभा घेण्याचें जाहीर करून तो नेब्रास्कास परत आला. पण वृत्तपत्रांनीं त्याच्या या सभेच्या घोषणेची दखलहि घेतली नाहीं. रिपब्लिकन नॅशनल कमिटीचा एक सदस्य सभेला अध्यक्ष मिळावा असा त्यानें प्रयत्न केला. पण सदर सदस्यानें त्याला कळविलें कीं, "ही सभा दंगलीवांचून पार पडणार नाहीं. बहुधा सभा मोडेलच. किंवा श्रोतृसमुदाय तुला इतका विरुद्ध असेल कीं तुला सुसंगत भाषणच करता येणार नाहीं." नोरिसचे जे थोडेसे मित्र उरले होते त्यांतल्या एकानें नोरिसला भेटून आजारीपणाच्या सबबीवर सभा रद्द कर अशी विनंति केली. लोकमत इतकें प्रक्षुब्ध असता तूं नेब्रास्काला परत आलास हीच तूं चूक केलीस असें तो मित्र नोरिसला म्हणाला. सदर सभेंत दंगलबाज लोक मधून मधून पेरले जातील आणि ते नोरिसला आपली भूमिका मांडण्याचें अशक्य करून टाकतील असें भाकित इतर कांहीं लोकांनीं केलें. नोरिसनें अडवणुकीचें धोरण स्वीकारलें त्यानंतरच्या काळांत जर्मनीनें तीन अमेरिकन व्यापारी जहाजें टॉर्पेडोनें बुडविलीं, यामुळें तेथलें मतदार अधिकच प्रक्षुब्ध झाले आहेत असें या लोकांनीं नोरिसला सांगितलें. या प्रसंगासंबंधानें नोरिस आत्मचरित्रांत लिहितो, "माझ्या आयुष्यांत एकाकीपणाच्या निराशेचें दुःख मी त्या दिवशीं जेवढें भोगलें तेवढें इतर केव्हांहि भोगल्याचें मला आठवत नाहीं. माझ्या मित्रांनीं माझी खात्री करून दिली कीं नेब्रास्काचे लोक एकजुटीनें माझ्या विरुद्ध आहेत."

शेवटीं एकहि मित्र अथवा पाठिंबा-दाता सभेला अध्यक्ष म्हणून मिळाला नाहीं तरी पण सभा पार पाडायचीच असा त्याचा निश्चय झाला होता. त्याच्या हॉटेलमध्यें तो एकटाच होता. तेथें एकटाच एक वार्ताहर त्याला भेटायला आला असता नोरिस म्हणाला, "मीं स्वतः सभागृह भाड्यानें घेतलें आहे. ही सभा माझीच झाली पाहिजे. माझा अथवा माझ्या कार्याचा पुरस्कर्ता हो म्हणून मी कुणालाहि सांगणार नाहीं, पण मला कांहींहि परत घ्यायचें नाहीं अथवा कशाबद्दलहि दिलगिरी व्यक्त करायची नाहीं."

त्या दिवशींची रात्र वसंत ऋतूंतील रम्य रात्र होती ! नोरिस आपल्या हॉटेलांतून शहरांतल्या त्या सभास्थानीं आला. तेथें त्याला दिसून आलें कीं तेथें सुमारें तीन हजार श्रोते सभागृह व्यापून बसले होते. पुष्कळसे लोक खुर्च्यांच्या रांगांत उभे होते, कांहीं रस्त्यावरहि होते. कांहींना नोरिसबद्दलच्या आपुलकीनें चिंता वाटत होती, कांहीं संशयग्रस्त होते, कांहीं नुसतेच जिज्ञासू होते. शांतपणें पण कांहींसा कंपित होऊन तो लोकांच्या समोर व्यासपीठावर आला. कांहीं वेळ न बोलताच उभा राहिला. काळयाकुट्ट पोषाखांत एकटीच उभी असलेली ही साधी मूर्ति लोकांनीं पाहिली. नोरिस लिहितो : "श्रोते विरोधी असतील अशी माझी अपेक्षा होती, म्हणून भीतभीतच मी व्यासपीठार चढलों होतों. सभागृहाच्या मागील बाजूनें सभागृहांत शिरून मी जेव्हां व्यासपीठावर पाऊल टाकलें त्यावेळीं अगदीं स्मशानशांतता पसरली होती. एकहि टाळी पडली नाहीं. अर्थात टाळयांचा कडकडाट होईल अशी अपेक्षा मीं केलीच नव्हती. पण माझा धि:कार झाला नाहीं हें पाहून मला आनंद झाला."

आपल्या शांत घरगुती पण भावोत्कट पद्धतीनें त्यानें एक साधें वाक्य उच्चारलें. "मी सत्य सांगण्याला माझ्या प्रदेशांत आलों आहें."

"ताबडतोब श्रोतृसमुदायाच्या सर्व विभागांतून टाळयांचा कडकडाट ऐकूं आला. माझ्या आयुष्यांत या टाळयांनीं मला जेवढा धीर दिला तेवढा दुसऱ्या कोणत्याहि प्रसंगीं मिळाला नाहीं....सामान्य जनतेच्या मनांत एक गुप्त समजूत होती कीं, मीं लोकांना फसविलें, मीं लोकांचें योग्य प्रतिनिधित्व केलें नाहीं असा जो बोभाटा केला जातो त्यांत बराच कृत्रिमपणा होता. तसेंच राजकीय प्रभुत्व व वर्चस्व समाजावर अमक्याचें आहे असें जे दिसून येतें त्यांतहि बराचसा कृत्रिम मतप्रचार असतो."

सभेंत दंगल झाली नाहीं. त्याला कोणीं प्रश्न विचारून भंडावलें नाहीं. नोरिसनें आपल्या टीकाकारांना फडकावलें त्यावेळीं लोकांनीं खूप जोरांनीं टाळ्या वाजवून त्याचा गौरव केला. त्याची रूक्ष, साधी पण पुन्हा पुन्हा युक्तिवाद समजून सांगणारी भाषा आणि संताप आवरून बोलण्याची पद्धत यांनीं श्रोत्यांवर मोहिनी घातली. "वृत्तपत्रें सत्य सांगत नाहींत. तुझें अडवणुकीचें धोरण लोक विसरून जाईपर्यंत तूं लोकांसमोरून बाजूला जा असें मला सांगतात. पण माझें अडवणकीचें धोरण तुम्ही विसरूं नका," असें त्यानें श्रोत्यांना बजावलें. तो

म्हणाला "न्यूयॉर्कमधल्या ज्या श्रोत्यांनीं माझा धि:कार केला त्यांतल्या निम्म्याहून अधिक लोकांनीं संध्याकाळचे मजा करण्यासाठीं घालायचे पोषाख घातले होते. त्यांच्यापैकीं किती लोक स्वत: लढायला अथवा आपल्या मुलांना युद्धावर पाठवायला तयार होते ?"

नोरिस पुढें म्हणाला, "अर्थात कुलंगी कुत्र्यांचीं सैन्यें उभारता आलीं असतीं तर त्या श्रोत्यांनीं एक सबंध पलटण पुरवली असती—माझा एक सहकारी अडीच तास पर्यंत त्या बिलाच्या बाजूनें बोलला आणि वीर ठरला. मी दीड तास बिलाविरुद्ध बोललों आणि मला देशद्रोही म्हणूं लागले. जरी माझें धोरण चुकीचें आहे असें तुमचें म्हणणें असलें, जरी राष्ट्रपतीच्या बाजूला मीं रहावें असें तुमचें ठाम मत असलें तरी ज्या सिनेटमध्यें आम्हांला देशद्रोही म्हणून धनवंतांच्या शिव्या खाव्या न लागता आम्हांला अशा प्रश्नांची स्वतंत्र बुद्धीनें चर्चा करता यावी म्हणून पाठविण्यांत येतें त्या सिनेटमध्यें आम्ही आमची मतें बोलून दाखवूं नयेत अशी वेळ आली आहे काय ? देशद्रोही या एका आरोपाखेरीज दुसरा कोणता आरोप आपण माझ्यावर करतां बोला ? तो खोडून टाकण्याचा मी प्रयत्न करीन अथवा निर्भयपणें विषप्राशन करीन. पण इंग्रजी भाषेंत अथवा जगांतल्या दुसऱ्या कोणत्याहि भाषेंत देशद्रोही या शब्दाइतका दुसरा कोणताहि खोटा शब्द नाहीं."

एक तासपर्यंत श्रोत्यांच्या गर्दीनें तें भाषण ऐकलें. आणि मोठ्यानें गर्जना करून श्रोत्यांनीं नोरिसच्या भूमिकेबद्दल आपली पसंती दर्शविली. पण वृत्तपत्रांची खात्री इतक्या सहज होणार नव्हती. अथवा नोरिसला क्षमा करायला ते इतके सहज राजी नव्हते. 'वर्ल्ड हेरल्ड' या पत्रानें लिहिलें, "नोरिसनें मोठ्या चातुर्यानें व तपशीलानें आपल्या वर्तनाचा जो खुलासा केला तो सारा भाकड मूर्खपणा होता...त्याच्या त्या मूर्ख निवेदनानें लोक फक्त त्रस्त झाले." स्टेट जर्नल लिहितें, "वादाचा मुद्दा आहे तसा पुढें मांडून त्याला उत्तर देण्याचा सिनेटर नोरिसनें प्रयत्न केला नाहीं. त्यानें टीकाकारांच्या टीकामुळें बेताल होऊं नये."

वादग्रस्त मुद्यासंबंधानें खरोखर तुम्हांला काय वाटतें तें विचारण्यासाठीं अनेक गटांनीं सिनेटर नोरिसला बोलावलें. अशा सर्व ठिकाणीं त्याचा गौरवच झाला. गव्हर्नरनें जाहीर केलें कीं, नोरिसला परत बोलावून जादा निवडणूक करा असें मी कायदेमंडळाला सांगणार नाहीं. यामुळें नोरिस वॉशिंग्टनला परत गेला.

पण अजून त्याच्यावर जी टीका होत होती ती सहन करण्याची अधिक शक्ति आतां त्याच्या अंगीं आली होती.

× × ×

पुढील अकरा वर्षांत जॉर्ज नोरिसची कीर्ति आणि त्याचें राजकीय कर्तृत्व यांची खूपच वाढ झाली. १९२८ सालीं रिपब्लिकन पक्षाशीं व त्यांच्या कारभाराशीं त्याचे तीव्र मतभेद झाले. तरीहि त्या पक्षांत एक प्रमुख सभासद म्हणून त्याचा दर्जा कायम राहिला. सिनेटच्या ज्युडिशिअरी कमिटीचा तो अध्यक्ष झाला आणि राष्ट्रपतिपदासाठीं तो संभवनीय उमेदवार आहे असेंहि बोललें जाऊं लागलें. पण या अफवेचा त्यानें स्वतःच इन्कार केला. "मला राष्ट्रपतिपदाची उमेदवारी मिळेल अशी मला मुळींच अपेक्षा नाहीं. राजकीय जीवनांत मी ज्या मार्गानें गेलों आहे त्या मार्गानें जाणाऱ्या माणसाला राष्ट्रपतिपद मिळत नसतें. माझ्यासारखीं मतें धारण करणाऱ्याला राष्ट्रपतिपदाचा उमेदवार म्हणून नियोजित केलें जाणार नाहीं, हें मला पूर्णपणें माहीत आहे."

हर्बर्ट हूवर याला रिपब्लिकन पक्षातर्फे राष्ट्रपतिपदाची उमेदवारी देण्यांत आली होती. त्याच्याबरोबर त्याच्या उपाध्यक्षपदाची उमेदवारी नोरिसला देण्यांत आली. पण ती त्यानें साफसाफ नाकारली. रिपब्लिकन कन्व्हेन्शननें आपले उमेदवार ज्या पद्धतीनें ठरविले त्या पद्धतीचा त्यानें धिःकार केला. त्यावेळीं, म्हणजे टेनेसी व्हॅली ॲथॉरिटी स्थापन होण्यापूर्वीं विजेची शक्ति ही सरकारी मालकीची असली पाहिजे असें मत नोरिस मांडत असे. वीजशक्तीच्या हक्कदार गटानें रिपब्लिकन पक्षांत हुकुमशाही सत्ता मिळवून हूवरला उमेदवारी आपल्या हुकमतीनें दिली असा आरोप नोरिसनें केला.

डेमोक्रॅटिक पक्षाला त्यानें विरोध केला असल्यामुळें त्या बाजूस जाण्यास तो तयार नव्हता. डेमोक्रॅटिक पक्षहि दुबळा आहे असें त्याचें मत होतें. म्हणून पक्षातीत अशा प्रगतिपर मित्रांना एकत्र आणण्यासाठीं त्यानें देशभर दौरा काढला. पण डेमोक्रॅटिक पक्षाचा उमेदवार न्यूयॉर्कचा अल् स्मिथ याची निवडणूक मोहिमेंतील निवेदनें नोरिसच्या मताशीं जुळतीं आहेत असें दिसून येऊं लागलें. यामुळें त्याच्यापुढें त्याचा आयुष्यांतला जास्तींत जास्त कठीण असा राजकीय प्रश्न येऊन उभा राहिला.

जॉर्ज नोरिस हा रिपब्लिकन होता. तो मध्य-पश्चिम प्रदेशांतला असून धर्मपंथानें प्रॉटेस्टंट व दारूबंदीवाला होता. हर्बर्ट हूवरची हीच सर्व भूमिका होती. अल् स्मिथ हा कॅथॉलिक असून दारूबंदी रद्द करावी अशा मताचा होता. यामुळें नोरिसचें व त्याचें कांहीं जमण्यासारखें नव्हतें. नेब्रास्का राज्य रिपब्लिकन असल्यामुळें अल् स्मिथला तेथें पाठिंबा मिळणें शक्य नव्हतें. अशा स्थितींत नोरिसनें आपला पक्ष, आपला प्रदेश आणि आपला मतदारसंघ सोडावा काय, असा प्रश्न त्याचे पुढें उभा राहिला.

'होय' असें उत्तर नोरिसनें या प्रश्नास दिलें. त्याचें नेहमींच असें मत होतें कीं. "पक्षसदस्यावर पक्षशिस्त पाळण्याची सक्तीची जबाबदारी नसावी. पक्षांतहि वैयक्तिक जबाबदारीचें तत्त्व स्वीकारलें जावें. एकादा माणूस माझ्याप्रमाणें अगदीं ठाम रिपब्लिकन असेल, पण माझीं मतें त्याला मान्य नसतील तर त्यानें आपल्या मताप्रमाणें वागावें व माझ्या विरुद्ध खुशाल मतदान करावें."

नोरिसच्या या नेहमींच्या मतानुसार १९२८ च्या राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीसंबंधानें नोरिसनें पुढील निवेदन जाहीर केलें. तो म्हणाला, "जे प्रगतिवादी आहेत त्यांना स्मिथच्या छावणीखेरीज कोठेंहि जाण्यास जागा नाहीं.... स्मिथ हा एकटाच असा पुढारी आहे कीं वीजशक्तीच्या हक्कदार गटाच्या पकडींतून देशाला सोडवील. स्मिथच्या मागें जाण्यांतच देशहित आहे...त्याचें अनुयायित्व पत्करून देशहित साधण्याऐवजीं पक्ष हाच राष्ट्रापेक्षां श्रेष्ठ अशी भूमिका आपण घ्यावी काय ?...आपण गेलीं किती तरी वर्षें ज्या तत्त्वासाठीं झगडतों आहों, त्यांना जो माणूस विरुद्ध आहे हें आपणास आधींपासून माहीत आहे त्याला पाठिंबा देण्यासाठीं आपण सद्सद्विवेकबुद्धीस चिरडून टाकावें हें मला मुळींच मान्य नाहीं."

पण नोरिस ज्या स्मिथमागून जाऊं पहात होता त्या स्मिथची धार्मिक मतें काय होतीं ? मद्यपानासंबंधानें तो अनुकूल होता; त्यावर नोरिसचें काय म्हणणें होतें ?

नोरिस सांगतो, "सार्वजनिक जीवनांत एकादा पुढारी आपल्या राजकीय भूमिकेपासून आपलीं धार्मिक मतें अलग ठेवूं शकेल···मी प्रॉटेस्टंट व मद्यपानविरोधी आहे. पण जो माणूस कायदा जसा असेल तशी त्याची कठोर बजावणी झाली पाहिजे असें म्हणणारा असेल आणि आर्थिक प्रश्नांत अचूक धोरण अवलंब-

णारा असेल तो माणूस मद्यपानास विरोधी नसला आणि कॅथॉलिक असला तरी मी त्याला पाठिंबा देईन. जे मुत्सद्दी आपण मद्यपानविरोधी असल्याचा टेंभा मिरवतात पण स्वत: चोरट्या दारूभट्ट्या चालविणाऱ्यापेक्षा अधिक प्रयत्न मद्यबंदीविरोधी कायद्याची बजावणी करण्यासाठीं करीत नाहींत अशा मुत्सद्यांना पाठिंबा देण्यापेक्षा जो मद्यपानास अनुकूल आहे पण आपल्या जीवनांत प्रगतिपर व धैर्यवान आहे अशा माणसावर मी अधिक विश्वास ठेवीन."

नोरिसचे हे विचार मोठे धैर्याचे होते. पण त्याचा मतदारसंघ त्याच्यावर इतका संतापला होता कीं त्यानें नोरिसचे हे विचार कधींच समजून घेतले नाहींत. ओमाहाला त्याचें स्मिथला पाठिंबा देण्यासाठीं रेडिओवर भाषण व्हायचें होतें. त्यासाठीं त्याची आगगाडी नेब्रास्का राज्यांतून ओमाहाला चालली असता नोरिसचें कांहीं दीर्घकालीन मित्र व रिपब्लिकन पुढारी त्याच्या गाडींत चढले आणि त्याचा पक्ष व त्याची सारी राजकीय कारकीर्द यांचा विचार करून नोरिसनें स्मिथला पाठिंबा देण्याचा विचार सोडून द्यावा अशी त्यांनीं नोरिसला विनंति केली. नेब्रास्कांतील 'अॅन्टी सलून लीग' (मद्यपानविरोधी संघ) ही संघटना फार सामर्थ्यवान होती. तिचा अध्यक्ष पूर्वी नोरिसला पाठिंबा देणाऱ्यापैकीं होता. त्यानें नोरिसचा वीजशक्तीचा मुद्दा हा अर्थशून्य आहे असें मत व्यक्त केलें. तो म्हणाला, "या निवडणूकमोहिमेंत खरा मुद्दा 'मद्यपान कीं मद्यबंदी ?' हा आहे. नोरिसला हें माहित आहे. स्मिथ मद्यपानाला अनुकूल आहे हेंहि नोरिस जाणतो. असें असतांहि आपल्या भाषणांत नोरिस स्मिथला पाठिंबा देईल तर 'अँटीसलून लीग' नोरिसच्या बाजूस राहणार नाहीं." (नोरिसविरुद्ध अशीं जीं निवेदनें प्रसिद्ध होत होतीं तीं त्याच्या नजरेस आणून त्याला कोणीतरी विचारलें कीं "हीं निवेदनें पाहिल्यावरहि १९३० च्या निवडणुकीस पुन: उभे राहाल का ?" नोरिस म्हणाला, "अशीं निवेदनें वाचून मला त्या निवडणुकीस अवश्य उभें राहावें अशी प्रेरणा वाटेल.") ओमाहांतील मोठ्यांत मोठ्या बॅप्टिस्ट चर्चच्या धर्मगुरूनें नोरिसला कळविलें कीं "तूं आमचा मुळींच प्रतिनिधि नाहींस. सरकारसंबंधानें तुझी जी भूमिका आहे तिची आम्हांला शरम वाटते." नोरिसनें त्या धर्मगुरूला शांतपणें उत्तर दिलें कीं "तुमच्या भावाच्या डोळ्यांत गेलेली सळी तुम्हांला नीट दिसावी यासाठीं तुमच्या डोळ्यांत गेलेलें तुळकट आधी काढून टाकण्याची तसदी घ्याल काय ?"

जुने रिपब्लिकन पुढारी नोरिस हा रिपब्लिकन नव्हे असें नेहमीं खाजगी-रीतीनें म्हणत असत, आतां ते उघड उघड तसें बोलूं लागले. नोरिसनें यावेळीं हें जें अकस्मात पक्षान्तर केलें होतें त्यामुळें नोरिसचे जिवलग मित्रहि निराश झाले. नेब्रास्कांतील एक लहान धंदेवाला म्हणाला, "मीं नोरिसला वीस वर्षें पाठिंबा दिला आहे पण पुन्हा देणार नाहीं. तो मनानें कचखाऊ झाला असून राजकीय दृष्टीचा त्याचे ठिकाणीं विकृति आली आहे. थिओडोर रूझवेल्टनंतरच्या प्रत्येक रिपब्लिकन सरकारशीं नोरिसनें वैर उभारलें आहे. दारूबंदीला अनुकूल असणाऱ्याला आपल्याच हातांनीं मदत करावी अशी नोरिसची अपेक्षा आहे काय ? आपल्या चहात्यांच्या अकलेबद्दल नोरिसनें याहून अधिक आदर दाखवावा." नोरिसचा कॉंग्रेसमधील पहिला चिटणीस वार्ताहरांना म्हणाला, "ताम्हनी हॉलच्या (मद्यपानास ताम्हनी हॉल हें नांव फार अनुकूल होतें.) इसमास राष्ट्रपतिपदाच्या उमेदवारीसाठीं नोरिसनें पाठिंबा देणें हें अगदी असमर्थनीय असून मला मुळींच मंजूर नाहीं."

रिपब्लिकन कन्व्हेन्शनमध्यें नोरिसला राष्ट्रपतिपदाच्या उमेदवारीसाठीं पाठिंबा देणाऱ्या एका प्रतिनिधीनें वृत्तपत्रांना सागितलें कीं "मी माझी सद्सद्विवेकबुद्धि कांहीं नोरिसच्या बंडीच्या खिशांत ठेवली नाहीं. त्यानें यावेळीं जी भूमिका घेतली आहे तीमुळें मला फार दुःख होत आहे. नोरिसनें आतां नवे मित्र शोधावे. न्यूयॉर्कच्या रस्त्याच्या कडेनें भटकणारे लोक हेच आपले मित्र असें जर त्याला वाटत असेल तर त्याचा हा बहुमान त्याचा त्याला लखलाभ असो. पण निवडून येण्यापुरतें रिपब्लिकन पक्षाचें वाहन त्यानें वापरावें आणि मग त्या पक्षाची ती मुख्य तत्त्वनिष्ठा (दारूबंदी) तिचा त्याग करावा हें खरोखर दुर्दैव होय."

वॉलथिल 'टाइम्स'च्या संपादकानें लिहिलें, "नोरिसची माझी मैत्री कायमची तुटली. असें म्हणतांना दुःख होतें, पण इलाज नाहीं. राजकीय दृष्ट्या नोरिसच्या प्रगतिप्रिय मित्रापासून तो फारच दूर गेला आहे."

नोरिसच्या गटाचा मित्र असणारा लिंकनचा एक वकील म्हणाला, "ज्याची राजकीय तर्कशक्ति सामान्य आहे अशा एकाद्या भुकेल्या शेतकऱ्यानें अथवा तहानेल्या दारुड्यानें नोरिससारखीं भूमिका घ्यावी हें समजूं शकतें. पण नोरिससारख्या कर्तबगार अनुभवी माणसानें अशी भूमिका घ्यावी हें मुळींच समर्थनीय नाहीं."

पण भुकेलया शेतकऱ्याला मदत करण्याचें धोरण अवलंबतांना तहानेल्या दारुड्याला मदत करण्यासहि नोरिस तयार झाला. त्याला करण्यांत आलेलीं आवाहनें व त्याजवर करण्यांत आलेले हल्ले यांपैकीं कशाचीहि पर्वा न करता त्यानें ओमाहा येथें स्मिथला जोरदार पाठिंबा देणारें भाषण केलें. "न्यूयॉर्कचा गव्हर्नर स्मिथ हा ताम्हानीचे आदेश मोडून पलीकडे गेला आहे, पण रिपब्लिकन कन्व्हेन्शननें जे मार्ग अवलंबले आहेत त्यामुळें ताम्हानी हॉल हाच पांढऱ्या झग्यां-तला साधु बनलेला दिसतो आहे. माझ्या पक्षाच्या विरोधी उमेदवाराला पाठिंबा देतांना मी फार वड्या लोकांच्या पावलावर पाऊल टाकून चाललों आहे. कारण दहा वर्षांपूर्वी हर्बट हूव्हरनेंहि असेंच वर्तन केलें होतें" पण त्याच्या भाषणाचा बहुतेक भाग वीजशक्तीबाबत हक्कदारी गाजविणाऱ्या गटाविरुद्ध हल्ला करणारा होता. "हा हक्कदार गट म्हणजे अनेक बारीक बारीक शोषक नांग्या असणारा ऑक्टोपस असून प्रत्येक कुटुंबाची तो पिळणूक करतो. पण हूव्हर या प्रश्नांचीच चर्चा करण्याचें नाकारतो. जेथें आपण विरोध करायला पाहिजे तेथें मौन धारण करणें हें पाप असून त्यामुळें माणसें केवळ भेकड होतात."

भाषण संपवितांना नोरिसनें धार्मिक आक्षेपाला पुढीलप्रमाणें उत्तर दिलें. नोरिस म्हणाला, "असहिष्णुता हें अमेरिकाविरोधी तत्त्व आहे तें आपण सोडलें पाहिजे. ज्यांनीं असहिष्णुतेची ही दिवटी पेटविली आहे त्यांचा आपण धिक्कार केला पाहिजे. राजकारणांत धर्मकारणाचा संबंध काय ? कोणत्याहि धर्माच्या अथवा धर्मपंथाच्या लोकांनीं एकत्र येऊन आपल्या लोकांना जास्तींत जास्त सुख मिळावें यासाठी राजकीय कार्यांत एकोप्यानें प्रगति करावी."

पण १९२८ सालीं नेब्रास्काचे लोक सहिष्णुतेचा सिद्धांत ऐकायला अथवा नोरिसनें उपस्थित केलेल्या मुद्यांची चर्चा करायला तयार नव्हते. एका कॅथॉ-लिकाला व मद्यपानास अनुकूल असणाऱ्याला नोरिस पाठिंबा देतो याबद्दल त्याज-वर हल्ला करणाऱ्या शेकडों तारा त्याला आल्या. नंतरच्या काळीं नोरिस आपली आठवण सांगतांना म्हणतो, "ओमाहा येथें स्मिथला पाठिंबा देणारें भाषण मीं केल्यानंतर एवढें भयंकर वादळ माझ्याविरुद्ध उठलें कीं तेवढ्या वादळाला तोंड देण्याचा प्रसंग माझ्या आयुष्यांत पूर्वीं अथवा नंतर कधींच आला नाहीं. शिव्यां-च्या बाबतींत मला बरीच सवय झाली होती ही त्यांतल्या त्यांत बरी गोष्ट होती." वृत्तपत्रें सांगतात कीं यावेळीं नोरिसची बायकोहि त्याच्यावर उलटली.

आपण स्मिथलाहि मत देणार नाहीं व हूव्हरलाहि देणार नाहीं असें ती म्हणाली. "या सर्व बाबतींत मी जॉर्जची अनुयायी नाहीं...आणि जॉर्जनें जरी स्मिथच्या बाजूनें मत दिलें असलें तरी मी देणार नाहीं." ओमाहाच्या 'वर्ल्ड हेरल्ड' या डेमोक्रॅटिक पत्रानें पूर्वी नोरिसनें वुड्रो विल्सनला विरोध केला असतां नोरिसवर हल्ला केला होता. त्यानें यावेळीं नोरिसच्या "उमद्या धैर्यासाठीं व तत्त्वनिष्ठेसाठीं त्याचा गौरव केला. पण नेब्रास्का राज्यांतील इतर सर्व पत्रांनीं "नोरिसनें आपल्या नेब्रास्का प्रदेशाबद्दलची निष्ठा सोडली आणि चार वर्षांनीं होणाऱ्या राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकींत ताम्हानी हॉलचा पाठिंबा मिळवून आपल्या त्यावेळच्या यशाचा संभव नोरिस वाढवीत आहे" असा आरोप केला. नोरिसच्या ओमाहाच्या भाषणानें नोरिसच्या लिबरल रिपब्लिकन सहकाऱ्यालाहि पुन्हा निवडून येणें कठिण झालें आणि नोरिसच्या बाजूनें असणाऱ्या बंडखोर रिपब्लिकनांनींहि नोरिसच्या धोरणाचा निषेध केला. ज्यावेळीं सिनेटर नोरिस त्याच्या गांवीं आला त्यावेळीं त्याचे मित्र आणि गांवांतील इतर ठळक माणसें त्याच्यापासून दूर दूर जातात असें त्याला आढळून आलें. "जणूं कांहीं माझें काळीज कापून काढून त्यांना तें कुंपणावर लावून ठेवायचें आहे म्हणजे इतरांना तो इशारा मिळेल असें त्यांना वाटत असावें."

नेब्रास्कांतील सर्व लहानमोठ्या गांवांतून हूव्हरला धूमधडाक पाठिंबा मिळाला तसाच तो सर्व देशभरहि मिळत गेला. यामुळें नोरिस फार चिडला. "खरे प्रश्न विजेची शक्ति आणि शेतकऱ्यांना साहाय्य हे असतां धर्म आणि दारूबंदी हे खोटे प्रश्न उभे करून हूव्हरनें निवडणूक जिंकली" असा आरोप नोरिसनें हूव्हरवर केला. "हूव्हरच्या बाजूस असलेले खास हितसंबंधी गट आणि त्याची राजकीय यंत्रणा यांनीं हे मुद्दे खोटे, दुष्ट आणि अन्याय्य आहेत हें माहीत असूनहि तेच लोकांपुढें मांडून लोकांना फसविलें."

× × ×

'सशस्त्र जहाज' बिलाविरुद्ध दहा वर्षांपूर्वीं नोरिसनें जें अडवणुकीचें धोरण अवलंबलें होतें तें त्यावेळीं नजिकच्या व दूरच्या अशा दोन्ही भवितव्याबाबत फसलें. तें बिल राष्ट्रपति विल्सन यानें ताबडतोब मंजूर करून घेतलें आणि अमेरिकेला युद्धांत पडावें लागू नये अशी नोरिसची इच्छा असतां कांहीं आठवड्यांतच अमेरिका युद्धांत सामील झाली. तसेंच यावेळीं अल् स्मिथ याच्या

बाजूनें नोरिसनें काढलेली मोहीमहि सपशेल फसली. पण तरीहि पुढें कांहीं वर्षांनीं सिनेटर नोरिस एका मित्राला म्हणाला,

"माणूस एकादी गोष्ट प्रयत्नानें करूं पाहतों पण फसतोहि. त्यामुळें तो नाउमेद होतो. पण कांहीं वर्षांनीं त्याला कळून येतें कीं आपण प्रयत्न केला म्हणूनच पुढें कोणींतरी तोच प्रयत्न पुन्हा करून यश मिळवितो. माझें खरोखर असें मत आहे कीं प्रगतिपर सुधारणेला मीं जर कांहीं साहाय्य केलें असेल तर ज्यांत मीं यश मिळविलें त्या प्रयत्नांनीं नव्हे तर ज्यांत मीं अपयश मिळविलें त्या प्रयत्नांनीं मीं प्रगतीस साहाय्य केलें आहे." नोरिस प्रतिनिधिपदावर सुमारें पन्नास वर्षे होता. या काळांत त्याला यश व अपयश पुष्कळ मिळालें. नोरिसचें व्यक्तित्व, व त्याची कारकीर्द यांचें सार काय याचें उत्तर १९३२ च्या सेप्टेंबरांत त्या वेळच्या राष्ट्रपतिपदांसाठीं नेमल्या गेलेल्या डेमोक्रॅटिक उमेदवारानें (फ्रँकलिन रूझवेल्टनें) पुढील शब्दांत सांगितलें आहे. इतिहास विचारतो, "त्या माणसांत प्रामाणिकपणा होता का ? तो निस्वार्थी होता का ? त्याच्या अंगीं धैर्य होतें का ? त्याच्या वर्तनांत सुसंगति होती का ? या चार प्रश्नाबावत 'होय' असें ठाम उत्तर ज्यांचे बद्दल देता येईल असे नोरिससारखे मुत्सद्दी थोडेच सापडतील."

प्रकरण ९ वें

# रॉबर्ट ए. टॅफ्ट

मरहूम सिनेटर रॉबर्ट ए. टॅफ्ट हा अमेरिकेचा राष्ट्रपति कधीं झाला नाहीं, यांतच त्याच्या जीवनाची वैय्यक्तिक दुःखकथा असून त्याची राष्ट्रीय थोरवीहि त्यांतच आहे.

कारण सिनेटमध्यें असतांच्या सर्व काळांत राष्ट्रपति होण्याच्या महत्त्वाकांक्षेसाठीं रॉबर्ट टॅफ्टनें सतत प्रयत्न केले. टॅफ्टचा बाप राष्ट्रपति झाला होता तसेंच त्यालाहि व्हायचें होतें. दहा वर्षांहून अधिक काळ रिपब्लिकन पक्षाच्या तत्त्वावलीचा टॅफ्टनें इतका निकरानें पुरस्कार केला होता कीं त्याला 'मि. रिपब्लिकन' असें नामाभिधान मिळालें होतें. पण तीनदां निकराचा प्रयत्न करून सुद्धां टॅफ्टला रिपब्लिकन पक्षानें राष्ट्रपतिपदाची उमेदवारीहि दिली नाहीं.

पण राष्ट्रपतिपदाची आकांक्षा एवढेंच टॅफ्टचें वैशिष्ट्य नव्हतें. त्याची ज्या मूलग्राही तत्त्वावर श्रद्धा असे त्या तत्त्वांना तो चिकटून राहत असे. आणि ज्यावेळीं तीं मूलग्राही तत्त्वें वादाचा विषय होत त्या वेळीं राष्ट्रपतिपदाचा मोह त्या तत्त्वासाठीं तो दूर सारी इतकेंच नव्हे तर आपणाला उमेदवारी मिळण्याआड तीं तत्त्वें येत असलीं तरी त्या तत्त्वांची कास तो सोडीत नसे. टॅफ्ट हा कर्तबगार मुत्सद्दी होता. पण अनेकदां त्यानें अशा भूमिकांचें समर्थन केलें कीं टॅफ्टसारखींच महत्त्वाकांक्षा असणाऱ्या कोणीहि मुत्सद्यानें त्या भूमिकांचें समर्थन केलें नसतें. टॅफ्ट हा स्वतः मोठा मुरब्बी मुत्सद्दी असल्यानें त्याला हें माहित होतें कीं, आपल्या राजकीय तत्त्वज्ञानाची मूलभूत भूमिका मान्य असणारे मतदार हे कायमचे अल्पसंख्यच राहणार आणि असे मतदार ज्या ज्या गटांत असतील त्या त्या गटांना न दुखविता नव्या गटांच्या खुशामतीनें नवा पाठिंबा मिळवूनच आपणाला राष्ट्रपतिपद मिळविण्याचें ध्येय साधता येईल. पण या

दूरदृष्टीअनुसार जो संयम पाळायला हवा असें त्याला वाटे तो संयम तो स्वतःच अनेकदां झुगारून देई; कोणत्याहि गटापुढें मान झुकवायला तो तयार नसे आणि कोणत्याहि मुद्यावर मौन ठेवायलाहि तयार नसे.

जॉन क्विन्सी ॲडॅम्सला सिनेटमधील आपल्या सर्व कारकीर्दींत तत्त्वासाठीं नेहमीं लोकप्रियता सोडावी लागली तशी पाळी टॅफ्टवर आली नाहीं हें खरें. आपला सुसंगत प्रामाणिकपणा कायम ठेवण्यासाठीं त्याला थॉमस हार्ट बेंटन-प्रमाणें सतत लढावें लागलें नाहीं. त्याच्या तत्त्वानुसार तो जे निर्णय ठरवी त्यांना त्याचे पुष्कळसे मतदार व राजकीय सहकारी यांचा पाठिंबा मिळे. पुष्कळदां त्याचें राजकीय वर्तन त्याच्या राजकीय महत्त्वाकांक्षेस उपकारक असेंच असे. तरी पण लोकप्रियता ही त्याच्या मूलभूत सिद्धांतांच्या प्रतिपादनाबाबत नियामक नसे. कामगारकारखानदार संबंधाविषयीचा जो कायदा टॅफ्ट-हार्टले तडजोडीनें झाला त्यानें ओहिओसारख्या औद्योगिक प्रदेशांत टॅफ्टला अधिक मतें मिळणार नव्हतीं. कारण त्या कायद्यानें कामगारसंघटनांवर घातलेलीं बंधनें ज्यांना मान्य होतीं ते टॅफ्टचे अनुयायी पूर्वींच होते. पण ओहिओंतील कामगारसंघटनांचा त्या बंधनांना निकराचा विरोध होता. यामुळें १९५०च्या सिनेटच्या निवडणुकींत टॅफ्टला निकराचा विरोध झाला आणि त्यामुळेंच १९५२च्या राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकींत त्याला यश येणार नाहीं असा समज पोसला जाऊन तें एक १९५२ सालीं टॅफ्टला उमेदवारी न मिळण्याला कारण झालें. त्याचबरोबर शिक्षण, घरबांधणी, आरोग्य व इतर लोककल्याणयोजनांबाबत टॅफ्ट जीं मतें मांडूं लागला त्यामुळें टॅफ्ट-हार्टले तडजोडीला पाठिंबा देणारेहि टॅफ्टचे शत्रु बनूं लागले.

याबाबत टॅफ्टनें मांडलेलीं मतें ऐकून जे चकित झाले त्यांना टॅफ्ट हा रिपब्लिकन पक्षाची मतप्रणालि सोडतो आहे असें वाटलें. पण त्यांच्या लक्षांत एक गोष्ट आली नाहीं कीं, टॅफ्टच्या सनातनीपणांत व्यावहारिक दूरदृष्टीचाहि मोठा अंश होता. म्हणून खाजगी धंद्यांच्या ज्या प्रदेशांत खाजगी धंद्यांकडून लोकसेवा पुरेशी केली जात नाहीं तेथें फेडरल सरकारनें लोकहिताच्या योजना हातीं घेतल्या पाहिजेत असें तो म्हणे. यांत आपण आपल्या सनातनी तत्त्वांविरुद्ध वागतों आहों असें त्याला कधीं वाटलें नाहीं. कारण सनातनीपणा म्हणजे बेज-बाबदारी नव्हे असें तो म्हणे. सनातनीपणाच्या तत्त्वज्ञानाला त्यानें नवे अंकुर फोडले. या तत्त्वाची इभ्रत आणि शक्ति अगदीं रसातळास पोचली होती त्या वेळींहि

त्यानें त्या तत्त्वाचा त्याग केला नाहीं, आणि नंतर आपल्या नवीन दृष्टीनें त्या तत्त्वाला टॅफ्टनें जबाबदारीचा दर्जा व मान्यता मिळवून दिली. तो मामुली पुढाऱ्याहून वेगळया प्रकारचा होता. कारण वक्तृत्व आणि त्यासाठीं शब्दांची निवड या संबंधीची कला त्याचेजवळ मुळींच नव्हती. पक्षाच्या आदेशाप्रमाणें ( तो आदेश दिला नसेल तर ) डोळे मिळून चालावे—इतकी त्याची पक्षनिष्ठा आंधळी नव्हती. आणि वादग्रस्त मुद्दे व भूमिका टाळाव्या ही जी राजकीय मुत्सद्यांची उपजत बुद्धि ती त्याच्या ठिकाणीं कधींच नव्हती.

पण त्याचें 'मि. रिपब्लिकन' असें जरी नामाभिधान पडलें होतें तरी तो रिपब्लिकन पक्षाचा मुत्सद्दी नव्हता. तो किती तरी अधिक होता. त्याचें टॅफ्ट घराण्यांतला पुरुष म्हणून कांहीं वैशिष्टय होतें. 'मि. रिपब्लिकन' या नामाभिधानापेक्षा 'मि. प्रामाणिक' हें नांव, त्याला अधिक शोभण्यासारखें होतें. सिनेटर रॉबर्ट टॅफ्टचा आजा अल्फान्सो टॅफ्ट हा १८३० सालीं वकीली करण्यासाठीं पश्चिम प्रदेशांत गेला. आपण पश्चिम प्रदेशांत जाण्याचें कां ठरविलें हें सांगतांना अल्फान्सो टॅफ्ट आपल्या बापाला लिहितो, "न्यूयार्कमध्यें बहुसंख्य लोकांत जो भयंकर स्वार्थसाधूपणा व अप्रामाणिकपणा बोकाळलेला तुम्हांला दिसतो तें माझ्या मतें न्यूयॉर्कमध्यें व्यवसायधंदा करीत राहण्याच्या मार्गांत मोठेंच विघ्न आहे." सिनेटर रॉबर्ट टॅफ्टचा बाप विल्यम हॉवर्ड टॅफ्ट हा राष्ट्रपति झाला होता. तो त्या अधिकारावर असतां जेव्हां पिन्शॉट, थिओडोर रूझवेल्ट आणि त्याच्याच पक्षांतले इतर प्रगतिपर गट यांच्या प्रचंड शक्तीविरुद्ध आपला गृहमंत्री बॅलिंजर याच्या बाजूस ठामपणें उभा राहिला तेव्हां धैर्य म्हणजे काय व राजकीय अन्याय म्हणजे काय याचा त्याला चांगला अनुभव आला होता.

अशा प्रकारें, बॉब टॅफ्टचा चरित्रकार लिहितो त्याप्रमाणें बॉब टॅफ्टचा जन्म 'प्रामाणिक' पणाच्या पोटींच झाला होता. तो केलेला करार मोडत नाहीं अशी त्याची सिनेटमध्यें ख्याति होती. रिपब्लिकन तत्त्वावर त्याची दृढ भावनात्मक निष्ठा असून त्याबद्दल तो कधींहि तडजोड करीत नसे. राजकारणांत फसवाफसवीचें त्याला अगदीं वावडें होतें. सिनेटर टॅफ्ट मेला तेव्हां त्याचा कट्टा राजकीय शत्रु हॅरि ट्रुमन म्हणाला, "टॅफ्टचें व माझें सार्वजनिक कामांतलें धोरण कधीं जमलें नाहीं. पण आम्ही दोघे कोणत्या भूमिकेवर आहों हें आम्हां एकमेकांना माहीत होतें. सिनेटर ट्रॅफ्टसारखे बौद्धिक दृष्टया

प्रामाणिक असणारे लोक आम्हांला हवे आहेत." टॅफ्टच्या फटकळ स्वभावाचीं उदाहरणें अनंत असून सगळीं चकित करणारीं आहेत. ओहिओंतील रिपब्लिकन पक्षाच्या शेतीमुलुखाच्या केंद्रांत शेतकऱ्यांच्या तोंडावर टॅफ्ट म्हणाला, "तुमचा शेतीमाल फार महाग आहे आणि तुम्ही सदा 'कॅडिलॅक' गाड्या वापरून चैन करतां ती पाहून पाहून मला कंटाळा आला आहे." "फेडरल सरकारनें घरें बांधण्याचा कार्यक्रम स्वीकारावा" असें टॅफ्टचें मत ऐकून त्याचा एक सहकारी म्हणाला, "सोशॅलिस्टांनीं याला खाऊन टाकलेलें दिसतें." टॅफ्टच्या एका राजकीय मित्राला टॅफ्टच्या सहीचें एक शिफारसपत्र हवें होतें. त्याला टॅफ्ट म्हणाला "माझा असिस्टंट रोज कितीतरी शिफारसपत्रें देतो, मी तीं पहातहि नाहीं आणि मला सही करायला तो असिस्टंट सांगतहि नाहीं" टॅफ्टचा एक सहकारी आठवण सांगतो, "आपल्या मित्रांच्या सूचना टॅफ्ट नाकारतो तो सौम्य अप्रत्यक्ष शब्दांत नव्हे तर निर्विकारपणें व निःसंकोचपणें 'अर्थशून्य सूचना' असें म्हणून नाकारतो. विल्यम एस. व्हाइटनें लिहिलें आहे "त्याच्या हेतूंत एक चमकदार प्रांजळपणा होता. ज्या सिनेटमधील सभासदांचा प्रांजळपणा हा मुळींच विशेष गुण नव्हता तेथें टॅफ्टचे ते फटकळ बोल ऐकले कीं श्रोत्यांना ताजेतवानें झाल्यासारखें वाटे."

वरील वर्णनावरून सिनेटर टॅफ्ट हा वैयक्तिकसंबंधांत निःस्नेह आणि अचानक वृत्तीचा होता असें अनुमान कोणीं काढलें तर तें मात्र चूक ठरेल. मीं सिनेटमध्यें कांहीं काळ व त्याच्या मरणापूर्वीं सिनेट लेबर कमिटीमध्यें कांहीं महिने त्याच्या बरोबर काम केलें आहे. त्या अनुभवावरून माझ्या मनांत टॅफ्टची जी आठवण आहे ती असाधारण प्रेमळपणाची आहे. त्याचें वागणें इतकें साधें व सहज असे कीं त्याच्याशीं मनांतून भांडायला गेलेला माणूस भांडायचें विसरून जात असे. या सर्व सद्गुणाबरोबरच त्याच्या अंगीं दुर्दम धैर्यहि होतें. त्यानें तें धैर्य सर्व जन्मभर, विशेषतः मरणापूर्वीच्या दिवसांत इतकें पुष्कळ दाखविलें कीं त्याच्या अनुयायांची त्याच्या ठिकाणची निष्ठा अगदीं अभंग झाली. सिनेटर टॅफ्ट याच्या आयुष्यांत त्याच्या हातून अनेक वादग्रस्त गोष्टी घडल्या. आणि काळाच्या दृष्टीनें आपण त्याच्या इतकें जवळ आहों कीं ऐतिहासिक दृष्टिकोनांतून आपण त्या वादग्रस्त घटनांकडे अजून पाहूंच शकत नाहीं. ज्या माणसानें अनेकांना कठोर शत्रु केले व उलट अत्यंत निष्ठावंत अनुयायी मिळविलें त्याच्या संबंधीचें अचूक

मत पुष्कळ वर्षांनंतरच बनविता येईल. राजकीय व कायदेमंडळांतल्या त्या वादांचा गाळ इतिहासाच्या तळाला जाऊन आजच्या कालखंडाचें महत्त्व-मापन करता येईल इतका दीर्घकाल गेला पहिजे.

पण, १९४६ सालीं सिनेटर टॅफ्ट यानें ज्या एका कृत्यांत धैर्य दाखविलें, त्यासंबंधानें आपण तटस्थपणें पाहूं शकूं इतका काळ त्यानंतर आतां खचित गेला आहे. डॅनिअल वेब्स्टर अथवा एडमंड रॉस यांच्या धैर्यशील कर्तबगारीनें इतिहासाला वळण लावलें तसें टॅफ्टच्या १९४६ तल्या वर्तनानें लावलें नाहीं. जॉन क्विन्सी ॲडॅम्स व थॉमस बेंटन यांना आपल्या कृतीपायीं सिनेटची कार-कीर्द संपवावी लागली तसा प्रसंग टॅफ्टवर आला नाहीं. यापूर्वीच्या धैर्यवंतांचे पराक्रम सिनेटमध्यें दिसले ते पूर्वीं वर्णिले आहेत. पण टॅफ्टचें हें धाडस सिनेट-मधलें नव्हे. पण ज्या काळांत प्रांजळपणा कुणालाच नको होता त्या काळांत त्यानें दाखविलेला प्रांजळपणा, आणि असहिष्णुता व वैरभाव यांनीं कोंदाटलेल्या वातावरणांत टॅफ्टनें दाखविलेली न्यायबुद्धि या दृष्टीनें टॅफ्टचें हें कृत्य संस्मर-णीय आहे.

× × ×

१९४६च्या ऑक्टोबरांत ओहिओचा सिनेटर टॅफ्ट हा वाशिंग्टनमध्यें रिप-ब्लिकन पक्षाचा मुख्य प्रवक्ता आणि राष्ट्रीय राजकारणाच्या आखाड्यांत रिप-ब्लिकनांचा मुख्य पुढारी असून १९४८ च्या राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकींत रिपब्लिकन पक्षाचा संभवनीय उमेदवार होता. तो काळ असा होता कीं एवढ्या मोठ्या प्रस्थापित कीर्तीच्या सिनेटरालाहि आपलें मन बोलून दाख-वितांना जिभेला लगाम घालावीसें वाटे आणि सिनेटर बॉब टॅफ्ट ज्या महत्त्वाच्या जागीं होता व जेथें तो पुढें चढण्याचा संभव होता त्यामुळें तर त्याला बोलतांना फारच सावधगिरी ठेवणें अवश्य होतें. कारण जो पक्ष म्हणजे त्याचें सारें जीवन होता आणि काँग्रेसमध्यें ज्या रिपब्लिकनातर्फे तो बोलत असे तो पक्ष आणि ते रिपब्लिकन्स येत्या निवडणुकींत अगदीं विजय मिळविणारच अशा संभवांत होते. कायदेमंडळाच्या म्हणजे काँग्रेसच्या दोन्ही सभागृहांच्या निवड-णुका लवकरच व्हावयाच्या असून त्या दोन्ही सभागृहांत रिपब्लिकन पक्षास बहुमत मिळाल्यास त्या दोन्ही सभागृहांचा ताबा रिपब्लिकन पक्षाच्या हातीं जाणार होता, त्यामुळें रॉबर्ट टॅफ्टचें वजन वाढणार होतें. १९४८च्या राष्ट्रपति-

पदाच्या निवडणुकीसाठीं रिपब्लिकन पक्षाची उमेदवारी मिळण्याचा त्याचा हक्क वाढणार होता आणि १९१२ सालीं त्याच्या बापास ज्या राजगृहांतून (राष्ट्रपतिसदन ऊर्फ व्हाइट हॉल) कांहींशा अपमानानें बाहेर जावें लागलें त्या राजगृहांत जाण्याचा टॅफ्टचा रस्ता चांगला तयार होणार होता. निदान पुष्कळ राजकीय निरीक्षकांना असें वाटलें आणि हा सारा जुळत आलेला बनाव विस्कटेल असें सिनेटर टॅफ्ट कांहींहि करणार नाहीं असे ते धरून चालले होते. कांग्रेसचें अधिवेशन चालू नव्हतें. सत्ताधारी असलेल्या डेमोक्रॅटिक पक्षा-विरुद्ध लोकमताची लाट उसळली होती. अशा परिस्थितींत कॉंग्रेसच्या निवड-णूकमोहिमेसाठीं नेहमींच्या मुद्यावर सामान्य निवेदनें करण्यापलीकडे सिनेटर टॅफ्टनें अधिक कांहीं बोलण्याची गरजच नव्हती.

पण सिनेटर टॅफ्टचें मन त्रस्त झालें. आणि मन त्रस्त झालें कीं मनांत रुचणारा विचार बोलून टाकायचा अशी त्याची सवय होती. कशानें त्याचें मन त्रस्त झालें? त्यावेळीं दुसऱ्या महायुद्धांतील जर्मन पुढाऱ्यांवर युद्धगुन्ह्यादाखल जर्मनींत खटले चालू असून जर्मनींत ते संपत आले होते व जपानांत जपानी युद्ध-पुढाऱ्यावरचे खटले सुरू होणार होते. जर्मनींत नुरेनबर्ग येथें ११ कुप्रसिद्ध नाझी पुढाऱ्यांवर खटले झाले व खात्री पटण्यासारख्या पुराव्यावरून त्यांनीं "आक्रमक युद्ध केल्याचा" आरोप त्यांच्यावर शाबीत झाला. हा खटला साऱ्या जगभर व विशेषत: अमेरिकेंत फार लोकप्रिय झाला होता. आणि त्या आरोपींना त्या वड्या न्यायमंडळानें मृत्यूची शिक्षा दिली तीहि लोकांना आवडली होती.

पण हे खटले कशा प्रकारचे होते? अलीकडे अमेरिकेच्या सुप्रीम कोर्टाचा एक न्यायाधीश विल्यम ओ. डग्लस यानें लिहिलें आहे, "या खटल्यासंबंधानें कितीहि पुस्तकें लिहिलेलीं असोत अथवा पुरावा कितीहि दाखल केलेला असो, वकीलांनीं त्या पुराव्याचें पृथक्करण कितीहि सूक्ष्मपणें केलेलें असो, ज्या गुन्ह्यां-साठीं त्या नाझीचेवर हा खटला झाला. ते 'गुन्हे' आमच्या कायद्यांच्या कसोटी-प्रमाणें 'गुन्हे' म्हणून कधींच रीतसर ठरविण्यांत आले नव्हते अथवा आंतर-राष्ट्रीय जगानें हे 'गुन्हे' कधीं मृत्युशिक्षापात्र असे ठरविलेले नव्हते. आमच्या राज्यघटनेच्या कसोटीप्रमाणें पाहता गुन्ह्याचें कृत्य घडून गेल्यानंतरच्या एकाद्या कायद्यानें तें कृत्य गुन्ह्याचें ठरविण्यांत आलें होतें. गोअरिंगला फार मोठी शिक्षा देणें योग्य असेल. पण गोअरिंगप्रभृतींनीं तो 'गुन्हा' केला म्हणून

आम्हीं आमच्या तत्त्वाचा त्याग करून सत्तेच्या बळावर तत्त्वाविरुद्ध वागावें हें समर्थनीय नव्हतें."

अमेरिकेंतील बऱ्याच नागरिकांचें आज हें मत आहे असें मला वाटतें. आणि १९४६ सालींहि पुष्कळशा अमेरिकनांना खाजगी रीतीनें असेंच वाटत होतें. पण महत्त्वाचा असा कोणीहि मुत्सद्दी हें मत बोलून दाखविण्यास तयार नव्हता. विशेषतः खटल्याचा निर्णय व आरोपींच्या शिक्षा जाहीर होऊन त्यांना फाशी देण्याची तयारी चालू झाली असतांना कोणीच महत्वाचा मुत्सद्दी आपलें मौन सोडणार नव्हता. पण सिनेटर टॅफ्ट याला अपवाद ठरला.

या ओहिओच्या सिनेटरला अमेरिकेची घटना हें ब्रह्मवाक्य असून आपले धोरणासंबंधीचे सर्व निर्णय तो त्या घटनेवर आधारून ठरवीत असे. ही घटना हा त्याचा स्फूर्तीचा उगम, त्याचें शस्त्र व त्याचें मोक्षस्थान होतें. अमेरिकेच्या घटनेप्रमाणें एकादें कृत्य त्या कृत्यानंतर झालेल्या कायद्यानें गुन्हेगारीचें ठरविता येत नसे. अमेरिकेची घटना ही कांहीं सुटया सुटया आश्वासनांची मालिका नव्हे कीं तींतून सोईप्रमाणें व्यापक अर्थ काढून आपणांस हवे ते निर्णय मिळविता येतील. व्यवहाराची तशीच गरज लागली तर बाजूस सारता येईल अशी कांहीं अमेरिकन राज्यघटना ही गोड गोड सुभाषितांची मालिका नव्हती. अमेरिकेचे कायदे व न्याय यांच्या पद्धतीचा पाया अशी ती राज्यघटना होती. आणि युद्धांत जिंकलेल्या शत्रूला शिक्षा करण्यासाठीं आपल्या अमेरिकन राष्ट्रानें आपल्या घटनेचीं तत्त्वें अशा प्रकारें फेकून द्यावीं या गोष्टीनें टॅफ्टच्या मनाला खरोखर धक्काच बसला.

पण, समजा, टॅफ्टच्या मनाला धक्का बसला असेल, पण त्यानें बोलावें कशाला ? नूरेन्बर्गचे खटले काँग्रेसपुढें कधींच चर्चेला आलेले नव्हते. त्यावेळीं जी काँग्रेसच्या निवडणुकीची मोहीम चालू होती तींत हा खटला हा वादग्रस्त मुद्दा तरी खास नव्हता. साऱ्या राष्ट्रानें अत्युत्साहानें त्या खटल्यांना पाठिंबा दिला असल्यानें त्यांत रिपब्लिकन अथवा डेमोक्रॅट्स् यांची वेगवेगळी भूमिकाहि नव्हती. आणि अमेरिकेच्या सिनेटराच्या कोणत्याहि भाषणानें त्या खटल्यांतील मृत्यूची शिक्षा टळणार नव्हती. टॅफ्टनें निष्कारण आपलें मत जाहीरपणें बोलून दाखविणें हें राजकीय दृष्टया निष्फळ व महाग पडणार होतें.

पण रॉबर्ट टॅफ्ट बोललाच.

ओहिओच्या केनीऑन कॉलेजानें 'अँग्लोअमेरिकनांचा वैचारिक वारसा' या विषयावर एक चर्चापरिषद भरविली. त्या परिषदेंतहि वक्ते ज्या विषयांवर बोलतील असें अपेक्षिलें गेलें होतें त्या विषयांत युद्धगुन्ह्यांचा विषय येईल असें कोणास वाटलें नव्हतें. आश्चर्यजनक व अगदीं नवा असा दृष्टिकोन मांडण्यास टॅफ्ट सामान्यत: नाराजच असे. पण ही नाराजी यावेळीं त्यानें सोडली. 'कायद्याअन्वयें समान न्याय' हा विषय टॅफ्टनें बोलण्यास घेतला होता. त्या विषयावर बोलतांना त्यानें 'जित्यांवर जेत्यांचा खटला' हा मुद्दा ओढून आणून "न्यायाच्या कितीहि औपचारिक बंधनांत असा खटला बांधला गेला तरी तो नि:पक्षपाती न्याय होणार नाहीं" असें मत त्यानें सांगून टाकलें. श्रोते चित्त लावून ऐकत होते. या मत-प्रदर्शनानें ते चकित झाले.

टॅफ्ट आपल्या भाषणांत म्हणाला, "ज्यांना आपण फाशी देत आहों ते कितीहि तिरस्करणीय लोक असले तरी जर्मन जनतेचे ते पुढारी आहेत. त्यांना फाशी देण्यानें आक्रमक युद्धांची प्रेरणा नाहींशी होईल काय असा माझा प्रश्न आहे. कारण यशाची आशा असल्यावांचून आक्रमक युद्ध कोणीच करीत नाहीं. या सर्व न्यायनिर्णयांत सूडबुद्धि आहे आणि सूडबुद्धीनें न्याय कधींच मिळत नाहीं. या अकरा माणसांना फाशी देण्यानें अमेरिकेच्या न्यायदानाच्या लौकिकावर डाग पडणार आहे. फार काळ आपणाला त्याबद्दल पश्चात्ताप करीत बसावें लागेल.

या खटल्यांत, खटल्यांच्या हेतूविषयीं जी रशियन कल्पना आहे तिचा आम्हीं स्वीकार केला आहे. खटला चालवायचा तो न्यायदानासाठीं नव्हे तर सरकारच्या धोरणासाठीं, हें रशियन तत्त्व असून अँग्लोसॅक्सन तत्त्वांचा वारसा म्हणून आपण जें कांहीं मानतों त्याच्याशीं हें रशियन तत्त्व संपूर्ण विसंगत आहे. कायद्याच्या प्रक्रियेला आपण धोरणाचा पेहेराव चढवीत आहों. यामुळें युरोपांत पुढील अनेक वर्षे न्यायाची कल्पना आपण बरबाद करणार आहों. युद्ध खरोखरच फार भयंकर झालें हें खरें. पण तरीहि सर्व मुद्दे निखालसपणें विचारांत घेतल्यावरहि असें म्हणावें लागतें कीं दु:खितांना साहाय्य आणि प्रदेशांचीं अखेर विल्हेवाट याबाबत आम्ही इंग्रजीभाषी जनतेच्या न्यायाच्या कल्पनांना धरून शत्रूला न्याय दिला असें त्या शत्रूला वाटलें असतें तर भवितव्याकडे आपण अधिक आशेनें पाहूं शकलों असतों."

यानंतर दहाच दिवसांनीं नाझी पुढारी फाशी जायचे होते. पण टॅफ्टनें निर्विकारपणें अगदीं कापीव भाषेंत व फक्त वस्तुस्थिति मांडण्याच्या पद्धतीनें बोलून, त्या युद्धआरोपींना मृत्यूच्या शिक्षा सुनावल्याबद्दल खेद व्यक्त केला आणि नेपोलिअनला ज्याप्रमाणें त्याच्या इच्छेविरुद्ध हद्दपार करण्यांत आलें तसें यांना हद्दपार करणें अधिक शहाणपणाचें होईल असें मत मांडलें. "पण" टॅफ्ट म्हणाला "या शिक्षेपेक्षां हे खटले अधिक निषेधार्ह आहे. नुरेन्बर्ग हा आमच्या राज्यघटनेच्या इतिहासावर कलंक असून सर्व नागरिकांना न्याय्य आणि समान वागवणूक हें जें अँग्लोसॅक्शन वारशापासून आम्हांस मिळालेलें नैतिक तत्त्व आणि ज्यामुळें जगांतील सर्व राष्ट्रांच्या विश्वासास आम्ही पात्र होत आलों त्या तत्त्वापासून आम्ही च्युत झालों आहों. शेवटीं मी एवढेंच सांगतों कीं आपण आपल्या लोकांना न्याय आणि व्यक्तिस्वातंत्र्य हीं टिकाऊ तत्त्वें शिकवूं शकणार नाहीं. व्यक्तिस्वातंत्र्य आणि न्याय दडपून टाकून जर्मन लोकांना त्यांच्या देशांत सरकार कसें स्थापायचें हें आपण शिकवूं शकणार नाहीं. माझ्या दृष्टीनें पाहता आम्हा इंग्रजीभाषी लोकांवर एक मोठी जबाबदारी आहे. न्याय व कायदा यांच्या बजावणींत सर्वांना समानतेनें वागवावें या तत्त्वाबद्दल लोकांच्या मनांत पुन्हा आदर निर्माण करणें ही ती जबाबदारी होय."

१९४६च्या काँग्रेसच्या निवडणूकप्रचाराची मोहीम अगदीं तापत चालली असतां टॅफ्टच्या या भाषणानें त्या मोहिमेंत मोठा स्फोट केला. देशभर या भाषणानें एवढी खळबळ माजली कीं रिपब्लिकन लोक खवळणाऱ्या लोकमतास भिऊन आश्रयार्थ पळत सुटले तर डेमोक्रॅटांनीं या संधीचा फायदा घेऊन त्याच लोकमताच्या आश्रयानें आपले घोडें दामटलें. खरोखर फार फार लोकांना टॅफ्टच्या भाषणानें आपणावर अन्याय झाला असें वाटलें. जर्मन आक्रमकांना मागें हटविण्यासाठीं अनेकजण लढले होते, अनेकांचे आप्तेष्ट लढले होते व त्यांतले कित्येक मेले होते. अशा सर्वांना, ज्यानें रणांगण कधींच पाहिलें नाहीं अशा टॅफ्टनें हे गोड गोड तात्त्विक सिद्धांत मांडावे याचा तिरस्कार वाटला. युरोपांत ज्यांचे आप्त होते अथवा अमेरिकेंत येण्यापूर्वीचे देशबांधव ज्यू, पोल्स, झेच आणि हिटलरकडून छळ पावलेले इतर राष्ट्रांचे लोक इत्यादि होते त्यांना टॅफ्टच्या या भाषणानें धक्काच बसला. ब्यूचेनवॉल्ड येथें व इतर कांहीं ठिकाणीं नाझींनीं ज्या छळछावण्या स्थापल्या होत्या, तेथें नाझींनीं केलेल्या अंगावर

शहारे आणणाऱ्या अत्याचारांच्या ज्या कथा लोकांच्या स्मरणांत होत्या व ज्यांत नुरेंनबर्ग येथील खटल्यांत सांगण्यांत आलेल्या उदाहरणांनीं भर पडली होती, युद्ध चालू असता रोजच्या रोज प्रसिद्ध होणाऱ्या मृतांच्या आणि जखमींच्या नव्या याद्यांनीं हजारों अमेरिकन घरांत ज्या नव्या वेदना व नवें दुःख पसरत होतें या सर्वांची स्मृति लोकांच्या मनांत ताजी होती. अशा परिस्थितींत अमेरिकेच्या एका सिनेटरानें नाझी हे फक्त तिरस्करणीय लोक होते एवढेंच म्हणावें आणि त्यांच्यावरील खटला व त्यांना झालेल्या शिक्षा याविषयीं खेद व्यक्त करावा यामुळें अनेकांना दुःख झालें व संतापहि आला.

राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकींत न्यूयॉर्क हें फार महत्त्वाचें राज्य. तेथें निरनिराळ्या राष्ट्रांचे लोक असल्यानें त्या त्या गटांच्या मतांच्या सतत होणाऱ्या हालचालीनें राजकारणाचा ताजवा चटकन खालीवर होत असे इतका तेथें तो नाजूक होता. तेथें डेमोक्रॅटांना टॅफ्टच्या भाषणानें हर्ष झाला व रिपब्लिकन अगदीं संतप्त व उदास झाले. १९४४ सालीं रिपब्लिकन पक्षानें राष्ट्रपतिपदासाठीं उभा केलेला उमेदवार व पक्षाच्या नेतृत्वाच्या स्पर्धेतला टॅफ्टचा प्रतिस्पर्धी न्यूयार्कचा गव्हर्नर थॉमस ड्यूई यानें नुरेनबर्गचे निर्णय हे न्याय्य असल्याचें जाहीर केलें. ड्यूई व न्यूयॉर्क सिनेटसाठीं उभा करण्यांत आलेला रिपब्लिकन उमेदवार आर्यविन ईव्ह्ज् या दोघांनीं एक पत्रक प्रसिद्ध करून "नूरेन्बर्गच्या आरोपींवरील खटला न्यायानें व दीर्घकाल चालला, जगावर ज्यांनीं एवढें दुःख आणलें त्या नाझी पुढाऱ्यांबद्दल कोणालाहि सहानुभूति वाटणार नाहीं." असें मत व्यक्त केलें. "टॅफ्टनें न्यूयॉर्क राज्यांत येऊन नाझी युद्धगुन्हेगारांसंबंधानें तेंच भाषण पुन्हा करून पहावें" असें न्यूयॉर्क राज्याच्या डेमोक्रॅटिक पक्षीय निवडणूक मोहिमेच्या व्यवस्थापकानें टॅफ्टला आव्हान दिलें. तो म्हणाला, "डेमोक्रॅटिक पक्षाला मतदारांना असें विचारण्याचा पूर्ण हक्क आहे कीं गुन्हेगार ठरलेल्या नाझींचे प्राण वांचावे अशी इच्छा व्यक्त करणाऱ्या सिनेटर टॅफ्टच्या नेतृत्वाखालील पक्षाची सत्ता साऱ्या अमेरिकेवर व न्यूयॉर्क राज्यावर स्थापली जावी कीं काय ? या नाझी खुनींच्या मृत्यूच्या शिक्षा कमी व्हाव्या म्हणून रिपब्लिकन पक्षाचा प्रचार सुरू करायची तयारीहि टॅफ्ट करीत असेल."

न्यूयॉर्कचा रिपब्लिकन पक्षातर्फे कांग्रेससाठी निवडणुकीस उभा असलेला उमेदवार जेकब के. जेव्हिट्स् यानें टॅफ्टला तारेनें कळविलें कीं "भाविकाळांत

जगांत शांतता नांदावी यासाठीं जे लढले त्या सर्वांना तुझ्या भाषणानें तूं अपाय केला आहेस." अमेरिकन सिनेटसाठीं उभा करण्यांत आलेला न्यूयॉर्कचा डेमोक्रॅटिक उमेदवार म्हणाला, "टॅफ्टच्या निवेदनानें मला धक्काच बसला. न्याय्यदृष्टीनें विचार करणारा कोणीहि अमेरिकन माणूस टॅफ्टच्या या निवेदनाचा धिक्कारच करील." न्यूयॉर्कच्या गव्हर्नरपदासाठीं उभा असलेला डेमोक्रॅटिक उमेदवार एका सभेंत म्हणाला, "सिनेटर टॅफ्टनें नाझी छळछावण्यांत बळी पडलेलीं माणसें पाहिलीं असतीं तर त्याला असें भाषण करवलें नसतें."

वॉशिंग्टनमध्यें टॅफ्टला विशेष मान असे. आणि त्याचा निष्ठुर फटकळपणा लोकांनीं नेहमीं अपेक्षिलेला असे. पण या भाषणाची प्रतिक्रिया तेथेंहि इतर ठिकाणाप्रमाणें प्रतिकूलच झाली. रिपब्लिकन पक्षाच्या पुढाऱ्यांनीं मतप्रदर्शन करण्याचें नाकारलें. पण खाजगी बोलण्यांत आपल्या पक्षाच्या कॉंग्रेससाठीं उभ्या असलेल्या उमेदवारांच्या निवडणुकीवर याचा परिणाम वाईट होईल अशी कबूली त्यांनीं दिली. रिपब्लिकन पक्षाच्या कॉंग्रेशनल निवडणूकमोहिमेचा अध्यक्ष एका वार्ताहरपरिषदेंत म्हणाला, "मी टॅफ्टच्या भाषणावर मत प्रदर्शन करीत नाहीं. नूरेन्बर्ग खटल्यासंबंधानें माझीहि कांहीं मतें आहेत. पण मी टॅफ्टशीं त्याबाबत वाद कशाला घालूं ?"

डेमोक्रॅट पक्षीयांनीं टॅफ्टच्या निवेदनानें आपणास मोठा संताप आल्याचा देखावा केला. पण त्यांना खरोखर त्या निवेदनानें हर्ष झाला होता. आपल्या साप्ताहिक वार्ताहर परिषदेत राष्ट्रपति ट्रुमन हसत हसत म्हणाला, "सिनेटर टॅफ्ट आणि गव्हर्नर डयूई यांनीं आपसांत लढून या प्रश्नावर निर्णय ठरवावा." सिनेटमधील डेमोक्रॅटिक बहुमताचा पुढारी (आणि पुढें उपराष्ट्रपति झालेला) सिनेटर बार्क्ले निवडणुकीच्या एका सभेंत म्हणाला, "१९३२ सालीं उपाशी बेकारांना अंबील वाटण्यासाठीं स्थापलेली सैपाकघरें पाहून या देशांत अनेकांना झालेला चित्तक्षोभ टॅफ्टनें अनुभवला नाहीं. पण नूरेन्बर्गच्या गुन्हेगारासाठीं मात्र तो अश्रु ढाळतो आहे." टॅफ्टच्या भाषणावर डेमोक्रॅटिक पक्षाची प्रतिक्रिया एकंदरीनें कशी झाली हे इलिनॉइसचा सिनेटर ल्यूकॉस याच्या निवेदनावरून दिसून आलें. तो म्हणाला, "टॅफ्टचें भाषण हें त्याच्या गोंधळलेल्या विचारसरणीचें द्योतक आहे. १९४८ सालीं राष्ट्रपतिपदावर निवडून येण्याची जी त्याची इच्छा आहे तिजवर हें त्याचें भाषण प्रतिकूल परिणाम केल्याखेरीज राहणार नाहीं.

दुसऱ्या महायुद्धांत लढलेले १ कोटि १० लक्ष युद्धसैनिक हेच टॅफ्टला उत्तर देतील...नूरेन्बर्गचा खटला हा अमेरिकन इतिहासावरील कलंक होय असें टॅफ्टनें म्हटल्यानंतर रिपब्लिकन पक्षाचा राष्ट्रीय अध्यक्ष त्याला आणखी भाषणें करूं देईल असें मला वाटत नाहीं. टॅफ्टचें हें मत अमेरिकन जनता अथवा इतिहास या दोघांनाहि मान्य होणार नाहीं. सिनेटर टॅफ्ट आपल्या भाषणानें एक कोटि खून केलेल्या माणसांचें समर्थन करीत होता. त्याला हें म्हणणें पटो अथवा न पटो."

ओहिओ हा सिनेटर टॅफ्टचा स्वतांचा प्रदेश. तेथें आपल्या सदनशीर धोरणाच्या कठोर पुरस्कारामुळें तो फार लोकप्रिय झाला होता. पण तेथेंहि टॅफ्टच्या या भाषणानें संताप व गोंधळ माजून राजकारणांत खळबळ उडाली. ओहिओचा माजी गव्हर्नर आणि रिपब्लिकन पक्षाचा सिनेटसाठीं उभा असलेला उमेदवार जॉन ब्रिकर हा टॅफ्टचा जिवलग मित्र असून १९४४ सालीं राष्ट्रपति-पदासाठीं ड्यूई उभा होता त्याच्या बरोबर ब्रिकर हा उपाध्यक्षपदासाठीं उभा होता. त्याचा सिनेटसाठीं प्रतिस्पर्धी असलेला डेमोक्रॅटिक उमेदवार जेम्स हफमन यानें ब्रिकरला "तुला टॅफ्ट मान्य आहे कीं ड्यूई मान्य आहे सांग," असें आव्हान केलें. हफमन म्हणतो,

"ज्या राष्ट्रानें आधुनिक युद्धाचा शाप सोसला, आपल्यांतील उत्कृष्ट असे ३ लक्ष नागरिक बळी दिले आणि तीनशें कोटि डॉलर किंमतीची राष्ट्रीय संपत्ति खर्च केली त्या राष्ट्रावर या गुंडांनीं इतका सर्व होम करणें अवश्य ठरण्याएवढें संकट आणलें. त्यांना मिळालेली मृत्यूची शिक्षा या राष्ट्राला कठोर वाटणार नाहीं....आंतरराष्ट्रीय गुन्हेगारांना शिक्षा करतांना मनांत करुणा उत्पन्न होऊं देणें हें यावेळीं योग्य नाहीं. टॅफ्टनें केली तशी टीका जर समर्थनीय असेल तर ती नूरेन्बर्गचें न्यायमंडळ स्थापलें जात होतें तेव्हांच करायला हवी होती."

टोलेडोच्या 'ब्लेड' या पत्रानें लिहिलें, "या व इतर अनेक विषयांवर टॅफ्ट जेव्हां मतप्रदर्शन करतो तेव्हां असें दिसून येतें कीं टॅफ्टचें मन हें एक आश्चर्य आहे. या मनाला जगांतलें सर्व कांहीं माहीत आहे, पण समजत मात्र कांहींहि नाहीं... ...."

क्लीव्हलँडचें 'प्लेन डीलर' हें पत्र आपल्या संपादकीयांत लिहितें, "तांत्रिक दृष्ट्या टॅफ्टचें म्हणणें खरें असेल. पण इतिहासांतील जास्तींत जास्त क्रूर अशा

या गळेकापूंच्या टोळीला जगावर मोकाट सोडण्यानें जगांत आज अवश्य प्रस्थापित व्हायला हवें आहे असें महत्त्वाचें तत्त्व प्रस्थापित झालें नसतें. तें तत्त्व म्हणजे 'नियोजनापूर्वक आक्रमक युद्ध करणें हा मानवजातीविरुद्ध गुन्हा होय."

आपणावर अशी सर्व बाजूंनीं मोठी विध्वंसक टीका झालेली पाहून सिनेटर टॅफ्टचें मन खचलेंच. विशेषत: नाझी पुढाऱ्यांपैकीं दोषमुक्त ठरलेला फ्रँझ फाँ पेपेन यानें एका मुलाखतींत "टॅफ्टसारखेंच आपलें मत आहे" असें जेव्हां सांगितलें तेव्हां तर आपण सर्वस्वी फजीती पावलों असें टॅफ्टला वाटलें. टॅफ्टतर्फे त्याच्या एका प्रवक्त्यानें एक त्रोटक उत्तर सर्व टीकेला दिलें. "या बाबतींत टॅफ्टनें आपलें मत मांडलें आहे, इतरांना जर त्यावर टीका करायची असेल तर त्यांनीं तशी ती खुशाल करावी." पण टॅफ्टचा एक जुना पाठीराखा डेव्हिड लॉरेन्स हा वृत्तपत्रलेखक म्हणाला कीं टॅफ्टचें तें भापण म्हणजे फक्त 'तांत्रिक लटपट' आहे. लॉरेन्सची ही टीका वाचून मात्र टॅफ्ट अगदीं बुचकळ्यांत पडला. आणि अमेरिकन बार अॅसोसिएशनचा अध्यक्ष, त्या असोसिएशनच्या कार्यकारी समितीचा अध्यक्ष आणि वकील वर्गांतील प्रमुख लोक यांजसारख्या कायदेपंडितांनींहि जेव्हां हे खटले आंतरराष्ट्रीय कायद्याला धरून झाले आहेत असें म्हणून त्यांचें समर्थन केलें तेव्हां टॅफ्टला फारच दु:ख झालें असेल.

रॉबर्ट टॅफ्टनें खुनी अशा नाझी पुढाऱ्यांचें समर्थन केलें असा आरोप एका मजूर पुढाऱ्यानें टॅफ्टवर केला होता. अमेरिकेनें जागतिक राजकारणांतून अलग राहावें अशा भूमिकेवरून टॅफ्ट बोलला असें बहुतेक टीकाकार धरून चालले होते. पण टॅफ्टच्या हेतूबाबत हे दोन्हीहि आरोप चूक होते. अमेरिकेचे कायदा व न्याय यांबाबत जें परंपरागत तत्त्व होतें त्याच्या समर्थनार्थ हें भापण त्यानें केलें होतें. सनदशीर राजकारणाचा तो कांटेतोल पुरस्कर्ता होता. व्यक्ति आणि सरकार यांनीं सनातन धोरणच अवलंबलें पाहिजे या मताचा तो होता. त्याच्या या निष्ठेमुळें त्याचें भाषण त्याच्या पक्षाची आधींच बिकट असलेली परिस्थिति आणखी दुबळी करील आणि आपली राष्ट्रपतिपदाच्या उमेदवारीसाठीं निवड होण्याचा संभव कमी करील या भीतीनें तो तें भाषण करण्यास कचरला नाहीं. टॅफ्टच्या मतें न्यायतत्त्वच संकटांत आलें होतें. अर्थात् इतर बाबी स्वाभाविकच क्षुल्लक होत्या. एका वृत्तपत्रलेखकानें त्यावेळीं लिहिलें, "टॅफ्टचा हट्टीपणा, प्रामाणिकपणा आणि राजकारणांतील त्याची अढीबाजी त्या भाषणांत दिसून येते. हजारों लोकांचा आपणाशीं मतभेद आहे आणि आपल्या मतप्रदर्शनामुळें

इतर रिपब्लिकनांना अडचणी उत्पन्न होतील, याची बहुधा त्यानें मुळींच फिकिर बाळगली नाहीं. एकाद्या विषयावर ठाम मत बनवायचें व तें व्यक्त करण्यानें स्वतांला अपाय होईल याची पर्वा करायची नाहीं अशी त्याची सवयच होती. आपल्या भाषणाचा विपर्यास होईल हें टॅफ्टला खास माहीत असलें पाहिजे. ज्यावेळीं तो हें भाषण करीत होता ती निवडणूकमोहिमेची वेळ असल्यानें आपल्या पक्षाविरुद्ध यामुळें भुतें उठविलीं जातील हेंहि त्याला ठाऊक असलें पाहिजे. पण इतकें सर्व लक्षांत येऊनहि ठरल्याप्रमाणें बोलून टाकावें हा त्याचा स्वभावच होता."

त्याच्या भाषणानें उठविलेलें वादळ कालांतरानें शमलें. १९४६ सालीं रिपब्लिकनांची निवडणुकींत सरशी झाली, तिला टॅफ्टच्या भाषणानें माजविलेल्या आरडाओरडीमुळें फारसा अपाय झाला नाहीं. १९४८ सालीं राष्ट्रपतिपदाच्या उमेदवारीसाठीं रिपब्लिकन पक्षानें कोणाला निवडायचें याबाबत टॅफ्टचें नूरेन्बर्ग खटल्याबाबतचें मत हा निदान उघडपणें तरी वादाचा विषय नव्हता. त्यापूर्वीच नाझी पुढाऱ्यांना फासावर चढविण्यांत आलें होतें. टॅफ्ट व अमेरिका यांनीं दुसरे विषय हातीं घेतलेले होते. टॅफ्टनें नूरेन्बर्ग खटल्याचा निषेध केला ही गोष्ट त्यानें योग्य केली कीं अयोग्य केली हा आज चर्चेचा मुद्दा नाहीं. जी बाजू आपणास न्यायाची वाटते तिच्या समर्थनासाठीं लोकमताच्या प्रवाहाविरुद्ध जाऊन भाषण करण्याचें जें धैर्य त्यानें दाखविलें तें संस्मरणीय आहे. टॅफ्टला कांहीं लोक प्रतिगामी म्हणत व स्वतःला सनातनी म्हणवून घेण्यांत तो अभिमान मानी. उदारमतवादित्व व व्यक्ति-स्वातंत्र्य याची व्याख्या टॅफ्टनें पुढीलप्रमाणें केली होती; —

"उदारमतवादित्व म्हणजे काय ? याचा अर्थ विचारस्वातंत्र्य, सनातन शब्दप्रामाण्यापासून स्वातंत्र्य, आपणाहून वेगळी विचारसरणी धारण करण्याचा इतरांचा हक्क. यासाठीं अवश्य गोष्ट म्हणजे स्वतंत्र मन, नव्या विचारांना खुलें असें मन, दुसऱ्या कल्पनांचा लक्षपूर्वक विचार करण्यास तयार असणारें मन......

मी जेव्हां व्यक्तिस्वातंत्र्य असा शब्द उच्चारतों तेव्हां व्यक्तीला विचार करण्याचें आणि आपल्या विचाराप्रमाणें राहाण्याचें स्वातंत्र्य असलें पाहिजे असा माझ्या म्हणण्याचा अर्थ असतो."

सिनेटर टॅफ्टची ही तत्त्वनिष्ठा होती. आणि आपल्या विशिष्ट पद्धतीनें, आपल्या विशिष्ट झोकानें अमेरिकेंत ज्याला त्याला आपल्या इच्छेप्रमाणें वागता यावें असें वातावरण निर्माण करण्याचा त्यानें प्रयत्न केला.

प्रकरण १० वें

# आणखी कांहीं धैर्यवंत

राजकीय दृष्ट्या धैर्यवान म्हणून गणल्या गेलेल्या सिनेटरांची एखादी अधिकृत "यादी" अस्तित्वात नाहीं. आणि मी अशी एखादी यादी सुचवूंहि इच्छीत नाहीं. उलट सिनेटमधील राजकीय धैर्यवंतांच्या कांहीं ठळक व नाटयपूर्ण कथा येथें सांगून मीं असें दाखविण्याचा प्रयत्न केला आहे कीं धैर्य हा गुण कोणाहि सिनेटराच्या अंगीं आणि कोणत्याहि राजकीय पक्षांत कोणत्याहि काळीं दिसून येऊं शकतो. या सिनेटरांनीं ज्या परिस्थितींत धैर्य दाखविलें तशा परिस्थितींत धैर्य दाखविलेल्यांची आणखी अनेक उदाहरणें सांगता येतील. ज्याप्रमाणें जॉन क्विन्सी अॅडॅम्स, थॉमस हार्ट वेन्टन, एडमंड रॉस, सॅम हाऊस्टन आणि जॉर्ज नोरिस यांनीं आपल्या मतांना आपल्या राजकीय कारकीर्दीपेक्षां अधिक महत्त्व देऊन आपआपल्या पक्षाशीं भांडण केलें, त्याप्रमाणें इतर अनेक सिनेटरांनींहि केलें आहे. १९१० सालीं इंडियानाचा सिनेटर आलबर्ट बिव्हरिज याच्या फेरनिवडणुकीच्या मोहिमेचे वेळीं त्याच्या रिपब्लिकन मित्रांनीं रिपब्लिकन पक्षानें पुरस्कारलेल्या पाएॅन आल्ड्रिच टॅरिफ कायद्यावर आलबर्ट बिव्हरिज जे आरोप करीत होता ते आरोप त्यानें जरा सौम्य करावे अशी विनंति त्याला केली. पण त्यानें मौन धारण करण्याचें नाकारलें. तो म्हणाला "पक्षाला जिवंत राहायचें असेल तर त्यानें विकसत राहिलें पाहिजे. नव्या कल्पनांबद्दल असहिष्णुता दाखविल्यानें पक्षाचा मृत्युच ओढवतो. जी संघटना पुन्हा पुन्हा तेंच मत मिळविण्यावर अवलंबून असतें, बापाच्या जागीं मुलगा येतो असें ज्या पक्षाचें जीवन असतें तो कांहीं राजकीय पक्ष नव्हे. असा पक्ष म्हणजे विचारशक्ति व सद्सद्विवेकबुद्धि यांनीं एकत्र आणलेली ती संघटना नसून रक्ताचें नातें आणि दृढ-दूषित पूर्वग्रह यांनीं एकत्र आणलेली ती इंडियनांची टोळी ठरेल."

विव्हरिज्च्या पक्षांतीलच वजनदार गटांनीं त्याला विरोध करून त्याचा पराभव जेव्हां घडवून आणला तेव्हां त्याच्या पक्षाबद्दल त्याचे डोळे उघडले. तो नाउमेद झाला. निवडणुकीच्या दुसऱ्या दिवशीं सकाळीं त्यानें आपल्या पराभवास उद्देशून फक्त पुढील उद्‌गार काढले होते: "झालें तें ठीकच झालें. बारा वर्षें मीं झटून काम केलें. माझा हा इतिहास अत्यंत निर्मळ आहे. मला यांत समाधान आहे."

पुष्कळांना स्वपक्षांतून फुटण्याचें धैर्य जेव्हां दाखवावें लागतें त्यावेळीं त्यांना दुसऱ्या एखाद्या संघटनेंत नवें घर करता येतें. पण ज्यांना आपला पक्ष सोडायचा नसतो आणि पक्षांतील त्यांच्या गटांतून ज्यांची हकालपट्टी होते, (जो अनुभव सिनेटर बेन्टन व हाऊस्टन यांना आला) त्यांच्या राजकीय जीवनाची इतिश्री अधिक कायम आणि अधिक दुःखदायक होते. १९२४ सालीं डेमोक्रॅटिक कन्व्हेन्शनमध्यें अलाबामाचा सिनेटर ऑस्कार अंडरवुड हा राष्ट्रपतिपदाचा संभाव्य उमेदवार होता. १९१२ सालीं तो राष्ट्रपतिपदाचा उमेदवार म्हणून निवडणुकींत लढला होता. सिनेटमध्यें आणि प्रतिनिधिसभेंत तो डेमोक्रॅटिक पक्षाचा पुढारी होता. त्याच्या नांवावर प्रसिद्ध असलेलें टॅरिफ बिल त्यानेंच तयार केलें होतें. १९२४ सालच्या राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीपूर्वी दक्षिण प्रदेशांतील राजकारणांत 'कू क्लक्स क्लॅन' ही संघटना बलवान होत होती. अंडरवुडला राष्ट्रपतिपदाची उमेदवारी मिळणें सोपें व्हावें यासाठीं त्यानें कू क्लक्स क्लॅन या संघटनेला दुखवण्यासारखें कांहीं बोलूं नये अशी विनंति त्याच्या मित्रांनीं त्याला केली होती. पण अंडरवुड हा जेफर्सोनियन लोकशाहीच्या तत्त्वांचा निष्ठावंत अनुयायी असून कू क्लक्स क्लॅन ही संघटना या तत्त्वासच विरुद्ध असल्याची त्याची खात्री झाल्यामुळें या संघटनेचा प्रश्न हा महत्त्वाचा आहे, तिच्याविरुद्ध पक्षानें भूमिका घेतली पाहिजे असा अंडरवुडनें हट्ट धरला. आणि क्लॅनविरोधी भूमिका पक्षानें घ्यावी यासाठीं निकरानें लढून त्यानें अपयश पत्करलें. लुइझियाना येथील शिष्टमंडळानें आणि इतर दाक्षिणात्यांनीं जाहीरपणें अंडरवुडचा निषेध केला. आणि तेव्हांपासून राष्ट्रपतिपदाची उमेदवारी मिळण्याचा त्याचा संभव कमी झाला. यासंबंधानें फ्रँक केन्ट लिहितो :

"अंडरवुडला पुन्हा सिनेटमध्येंहि निवडून येता आलें नाहीं. त्यानें कळकळीनें व प्रामाणिकपणानें जीं राजकीय निवेदनें केलीं तींच त्याच्या आड आलीं. त्याचीं मतें तो जोरदारपणें, उघडपणें व ठामपणें मांडी. यामुळेंच अलाबामांत त्याला

विरोध झाला. हा विरोध पुढें इतका वाढला कीं त्याला पुन्हा उमेदवारी मिळणें हें निकराच्या लढ्यावांचून अशक्य झालें...राजकारणांत कांहीं तरी जोरदारपणें बोलावें पण तसें वागूं नये, हा मुत्सद्देगिरीच्या खेळांतील एक यशस्वी नियम असतो. या नियमानुसार तो वागला असता तर उरलेल्या सर्व आयुष्यांत सिनेट-मध्यें राहाण्याला त्याला कोणीं विरोध केला नसता."

१८६८ सालीं त्यावेळचा राष्ट्रपति अँड्र्यू जॉन्सन याच्यावरील राष्ट्रपति-पदावरून हाकलून जाण्याचा अपमानकारक प्रसंग दुर्दैवी एडमंड रॉस याच्या एका मतानें टळला ही हकिगत पूर्वी आलीच आहे. जॉन्सन हा शूर लढवय्या होता, पण त्याच्या वागणुकींत मुत्सद्दीगिरी नव्हती. यादवीपूर्वीच्या त्या अस्वस्थतेच्या कालखंडांत तो सिनेटमध्यें असतांनाच त्यानें स्वप्रदेशाचें दडपण झुगारून लाव-ण्यासाठीं वेब्स्टर, बेन्टन व हाऊस्टन यांच्यापेक्षांहि कदाचित अधिक धैर्य दाख-विलें होतें. १८६० सालीं अमेरिकन संघराज्य चिराळायला लागलें. बेन्टन व हाऊस्टन सिनेटमधून गेले होते. दाक्षिणात्यांपैकीं सिनेटर जॉन्सन हा एकटाच संघराज्याच्या बाजूनें बोलत होता. आपलें टेनेसी हें राज्य संघराज्यांत रहावें या साठीं खटपट करण्याकरितां तो आगगाडीनें टेनेसी राज्यांत येत होता. वाटेंत व्हर्जिनियांतील लिंचबर्ग येथें तो थांबला. तेथें संतापलेल्या जमावानें त्याच्या गाडीस वेढा देऊन त्याला खालीं ओढलें, त्याच्यावर हल्ला करून त्याला शिव्या दिल्या. त्याला ते छळ करून ठार मारणार होते. त्याच्या मानेभोवतीं त्यांनीं दोर टाकलाच होता. पण शेवटच्या क्षणीं त्यांनीं तो बेत बदलला. त्यांनीं त्याला फांशीं दिलें नाहीं. टेनेसी या आपल्या शेजारी राज्याचा हा नागरिक आहे. त्याला फांशीं देण्याचा मान हा त्यांचा आहे असें म्हणून त्याला सोडून दिलें. खुद्द टेनेसींत जॉन्सनचा धि:कार चालू असून त्याची प्रतिमा फांसावर चढविण्यांत येत होती. टेनेसींतील कॉन्फिडरेट पुढाऱ्यांना अशी खात्री वाटत होती कीं, "त्याचें सामर्थ्य नष्ट झालें असून त्याच्या देशद्रोहाचा दुर्गंध तेवढा उरला आहे. सिनेटर अँड्र्यूज यानें आपल्या राज्यांत सर्वत्र दौरा काढला आणि संघराज्यांतून फूटून निघण्याची लाट परतवण्याचा प्रयत्न केला. त्यांत त्याला यश आलें नाहीं. शेवटीं सिनेटमधील दाक्षिणात्य सदस्यांपैकीं त्यानें एकट्यानें संघराज्यांतून फूटून निघण्याच्या धोरणास विरुद्ध भूमिका घेतली. वॉशिंग्टनला परत येत असता सिनसिनाटी स्टेशनवर मोठ्या जमावानें उत्साहानें त्याचा जयजयकार केला.

त्यावर तो अभिमानानें म्हणाला "मी दक्षिणेचा व टेनेसी राज्याचा नागरिक आहें, पण त्याच बरोबर मी साऱ्या अमेरिकेचाहि नागरिक आहें."

तत्त्वाच्या मुद्यावर सिनेटमधील जागेचा राजिनामा देण्याचें धैर्य दाखविणारा जॉन क्विन्सी ॲडॅम्स हा एकटाच सिनेटर नव्हे. अँड्र्यू जॅक्सननें बँक ऑफ् युनायटेड स्टेट्स् विरुद्ध अनधिकृत कारवाई केल्याबद्दल जॅक्सनचा निषेध सिनेटनें केला होता. त्या निंदाव्यंजक ठरावाचा उल्लेख सिनेटच्या जर्नलमधून काढून टाकावा असा सिनेटर बेन्टन याचा ठराव पुष्कळ काळ येऊन पडलेला होता. पण अशा रीतीनें सिनेटच्या जर्नलमधून मजकूर काढून टाकणें हें गैरसनदशीर व सिनेटला न शोभणारें आहे अशी भूमिका व्हर्जिनियाचा सिनेटर जॉन टायलर यानें मांडली. उलट व्हर्जिनियाच्या कायदेमंडळामध्यें जॅक्सनचे मित्र व टायलरचे शत्रु यांची बहुसंख्या असल्यानें, त्याचप्रमाणें राष्ट्रपतीला त्याच्या नांवावर कोणताहि कायम कलंक न रहाता निवृत्त होता यावें या भावनेनें व्हर्जिनियाच्या कायदेमंडळानें आपल्या सिनेटरांना सिनेटच्या जर्नलमधून तो निंदाव्यंजक मजकूर काढून टाकण्याचा आदेश दिला.

यावेळीं आपण सिनेटमधून बाहेर पडलों तर आणखी किती तरी मूलभूत मुद्यांवर जॅक्सनच्या अनुयायांना अधिक बळ मिळेल आणि उपाध्यक्षपदाची उमेदवारी प्राप्त होण्याचा संभव नाहींसा होऊन थोडा वेळ कां होईना, आपल्या राजकीय कारकीर्दीची पिछेहाट होईल ही गोष्ट टायलरच्या लक्षांत आली. तरी पण सद्सद्विवेकबुद्धीला मान देण्यासाठीं त्यानें सिनेटचा राजिनामा देण्याचें ठरवून आपल्या कायदेमंडळाला पुढील पत्र लिहिलें.

"व्हर्जिनियन जनतेच्या अधिकृत संघटनेनें मला सिनेटमध्यें जेवढा काळ रहाण्याची परवानगी दिली आहे त्याहून अधिक असा एक क्षणभरहि मी सिनेटमध्यें रहाणार नाहीं. माझी सेवा आतां नको असें तुमचें मत कळताच मी सिनेट सोडून जाईन.

पण मी सिनेटच्या जर्नलला स्पर्श करूं धजत नाहीं. तसें करण्याला घटनेनें बंदी केली आहे. पक्षामध्यें याविषयीं प्रक्षोभ माजले असतां मी त्या पवित्र अशा राज्यघटनेच्या बाजूनें राहिलों आहें. आजचा सिनेटर जातो, त्याच्या जागीं उद्यां दुसरा येतो. आणि एखादा गट आज ज्या मूर्तीची पूजा करतो ती मूर्ति दुसरा गट फोडून टाकतो. पण मला राजकीय दृष्ट्या पूजनीय अशी वस्तु म्हणजे या राष्ट्राची घटना हीच आहे.

...मीं सार्वजनिक जीवनांत जीं तत्त्वें घेऊन प्रवेश केला तीं तत्त्वें उराशीं बाळगून मी सेवानिवृत्त होईन. आणि व्हर्जिनियांतील जनतेनें मला उच्च स्थान दिलें होतें तें परत करून मी माझ्या मुलांबाळांना एक उदाहरण घालून देईन. स्वाभिमानाचा बळी देऊन जें मिळवावें लागतें अथवा संभाळावें लागतें तें स्थान स्वाभिमानापुढें तुच्छ मानून सोडावें असा बोध माझ्या या उदाहरणांत असून तो माझ्या मुलांबाळांनीं घेतला पाहिजे."

१७९५ सालीं केन्टुकीच्या सिनेटर हंफ्री मार्शल यानें जें धैर्य दाखविलें तें सिनेटमधलें पहिलें मोठें धैर्यवान कृत्य होय. मार्शल हा मोठा नाटयपूर्ण व गडगडाट करणारा वक्ता होता. केन्टुकीच्या फेडरॅलिस्टांनीं राष्ट्रपति वॉशिंग्टनला, त्यानें ब्रिटनशीं जो जाय-तहनामा केला त्यासाठीं विरोध केला होता. हा तहनामा लोकांत अत्यंत अप्रिय झाला होता. पण मार्शलनें राष्ट्रपति वॉशिंग्टनला पाठिंबा दिला. आपल्या मतदारांना उद्देशून मार्शल म्हणतो :

"या तहाला तुम्हीं आणलेले आक्षेप विचारांत घेतले म्हणजे असें म्हणावेसें वाटतें कीं, तुम्ही गटबाज माणसें आहांत, तुम्ही बेबंदशाहीचे सौंगडी आहांत. फेडरल सरकारबद्दल जाणूनबुजून विपर्यस्त भावना पसरविणारे असे तुम्ही फेडरल सरकारचे शत्रु आहांत. तुमचे सर्व युक्तिवाद म्हणजे आरडाओरडा व शिवराळपणा असून तुमचा युक्तिवाद व तुमचा तर्क अगदीं दुबळा व चुकीचा आहे."

आपल्या मताच्या प्रचारासाठीं मार्शलनें केन्टुकींत दौरा काढला. तेथें त्याचा धिःकार होऊन त्याच्यावर दगडफेंक झाली. एके दिवशीं अपरात्रीं जमावानें त्याला घरांतून ओढून बाहेर काढलें. शेजारच्या एका नदींत नेऊन त्याला बुडवावें अशा विचारानें जमावानें त्याला नदीतीरावर आणलें. पाण्याच्या अगदीं काठावर नेण्यांत आलें असता त्या संतापलेल्या जमावाला उद्देशून सिनेटर मार्शल शांतपणें व विनोदानें म्हणाला, "मित्रहो, तुमचें हें सारें करणें धर्माप्रमाणें पाहता नियमबाह्य आहे. बॅप्टिस्ट चर्चच्या सचैल स्नान घालण्याच्या आदेशानुसार वागावयाचें तर त्या उमेदवाराला पाण्यांत बुडवून धर्मदीक्षा देण्यापूर्वी त्यानें आपले अनुभव सांगावयाचे असतात. आतां या नियमानुसार मी माझे अनुभव सांगूं इच्छितों. मग मला तुम्ही खुशाल बुडवा."

त्या जमावाला मार्शलच्या या बोलण्याची थोडी मौज वाटली व त्याच्याबद्दल थोडासा आदरहि वाटला. त्या सर्व बेताल नागरिकांपैकीं फार थोड्यांना

जाय-तहनामा काय आहे तें ठाऊक होतें. या तहनाम्याला पाठिंबा देऊन मार्शलनें देशद्रोह केला एवढी मात्र सर्वांची ठाम कल्पना होती. त्यांनीं त्या सिनेटराला एका वृक्षाच्या कापलेल्या बुंध्यावर बसविलें आणि 'आपली भूमिका स्पष्ट कर' असा त्याला हुकूम केला. मार्शलनें पूर्वींसारखीच विनोदानें बोलण्यास सुरुवात केली. त्यानें आपली भूमिका मोठ्या रुबाबांत सांगितली आणि आपल्या भाषणाच्या शेवटीं आपलें शत्रु आणि तेथें मेंढरासारखे उभे असलेले श्रोते या सर्वांची खूप खरडपट्टी काढली. या प्रसंगीं जमलेल्या श्रोत्यांविषयीं मार्शलनें पुढें एकदां लिहिलें आहे :

"ते लोक गरीब, अज्ञानी होते. मला नदींत बुडवून स्वतंत्रपणें आपलें मत व्यक्त करण्याच्या सन्मान्य कार्यासाठीं ते जमले होते. या देशभक्त जमावांत म्हातारा जॉन बिर्नेस हा दारुडा खाटिक जास्तींत जास्त सन्मान्य होता."

मार्शल हा केन्टुकीचा नवीनच सिनेटर झाला होता. त्याला त्या दिवशीं अखेरीस नदींत बुडविण्यांत आलें नाहीं. परंतु त्याची तिखट जीभ त्याची सिनेट-मधून सक्तीनें होण्याची हकालपट्टी टाळूं शकली नाहीं.

राजकीय धैर्याचीं अशीं उदाहरणें अर्थातच अमेरिकेच्या सिनेटमध्येंच घड-तात असें नव्हे. इतक्याच शौर्यानें व उत्साहानें कॉंग्रेसमनानें, राष्ट्रपतींनीं, गव्हर्नरांनीं अथवा खाजगी व्यक्तींनींहि आपल्या राजकीय महत्त्वाकांक्षेच्या कार्यांत धैर्य दाखविलें आहे. एकदोन उदाहरणें दिलीं असतां सिनेट अथवा राज-धानी वॉशिंग्टन यांनाच धैर्याचा मक्ता दिलेला नाहीं ही गोष्ट सिद्ध होईल.

साउथ कॅरोलिनाचा जॉन कल्हाऊन हा सिनेटमध्यें निवडून येण्यापूर्वींच पुष्कळ वर्षें प्रतिनिधिगृहांत सभासद होता. तेथलें त्याचें एक धैर्यकृत्य संस्मरणीय आहे. १८१६ सालीं कॉंग्रेसनें आपल्या सदस्यांचा पगार दर दिवसाला ६ डॉलर येथपासून वर्षाला १५०० डॉलर इतका वाढविला. त्यामुळें सर्व देशभर आणि सर्व पक्षांकडून कॉंग्रेसच्या निषेधपर अशी फार मोठी लाट उसळली. फार थोडे सदस्य निवडणुकीस पुन्हा उभे रहाण्याचें धैर्य दाखवूं शकले. हेन्री क्ले यानें अतिशय निकराची मोहीम काढून आपला पराभव अगदीं निमुळत्या बहुमतानें टाळला. कल्हाऊनच्या विश्वासू पाठीराख्यांनीं त्याला आग्रह करून सांगितलें कीं, "तूं एक निवेदन प्रसिद्ध कर आणि मतदार मला माफी करून पुन्हा निवडून देतील तर मी बिलाला विरोध करीन असें वचन मतदारांना दे." पण

कल्हाऊननें ती गोष्ट अमान्य केली. तो एकदां एका मित्राला म्हणाला, मी एकदां मनाचा निर्धार केला म्हणजे त्यापासून परावृत्त करण्याची शक्ति कोणाहि माणसांत नाहीं." कल्हाऊननें माघार घेतली नाहीं. किंबहुना वर्षाला १५०० डॉलर हा पगार फार कमी आहे असेंच मत त्यानें मांडलें.

साऊथ कॅरोलिनापैकीं त्याचे पुष्कळसे सहकारी पराभूत झाले. तरी सुद्धा कल्हाऊन निवडून आला. जुना आणि नवा असा जवळ जवळ तो एकच सभासद होता. बाकीच्या सर्व सभासदांनीं बिलाचा धिःकार चालविला. पण कल्हाऊन बिलाचा धिःकार न करता म्हणाला, "या प्रतिनिधिगृहांतील सभासदांना त्यांच्या स्वतंत्र बुद्धीस जसें वाटेल तसा निर्णय ठरविण्याचें स्वातंत्र्य आहे. लोकांना जें वर्तन आवडतें तसेंच आपण सर्व बाबतींत वागावें असें आपणांवर बंधन आहे काय ? या सभागृहाचा चर्चायुक्त विचार करण्याचा अधिकार लोकांनीं हिरावून घेतला आहे काय ? बिलाला विरोध करणाऱ्यांनीं हें सांगावें कीं, सामान्य जनतेनें केव्हां व कोणत्या जागीं जमून या विषयावर खल केला आहे ? नाहीं मुळींच नाहीं. येथल्या या सदस्यांना लेखी अथवा तोंडी सूचना लोकांकडून कांहींहि मिळालेल्या नाहींत. फक्त कायदा लोकांना आवडत नाहीं एवढेंच हे सदस्य जाणतात आणि म्हणून आपल्या सद्सद्विवेकबुद्धीस पटत नसताहि हे सभ्यगृहस्थ हें बिल नामंजूर करणार आहेत. असेंच जर घडणार असेल तर एकदां रूढ झालेल्या राजकीय चुका कधीं तरी दुरुस्त होतील काय ?"

सिनेटरला ज्या धैर्याच्या कसोटीला उतरावें लागतें त्या कसोटीला उतरण्याची पाळी अमेरिकेच्या राष्ट्रपतीवर येत नाहीं, त्याचा मतदारसंघ हा विशिष्ट प्रदेशाचा नसतो. एका गटांत अथवा एका प्रदेशांत एकाद्या विषयाबद्दल तो अप्रिय झाला तर त्याच विषयाबाबत दुसऱ्या गटांत अथवा दुसऱ्या प्रदेशांत तो लोकप्रिय होऊं अथवा राहूं शकतो. यामुळें त्याचें सामर्थ्य व त्याचें वजन सिनेटरापेक्षां अधिक सुरक्षित असतें. पण राष्ट्रपतिबाबतच्याहि एका उदाहरणावरून त्याच्यावर मतदार आणि खास हितसंबंध यांचें दडपण किती येतें हें कळून येतें.

राष्ट्रपति जॉर्ज वॉशिंग्टन यानें ग्रेट ब्रिटनशीं जाय-तहनामा केला त्यावेळीं लोक ब्रिटनशीं लढण्याला इतके उत्सुक होते कीं त्यांना तो 'तहनामा अमान्य होणार हे वॉशिंग्टनला माहीत होते. पण त्या युद्धांत आपण निभावणार नाहीं

हें लक्षांत घेऊन आपल्या तरुणांचे जीव वांचविण्याकरितां वॉशिंग्टननें तो तह-नामा केला. टॉम पेन् वॉशिंग्टनला म्हणाला. "तूं खाजगी मैत्रीस विश्वास-घातकी आहेस आणि सार्वजनिक जीवनांत ढोंगी आहेस....तूं तत्त्व सोडून पळून जाणारा आहेस कीं तत्त्वपुरस्काराचा तोतया आहेस हें ठरवतांना जगाचा गोंधळ उडेल. तूं चांगलीं तत्त्वें सोडलींस म्हणावें कीं तुला तत्त्वें काँहीं नव्हतींच ?" वॉशिंग्टन चिडून म्हणाला, "मी यावेळीं राष्ट्रपति असण्यापेक्षां थडग्यांत पडून रहाणेंच अधिक पसंत केलें असतें.' वॉशिंग्टन जेफर्सनला लिहितो:

"मी अमेरिकेचा शत्रू असून परकीय राष्ट्राच्या दडपणानें वागतों असा आरोप माझ्यावर केला जात आहे....माझ्या राज्यकारभाराच्या प्रत्येक कृत्याचा इतक्या अतिरिकानें विपर्यास केला जात आहे व त्यांची इतक्या गलिच्छ शब्दांत निंदा केली जात आहे कीं नीरोबद्दल अथवा एखाद्या कुप्रसिद्ध दिवाळखोराबद्दल अथवा सामान्य खिसेकापूबद्दलहि अशी शब्दयोजना कोणी करणार नाहीं."

शेवटीं वॉशिंग्टन जाय-तहनाम्यासंबंधानें खंबीर भूमिका घेऊन उभा राहिला.

या पुस्तकांत धैर्यवान सिनेटरांचीं उदाहरणें आहेत. त्यांतच धैर्यवान गव्हर्नराचें एक उदाहरण घालणें योग्य होईल.

ज्या गव्हर्नरानें राजकीय धैर्याचें कृत्य केल्यामुळें अमेरिकन सिनेटमध्यें निवडून जाण्याची त्याची महत्त्वाकांक्षा पूर्ण होऊं शकली नाहीं असें उदाहरण मी येथें निवडतों आहें. १८८६ सालीं शिकॅगोच्या प्रसिद्ध हे मार्केट स्क्वेअरमध्यें बॉम्बस्फोट झाला. त्यांत तीन आरोपींवर खटला होऊन खुनाच्या आरोपा-दाखल त्यांना फांशीची शिक्षा सांगण्यांत आली. खटल्याचे कागदपत्र फेरतपा-सणीसाठीं गव्हर्नरकडे गेले. अनेक साक्षीदारांचीं प्रतिज्ञापत्रें व कोर्टाचें इतर रेकॉर्ड इलिनॉईसचा गव्हर्नर जॉन पिटर अल्टजेल्ड यांजकडे गेलें. कागदपत्रांचा तो ढिगारा वाचून त्याची अशी खात्री झाली कीं, आरोपीविरुद्ध पुरावा अपुरा असून खटला न्याय्य पद्धतीनें झालेला नाहीं. डेमोक्रॅटिक पुढाऱ्यांनीं त्याला इशारा दिला कीं त्याला जर सिनेटमध्यें जाण्याची महत्त्वाकांक्षा असेल तर कोर्टांत आरोप सिद्ध झालेल्या या आरोपींना त्यानें विसरलें पाहिजे. पण गव्हर्नर आल्ट-जेल्ड यानें उत्तर दिलें, "न्यायाचें कृत्य हें अगदीं साधें व सरळ आहे. त्याच्या-आड येण्याचा हक्क कोणाच्याहि महत्त्वाकांक्षेला असूं शकणार नाहीं." त्यानें त्या आरोपींना माफी देण्यासाठीं त्यानें १८,००० शब्दांचें माफीपत्र लिहिलें. डेमो-

क्रॅटिक पक्षाच्या त्या प्रदेशांतील अध्यक्षानें गव्हर्नरला विचारलें, "हें चांगलें धोरण आहे काय ?" गव्हर्नरनें गर्जून उत्तर दिलें, "चांगलें असो नसो, हें न्याय्य धोरण आहे."

त्या गव्हर्नरच्या या कृत्याबद्दल त्याची प्रतिमा जाळण्यांत आली. परेडी-सारख्या समारंभांतून त्याला वगळण्यांत येऊं लागलें. "सोशॅलिस्ट", "खुन्यां-चा कैवारी", "बेबंदशाहीचा निर्माता" वगैरे विशेषणें त्याला वृत्तपत्रांनीं वापरलीं. १८९६ सालीं तो फेरनिवडणुकींत पराभूत झाला. तेव्हां नवीन निवडून आलेल्या गव्हर्नराच्या अधिकारग्रहणप्रसंगीं प्रारंभिक भाषण करण्याचा त्याचा रूढ हक्क त्याला नाकारण्यांत आला. (नवीन गव्हर्नर ओरडून म्हणाला, "ईलिनॉईसला या अराजकवादी गव्हराचें राज्य वस झालें आहे." जॉन पिटर आर्टजेल्ड अशा प्रकारें गव्हर्नरपदावरून खाजगी जीवनांत हाकालला गेला व पुढें सहा वर्षांनीं मृत्यु पावला.)

व्हॅचेल लिंडसे या कवीनें आल्टजेल्डवर 'विसलेला गरूड' या नांवाचें काव्य लिहिलें आहे. त्यांत सदर कवि लिहितो, "हे विस्मृत गरुडा, त्या शिळेखालीं झोप घे—काळ आणि माती तुझ्याशीं आपआपल्या पद्धतीनें वागली. हे शूर अंतःकरणाच्या आणि शहाण्या माणसा, दीर्घकाल निद्रा घे. तूं ज्योत पेटविली आहेस त्या ज्योतीचा प्रकाश सांगत आहे कीं—मोठ्या नांवाच्या किर्तीनें जगण्या-पेक्षां माणसासारखें जगणें हें फारफार थोर आहे !"

चार्ल्स इव्हॅन्स ह्युजेस हा १९२० सालीं कॉंग्रेसमनहि नव्हता अथवा गव्हर्नरहि नव्हता. पण तो त्यावेळीं देशांतील एक सर्वप्रमुख वकील होता, तो एक माजी गव्हर्नर होता, सुप्रीम कोर्टाचा एक न्यायाधीश होता. राष्ट्रपतिपदासाठीं त्याचें नांव सुचविण्यांत आलें होतें आणि त्याहूनहि अधिक मोठी जागा त्याला देण्यांत यावी असा विचार चालू होता. ( लवकरच तो सेक्रेटरी ऑफ स्टेट झाला आणि सरन्यायाधीशहि झाला.) या ह्यूजेसपुढें १९२० सालीं पुढील प्रश्न आला होता. कायद्यानें मान्य अशा एका पक्षाचे पाच सोशॅलिस्ट सदस्य न्यूयॉर्क राज्य विधान-सभेंत रीतसर निवडून आले असता त्यांचीं मतें लोकांना संमत नव्हती या सबबीवर त्यांना विधान सभेंत बसूं देण्याचें नियमबाह्यपणें नाकारण्यांत आलें. तेव्हां आपले प्रतिनिधि निवडण्याचा लोकांचा जो अधिकार त्यावर होणाऱ्या या आक्रमणास विरोध करून ह्यूजेसनें आपला सामाजिक दर्जा आणि व लोकप्रियता

यांना धोका आणला. ह्यूजेसला त्या पाच सोशॅलिस्टांचीं मतें पसंत नव्हतीं तरी न्यूयॉर्क बार असोसिएशनमध्यें निकराचें भांडण करून त्यानें कायदेमंडळापुढें त्या पाच जणांचा बचाव करण्यासाठीं स्वतांच्या अध्यक्षतेखालीं, एक खास कमिटी स्थापन करून घेतली.

नंतर कायदेमंडळापुढें ह्यूजेसला स्वतां व्यक्तिश: उभे राहूं देण्यांत आलें नाहीं, तेव्हां ह्यूजेसनें त्या पाच जणांच्या वतीनें एक अर्ज पाठविला. त्यांत त्यानें लिहिलें होतें कीं "जर कायदेमंडळांतल्या बहुमताला अल्पमतवाल्यांचीं मतें अपायकारक आहेत या सबबीवर अल्पमतवाल्यांना कायदेमंडळांत मज्जाव करता आला तर त्या राज्यसत्तेंतील व्यक्तिस्वातंत्र्याचा लोप झाला असेंच मानावें लागेल." त्याच्या या युक्तिवादाचा कायदेमंडळावर कांहींहि परिणाम झालेला दिसून आला नाहीं आणि कायदेमंडळानें त्या सभासदांना हाकून लाऊन त्यांचा पक्षहि बेकायदा ठरविला. पण पुष्कळांच्या मतें ह्यूजेसनें जवळजवळ एकटयानें व निर्भयपणें जें हें मतप्रदर्शन केलें त्याचा अप्रत्यक्ष परिणाम झालाच. कारण त्या कायदेमंडळानें शाळांतील जहाल मतप्रचारावर बंधनें घालणाऱ्या योजना पास केल्या असता गव्हर्नर अल स्मिथ यानें त्यांना मंजूरी देण्यास जो मोठ्या धैर्यानें नकार दिला त्यामागें ह्यूजेसच्या विचारांचीच प्रेरणा होती.

अमेरिकनांनीं दाखविलेल्या राजकीय धैर्याच्या या कथा संपवितांना हें राष्ट्र जन्मास येण्यापूर्वीं घडलेल्या एका धैर्यवान कृत्याची कथा येथें सांगतों. त्या एका कृत्यानें पुढील सर्वांना अतुल धैर्याचें उदाहरण घालून दिलें. ५ मार्च १७७० या दिवशीं अव्यवस्थित, प्रक्षुब्ध व शिव्यांच्या घोषणा करणाऱ्या एका जमावावर बोस्टनमधील स्टेट स्ट्रीटमध्यें ब्रिटिश पहारेकऱ्यांनीं पिसाटपणें गोळीबार केला. ब्रिटिशांनीं अंकित राष्ट्रांच्या गाऱ्हाण्याविषयीं दाखविलेल्या बेपर्वाईबद्दल त्यांना विरोध करणाऱ्या पुढाऱ्यांत त्या काळीं मॅसॅच्यूसेट्सच्या जॉन ॲडॅम्सचा समावेश होऊं लागला होता. शिवाय तो आपल्या समाजांत नाणावलेला वकील असून जनरल कोर्टाच्या पुढील निवडणुकींत तो उमेदवार होता. अशा स्थितींत बोस्टनच्या ब्रिटिश पहारेकऱ्यांनीं केलेल्या 'कत्तली'विरुद्ध बोस्टनमध्यें जी संतापाची लाट उसळली तींत सामील न होता ॲडॅम्सनें मौन धारण केलें असतें तरी तें त्याला फायदेशीर ठरलें असतें.

क्रॅटिक पक्षाच्या त्या प्रदेशांतील अध्यक्षानें गव्हर्नरला विचारलें, "हें चांगलें धोरण आहे काय ?" गव्हर्नरनें गर्जून उत्तर दिलें, "चांगलें असो नसो, हें न्याय्य धोरण आहे."

त्या गव्हर्नरच्या या कृत्यावद्दल त्याची प्रतिमा जाळण्यांत आली. परेडी-सारख्या समारंभांतून त्याला वगळण्यांत येऊं लागलें. "सोशॅलिस्ट", "खुन्यां-चा कैवारी", "बेबंदशाहीचा निर्माता" वगैरे विशेषणें त्याला वृत्तपत्रांनीं वापरलीं. १८९६ सालीं तो फेरनिवडणुकींत पराभूत झाला. तेव्हां नवीन निवडून आलेल्या गव्हर्नराच्या अधिकारग्रहणप्रसंगीं प्रारंभिक भाषण करण्याचा त्याचा रूढ हक्क त्याला नाकारण्यांत आला. (नवीन गव्हर्नर ओरडून म्हणाला, "ईलिनॉईसला या अराजकवादी गव्हराचें राज्य वस झालें आहे." जॉन पिटर आर्टजेल्ड अशा प्रकारें गव्हर्नरपदावरून खाजगी जीवनांत हाकालला गेला व पुढें सहा वर्षांनीं मृत्यु पावला.)

व्हॅचेल लिंडसे या कवीनें आल्टजेल्डवर 'विसलेला गरुड' या नांवाचें काव्य लिहिलें आहे. त्यांत सदर कवि लिहितो, "हे विस्मृत गरुडा, त्या शिळेखालीं झोप घे—काळ आणि माती तुझ्याशीं आपआपल्या पद्धतीनें वागली. हे शूर अंत:करणाच्या आणि शहाण्या माणसा, दीर्घकाल निद्रा घे. तूं ज्योत पेटविली आहेस त्या ज्योतीचा प्रकाश सांगत आहे कीं—मोठ्या नांवाच्या किर्तीनें जगण्या-पेक्षां माणसासारखें जगणें हें फारफार थोर आहे !"

चार्लस इव्हॅन्स ह्युजेस हा १९२० सालीं कॉंग्रेसमनहि नव्हता अथवा गव्हर्नरहि नव्हता. पण तो त्यावेळीं देशांतील एक सर्वप्रमुख वकील होता, तो एक माजी गव्हर्नर होता, सुप्रीम कोर्टाचा एक न्यायाधीश होता. राष्ट्रपतिपदासाठीं त्याचें नांव सुचविण्यांत आलें होतें आणि त्याहूनहि अधिक मोठी जागा त्याला देण्यांत यावी असा विचार चालू होता. ( लवकरच तो सेक्रेटरी ऑफ स्टेट झाला आणि सरन्यायाधीशहि झाला. ) या ह्यूजेसपुढें १९२० सालीं पुढील प्रश्न आला होता. कायद्यानें मान्य अशा एका पक्षाचे पाच सोशॅलिस्ट सदस्य न्यूयॉर्क राज्य विधान-सभेंत रीतसर निवडून आले असता त्यांचीं मतें लोकांना संमत नव्हती या सववीवर त्यांना विधान सभेंत बसूं देण्याचें नियमबाह्यपणें नाकारण्यांत आलें. तेव्हां आपले प्रतिनिधि निवडण्याचा लोकांचा जो अधिकार त्यावर होणाऱ्या या आक्रमणास विरोध करून ह्यूजेसनें आपला सामाजिक दर्जा आणि व लोकप्रियता

यांना धोका आणला. ह्यूजेसला त्या पाच सोशॅलिस्टांचीं मतें पसंत नव्हतीं तरी न्यूयॉर्क बार असोसिएशनमध्यें निकराचें भांडण करून त्यानें कायदेमंडळापुढें त्या पाच जणांचा बचाव करण्यासाठीं स्वतांच्या अध्यक्षतेखालीं, एक खास कमिटी स्थापन करून घेतली.

नंतर कायदेमंडळापुढें ह्यूजेसला स्वतां व्यक्तिशः उभे राहूं देण्यांत आलें नाहीं, तेव्हां ह्यूजेसनें त्या पाच जणांच्या वतीनें एक अर्ज पाठविला. त्यांत त्यानें लिहिलें होतें कीं "जर कायदेमंडळांतल्या बहुमताला अल्पमतवाल्यांचीं मतें अपायकारक आहेत या सबबीवर अल्पमतवाल्यांना कायदेमंडळांत मज्जाव करता आला तर त्या राज्यसत्तेंतील व्यक्तिस्वातंत्र्याचा लोप झाला असेंच मानावें लागेल." त्याच्या या युक्तिवादाचा कायदेमंडळावर कांहींहि परिणाम झालेला दिसून आला नाहीं आणि कायदेमंडळानें त्या सभासदांना हाकून लाऊन त्यांचा पक्षहि बेकायदा ठरविला. पण पुष्कळांच्या मतें ह्यूजेसनें जवळजवळ एकट्यानें व निर्भयपणें जें हें मतप्रदर्शन केलें त्याचा अप्रत्यक्ष परिणाम झालाच. कारण त्या कायदेमंडळानें शाळांतील जहाल मतप्रचारावर बंधनें घालणाऱ्या योजना पास केल्या असता गव्हर्नर अल स्मिथ यानें त्यांना मंजूरी देण्यास जो मोठ्या धैर्यानें नकार दिला त्यामागें ह्यूजेसच्या विचारांचीच प्रेरणा होती.

अमेरिकनांनीं दाखविलेल्या राजकीय धैर्याच्या या कथा संपवितांना हें राष्ट्र जन्मास येण्यापूर्वीं घडलेल्या एका धैर्यवान कृत्याची कथा येथें सांगतों. त्या एका कृत्यानें पुढील सर्वांना अतुल धैर्याचें उदाहरण घालून दिलें. ५ मार्च १७७० या दिवशीं अव्यवस्थित, प्रक्षुब्ध व शिव्यांच्या घोषणा करणाऱ्या एका जमावावर बोस्टनमधील स्टेट स्ट्रीटमध्यें ब्रिटिश पहारेकऱ्यांनीं पिसाटपणें गोळीबार केला. ब्रिटिशांनीं अंकित राष्ट्रांच्या गाऱ्हाण्याविषयीं दाखविलेल्या बेपर्वाईबद्दल त्यांना विरोध करणाऱ्या पुढाऱ्यांत त्या काळीं मॅसॅच्यूसेट्सच्या जॉन अॅडॅम्सचा समावेश होऊं लागला होता. शिवाय तो आपल्या समाजांत नाणावलेला वकील असून जनरल कोर्टाच्या पुढील निवडणुकींत तो उमेदवार होता. अशा स्थितींत बोस्टनच्या ब्रिटिश पहारेकऱ्यांनीं केलेल्या 'कत्तली'विरुद्ध बोस्टनमध्यें जी संतापाची लाट उसळली तींत सामील न होता अॅडॅम्सनें मौन धारण केलें असतें तरी तें त्याला फायदेशीर ठरलें असतें.

पण ब्रिटिश राजसत्तेच्या या कट्टया शत्रूला आरोपी पाहारेकऱ्यांचा बचाव करण्याचें काम पत्करण्याची विनंति करण्यांत आली असतां त्यानें निर्भयपणें तें काम पत्करलें. अॅडम्स या खटल्यासंबंधानें पुढें आत्मचरित्रांत लिहितो, "या खटल्यानें मला अगदीं दमवून सोडलें. मीं मोठ्या प्रयत्नानें मिळविलेली माझी लोकप्रियता धोक्यांत आली आणि लोकांच्या मनांत माझ्यासंबंधानें निर्माण झालेले संशय व गैरसमज अजूनहि गेलेले नाहींत." पण अॅडम्सनें अखेरपर्यंत त्या पहारेकऱ्यांची वकीली केली इतकेंच नव्हे तर त्यांना निर्दोषी म्हणून सोडवून घेतलें. त्यांनीं केलेला गोळीबार प्रक्षोभकारण नसतां केवळ दुष्ट बुद्धीनें केला असें मानण्याला पुरेसा पुरावा नाहीं असें अॅडम्सनें त्या गच्च भरलेल्या कोर्टापुढें सिद्ध केले. अॅडम्स म्हणाला,

"आमच्या इच्छा, आमच्या मनाचा कल, अथवा आमच्या भावनांच्या प्रेरणा कांहींहि असोत, त्यामुळें वस्तुस्थिति व पुरावा यांनीं सिद्ध केलेली परिस्थिति बदलत नाहीं. लोकांच्या अनिश्चित इच्छा, कल्पना अथवा बेताल भावना यापुढें कायदा नमणार नाहीं.

ज्यूरींतील सभ्यगृहस्थ हो, कोर्टापुढें असलेल्या आरोपी कैद्यांची बाजू मीं घेतली आहे. आणि या भूमिकेचें समर्थन करण्यासाठीं मी मार्क्विस ऑफ् बॅकेरिया याचे उद्गार आपल्यापुढें मांडतों. तो मार्क्विस म्हणाला, 'मीं जरी एक जीव बचावण्याला कारणीभूत झालों तरी त्याचे आशीर्वाद व अश्रु यांमुळें मला एवढें समाधान मिळेल कीं त्यापुढें साऱ्या मानव जातीनें माझा धिक्कार केल्याचें दुःख मी सहन करीन.'" हाच अॅडम्स पुढें एक थोर राष्ट्रपति झाला आणि त्याचा मुलगा एक स्वतंत्र वृत्तीचा सिनेटर व राष्ट्रपति झाला.

प्रकरण ११ वें

# धैर्याचा अर्थ

धैर्य आणि राजकारण यासंबंधीचा हा ग्रंथ आहे. राजकारणानें धैर्याला अनुकूल अशी परिस्थिति दिली. धैर्यगुणानें त्यांत कथावस्तु निर्मिली. धैर्य हा सार्वत्रिक सद्गुण असून कोणासहि तो ओळखता येतो. पण धैर्यशीलांचीं जीं शब्दचित्रें या ग्रंथात आलीं आहेत त्यांतील राजकारणांतलें गूढ सहजासहजीं लक्षांत येत नाहीं.

या ग्रंथांत आतांपर्यंत ज्यांच्या कथा सांगितल्या त्यापैकीं कोणाच्या कथेंत त्या नायकाचे हेतु व त्याचें यश यासंबंधानें स्पष्ट रेखीव चित्र पाहायला मिळत नाहीं. प्रत्येकाच्या चरित्रांतील गुंतागुंत, विसंगति, संशय वाचकाला भंडावून सोडतात. यांतील प्रत्येकाच्या चरित्राचा अभ्यास कितीहि तपशीलानें केला तरी हा प्रत्येक जण शेवटीं एक दुर्बोध कोडेंच ठरतो. त्याच्या धैर्ययुक्त कृत्याचा परिणाम जरी कितीहि स्पष्ट असला तरी त्याच्या प्रेरक कारणांवर जो बुरखा पडलेला आहे तो फाडून काढता येतच नाहीं. आपण मोठ्या आत्मविश्वासानें त्यांचीं प्रेरक कारणें सांगूं, पण कोणती तरी गोष्ट आमच्या दृष्टींतून सुटली आहे असें वाटतें. आमच्या प्रश्नाचें उत्तर आमच्या मुठींत आहे असें आम्हांला वाटतें, तरीपण तें आमच्या बोटांतून निसटून गेलेलें असतें.

कोणीहि मानसशास्त्रज्ञ आपणास सांगतील कीं कोणत्याहि कार्याचा प्रेरक हेतु अचूकपणें ताडणें हें कठिणच आहे. राजकारणाच्या गढूळ सागरांत तर हे हेतुसंशोधन फारच अवघड ठरतें. डॅनिअल वेब्स्टर, सॅम ह्यूस्टन यांच्या सारख्यांनीं राष्ट्रीय हितासाठीं प्रादेशिक हिताचा त्याग केला. पण अधिक उच्चजागाबद्दलची त्यांची महत्त्वाकांक्षा गुप्त नव्हती. यामुळें त्यांनीं दाखविलेलें धैर्य राष्ट्रपतिपद प्राप्त करून घेण्याच्या महत्त्वाकांक्षेवर नजर ठेवून दाखविलें होतें

असा आरोप त्यांच्यावर येऊं शकलाच. जॉन क्विन्सी ॲडॅम्स, एडमंड रॉस यांच्यासारख्या ज्यांनीं व्यापक तत्त्वासाठीं आपापला पक्ष सोडला, त्यांनीं अधिकाराची जागा स्वीकारतांना ज्या संघटनेचा आधार घेतला त्यांचा ऐन संकटकाळीं त्याग करून जबाबदारीपासून त्यांनीं पळ काढला असा आरोप त्यांचेवरहि आला.

पण मीं या ग्रंथांत ज्या धैर्यशीलांच्या कथा दिलेल्या आहेत त्यांतील त्यांच्या त्या धैर्ययुक्त कृत्याबाबत त्या त्या थोर पुरुषांचीं संबंध चरित्रें दीर्घकाल अभ्यासून माझी खात्री झाली आहे कीं, या धैर्ययुक्त कृत्यांचे प्रेरक हेतु खाजगी अथवा राजकीय स्वार्थ या जातीचे नसून राष्ट्रीय हितदृष्टीचेच होते. याचा अर्थ असा नव्हे कीं यांतील कोणीहि प्रथम कठोर मार्ग आक्रमून गेल्यानंतर त्यांतून पुढें वैयक्तिक फायदा मिळविण्याचा प्रयत्न केलाच नाहीं. (ज्यांनीं असा प्रयत्न केला त्यांतील कोणाला क्वचितच यश आलें आहे.) कारण हे सर्व लोक राजकारणी होते हें उघड आहे. (असें म्हणणें म्हणजे त्यांना कमी लेखणें मुळींच नव्हे.) आणि राजकारणी माणसांनीं आपल्या धैर्याच्या कृत्यापासून फायदा उठवावा हें खास समर्थनीय आहे.

अर्थात् यांतील प्रत्येक वीर पुरुषानें उच्च तत्त्वाचे पायीं स्वतांची कारकीर्द अर्पण करतांना स्वहित विचारांतून अजीबात काढून टाकलें असें जर आपण मानलें तर या ग्रंथांत वर्णिलेलीं त्यांचीं धैर्याचीं कृत्यें परम्परागत वीरपुरुषांच्या कथांसारखीं तेजःपुंज व स्फूर्तिदायक ठरतील. पण वस्तुस्थिति अशी असणार नाहीं. राष्ट्रपति जॉन ॲडॅम्स हा जास्तींत जास्त अनासक्त आणि तितकाच शहाणा सरकारी अधिकारी होऊन गेला. त्यानें 'अमेरिकन घटनेचें समर्थन' या नांवाच्या ग्रंथांत "कोणाचेंहि स्वतांवर प्रेम असतें त्यापेक्षा जनतेवर अधिक प्रेम असतें असें म्हणणें हें नेहमीं वस्तुस्थितीला सोडूनच आहे" असें मत मांडलें आहे. ॲडॅम्सचें हें म्हणणें सत्य परिस्थितीला जास्तींत जास्त जवळ आहे.

तर मग या पुस्तकांत वर्णिलेल्या धैर्यवान पुरुषांनीं जीं धैर्याचीं कृत्यें केलीं तीं त्यांनीं कां केलीं ? "स्वतःवर त्यांचें प्रेम होतें त्यापेक्षा लोकांवर त्यांचें अधिक प्रेम होतें म्हणून हीं कृत्यें त्यांनीं केलीं असणें खास शक्य नाहीं. उलट त्यांचे स्वतांवर प्रेम होतें म्हणूनच त्यांनीं तीं कृत्यें केलीं. त्यांतल्या प्रत्येकाला लोकांत प्रिय राहण्याची इच्छा जेवढी होती त्यापेक्षां स्वतांबद्दल स्वतांला आदर

वाटत राहणें हें त्याला प्रत्येकाला अधिक महत्त्वाचें वाटत होतें. आपली जागा टिकवून धरण्यापेक्षां प्रामाणिकपणाबद्दलचा लौकिक मिळविणें व टिकविणें हें प्रत्येकाला अधिक महत्त्वाचें वाटत होतें. त्या प्रत्येकाची सदसद्विवेकबुद्धि, त्याच्या वैयक्तिक नीतिमत्तेचें त्यानें ठरविलेलें अत्यवश्य प्रमाण, त्याचा प्रामाणिकपणा अथवा नीतिमत्ता, यांचें दडपण त्याच्यावर येणाऱ्या लोकांच्या नापसंतीच्या दडपणापेक्षा अधिक होतें. आपला मार्ग हाच बरोबर आहे व तसें अखेर सिद्ध होईल याबद्दल त्याला असलेला त्या प्रत्येकाचा आत्मविश्वास लोक आपणास शासन करतील या भीतीपेक्षा अधिक बलवान ठरला.

जरी अखेरीस या लोकांच्या त्या त्या वर्तनानें अप्रत्यक्षपणें जनतेचें हित साधलें तरी लोकहिताच्या या केवळ मोघम व सामान्य कल्पनेसाठीं या शूर पुरुषांनीं तो सारा छळ सोसलेला नाहीं. त्या छळाला कारणीभूत झालेलीं ती धैर्याचीं कृत्यें त्यांनीं स्वतांवरील प्रीतीमुळें अथवा ती प्रीति आणि इतर भावना यांच्या सामुहिक प्रेरणेमुळें केलीं. खरोखर ज्यावेळीं एकाद्या मुत्सद्याचें लोकांवरहि फारसें प्रेम नसतें व स्वतांवरहि नसतें, अथवा जेव्हां त्याचें स्वतांवरील प्रेम मर्यादित असतें व ऑफिसचा गणवेष मिळाला कीं त्याचें समाधान होतें तेव्हां अशा अधिकाऱ्याचे हातून कांहींहि लोकसेवा होत नाहीं. उलट ज्याचें स्वतांबद्दलचें मत इतकें उच्च असतें कीं, सदसद्विवेकबुद्धि व धैर्य या मार्गानेंच आपण गेलें पाहिजे अशी प्रेरणा त्याला त्याचा स्वाभिमानच देत असतो तेव्हांच लोकांचें हित होईल असें कृत्य त्याच्या हातून होतें. जॉन कल्हाऊन म्हणतो,

"साऊथ कॅरोलिनाला अमुक एका योजनेबद्दल काय वाटतें हें मला कधींच कळत नाहीं. मी त्या जनतेला कधींच विचारीत नाहीं. माझ्या तर्काला व सदसद्विवेकबुद्धीला योग्य दिसेल तसें मी वागतों. लोकांना हें करणें आवडलें तर बरेंच. पण माझें करणें लोकांना न आवडून त्यांना माझ्या जागीं दुसऱ्या कोणाला नेमायचें असलें तर माझी जागा सोडायला मी तयार आहें."

याचा अर्थ असा नव्हे कीं झगडणारे मुत्सद्दी व ते ज्या तत्त्वासाठीं झगडतात तीं तत्त्वें हीं नेहमींच बरोबर असतात. जॉन क्विन्सी अॅडम्ससंबंधानें असें सांगितलें जातें कीं त्याच्या व्यापारबंदीच्या धोरणानें न्यू इंग्लंडचा पूर्ण नाश होईल, पण ब्रिटनला नुसता संतापहि येणार नाहीं हें त्याला कळायला हवें होतें. डॅनिअल वेब्स्टरच्या टीकाकारांचें असें मत आहे कीं त्यानें गुलामगिरीच्या पुरस्कर्त्यांची निष्कारण मनधरणी केली. थॉमस हार्ट बेंटनला त्याचे टीकाकार एक हट्टी, देखावे-

बाज, घमेंड्या म्हणतात. सॅम हौस्टन हा, त्याच्या टीकाकारांच्या मतें, लबाड, मतें बदलणारा व अविश्वासू होता. एडमंड रॉसनें घटना मोडणाऱ्या व कॉंग्रेसची अवज्ञा करणाऱ्या राष्ट्रपति जॉन्सनला आपल्या मतानें पाठिंबा दिला असा रॉस-वर त्याच्या टीकाकारांचा आरोप आहे. अनियंत्रित मंदीच्या संकटापेक्षा नियोजित चलनफुगवटीचीं दुःखें ही पुष्कळदां अधिक सुसह्य असतात हें लामारच्या लक्षांत आलें नाहीं असें कांहीं टीकाकारांनीं म्हटलें आहे. नोरिस व टॅफ्ट यांच्या वर्तनाचा प्रेरक हेतु राज्यघटनेच्या तत्त्वापेक्षा जागतिक राजकारणापासून अमेरिकेनें अलग राहावें हा अंध अलगवाद होता असें त्यांच्या टीकाकारांचें म्हणणें आहे.

अशी आणखी किती प्रकारची टीका या शूर पुरुषांच्या त्या त्या कर्तृत्वावर झाली आहे. या पुरुषांनीं ज्या मार्गाबद्दल लढे केले त्यांची गुणावगुणचिकित्सा आपण प्रत्येक जण आपापल्या परीं करूं शकतों.

पण या लोकांच्या धैर्याचें कौतुक करण्यासाठीं वरील प्रश्न प्रथम सोडविलाच पाहिजे काय ? एकादी घटना घडून गेल्यावर त्या घटनेसंबंधानें उच्च तत्त्व कोणतें तें ठरविणें व त्या उच्च तत्त्वासाठीं पूर्वीं ज्यांनीं धैर्य दाखविलें असेल त्यांचाच भावी पिढ्यांनीं गौरव करावा असें म्हणणें हें कसें योग्य होईल ? ज्या अमेरिकेंत भावानें भावावर शस्त्र धरलें तेथें एखाद्याच्या रणांगणावरील शौर्याचें कौतुक करण्यासाठीं कोणाचें निशाण कोणतें होतें हें कसें पाहता येईल ?

ज्यांनीं आपणाला योग्य वाटलें तेंच बोलण्यासाठीं आपली सारी कारकीर्द पणाला लावली त्या माणसांचें तें वर्तन योग्यच होतें असें म्हणण्याचा माझा आग्रह नाहीं. खरोखर १८५०च्या तडजोडीबाबत वेब्स्टर, बेंटन व हौस्टन हे तिघेहि बरोबर असणार नाहींत. कारण प्रत्येकाचें उद्दिष्ट संघराज्य टिकविणें हेंच असूनहि त्या मोठ्या ठरावावर प्रत्येकाचें मत इतरांपासून सर्वथैव वेगळें होतें. लुसिअस लामारनें, आपल्या कायदेमंडळाचा आदेश मानला नाहीं व सिनेटचा राजीनामा देण्याचेंहि नाकारलें तरी तो धैर्यवान ठरलाच. पण जॉन टायलरनें आपणास निवडणाऱ्या कायदेमंडळाचा आदेश आपणावर बंधनकारक आहे असें मानून तो पाळणें तत्त्वाच्या दृष्टीनें अनिष्ट वाटताच सिनेटचा राजीनामा दिला व तोहि धैर्यवान ठरलाच. टायलर अॅडॅम्सचा तिरस्कार करी. अॅडॅम्सला वेब्स्टरचें अंतःकरण नासकें आहे असें वाटत असून त्याच्या मत्सरी व लाचखाऊ स्वभावाचा अॅडॅम्सला तिटकारा वाटे. नोरिस व टॅफ्ट एकाच रिपब्लिकन पक्षांत असूनहि त्यांचें एकमत नव्हतें. कल्हाऊन व बेंटन दोघेहि डेमोक्रॅट पण त्यांच्यांत मतभेद होतेच.

हे सर्व थोर पुरुष एकाच बाजूस नव्हते. ते सारे अचूक नव्हते, सारेच कॉन्झ-र्वेटिव्ह अथवा लिबरल नव्हते. त्यांतील कांहीं जण आपल्या बोलक्या पण अल्प-संख्य मतदारांच्या विरोधी वर्तन करीत असता बिनमुखी अशा बहुसंख्य मत-दारांच्या भावनेला सुसंगत वागले असतील हें शक्य आहे. पण त्यांतले पुष्कळ-जण बहुसंख्य मतदारांच्या विरुद्ध वागले हेंच खरें आहे. त्यांतले कांहीं जण आपल्या अदूरदृष्टीच्या व पूर्वग्रहदूषित मतदारांच्या विरुद्ध वागत असता खरोखर आपापल्या प्रदेशाचें दीर्घकालीन हितच साधत असावे. पण कांहीं लोकांचें वर्तन असें नव्हतेंहि. त्यांतले कांहीं जण अमेरिकेच्या वीरपरंपरेनुसार आपल्या सर्व जीवनांत शुद्ध, उदार, दयाळू व उमदे असतील. पण यांतले बहुतेक तसे नाहींत. नोरिस हा हट्टी असून शेवटीं तेढ वाढविणारा होता. ॲडॅम्स हा चीड आणणारा उद्धट माणूस होता. वेब्स्टर हा धंदेवाल्याकडून पैसा उपटणारा होता. बेंटन हा बोलघेवडा गुंड होता. अमेरिकेच्या वास्तव जीवनांतले राजकीय शूर पुरुष हे सारे अशा गुणावगुणाचे बनलेले आहेत.

कांहींनीं एकांतिक तत्त्वावरील अदम्य निष्ठेसाठीं धैर्य दाखविलें. दुसऱ्या कांहींनीं तडजोड स्वीकारण्यांत, सलोख्याच्या भूमिकेचा पुरस्कार करण्यांत, कलह थांबवून सहकाराचा अवलंब करण्यांत धैर्य दाखविलें. या सर्वांची मानसिक कुवत वेगवेगळी होती, पण त्यांचा धैर्यगुण सारखाच होता. कारण अमेरिकन सरकारची पद्धतिच अशी आहे की जॉन क्विन्सी ॲडॅम्सप्रमाणें प्रत्येक माणूस संपूर्ण निर्दोष असून आपल्या प्रादेशिक हिताचा फारसा विचार न करतां उच्च गणितशास्त्रांतल्या पद्धतीनें वागला असता तर अमेरिकन राज्यपद्धति चाल-लीच नसती.

या सर्व महापुरुषांत फरक पुष्कळ होता तरी त्यांच्यांत सर्वांना साधारण असे गुणहि पुष्कळ होते. उत्कृष्ट वक्तृत्व, पंडितांची बुद्धिमत्ता, पक्ष व प्रदेश यापलीकडे पाहणारी व्यापक दृष्टि, आणि या सर्वांहून अधिक म्हणजे दृढ आत्म-विश्वास, प्रामाणिकपणा आणि आपली बाजू न्याय्य असल्याबद्दलची खात्री हे गुण त्या सर्वांच्या अंगीं होते.

× × ×

राजकीय हेतूबद्दल जसा लोकांचा गैरसमज होत असतो तसाच धैर्य म्हणजे काय हें ठरविण्याबाबतहि लोकांचा गैरसमज होत असतो. कांहींना धैर्याच्या कृत्यांतील प्रक्षोभयुक्त लढे पाहून मौज वाटते, पण त्याचे परिणाम लक्षांत येत नाहींत. कांहींना एका प्रकारचें धैर्य निराळ्या काळीं निराळ्या लोकांनीं दाख-

विलेलें पाहून कौतुक वाटतें. पण विद्यमान काळांतल्या अमुक माणसांनीं तसेंच धैर्य दाखविलें तर या लोकांच्या लक्षांत तें येत नाहीं. कदाचित् राजकीय धैर्याच्या ज्या कथा या ग्रंथांत सांगितल्या आहेत त्यांचें वैशिष्ट्य लक्षांत येण्यासाठीं हें पुस्तक कोणत्या हेतूनें लिहिलेलें नाहीं तें येथें सांगतों.

स्वतंत्र वृत्ति हा एकांतिक सद्‌गुण मानून, कोणतीहि तडजोड हटवादीपणानें धुडकावणें अथवा स्वतांच्या मताला फाजील हट्टानें व गर्विष्ठपणानें चिकटून राहणें या जातीच्या स्वतंत्र वृत्तीचें समर्थन या ग्रंथांत केलेलें नाहीं. प्रत्येक प्रश्नाला एक न्याय्य व एक अन्याय्य बाजू असून प्रत्येक सिनेटरानें (फक्त धूर्त व मूर्ख सोडून बाकीच्यांनीं) न्याय्य बाजूच घेतली पाहिजे असें सुचविण्याचाहि या ग्रंथाचा उद्देश नाहीं. उलट ब्रिटिश पंतप्रधान मेलबोर्न म्हणाला त्याप्रमाणें कोणत्याहि वेळीं नेमकें योग्य अथवा अयोग्य काय हें कळत नाहीं असें माझेंहि मत आहे. (मेकॉले या तरुण इतिहासकाराच्या टीकेनें चिडून जाऊन मेलबोर्न एकदां म्हणाला, "मेकॉलेला ज्या प्रकारें एकाद्या गोष्टीबद्दल अतिशय खात्री असते अशी मलाहि असती तर बरें झालें असतें.") मी नऊ वर्षें काँग्रेसमध्यें असून मला लिंकनच्या पुढील वचनांतलें शहाणपण पटलें आहे. लिंकन म्हणतो, "सर्वथैव चांगल्या अथवा सर्वथैव वाईट अशा फार थोड्या गोष्टी असतात. बहुतेक बाबी, विशेषत: सरकारी धोरणें ही बऱ्यावाइटाची भेळ असते. त्यांतलें चांगलें व वाईट वेगवेगळें काढता येत नाहीं. म्हणून त्या दोहोंत कोणाचें आधिक्य होत असतें हें नेहमीं पाळत ठेवून पाहावें लागतें."

तसेंच पक्षशिस्त व पक्षीय जबाबदारी या गोष्टी अपरिहार्य अशा आपत्ति असून आपले निर्णय ठरविताना त्यांचा विचार करूं नये असें सांगण्याचाहि या ग्रंथाचा उद्देश नाहीं. आपलें राज्य अथवा आपला प्रदेश यांच्या हिताचा विचार कधीं करूंच नये असेंहि सूचित करण्याचा या ग्रंथाचा उद्देश नाहीं. उलट कोणत्याहि सिनेटराची निष्ठा त्याचा पक्ष, त्याचें राज्य, त्याचा प्रदेश, अमेरिकन राष्ट्र व ज्याची त्याची सद्सद्विवेक बुद्धि या सर्वांत विभागलेली असते. पक्षीय मुद्यांबाबत त्याची पक्षीय निष्ठा हीच अंतिम नियामक ठरेल. प्रादेशिक वादांत प्रादेशिक जबाबदारी विचारांत घेऊनच त्यानें सामान्यत: वागलें पाहिजे. पण ज्यावेळीं एकादा राष्ट्रीय मुद्दा वादास येतो अथवा एकादा सद्सद्विवेकबुद्धीचा प्रश्न वादास येतो त्यावेळीं धैर्य कसोटीस लागण्याचा प्रसंग येतो.

आपल्या राष्ट्रपतीशीं अथवा पक्षाशीं अथवा राष्ट्रांत जोरानें उफाळणाऱ्या भावनावेगाशीं झुंज देतांना धैर्याची गरज लागेल. पण यापेक्षा अधिक मोठें

धैर्य आपलें सारें भवितव्य ज्यांच्यावर अवलंबून त्या आपल्या मतदारसंघाच्या संतप्त शक्तीशीं झुंज देतांना लागत असतें. जॉन रँडॉल्फ, थाडिअस स्टीव्हन्स, रॉबर्ट लाफॉलीट इत्यादि या देशांतल्या प्रसिद्ध 'बंडखोरां'चीं च रत्नें मीं या ग्रंथांत घेतली नाहींत त्याचें कारण हें कीं हीं माणसें जरी धैर्यवान व प्रामाणिक होतीं तरी त्यांचा लढा चालू असता त्यांना स्वप्रदेशांतील मतदारांचा आपणास पाठिंबा आहे याची नेहमीं जाणीव होती.

शेवटीं आणखी एक गोष्ट मी येथें सांगूं इच्छितों कीं लोकशाही सरकार व प्रातिनिधिक सत्ता यांना कमी लेखण्यासाठीं हें पुस्तक लिहिलेलें नाहीं. मतदार संतापतात आणि तत्त्वनिष्ठ प्रतिनिधीचा अन्यायानें धिक्कार करतात हें खरें, पण म्हणून सार्वत्रिक मताधिकार देणें चूक आहे असें नव्हे, थोर सत्कृत्यें करणाऱ्या लोकांना त्या सत्कृत्यासाठीं लोकांच्याकडून क्रूर निंदा झालेली सोसावी लागली तरी पण राष्ट्रीय हिताहिताच्या बाबींत लोकांच्या भावना विचारांतच घेऊं नये असें अनुमान त्यापासून काढता येत नाहीं. कारण विन्स्टन चर्चिल म्हणतो "लोकशाही हा अतीशय वाईट राज्य प्रकार आहे—मात्र आजवर जे जे राज्य-प्रकार अमलांत आले ते याहून अधिक चांगले नव्हते." आपण लोकशाहीच्या पद्धति सुधारूं शकूं, लोकशाहीच्या प्रश्नाबाबत आपली जाणीव आपण अधिक उच्च करूं शकूं आणि ज्या प्रामाणिक माणसांना वेळोवेळीं लोकमतास विरोध करून वागावें लागतें त्यांच्या बद्दलचा आपला आदर आपण वाढवूं शकूं, पण लोकशाही रद्द करून अथवा तिची कापाकापी करून कायदेमंडळाच्या स्वातंत्र्याचे व जबाबदारीचे प्रश्न सोडवूं म्हटलें तर तें अशक्य आहे.

प्रातिनिधिक सरकार व बहुमताचें राज्य म्हणजे लोकशाही ही एक प्रचंड बहुसंख्य मतदारांच्या गटाला खुष करण्याची व फसविण्याची संघटना असते, इत्यादि या गोष्टी कांहींशा खऱ्या असल्या तरी लोकशाहीचा अर्थ यापेक्षा फार अधिक आहे. उदाहरणार्थ ज्या लोकशाहींत जॉर्ज नोरिस नाहीं, खवळलेल्या लोकमताच्या सागराशीं झगडणारी सदसद्विवेकशक्ति प्रतीकरूपानें ज्या लोक-शाहींत आढळत नाहीं अशी लोकशाही 'लोकशाही' या नांवालाच पात्र नाहीं. खरोखर जिवंत, वाढती व स्फूर्तिदाती अशी जी लोकशाही असते ती लोकांवर विश्वास ठेवते, जीं माणसें लोकांचे प्रतिनिधित्व विश्वासानें व समर्थपणें करतील अशा माणसांनाच नव्हे तर जीं माणसें सदसद्विवेकबुद्धीस विचारून वागतील अशा माणसांनाहि अशी लोकशाही निवडून देतें; जीं माणसें आपल्या तत्त्वनिष्ठे-साठीं लोकांना प्रिय नसणारे मार्ग अवलंबतात अशा माणसांचा धिक्कार न

करता त्यांच्या धैर्याबद्दल अशी लोकशाही त्यांना बक्षीस देते. आपल्या प्रतिनिधीनें दाखविलेल्या स्वाभिमानाबद्दल अशी लोकशाही आदर व्यक्त करतेच; अखेरीस व्यक्तिमात्राच्या हक्काला ती मान देते; अशी लोकशाही हीच खरी लोकशाही होय.

या पुस्तकांतील कथा अशा लोकशाहीबद्दलच्या आहेत. या राष्ट्रानें जर मत-प्रदर्शन व मतभेद व्यक्त करण्याच्या स्वातंत्र्याचा वारसा टिकवला नसता, निरनिराळ्या मतामतामधला प्रामाणिक विरोध पोसला नसता, लोकांना मान्य नसणाऱ्या मताबद्दल सहिष्णुता दाखविण्याच्या प्रवृत्तीस उत्तेजन दिलें नसतें तर या ग्रंथांत सांगितेलेल्या कथा घडल्याच नसत्या. आम्ही प्रत्येक प्रकरणाचा सुखद शेवट केला नाहीं म्हणून कुत्सित वाचक आम्हांस दोष देतील. पण धैर्य दाखविण्याविरुद्ध इषारा म्हणून या कथा लिहिल्या आहेत, असें कोणी मानणार नाहीं अशी अपेक्षा आहे. कारण लोकमताच्या दडपणाशीं ज्यांनीं झुंज दिली अशांनाच राजकीय क्षेत्रांत सतत यश येत गेलें अथवा कांहींनीं पुरस्कारिलेलीं तत्त्वें दीर्घकालाचे अखेरीसच खरीं आहेत हें सिद्ध झालें. यामुळें लोक दीर्घकाळानें कां होईना योग्य असाच निर्णय ठरवितात, अशी श्रद्धा बाळगणें शक्य होतें.

आणि म्हणून पूर्वकाळीं ज्यांनीं धैर्य दाखविलें अथवा भविष्यकाळीं ज्यांनीं धैर्य दाखविणें जरूर आहे, अशीं माणसें फक्त सिनेटमध्येंच असतील असें नव्हे. आपल्या देशांत लहान अथवा मोठ्या जागेवर जो कोणी अधिकारी असेल, आणि मग तो कोणालाहि जबाबदार असो, अशा प्रत्येक अधिकाऱ्याला धैर्य दाखवून व सद्सद्विवेकबुद्धीला प्रामाणिक राहून जे प्रश्न सोडविणें अवश्य आहेत असे प्रश्न हाताळावे लागतीलच. इतकेंच नव्हे तर मतदार, कायदेमंडळाचे सदस्य, राजकीय संघटना, पक्षसंघटना इत्यादींनाहि असे प्रश्न हाताळावे लागतील. आमच्या देशांतील प्रत्येक मतदाराच्या जिव्हाळ्याचे हे प्रश्न आहेत. इतकेंच नव्हे तर जे मतें देत नाहींत, सरकार या संस्थेबाबत ज्यांना कांहींहि आस्था नाहीं, राजकारणी माणूस आणि त्याचा धंदा याबद्दल केवळ ज्यांना तिटकारा आहे अशा लोकांच्याहि जिव्हाळ्याचे हे प्रश्न असतास. ज्यांनीं मोठे अधिकारी लांचखाऊ आहेत अशी तक्रार केली असेल आणि ज्यांनीं आपल्या प्रतिनिधीनें आपली इच्छा अमलांत आणावी असा हट्ट धरला असेल अशा सर्वांना धैर्य व सद्सद्विवेकबुद्धि यांची गरज लागणारे प्रश्न हे आपल्या जिव्हाळ्याचे होत असें मानावें लागेल. कारण लोकशाहींत प्रत्येक नागरिकाचे हितसंबंध कांहींहि असोत, तो नागरिक "अधिकाराच्या जागेवर आहेच." आपणां-

पैकीं प्रत्येकजण जबाबदारीच्या भूमिकेवर आहे. सर्व गोष्टींचा विचार केला असता अखेरीस असें दिसून येतें कीं कोणत्याहि प्रकारच्या राज्यपद्धतीच्या जबाबदाऱ्या आपण कशा पार पाडतों त्यावरून कोणत्या प्रकारची राज्यपद्धति आपणांस मिळावयाची हें ठरत असतें. आपण लोक हेच देशाचे मालक असतों आणि ज्या प्रकारचे राजकीय नेते आपण मागतों व जसे नेते मिळण्याची आपली लायकी असते तसे नेते आपणाला मिळतात.

केवळ राजकारणांतच हे प्रश्न उद्‌भवतात असें नव्हे. आपणाला मतदारांच्या अथवा एकाद्या मित्राच्या अथवा एकाद्या डायरेक्टर बोर्डाच्या अथवा कामगार-संघटनेच्या संतापाची भीति असेल. अशा सर्व वेळीं वादग्रस्त मुद्यांत एका बाजूनें जोरदारपणें वहाणाऱ्या मतप्रवाहाविरुद्ध धैर्यानें जायचें कीं त्या मतप्रवाहा-पुढें नमायचें असा प्रश्न जीवनाच्या सर्व क्षेत्रांत उद्‌भवतोच. ज्यांनीं आपल्या तत्त्वासाठीं प्राणार्पण केलें त्यांचें धैर्य फार मोठें आहे. पण ज्यांनीं प्राणार्पण केलें नसलें तरी जिवंत राहूनहि ज्यांनीं धैर्य दाखविलें त्यांचें धैर्य आपण कमी मानूं नये. मरणाला तोंड देण्यांतलें धैर्य जितकें नाट्यपूर्ण असतें तितकें जिवंत राहून दाखविलेलें धैर्य नाट्यपूर्ण असत नाहीं हें खरें. पण त्यांतहि यश आणि अपयश यांचें होणारें मिश्रण तितकेंच तेजस्वी असतें. आपलें जें कर्तव्य आहे तें करताना स्वतःवर त्याचा कांहींहि परिणाम होवो, अडथळे अथवा संकटें अथवा दडपणें कितीहि येवोत, त्यांची पर्वा न करता कर्तव्य पार पाडणें हाच सर्व मानवी नीतिमत्तेचा पाया आहे.

या कथांनीं एक गोष्ट स्पष्ट होईल कीं माणसानें धैर्य दाखविण्यासाठीं त्याला अपवादात्मक सद्‌गुणांची गरज नाहीं, कोणत्याहि जादूच्या मंत्राची गरज नाहीं अथवा काल, स्थल व परिस्थिति यांचा खास योगायोग जमावा लागत नाहीं. कधींना कधीं आपणांपैकीं प्रत्येकाला धैर्य दाखविण्याची संधि मिळणारी आहे. राजकारण हा त्याचा फक्त एक आखाडा असून त्यांत धैर्याची विशेष कसोटी असते इतकेंच. पण जीवनाच्या कोणत्याहि आखाड्यांत धैर्य दाखविण्याचें आव्हान मिळालेलें असो, सद्सद्विवेकबुद्धीप्रमाणे वागताना मित्र, संपत्ति, समाधान, प्रशंसा यापैकीं कशाचाहि त्याग करण्याची पाळी येवो अशा प्रसंगीं कसें वागावें हें ज्याचें त्यानें ठरवावयाचें असतें. जुन्या लोकांच्या धैर्यकथा आपणांस मार्गदर्शन करूं शकतात, धीर देतात, स्फूर्ति देतात. पण खुद्द धैर्य त्या कथा पुरवूं शकणार नाहीं. प्रत्येक माणसानें धैर्य शोधायचें तें आपल्या अंतःकरणांतच शोधलें पाहिजे.

“अध्यक्ष महाराज, जेव्हां एखादा मनुष्य या सिनेटचा सदस्य होतो त्यावेळीं त्याला—

रोजच्या रोज समोर येणारीं मोहकारणें दूर सारण्यासाठीं धैर्य किती बाळगलें पाहिजे—

अकारण होणाऱ्या निंदेपुढें कच खाण्याची प्रवृत्ति मनांत येऊं नये ह्यासाठीं मनावर किती ताबा ठेवला पाहिजे—

लोकांच्याकडून वाहावा मिळविण्याची इच्छा आणि सार्वजनिक कर्त्तव्य पार पाडण्याची प्रेरणा अशा दोन्ही बाजूंनीं ओढाताण चालू असता आपला तोल कसा सांभाळला पाहिजे—

जे खरोखर आपले मित्र असायला पाहिजेत अशांच्या कडूनहि अन्यायाचा भडिमार होत असता तो किती शांतपणें सोसला पाहिजे—

आपल्या हेतूंचा विपर्यास केला जात असताना अज्ञान व दुष्टपणा यांनीं उपरोधिक निंदा केली जात असताना, ज्यांचा स्वार्थ साधला नाहीं म्हणून निराश झालेले जे लोक पक्षीय अथवा खाजगी दुष्टाव्यानें, आपल्या अरक्षित डोक्यावर अन्यायाचा वर्षाव करीत असतात त्यांचा तो वर्षाव कसा सोसला पाहिजे—

या विषयींच्या कठोर दिव्याची त्या सिनेटराला आरंभीं कल्पनाहि नसते.

अध्यक्ष महाराज, ज्या सिनेटराला प्रामाणिक रहायचें आहे त्यानें हें सर्व अगदीं अविचलित वृत्तीनें सोसण्यास शिकलें पाहिजे. कर्तव्याच्या मार्गानें सतत चाललें पाहिजे. काल हाच आपणाला न्याय देईल या निष्ठेनें धीर धरला पाहिजे. जरी असा न्याय मिळाला नाहीं आणि त्याच्या सर्व आशा व आकांक्षा वाया गेल्या व त्याच्या बद्दलची लोकांची स्मृति नष्ट झाली तरीहि, ज्या जनतेचें हित संभाळण्याकरितां व त्याचें रक्षण करण्याकरितां आपण सिनेटमध्यें आलों त्या जनतेचें हित केल्याच्या जाणीवेंतच त्यानें धन्यता मानली पाहिजे”

मेन राज्याचा प्रतिनिधि सिनेटर विल्यम पिट फेसेन्डन यानें १८६६ सालीं व्हर्मांटचा सिनेटर फूट याच्या मृत्यूनंतर त्यांच्या प्रशंसादाखल केलेल्या भाषणांतला उतारा. (या भाषणानंतर सिनेट सभासदांनी राष्ट्रपति अँड्यू जॉन्सन याला निर्दोषी ठरविताना फेसेन्डनला त्यांची वरील भविष्यवाणी खरी करून दाखवावी लागली.)

मराठी ... ९३२२ दा. क्र.

REFBK-0010322